

अशोक

भारताच्या हरवलेल्या सम्राटाचा शोध

चार्ल्स ॲलन

अनुवाद - डॉ. धनंजय चव्हाण

अशोक

भारताच्या हरवलेल्या सम्राटाचा शोध

चार्लस् अलन

अनुवाद- डॉ. धनंजय चव्हाण



ग्रखिल पृथ्वी थोर व्यक्तींचे स्मारक श्राहे. त्यांचा सन्मान फक्त त्यांच्या देशातील स्तंभ व लेखांनी होत नसतो तर परदेशातही होतो, फक्त पाषारणांवर लिहिलेल्या नाही तर लोकांच्या हृदयांत व मनात कोरलेल्या स्मृतींनी.
Thucydides , History of the Peloponnesian War, 404 BC


The
EMPIRE OF ASHOKA
With locations of surviving rock and pillar edicts
English Miles
0 100 200 300 400 500
GANDHARA
Taxila
HIMAVANT (HIMALAYA)
Sindhu
Kapilabastu
Yamuna
Ganga
Kashi
(Varanasi)
Pataliputra
Prayag
MAGADHA
Ganga
Chambal
Son
Bodh-Gaya
Ujjain
Vidisha
Narmada
Tamralipti
Mahanadi
KALINGA
Tosali
Godavari
Krishna
Territorial limits
Rock edicts
Minor rock edicts
Pillar edicts
Major towns
N
W
E
S
TAMRAPANI
(LANKA)
Anuradhapura

अनुवादकाचे दोन शब्द

अनेक वर्षांपूर्वी एका मित्राने मला चार्लस अँलन यांचे बुद्ध अँड द साहिब्ज हे पुस्तक दिले. त्यातील बुद्धाच्या विसरलेल्या आणि हरवलेल्या इतिहासाच्या शोधकथा कुठल्याही रहस्यमय कादंबरीपेक्षा जास्त रोमहर्षक होत्या. भारताच्या त्या महान सुपुत्राची ओळख आपण कशी विसरलो व त्यांच्या पाऊलखुणाही काळौघात कशा मिटल्या गेल्या याने दुःख होणे स्वाभाविक होते पण त्याचबरोबर त्या ऐतिहासिक ठेव्यावर पुनर्प्रकाश कसा पडला हे वाचून त्यापेक्षा अधिक हृषों [स झाला. मनोमन चार्लस अँलन यांचे त्या ग्रंथाबद्दलल आभार मानले.

पुढे चार्लस अँत्तन यांचा अशोक-द लॉस्ट एम्परर ऑफ इंडिया हा ग्रंथ वाचण्यात आला. तो वाचल्यावर केवळ सम्राट अशोकाचीच माहिती मिळाली नाही तर भारतीय इतिहासाचा एक नवीन पैलू कळला. यावेळी मात्र त्यांचा संपर्क शोधून या दोन्ही ग्रंथातून बुद्ध व अशोक यांच्या इतिहासावर प्रकाश टाकल्याबद्दल मी त्यांचे आभार मानले.

चार्लस अँलन यांनी मला ह्या प्रंथाच्या मराठी भाषांतराची संधी दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे हे भाषांतर करतांना मूळ ग्रंथाबह्वल जेव्हा जेव्हा मी काही प्रश्न विचारले तेव्हा त्यांनी लगेचच उत्तर दिले. त्यामुळे मूळ ग्रंथात मता काही त्रुटी वाटल्या तेव्हा त्या त्यांच्या नजरेस आणून देण्याचे धाष्ट्यंही केले. प्रज्ञावंत विद्ठानाप्रमाणे त्यांनी त्याबद्दल खुली चर्चा केली. योग्य ठिकाणी भाषांतरात मामुली बदल करण्याची मुभाही दिली.

मूळ ग्रंथ इंग्रजीत असल्याने मराठी वाचकांसाठी काही बाबी नवख्या आहेत तर काही बाबी आजच्या बोलीभाषांच्या पालि-प्राकृतशी असलेल्या साम्यामुळे सहजगम्य आहेत. काही ठिकाणी अधिक माहिती देणे आवश्यक होते. अशा प्रत्येक ठिकाणी मूळ लेखकाची परवानगी घेणे शक्य नव्हते. पण जेथे जेथे मूळ लेखकाच्या परवानगीशिवाय मी मराठीत काही माहिती विस्ताराने दिली आहे ती चौकोनी कंसात [ ] दिली आहे.

ह्या ग्रंथाच्या भाषांतरात व टंकलेखनात जागृती पाटील आणि ज्योती पाटील यांनी सहकार्य केले. सपना महाडिक यांनीही मोलाची मदत केली.

सर्वात महत्वाची मदत केली ती प्रा. नरेंद्र बोखारे यांनी. त्यांच्या मदतीशिवाय हा अनुवाद शक्यच नव्हता. त्यांच्या मराठी, फ्रेंच, भूगोल, इतिहास, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, महायान पंथ यांतीत्त चौफेर ज्ञानाचा खूप उपयोग झाला. त्यांनी ज्या

आत्मीयतेने भाषांतरात मदत केली त्याबद्दल त्यांचे पुरेसे आभार मानणे अशक्य आहे. ते खऱ्या अर्थाने या ग्रंथाचे सहअनुवादक आहेत.

शेवटी, ह्या अनुवादातील सर्व त्रुटींसाठी मी स्वतः व्यक्तिशः जबाबदार आहे. महामानव डो. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की वाचकांचा प्रतिसाद महत्त्वाचा. मी वाचकांना विनंती करतो की त्यांनी त्यांचे विचार आणि सूचना जरूर कळवाव्या.

-” डॉ. धनंजय चव्हाण
the.lost.emperor@gmail.com

प्रस्तावना शोकरहीत सम्राट -- राजा अशोक

पुराणांमध्ये उ 'ख केला गेलेला राजा अशोक साधारणतः २२५७ वर्षांपूर्वी अखंड भारतावर राज्य करत होता. चाळीसएक वर्षांच्या कालावधीत अशोकाने पूर्ण भारतीय उपखंड एका शासनतंत्राखाली आणला, एका लहानशा संप्रदायात्ता जागतिक धर्माचा दर्जा मिळवून दिला आणि नैतिकतेची जी तत्त्वे प्रसारीत केली त्यांचा प्रभाव आजही आशियाभर जाणवतो.

अशोकाला भारताचा राष्ट्रपिता म्हणता येईल कारण पूर्ण भारताला एकछत्र अमलाखाली आणणारा तो पहित्ता राजा होता. ते कारण पुरेसे नसेत्त तर-- महात्मा गांधींच्या कितीतरी आधी सम्राट अशोकाने अहिंसेचा व पूर्णतया नावीन्यपूर्ण नैतिकतेच्या जोरावर जिंकण्याच्या संक नेचा, धर्मविजयाचा प्रसार केला. तसेच कल्याणकारी राज्य स्थापन करणारा तो इतिहासातील बहुधा पहित्ता शासक असावा.

भारताच्या प्राचीन राजवंशापैकी ज्याचा आवाज आजही सुस्पष्ट व सुपरिचितरित्या ऐकू येतो असा अशोक हा पहित्ता शासक आहे. आणि तो काही सामान्य आवाज नव्हे! त्याने जे सांगितले ते राजधर्माच्या तत्त्वांमध्ये वादातीतपणे पूर्णतया 'एकमेवाहितीय होते व आहे.

ज्यांना सामान्यपणे अशोकाचे शिलालेख व स्तंभलेख म्हणता येईल व जे वस्तुतः **अशोकाची गाथा** आहेत ते भारताच्या पहिल्या लिपीत, अशोककालीन ब्राह्मीत, लिहिले गेले. संपूर्ण भारतीय उपखंडात ते शेकडो शिलांवर आणि घासून गुळगुळीत केलेल्या शेकडो स्तंभांवर कोरले गेले, जेणेकरून कंदाहार ते इरावतीच्या खाडीपर्यंत आणि कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत ती गाथा स्पष्टपणे ऐकू यावी. त्या हृदयस्थानापासून ह्या गाथेचे तरंग सर्वदूर पसरले आणि सर्व आशिया खंडात ऐकू येऊ लागले.

काळचक्राच्या गतीमुळे व मानवी हिंसेच्या तडाख्यामुळे आज फारच थोडे मौल्यवान शिंलालेख वाचता येतील अशा स्थितीत सापडतात -- सात बृहद शिलालेख, डझनभर लघु शिलालेख, अकरा विशाल स्तंभलेख, एकोणीस लघु स्तंभलेख आणि गुंफा शिलालेख. उपलब्ध भारतीय इतिहासातील त्या सर्वात प्राचीन लिखित नोंदी आहेत. फार कमी लोकांना माहीत असलेली बाब म्हणजे ते शितल्लालेख व त्यांना लिहिणारा सम्राट इतिहासाला दोनएक हजार वर्षे संपूर्णतः अज्ञात होता.

अशोकाने आपल्या धम्म-अमात्यांहवारा त्याच्या साम्राज्यात व धम्मदूतांद्वारा साम्राज्याबाहेर पसरवलेल्या शिकवणुकीच्या हृदयस्थानी जी **धार्मिक सहिष्णुता** होती तिचाउ 'ख त्याच्या शिलालेखात आढळतो-- **सर्व संप्रदायांनी सर्वत्र रहावे** ही त्याची इच्छा होती. पण अगदी त्याच्या जीवनकाळातही ज्यांना असे वाटे की त्यांना, आणि फक्त त्यांनाच लोकांना धर्म शिकवण्याचा अधिकार आहे त्या लोकांना हा संदेश सहन झाला नाही.

भारतात एकोणीसाव्या शतकात काम करणाऱ्या इंग्रज इतिहासकारांनी व पुरातत्त्ववेतत्यांनी बौद्ध धर्माच्या क्षतिल्ला मुस्लिम आक्रमणांना चटकन जबाबदार ठरवून टाकले. मुस्लिम धर्माच्या नावाखाली सात शतके अनेक अतिरेक्यांनी खरोखरच भारताची भयंकर सांस्कृतिक व मानवी हानी केली. पण हेही सत्य आहे की गझनीचा महमूद १००८ साली पहिल्यांदा सिंधू पार करून आला त्याआधीच बौद्ध धर्म भारतात शेवटचे श्वास घेत होता. नववे शतक उगवता उगवता भारतातील बौद्ध धर्म इतका गूढ व रहस्यमय झाला होता आणि मुख्य समाजधारेपासून इतका दूर गेला होता की त्यातला नवउन्मेषाने उभ्या राहिलेल्या, भक्तीवर आधारीत, आदि शंकराचार्य व त्याच्या अनुयायांनी प्रसार केलेल्या हिंदू धर्माशी स्पर्धा करणे शक्य नव्हते. भारतातून बौद्ध धर्म नाहीसा होण्याला अजून एक तितकेच महत्वाचे कारण आहे-- ब्राह्मणी असहिष्णुता. हे हिंदुत्ववादी विचारसरणीचे (जिच्या मते फक्त एक हिंदूच चांगला भारतीय होऊ शकतो) अनुयायी क्वचितच मान्य करतात. ही ब्राह्मणी असहिष्णुता अनेकदा इतर मतांच्या व संप्रदायांच्या ढेषाच्या बाबतीत तितकीच कडवी होती जितकी नंतर आलेल्या मुस्लिम अतिरिकी आक्रमकांची त्यांच्या काफीरांविरुधच्या जिहादात होती.

ब्राह्मणी अत्याचाराचे मुख्य पुरावे भारताच्या बौद्ध शेजाऱ्यांकडून-- तिबेट, नेपाळ, ब्रह्मदेश (म्यंमा), श्रीलंका-- मिळतात. शिवाय अनेक ब्राह्मणी ग्रंथही बौद्धांच्या प्रति टोकाचा वैरभाव दर्शवतात तसेच सनातनी हिंदू राजांकडून बौद्धांवरच्या जुलमांची नोंद देतात. याशिवाय पुरातत्त्वशास्त्राचे पुरावे आहेतच.

एकोणीसशे एक्याण्णव मध्ये अयोध्येतील बाबरी मशिद पाडण्यासाठी जमावाला चिथावणी देणाऱ्या अनेक राजकारण्यांना हे माहीत झाले तर आश्चर्य वाटेल की भारतातील सर्वात प्रसिद्ध हिंदू मंदिरांपैकी काही सुरुवातीला जवळजवळ निश्चितपणे बौद्ध स्थाने होती आणि त्यांतील बौद्ध प्रतिकांना पुढे हिंदू मंदिरात मूर्ती रूपात किंवा शिवलिंग म्हणून आत्मसात करण्यात आले आहे. त्यापैकी चार स्थाने बहुधा उत्तरेतील गढ़वाल हिमालयातीत्त बद्रिनाथ, पूर्वी किनाऱ्यावरीत्त पुरी येथीत्त जगन्नाथ मंदिर, केरळातील साबरीमाला येथील अय्यप्पा देवालय आणि पश्चिम महाराष्ट्रातील पंढरपूर येथीत्त विठ्ठल मंदिर अशी आहेत (त्यांची निवड यासाठी की ते भारताच्या चार वेगवेगळ्या कोपऱ्यात आहेत).

मात्र बौद्धांच्या प्रति ब्राह्मणी वैरभावाचा सर्वात मोठा पुरावा आहे ब्राह्मणी मौन-- इतिहासातून भारतीय भूखंडाचा मोठा प्रदेश व्यापणारा व अनेक शतकांचा भारतातील बौद्ध इतिहास काढून टाकण्यात आला. ह्या साध्या अनु. खाने (act of omission) ब्राह्मणी पंडितांच्या व वंशावळी ठेवणाऱ्यांच्या अनेक पिढ्यांनी केलेल्या इतिहासाच्या पुनर्लेखनामुळे अशोकाची गाथा निशब्द केली गेली आणि सम्राट अशोकाला भारतीय इतिहासातून पुसून टाकण्यात आले. अशोकाची गाथा तिच्या धार्मिक सहिष्णुतेत, सर्व जीवांनी एकोप्याने व अहिंसेने एकत्र नांदावे ह्या तिच्या मनीषेने सर्वांशी बोलत होती. पूर्ण भारतभर बौद्ध मताचा प्रचार करून अशोकाने जातीवर आधारीत ब्राह्मणी व्यवस्थेला सरळ आव्हान दिले. अर्थातच तो व त्याची मते सहन होणारी नव्हती.

खरे तर धार्मिक असहिष्णुतेला मर्यादा नसतात. जेव्हा मुघल बादशाह शहाजहान बनारसमधील हिंदू मंदिरे उध्वस्त करीत होता त्याचवेळी इंग्लंडमधील तथाकथित धर्मनिष्ठ देशभर मध्ययुगीन चर्चमधील रंगीत काच-चित्रे व मूर्ती फोडीत होते. अशी अप्रिय सत्ये दडवणारे इतिहासकर विधायक असे काहीही साधत नाही. ज्याची यशोगाथा मौन केली गेली त्या भारताच्या विस्मरणात गेलेल्या सम्राटावर हे पुस्तक लिहिण्यामागचे हे एक कारण आहे.

अर्थात इतर आनंददायी कारणेही बरीच आहेत -- एक असे की अठराव्या शतकाच्या शेवटी व एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला मुस्लिमपूर्व भारताचा इतिहास पुनःप्रकाशित करण्यात आला. युरोपियन प्राच्यविद्यापंडितांनी (ज्यांच्यावर एडवर्ड सैद व त्याच्या अनुयायांनी गरळ ओकली आहे) कष्टपूर्वक सुरू केलेली ही एक विस्मयजनक कथा आहे. प्रत्येक ज्ञानोपासक प्राच्यविद्यापंडीत म्हणा वा पुरातत्त्ववेत्त म्हणा त्यांचा कृतज्ञ राहील. माझी अशी खात्री आहे की अशोकाच्या शोधाच्या ह्या कथेनंतर अत्यंत कडवा राष्ट्रवादीही हे मान्य करेत्त की अनेक उत्साही विदेशी अभ्यासकांनी, त्यातील काहीजण भारताच्या शोषणात भागीदार असूनही, आधुनिक भारताच्या निर्मितीत काहीतरी विधायक कार्य केले. ही पुनशोंधाची प्रक्रिया पहिल्यांदा जॉन के याने त्याच्या १९८९ साली प्रकाशित झालेल्या पण वाचकांकडून उचित प्रतिसाद न मिळालेल्या मौल्यवान पुस्तकात (India Discovered) दर्शविली. मीही माझ्या The Buddha and the Sahibs तसेच The Buddha and Dr Fuhrer या पुस्तकांत ह्या प्रक्रियेच्या काही अंगांचा शोध घेतला.



ब्राह्मणी धर्माचा (सिंह) बौद्ध धर्मावर (हत्ती) विजय. १८९०चे छायाचित्र. हा विशाल सिहि सूर्यमंदिराची राखण करणाऱ्या जोडीपैकी एक आहे. कि शिल्पकलेचे हे एक उत्तम उदाहरण आहे.' (APAC, British Library)

भारताच्या हरवलेल्या सम्राटाच्या ह्या पुनर्शोधाच्या प्रवासाच्या एक एक पावलाचा आढावा घेत पुरातत्त्वशास्त्र व चिकाटीचा अभ्यास यांच्या सहाय्याने मी हेच काम पुढे नेत आहे.

प्राचीन चीन भारत व त्याबरोबर अशोक बाहेरच्या जगासाठी गस ठी कसे हरवले हे पाहिल्याशिवाय हे पुनशोंधाचे कार्य अर्थहीन आहे. सन १९९३-४ मध्ये नालंदा येथील बौड़ विद्यापीठ नष्ट करण्यात आले ती प्रक्रिया उदाहरणादाखल पुरेशी आहे. ह्या पुस्तकाच्या प्रथम प्रकरणात त्या भयानक कांडाची माहिती दिली आहे. त्या संहाराचा व नंतरच्या घटनांची ऐतिहासिक नोंद ठेवण्यासाठी बरेच मुस्लिम इतिहासकार उपस्थित होते, पण दोन सन्मान्य अपवाद सोडले तर इतर सर्व इस्लामच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कुठल्याही बाबींबद्दल उदासीन होते. आता ब्राह्मणी मौनाला मुस्लिम एकक "पणाची साथ मिळाली.

भारतीय पूर्वेतिहासाची नाळ तोडली गेली. भारताचा मुस्लिमपूर्व इतिहास जवळपास विस्मरणात गेला. युरोपातील प्रबोधनकाळानंतर आलेली विजिगिषु मानसिकता भारतात प्राच्यविद्याशास्त्र म्हणून प्रकट झाली. शोधाची व पुनर्प्रकाशनाची प्रक्रिया सुरू व्हायला अठराव्या शतकाचा शेवट यावा लागला.

वाचकाच्या लक्षात आलेच असेल की हा नेहेमीसारखा चरित्रग्रंथ नाही. एडवर्ड सैद ज्यांचा हेष करत असे त्या प्राच्यविद्यापंडितांना त्यांना नेमके काय शोधायचे हे माहित नव्हते. ते संख्येने अ होते. अमाप उत्साह व तर्कशुद्ध बुद्धी याखेरीज त्यांच्याकडे फारशी साधने नव्हती. पण भारतीय भूमीवर सर्व इतिहासाच्या पाऊलखुणा होत्या. जणू एखाद्या जिगसो कोड्याच्या तुकड्यांप्रमाणे भारतात सर्वत्र विखुरलेल्या खुणा होत्या. ह्या खुणा ओळखून, त्यांना प्रयत्नपूर्वक जोडून, चुका करून, चुकांपासून शिकून, चुकीच्या दिशेने जाऊन व परतून, ह्या उत्साही वीरांनी भारताचा इस्लामपूर्व इतिहास शोधायला सुरुवात केली. हे कार्य दोन शतके चालू राहिले. या कष्टांची परिणती अशोक कसा होता व आशिया खंडाच्या घडवणुकीत त्याचा किती मोठा वाटा होता ही त्याची ओळख, पूर्ण नाही पण त्याला समजावून घ्यायला पुरेशी, होण्यात झाली.

ही प्रक्रिया जरी युरोपियनांनी सुरू केली ती एकतर्फी नव्हती. नुकतीच मला श्रीलंकेतील राजगुरू श्री सुभूति महाविहाराचे प्रमुख आदरणीय वस्कादुवे महिन्दवंस महानायक यांच्या चरणी बसण्याची आनंददायी संधी मिळाली. कोलंबो व ग * यांच्यामधे समुद्रकिनारी हा विहार आहे. तेथे मला भिक्षु वस्कादुवे यांचे पूर्ववर्ती थोर पाली पंडित भिक्षु सुभूति व इंग्रज प्राच्यविद्यापंडितांच्या तीन पिढ्यातील प्रदीर्घ पत्राचार वाचायला मिळाला. या पत्राचाराची सुरुवात नवीनच नेमणूक झालेल्या भारतीय पुरातत्त्व विभागाचा प्रमुख जनरल सर अलेक्झांडर कनिंगहमच्या भारहूतच्या १८६१ मधील उत्खननाच्या वेळी झाली. नंतर आत्ला तो मूळ सिलोन सिव्हिल सर्विसमधील पण पुढे पाली पंडित झालेल्या रॉबर्ट चाई र्सच्या १८७० ते १८९०च्या दरम्यानचा पत्राचार. शेवटी आला तो भारतीय लोकसेवेतील व पुढे इतिहासकार झालेल्या विमन्सेन्ट स्मिथने बिहारमधून १८९८ मध्ये केलेला पत्रव्यवहार.

हे कोड्याचे भाग जोडण्याची प्रक्रिया करतांना मी संदर्भाच्या चौकटीत रहाण्याचा प्रयत्न केला आहे, जेणेकरून प्रत्येक पायरीवर वाचकाला त्या प्रकांड बुद्धिशाली संशोधकांपेक्षा थोडीशी जास्त माहिती असावी. मी पुस्तकातील चित्रे समकालीन बनविण्याचा प्रयत्न केला आहे. काही जुन्या छायाचित्रांच्या दर्जाबद्दल मला काहीही खेद नाही. काही वेळा सर्व माहिती एकत्र न देण्याच्या माझ्या निर्णयामुळे वाचकाला आश्चर्य वाटू शकते, अगदी त्याची चिडचिडही होऊ शकते. पण मी तसे मुद्दाम केले आहे. अशाने वाचकाला अशोकाच्या शोधाच्या प्रवासात एकेका खुणेच्या सुगाव्याने साथीदार बनता येईल.

जेव्हा ही शोधाची प्रक्रिया संपते तेव्हा मी शेवटच्या प्रकरणात अशोकाची व त्याच्या वंशाची माहिती दिली आहे. थोड्याफार निश्चित पुराव्यांच्या आधारावर व काही प्रमाणात तर्क वापरून मी ते एक छोटेसे चरित्रात्मक प्रकरण लिहिले आहे.

जे प्राचीन लेख संदर्भासाठी वापरले किंवा येथे उद्धृत केले आहेत ते प्राकृत, पाली व संस्कृत या एकदुसऱ्यांशी संबंधित भाषांतील आहेत. लिपी मुख्यतः ब्राह्मी किंवा खरोष्टी आहे. त्यांची माहिती शेवटी नोंदींमध्ये दिली आहे.

ब्राह्मण शब्दाबद्दल काही-- अशोकाच्या काळात ब्राह्मण हा चार वर्णातील सवोच्च वर्ण होता. अधिकार गाजवत असलेला तत्कालीन ब्राह्मण संप्रदाय आजच्या हिंदू संप्रदायापेक्षा खूप वेगळा होता व ब्राह्मणांचा अधिकारही वेगळा होता. (मूळ ग्रंथात लेखकाने तत्कालीन ब्राह्मणी धर्म व आताचा हिंदू धर्म यांतील ब्राह्मणांना वेगळे दर्शविण्यासाठी तेव्हाच्या ब्राह्मणांसाठी Brahmans तर आताच्या ब्राह्मणांसाठी Brahmins असा शब्दप्रयोग केला आहे. पण मराठी भाषांतरात ब्राह्मण हा एकच शब्द वापरला आहे.-- अनुवादक)

येथे मी पालि-प्राकृतमधल्या असोक नावाऐवजी रूढ असलेले अशोक हे नाव वापरले आहे. काही ठिकाणी धर्म तर काही ठिकाणी धम्म वापरते आहे. हे समानार्थी शब्द आहेत. त्यांचा अर्थ एकच आहे. धर्म शब्दाचे मूळ धृ ह्या आद्य प्रोटो-इन्डो-युरोपियन क्रियापदात आहे. त्याचा अर्थ विश्वाच्या मुळाशी असलेला नैसर्गिक नियम असा होतो. हिंदू, बौद्ध, जैन व शीख सर्वच या शब्दाचा वापर स्वतःच्या संप्रदायासाठी करतात व उच्च अध्यात्मिक अर्थाने पारमार्थिक सत्य असा करतात. हिंदूंमध्ये ह्या शब्दाला अनेक छटा प्राप्त झाल्या आहेत -- कर्मकांडांचे योग्य पालन, जातीसंबंधी वर्तणुकीचे नियम, दिवाणी व गुन्हेगारी कायद्याचा अवलंब इत्यादी.

पण इ. पू. पाचव्या शतकात बौद्धांनी ह्या शब्दाला एक विशिष्ट अर्थ प्रदान केला होता. त्यावेळच्या पाली-प्राकृतमध्ये धम्म हा शब्द वापरता जाई. संस्कृतमध्ये धर्म. बौद्धांसाठी ह्या शब्दाचा अर्थ शाक्यमुनी बुद्धाच्या शिंकवणुकीतील अंतिम सत्य असाही आहे. सम्राट अशोकानंतर बौद्ध जगतात अशोकधर्म (संस्कृत) व असोकधम्म (पाली) म्हणून ओळखला जाऊ लागला. कंदाहार येथील द्विभाषिक शिलालेखात धर्मासाठी ग्रीक शब्द 8158618 वापरत्ता गेला आहे ज्याचा अर्थ चांगला, कर्तव्यनिष्ठ, श्रद्धाळू इत्यादी असा होतो. विद्ठानांमध्ये धर्म वा धम्म या शब्दाचा नक्की कुठला अर्थ अभिप्रेत होता यासंबंधी मतभेद आहेत पण शिंलालेख व स्तंभलेखांवरुन असे दिसते की अशोकाला धर्म या शब्दाचा व्यापक अर्थ अभिप्रेत होता व तो असा -- मौर्य साप्राज्यातीत्त सर्व प्रजेसाठी अध्यात्मावर आधारीत नैतिकता, तसेच एका विशिष्ट धर्माची, बौद्ध धर्माची, शिकवण.

या कथानकाच्या प्राच्यविद्यापंडित नायकांना मात्र धर्म या शब्दाच्या अर्थाला गवसणी घालता आली नाही. (त्यांनी कधी त्याचा '२७॥101? असा अनुवाद केत्ता तर नंतर केवळ '1_8९/ असा केला. मूळ लेखकाने इंग्रजी वाचकांना वाचन सुलभ व्हावे म्हणून ॥॥ ०181 -30/ असा अनुवाद केला आहे --अनुवादक.)

- चार्त्वस अलन, सामरसेट, ऑगष्ट २०११

सम्राट अशोक आणि महाराष्ट्र

मराठी वाचकांसाठी प्रस्तावना

लघु शिलालेखांवरून हे स्पष्ट होते की सम्राट अशोक घुमक्कड होता. कनिष्ठ राजकुमार असतांना तो त्याच्या वडिलांचा प्रतिनिधी म्हणून दोन प्रदेशांचा शासक होता, आधी तक्षशिला व नंतर उज्जैन. नर्मदेच्या शेजारी विंध्य पर्वतातील पांगुरियाच्या लघुशिलातलेखावर लिहिलेल्या ग्राफिटीत तो आपल्याला सांगतो की तो पहिल्यांदा तेथे “राजकुमार वा संसवसमाने इमं देसं पापुनिथ विहरताय”--राजकुमार असतांना त्याच्या साथीदाराबरोबर वनक्रिडेसाठी आला होता. ही साथीदार बहुधा विदिशाच्या बौद्ध व्यापाराची कन्या असावी जिच्यापासून अशोकाला त्याची पहिली दोन मुले, महेंद्र आणि संघमित्रा, झाली ज्यांनी सुरूवातीच्या थर्मदूतांचे नेतृत्व केले. अशोक दोनशे-छप्पन्न दिवसांच्या मध्य भारताच्या दौऱ्यावर आला तेव्हा तो पांगुरियाला जुन्या स्मृतींना उजाळा द्यायला आला.

शिलालेखांच्या पुराव्यांवरून असे दिसते की ह्या दौऱ्यावर तो कमीतकमी कर्नाटकाच्या चितळदुर्गपर्यंत गेला होता. आत्तापर्यंत कर्नाटकातील बेलारीच्या आसपास थोडेथिडके नाही तर दहा लघुशिंलातेख सापडले आहेत. हा योगायोग असू शकतो पण हे सारे शिलालेख एकाच वेळी कोरले गेले होते यावरून असे दिसते की काही काळ तरी बेलारीत किंवा बेलारीजवळ अशोकाचा दरबार होता.

ह्या लेखांत अशोक सांगतो की तो नुकताच 'उपासके', 'शाक्याचा अनुयायी” म्हणजे बौद्ध झाला होता. तो पुढे लिहितो की तो अडीच वर्षे केवळ नावाचा बुद्धानुयायी होता पण आता तो समर्पित उपासक होता. ही प्रामाणिक कबुली त्याने छोट्या बौद्ध संघाला उद्देशून दिली असावी. हा संघ बुद्धाच्या आज्ञेनुसार मानवी वस्तीपासून दूर पण पिंडपात करता येईल इतक्या जवळ रहात होता. आत्तापर्यंतचे लघुशिलालेख मोठ्या वस्तीपासून दूर नैसर्गिक गुहा किंवा स्वतंत्र टेकड्यांवरील पाषाणांवर सापडले आहेत. हे सुरुवातीचे बौद्ध विहार होते. नंतर विहार डोंगरात कोरलेल्या गुफा वा विटांच्या इमारती विहारांसाठी वापरात येऊ लागल्या.

ह्या शिलालेखांच्या एकांत जागा जाणूनबुजून निवडण्यात आल्या होत्या. त्यामुळे मी आत्मविश्वासपूर्वक हे सांगू शकतो की पुढीतत काही वर्षात असे अनेक लघुशिलालेख सापडतील. हे पुस्तक प्रकाशित होत असतांना उत्तर प्रदेशातील कैपूर पर्वतरांगात काही

बौद्ध गुफांच्या जवळ रतनपूरवा येथे तेविसावा लघुशिंलालेख सापडला आहे. हे गेल्या काही वर्षात मोठी प्रगती केलेल्या भारतीय पुरातत्त्व संशोधनासाठी उत्साहवर्धक दिवस आहेत. पण बरेच काही अजून सापडायचे आहे. महाराष्ट्रातील डोंगरामधे भारतातील सर्वात मोठ्या संख्येने बौद्ध, जैन व हिंदु गुफा आहेत-ऱ्यामुळे मला वार्ते की पुणे व औरंगाबादपासून शंभर किलोमीटरच्या परिघात अशोकाचे शिंलालेख सापडतील.

असे शिलालेख सापडेपर्यंत महाराष्ट्र व पश्चिम दक्खन टापूत अशोकाच्या शिंलालेखांची कमतरता भासेल. याता एकमेव अपवाद आहे मुंबईबाहेरीत्त मोठे अशोककालीन बंदर सोपारा येथीत्त शिलालेख आहे. शिलालेखांच्या दुसऱ्या फळीत लिहिल्याप्रमाणे अशोकाचे धम्मदूत या बंद्रातूनच ग्रीक व इजिप्त या मित्रराष्ट्रांकडे गेले असावे.

आज ज्यांना अशोकाचे शिलालेख (RE) म्हणतात ते हत्तीसारख्या आकाराच्या मोठ्या पाषाणांवर कोरलेले आहेत. ह्यांच्यासाठी हेतुतः सार्वजनिक किंवा मोठ्या रस्त्यांच्या चौफुल्यांवरील जागा निवडल्या होत्या. उदाहरणार्थ, गिरनास्चा शिलालेख जुनागढ शहराजवळ पवित्र गिरनार पर्वताच्या पायथ्याशी आहे. हा शिलालेख सर्व जनतेसाठी होता. म्हणून यात अशोक बौद्ध धर्माचा उ 'ख करत नाही. ह्या शिलालेखातील चौदा विभागात जो धर्म अशोक सांगतो तो सर्व धर्मांच्या प्रजाजनांसाठी इष्ट सदाचार व नैतिकता आहे. आणि येथे अशोक (सर्वधर्मसमभावाचीच नाही तर) सर्व धर्मांच्या सन्मानाची घोषणा करतो.


या पुस्तकात मी लिहिले आहे की त्याच्या शेवटच्या वर्षात अशोकाने बुद्ध- धर्माच्या प्रसारासाठी अतिरेकी भूमिका घेतली. राजदरबारातील ब्राह्मणांच्या नेतृत्वाखालील बंडानंतर त्याने सत्ता गमावली असे दिसते. यानंतर त्याच्या साम्राज्याचे तुकडे पडले व अनेक बौद्ध स्थळांचा विध्वंस झाला. तरीही बौद्ध धर्म टिकून राहिला, एवढेच नाही तर त्याची भारतातीत्त अनेक भागात (विशेषतः मध्य भारत व दक्खनात) भरभराट झाली. येथे बौद्ध, जैन धर्म व ब्राह्मणी धर्म एकत्र नांदत होते. हे वेरूळच्या लेण्यांवरून स्पष्ट दिसते. हे अशोकानंतर मध्य भारत व दक्खनमधे आलेली पोकळी भरून काढणाऱ्या राजघराण्यांमुळे झाले.

पुराणाच्या वंशावळीत आंध्र म्हणून उ 'ख असलेला व ज्यांचे अधिक योग्य नाव सातवाहन आहे असा हा राजवंश होता. हे नाव अठराव्या शतकातील सातव्या दशकात सापडलेल्या व भाषांतर झालेल्या नाणेघाटच्या प्रेक्षणीय लेण्यातीत्त शिलालेखात उजेडात आले. इतर काही पुरावे नाहीत आणि ते मूळ नक्की कोण होते याबद्दल भिन्न भिन्न मते आहेत पण सर्वजन हे मान्य करतात की सातवाहनांनी २२०० वर्षांपूर्वी आपली राजधानी प्रतिष्ठाण (आजचे पैठण) येथे स्थापन केली. आणि जर कुणी राजा अशोकाचा खरा चक्रवर्ती वारसदार होता तर तो सातवाहन राजा, पहिला सातकर्णी, होता ज्याने भारताच्या मोठ्या भूभागावर साधारणतः इ. पू. १९६ ते १४० असे अर्ध्या शतकावर राज्य केले.

पहितल्ला सातकर्णी व त्याचे वंशज तसेच त्यांच्या तेवढ्याच प्रभावशाली राण्या यांच्या सहिष्णुतेमुळे बौद्ध धर्माची भारतात वाढ व भरभराट झाली. नंतरच्या राजांच्या असहिष्णुतेमुळे व काळाच्या ओघात झालेल्या क्षतिमुळे आज आपल्याला त्या वैभवशाली प्राचीन संस्कृतीची फारच थोडी उदाहरणे बघायला मिळतात--कान्हेरी, कार्लें, नाशिक, भाजा, बेडसा, शेलारवाडी, जुन्नर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अजिंठा तसेच ज्या अगदी थोड्या स्तूपांचे अवशेष शिं क आहेत (सांची, अमरावती, नागार्जुनकोंडा आणि (नुकतेच सापडलेले) हैदराबादशेजारचे कनागणह). ह्या सर्वांसाठी आपण सातवाहनांचे कणी आहोत.

चार्लस अँलन, २०१५

१. मूितर्भंजन



अनेक शतके विद्येचा दिपस्तंभ असणाऱ्या नालंदाच्या महाविहाराच्या अवशेषांचा एक भाग. पहिले हिले उत्खनन सुरु झाल्यावर अंशत: उघडकीस आलेल्या बालादित्य ालादत्य मंदिराच्या अवशेषांचे हे छायाचित्र पुरातत्त्व संशोधक जोसेफ बेगलार याने १८७२ ला काढले. (APAC, British Library)

इ.स. ११९३-९४ मधील एका प्रातःसमयी दोनशे सशस्त्र घोडेस्वारांनी वाराणसी येथे गंगेचे पात्र पार केले. वाराणसी नगरीला थंडीची चाहूल लागत होती. नवीन लुटीच्या शोधात निघालेले हे सारे घोडेस्वार खिलजीचे गुलाम होते. त्यांचा नेता होता त्याच्या ताटाला ताट लावून जेवणारा व लुटीमधे सारखाच सहभागी असणारा खिलजीचाच एक युद्धपिपासू सरदार-- महम्मद बख्तियार... तापट, साहसी, चलाख, युद्धकलेत निपुण व कुतुबुद्दीन-ऐबकचा सर्वात धाडसी सरदार.

कुतुबुद्दीन स्वतःच घोरीच्या सुलतान महम्मदाचा गुलाम होता. घोरीची प्रजा आपल्या सुलतानाला 'जहानजोस' म्हणजेच जगाला जाळणारा हे बिरूद लावून त्याची “महती गात

असे. या हिवाळी मोहीमेपूर्वी बारा वर्षे आधी या जग जाळणाऱ्या सुलतानाने लाहोर शहर काबीज केले होते, जेथून त्याने आक्रमण करून पुढे भारतात घुसखोरी केली. कुतुबुद्दीन-ऐबकच्या सैन्याने मारलेल्या मुसंडीचे वर्णन पर्शियन (इराणी) इतिहासकार सदरुहिन-महम्मद-हसन निझामीच्या सुलतानी बखरीमधे आढळते.

आपल्या तलवारीच्या जोरावर तो हिंद प्रांतातील नास्तिकतेची घाण दूर करत सुटला... मूर्तिपूजेचे पाखंड दूर करत ... मार्गांत येणारे एकही मंदिर शाबूत न ठेवता जेव्हां तो मेरठ येथे पोहोचला, तेव्हां त्याने सर्व मंदिरांच्या मशिंदी केल्या. पुढे त्याने दि हीच्या कि कडे कूच केले व तेथे छावणी टाकली. दि "१ शहर व त्याचा परिसर मूर्ती व मूर्तिपूजा यापासून मुक्त केले. त्या मंदिरांच्या प्राकारात एकाच देवाला (अ ह) मानणाऱ्यांनी मशिंदी बांधल्या. नंतर ही सर्व सेना हिंदुस्थानाचे मध्यवती ठिकाण "बनारस येथे पोहोचली. तिथे त्यांनी जवळ-जवळ एक हजार मंदिरे नष्ट केली. त्या मंदिरांचे मशिंदींमधे रुपांतर केले. माळ जपणाऱ्यांचे उद्गार व प्रार्थनेच्या बांगेचे आवाज स्वर्गात पोहचू लागले. सर्व ठिकाणी मूर्तिपूजा समूळ नष्ट झाली.

गंगेचे वरचे खोरे इस्लामच्या अमलाखाली आणल्यानंतर महम्मद बख्तियारत्ता त्याची मुजाहिदीनांची छोटीशी तुकडी घेऊन पुढे कूच करण्यास परवानगी देण्यात आली. जिहादच्या विचारांनी भारलेल्या व वर्षानुवर्षे अनेक खडतर मोहिमा पार पाडून काटक बनलेल्या या कडव्या नेत्याला व त्याच्या सैन्याला स्वतःच्या सुखसोयींचा विचारदेखील शिवत नसे. म्हणूनच १६० मैलाचे अंतर लवकरात लवकर कसे पार करायचे ह्या एकाच ध्येयाने ते आपल्या घोड्यांना अत्यंत वेगाने कसे हाकारत असतील याची आपणक ना करू शकतो. आपल्याला परमेश्वरच सारे पुरवेल या विश्वासाने ते तलवार, भाले व ढाली या व्यतिरिक्त जास्त सामान बाळगत नसत. त्यांचे पुढील लक्ष्य होते बिहार. ह्या विस्तृत पठारी प्रदेशावर पाल घराण्याच्या शेवटच्या राजाचे राज्य होते. मुजाहिदीन आक्रमणकर्त्यांना कदाचित या गोष्टीची जाणीव नव्हती की त्यांनी आक्रमण केलेल्या प्रदेशाचे नाव 'बिहार' तेथे असलेल्या असंख्य बौद्ध विहारांमुळे पडले आहे. त्यांना हे देखील माहीत नसावे की बिहार कि च्या पश्चिमेला एक तासाच्या अंतरावर कुठल्याही तटबंदीशिंवाय किंवा कुठल्याही सैन्याशिवाय असे एक शक्तिशाली स्थळ आहे, जे त्यांच्या 'परमेधर एकच आहे' या क नेला थेट आव्हान देऊ शकते. हा नालंदाचा महाविहार होय. जे साऱ्या बौद्ध जगतात धर्मगंज अर्थात आदर्श नीतिमूल्यांचा खजिना म्हणून ओळखले जात असे.

शतकानुशतके "नालंदा" ज्ञानोपासनेचे आशियातील सर्वात प्रमुख स्थान होते. नालंदा येथे (१) न्नासागर (२) रत्नोदधी व (३) रत्नरंजक या तीन बहुमजली ग्रंथातयांमधे बौद्ध ज्ञानसंपदेचे जगातील सर्वांत मोठे भांडार जतन केले होते. पिढ्यानपिढ्या बौद्ध जगातील अत्यंत विद्वान विचारवंत येथे बौद्ध साहित्याच्या अध्ययन व अध्यापनासाठी येत

असत. जरी नालंदाचा सुवर्णकाळ या वेळेपर्यंत ओसरत्ता होता तरी भव्य ग्रंथसंपदेमुळे ही ग्रंथालये अन्य अनेक देशांच्या अभ्यासकांना आकर्षित करीत होती. भारतभूमीवर दहशत निर्माण करणाऱ्या आक्रमक फौजा उत्तरेकडून उतरत आहेत आणि गंगेच्या विशाल प्रवाहातून पुढे सरकत समोर उभ्या टाकणाऱ्या प्रत्येकाला चिरडून, नवीन जागा पादाक्रांत करीत पुढे सरकत आहेत, या बाबत हे विद्वान अनभिज्ञ असणे शक्यव नव्हते.

यशस्वी सेनापती म्हणून महम्मद बख्तियास्चे सूज़् होते- अचानक केलेला भयंकर ह. आपल्या शत्रूने ह 1 केला आहे हे समजण्याआधीच त्याने बिहारचा कि काबीज केला. नंतर त्याने आपला मोर्चा नालंदाकडे वळविला. एका दूताला या महाविहारात कुराणाची प्रत आहे किंवा नाही हे विचारण्यासाठी पाठवून व अशी प्रत तेथे नाही हे कळताक्षणी नालंदा विद्यापीठ व त्यात असणारी संपूर्ण सामुग्री समूळ नष्ट करण्याची आज्ञा त्याने दिली. यानंतर जे काही झाले ते सारे मिन्हाजुद्दीन या घोरीच्या वकिलाने शब्दबद्ध करून ठेवले आहे. तो घोरीच्या आक्रमक फौजेबरोबर असणारा एक वकील होता.

त्या जागेतील बहुतांशी रहिवाशी ब्राम्हण होते... त्या साऱ्यांची कत्तल केली गेली .... त्या ठिकाणी अनेक पुस्तके होती. जेव्हां मुसलमानांनी ही पुस्तके पाहिली तेंव्हा या पुस्तकांबद्दल माहिती घेण्याची त्यांना इच्छा झाली. त्यानी हिंदूंना बोलावण्याचा प्रयत्न केला परंतु तोपर्यंत सारे हिंदू मारले गेले होते. या विजयानंतर मोहंमद बख्तियारतला प्रचंड संपत्तीची लूट मिळाली. ही लूट त्याने आपल्या उदार सुलतान कुतुबुद्दीन-ए-बाख समोर पेश केली आणि खूप मोठा मान मरातब व हुद्दा प्राप्त केला.


परंतु यावरून असे दिसते की नालंदा येथीत्त रहिवासी हिंदू होते असा मिन्हाजुद्दीनचा गैरसमज झाला होता. कारण ते सारे रहिवासी अर्थातच बौद्ध भिक्षू होते. त्यातील अनेक ब्राह्मण जातीचे होते. मात्र मिन्हाजुद्दीनने या गोष्टींचा उ ख देखील टाळला की आक्रमकांनी अनेक एकर पसरलेल्या या जागेला आग लावली होती आणि सर्व ग्रंथालये पूर्णतः जाळण्याचे हे काम त्यांना अनेक महिने पुरले. या कालावधीमधे कित्येक दिवस ही असंख्य हस्तलिखिते जळतांना निघत असणारा धूर हा जणू काही छोट्या टेकड्यांवर तरंगणाऱ्या काळ्या कफनाप्रमाणे भासत होता.

नालंदा महाविहाराबरोबस्च इतर महत्त्वाची बौद्ध शिक्षणाची दोन केंद्रे बिहार व दोन बंगालमधे होती. नालंदा अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडल्यावर लगेचच जवळचे ओदंतपूरी येथील विहार जाळला गेला. त्यानंतर गंगेच्या उत्तर किनाऱ्यावरील विक्रमशीला येथील विहारांची देखील राखरांगोळी करण्यात आली. बिहार येथे सुरु झालेल्या या जाळपोळीचा शेवट दहा वर्षांनंतर महम्मद बख्तियार याने बंगालमधील सेन राजांवर अचानक आक्रमण करून केला. तेथे देखील सोमपुरा आणि जगतलातला या गंगेच्या खालच्या काठावर असलेल्या शेवटच्या उरल्यासुरल्या दोन बौध्द विहारांना संपविण्यासाठी अग्नी व तलवार यांचा वापर केला गेला आणि याखेरीज सापडतील ते अनेक लहान मोठे विहार त्याने नष्ट


केले. पुढे महम्मद बख्तियारचा तो झोपेत असतांना अंथरूणातच खून करण्यात आला. परंतु तोपर्यंत त्याने मुस्लिम साम्राज्य बिहार व बंगालपर्यंत पसरलेले पाहिले होते.

वरवर पाहता जरी नालंदा व इतर बौध्द ग्रंथालयांची त्याने केलेली नासधूस ही अलेक्झांड्रिया येथील शाही ग्रंथालयांच्या जाळपोळीशी साम्य दर्शविते तरी या दोन्ही घटनांमधे जे काही गमावले गेले त्यामधे अत्यंत महत्वाचा फरक दिसतो. अलेक्झांड्रिया येथील विनाश हा टप्प्या-टप्प्याने व अनेक शतकांमधे झाला. परंतु महम्मद बख्तियारने बिहार व बंगाल येथे जे काही नष्ट केले ते मात्र एकदाच व एकाच फटक्यांत कायमचे नष्ट केले. ही घटना उत्तर भारतातील बौद्ध परंपरेसाठी शेवटचा मरणातंक घाव ठरली. यामुळे अपरिमित हानी झाली. भारतीय उपखंडातील हजारो वर्षाच्या बौद्ध परंपरेच्या इतिहासाचे प्रत्येक पान अन् पान पहाता-पहाता डोळ्यादेखत नष्ट झाले. अशा प्रकारे भारतीय बौद्ध परंपरेचा ऱ्हास झाला व लवकरच ती विस्मरणातही गेली.


२. फिरोजशहाचे सुवर्णस्तंभ



सुलतान फिरोझशाहच्या कोटल्याच्या अवशेषांचे सन १८२० मधे एका दिल्लीच्या कलाकाराने केलेले रेखाटन. यात महालाच्या वरच्या मजल्यावर ज्या सोनेरी स्तंभाला (महालाच्या) निर्मात्याने केंद्रस्थानी ठेवले होते ती फिरोझशाहची लाट प्रेक्षक कौतुकाने बघतांना दिसतात. उजवीकडील मस्जिंद अजूनही उभी आहे पण मूळ किल्ल्याचा बराच भाग क्रिकेट स्टेडियमसाठी तोडून टाकण्यात आला आहे. (Metcalfe Album, APAC, British Library)



शिंरात-ए-फिरोझशाहीच्या अट्टिंतिय चिंत्नांकीत प्रतीतील सुलतान फिंरोझशाहचा सोनेरी स्तंभ. हा एका तराफ्यावर ठेवला आहे ज्यानंतर त्याला यमुनेच्या पान्नात खालच्या दिंशेने नेले गेले. (खुदाबक्ष ओरएन्टल पब्लिक लायब्ररी, पाटणा)



जॉन मार्शलने उत्तर बिहारमधे पाहिलेला स्तंभ व त्यावरील (Tyger ingraven) शीर्ष यांचे एका अनामिक चित्रकाराने (बहुधा थॉमस लॉ) सन १७८३च्या सुमारास रेखाटलेले चित्र. हा स्तंभ आज लौरिया-नंदनगड स्तंभ म्हणून ओळखला जातो. (Royal Asiatic Society)

आज भारतमधे गरम चर्चेत असणारा विषय म्हणजे आय. पी. एल. २०-२० क्रिकेट स्पर्धा- एक तडकफडक झटपट धंदा ज्यात पैशाने विकत घेता येतील तेवढे महागडे खेळाडू समाविष्ट असलेले आठ संघ आठ शहरांत वीस-वीस षटकांचा खेळ प्रकाशझोतांमधे तुफान फटकेबाजी करत खेळतात. आठ शहरांच्या नावे आठ संघ, दि "च्या संघाचे नांव "दि १ डेअर ठेव्हील्स" व त्यांचे मैदान म्हणजे फिरोझशहा कोटला स्टेडीयम. कोटला

या शब्दाचा अर्थ कि ॥. परंतु या किल्याच्या भिंती केव्हाच नाहिशा झाल्या आहेत. इ.स. १८८३ पासून या ठिकाणी क्रिकेट खेळले जात आहे. आणि बहुतांश भारतीयांना फिरोझशाह कोटला असे म्हणताच आठवते ती एकच गोष्ट-- क्रिकेट. त्याशिवाय काहीही नाही. काहीजण या नावाचा संबंध दि "तील मुस्लिम भूतकाळाशी जोडतात. अगदी थोड्या लोकांना ही जाणीव असते की या स्टेडियमच्या पलीकडे इतस्ततः विखुरलेले अवषेश हे भारतीय इतिहासातीत्त अत्यंत प्राचीन, असामान्य व महत्त्वपूर्ण पुरातत्त्वीय पुरावे आहेत.

सुतततान फिरोझशाह याने दि) सहाव्यांदा वसविली. सर्वांत प्रथम महाभारत ह्या महाकाव्यात पांडवांनी ही इंद्रप्रस्थ म्हणून राजधानीची नगरी वसविली, असाउ 'ख आढळतो पण तो शंकास्पद वाटतो. असे म्हणतात की त्या तथाकथित नगरीचे काही अवशेष दि) प्राणिसंग्रहात्तायाजवळ “पुराना-किला? येथे जमिनीखाली आहेत. परंतु त्यापेक्षा लाल किल्याच्या पश्चिम व दक्षिणेत्ता असणारे, फारसे नजरेत न येणारे अवशेष हे जास्त खात्रीलायक वाटतात. कारण तेथेच 'कुतुबुद्दीन-ऐबक* (हा तोच, गुलामांचा क्रूर सरदार ज्याच्या अधिपत्याखाली त्याचा गुल्ताम महम्मद बख्तियार याने बिहार व बंगाल पर्यंतचा प्रदेश काबीज केला होता) याने ही जागा दि "तील मुस्लिम सल्तनतीचे पहिले तख्त स्थापन करण्यासाठी निवडली होती.

हिंदूच्या प्रचंड फौजांवर मिळविलेला विजय साजरा करण्यासाठी कुतुबुद्दीन याने इ.स.११९३ मधे कुब्बत-उल-इस्लाम (इस्लामची ताकद) नावाची मशीद बांधली. सत्तावीस हिंदू आणि जैन मंदिरांच्या कोरीव दगडांनी व त्याचे गुलाम असलेल्या कलाकारांकडून त्याने ही मशीद बांधवून घेतली. या मशिदीच्या बाजूला त्याने पन्नास फूट पाया असलेला (लाल सेंडस्टोनचा) कुतुब-अल-मिनार हा अत्यंत कोरीव व देखणा असा भव्य आणि वर निमुळता होत गेलेला विजयस्तंभ उभारता.

इस्लामी जगतातातला सर्वांत उंच, सर्वात भव्य असा कुंतुब-अल-मिनार बांधण्याचा त्याचा मानस होता. परंतु मनोऱ्याचे पहिल्या पाच मजल्याचे नव्वद फूट उंचीपर्यंत काम पूर्ण होता होताच घोडयाच्या टापांखाली येऊन त्याचा मृत्यू झाला.

यानंतर एक शतकाने लाल किल्याच्या ईशान्येला “सिरी” या ठिकाणी तिसऱ्यांदा दि "चा उदय होऊ लागला. सुलतान अ 1उद्दीन खिलजी याने हे काम सुरु केले. ज्याला अरबी कथांमधे 'अ ।1उद्दीनची गुहा म्हटले जाते त्या दख्खनच्या प्रचंड लुटीतील संपत्ती या कामासाठी त्याने वापरली. याने देखील कुतुबुद्दीनच्या मिनाराच्या दुप्पट उंचीचा विजयस्तंभ बांधण्याचे ठरविले व तशी सुरुवातही केली. परंतु त्यावेळी त्याच्या प्रमुख सरदारांपैकी एकाने विष देऊन त्याला मारले आणि हे मिनाराचे काम पहिल्या टप्प्यापर्यंत येऊन बंद पडले.

यानंतर दोन दशकांनी तुघलकाबाद किल्याच्या स्वरूपात धियासुद्दीन तुघलक याने चौथ्या दि "ची उभारणी सुरु केली. या सोहळ्याचा देखील अंत झाला तो असा-- त्याचा

मुल्तगा महम्मद-बिन-तुघततक याने बापाच्या स्वागतासाठी उभारलेल्या तंबूच्या खालीच त्याला गुझ्रून टाकून त्याचा खून केला गेला. इ.स. १३२५ मधे महम्मद-बिन- तुघलक दि "च्या गादीवर बसता. हा अत्यंत विक्षिप्त, स्वतःच्या वडिलांचा खून करणारा शासक स्वतःला “ईश्वरी इच्छेसाठी लढणारा लढवय्या” असे म्हणवून घेत असे. परंतु प्रजा मात्र त्याला 'अल-खूनी' (स्क्तशोषक, स्क्तरंजित) म्हणत असे. प्रजेने असे म्हणण्याचे कारण त्याने घेतलेत्ता एक अतिअनर्थकारी निर्णय होता-- आपली राजधानी साऱ्या प्रजेसह '७०० मैल लांब दक्षिणेकडे दौलताबाद येथे हलवणे आणि दोन वर्षांनी परत मूळ ठिकाणी आणणे. परत आल्यानंतर त्याने पाचवी दि 'जहांपनाह' (विश्वाचा आसरा) या नावाने उभारली व लवकरच ती सोडूनही दिली.

इ.स. १३५९ च्या वसंत क्रतूमधे या रक्तशोषक महम्मदाचा सिंधू नदी किनारी ताप येऊन मृत्यु झाला. त्याचा चुलतभाऊ फिरोझशहा तुघलक याला त्याच्या नियतीला (वा नशीबाला) स्वीकारण्यासाठी चार दिवस लागले. सौम्य स्वभावाच्या फिरोझशाहाचा पिंड राजगादीवर बसण्याचा नव्हता. हिंदू आईच्या पोटी जन्मलेल्या, बालपणीच पितृछत्र हरपलेल्या फिरोझशहात्ता त्याच्या आईने वेगळ्याच प्रकारे वाढवले होते. ज्यांनी फिरोझशहाला दि "च्या सिंहासनावर बसविले त्या लोकांना तो त्यांच्या मनासारखे वागेल असे वाटत असावे. कोणतेही मित्र किंवा मोठी संपत्ती नसल्यामुळे त्यामधून कसाबसा मार्ग काढण्यासाठी त्याने काफिरांवर कर लावून पैसे उभे करण्याचा प्रमुख मार्ग अवलंबला. स्वतःच्या दरबारातील कर्मठ धर्ममार्तंडांना शांत करण्यासाठी त्याने वेळोवेळी मूर्तिपूजकांवर कारवाई केली. यावरून असे दिसते की या सुलतानाचे चाखिय पूर्णपणे निष्कलंक नव्हते. कलिंग येथील (आताचे ओडिशा) समुद्र किनारी असलेल्या प्रसिद्ध जगन्नाथ मंदिरावर कुप्रसिद्ध ह्‌ करण्यास हाच जबाबदार होता. त्यापाठोपाठ झालेल्या जनतेच्या उठावाला त्याने अमानुषपणे चिरडून टाकले. या प्रसंगामुळे त्याच्या चस्त्रिकारांनी सुलतान फिरोझशाह याला इस्लामचा मुख्य स्तंभ असे रंगवले. फिरोझशहाने त्याच्या एक लाख ऐंशी हजार गुलाम कामगारांच्या प्रचंड ताकतीच्या जोरावर अनेक मदरसे, दवाखाने, पूल, कालवे, तलाव, विहिरी, सार्वजनिक इमारती बांधल्या.

यांत सर्वांत उपयुक्त ठरलेली निर्मिती म्हणजे १५७ मैत्त लांबीचा पश्चिम-यमुना कालवा. यामुळे एका मोठया रखरखीत भागाचे रुपांतर हिंदुस्तानातीत्त धान्याच्या कोठारामधे झाले. या नवनिर्मिती बरोबरच फिरोझशहा पुर्नबांधणीबाबत देखील तितकाच उत्सुक होता. इथे तो अत्यंत धोरणीपणे आपल्या व्यक्तिमत्वाची दुसरी बाजू दाखवून देतो की तो पाखंडी वाटावा अशी काही अंशी धार्मिक सहिष्णूताही त्याच्यात दिसते. इ.स. १३२६मधे वीज पडल्यामुळे कुतुबुद्दीनच्या विजयस्तंभाचे वरील दोन मजले तुटून खाली पडले. त्यामुळे आधीच धार्मिकदृष्ट्या महत्वाच्या ठरलेल्या या जागेवर स्वतःची छाप पाडण्याची आयती संधी त्याला चालून आली. त्या भव्य मनोऱ्याची पुर्नबांधणी तर त्याने

केलीच परंतु हे करतांना त्याने स्वतःचे अद्वितीय असे विजयचिन्ह - २४ फूट उंचीचा भरीव पोलादी खांब, जो पूर्वी कोण्या हिंदू मंदिराच्या प्रांगणात उभा होता--तेथे नेऊन बसविले.

उत्तर भारतातील मंदिरांच्या प्रांगणात अशा प्रकारचे बहुतांशी दगडाचे बनलेले व त्यावर ब्रॉँझची गरुड प्रतिमा असलेले शेकडो स्तंभ उभे होते. पुढील काही शतकांमधे हे स्तंभ जमीनदोस्त झाले. त्यांचे रक्षक असलेल्या गरुड पक्ष्यांच्या प्रतिमा त्यातील किंमती धातू मिळविण्यासाठी वितळविल्या गेल्या.

फिरोजशाहने आणून बसविलेला तो स्तंभ नक्कीा कुठून आणला याबद्दल काही माहिती उपलब्ध नाही. पण ते निर्विवादपणे हिंदू धर्मातीलच एक चिन्ह होते. असे असून देखील सुलतानाने हा नास्तिकांचा स्तंभ आपल्या इस्लामी-ताकद मशिदीतील नमाज पढण्याच्या जागेवर बरोबर मध्यभागी मक्‌्केलची दिशा दर्शविणार्यिा भिंतीतील छोट्या झरोक्याच्या अगदी समोर उभा केला. ही एक प्रकारे धर्मविरोधी कृती होती हे यावरून स्पष्ट दिसते की या काळातच शुक्रवारच्या नमाजासाठी ह्या मशीदीचा वापर पूर्णपणे थांबविण्यात आला.

परंतु सुललतान फिरोझशाह हा उघड उघड काफिरांच्या या स्तंभाच्या मोहात पडला होता. दि १ सल्तनत मिळाल्यानंतर त्याचे पहिले काम आपला स्वतःचा बऱ्यापैकी विजयस्तंभ दि "पासून ईशान्येला १०० मैल असलेल्या हिसार या विजय प्राप्त केलेल्या जागेवर उभारणे हे होते. आणि त्याच्या सुदैवाने ३० फूट उंचीचा एकसंघ दगडातून तयार केलेत्ता एक रेखीव खांब हातोहात उपलब्ध होता. हा स्तंभ त्याने आपल्या नमाज अदा करण्याच्या ठिकाणी पुनर्स्थापित केला व त्यावर आपल्या राजघराण्याच्या इतिहासापासून ते स्वतःच्या गौरवशाली राज्यारोहणाच्या प्रसंगापर्यंतची माहिती कोरून घेतली. त्यानंतर त्लवकरच पूर्व दिशेला टोप्रा या खेडयाजवळ शिकारीच्या मोहीमेवर असतांना सुलतानाला अजून एक उभा दगडी स्तंभ दिसत्ता. यमुना आणि गंगा या दोन नद्यांमधील प्रदेशातला हा स्तंभ देखील एकसंघ दगडी शिळेपासून बननलेत्ता होता परंतु आधीच्या स्तंभापेक्षा अत्यंत भव्य होता. पंचेचाळीस फूट लांबीचा व पंचवीस टनाहून अधिक वजनाचा तो स्तंभ अजूनदेखील सुस्थितीत होता. त्याचा चकचकीत चमकदार लाल पृष्टभाग जणू सोन्यासारख्या लखलखीत होता. पुढे असे आढळून आले की ह्या दोन स्तंभाच्या जोडीपैकी हा एक स्तंभ आहे व दुसरा स्तंभ दि च्या पूर्वेस मेरठ येथे रोवलेला आहे. तत्कालीन लोकांच्या मते हे स्तंभ त्या ठिकाणी पांडवांच्या काळापासून उभे होते. परंतु सुलतान फिरोझशाह याने दखल घेईपर्यंत या पूर्वी दि "च्या सिंहासनावर बसलेल्या एकाही राजाचे त्यांच्याकडे लक्ष गेले नव्हते.

मात्र यापूर्वीच्या मुस्लिम आक्रमकांची नजर अन्य काही दगडी स्तंभावर पडली होती. परंतु ते नष्ट न करता जतन करावेत असा विचार पहिल्यांदा फिरोझशहा याच्या मनांत आला. या स्तंभाचे महत्व काय होते हे समजून घ्यायचा प्रयत्न त्याने केत्ता. ब्राह्मण

पंडितांकडे त्याने सखोल चौकशी केली. स्थानिक आख्यायिकेप्रमाणे असे समजले की टोप्रा व मेरठ येथील हे दोन स्तंभ शापीत भीमाच्या (पाच पांडवापैकी सर्वात बळकट शरीरयष्टी असलेला) चालतांना वापरायच्या काठ्या आहेत. भीमाच्या मृत्यूनंतर त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे खांब उभे करून ठेवण्यात आले. या कथेचे कौतुक वाटून फिरोझशहा याने हे स्तंभ अत्यंत काळजीपूर्वक हत्लवून दि "शेला विजयचिन्ह म्हणून न्यायचे ठरविले.

या संपूर्ण घटनेचा साक्षीदार बारा वर्षे वयाचा शम्स-इ-सिराज-अफीफ हा होता. पुढे तो सुलतान फिरोझशहाच्या सेवेत गेला व त्याने सुलतानाचे जीवनचरित्र लिहिले. सुलतानाने स्वतःच्या देखरेखीखाली पार पाडलेल्या स्तंभाच्या वाहतुकीचा व पुनर्स्थापनेचा 'आखो देखा हाल' शम्स-इ-सिराज-अफीफ याने लिहून ठेवला आहे. ही अभियांनिकी विघेची करामतच होती. टोप्रा येथे मिळालेल्या सोन्यासारख्या चमकणाऱ्या स्तंभाला फिरोझशहाने मिनार-ए-झरिन म्हणजे सोन्याचा स्तंभ असे नाव दिले.

कापसाच्या (सांबाळ वृक्षाचा कापूस) गासड्याच्या गासड्या आणण्याचे आदेश दिले गेले. प्रचंड प्रमाणात हा कापूस या स्तंभाभोवती ठेवला होता. ज्यावेळी या स्तंभाच्या तळाची माती खणली गेली त्यावेळी अत्यंत अलगदपणे हा स्तंभ कापसाच्या गाडीवर आडवा पडला. यानंतर स्तंभाभोवतीचा हा कापूस थोडा थोडा काढत काढत हा स्तंभ जमिनीवर आडवा केला गेला... स्तंभाला कुठलीही इजा होऊ नये म्हणून कातडे व वेतासारख्या गवताने स्तंभाला वरपासून खालपर्यंत गुंडाळले गेले. बेचाळीस चाकांचा मोठा गाडा बनविला. त्याच्या प्रत्येक चाकाला 'एक दोरखंड बांधला, जो ओढण्यासाठी हजारो लोक लावले गेत्ले. प्रचंड मेहनतीने व अडचणीतून तो स्तंभ या गाड्यावर चढवला गेला.

हा सोनेरी खांब ओढत यमुना नदीच्या किनारी आणला. अनेक मोठ्या नावा दोरखंडांनी एकमेकींना बांधून त्यावर हा स्तंभ चढविला गेला आणि नदीच्या प्रवाहाबरोबर वाहून नेत दि "पर्यंत पोहचवला.

या वेळेस आपल्या गुलाम कारागिरांच्या फौजेकडून सुलतान आपली राजधानी बांधवून घेत होता. ही नवी दि) त्याने आधीच्या राजांनी बांधलेल्या शहराच्या उत्तरेस बांधून तित्ता फिरोझाबाद असे नाव दिले. परंतु फिरोझशहाच्या पुढील पिढ्यांनी येथील दगड काढून दुसरीकडे वापरले. त्यामुळे मूळ फिरोझाबाद नगरीचे फार थोडेसे अवशेष आज दिसतात. जे शिं क आहे ते सोनेरी स्तंभाच्या सभोवतालीचे फिरोझशहाच्या कि चे (कोट) अवशेष. हा स्तंभ दि गोला आणल्यानंतर अभियंत्यांचे अधिक कौशल्य हा स्तंभ त्याच्या आताच्या स्थांनी उभे करण्यासाठी लागले. फिरोझशहाच्या दुसर्याह एका जीवन चरित्रानुसार (जे बहुधा त्याने स्वतःच सांगितले असावे) या स्तंभाला एका नवीन धार्मिक ओळख दिली गेली. त्याने म्हटले, ‘‘सुलतान फिरोझशाह यांच्या प्रयत्नामुळे व अ हव्या कृपेमुळे हा स्तंभ जो हजारो वर्ष काफीरांची पूजेची वस्तू होता, तो श्रद्धावान लोकांच्या प्रार्थनेच्या ठिकाणी मिनार बनता.’’

फिरोझशहाने मिळविलेली दुसरी भीमाची भव्य काठी (मेरठ येथील स्तंभ) देखील अशाच प्रक्रियेतून गेली. नदीमार्गे दि "पर्यंत आणून फिरोझाबादच्या उत्तरेकडे काही मैल अंतरावर असलेल्या जागेवर शिकारखान्याच्या शामियानाचा मध्यस्तंभ म्हणून तो पुन्हा रोवला गेला. (आज हा भाग जुऱ्या दि "च्या तटबंदीलगतच पण बाहेर आहे.) हा स्तंभ व फिरोझशहा याच्या महालातील स्तंभ हे त्या त्या स्थानातील मध्यवती आकर्षण ठरले आहेत. थोड्या दूर अंतरावरून पाहिले असता या स्तंभांची टोके इमारतीच्या वर आलेली दिसतात.

इ.स. १६९० मधे इंग्रज प्रवाशी विल्यम फिंच याने या शिकारखान्याच्या उरल्यासुरल्या अवशेषांना भेट दिली तेव्हा त्याने याचे असे वर्णन केले, "एक प्राचीन शिकारखाना ज्यातून एक दगडी खांब बाहेर आलेत्ता दिसतो, जो तीन मजल्यापेक्षा उच आहे. चोवीस फूट उंचीच्या ह्या स्तंभाच्या टोकावर एक गोल व अर्धचंद्र आहे. त्या दगडावर काही लेख कोरलेले आहेत असे म्हणतात."

प्रत्यक्षात ह्या दोन्ही स्तंभावरचे शिततालेख पाहूनच फिरोझशहातला अत्यंत कुतूहल वाट्त होते. त्याने त्यांचे मूळ व अर्थ समजून घेण्यासाठी सखोल तपास केला. परंतु त्याचे सारे प्रयत्न निष्फळ ठरते. अनेक ब्राह्मण, अनेक हिंदूना आमंजित करून त्याने हे लेख वाचण्यास सांगितले. परंतु कोणालाच काही उमगले नाही. असे दिसते की कुणालाही या स्तंभावर काय लिहिले आहे किंवा या निर्मितीच्या मुळाशी कोण आहे ह्याची जरादेखील माहिती नव्हती. या सोनेरी स्तंभाला व त्याच्यापेक्षा कमी आकर्षक अशा त्याच्या जुळ्या स्तंभाला फिरोझशहाच्या जीवनात व क नाविश्वात किती मोठे स्थान होते हे त्याच्या त्याच्या अधिकृत चरित्रकार शम्स-इ-सिराज-अफीफ याता कधीच कळले नसावे किंवा त्याने मुद्दामच हे उ 'ख करण्याचे टाळले असावे. परंतु अनेक शतकांनंतर फिरोझशहाच्या जीवनाची ही लपलेली बाजू जेव्हा सिरत-ए-फिरोजशाही नावाचे हस्तलिखित सापडले त्यामधे स्पष्टपणे उघड झालेली दिसते. ही हस्तलिखिते सुलतानाने स्वतःच लिहिली असावीत किंवा कोणाकडून लिहून घेतली असावीत. या हस्तलिखितामधे हे दोन स्तंभ मूळ जागेपासून काढणे, यमुना नदीच्या किनाऱ्यापर्यंत वाहून नेणे, नदीमार्गे दि "पर्यंत आणणे व मशीदीच्या बाजूला असलेल्या आपल्या महालात त्याची पुर्नस्थापना करणे, यासाठी वापरलेल्या अभियांनिकी तंत्राचे इत्यंभूत तपशील सचित्र उदाहरणांनी क्रमश: स्पष्ट केलेले आढळते.

याहूनही अधिक कौतुकास्पद म्हणजे याच हस्तलिखितांमधे सोनेरी स्तंभाच्या स्वागताप्रीत्यर्थ फिरोझशहाने स्वतः लिहिलेली एक कविता आढळते. पर्शियन अतिशयोक्तीच्या अलंकारिक भाषेत सुलतान जाहीर करतो,

कुठलाही पक्षी -ना गरुड -ना सारस

त्याच्या उंचीपर्यंत उडू शकत नाही.

पुढे तो त्याच्या आश्चर्यकारक निर्मितीबद्दल व उभारणीबद्दल सांगतो आणि त्याचे निर्माणकर्तें त्याला

"सर्वत्र सोन्याने कसे रंगवू शकले ज्यामुळे जणू ही सोनेरी पहाट झाली आहे की काय असा लोकांना भास होतो?" अशी पृच्छा करतो.

याचा शेवट करतांना तो विचारतो की हा सोनेरी खांब म्हणजे नक्की काय? आणि याचे उत्तरन सापडल्यामुळे तो लिहितो, "... हे देवदूतांनी पृथ्वीवर आणून लावलेले स्वर्गातील टुबा हे झाड तर नव्हे! किंवा हा सिदया हा स्वर्गीय वृक्ष तर नाही ज्याला माणसे पर्वतच समजले?"

इ.स. १३८८ साली फिरोझशाहचा मृत्यु झाल्यानंतर्चे दशक त्याच्या वारसांच्या आपापसातीत्त विघातक लढायांमधे धांदलीचे गेले. त्याचा सर्वांत मोठा मुलगा फतेहखान याला सरतेशेवटी दि "ची सल्तनत मिळाली. हिसारच्या ईशान्येकडे काही अंतरावर फतेहबाद (विजयनगर) हे शहर स्थापून त्याने आपला विजय साजरा केला. तुघलक घराण्याच्या स्मारकासाठी त्याच्या वडिलांनी स्थापलेल्या हिसार येथील स्तंभाचा वरचा भाग काढून त्याने तो फतेहबाद येथे पुनर्स्थापित केला.

फतेहखानच्या मृत्युनंतर तगेचच तुर्क व मंगोल युद्धाला तोंड फुटले. खोरासनच्या अमीर तिमूर याच्या नेतृत्वाखाली हे युद्ध लढले जात होते. हा मंगोलियाच्या चेंगीजखानचा पणतू होता. याला तैमूरतंग (लंगडा तिमूर) असे म्हटले जायचे. हा तैमूर घराण्याचा संस्थापक होता. ज्यातून पुढे मुघलांचा (मंगोल) उद्य झाला. तैमूरलंग पंजाब प्रांत लुटत व जाळत पुढे निघाला. तैमूरतलंग काही वेळ हिसार येथे थांबला असतांना फिरोझशाहच्या स्तंभाचे उर्वरित भाग त्याने नष्ट केले. शम्स-इ-सिराज-अफीफ याने म्हटल्याप्रमाणे तैमूरने आपल्या दतातील प्रत्येक घोडेस्वारातला लाकडाच्या दोन-दोन मोळ्या आणण्यास धाडले. ही सारी लाकडे त्या स्तम्भाभोवती स्चून त्याला आग लावली. आज देखील हा स्तंभ हिसारच्या मशीदीबाहेर उभा आहे. त्याचा खालील भाग आगीमुळे इतका क्षतिग्रस्त झाला आहे की कोणे एके काळी मुस्लिमपूर्व काळात त्यावर असलेल्या शिलालेखांपैकी आता काहीही उरले नाही.

आपल्या फौजांची गति कमी होत आहे असे दिसल्याने तैमूरने आपल्या बरोबर असलेल्या एक लाख काफीर कैद्यांची कत्तल केली. तेथून पुढेतो दि हवर हु करून ती ताब्यात घेण्यासाठी गेला. या मोहिमेत त्याला इतके नवीन कैदी मिळाले की त्याच्या फौजेतील प्रत्येक सैनिक पन्नास ते शंभर माणसे - बायका - मुले कैदी म्हणून घेऊन आला. तैमूरने आपल्या आत्मचारित्रांत याबद्दल लिहिते आहे, "नियतीच्या लेखणीनेच या शहरातील लोकांचे नशीब लिहिले गेले होते. यामुळेच अ ।च्या इच्छेनुसारच ही आपत्ती या शहरावर आली असेत."

मात्र याह पासून ज्या इमारती वाचल्या त्यामधे फिरोझशाहचा कि व मशीद् यांचा समावेश होता. या ठिकाणी तैमूर स्वतः अ ला धन्यवाद देण्यासाठी आला होता. येथील सोनेरी स्तंभ व त्याचा जुळा स्तंभ यांचे अत्यंत कौतुक करत तो परत गेला. तो म्हटला की तो इतक्या देशांमधे फिरता परंतु अशा प्रकारचे अतुलनीय स्मारक त्याने कुठेच बघितले नाही. मेरठ व इतर प्रतिकार करणाऱ्या ठिकाणी विजय मिळवत तैमूरने आपल्या फौजांना मायदेशी कूच करण्याची आज्ञा दिली, ‘‘समरकंद हीच माझी राजधानी व स्वर्ग’’.

अडीच शतकानंतर व्यापारी विल्यम फिंच हा ग्रेट मुघल बादशाह जहांगीरसमोर अभिवादन करण्यासाठी हजर होणारा पहिला इंग्रज ठरला. आपल्या पूर्वजांप्रमाणेच जहांगीरंदेखीलल एक अस्वस्थ व सक्रीय शासनकर्ता होता. त्याचा दरबार देखील प्रामुख्याने फिरता दरबार होता. यामुळे बादशहाची कृपादृष्टि सदैव आपल्यावर रहावी असे ज्यांना वाट्त होते त्यांना सदैव त्यांच्यामागे फिरत रहावे लागत असे. व्यापारी फिंच याला नव्या दि "ला भेट देण्याची संधी मिळाली. ती फिरोझाबादच्या भग्न अवशेषाच्या उत्तरेला वसली होती. (हे शहर वसवण्याचे काम जहांगीर्चा मुल्लगा शहाजहान याने पूर्ण केले आणि त्याचे नांव 'शाहजहानाबाद' असे ठेवले. आज ते जुनी दि) म्हणून ओळखले जाते.) या ठिकाणी फिंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी सोनेरी स्तंभाचे-- ज्याला आता फिरोझशहाचा लाट म्हणत होते--जवळून निरिक्षण केले. त्यांनी निष्कर्ष काढला की या स्तंभावरील ही न समजणारी अक्षरे ग्रीक भाषेतील असावीत व कदाचित सिकंदर (अलेक्झांडर दि प्रेट) याने भारतीय राजा पोरस याच्यावरील विजयाची आठवण म्हणून कोरली असावीत.

जेव्हा बादशहा जहांगीर व त्याचा दरबार नदीच्या प्रवाहाच्या दिशेने गेला तेव्हा फिंच त्यांच्या मागोमाग गेला. काही कालावधीनंतर ते गंगा आणि यमुनेचा संगम असलेल्या प्रयाग या ऐतिहासिक शहरापर्यंत पोहोचले. जहांगीरने त्याचे नामकरण अलाहाबाद असे केले आणि त्याला एका कि त परिवर्तित करण्याची तयारी सुरु केली. या किल्याच्या तटबंदीच्या आत फिंचला दि "तील ‘‘फिरोजशाहच्या लाट' सारखीच उंची, घेर आणि ख्प असलेला स्तंभ दाखविण्यात आला. याचा मूळ निर्माणकर्ता देखील तोच असावा, असा संबंध फिंचने लावला. त्याने वर्णन केले-

हा स्तंभ दगडाचा असून जमिनीपासून पन्नास हात उंच आहे. जमिनीत अतिशय खोलवर गाडला असल्यामुळे त्याचे खालचे टोक सापडू शकत नाही. त्यावेळची भारतीयांची परिस्थिती बघता हा स्तंभ अलेक्झांडर (सिकंदर) किंवा अन्य कोणी महान आक्रमणकर्त्यांनी उभारला असावा.

अशा प्रकारे इ.स. १६७० मधे अशा अत्यंत महत्वाच्या दगडी स्तंभांचे अस्तित्व भारताच्या उत्तर पठारावर आढळते असे नोंदविण्याची पाळी एक दुसरा इंग्रज, सव्वीस वर्षीय जॉन मार्शल, याच्यावर आली. त्या काळी फारशा दखलपात्र नसलेल्या एका ब्रिटीश व्यापारी संस्थेचा म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापारी प्रतिनिधी म्हणून तो भारतात आला

होता. इ.स. १६७० मधे त्याची नेमणूक ईस्ट इंडिया कंपनीच्या गंडकी नदीच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या सिंधिया या ठिकाणी केली गेली. पाटण्याच्या पुढे गंडकी नदी जेथे गंगेला मिळते त्या जागेपासून नदीच्या वरच्या दिशेने पंधरा मैल अंतरावर हे ठिकाण होते (ही वस्ती गंडकी नदीच्या वारंवार बदलणाऱ्या प्रवाहामुळे वाहून गेली). आज उपलब्ध असणाऱ्या त्याच्या कागदपत्रातीत्त नोंदीनुसार असे दिसते की सिंधिया येथे एकट्या पडलेल्या मार्शलने हिंदू धर्म व तत्वज्ञान याचा अभ्यास सुरु केला आणि त्याही पुढे जाऊन त्याने भारतीय ज्योतिषशास्त्र, औषधशास्त्र व विज्ञान याची सखोल माहिती घेतली. यामुळे पुढे बऱ्याच बदनाम झालेल्या वर्गापैकी तो ''पहिला प्राच्यविद्या संशोधक' ठरता.

सिंधिया येथे आल्यानंतर काही महिन्यांनी त्याला एका आश्चर्यजनक स्तंभाची माहिती मिळाली. त्यामुळे मार्शलने दूरच्या प्रदेशात एक मोहीम हाती घेतली. त्याच्या दैनंदिनीतील नोंदणीनुसार तो सिंथियापासून २९ जुलै रोजी उत्तर दिशेला निघाला आणि १२ मैल अंतरावर बनिया या खेड्यात पोहचल्यावर त्याने एका मोठ्या वृक्षाखाली रात्र घालविली. दुसऱ्या दिवशी आणखी ६ मैल चालून तो आपल्या इप्सित स्थळी 'पोहोचला-- ज्याला स्थानिक लोक ''ब्रिंका-लाटी'' म्हणत. ते त्याला भीमाची लाठी असे वाटले. तेथे मार्शलता एक स्तंभ दाखविण्यात आला आणि बलाढ्य भीम फार फार पूर्वी येथे रहात होता, अशी माहिती त्याला मिळाली. त्याच्या नोंदीनुसार...

तो एका अखंड दगडातून बनविलेला असावा असे मला वारते. त्या स्तंभाच्या किंवा लाठीच्या माथ्यावर वाघ कोरलेला आहे. मी भारतात बघितलेल्यांपैकी हे सर्वात सुबक शिं आहे. त्याचे तोंड उत्तर, ईशान्य व अर्धे पूर्वेकडे आहे. पुढे त्याला असे समजले की फार प्राचीन काळी बलदंड भीम इथे रहात होता आणि... हा स्तंभ म्हणजे भीमाची चालतांना वापरायची छडी होती, जी जमिनीवर जेवढी दिसते त्यापेक्षा दुप्पर जमिनीखाली आहे असे म्हणतात.

जेव्हा मानव या जगात आला तेव्हा भीमाने पाहिले की एवढे लहानसे जीव असून देखीत्त एवढे ललबाड व पुढे गेलेले आहेत. यामुळे त्यात्ता त्या जागेवर रहाणे त्रासदायक वाटू लागले. तो तेथून तार्तार पर्वत रांगामधे निघून गेला व तेथे दोन पर्वतांमधे झोपत्ता असतांना त्याचा मृत्यु झाला आणि त्याचे शरीर बर्फाखाली झाकून गेले.

येथे देखील या उंच स्तंभाचा संबंध हिंदूंनी बत्ताढ्य भीमाशी जोडला असला तरी मार्शलच्या नोंदीनुसार बत्ताढ्य भीमाचे हिमालयाकडे जाणे आणि दोन पर्वतांच्या मधे मृत्यु पावणे ही घटना अशाच दुसर्याम एका प्राचीन घटनेचा प्रतिध्वनी दिसतो. याच प्रकारे शाक्युमुनी बुद्ध देखीत्त कपिलवस्तू या आपल्या मूळ प्रदेशाकडे निघाले असतांना जीवघेण्या व्याधीने प्रस्त झाले आणि दोन भव्य साल वृक्षांमधील मृत्युशय्येवर निर्वाण पावले.

इ. स. १६७६ च्या नोव्हेंबरमधे मार्शलत्ला बढती मिळून बंगालमधल्या बालासोर येथे त्याची बदली झाली. त्यानंतर अवघ्या आठच महिन्यांत एका साथीच्या आजारात त्याचा मृत्यु झाला. याच साथीत त्याचे अनेक साथीदार व अनेक गावकरीही मृत्यमुखी पडले. आपल्या मृत्युपत्रामधे त्याने आपली भारताबहतलची हस्तलिखिते त्याच्या ख़ाईस्ट कॉलेजच्या केंब्रिज येथीत्त दोन मित्रांना दिली. (आता ती ब्रिटीश म्युझियमच्या हार्लियन संग्रहाचा एक भाग आहे.) यामधे भगवद्-गीतेचे सर्वप्रथम केले गेलेले इंग्रजी भाषांतरही होते. जर मार्शल अथवा त्याच्या मित्रांनी या सुरवातीच्या भारतीय अभ्यासाची माहिती छापली असती तर भारतीय प्राच्यविद्येचा अभ्यास एखाद्या शतकाहून अधिक काळाने आधी सुरू झाला असता. जॉन मार्शल याचे बिहारमधील अ वास्तव्य बादशहा जहांगीरचा अत्यंत कर्मठ नातू औरंगजेब याच्या काळात होते. मुघलांपैकी मूर्तिपूजकांचा सर्वात अतिरेकी कर्दनकाळ म्हणून तो स्वतःला जोशाने सिद्ध करत होता. त्याने शैवांच्या मध्यवर्तीं ठिकाण असलेल्या वाराणसी नगरीला आपले प्रमुख लक्ष्य केले. मुस्लिम राज्यकर्त्यांनी या आधी चार वेळेला या नगरीचे काही अंशी 'शुद्धीकरण' केले होतेच. आता ती पाचव्यांदा औरंगजेबाच्या आज्ञेनुसार तोडफोडीला बळी पडली. शेकडो मंदिरे पाडली गेली. त्यापैकी अनेकांचे मशीदीत रूपांतर झाले. या मंदिरापैकी एक सर्वांत जुने मंदिर म्हणजे भैरवाचे मंदिर (भैरव हे शिवाचे उग्र रूप) हे मंदिर शहराच्या उत्तरेला बाहेरच्या बाजूला होते. ललाट भैरव म्हणून शतकानुशतके पूजले गेलेले वाराणसीतील सर्वांत पवित्र असे ते शिवमंदिर होते. त्याच्या आवारात भव्य शिवलिंग स्थापित होते. औरंगजेबाने जवळ-जवळ सर्व मंदिर मशीद बनविण्यासाठी नष्ट केले. परंतु अनपेक्षितपणे या भव्य दगडी स्तंभाला त्याने तसेच ठेवले. यामुळे नवीन मशिंदीला देखील लाट इमामबारा असे म्हटले जाऊ लागले. जेव्हा जॉन मार्शलच्या समकालीन फ्रेंच जॉ बॅतीस्त टॅव्हर्नियर याने इ. स. १६७० च्या मध्यकाळात वाराणसी नगरीला भेट दिली तेव्हा त्याने एका उंच जोत्यावर एक दगडाचा स्तंभ नवीन बांधलेल्या मशीदीच्या बाजूला उभा असलेला पहिला. तेथे आजूबाजूला मुस्लिम कबरी दिसल्याने त्या स्तंभाला तो एक प्रकारचा स्मारक दगड समजता.

तेथे, त्याच्या मध्यभागी जो ३२ ते ३५ फूट उंचीचा एकसंघ स्तंभ तुम्ही पाहू शकता, त्याला तीन माणसे जेमतेम आपल्या कवेत घेऊ शकतील. हा सँडस्टोनचा असून इतका कठीण आहे की माझ्या चाकूने त्याच्यावरमी ओरखडाही काडूशकतलो नाही. स्तंभाच्या सर्व बाजूने प्राण्यांच्या आकृती कोरलेल्या दिसतात. आत्ता दिसतो त्यापेक्षा पूर्वी हा जमिनीच्या बराच वर असावा. तेथे संरक्षण करणाऱ्या अनेक वयस्कर लोकांनी मला खात्रीपूर्वक सांगितले की गेल्या पन्नास वर्षांत हा जवळ- जवळ ३० फूट खचला आहे. त्यांनी अजून असेही सांगितले की भूतानच्या राजापैकी ज्याला इथे पुरले आहे त्याचे हे थडगे आहे. हा आपला देश सोडून येथील राज्यावर आक्रमण करण्यासाठी आला होता. तैमूरलंगच्या वारसांनी त्याला पळवून लावले.

जाँ बॅतीस्त टॅव्हर्नियरकडून या कथेचा चुकीचा अर्थ काढला गेला याचे कारण "भूतान" या शब्दांत दडले आहे, ज्याचा मूळ धातु संस्कृत भाषेतील "बुध? शब्दात आहे, ज्यापासून बुद्ध शब्द आला.

इ.स. १७०७ मधे औरंगाजेबाचा मृत्यु झाला. त्याच्या बहुतांश प्रजेला काहीही दुःख झाले नाही. त्यानंतर मुघलांची ताकद लयाला जाऊ लागली. त्याची मुले, नातू, पणतू यांच्यामधे सत्तासंघर्ष सुरु झाला.

पुढीत्त दोन दशकांमधे कधीतरी एकदा दारूगोळ्याचा स्फोट झाल्यामुळे फिरोझशाहच्या उत्तर दि १ स्थित शिंकारखान्यातीलत स्तंभाचे अनेक तुकडे झाले. (यानंतर अडीचशे वर्षांनी या तुकड्यांची अत्यंत काळजीपूर्वक जुळणी करण्यात आली. यातीत्त एक नेमका तुकडा तेवढा सापडला नाही, बाकी सर्व स्तंभ सध्या ब्रिटीश म्युझियम, लंडन येथे ठेवला आहे.) मुघलांचा ऱ्हास झाल्यामुळे ही राजकीय पोकळी भरून काढण्यासाठी इतर शक्तींचा उद्य झाला. त्यातील प्रमुख म्हणजे पंजाबचे शीख, दख्खनचे मराठे आणि बंगालमधे ईस्ट इंडिया कंपनी. मराठा सरदारांच्या मदतीने-- ज्यांच्यापैकी एक विधवा साध्वी इंदूरच्या राणी अहिल्याबाई होळकर होत्या-- महम्मदाबादचे परत वाराणशीत रुपांतर झाले व या शहराचा एक लक्षणीय पुर्नजन्म घडवला गेला.

आज येथे जाणाऱ्या यात्रेकरूंच्या प्रशंसेस पात्र ठरणाऱ्या मंदिरासमोरील रमणीय सुंदर जागा आणि स्नानाचे घाट यांच्या निर्मितीचे श्रेय पूर्णपणे अठराव्या शतकातील मराठा राजांनी कमावलेल्या संपत्तीला आणि त्यांच्या धार्मिकतेला जाते. याचवेळेस वाराणसीतील बहुसंख्य हिंदूनी आपल्या शहराची "शिवाची नगरी" ही ओळख ज्यामुळे पडली त्या दगडी स्तंभावर पुर्नहक्क प्रस्थापित करण्यासाठी तयारी सुरु केली. जा बॅतीस्त टॅव्हरनियरने मशिदीच्या आवारात पाहिलेत्ता हा स्तंभ शिवउपासकांमधे दिवसेंदिवस लोकप्रिय होत चाललेल्या शिवाच्या लाटच्या लम्रसोहळ्याचा केंद्रबिंदू बनत होता. यामुळे शहरातील हिंदू आणि मुस्लिमांमधे संघर्ष वाढीस ललागला. सन १८०५ च्या उन्हाळ्यात मोहरम सणाच्या वेळी हा संघर्ष शिंगेला पोहचला. याबद्दल स्थानिक इतिहासकाराने लिहिले, "धर्मांध उत्साहाने तणावपूर्ण झालेल्या परिस्थितीत लाटचा इमामवाडा येथे मोहरमसाठी जमलेल्या जमावासमोर काही कर्मठ मौलवींनी तो स्तंभ व हिंदू मंदिरातील मूर्ती तोडून फेकून नष्ट कराव्या अशी चिथावणी दिली." मग जमावाने "शिवजी की लाट जमिनीवर खेचून त्याचे तुकडे-तुकडे केले.

संतापलेल्या हिंदूंनी याला प्रत्युत्तपदाखतल नदीकिनारी औरंगजेबाने उभारलेल्या मोठ्या मशिंदीला आग लावली आणि त्यानंतर साऱ्या शहरभर दंगली उसळल्या. वाराणशी येथील तरुण दंडाधिकारी विल्यम बर्ड याने हिंदू जमावाचे मुस्लिम जमावावरील ह्' रोखण्यासाठी शिपायांच्या दोन तुकड्या पाठवून दंगली रोखण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु दंगत्त रोखण्यात त्यांना यश आले नाही.

याबद्दल बनारसच्या गॅझेटमधे नोंद अशी. "संपूर्ण बनारसमधे अत्यंत गोंधळाची स्थिती होती. अनेक बाजार आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. जुलाहा (मुस्लिम विणकर/कोष्टी) यांच्या वस्तीमधे लूट आणि खून-मारामाऱ्यांचे वातावरण होते. पन्नासएक मशिदी नष्ट झाल्यावर व शेकडो लोकांनी प्राण गमावल्यावस्च शिपायांना परिस्थिती काबूत आणता आली."

सन १८२३ मधे कलकत्याचे बिशप रेव्हरंड रेजिनड हीबर यांनी वाराणशीला भेट दिली तेव्हा त्यांना दिसले की "शिंवाचा स्तंभः जमीनदोस्त झाला होता व ब्राह्मण शिपाई त्याचे रक्षण करीत होते. कदाचित त्यानंतरच्या तीन दशकांमधे कधीतरी तुटलेल्या स्तम्भापैकी एक सर्वांत मोठा सात-आठ फूट उंचीचा भाग तांब्याच्या आवरणामधे बंदिस्त केला गेला आणि सशस्त्र रक्षकांच्या पहाऱ्याखाली ठेवण्यात आला. म्हणून आजपर्यंत कुठलाही संशोधक त्याचा अभ्यास करू शकला नाही. कारण वाराणशीतीत्त या दोन समाजांमधील तणाव आज देखील तितकाच कायम आहे.

ज्या वर्षी औरंगजेबाच्या मृत्यु झाला त्या दरम्यान कापुचिन मिशनऱ्यांचे एक पथक तिबेट्मधे सापर्यंत जाऊन पोहचले. पथभ्रष्ट ख्रिश्चन आपल्याला हिमालयाच्या उत्तरेकडे सापडतीत्त या भावनेने गोव्याच्या पोतुंगीजांनी त्यांना पाठविले होते. आठ वर्षानंतर निराश झालेले कापुचिन तिबेटमधून हाकलले गेले आणि तेथून निघून ते नेपाळच्या काठमांडू खोऱ्यात स्थायिक झाले. त्यांना तेथून पुन्हा एकदा हाकलले जाईपर्यन्त पुढचे अर्धशतक त्यांनी आपले मिशन तेथे चालवले. नेपाळचा हिंदू गोरखा राजा पृथ्वीनारायण शहा याच्या आज्ञेनुसार त्यांना दुसर्यांथदा विस्थापित व्हावे लागले. हा राजा धार्मिकदृष्ट्या असहिष्णु होता व त्याने जातिमेदाला खतपाणी घातले. त्याने देशातील बिगर-हिंदू लोकांना बहिष्कृत केले किंवा गुत्ताम तरी केले. कापुचिनी व त्यांनी धर्मांतरित केलेल्या थोड्याशा लोकांना वाराणशीच्या ईशान्येला १५० मैलावर असलेल्या बिहारच्या पठारावर बेटियाह या गावात आसरा मिळाला. हे ठिकाण इटालियन विद्वान पाद्री मार्को डेला टोम्बा याच्या नेतृत्वाखालील रोमच्या एका कॉन्प्रिगेशनच्या तिबेट व हिंदुस्तान मिशनचे एक मध्यवर्ती ठिकाण बनले.

अदमासे सन १७६९ साली केव्हातरी पाद्री डेला टोम्बा यांने दगडाच्या दोन स्तंभांचा उ ख केला. दोन्ही स्तंभावर शिलालेख कोरलेले होते व माथ्यावर दगडात कोरलेले सिंह होते. (त्यापैकी एक म्हणजे एका शतकाआधी मार्शल यांनी पाहिलेला तिरहट येथील 'वाघ' होय).

ते स्तंभ जमिनीपासून २७ हात उंच होते. त्यावर अत्यंत नैसर्गिक दिसणारे सिंह कोरलेले होते. मी स्वतः मोजल्यावर या स्तंभाचा घेर ७ हात भरला. हा स्तंभ एकाच दगडातून बनवला गेला असावा असे वाटते. मी त्यावर छोट्या कुऱ्हाडीने बरेच घाव घातले व काही गोळ्याही चालवल्या त्यामुळे माझी तशी खात्री पटली. या दोन्ही स्तंभावर काही

अक्षरे लिहिलेली होती. ती मी कागदावर गिरविली व बनारस येथील हिंदू विद्यापीठात आणि काही तिबेटी विठ्ठानांकडे पाठविली. परंतु एकालाही त्यातील एक अक्षरसुद्धा कळले नाही... ही अक्षरे प्राचीन ग्रीक लिपीतील असावीत.

याच कालखंडात जेसुएट पाद्री जोसेफ टायफेन्थेतरर हा गंगेच्या खोऱ्यात अनेक वाऱ्या करत होता. त्याचे वरवरचे लक्ष्य जरी धर्मप्रसार हे असले तरी संशोधन व अभ्यास हा त्याचा प्रमुख उद्देश होता. सन १७५० च्या मध्यावर पोपकडून जेसुएट संघाचे दमन सुरू झाल्यावर टायफॅन्थेलतर भारतातच राहिला आणि त्याने भारतातील भाषा, धार्मिक व वैज्ञानिक अभ्यासासाठी स्वतःला वाहून घेतले. हिंदूचे सारे पवित्र ग्रंथ ज्या प्रतिबंधित भाषेत लिहिले गेले होते ती संस्कृत भाषा शिंकणारा तो कदाचित पहिलाच युरोपियन असावा. ही भाषा प्रतिबंधित एवढ्यासाठी होती की ती देवांची भाषा मानली गेल्यामुळे केवळ ब्राह्मणांनाच ती शिकायचा हक्क होता. देव आणि मानवामधला दुवा साधण्यासाठी स्वतः परमश्वरानेच त्यांची नेमणूक केली होती अशी त्यांची स्वघोषित मान्यता होती.

इ.स. १७५६ मधे टायफेन्थेलर यानेच सर्वप्रथम फिरोझशाहच्या सोनेरी स्तंभावर असलेल्या सर्वांत जुन्या शिंलालेखातीतत मजकूर कागदावर उमटवला. आणि त्यानंतर हे कागद् त्याने त्याच्यासारखाच भारतीय कला व विद्यांचा पहिला अभ्यासक (Indologist), फ्रां्समधीत्त अब्राहम एन्केतिला द्युं पेरा, याच्याकडे पाठविले. परंतु त्यावेळी ईस्ट इंडिया कंपनीने पांडेचरी ताब्यात घेतल्यामुळे द्युं पेरा आपल्या देशवासियांबरोबर पॉडेचरी सोडून चालला होता. त्यामुळे जेव्हा १८८६ मधे द्यु पेरा याने त्याचे Recherches historiques et geographie sur l'indie (भारतीय इतिहास व भूगोलाचे संशोधन) तीन खंडात प्रकाशित केले तेव्हाच टायफेन्थेलरचे संशोधन व विद्वत्ता सगळ्यांना माहिती झाली. टायफेन्थेलर व द्यु पेरा या दोघांनी मिळून युरोपियन प्रबोधनाची पहिली बीजे भारतीय किनाऱ्यावर आणली. फ्रान्सच्या राजकीय महत्वाकांक्षेला ब्रिटीश आरमाराच्या समुद्रावरील वर्चस्वामुळे आळा बसता होता आणि त्यामुळे हे प्रबोधन पुढे नेण्याचे कार्य ब्रिटीशांकडे आले.

हे बीज पुढे अंकुरित होण्यासाठी पार्श्व भूमि तयार करण्याचे काम कायदेपंडित, भाषातज्ञ, बहुआयामी व्यासंगी विठ्ठान असलेल्या असामान्य बुद्धिमत्तेच्या विल्यम 'ओरिएन्ट्त्त' जोन्स याने केले. विल्यम जोन्स एका गणितज्ञाचा मुलगा होता. लहानपणापासूनच विलक्षण प्रतिभासंपन्न असलेल्या विल्यममधे नवीन भाषा अवगत करण्याची विस्मयकारक क्षमता होती. इ.स. १७६८ मधे ऑक्स्फर्डमधून पदवी प्राप्त करतेवेळी जॉन १३ विविध भाषांमधे पारंगत होता. आणि त्याला अन्य अठ्ठावीस भाषा माहिती होत्या. त्याच्या वडिलांप्रमाणे तो सरंजामशाहीच्या आश्रयाला गेला व लार्ड स्पेन्सरच्या मुतल्लाचा, जो त्याचा वारसदारही होता, शिक्षक बनला. तो फारसी व अरबी शिकला. त्याने इतक्या ग्रंथांचे भाषांतर केले की त्याला "फारसी" किंवा 'ओरियन्यत्त*

जोन्स हे बिरूद प्राप्त झाले. त्याच्या मते फिरदौससारखे फारसी कवी होमरइतकेच थोर व वाहवेला पात्र होते.

पैशाच्या सतत टंचाईमुळे जॉन्सने आपले नाव मिडल टेम्पल (तेव्हा फारशी प्रतिष्ठा नसलेली संस्था जेथे गरीब विद्यार्थी शिक्षण घेत) येथे घातले. परंतु त्याची महत्वाकांक्षा दबून राहू शकली नाही. सन ९७७४ मधे त्याला सनद मिळाली. त्याचे तिसरे लोकप्रिय बिरूद ''मनमिळावू? जोन्स असे होते. रायल सोसायटी आणि सोहोतील टर्कस् हेड येथे सॅम्युअल जॉन्सन क्लबमधे तो एक पट्टीचा विद्वान म्हणून चमकू लागला. तो व्हीग पक्षाचेही काम करी (हा तेथील एक सुधारक राजकीय पक्ष होता). ऑक्सफर्डमधे अरबी भाषेचा प्राध्यापक म्हणून नेमणूक होण्याची पात्रता असतांनाही, ते पद त्याच्यासाठीच आहे असे त्याला वाटत असतांना, ते पद त्याला मिळाले नाही. हा त्याला एक जबर धक्का होता. यामुळे तो इतरत्र संधी शोधू लागला व त्याने बंगालमधे नव्याने स्थापन झालेल्या सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशपद स्वीकारले.


युरोपियन लोकांच्या दृष्टिने भारत एका दफनभूमीपेक्षा निराळा नव्हता-- असा एक मृत्यूदायी समुद्रकिनारा की जेथून थोडेच परत येऊ शकत होते. याहीपेक्षा अधिक म्हणजे जोन्स अशा व्हीग विचारसरणीचा होता की ईस्ट इंडिया कंपनी एक भ्रष्टाचारी आणि जुलमी संस्था आहे व तिला बंद पाडते पाहिजे. परंतु ज्या कारणामुळे विल्यम जोन्सने मनाची टोचणी दुर्लक्षित केली ते म्हणजे त्याला देऊ केलेला लठ्ठ पगार. या नुकत्याच निर्माण केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या पदासाठी त्याला वार्षिक ६००० पौंड (आजचे २ लाख पौंड) मिळणार होते व जोन्सने केलेल्या हिशोबानुसार भारतामधे आपण अजून दहाएक वर्षे पुरेशा ऐश्वर्यात घालविली तरी पण तरुणपणीच खिशात ३०,००० पौंड टाकून आपण इंग्लंडला परत येऊ शकतो असा सोपा हिशेब होता. या पदामुळे प्राप्त आर्थिक स्थैर्यामुळे त्याला एका पाद्र्याची मुलगी असलेल्या त्याच्या प्रेमिकेशी लग्न करता आले. तसेच तो उमरावही (Knight) झाला.

भारताबद्दल आकर्षण वाटण्याचे अजून एक कारण म्हणजे जोन्सने जी स्वप्ने इंग्लंडमघे असतांना बाळगली होती ती भारतात साकार होतील अशी शक्यवता त्याला वाटली. कॅप्टन कुकच्या पॅसिफिक समुद्रातील तीन सफरींनी किती मोठे यश मिळू शकते हे दाखवून दिले होते. जर पुरेशी उत्साही व समविचारी माणसे असतील आणि त्यांना योग्य दिशा दाखवणारे नेतृत्व असेत्त तर एक मोठी वैज्ञानिक यंत्रणा नक्की उभी राहू शकते, हे जोसेफ बँक्स ह्या कुकच्या पहिल्या मोहिमेतील्ल सहकाऱ्याने दाखवून दिले होते.

सरतेशेवटी १७८३ च्या सप्टेंबर महिन्यात सर विल्यम जोन्स कोलकात्याच्या किनारी उतरतला-- जणू युरोपियन प्रबोधनयुगाचा प्रतिनिधीच आता होता. अवघ्या ३६ वर्षे वयाचा, नुकताच उमराव झालेला, नवविवाहित जोन्स आपल्या कोटाच्या खिशामधे दोन याद्या घेऊन आला. पहिलीमधे सोळा ''मला भारतात करावयाच्या संशोधनाचे विषय' होते आणि


दुसऱ्या यादीमधे रॉयल सोसायटीच्या धर्तीवर आशिया व इतरत्र मानव व निसर्ग यांचा अभ्यास करणारी, ठरविलेल्या विषयांपर्यन्त सखोलपणे पोहोचणारी, "विविध कालखंडातील ऐतिहासिक दस्तऐवजाचा शोध कसा करावा या बरोबरच त्या विविध परंपरा ज्या लोकांनी पाळल्या किंवा सोडून दिल्या" यांचे संशोधन जेणेकरून "वेगवेगळ्या वेळची शासनयंत्रणा, धार्मिक व व्यवहारीक संस्था यावर प्रकाश पडू शकेल."

भारतीय इतिहासातील एका नवीन अध्यायाला आता सुरुवात झाली होती. विज्ञानाचा प्रकाश आता जोन्सने हाती घेण्याचे ठरवलेल्या सोळा विषयांवर पडणार होता. भारतमातेबद्दल जगाला एक नवीन ओळख मिळणार होती-- "विविध विज्ञानांची दाई, अनेक आनंददायी व उपयोगी कलांची जन्मदात्री, अनेक गौरवशाली घटनांची साक्षीदार, आणि प्रतिभाशाली व्यक्तिना पोषक अशी भूमी". भारताच्या पूर्ण विस्मरणांत गेलेल्या मुस्लिमपूर्व इतिहासाची नवीन समज व मांडणी हा त्याचाच भाग होते.



सन १७९४ मधे झालेल्या अकाली मृत्युच्या अल्पकाळापूर्वी सर विल्यम जोन्स यांच्या आर्थर डेविस या कोलकात्याच्या चित्रकाराच्या चित्रावरून केलेला ठसा.

३. संशोधनाचे विषय



वाराणसीच्या हिंदू मंदिरात एक ब्राह्मण पुराणांचे पारायण करतांना. जेम्स प्रिन्सेपने १८२०च्या दशकात काढलेल्या चित्रावरून तयार केलेला शिळाछाप (lithograph). हे चित्र प्रिन्सेपने Benares Illustrated मधे प्रकाशित केले होते.

सन १८८८ मधे एक होतकरू तरुण पत्रकार रुड्यार्ड किपलिंग याने कोलकात्यास भेट दिली. त्यावेळी तो अलाहाबाद येथील द पायोनियर' या वृत्तपत्रासाठी बंगाल प्रातांवर एक लेख मालिका लिहित होता. मृत्यू आणि रोग याबद्दल त्याला आकर्षण असल्यामुळे तो पार्क स्ट्रीटच्या टोकाशी असलेल्या ख्रिस्ती दफनभूमीमधे गेला. त्याने वर्णन केले ते असे, "ही थडगी म्हणजे जणू छोटी छोटी घरेच होती. आगीने होरपळलेली आणि धूर-धुक्यामुळे

शबल झालेली ही घरे इतकी उंच व जवळजवळ उभी होती की जणू काही आम्ही कुण्या गावातील रस्त्यावर्नच चालत होतो. आपल्या वेळेच्या आधीच दफन केलेले आपले मित्र परत बाहेर येतीत्त अशी भीती माणसांना वाटत असावी आणि म्हणून त्यांनी थडप्यांवर मोठ-मोठ्या शिळा ठेवून जणू त्यांना क्रूरपणे दाबून ठेवले होते.''

किपलिंगने वर्णन केलेली अशीच एक साठ फूट उंच 'क्रूर शिळा'' एका स्मारकावर होती. (आज ती धुवून स्वच्छ करून सफेद रंगाने रंगविलेली दिसते. ज्याचे श्रेय इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड क चरल हेरिटिज, INTACH- तसेच ब्रिटीश असोशिएशन फॉर सिमेट्रीज इन साऊथ एशिंया, BACSA यांच्या संयुक्त प्रयत्नांना जाते.) या शिळेखाली सर विल्यम जोन्स याचे शारीर अवशेष आहेत. ''परमेश्वराला घाबरणारा पण मृत्यूला न घाबरणारा... ज्याने अनीती व अन्याय याशिवाय दुसर्यार कशालाच कमी लेखले नाही, आणि ज्याने प्रज्ञावंत व शील्लवान यांना सोडून कुणालाही स्वतःपेक्षा मोठे मानले नाही''. हे सर विल्यम जोन्स याने स्वतःच स्वतःबद्दल लिहिलेले शब्द होते. परंतु तेथे भारतीय इतिहास व संस्कृतीला पुनर्जिवीत करण्याच्या असामान्य कार्याचा त्याने केलेल्या आरंभाबद्दल्ल काही उ ख दिसित नाही. नियतीने घातलेल्या क्रूर खघावामुळे त्याला वयाच्या अवघ्या ४७ व्या वर्षी (२७ एप्रित्त १७९४) अचानक मृत्यु आला आणि हे अत्यंत महत्वाचे काम खंडित झाले. कलकत्ता सुप्रीम कोर्टामधे वरिष्ठ न्यायाधीश म्हणून काम करत असतांना विल्यम जोन्सने आपल्या उच्च पदाचा पुरेपूर वापर केला. या पदामुळे ईस्ट इंडिया कंपनीचा सर्वोच्च अधिकारी गव्हर्नर जनरल वॉरेन हेस्टिंग याच्याशी त्याचा सहज संपर्क होऊ शकला. त्याची विचारसरणी देखील जोन्ससारखीच - भारतातील ब्रिटीश राजसत्तेचे स्वरूप अधिक लोकाभिमुख असावे अशी-असल्याने त्यांच्यात जवळीक निर्माण झाली, जिव्हाळा निर्माण झाला. काही आठवडयातच हेस्टिंग व जोन्स (जो आज भारतीय विद्याभ्यासाचा जनक, Father of Indian Studies, म्हणून ओळखला जातो) या दोघांनी मिळून एशियाटीक सोसायटीचा पाया घातला. पुढे ती एशिंयाटीक सोसायटी ऑफ बंगाल झाली.

याप्रकारे एक अशी यंत्रणा तयार केली गेली की जिच्याद्वारे एखाद्या विषयाची सर्व प्रकारची माहिती गोळा करणे, मध्यवर्ती ठिकाणी तिचे संकलन करणे, त्याची संदर्भासह पडताळणी करणे, तपासून बघणे, त्याचे भाषांतर करणे आणि त्यातून निघालेले निष्कर्ष सोसायटीच्या मासिक पत्राद्वारा (Asiatick Researches, नंतर Asiatic Researches) सर्वत्र प्रसारासाठी पाठविणे शक्यत झाले.

''नबाबांचा असा प्रदेश की जेथे ब्रिटीश वंशाचे तरुण अधिकारी लोकांचे स्क्त शोषण्यासाठी येतात' अशी बंगालची प्रसिद्धी व्यर्थ वा गैरवाजवी नव्हती. ते पैसे कमावण्यासाठीच येत. एतद्देशीय स्त्रिंयांबरोबर ते आनंदाने रममाण होत परंतु स्थानिक

जनतेसाठी त्यांना फारसा वेळ नव्हता. भारतीयांवर त्यांची अधिकार्शाही वाढत होती. जे थोडे अधिकारी आपले काम ''लोकांचे प्रेम व कृतज्ञता मिळविण्याच्या भावनेने' करत होते त्यांना देखील येथीत्त जनता शतकानुशतके हुकुमशाहीने चिरडलेली, अंधश्रदेची गुललाम, काहीही शिक्षण व अनुभव नसल्यामुळे अज्ञानी, विज्ञान व साहित्याविना रिती असलेली आणि कुठल्याही प्रेमळ करुणामयी बांधिलकी जपणाऱ्या धर्मांचे अस्तित्व नसल्याने निरुत्साही झालेली अशी वाटत होती.

परंतु असे असून देखील जोन्सची नवीन संस्था व हेस्टिंगचा त्याला मिळालेला उदार पाठिंबा यांची बातमी पसल्ययावर स्वतंत्र विचाराचे मूठभर विठ्ठान आपला पाठिंबा दर्शवीत पुढे सरसावले-- आत्तापर्यंत एकटेच वाटचाल करणारे बरेच प्राच्यविद्यातज्ञ जे अनेकदा सहकाऱ्यांची टिंगल-टवाळी सहन करीत आले होते. सोसायटीचे पहिले अध्यक्ष सर विल्यम जोन्स यांच्या मार्गदर्शनाखाली या छोट्याशा चमूने एका नवीनच शिस्तबद्ध कार्यक्रमाद्वारे आपल्या संशोधनाची माहिती इतरांना दिली. त्यांनी कत्तकत्याच्या सुप्रीम कोर्टाच्या इमारतीतील ज्युरींच्या भव्य कक्षात आपापले शोधनिबंध दर मासिक सभेत वाचून दाखवायला सुरूवात केली. याद्वारे फार पूर्वी हरवलेला भारत हळूहळू टप्प्या- टप्प्याने का होईना पण आपली ओळख पटवून देऊ लागला.

सुप्रीम कोर्टाचे कामकाज वर्षातील आठ महिनेच चालत असे. यामुळे सर विल्यम जोन्सला चार महिने सुट्टी असे. त्याने व त्याच्या पत्नीने पहित्ती सुट्टी बनारस येथे घालविली. परंतु नंतर कोलकात्याच्या उत्तरेला कृष्णनगर जि ह्यामधे गवताने शांकारलेला एक बंगला स्वतःचे हक्काचे घर म्हणून विकत घेतला. त्याच्या सहकाऱ्यांनी नंतर लिहिले, ''या ठिकाणी वादी-प्रतिवादी यांच्या वादावादीपासून दूर असतांना त्याचे मन अत्यंत सहज भावाने त्याच्या आवडत्या विषयांकडे वळले. संस्कृत भाषेतील ग्रंथाचा अभ्यास, वनस्पती शास्त्राचा अभ्यास, साहित्य व विज्ञान यांच्याबाबत पत्रव्यवहार यामुळे त्याला एक क्षणही मोकळा वेळ मिळत नसे.'' कृष्णनगर येथे विल्यम आणि त्याची पत्नी अँना मारिया जोन्स यांनी उमदेपणाने भारतातील सर्व गोष्टी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे जोन्सचे हायकोर्टातील बरेचसे सहकारी नाराज होते. कोर्टाबाहेर जोन्सच्या संपर्कात जे पंडित व इतर भारतीय आले होते ते खूपच खूश होते. त्याचा एक खूप जवळचा मित्र सर जॉन शोअर याने ही किती असामान्य गोष्ट होती याबद्दल उ 'ख करतांना लिहिले, ''त्याचा मूळ भारतीयांशी संवाद साधण्याकडे कल होता. त्यात तो खूप कुशल होता. ज्या कोणी त्याची सेवा केली किंवा त्याला कामामधे सहकार्य दिले त्यांना त्याने मुक्त हस्ते बक्षीसे दिली आणि त्याच्या आश्रितांना त्याने मित्रांप्रमाणे वागविले.''

जोन्सची भारताबरोबर्ची ही प्रेमकहानी संगीताच्या माध्यमातून सुरु झाली. या संगीताचा गोडवा त्याच्या मित्रांना कळलाच नाही. ह्या प्रेमाची व्याप्ती वाढली आणि त्याची परिणती हिंदू व मुस्लिम सुफी साहित्याच्या आवडीत झाली. हे मुख्यत: फारसी

भाषांतरामुळे झाले. वॉरेन हेस्टींगलता ह्या विषयांची आवड होती. तो आता निवृत्त होऊन इंग्लंडला परत गेला होता. विल्यमने त्याला एका पत्रात लिहिले,

"मी गोपींच्या प्रेमात पडलो आहे. कृष्णाकडे आकर्षित झालो आहे. रामाचा उत्साही प्रशंसक झालो आहे. आणि ब्रम्हा-विष्णू-महेश या जिमूर्तीचा श्रद्धाळू झालो आहे. अर्थातच युधिष्ठिर, अर्जुन, कर्ण आणि महाभारतातील अन्य योध्ये मी जेव्हा इलियड पहिल्यांदाच वाचले होते तेव्हा त्यातील अगॅमेमोन, एजॅक्स आणि अचिलिस वाटत त्यांच्यापेक्षाही मत्ता थोर वाटू लागले आहेत."

ह्या आवडीमुळे हे सारे मूळ ग्रंथ आपण वाचावेत अशी इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली. ती इच्छा प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सर विल्यम जोन्स याने पंडित रामलोचन याची मदत घेतली. तो एक आगळा-वेगळा विद्वान होता. वेगळा यासाठी की तो ब्राह्मण नसून वैश्य होता, शेती करीत होता आणि वैद्यकीय अध्ययनासाठी तो संस्कृत शिकला होता. काही महिन्यातच जोन्सने स्वतःला "हिंदू ज्ञानाच्या निर्मनुष्य रस्त्यांवर चालणारा एक हर्षभरीत घुसखोर" असे जाहीर केले. जोन्सने अचूक वेळ साधली होती. याच्या पाच वर्ष आधी त्याच्या ऑक्सफर्डमधील परिचित दोन व्यक्तींनी, नॅथानियल हलहेड आणि चार्लस वि न्सन यांनी, एकत्रपणे पहिल्यांदाच बंगाली छापखान्यात वापरण्याचे खिळे (typeface) बनविले होते. त्यामुळे हैलहेडला 'बंगाली भाषेचे व्याकरण हे पुस्तक प्रकाशित करता आले. आतापर्यंत जेव्हा जेव्हा त्यांनी हिंदूंच्या पवित्र ग्रंथांबद्दल ब्राह्मणांकडे चौकशी केली, तेव्हा तेव्हा त्यांना अभेद्य अशा नकारात्मक तटबंदीला सामोरे जावे लागले. परंतु अशी वागणूक केवळ संस्कृत ही अत्यंत पवित्र भाषा असून ब्राह्मणेतरांनी वाचू किंवा बोलू नये अशामुळे नव्हती, तर शतकानुशतके मुघल शासनामुळे ब्राह्मणांचा परंपरागत अधिकार कमी होत गेला होता आणि त्यामुळे त्यांची संस्कृत भाषेवरील मक्तेदारी ही थोड्या उर्ल्या-सुरल्या अधिकारांपैकी होती. ते ज्ञान दि तील मुघल बादशाहांच्या प्रतिनिधींना उपलब्ध करून द्यायची त्यांची जरादेखील इच्छा नव्हती. कारण या वेळेपर्यंत ईस्ट इंडिया कंपनी बंगालमधे सुत्वतान शाह- आलमच्याच अमलाखाली सत्ता गाजवत होती.

परंतु बंगाली व्याकरणाचे पुस्तक आलेले पाहून व विं न्सने उभारलेला बोलीभाषेचा छापखाना पाहून त्याचा सारा विरोध मावळला. बंगालमधील टूरदृष्टि असणाऱ्या पंडितांना या गोष्टीची जाणीव होती की ब्राह्मणी ज्ञानाचा ऱ्हास होत आहे आणि संस्कृत केवळ कर्मकांडाची भाषा रहाण्याचा धोका आहे. ज्या ब्राह्मणांनी रवि न्सनला परतावून लावले होते ते स्वतःच आता त्याला संस्कृत शिकविण्याचा प्रस्ताव घेऊन त्याच्याकडे गेले. यामुळे एक वर्षाच्या आतच इंग्रजी-संस्कृत व्याकरण हे पुस्तक पहिल्यांदा छापले गेले. पंडितांच्या मार्गदर्शनाखाली वि न्सनने अन्य पवित्र हिंदू धर्मग्रंथ भाषांतरीत करण्याचे काम हाती घेतले. त्याची सुरुवात भगवदु-गीतेपासून झाली. हे काम पुष्कळसे बाकी असतांनाच वि न्सन आजारी पडल्यामुळे त्याला निवृत्ती घेऊन इंग्लंडत्ता परतावे लागले.

आता रवि न्सनमुळे रिकामी झालेली जागा जोन्स याने भरून काढली. त्याच्या अलौकिक प्रतिमेमुळे त्याची प्रगती खूपच वेगाने झाली. संस्कृत भाषेतील शब्द अगदी बाह्मणांना अपेक्षित त्याचप्रमाणे तो अचूक उच्चारू लागला. पुढे त्याच्या असे लक्षात आले की संस्कृत ही देववाणी नसून तिचे ग्रीक व लॅटिन भाषांशी कमालीचे साधर्म्य आहे. त्या इतक्या जुळलेल्या आहेत की कुठल्याही भाषातज्ञाची या तीनही भाषांचा अभ्यास केल्यावर खात्री पटावी की केवळ योगायोगाने या तिन्ही भाषांमधे (लॅटिन, ग्रीक, संस्कृत) साम्य नसून त्या एकाच समान उगमस्थानातून पुढे प्रवाहित झाल्या आहेत. पंडित रामलोचन आणि हेस्टिंगसाठी काम केलेला दुसरा एक ब्राह्मण पंडित राधाकांत यांच्या सहकार्याने जोन्सने आम जनतेसमोर आजपर्यंत पश्चिम जगताला अनभिज्ञ अशा ह्या पवित्र ग्रंथाचा व इतर साहित्याचा खजिना खुला करण्याचे काम केले.

जोन्सच्या स्वलिखित टिपणीमधून मुस्लिमपूर्व भारताच्या इतिहासावर प्रकाश टाकला गेला. त्याला आलेला पहिला अडथळा म्हणजे युरोपियन आणि मुस्लिम तज्ञांना समजू शकतील असे ऐतिहासिक दस्तावेज उपलब्ध नव्हते. त्याला अल्-बीरूनी आणि २६ व्या शतकातील फारसी इतिहासकार फरिस्ता यांनी लिहिलेल्या भारतीय मुस्लिमांचा इतिहासाबद्दल बरीच माहिती होती, तरी तिच्या जोडीला इतर जातीधर्मांमधे काहीही साहित्य वा पुरावे उपलब्ध नव्हते. ब्राह्मणांकडून जी सर्वात चांगली साधने उपलब्ध होऊ शकली ती म्हणजे अठरा पौराणिक ग्रंथ. या सर्व धार्मिक ग्रंथांना एकत्रितपणे 'पुराणे' म्हणत. ती प्रामुख्याने विश्वाची उत्पत्ती कशी झाली याबद्दलच्या कथा, देवी-देवतांची मिथके व अर्ध-ऐतिहासिक कथांनी भरलेली होती.

याबरोबरच पुराणांमधे अनेक विश्वोत्पत्ती कथा, विविध देवदेवतांची, यक्ष- गंधर्वाची आणि वेगवेगळ्या राजांच्या व क्रषीमुनींच्या वंशावळीची माहिती व त्यास अनुसरून कथा दिलेल्या होत्या. जे काळाच्या उत्पत्तीपासून या जम्बुद्दीपावर (भारतीय उपखंडावर) राज्य करीत आले अशा राजघराण्यांच्या वंशावळी पुराणांत दिल्या होत्या. या सर्व वंशावाळींचे जोन्स याने एकत्रीकरण करून जे निष्कर्ष काढले त्याला त्याने ‘‘भारतीय कालगणना शास्त्रांचा संक्षिप्त ताळमेळ' असे म्हटले.

या कालगणनेमधे सर्वप्रथम उऊ 'ख मनु या मानवाचा आता ज्याला ब्रम्हाचा पुत्र म्हटले होते. त्याच्या पुढच्या पिढ्या दोन शाखांमधे विभागल्या गेल्या. एक सुर्यवंशी आणि दुसरी चंद्रवंशी. त्यांच्या वंशजांनी अनुक्रमे अयोध्या आणि प्रतिहार येथे आजपासून ते सुमारे हजार वर्षापूर्वीपर्यंत राज्य चालविले. या कालावधीत झालेल्या अनेक राजांची नांवे पंडित राधाकांत यांनी विविध पुराणांतून परिश्रमपूर्वक शोधून काढली.

या ऐतिहासिक घटनांच्या मालिकेवरून असे दिसते की राजघराण्यांनी शतकानुशतके भारतातीत्त विविध राज्यांवर (जनपदांवर) राज्य केले. परंपरागतरित्या जम्बुद्दीपात अशी पंधरा जनपदे होती. त्यापैकी इतरांपेक्षा कितीतरी अधिक प्रबळ होते ते

सर्वात शक्तिमान आणि दीर्घायु मगध जनपद. त्याची ओळख पटण्यासाठी जोन्सला फार कष्ट घ्यावे लागले नाहीत. तेव्हाच्या बंगालच्या पश्चिम भागाला बिहार म्हणत--मध्य गंगेच्या पठाराच्या भागातील पाटणा हे मध्यवती शहर असलेले आजचे बिहार राज्य. पुराणकथेनुसार राजा बृह्द्रथ याने मगध राज्य वसविले व त्याच्या वंशजांनी १००० वर्षे मगधावर आधिपत्य गाजविले. त्यानंतर प्रद्योताने १३७ वर्षे राज्य केले. त्यानंतर त्याला हरवून हर्यकांनी राज्याचा ताबा घेतला. त्यापुढे त्याला बाजूला करून शिशुनागाने व त्याच्या दहा पिढ्यांनी राज्य चालविले. त्यांचे राज्य हीन कुळात जन्मलेल्या नंदाने उत्लथून टाकले. पहिला नंद हा वर्णव्यवस्थेतील चार वर्णांपैकी सर्वांत खालच्या वर्णातील शूद्र जातीतील होता. क्षत्रिय राजा शिंशुनागाचे सिंहासन बळकावून राजा हा नेहमी क्षत्रिय असला पाहिजे (किंवा कधी कधी ब्राह्मण चालेल) या धर्मग्रंथाच्या स्वाभाविक प्रस्थापित मान्यतेल्ता त्याने हादरा दिला.

पण पुराणांच्या लिखाणात असे भासविले गेले होते की ते इतिहास सांगत नसून भविष्य वर्तवतात. त्यांनी एक भाकित असे केले की एक सदाचारी ब्राह्मण चाणक्य नंद वंशाला उखडून टाकेल आणि तो चंद्रवंशापैकी एकाला निवडून त्याचा मगधाचा सम्राट म्हणून राज्याभिषेक करील.

नंद हे नांव जोन्सत्ता त्याच्या अफाट वाचनामुळे आधीच माहित होते. त्याने लिहिले, "नंद या नावाच्या राजाचा संस्कृत ग्रंथामधे बयाच वेळा उ 'ख केलेला आढळतो. त्याने १०० वर्षे राज्य केल्यानंतर त्याची एका कुशत्त, क क, हुशार पण तापट व सूडभावनेने पेटलेल्या चाणक्य नावाच्या ब्राह्मणाकडून हत्या करण्यात आली आणि चाणक्याने मौर्यट घराण्यातील चंद्रगुप्ताला सिंहासनावर नेऊन बसविले."

सम्राट चंद्रगुप्ताने मौर्य राजघराण्याची सुरवात केली. त्याने व त्याच्या वंशजांनी पुढील १३७ वर्षें मगध राज्य चालविले. चंद्रगुप्त स्वतः २४ वर्षें गादीवर होता. त्याच्या मुलाने, ज्याची विविध नावे वरीसारा, विंदुसार किंवा बिंदुसार अशी आली आहेत, २५ वर्षे राज्य केले. मौर्य राजांपैकी तिसरा राजा चंद्रगुप्ताचा नातू अशोक हा होता. ज्याला कधी-कधी अशोकवर्धन (Ashoka the Great) असे म्हटले गेले. त्याने 35-३७ वर्षे राज्य केले. ब्राह्मणी इतिहासामधे अशोकाला काहीही महत्व दिलेले नाही. पुराणकर्त्यांनी अशोकाला अशोकवर्धन का म्हटले जायचे, याबद्दल काहीही स्पष्टीकरण दिलेले नाही किंवा अशोकानंतर पुढचा मौर्य शासक कोण होता, याबद्दलही त्यांच्यात एकमत नव्हते. पण शेवटच्या दोन राजांबद्दल मात्र एकमत होते.

मौर्य घराण्याची वंशावळी

विष्णू पुराण	**मत्स्य पुराण**	**वायु आणि ब्रम्हांड पुराण**
चंद्रगुप्त	चंद्रगुप्त	चंद्रगुप्त
बिंदुसार	बिंदुसार	बिंदुसार
अशोक	अशोक	अशोक
सुयशहास	----	कुणाल
दशरथ	दशरथ	बंधुपालित
संगत	संप्रती	इंद्रपालित
सालीशुक	----	देववर्मन
सोमवर्मन	----	----
शतधन्वन	शतधन्वन	शतधन्वन
बृहद्रथ	बृहद्रथ	बृहद्रथ

वेगवेगळ्या वंशावळींच्या तक्त्यां वरून हे नक्की दिसते की मौर्य घराण्याच्या शेवट हा त्यांचा दहावा व शेवटचा शासक बृहद्रथ याच्या हत्येमुळे झाला. त्याचा ब्राह्मण सरसेनापती पुष्यमित्र शुंग याने कट करून सैन्य संचालनाच्या मैदानांत त्याला ठार केले. तेथून शुंग घराण्याची सुरुवात झाली. त्यात दहा राजे होऊन गेले. त्यांनी एकत्रितपणे ११२ वर्षे राज्य केले. त्यातील शेवटच्या राजाची हत्या वासुदेव कण्वाने केला. कण्व राजघराणे जवळ-जवळ ३४५ वर्षे सत्तेवर टिकले आणि ते जाऊन त्यांच्या ठिकाणी आंध्र आले. ते ४५२ वर्षे सत्तेवर टिकले. त्यांचा राजा चंद्रबीजाच्या मृत्युनंतर आध्रांची सत्ता संपुष्टात आली. याबद्दल सर विल्यम जोन्सने उ ख केला, "मगधाचा एक स्वतंत्र राज्य असाउ ख यापुढे कुठे दिसत नाही". हे सर्व आकडे गृहीत घरून जोन्सने अंदाज केला की मौर्य राजघराण्याने मगधावर इ.पू. १३६५ ते १४९२ एवढा काळ राज्य केले असावे.


युरोपियन भाषा आणि संस्कृत भाषा याची उत्पत्ती एकाच उगमस्थानापासून झाली असावी या आपल्या शोधामुळे उत्साहीत होऊन जोन्सने या कालगणनेच्या तकक्त्या शी साधर्म्य दाखविणारे अजून काही पुरावे मिळू शकतील का हे पाहण्यास सुरवात केली.

जोन्स इतका विदठ्ठान असूनही ह्या मान्यतेत वाढला होता की आट््म (Adam), नोहा आणि बायबलमधील प्रलय ही ऐतिहासिक सत्ये आहेत. भारतीय इतिहास हा प्राचीन इजिप्तशी आणि जुन्या कराराशी बांधला गेलेला असावा अशी खात्री पटल्यामुळे त्याने भारतीय इतिहास आणि बायबलमधील विविध घटनांच्या तुलनात्मक कालगणनेचा एक तक्ता मारूनमुटकून तयार केला. त्यामधे भारतीय मनु व बायबलमधील आदप यांना त्याने एकच मानले. या चुकीमुळे जोन्स व इतरांचा असा विश्वास बसला की


शाक्यामुनी बुद्ध हा आफ्रिकेतून आलेत्ता एक विजेता आक्रमक असावा. यामुळे पुढील काही दशके तरी भारतीय संशोधनात गोंधळ झाला.

मार्को पोलो परतल्यापासूनच भारतीय धर्माबद्दलच्या विविध वृत्तांतामधे एका योध्याचे, तत्त्वज्ञान्याचे, पैगंबराचे नांव जे कधी बौद्ध, बोध, शाक््यतमुनी, गौतम, गोतमा तर कधी फो अशा विविध नावांनी युरोपमधे सर्वदूर पसरले होते. परंतु खुद्द भारतामधे हा नक्की कोण होता हे सांगू शकेल असा कुठलाही पुरावा नव्हता. सरतेशेवटी बुद्ध हेच त्याचे योग्य नाव आहे असे जोन्सने ठरविले. त्याचा या देशाशी संबंध आहे की नाही हे दाखवणारा कोणताही पुरावा नव्हता. हिंदू ग्रंथांमधे बुद्धाचा क्वचित केलेला उ 'ख जर्र आढळतो परंतु त्या काळी भारतामधे एकही बौद्ध नव्हता, कुठलेही बौद्ध साहित्य नव्हते अथवा कोणतेही बौद्ध स्मारक ज्ञात नव्हते.

जसजसे एशियाटीक सोसायटीला देशभर पसरलेले नवीन प्रतिनिधी मिळू लागले तसतसा हा अज्ञानाचा अंधःकार थोडा थोडा दूर होऊ लागता. थॉमस ला व जॉन हॅरिंट्न ह्या दोन हौशी किशोरवयीन पुराणवस्तु अभ्यासकांनी ९७७० च्या दशकात ईस्ट इंडिया कंपनीत कारकून म्हणून नोकरी पत्करली होती. पुढे ते दोघेही कंपनीच्या पहिल्या फळीतील मुलकी अधिकारी बनले. या दोघांची कंपनीची विविध कामे शिकण्यासाठी बिहार परणण्यामधे नेमणूक केलेली होती. इ.स. १७८३ मधे बिहारमधे गयेचा जि आधिकारी झालेल्या लोने तीर्थयात्रेवरील कर रद्द केला होता. त्यामुळे तो स्थानिक हिंदूंमधे लोकप्रिय झाला होता. यानेच पुढे कायमधारा पद्धती आखली. त्याद्वारे जमीनधारकांकडून योग्य कर आकारणी केली गेली. पुढे ही योजना जमीन सुधारणेचा भाग म्हणून १७८श्री कॉर्नवोलिस कायमधारा पद्धती या नावाने ओळखली गेली.



(वर) गया-पाटणा रस्त्यावर युरोपियनांचा जथा. पार्श्वभागी बाराबार व नागार्जुनी टेकड्या दिसतात. सर चार्लस डॉयलीने सन १८२५मधे पेन व शाईने काढलेले चित्र. (APAC, British Library)
(खाली) लोमस क्रषींची गुफा म्हणून प्रसिद्ध असलेल्या लेणीचे प्रवेशद्वार. पुरातत्त्व संशोधक जोसेफ बेगलारने सन १८७२-३ मधे घेतलेले छायाचित्र. (APAC, British Library)



'एशियाटीक सोसायटी येथे त्याच्या सुरुवातीच्या सभांपैकी एकीत थॉमस लां याने पाटण्याच्या उत्तरेला असलेल्या दोन स्तंभांची थोडक्यांत माहिती त्याने स्वतः रेखाटलेल्या चित्रांसह सादर केली. कापुचिन फादर डेला टोम्बा याने वर्णन केलेले हेच ते दोन स्तंभ होते.

थॉमस लां याने जे ठिकाण सांगितले त्यातील पहिले बतियापासून उत्तरेकडे १७ मैलावर नंदनगड येथे तर दुसरे ठिकाण बतियापासून दक्षिणेत्ता जवळ जवळ तेव्हढ्याच अंतरावर अराराज या ठिकाणी होते. पहिल्या स्तंभाच्या शीर्षांला बसलेल्या सिंहाचे शिं होते मात्र दुसरा स्तंभ आता बोडका होता.

दोन्ही स्तंभावर शिल्लालेख त्याने आतापर्यंत कधी न पहिलेल्या लिपीमधे कोरलेले होते. या शोधनिबंधामुळे जोन्सला या स्तंभावरील शिंत्तालेखातील मजकुराच्या बिनचूक नकला तयार करता आल्या. मात्र जॉन हॅरिंगटनचे योगदान प्राचीन स्तंभांपेक्षा जुन्या गुफांबद्दल जास्त आहे. त्याने दक्षिण बिहार येथे पाटणा व गया यांच्या मधोमध असलेल्या दोन डोंगरांच्या रांगांमधे जाऊन संशोधन केले. प्रथम त्याला तेथील पर्वतरांगामधे दगडांत कोरलेल्या अनेक गुफा दाखविण्यात आल्या. स्थानिक ल्लोक त्यांना *सात घरे' म्हणत असत. गुफांचे छत कमानदार होते. त्यांच्या गुळगुळीत पृष्ठभागावर काजळी धरलेली होती.

तेथे खूप उजेड केला तरी त्यांचे स्वरूप खराब दिसत होते. एका गुफेचे प्रवेशद्वार कोरीव दरवाज्याने सुशोभित केलेले होते. त्याने लिहीले, “त्यावर हत्ती व इतर कलाकुसर अत्यंत काळजीपूर्वक कोरलेली होती. त्लववकरच मी त्याचे चित्र आपल्या सोसायटी समोर सदर करू शकेन.”

तिथे हरिंगटनच्या नजरेतून सुटलेली गोष्ट म्हणजे गुफेच्या प्रवेशद्ारासमोर दगडांत कोरलेले पुष्कळसे शिलालेख होय. परंतु पुढे जवळच्याच नागर्जुनी डोंगराकडे गेल्यावर मात्र त्याने ही चूक केली नाही. तिथे त्याला दोन शिंलालेख दिसून आले. त्याने म्हटले, “माझ्या मुन्शीने (भाषातज्ञ व दुभाषी) तीन दिवसाच्या अवधीत त्यांची बऱ्याच कष्टाने व पुरेशा अचूकपणे (कागदावर) प्रतिकृती तयार केली.” पहिला शिलालेख मध्ययुगीन देवनागरी भाषेत होता, जो दुभाषाने सहज वाचला. दुसरा शिलालेख “दुर्दैवाने वेगळ्याच लिपीत आहे आणि अजूनपर्यंत समजू शकता नाही.” हॅरिंगटनची माहिती जास्त आकर्षित करणारी ठस्ली नाही. परंतु ते स्तंभ व त्यावरील शिलालेखाची लिपी जोन्स आणि त्याच्या सहकारी संशोधकांच्या मनात खोल घर करून बसले. ह्या स्तंभावरील शिलालेखाचे “घासून उमटलेले ठसे ओळखण्यासाठी जोन्सने केलेले आवाहन स्विस व्यापारी कर्नल ऐटोनी पोलियार याच्या कानावर पडले. तो दि हेतील मुगत्त बादशहा दुसरा शाहआलम याच्या पदरी काम करीत होता. या दुर्दैवी शाहआलमला मराठा, शीख व अफगाण रोहिल्यांनी इतके हैराण केले की त्याची सत्ता लहान मुलांनी एकमेकांपासून हिसकावून इकडून तिकडे फेकलेल्या खेळण्याप्रमाणे झाली होती. त्यांनी त्याला आपल्या उन्नतीत एक साधन आणि अधोगतीत बळीचा बकरा म्हणून वापरले. (आश्रयदात्या बादशहाचे) भविष्य साफ दिसत असल्यामुळे पोलिंयारने युरोपला परतायचे ठरविले. तो आपल्या मालमत्तेची वि वाट लावून आपल्या अनेक हिंदुस्थानी बायकांचा निरोप घेऊन त्यांना आहे त्या स्थितीत सोडून जायच्या तयारीत असतांनाच वेडा अफगाण गुलाम कादीर याने शाहआलमचे डोळे काढले.

'पोलियरने जे ठसे मिळविले होते ते कलकत्याला सर विल्यम जोन्सला पाठवून दिले. ते ठसे जोन्सच्या हातात पडले तेव्हा तो खूप खूष झाला. परंतु लवकस्च तो आनंद निराशा आणि वैफल्य यांत रूपांतरीत झाला. कारण या ठशांच्या सहाय्याने पण खूप प्रयत्न करून देखील त्याच्या जवळ असलेल्या तीन शिलालेखांपैकी सर्वांत जुन्या अशा फिरोझशहाच्या स्तंभावरील लेखाचा त्याला अजिबात अर्थ लागला नाही. पुढे आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रांत जोन्सने म्हटले की “नागरी भाषेतील शित्तालेख अधिक सोपे व आधुनिक आहेत पण हे सर्वांत जुने फिरोझशाहच्या स्तंभावरील लेख मला निराश करीत आहेत".

त्या शिलालेखातीतत लिपीत जवळपास ३० मुळाक्षरे होती. वरवर पाहता ती ग्रीक लिपी वाटत होती पण तसे अजिबात नव्हते. जोन्स बरोबर असणाऱ्या ब्राम्हण पंडितांनी ही लिपी तपासून असे जाहीर केले की ही ब्राह्मी लिपी म्हणजेच ब्रह्मदेवाने लिहिलेली लिपी

आहे. ही सोयीस्कर अद्भुत 'ब्राह्मी' संज्ञा युरोपियनांमधे पुढील शतकापर्यंत प्रचलित झाली नाही.

फिरोझशहाच्या स्तंभावर असलेली लिपी आणि नागार्जुनी गुफेजवळ हॅरिंटन याला सापडलेल्या शिलालेखातीत लिपी या सारख्याच आहेत ही एकच गोष्ट जोन्स ठामपणे मांडू शकला. पश्चिम भारतातून एका वरिष्ठ मुलकी अधिकाऱ्याने एशियाटिक सोसायटीला पाठविलेला ठशातील लिपीदेखील तीच होती. पश्चिम भारतातून आलेले हे ठसे मुंबईपासून आतीत्त भागात असलेल्या डोंगरी गुफातील भिंतींवरून घेतले होते. कुठल्याही ठोस योग्य कारणमीमांसेशिंवाय जोन्सने असे मत बनविले की लेखांचे हे तीन संच इथियोपिया येथून आलेल्या विजेत्यांशी किंवा स्मृतीकारांशी कुठल्याना कुठल्या पद्धतीने नक्कीच संबंधित आहेत. त्याने म्हटले, "मत्ता असा विश्वास वाटतो की ही लिपी इथियोपियन असावी आणि इ.पू. १००० वर्षापूर्वी बौद्धांनी, पुजाऱ्यांनी किंवा ज्याला हिंदू शाक्यपसिंह म्हणतात त्या विजेता सिसाकच्या सैनिकांनी आणली असावी". त्याचे असे मत होते की हे सिसाक किंवा शाक्य इ.पू. १००० वर्षापूर्वी प्रवास करीत इथियोपियातून भारतात आले. त्याचे बुद्ध हे नाव त्याच्या ज्ञानाची पातळी दर्शविण्यासाठी होते व असे सूचित करीत होते की तो आपल्या बांधवांसाठी मारक नसून तारक होता.

जोन्सच्या हे लक्षात आले की बाह्मण पंडितांचे बुद्ध किंवा शाक्य याबइतल कटु मत होते. ते त्याला एका पाखंडी संप्रदायाचा बंडखोर नेता म्हणायचेच पण त्याबरोबरच विष्णूचा नववा अवतारदेखील म्हणायचे. याचे हुबेहूब प्रतिबिंब अरब इतिहासकार अबू-अल-फजल याने लिहिलेल्या ऐन-ए-अकबरीत दिसते. "ब्राह्मण बुद्धाला नववा अवतार तर म्हणतात परंतु असेही ठासून सांगतात की त्याचा धर्म खोटारडा आहे." या विरोधाभासयुक्त विधानांनी जोन्स प्रचंड कोड्यात पडला. त्याने लिहिले, "बुद्ध हा वेदांची शिकवण मानणारा उपासक वाटतो आणि जरी त्याच्या स्वभावातील चांगुललपणामुळे तो या प्राचीन ग्रंथांचा धिक्कारंदेखीलत करतो, कारण वेद पशुबळींमधे आनंद मानतात. तरी देखील काशीचे ब्राह्मण त्याला विष्णुचा नववा अवतार म्हणून स्वीकार करतात."

या कोड्याचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नात तेथे असे दोन वेगवेगळे बुद्ध असावेत अशी क नात्याने मांडली. "पहित्ता एक महान क्रांतिकारक ज्याने बाह्मणशाही उलथून टाकण्याचा प्रयत्न केला आणि त्यामुळे ब्राह्मणांनी बौद्धांना चास दिला". आणि "दुसरा बुद्ध नंतर आत्ता, ज्याने पहिल्याचेच नांव व गुण घेतले असावेत".

बुद्ध व बौद्धांबद्दलचे जोन्सचे हे काहीसे अनिश्चित विचार एशियाटिक स्सिर्चेसच्या पहिल्या दोन अंकामधे १७८९ साली बर्यानच विलंबानंतर प्रकाशित झाले. लगेचच यावर अनेक मित्रांकडून असंख्य पत्राद्वारे प्रतिसादाचा अक्षरशः पाऊस पडला. हा प्रतिसाद देणाऱ्यांमधे सुमात्रा येथीलल जॉन मार्सडेन, सिलोनमधीत्त कॅप्टन महोनी, मद्रास येथून विल्यम चेंबर्स, वाराणसीचे लेफ्टनंट फ्रान्सिस वित्लफर्ड, बंगालमधून फ्रांसिस बुर्केनन यांचा

समावेश होता. या वैविध्यपूर्ण पत्रव्यवहाराद्रारे या गोष्टीस पुष्टी मिळाली की बौध्द साहित्य भारताच्या उत्तर, दक्षिण आणि पूर्वेकडील देशांमधे अस्तित्वात आहे. त्यातील काही संस्कृतमधे तर उरलेले पालि भाषेत आहे. पालिचे उगमस्थान संस्कृतप्रमाणेच असून, दोन्हींचा उगम वरवर पाहता प्राकृत बोलीभाषेतून झाला आहे; "जी फारशी अभिजात नाही, व्याकरण दृष्ट्या सदोष आहे आणि जिच्यात स्थानिक बोलीभाषांचा भरणा आहे".

या सर्व विदेशी ग्रंथांमधे ही एकवाक्यता दिसून आली की "संपूर्ण बुद्ध शिकवणुकीचा उगम भारतात व त्यातही मगध देशात झाला. मगध हे साधारणपणे २००० वर्षापेक्षाही अधिक काळ एक ज्ञानपीठ, सांस्कृतिक, समाज-सुधारणांचे व व्यापाराचे केंद्र होते." तसेच शाक्यमुनी किंवा गौतम बुद्ध ही एक ऐतिहासिक व्यक्ती होती. ते मगध देशामधेच राहिले व तेथेच निर्वाण पावले. वर वर्णन केलेले हे सारे आधार, सारे दाखले बरोबर असले तर बुद्धाचे निर्वाण जोन्सच्या म्हणण्याप्रमाणे ख्रिस्तपूर्व १९ वे शतकात नाही तर ख्रिस्तपूर्व ५ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाले होते.

या नवीन मिळालेल्या पुराव्यांवरून हे स्पष्ट होत होते की जरी बाह्मणांनी बुद्धावर नास्तिकतेचा शिक्का मारला व बौद्धांचा पाखंडी म्हणून छळ केला आणि जरी वेगवेगळ्या हिंदू राजांनी त्यांचा छळ केला तरी बौद्ध धर्म अनेक शतके केवळ भारतातच नव्हे तर भारतीय उपखंडाच्या अनेक भागात भरभराटीस आला होता आणि १२व्या शतकाच्या शेवटपर्यंत टिकून राहिला होता. त्याच दरम्यान बुद्धाच्या शिकवणुकीची मुळे भारतातच होती याला दुजोरा देणारे पुरावे इथेच गंगेच्या मध्य पठारावर सापडू लागले. याची सुरवात दक्षिण बिहारमधील गया शहराच्या दक्षिणेला, ज्याला स्थानिक लोक बुद्धगया म्हणत तिथे, एका पडझड झालेल्या मंदिरात मिळालेल्या शितलातेखापासून झाली. यावर ९०व्या शतकांत केलेल्या दानाचा उ 'ख आढळला, ते दान 'बुद्धाच्या निवासासाठी', त्या "पुरुषोत्तम व्यक्तीसाठी" जो 'दैवी गुणसंपन्न होता". वाराणसीत देखील असे धक्कादायक पुरावे सापडले ज्यातून या सनातनी हिंदू शहरावर कोणे एके काळी प्रतिस्पर्धी बौद्ध धर्माची पकड होती असे दिसत होते. सन १७८० मधे ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिपत्याखाली वाराणसी "बनारस? या नावाने आंग्लाळलेली होती. सन १७८८ मधे कंपनीने ३२ वर्षीय जोनाथन डंकन याची निवासी मुख्याधिकारी म्हणून तिथे नेमणूक केली. "वॉरेन हेस्टिंजचे तरुण दळ' असे ओळखण्यात येणाऱ्या निवडक प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या समूहातील तो एक होता. त्याच्यात बौद्धिक कुतूहल्ल व भारतीय संस्कृतीबद्दल आस्था हे प्राच्यविद्यापंडितांचे दोन जुळे विशेष गुणधर्म होते जे फारच थोड्या लोकांमधे दिसतात. हेस्टिंजप्रमाणे डंकन देखील भारतीयांच्या धार्मिक परंपरामधे ढवळाढवळ करणे हे जुलमी ठरेल या मताचा होता, पण त्याबरोबरच जेथे मानवाधिकाराचा भंग होत असेल तेथे त्याला विरोध करणे हे आपले कर्तव्य आहे असे त्याला वाटे. ह्या क्रूर परंपरांमधे बनारस व आजूबाजूच्या राजपूत वंशाच्या शक्तिशाली जमीनदारांकडून मोठ्या प्रमाणांत एक रिवाज म्हणून मोठ्या प्रमाणात लहान मुलींची हत्या करण्याच्या पद्धतीचा समावेश होता. प्रतिष्ठीत जमीनदारांना डंकन याने

उदाहरणांसह हे पटवून दिले की मुलींची हत्या हे हिंदूच्या धर्मग्रंथांचे उ घन ठरते. ही पद्धत बंद केली पाहिजे हे त्याने त्यांना यशस्वीपणे पटवून दिले. त्यामुळे शहरातील सनातनी ब्राह्मणवर्गावर त्याची छाप पडली. या ब्राह्मणवर्गाला जिंकण्यासाठी बनारस येथे संस्कृत विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी त्याने स्वतः प्रयत्न केला. त्याच्या श्रळेचे केंद्र असलेल्या वाराणसीत संस्कृत महाविद्यालय स्थापून देशाचे कायदे, साहित्य आणि धर्म यांचे जतन करणे आणि त्यासाठी त्यांचा अभ्यास करून त्यांत सुधारणा करण्यासाठी डंकनने व्यवहास्चातुर्याने शहरातीत्त सर्व थरातीत्त लोकांचा पाठिंबा मिळवित्ला. त्यामुळे १७९४ मधे जेव्हा बनारसच्या उत्तरेकडे असणाऱ्या अवशेषातून एक हिरव्या संगमरवराचे पात्र जमिनीतून मिळाले तेव्हा डंकनचा स 1 घेण्यासाठी ते त्याच्याकडे आणले गेले. सारााथ म्हणून माहीत असलेल्या या अनेक पुरातन अवशेष असलेल्या जागेतून इमारतीच्या बांधकामासाठी लागणारे साहित्य खणून नेले जात असतांना हे पात्र दिसून आले. त्यामधे काही अस्थि-अवशेषाचे भाग दिसून आले. परंतु हे हिंदू रिवाजाच्या विरुद्ध होते. त्यामुळे डैकनने असा निष्कर्ष काढला की हे अवशेष आपले शरिराचे अवशेष नदीत अर्पण करण्याऐवजी जमिनीत दफन करणाऱ्या कोणा बौद्धाचे असावेत. जेव्हा याच ढिगाऱ्यात एक शिलालेख असलेली बुद्धमूर्ति सापडली तेव्हा डेकनचा हा निष्कर्ष खरा ठरता. संस्कृत विद्यालयातील त्याच्या मित्राने त्याचे भाषांतर केले. अकराव्या शतकातील गौड राजा वसंतपाल याने केलेल्या दानाचाउ 'ख त्या शिलालेखात होता. राजा वसंतपाल त्याच्या भावाबरोबर तेथे पूजा, प्रार्थना करण्यासाठी आला होता. त्याने जे लोक बुद्धाला मानीत नाहीत त्यांना त्या पंथात जाण्याची आज्ञा केली होती. हा एक अत्यंत ठोस पुरावा होता की अगदी १९व्या शतकांतसुद्धा बंगालच्या उत्तरेला बुद्धाची शिकवण राजाश्रयाखाली भरभराटीस आली होती.

आताशा सर विल्यम जोन्स व त्याच्या सहकारी विठ्ठानांच्या हे लक्षात येऊ लागले होते की इस्लामपूर्व भारतीय इतिहासातील प्रगती पूर्वीच्या साहित्यातील कालगणनेचा अभाव ह्या एका मोठ्या न्यूनतेमुळे अडखळली होती. एका अशा व्यक्तीची वा घटनेची गरज होती की जिचा ताळमेळ युरोपच्या इतिहासाशी जोडता येईल. या पद्धतीला synchronology असे म्हणतात. बायबलवर्णित इतिहासाचा काहीही फायदा होत नाही असे पाहून जोन्स आता त्याच्या लहानपणच्या अभिजात साहित्याकडे वळला. त्याला हेरेडोटस, स्ट्रॅबो, मेगास्थेनिस माहीत होते. त्याने एरियनचे अनाबाप्सिस, टोलेमीचे जिओप्राफिका आणि क्विंट्स कुर्टीअस रूफूसचे अलेक्झांडरच्या (सिकंदर) इतिहासाविषयी मूळ ग्रीक व लॅटीनमधे तसेच इतर अनेक ग्रंथ वाचले होते. आता त्याने हे ग्रंथ परत भारतीय इतिहासाच्या संदर्भातून अभ्यासायला सुरूवात केली; विशेषतः सिंकदरची गाठ पडलेल्या राजांचा व त्याच्या मॅसेडोनियन उत्तराधिकाऱ्यांचा इतिहास. त्याला खात्री होती की ह्या ग्रंथांमधे कुठेतरी ती कि " होती जी भारतीय व ग्रीक इतिहासाला जोडील आणि त्याला अशी एक व्यक्ती वा घटना सापडेल जिच्यामुळे भारताच्या पूर्वेतिहासावर प्रकाश पडेल.

४. सिकंदराचा प्रवेश



सिकंदराने (अलेक्झांडर दि ग्रेट) बेबिलॉनला गेल्यावर भारतावरील विजयाच्या स्मरणार्थ चलनात आणलेले चांदीचे नाणे. नाण्याच्या एका बाजूला (डावीकडे), नाईके ही विजयाची देवता पानांची माला (सन्मानार्थ डोक्यावर ठेवली जाणारी), चिंलखत व पर्शियन शिरस्त्राण घातलेल्या सिंकंदराच्या वर धरून उभी आहे. नाण्याच्या दुसऱ्या बाजूला (उजवीकडे) एक घोडेस्वार दोन हत्तींवरील योद्ध्यांशी लढतांना दाखवला आहे--हे दृष्य पुरुराजाला एका ग्रीक घोडेस्वाराने जखमी केले तो क्षण दाखवते. (British Museusm)

इ.पू. ३२७-३२६ मधे सिकंदराच्या (अलेक्झांडरच्या) भारतीय स्वारीची सुरव्वात झाली. त्याआधी वीस महिन्यांत त्याने शेवटचा अँकेमेनिड सम्राट डरायसचा पराभव केला होता आणि स्वतःला राजाधिराज म्हणून घोषित केले होते. त्याने डरायसचा खून करणारा बंडखोर सरदार बेस्सोस याला शोधून काढले आणि त्याला देहदंड दिला. तो जेथे जेथे गेला तेथे तेथे त्याने त्याच्या नावाची नवीन शहरे बसविली. अलेक्झान्डरिया- आज त्याला कंदाहार म्हणतात व तो इस्कंदाहार्चा अपभ्रंश आहे. हिंदुकृश पर्वताच्या दक्षिणेला जे आज बेप्राम म्हणून ओळखले जाते ते अलेक्झाल्टिया. आजच्या 'ताजिकिस्तानातील अलेक्झान्टिया Eschate म्हणजे सगळ्यात दूरचे अलेक्झान्ट्रिया. पण ते पुरेसे नव्हते. तो आता भारताचा विचार करू लागला. तेव्हा भारत इतिहासकार हेरोडोटसच्या मते जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा व सर्वात श्रीमंत देश होता.

सिकंद्राच्या नेतृत्वाखालील सैन्याइतके सुप्रशिक्षित सैन्य पूर्वी कधी झाले नव्हते-- घोडेस्वारांच्या आठ पथकांव्यतिरीक्त शाही पथकावर नियंत्रण ठेवणारे अधिकारी, सैन्याच्या उजव्या फळीत्ा असलेले पायदळ सांभाळणारे अधिकारी त्यात होते. त्यापैकी

अनेक जण त्याचे लहानपणचे सवंगडी होते आणि मिएझ्झा येथील विद्यालयातही त्याच्याबरोबरच होते. याच विद्यालयात स्टगीराचा एरिस्टॉट्ल सिंकद्रला प्रशिक्षण देत होता--तो त्याला वयाच्या तेराव्या वर्षापासून तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, तर्कशास्त्र, विज्ञान, गणित, वैद्यकशास्त्र व कला यांचे घडे देत होता. सिकंदर शिकता की जिज्ञासू वैज्ञानिक वृत्ती हेच ग्रीक (यवन) व मॅसेडोनियन ह्यांचे वैशिष्ट्य होते. पण सिकंद्राला शिक्षण अर्धवट सोडावे लागले कारण त्याचा पिता राजा फिलिप बायझन्टीयमविरुद्ध (आजचे इस्तंबूल) युद्धासाठी बाहेत पडला होता. त्यानंतर राज्याचे संरक्षण करण्यात आणि राज्य वाढवण्यात सिकंदर इतका गर्क झाला की अरिस्टोटलच्या नैतिक शिकवणुकीकडे लक्ष द्यायला त्याला फारसा वेळ मिळाला नाही!

सिकंदराच्या आशियावरच्या स्वाऱ्यांना कुठलेही नैतिक पाठबळ नव्हते पण तरीही किमानपक्षी त्या त्याच्या ह्या म्हणण्याला पुष्टी देत होत्या "सर्व माणसे निसर्गतः जिज्ञासू असतात" (All men by nature desire to know). त्याच्या कमीत कमी सोळा सहकाऱ्यांनी त्याच्या पूर्वेकडील आक्रमणाच्या नोंदी लिहून ठेवल्या आहेत. ह्यापैकी कुठलाही 'आखो देखा हाल? मूळ स्वरूपात उपलब्ध नाही. पण रोमन साम्राज्याच्या गणतंत्र व साप्राज्यशाही या दोन्ही काळापर्यंत इतक्या नोंदी अस्तित्वात होत्या की तत्कालीन इतिहासकारांनी त्यांच्या उपयोग आपापल्या मताप्रमाणे सिकंदराच्या आशियाच्या स्वारीचा इतिहास लिहायला केला. त्यातील पाच जणांचे लिखाण सर विल्यम जोन्सला वाचायला मिळाले. काही ठिकाणी ह्या नोंदी परस्परविरोधीही होत्या.

आक्रमणाचा निर्णय झाल्यावर सिकंद्राने तेथील सर्व राजेरजवाड्यांना संदेश पाठवला आणि शरण यायला सांगितले. जी पठारावरची राज्ये होती त्यांना सिकंद्राच्या ताकदीची माहिती व्हायला पुरेसा वेळ मिळाला होता. त्यामुळे त्यांनी तत्काळ मैत्रीची बोलणी सुरु केली. ज्याला पुढे ग्रीक तक्षशीलेचा ओम्फीस म्हणून ओळखू लागले त्यानेही मैत्रीचा संदेश पाठवला. या राजाचे राज्य सिंधु नदीपासून झेलमपर्यंत पसरलेले होते. ओम्फीस इतका आतुर होता की त्याने सिकंदराचे स्वागत करायला सिंधु पार केली व बरोबर नजराणा म्हणून युद्धात वापरते जाणारे पंचवीस हत्ती आणले. हत्ती हा मोठा नजराणा होता कारण त्या काळच्या युद्धात तो साक्षात रणगाडाच होता.

पण पर्वतांवरील अस्पासिओई व अस्सकिनोई (ही नावे बहुधा अश्व व अश्वश्रेणी या संस्कृत शब्दांपासून आली असावीत) या टोळ्यांनी शरण यायला नकार दिला. मग सिकंदराने त्याच्या सैन्याचे दोन भाग केले. एक तुकडी त्याने खैबर खिंडीतून गांधारची हिवाळी राजधानी पुकेलाओटीस (पुष्कलावती-आजचे चरसद्दा जे स्वात व काबुल नद्यांच्या संगभापाशी वसले आहे) च्या दिशेने पाठवली. तो स्वतः त्याच्या सर्वोत्तम सैनिकांच्या तुकडीला घेऊन उत्तरेच्या पर्वतांमधल्या मार्गाने निघाला. ती हिवाळी स्वारी सिकंदराच्या इतर स्वाऱ्यांप्रमाणे झंझावाती व नृशंस होती. त्याच्या मार्गातील पहिले अस्पसियन शहर

शरण आले नाही. तेथील प्रत्येक नागरीक मृत्युमुखी पडला. पुढच्या शहराने थोडा प्रतिकार केला पण लवकरच शहराचा कोट पडला. ह्या शहराचे ग्रीकांनी नीस (Nysa) असे नामकरण केले कारण त्याच्या मागच्या वेलींनी आच्छादीत डोंगर त्यांच्या डायोनिसस या देवाच्या प्रिय पर्वताची आठवण करून देत होता. इतिहासकार 'एरींयन, जस्टीन व कर्टीयस तिघे सारखीच माहिती देतात, ती ही की हे नीस शहर मेरोस नावाच्या डोंगराच्या पायथ्याशी होते आणि त्या डोंगराच्या माथ्यावर सिकंदराची सेना दहा दिवस अंदाधुंद मौजमजा करत राहिली. त्याच्या सैनिकांना पुरेसा विसावा मिळाल्यावर सिकंदर पुढे निघात्ता. मग त्याने एओनोंस नावाच्या डोंगरी कि वरह केला. हा कि अभेद्य मानला जायचा. हेराक्ृत तसतलाही येथे अपयश आले होते. उरलेले अस्पासिओई व अस्सकिनोई आता निकराच्या व निर्वाणीच्या लढाईसाठी तेथे जमा झाले होते.

'एओर्नोस नाव ग्रीक शब्दावरून आले असावे एओरनोंस म्हणजे पक्षीविहीन. हे नाव अवर ह्या संस्कृत शब्दावरूनही आले असण्याची शक्यमता आहे. एरियनने केलेल्या वर्णनाप्रमाणे “हा एक अतिभव्य पहाड होता ज्याचा परिघ २०० स्टेडिया (१ स्टेडियम - ६७०७ फूट) आणि सर्वात कमी उंचीच्या ठिकाणी उंची ११ स्टेडिया होती.” हा पहाड गांधार पठार व सिंधु नदी यांच्या सर्वात उत्तरेकडील चौफुल्याजवळ होता. याचा अर्थ सिकंद्राला 'एओरनोंस काबीज केल्याशिवाय पुढे जाणे शक्यौ नव्हते.

सिकंदराने लगेच एओनोंस काबीज करण्यासाठी तयारी केली. एकीकडे त्याने दरीत ज्यावर्न पहाडावर चढता येईल असे बांधकाम सुरु केले आणि दुसऱ्या बाजूला त्याचा एक सरदार टॉलेमी एका तुकडीबरोबर कडा चढायच्या तयारीला लागला. तिसऱया दिवशी बांधकाम पूर्ण झाले आणि सिकंदरने स्वतःच ह् चे नेतृत्व केले. परिणाम कतलेआम. एरिंयन म्हणतो, “सिकंदर अशा प्रकारे पहाडाचा स्वामी झाला. त्याने तेथे बळी दिता व कि 1 बांधत्ता. त्याने सिसिकोड्सता कि दार नेमले. हा सिसिकोट्टस पूर्वी भारतीयांकडून बेस्सोसत्ता जाऊन मिळाला होता पण सिकंदराने बॅक्ट्रीया (आताचा उत्तर अफगाणिस्तान) जिंकल्यावर हा सिकंदराच्या सैन्यात दाखल झाला व तेथे त्याने सिकंद्रचा विश्वास संपादन केला.”

ह्या फरारी वा फितूर भारतीयाचे नाव एरिंयनने सिसिकोटटस असे ग्रीकाळले तर कुटीअसने रोमन पद्धतीने त्याला सिसिकोस्टस म्हटले. हे दोन्ही एकच आहेत कारण रोमन इतिहासकार व ग्रीक इतिहासकार दोहोंनी त्यांच्या वर्णनाचा शेवट सारखाच केला आहे. “त्या पहाडावर राजाने मिनर्व्हा व व्हिक्यी या देवतांसाठी वेदी बांधल्या. ज्या वाटाड्यांनी त्याला रस्ता दाखवला होता त्यांना त्याने यथोचित मोबदला दिला... कि चीव भोवतालच्या प्रदेशाची जबाबदारी सिसोकोस्टसला देण्यात आली.” सर्व वर्णने सांगतात की युद्धजीवी भारतीय सैनिक अस्पासिओई व अस्सकिनोई यांच्यासाठी काम करत होते आणि त्यांनी विवेकाची टोचणी लागू न देता लगेचच आपत्ता पक्ष बदलला. सिकंदराने त्या युद्धजीवी भारतीय सैनिकांच्या कौशल्याचा पुरेपूर उपयोग करून घेतला पण पुढे त्याला ते

धोकादायक वाटू लागल्यावर त्याने अत्यंत निर्दयपणे त्यांची कत्तल केली. त्याने इतका क्रूर नरसंहार केला की प्लुटारकने सिकंदरावर विश्वासघाताचा आरोप केला. "भारतीय युद्धजीवी सैनिक देशातील सर्वोत्तम सैनिक होते. ते ज्या शहरात असत तेथे त्यांच्याशी लढतांना सिकंदराची खूप हानी होई. त्यामुळे त्याने त्यांच्याशी तह केला. पण नंतर ते परतत असतांना त्यांच्यावर अचानक ह्‍ 1 करून त्या सर्वांना यमसदनी धाडले."

सिसिकोट्टस अथवा सिसिकोस्टस हा असाच एक युद्धजीवी सरदार होता. तो आधी पर्शियन सरदार बेस्सोससाठी बॅक्ट्रियात लढायचा पण ग्रीकांनी लढाई जिंकल्यावर तो ग्रीकांच्या बाजूला गेला. तेथे त्याच्या नेतृत्वगुणांमुळे तो सिकंदसर्चा विश्वासपात्र झाला. त्याच्या नावाचे महत्त्व सर विल्यम जोन्सने व त्यानंतर आलेल्या अनेक इंडो-ग्रीक इतिहासाच्या अभ्यासकांनी ओळखले नाही.

'एओर्नोस काबीज करून त्याच्या रसदीची व्यवस्था लावल्यावर सिंकदरने परत आपले सैन्य एकत्र केले आणि सिंधु पार केली. तेथील रिवाजानुसार त्याने बळी दिला व तक्षशिलेच्या दिशेने कूच केले. तक्षशिंत्ता "एक संपन्न व भराभराटीला आलेले शहर होते--ते सिंधू आणि बियासच्या मधले सवोत्कृष्ट शहर होते". तिथे राजा ओम्फीसने त्याचे आणि त्याच्या मॅसेडोनियन सैन्याचे जोरदार स्वागत केले आणि त्यांच्यावर भेटींचा खैरात केली. त्यांत छप्पन्न हत्ती, विलक्षण मोठ्या आकाराच्या कित्येक बकऱ्या, तीन हजार बैल, प्रचुर मात्रेत मका, सुवर्णमुद्रा आणि ऐंशी टॅलेंट चांदी (एक टॅलेंट म्हणजे जवळपास २६ किलो) यांचा समावेश होता. सिकंदर त्याच्या नजराण्यावर व औदार्यावर इतका खूष झाला की त्याने त्या सर्व भेटी परत केल्या. इतकेच नव्हे तर आपल्या वतीने "लुटीमधून मिळवलेला हजारो टॅलेंट माल दिला ज्यात अनेक सोन्याचांदीची भांडी, पर्शियन पडद्याचे भरपूर कापड आणि तीस घोडेस्वार सामील होते". मात्र ह्या राजनैतिक कृत्यामुळे त्याचे स्वतःचे सहकारी मित्र मात्र नाखूष झाले असे क्‍्विंटस म्हणतो.

सिकंदाराचा निर्दयीपणा, मद्यधुंद क्रौर्य आणि अहंकार वाढत चालले होते. तरीही, एरिंयन वर्णन करतो की, तो ऑसिस्टोट्त्तचा शिष्य होता. त्याने विशाल भारतीय समाजातील धार्मिक संप्रदायांची माहिती मिळविण्याचा विशेष प्रयत्न केला. त्यांत सर्वात महत्त्वाचे ब्राह्मण व श्रमण (Brachmanes and Sarmanes) होते. ह्यातील पहिल्यांचा अत्यंत आदर केला जात असे. त्यांना ओळखण्यात जोन्सने अर्थातच चूक केली नाही. पण sarmanes ओळखणे तितके सोपे नव्हते. हा शब्द संस्कृत श्रमण या शब्दापासून आत्ता होता आणि त्यांत नास्तिक आजीविकांसहीत बौद्ध, जैन, हिंदू अशा सर्वच संप्रदायांचे साधू-संन्यासी येतात. श्रमण ब्रह्मचर्याचे पालन करीत आणि त्यांतील सर्वात पूज्य असत ते लोकवस्तीपासून दूर जंगलात कंदमुळे खाऊन रहात असत.

ओम्फीस मित्र झाल्यावर सिकंदर पूर्वेकडे कूच करत बियासच्या किनारी पोहोचला. त्यापलिकडच्या विशाल पठारी प्रदेशावर पुरु नावाच्या भारतीय राजाचे राज्य होते. सिकंदराने त्याला भेटीस येऊन शरणागती पत्करायला सांगितले तेव्हा त्याने निरोप दिला की तो भेटीला जरूर येईल पण रणांगणात आणि तेही सिकंद्राच्या सैन्यापेक्षा कितीतरी बलशाली सैन्यासह! सिकंदर बि ., लल निराश झाला नाही. त्याने पुरूचे सैन्य एका ठिकाणी एकत्र येईल अशी व्यूहरचना केली आणि आपल्या सैन्याची एक तुकडी वादळी पावसाचा फायदा घेत दुसर्यार भागातून नदीच्या पलिकडे पाठवली. यामुळे पुरूने त्याच्या सैन्याची रचना करण्याआधी सिकंदराला आपली व्यूहरचना करण्यातला वेळ मिळाला. तरीही पुरूचे युद्ध-हत्ती पाहून सिकंदराच्या सैन्यात चलबिचल होऊ लागली. त्याही पेक्षा मोठे आव्हान पुरूच्या आघाडीच्या फळीचे होते. चार हजार घोडेस्वार व शंभर चार-चार घोड्यांचे रथ, प्रत्येक रथावर दोन धनुर्धारी, दोन ढालधारी व दोन भालाधारी सास्थी. पण लवकरच हे स्पष्ट झाले की पावसामुळे झालेल्या दलदलीत रथ निकामी होते. सिकंदराच्या घोडदळाला ही चांगली संधी होती आणि ती त्याने अचूक साधली. त्यांच्या तीव्र आक्रमणामुळे भारतीय घोडदळ मागच्या हत्तीदळाकडे ढकलले गेले.

जेव्हा जेव्हा हत्ती बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत तेव्हा तेव्हा सिकंदराचे घोडेस्वार भाले-बरच्यांनी त्यांना मागे ढोसत. ह्या कोंडीमुळे सिकंदर त्याचे पायदळ दोन्ही बाजूंनी पुढे आणू शकला. त्यांच्या ढाली एकमेकींना जोडून जणू एक अभेद्य भिंतच तयार झाली. त्यामुळे प्रथम भारतीय घोडदळ व नंतर पायदळाचे तुकडे झाले. सर्व बाजूंनी ह 1 होत असल्यामुळे ते रणांगण सोडून पळू लागले. ह्या पळणाऱ्यांमधे पुरु राजाही होता. त्याच्या खांद्याला जखम झाली होती. त्याचा हत्ती रणांगण सोडून जातांना पाहून सिकंद्राने राजा ओम्फीसला त्याच्यामागे समझोत्यासाठी मध्यस्थ म्हणून पाठवले. “ओम्फीस घोड्यावर होता. पुरुच्या हत्तीपासून सुरक्षित अंतरावर पोहोचल्यावर त्याने पुरुत्ता सांगितले की तो सिकंदराचा संदेश घेऊन आला आहे. पुरुने जेव्हा ओम्फीस ह्या आपल्या जुन्या शत्रूला ओळखले तेव्हा तो उलट फिरता व त्याच्यावर भाल्याने ह्1 करायला सज्ज झाला.” यानंतरही सिकंदराने अनेक संदेशवाहक पुरु राजाकडे पाठवले. “आणि शेवटी मेरोसला पाठवले जो एक भारतीय होता आणि सिकंदराला कळले होते की तो व पुरु जुने मित्र होते.”

शरणागती स्वीकारण्यासाठी पुरुला पटविण्यात मेरोस शेवटी यशस्वी झाला. इतिहासातील सर्व नोंदी सांगतात की पुरु पराभवातही स्वाभिमान बाळगून होता आणि त्यामुळे सिकंदरावर त्याची इतकी मोहिनी पडली की त्याने पुरुला त्याच्या राज्याचा मंत्री बनविले. इतकेच नाही तर अधिक प्रदेश त्याच्या ताब्यात दिला.

ह्या भारतीय मेरोसचा पुढे उ 'ख येत नाही. मेरोचा अशी मेरो शब्दाची षष्ठी विभक्ती असण्याचीही शक्येता आहे. ह्याच मेरोस पहाडावर ग्रीक सैन्याने दहा दिवस घूमधाम ऐषाराम केला होता. हा भारतीय मेरोस इतिहासातून जेव्हा नाहीसा होतो तेव्हा सिसिकोट्टस

पुनः प्रवेश करतो. याच वेळी सिकंदराला पूर्वी जिंकलेल्या पहाडी प्रदेशात बंडखोरी झाल्याची बातमी सिसिकोटड्सकडून मिळाली. मग तिचा बीमोड करण्यासाठी सिकंदराने आपला शूर सरदार फिलिप्पोस याला पाठवले.

ह्या बंडखोरीमुळे सिकंदरचा निर्धार थोडाही कमी झाला नाही. समुद्रापर्यंत जायचेच असे त्याने ठरविले. पण त्याला पंजाबमधे घुसण्याच्या आधी धोक्याची सूचना देण्यात आली की बियासच्या पलिकडील सर्व प्रदेश एकाच सर्वशक्तीशाली सम्राटाच्या अधिपत्याखाली आहे. ग्रीक डिओडोरस सिकुलोस त्याची Xandrames तर कुर्टीअस Aggrames म्हणून नोंद करतो. गंगा नदीच्या दोन्ही बाजूच्या दोन मोठ्या प्रदेशांवर त्याचे राज्य होते. तो विशातत सेना बाळगत असे. "२०,००० घोडेस्वार, २,००,००० पायदळ, २००० चार घोड्यांचे र्थ आणि या सर्वांपेक्षा ताकदवान असे ३००० हत्तींचे हत्तीदळ".

सिकंदराने पुरुत्ता त्याचे मत विचारते तेव्हा पुरुने ही माहिती खरी असल्याचे सांगितले. त्यापुढे तो म्हणात्ता की तो सम्राट चाख्यिहीन होता आणि तो न्हाव्याचा मुलगा असल्यामुळे प्रजा त्याचा आदर करत नव्हती. राणीचा प्रियकर असलेल्या त्या न्हाव्याने राजाचा खून केला होता व नंतर इतर सर्व वंशजांची कत्तल केली होती. Xandrames त्याचा मुलगा होता.

सैनिकांनी बियास नदी ओलांडायला स्पष्ट नकार दिल्यावर आचिलिसप्रमाणे सिकंद्रने रुसून दोन दिवस स्वतःत्ता तंबूत डांबून घेतले. शेवटी तो बाहेर आला तेव्हा त्याने त्याच्या स्वारीचे स्मारक म्हणून चौकोनी शिलांच्या बारा वेदी उभारायला सांगितल्या. त्यानंतर त्याने आपल्या आरमारप्रमुख निऑर्कसने तयार केलेल्या जहाजांमधून आपल्या सैन्यासह बियास व सिंधु नद्यांमधून परतीचा प्रवास सुरू केला. प्लुटाक लिहितो, "त्याने हजार जहाजांसहीत समुद्राकडे प्रयाण केले. पुरु व तक्षशिला यांच्यात समेट घडवून त्यांना मैत्रीपूर्ण वातावरणात सोडून... लग्नसंबंधांने या मैत्रीला बळकटी आली होती... त्याने दोघांना सार्वभौम राजे केले." आपल्ल्यामागे त्याने त्याचे दोन उत्कृष्ट सेनापती ठेवले. गांधारावर राज्यपाल म्हणून फिलिप्पोस तर ओम्फीस राजाला मदतीसाठी त्याच्या ढालधारी पथकाचा वरिष्ठ सेनापती युडेमोस मागे राहिला. अर्थात यांत ओम्फौसवर नजर ठेवण्याचाही हेतू असावा.

सिकंदर समुद्रापर्यंत पोहोचण्याच्या आधी त्याला इतर भारतीय टोळ्यांचा सामना व पराभव करावा लागला. तसेच त्याने इतरही अनेक शहरांना लुटले. समुद्राजवळ आल्यावर सिकंदराने सिंधच्या वाळवंटातून वाटचाल करण्याचा अत्यंत धोकादायक निर्णय घेतला. ह्याचा परिणाम असा झाला की प्रचंड प्राणहानीनंतर इ.पू. ३२५ मधे कर्मानिया (आताचे आग्नेय इराण/पर्शिया) येथे पोहोचले ते सर्वथा हतप्रभ सैन्य.

पर्शियाला परतल्यावर त्याच्या सैन्याने कितीही आनंदोत्सव साजरा केला तरी सिकंदराला मात्र खूष होण्यासाठी फारशी कारणे नव्हती. त्याला सगळीकडून बातम्या येऊ त्लागल्या की जे ग्रीक सरदार त्याने स्थानिक मंत्री म्हणून नेमले होते त्यांनी एकतर त्यांच्या अधिकाराचा गैरवापर तरी केला होता किंवा स्वतःला सार्वभौम राजा म्हणून तरी घोषित केले होते. पण सर्वात दुःखदायक बातमी आली ती गांधारचा राज्यपाल व सिकंद्रचा जुना मित्र फिलिप्पोस याच्या खुनाची. एरियन लिहितो, “भारतात ह्या सरदाराविरुद्ध युद्धजीवी सैनिकांनी कट स्चला आणि त्याला कपटाने ठार मारले”. सिकंदराने मग युडेमोस व राजा ओम्फीस यांना पत्र लिहून त्यांचाकडे गांधारची जबाबदारी सोपविली. त्यानंतर त्याने त्यांच्याकडे असलेल्या सर्व भाडोत्री सैनिकांना लगेच काढून टाकावे अशी आज्ञा त्याच्या साम्राज्यातील सर्व मंत्री व सेनापतींना दिली.

ह्या काढून टाकलेल्या भाडोत्री सैनिकांपैकी एक होता सिसिकोट्टस जो फिलिप्पोसच्या हाताखाली एओनोंसचा कारभार बघत होता व ज्याचा फिलिप्पोसच्या खुनात हात असण्याची शक्यएता आहे.

आता जसा सिकंदर पर्शियातून पश्चिमेकडे प्रवास करू लागता तसतसे त्याला अनेक सैनिक येऊन मिळू लागले. ते त्याने पूर्वेकडे प्रवास करतांना सैनिकी छावण्यांमधे मागे सोडले होते. पर्सेपोलिस (पर्शिपोलिस) येथे त्याने तेथील राजमहालाला भेट दिली. तेथे त्याने आधी केलेल्या विध्वंसाबद्दल पश्चाताप व्यक्त केला. तेथून तो सुसा ह्या तीन पर्शियन राजधान्यांपैकी एका राजधानीत इ.पू. ३२४ ला पोहोचला. सुसा इथे त्याने त्यांचा व त्याच्या सहकाऱ्यांचा सामूहिक विवाह पर्शियन पद्धतीने आयोजित केला. त्यामुळे त्याचे अधिकारी उच्च पर्शियन खानदानांत प्रवेश करतील हा त्याचा हेतू होता. सिकंदराने डरायसच्या मोठ्या मुलीशी, रोक्झानाशी, लग्न केले तर त्याचा जवळचा मित्र हेफेस्टन याने तिच्या लहान बहिणीशी लग्न केले.

इतर पर्शियन राजघराण्यातील व इतर मोठ्या खानदानांतील ऐंशी मुलींचा विवाह सिकंदराच्या सहकाऱ्यांशी करून देण्यात आला. मॅसेडोनियन सैनिकांपैकी ज्यांनी स्थानिक महिलांशी विवाह केला होता त्यांना विवाहाची नोंदणी करण्याचा आदेश देण्यात आला. त्या वेळी थोड्याथिंडक्या नाही तर दहा हजार सैनिकांनी नोंदणी केली.

ज्यांनी ह्या विवाह सोहळ्यात भाग घेतला त्यात मॅसेडोनियाचा सेनापती सेल्युकसही होता. हा एक पराक्रमी व बलवान सेनापती होता. त्याने सिकंदराच्या बरोबर अनेक महत्वपूर्ण युद्धभोहिमांमधे भाग घेतत्ता होता. एरियनच्या नोंदीप्रमाणे त्याने पुरुविरुदधच्या लढाईत ढालधारी दलाचे नेतृत्व केले होते. त्याला आता बक्षीस म्हणून स्पिटामेनेसची कन्या अपमा ही विवाहात मिळाली. स्पिंटामेनेस हा सिकंदराच्या विरुद्ध कडवी लढत देणारा शूर सरदार होता.

यावेळी सिकंदर केवळ एकतीस वर्षांचा होता. पण आताशा त्याच्यात शारीरिक व मानसिक ऱ्हासाची लक्षणे दिसू लागली होती. त्याला युद्धात झालेल्या जखमांबरोबर अतिमद्यपानाचाही हा परिणाम होता. चौदा महिन्यानंतर इ. पू. ३२३मधे बॅबिलोन येथे त्याचा मलेरिया किंवा विषमज्वरामुळे typhoid मृत्यु झाला. पर्डिकस ह्या त्याच्या सहकाऱ्याने मग सिंकंद्राच्या मुलाच्या (चौथा अलेक्झांडर) वतीने अनेक सहकाऱ्यांची विविध प्रदेशांवर नेमणूक केली. प्रत्यक्षात हे सरदार आता अधिक सत्ता काबीज करण्यासाठी चढाओढ करु लागले. इ.पू.3२९ मधे पर्डिकसचा खून झाला व उरलीसुरत्ती व्यवस्थाही कोसळली. येथूनच चाळीस वर्षाचे वारसांचे युद्ध सुरु झाले.

या दरम्यान युडेमोस गांधारात सत्तेवर राहिला. सुरुवातीला त्याने पुरु राजाबरोबर पंजाबचे राज्य उपभोगले पण पुढे पुरूचा विश्वासघाताने खून करून सर्व सत्ता काबीज केली. तो व पेईथॉन हे दोघे अनेक वर्षे गांधार व सिंध प्रदेशात राहिले पण त्यांचा अधिकार हळू हळू कमी होत गेला. शेवटी ते तेथील सत्तासंघर्षात भाग घेण्यासाठी पर्शियाला परतले.

पूर्वेला मात्र सेल्युकसत्ता याचा लाभ झाला. त्याला निकेटर हे बिरूद मिळाले. निकेट्र म्हणजे विजेता (Nike ह्या ग्रीकांच्या विजयदेवतेवरून). इ.पू. ३०५मधे त्याने पश्चिम तुर्कस्थानापासून सिंधुपर्यंत सर्व प्रदेशावर अधिपत्य मिळवले होते. तो आता स्वतःला मेसोपोटेमिया (आजचा इजिप्त) व पर्शिया (आजचा इराण) यांचा राजा म्हणू लागला. त्यानंतर तो सिंधुच्या पूर्वेकडील प्रदेश काबीज करायला निघाला.

यानंतर जे झाले त्याबद्दल इतिहासकार अप्पिअन, जस्टीन व प्लुटारक यांनी लिहिले आहे. पहिला लिहितो, “सेल्युकस निकेटरने सिंधु पार केली व भारतीय राजा अंड्रोकोट्टसशी युद्ध केले”. जस्टीनची नोंद थोडी मोठी आहे, “त्याने आधी बॅबिलोनवर ताबा मिळवला. नंतर या यशाने द्विगुणित झालेल्या सैन्याच्या मदतीने त्याने बॅक्ट्रीयाला पराभूत केले. नंतर तो भारतावर चढाई करून गेला जेथे सिकंदराच्या मृत्युनंतर गुलामगिरीचा जू मानवरून उतरल्यावर त्याच्या सहकाऱ्यांना मारून टाकण्यात आले होते. सॅड्रोकोटटस ह्या भारतीयांचा नेता होता ज्याने त्यांना स्वतंत्र केले होते.” प्लुटारकत्ता या नवीन भारतीय राजाबह्दल्ल अधिक काही म्हणायचे होते. “अंड्रोकोट्सने, जो आता सिंहासनाधिश्वर राजा झाला होता, सेल्युकसत्ता ५०० हत्ती नजराणा म्हणून दिले... व (त्यांनी) ६००,०००चे सैन्य घेऊन सर्व भारतावर ताबा मिळवला... **अंड्रोकोट्स तरूण असतांना त्याने प्रत्यक्ष सिकंदराला पाहिले होते** आणि नंतर जाहीर केले होते की सिकंदर सहजपणे भारत जिंकू शकता असता कारण तेव्हाच्या राजावर प्रजेचे प्रेम नव्हते कारण तो स्वभावाने क्रूर होता व जन्माने हलक्या जातीचा होता.” इथे हे स्पष्ट होते की अंड्रोकोट्ट्स आणि सेंड्रोकोटटस ही एकच व्यक्ती आहे.

आता जवळपास वीस वर्षांनी सिसिकोड्स/सिसिकोस्टस या नावाचा आणि काहीसा अज्ञात अशा मैरोसच्या जागी अंड्रोकोट्टस (अप्पिअन व प्लुटारकं), संड्रोकोट्ट्स (जस्टीन), संड्रोकोट्टोस (मोठा प्लिनी) व या सर्वात बिनचूक संड्रोकोष्टस (प्रीक तत्त्ववेत्ता अथेनाईओस)... व ह्यापुढे संड्रोकोष्टस म्हणून निर्देश केला गेलेत्ता भारतीय सेनापती परत इतिहासाच्या प्रकाशाझोतात येतो. एक भाडोत्री, युद्धजीवी सेनापती म्हणून नाही तर भारताचा सार्वभौम राजा म्हणून.

सँड्रोकोष्टस आणि त्याच्या मेसोपोटेमिया व पर्शियाच्या राजाशी म्हणजे सेल्युकस निकेटरशी असलेल्या संबंधांबद्दल जस्टीन सर्वात जास्त माहिती देतो पण तो सेल्युकसला सत्ता कशी मिळाली याबद्दल काही कपोलर्का 'त बाबीही जोडतो.

"तो (संड्रोकोष्टस) सामान्य कुटुंबात जन्मला होता पण एका उज्ज्वल भविष्य वर्तवणाऱ्या शुभशकुनामुळे त्याला राज्याभिलाषा उत्पन्न झाली होती. त्याने उद्धटपणे नंद (80115) राजाचा अपमान केला होता म्हणून राजाने त्याला मृत्युदंड फर्मावला. त्यामुळे तो तेथून पळाला. जेव्हा तो थकून भागून एका ठिकाणी झोपला तेव्हा एक महाकाय सिंह तेथे आता व त्याचा घाम चाटू लागला. जेव्हा तो जागा झाला तेव्हा सिंह शांतपणे तेथून निघून गेला. ह्या विलक्षण अद्भुत घटनेमुळे त्याला प्रेरणा मिळाली आणि त्याने एक दरोडेखोरांची टोळी तयार केली. त्याने परकीय राजाला हाकलण्यासाठी भारतीयांना चिथावणी दिली. त्यानंतर जेव्हा तो सिकंदराच्या सेनापतींवरह् 1 करायला तयार झाला तेव्हा एक प्रचंड हत्ती त्याच्यासमोर आला व पाळीव हत्तीप्रमाणे नतमस्तक झाला. त्याच्या पाठीवर बसून तो सैन्याच्या आघाडीवर लढला. सेंट्रोकोट्टसने अशा प्रकारे भारताचे सिंहासन मिळवले असतांना सेल्युकस त्याच्या महानतेचा पाया तयार करत होता." (मदमस्त हत्ती बुद्धासमोर नतमस्तक होण्याची कथा तिपिटकात येते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.)

संड्रोकोष्टसवर जो भारतीय राजा रागावला होता तो सिकंदराचे इतिहासकार म्हणतात त्याप्रमाणे Xandrames किंवा Aggrames नव्हता तर येथे नोंदल्याप्रमाणे Nandrus होता. आपण राजेवैभवाची दोन प्रतिके असलेल्या विशाल सिंह व हत्ती यांच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करू या. पण ह्या नोंदीप्रमाणे सँड्रोकोष्टस राजा नंदाला नाराज करतो व आपला जीव वाचवण्यासाठी पळून जातो; नंतर तो लुटारु साथीदार मिळवतो; भाडोत्री, युद्धजीवी सेनापती बनतो; स्थानिक भारतीयांना फिलिप्पोस व त्याचे उत्तराधिकारी युडेमोस व पेईथॉन ह्या सिकंदराच्या गांधारातीत्त सरदारांच्या विरुद्ध उठाव करायला चिथावणी देतो आणि त्यानंतर भारताचे सिंहासन काबीज करतो. हे सर्व तो सेल्युकस "विजेता? त्याची सत्ता बळकट करण्याच्या आधी करतो. दुसर्याच शब्दात सांगायचे तर इ.पू. ३०५मधे सेल्युकसने सिंधु पार करून भारतावर ह् केला त्याच्या खूप आधी सेट्रोकोष्टस भारताचा एकछत्र सप्राट झाला होता.

सेल्युकसच्या स्वारीत तो गंगाकिनाऱ्यावरील पठारावर दूरपर्यंत पोहोचला. कदाचित ज्या शहराला ग्रीक पालिंबोथ्रा Palibothra किंवा पालिम्बोथ्रा Palimbothra असे म्हणत त्या शहरापर्यंत त्याने धडक मारती असावी. तेव्हा पालिबोथ्रा किंवा पालिम्बोथ्राच्या सैन्याने पलटवार केला आणि सेल्युकसला मागे ढकलत सिंधुच्या पार त्याच्याच प्रदेशात दूर हुसकावले. त्यानंतर तह झाला व युद्ध थांबले. या तहानुसार सेल्युकसने भारतावरील सर्व हक्क् सोडले व त्या बदल्यात त्याला पाचशे हत्ती मिळाले. तो तह विवाहबंधनाने पक्का करण्यात आला. ग्रीक इतिहासकार तहाच्या अटींबाबत काहीसे मौन आहेत. त्यांच्यापैकी फक्त प्लिनी ग्रीकांनी काही प्रदेश गमावला हे मान्य करतो, "त्यानंतर भारतीयांचा एस्आनिवर ताबा होता (एरिआन हा पर्शियन साम्राज्याचा तो सुभा होता ज्यात आजचा पूर्व इराण, नेक्रत्य अफगाणिस्तान व बलुचिस्तान येतात). एस्ओआन त्यांना मॅसेडोनियनांकडून मिळाला होता. तहात विवाहसंबंध व भारतीयांकडून पाचशे हत्तींची भेट सामीत्त होती, संड्रोकोष्टसकडे नऊ हजार लढाईचे हत्ती होते." त्यातील पाचशे हत्ती सँड्रोकोप्टस सहज देऊ शकत होता. पाचशे हत्तींच्या बदल्यात सेल्युकसने सिकंदराने जिंकलेले सिंघुच्या पूर्वेचे सर्वं क्षेत्र परत केलेच पण त्याबरोबर गांधार व एस्आनिही गमावले. हा तह तुल्यबळांतील नव्हता. सेल्युकसला तो स्वीकारणे भाग होते कारण त्याला पूर्व सीमेवर काहीही उपद्रव नको होता. त्याचे लक्ष्य आता मेसोपेटोमियाच्या पश्चिमेत्ता त्याचा उरलेत एकमेव शत्रू अन्टीगोनोस होता. त्या तहातील्त विवाहसुद्धा तुल्यबळांतीलत नव्हता-- पराभूताने विजेत्याला त्याची कन्या दिली होती. ग्रीकांचे ह्याबाबतीत मौन हेच दर्शवते की सेल्युकसने त्याची मुत्तगी सॅड्रोकोष्टसता किंवा संड्रोकोष्टसच्या मुलाला व उत्तराधिकाऱ्याला दिली होती. बेसिल्यूस सेल्युकस "विजेता? व राजा संड्रोकोष्टस यांत पुढे मैत्रीपूर्व संबंध राहिले पण सेल्युकस आता अन्टीगोनोसचा बीमोड करण्यात व एशिया मायनरवर (तुर्कस्थानचा भाग, अँनातोलिया) आपले व आपल्या मुलाचे, अन्टीओकसचे, वर्चस्व निर्माण करण्यात गुंतला होता. तरीसुद्धा सेल्युकसने भारतीय राजधानी पालिम्बोथ्राला राजदूत पाठवले होते. ही प्रथा त्याचा मुलगा व उत्तराधिकारी अँन्टीओकसने (ज्याची बहिण भारतात एकतर राणी किंवा राजकुमाराची पत्नी असणार) सुरू ठेवली. ह्या राजदूतांपैकी पहिले दोन राजदूत होते--मेगास्थेनिस, जो संड्रोकोष्टसच्या दरबारात राजदूत होता, आणि डेईमाकोस ज्याला सँड्रोकोष्टसचा पुत्र व उत्तराधिकारी माहित होता. स्ट्रेबोने त्याला Allitrochades असे म्हटले तर अथेनाइओसने Amitrochates असा त्यांचा निर्देश केला.

मेगास्थेनिसच्या India ह्या पुस्तकाचे फकृत काही अंशच बचावले आहेत पण ह्या दोन राजदूतांच्या नोंदी एरियन, डिओडोरस, मोठा प्लिनी व स्ट्रॅबो यांना फारच उपयुक्त ठरल्या. ह्या राजदूतांनी भारतीय समाज व त्याच्या चालीरिती जवळून पाहिल्या होत्या व त्यांचे लिखाण पंधराशे वर्षांपेक्षा जास्त काळ भारताबद्दलचे पश्चिम युरोपात उपलब्ध असलेले सर्वोत्कृष्ट वर्णन होते. कोणत्याही कुशल राजनैतिक अधिकाऱ्यांप्रमाणे त्यांनी

गुप्तमाहिती गोळा केली, स्थानिक प्रशासन कसे काम करते याचा अभ्यास केला, सैन्याची बलस्थाने व उणीवा जाणून घेतल्या आणि स्थानिक अर्थव्यवस्था व नैसर्गिक स्त्रोत समजावून घेतले. पालिम्बोथ्राच्या संरक्षणाची काय व्यवस्था होती आणि हे शहर त्यांच्या राज्याच्या सीमेपासून किती दूर होते हे ही त्यांनी अचूक तपासले होते.

स्ट्रॅबोनुसार मेगास्थेनिसने लिहिले होते की पालिम्बोथ्रा शहर गंगा व एर्रानोबोआस या नद्यांच्या संगमावर वसले होते. "गंगा सर्वात मोठी तर एर्रानोबोआस कदाचित तिसऱ्या क्रमांकाची... ह्या नद्यांच्या संगमावर पालिबोथ्रा वसले आहे-- ऐंशी स्टेडिया लांबीचे व पंधरा स्टेडिया रुंदीचे." एसियिन सेंड्रोकोष्टसच्या राजधानीचे अधिक वर्णन करतो, "पालिम्बोथ्रा हे भारतातील सर्वात मोठे शहर आहे. ते प्रसिअन्सच्या प्रदेशात आहे, एर्रानोबोआस व गंगा यांच्या संगमावर... मेगास्थेनिस म्हणतो की ज्या बाजूत्‌ा हे शहर लांबवर पसरले आहे त्या बाजूला ते दहा मैल आहे आणि त्याची रुंदी पावणेदोन मैल आहे. शहराच्या भोवती ६०० फूट रुंदीचा व ४५ फूट खोलीचा खंदक आहे. शहराच्या तटबंदीवर ५७० मनोरे आहेत व तर्बंदीत ६४ दरवाजे आहेत."

इ.पू. २८१ मधे सेल्युकस निकेटर सत्त्याहत्तर वर्षांचा झाला होता. सिकंदराबरोबर लढणाऱ्या मॅसेडोनियन सेनानींपैकी तो एकटाच आता जिवंत होता. त्या वर्षी तो त्याच्या पुत्र अन्टीओकससाठी मॅसेडोनिया व थ्रेसवर ताबा मिळवायला निघाला होता पण त्या स्वारीत त्याचा चलाखीने खून करण्यात आला. हा खून त्याचा आधी मित्र व नंतर शत्रू झालेल्या इजिप्तच्या टॉलेमीच्या मुलाने केला. वारशाचे युद्ध (Succession Wars) आतासेल्युकीड व टॉलेमिक साप्राज्यांमधील सिरियन युद्ध झाले. सेल्युकसचा नातू दुसरा अँन्टीओकस इ.पू. २४६ मरण पावल्यानंतर सेल्युकीड साप्राज्याचे तुकडे पट्ट लागले. दुसर्याक सेल्युकसचा तिसऱ्या टॉलेमीने पराभव केला आणि त्याच्या छोट्या भावाने त्याला आव्हान दिले. यामुळे बॅक्ट्रीयाचा सरदार डिओडोट्स सोटर आता बॅक्ट्रीयाचा स्वतंत्र शासक झाला.

डिओडोटस सोट आणि त्याच्या वंशजाची भरभराट झाली. इ.पू. २४० पर्यंत ग्रीक-बॅक्ट्रीयनांनी सिंधुच्या पूर्वेकडील भारतीय साम्राज्याचा मोठा लचका तोडला होता. उत्तरेकडे पार्थियाही स्वतंत्र झाला होता. तेथीत्त राजा असकिसने बॅक्ट्रीयाशी मैत्री करून दुसरे सेल्युकसला त्याच्या पणजोबाचे पूर्वेकडील साम्राज्य परत मिळवू दिले नाही. पार्थियाच्या वाढत्या वर्चस्वामुळे सिकंदराने निर्माण केलेला भूमध्यसागरी प्रदेश व भारत यांतील भूमार्गी दुवा पूर्णपणे तुटला.

उपरोक्त माहिती सर विल्यम जोन्सला ग्रीक स्त्रोतांकडून उपलब्ध वर्णनांचा व नोंदींचा गोषवारा आहे.

आता त्याला ह्या नवीन उपलब्ध माहितीतून एक असा दुवा शोधायचा होता जो संस्कृत साहित्याशी जोडता येईल. सेल्युकस व संड्रोकोष्टसमधील युद्ध इ.पू. ३०५ मधे झाले असणार हे त्याला माहीत होते. याच वर्षी सेल्युकसने स्वतःला सिकंदरच्या पर्शियन साम्राज्याचा शासक घोषित केले होते. जोन्सने जाहीर केले, “जर आपण सेल्युकसच्या वेळचा एखादा भारतीय राजा शोधू शकलो तर” त्याला तो समान बिंदू सापडू शकेल.

जोन्सने भारतात येण्यापूर्वी ज्या अनेक विठ्ठानांचा स 1 घेतला होता त्यापैकी एक होता भूगोलशास्त्रज्ञ, मॅप-मेकर व ओशिंआनोप्राफर मेजर जेम्स रेन्नेल ज्याला “भारतीय भूगोलाचा जनक' मानले जाते. रेत्रेल भूतानच्या सरहद्दीवर पाहणी (सर्वे) करत असतांना कडव्या हिंदूंनी त्याच्यावर केलेल्या ह्‌ त खूप जखमी झाला होता. त्यामुळे तो १७७६मधे तिशीतच निवृत्त झाला. रेन्नेलची भारतातील तेरा वर्षे ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यातील प्रदेशांची पाहणी करण्यात, त्यांचा नकाशा बनविण्यात गेली होती त्यामुळे त्याला येथील प्रदेशांची व त्यांच्या जडणघडणीमागील प्रक्रियांची चांगली माहिती झाली होती. जेव्हा जोन्स त्याला लंडनच्या पोर्टलेड प्लेसजवळ शेवट्‌चा भेटला होता तेव्हा तो आपला नकाशा पूर्ण करत आला होता, जो भारताचा पहिला अचूक नकाशा असणार होता. आता १७८७ मधे जेव्हा जोन्स भारत व ग्रीस यांच्यातील समान दुव्याचा शोध घेत होता तेव्हा त्याला रेन्नेत्लकडून प्राचीन पालिम्बोश्राबद्दल एक पत्र आले. ह्या शहराबद्दल मेगास्थेनिस व त्याच्या नंतरच्या राजदूतांनी विस्ताराने लिहिले होते-- हे शहर गंगा-यमुना संगमापासून प्रवाहाच्या दिशेने ४२५ मैल होते, गंगेच्या मुखापासून ६३८ मैल प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने होते. निश्चितपणे सांगायचे तर “गंगा व एर्रानोबोआस यांच्या संगमावर वसलेले होते.

जोन्स व त्याचे सहकारी पंडित यांनी संस्कृत ग्रंथामधे पालिम्बोध्रा व एर्रानोबोआस यांचा खूप व्यर्थ शोध घेतला. त्यांना पाटलिपुत्रचा उ ख मात्र वारेवार सापडला, जी मगधाची राजधानी होती. त्यानंतर त्याला रेत्रेलचे पञ आले की त्याला एक दशकापूर्वी पाटण्यात व पाटण्याच्या आसपास पाहणी करतांना त्याला स्थानिक लोकांकडून कळले होते की ‘Patelpoot-her’ नावाचे एक प्राचीन शहर त्या ठिकाणी वसले होते व खूप पूर्वी पूराने वाहून गेले होते.

रेव्रेलच्या नंतरच्या पाहणीत त्याला शोध लागला की कंपनीच्या बंकीपूर येथील नवीन मुलकी व सैनिकी लाइन्सचे बांधकाम गंगेच्या काठावर नवीन पाटण्याच्या वरच्या बाजूला एका जुन्या नदीपात्राच्या ठिकाणीच करण्यात येत होते. (ह्या आपत्तीजनक नगररचनेमुळे आजही पाटण्याला दर पावसाळ्यात गंगेच्या पूराला सामोरे जावे लागते). त्याला खात्री पटली की हा सोन नदीचा मूळचा प्रवाह असावा जी आता गंगेत बावीस मैल वरच्या बाजूला विलिन होते. रेत्रेलला हेही लक्षात आले की ही सोन नदी गंगेला मिळण्याआधी दोन प्रवाहात विभागली जात होती, ज्यामुळे एक लांब अंडाकृती बेट तयार झाले होते. ह्या बेटाची लांबी व रुंदी इतकी मोठी होती की त्यामधे मेगास्थेनिसने वर्णन

केलेल्या पालिम्बोश्रा शहराच्या चौकोनी तटबंदी मावत होती. महत्त्वाचे म्हणजे मेगास्थेनिसने दिलेले मोजमापही असेच होते की ते प्राचीन शहर आधुनिक पाटण्याच्याच ठिकाणी होते. रेन्नेत आता पत्रातून विचारणा करत होता की पाटणा, पाटलिपुत्र व पालिम्बोथ्रा एकच तर नव्हे?

पण एका प्रश्नाचे उत्तर रेन्नेलकडे नव्हते. ग्रीकांनी पालिम्बोश्राजवळ गंगेत येऊन मिळणाऱ्या नदीला एररानोबोआस असे नाव का दिले होते? त्याचे उत्तर सर विल्यम जोन्सला अगदी योगयोगाने मिळाले ते त्याच्या वाचण्यात एक संस्कृत ग्रंथ आला ज्यात सोन नदीला हिरण्यबाहू म्हटले होते. जोन्सच्या लक्षात आले की मेगास्थेनिसने ह्या शब्दाचे ग्रीकीकरण एरंनोबोआस असे केले ज्याचा अर्थ होता “सुंदर गुंजारव करणारी नदी”. हा साहित्यिक पुरावा होता की सोन व एर्रानोबोआस ही एकच नदी होती आणि आधुनिक पाटणा हेच ग्रीकांचे पालिम्बोश्रा व प्राचीन भारताचे पाटलिपुत्र होते.

ह्या पहिल्या शोधातून लगेच दुसरा एक शोध लागला. तोही आत्तापर्यंत न वाचलेल्या दोन संस्कृत साहित्यकृतींमुळे. एकात सोमदेव नावाच्या कवीने अनेक रमणीय व सुविचारपूर्ण कथांची साखळी पद्यात गुंफलेली होती. त्यात 'नंदराजाची त्याच्या आठ मुलांसह हत्या व चंद्रगुप्ताने केलेले राज्यहरण या पाटलिपुत्रातील प्रसिद्ध क्रांतीची कथा होती". त्याच विषयावरील, चंद्राच्या राज्यारोहणावरील संस्कृत गद्य नाटक हा दुसरा स्रोत होता. चंद्र हे राज्य हडपणारा अत्यंत कर्तृत्ववान व साहसी चंद्रगुप्त याचे लघु रूप होते". हे गद्य प्रत्यक्षात पाचव्या शतकात विशाखदत्ताने लिहिलेल्या 'मुद्राराक्षस' ह्या महाकाव्याचा केवळ एक भाग होते.

मुद्राराक्षस ही मगधराज नंदाच्या सेवेतील राक्षस व चाणक्य या दोन विरोधी मंत्र्यांची (किंवा अमात्यांची) कथा होती.

नंद राजा वृद्धावस्थेत अत्यंत क्रूर वागू लागतो. त्यामुळे चाणक्य महत्वाकांक्षी राजपुत्र चंद्रगुप्ताला राजा बनविण्याच्या कटात सामील होतो. नंदात्ता कटाची माहिती होते व तो चंद्रगुप्ताला त्याच्या आठ सहकाऱ्यांसह राज्याबाहेर तडीपार करतो. चंद्रगुप्ताला हिमालयाचा राजा पर्वतेश्वर सहारा देतो. पर्वतेश्वराचे यवन (ग्रीक), शक (इराणी), कंबोज (गंधार) व काश्मीरी मित्र असतात. नंदाच्या अर्ध्या साम्राज्याच्या बदल्यात पर्वतेश्वर चंद्रगुप्ताला पैसा व सैन्य पुरवतो. मग ते पाटलिपुत्रावर स्वारी करतात व जिंकतात आणि चंद्रगुप्त त्याच्या सर्व सावत्र भावांची हत्या करतो. तो व पर्वतेश्वर नंदाचे साप्राज्य आपापसात वाटून घेतात. नंदाची मुत्लतगी नंतर पर्वतेश्वराचा विष देऊन खून करते. त्याचा मुत्तगा मलयकेतू सिंहासनावर बसतो. तो नंदाचा मंत्री राक्षस याच्या स‍ गुसार चंद्रगुप्तावर ह‍ करतो. पण चंद्रगुप्त ग्रीकांच्या मदतीने शहराची तटबंदी मजबूत करतो आणि चाणक्य चलाखीने राक्षसाला चंद्रगुप्ताच्या पक्षात घेऊन येतो. मलयकेतू पराभूत होतो. चंद्रगुप्त मग 'अनेक वर्षे न्यायाचे व समतेचे राज्य करतो व प्रजेचा लाडका होतो.'

ब्राह्मणाने ब्राह्मणांसाठी लिहिलेले व ब्राह्मण कसे सर्वकाही बरोबर करतात हे सांगणारे हे नाटक होते.

पण मुद्राराक्षसाचे मोल जोन्सता यामुळे होते की त्यांतीत्त एक घटना खरा इतिहास सांगत होती-- चंद्रगुप्त नंदाची सत्ता उलथून टाकतो. त्याला पुराणांच्या वाचनातून ह्या गोष्टीच्या काही मुख्य बाबी माहीत होत्या. ह्या नाटकाने काय केले तर अनेक बाबी विस्ताराने सांगितल्या. एक विशिष्ट माहिति फार महत्त्वाची होती ती ही की राज्यातून बेदखल केलेला राजकुमार चंद्रगुप्त पर्वतातील एका राजाची व वायव्येकडील लोकांची मदत करून नंदाला सिंहासनावरून पदच्युत करतो.

संड्रोकोष्टसने हेच केले होते. अर्थातच, ग्रीक संड्रोकोष्टस हा भारतीय राजा चंद्रगुप्त होता.

एका बाबीने उरलीसुरली शंकाही दूर केली. जोन्सने ओळखले की सिसिकोट्टस व सँड्रोकोष्टस हे दोन्ही नावे चंद्रगुप्त या नावाची ग्रीक रूपे होती. कुण्याही संस्कृतच्या जाणकाराला चंद्रगुप्त शब्दाचा अर्थ स्पष्ट होता. चंद्र म्हणजेच शशी. गुप्त म्हणजे राखलेला, सुरक्षित. सिसिकोट्टस हे शशीगुप्ताचे ग्रीक रुप होते. तरुण तडीपार राजकुमार व युद्धजीवी सैनिक शशीगुप्त पुढे प्रौढ सम्राट चंद्रगुप्त झाला.

आज हे सगळे सरळ सोपे दिसते. पण त्या काळात विल्यम जोन्सची विद्ठत्ता व सुखावह योगायोग यामुळेच हे शक्ये झाले होते. “मतला योगायोगाने लागलेला एक शोध सांगितल्याविना राहवत नाही” असे त्याने एशियाटीक सोसायटीच्या दहाव्या स्थापनादिनी कोलकाता येथे २८ फेब्रुवारी १७९३ ला केलेल्या व आता सुप्रसिद्ध झालेल्या भाषणात जाहीर केले. पहिल्यांदा त्याने पाटणा-पाटलिपुत्र-पालिम्बोश्रा हे कोडे कसे सुटले हे सांगितले. नंतर त्याने ह्यातून एक त्याहूनही मोठा शोध कसा लागला हे सांगितले. “एका साहसी सैनिकापासून उत्तर भारताचा सम्राट असा प्रवास करणारा चंद्रगुप्त... दुसरा तिसरा कुणी नसून तोच संड्रोकोटटस होता ज्याने सेल्युकस निकेटरबरोबर तह केला होता.”

ह्या शोधामुळे प्राचीन भारतीय इतिहासाला एक पक्की तारीख मिळाली जिच्या आधारावर पुढील कालगणना करणे शक्यि झाले.


सिकंदर (अलेक्झांडर द ग्रेट) इ.पू. ३२३ त्ता बॅबितोन येथे मृत्यु पावला होता. सेल्युकस निकेटरने इ.पू.३०५ मधे भारतावर ह् 1 केला तेव्हा चंद्रगुप्त उत्तर भारताचा सप्राट म्हणून स्थिर झाला होता. याचा अर्थ चंद्रगुप्ताने नंदाचे सिंहासन जिंकले ते सिकंदराच्या इ.पू.३२३ मधील मृत्युनंतर व सिकंदराचे सरदार युडेमोस व पेईथॉन ह्यांना भारतीय प्रदेशातून माघार घ्यावी लागली त्या इ.पू.३९७च्या आधी. जोन्सने नंतरची तारीख प्राह्म मानली.

'एशियाटीक रिसर्चेसमधे प्रकाशित झालेल्या मगधराजांच्या पौराणिक यादीनुसार चंद्रगुप्ताने चोवीस वर्ष राज्य केले. पुराणातीत्त कालगणना (कुणी किती वर्षे राज्य केले ही) खरी मानली तर चंद्रगुप्ताने इ.पू. ३१७ ते २९३ राज्य केले. त्याचा पुत्र बिंदुसार याने पंचवीस वर्षें राज्य केले. त्यानंतर त्याचा पुत्र अशोक याने छत्तीस-सदतीस वर्ष राज्य केले, म्हणजे इ.पू. २६७ ते २३०. मौर्य साम्राज्य १३७ वर्षे टिकले-- अदमासे इ. पू. ३१७ ते १८०.

ह्या कालगणनेच्या दोन शतके व दोन दशकांनंतरही तिच्या वैधतेवर आक्षेप आलेला नाही.




सेल्युकस निकेटरचे राजा (basileus) म्हणून नाणे. मागील बाजू भारतीय राजा सँड्रोकोप्टस (चंद्रगुप्त) याने त्याला भेट दिलेले हत्ती व माहूत दाखवते. येथे हत्ती युद्धाच्या वेळी वापरल्या जाणाऱ्या चिलखतात असून ते विजयाची देवता नाईके हिचा रथ ओढत आहेत. (British Museum)



पाटणा कस्टम हाऊसच्या छतावरून बंकिपूरच्या दिशेने काढलेले पाटण्याच्या नदीकिनाऱ्याचे चित्र. ईस्ट इंडिया कंपनीचा ओपियम एजंट सर चार्लस डॉयलीने पेन व शाईने काढलेल्या या चित्रावरील तारीख २४ ऑक्टोबर १८२४ आहे. (APAC, British Library)

५. आवेशपूर्ण प्राच्यविद्यापंडित



अमरावती येथील एक शिळा-शिल्प. ह्यात एक अत्यंत सुशोभित केलेला स्तूप, त्याच्या भोवतालचे स्तंभ व चार तोरण (प्रवेशद्वार) दिसतात. सन १८९६ मधे कॉलीन मॅकेन्झीने केलेल्या अपुऱ्या उत्खननाच्या वेळी त्याच्या रेखाटनकारांनी केलेल्या अनेक रेखाटनांपैकी एक. (APAC, British Library)

सर विल्यम जोन्स कलकत्ता येथे आल्यापासून भारतीय संशोधनात झालेल्या नाट्यमय व विलक्षण प्रगतीत्ला २७ एप्रिल ४७९५ रोजी अचानक खिळ बसली.

जोन्स याने फक्त दहा वर्षेच नोकरी करायचे कबूल केले होते व ती दहा वर्षे नोव्हेंबर १७९४ मधे पूर्ण झाली होती. परंतु आता अँना मारिया व विल्यम जोन्स दोघेही खूपच आजारी होते. तरी देखील जोन्सने तो ज्यावर अनेक वर्षे मधून-मधून काम करीत होता तो "हिंदू व मुस्लिम कायद्याचा ग्रंथ* पूर्ण करायचे ठरविले होते. हा आपला सर्वांत मोठा

बौद्धिक वारसा आहे असे त्याला वाटत होते. त्याच्या मते “२४ दशलक्ष काळ्या ब्रिटीश प्रजेला स्वतःचे कायदे देणे मला राजाने आभार मानण्यापेक्षा अधिक आनंददायी वाटते.” अना मारिया खूपच आजारी असल्याने इथे अधिक काळ न थांबता शरद क्रतूमधे त्री जहाजाने इंग्लंडला निघून गेली. परंतु तिचा पती यकृताला आलेल्या सूजेमुळे खूप वेदना होत असूनही कोलकाता येथेच राहीला. २० एप्रिल्त ४७९५ रोजी तो लार्ड हेस्टिंगनंतर गव्हर्नर जनरल म्हणून आलेला आपल्ता जुना मित्र सर जॉन शोअर याच्या भेटीला गेला. परंतु त्याला इतके अस्वस्थ वाटू लागले की तो जास्त काळ थांबू शकला नाही. एक आठवड्यानंतर शोअरला बोलावण्यात आले आणि तो जोन्सच्या गार्डन रिच येथील वाड्यात पोहचत्ता तो जोन्सने अखेरचा श्वास घेतलेत बघायलाच.

जोन्सच्या मृत्यूमुळे आपण नक्की काय गमावले हे त्याचा मित्र व शिष्य हेन्री कोलब्रुकपेक्षा चागंले कुणी सांगू शकणार नाही. “त्याच्या अकाली मृत्यूमुळे त्याच्या संशोधनातून मिळालेले निष्कर्ष विस्कळीत झाले. आणि त्याहीपेक्षा त्याच्या स्मरणातील, विचारांतील जे काही गमावले तीसुद्धा मोठी हानि होती... जे प्राच्यविद्यापंडित आता मागे राहिले आहेत त्यांचे ज्ञान तोटके आहे... मला अशा भीती वाटते की भविष्यातील संशोधनाच्या प्रगतीमधे इतका सर्वसमावेशक दृष्टिकोन असलेला अन्य संशोधक सापडणार नाही.”

ही भीती खरी ठरली. सर विल्यम जोन्स यांच्या मृत्यूमुळे एशियाटिक सोसायटीची अवस्था समुद्रांत सुकाणूशिवाय असलेल्या गलबतासारखी झाली. अनेक अध्यक्ष, सचिव, संकलक आले आणि गेले. परंतु सोसायटी योग्य मार्गदर्शकाच्या अभावी भरकटत राहिली.

असे असले तरी तिच्याशी पत्रव्यवहार करणाऱ्यांनी आपती माहिति गोळा करण्याचे काम सुरुच ठेवले. कमी प्रमाणात का होईना पण एशियाटिक रिसर्चेसचे अंक प्रकाशित होत राहिले. यापैकी एक होता कॅप्टन जेम्स हॉर ज्याने सोसायटीला दि "0 येथील फिरोझशहाच्या स्तंभाचे व अलाहाबाद येथील स्तंभाच्या चित्रांचे पुस्तक व त्याचबरोबर त्यावरील शिलालेखांच्या बघून रेखाटलेल्या प्रति भेट म्हणून दिल्या होत्या.

हा एक मोठा सुयोग होता कारण त्यानंतर ललवकरचे अलाहाबाद येथीत्त दगडी स्तंभाला हॉरने भेट दिली तेव्हा “हिंदुस्थानी वास्तूशास्त्राचा शनरू असलेला कर्नल किद याने निघृणपणे तो स्तंभ खाली पाडला होता व त्याचे शीर्ष (Capital) नष्ट झाले होते.” अवधच्या (लखनौ) नबाबाबरोबर केलेल्या एकत्रीकरणाच्या कपटी तहानंतर ईस्ट इंडिया कंपनीने अलाहाबाद किल्यावर सैन्य पाठविले. त्यानंतर १९०९ मधे नवाबाने कंपनीसाठी अलाहबाद सोडून दिले. त्यानंतर तेथील फौजेतीतत अभियंते किल्याची सुरक्षा मजबूत करण्यासठी कर्नल किदच्या हाताखाली आले. आपले काम करत असतांना कर्नल किद व त्याच्या फौजी अभियंत्यांनी या स्तंभाला फक्त उखडून फेकले नाही तर त्याचे अनेक तुकडे करून ते रस्त्याच्या आजुबाजूतता इतस्ततः टाकून दिले.

कॅप्टन हॉरने एशियाटिक सोसायटीला पाठविलेल्या या अहवालाचे तेथे वाचन होण्याआधीच तो तापाने मरण पावला. परंतु इ. स. १८०० त्ता कलकत्ता येथे संस्कृतवर प्रभुत्व असलेत्ता एकमेव युरोपियन हेत्री कोलब्रुक याने त्या अहवालाच्या प्रती वाचल्या. पण जेव्हा त्याच्यासमोर दि १ व अलाहाबाद येथील स्तंभावरील शिलालेखाची हॉरने काढलेली रेखाटने ठेवली गेली तेव्हा कोलब्रुकने कबुत्त केले की त्यावरील ग्रीक-सद्दश अक्षरांचा त्याच्या प्रतिभावंत पूर्वाधिकाऱ्याप्रमाणेच त्यालाही काहीही बोध झाला नाही.

सन १८००पर्यंत ईस्ट इंडिया कंपनीने अनेक वाईट सवयी (ज्यांच्यामुळे तिची भ्रष्टाचाराचा महामेरू अशी ख्याती झाली होती) सोडल्या होत्या. परंतु ही झालेली सुधारणा तिच्या भारतीय फौजेच्या वाढत्या ताकदीचे नियंत्रण करू शकली नाही. सन १७९८ मधे गव्हर्नर जनरत्त म्हणून रुजु झालेल्या लॉर्ड वेलस्ली याने या प्रचंड ताकदीचा पुरेपूर वापर केला.

लार्ड वेलस्लीबद्दल असे म्हटले जाई की "त्याला अशा सूचना मिळाल्या होत्या की शक्येतोवर कुठल्याही स्थानिक शक्तिशी भांडण न करता व त्यांच्याशी शत्रुत्व न पत्कर्ता रहावे." तरीदेखील त्याने त्यांच्यापैकी प्रत्येकाशी जोरदार युद्ध पुकारले. त्याला सांगण्यात आले होते की कंपनीच्या भूप्रदेशात एक एकराची देखील भर टाकायची नाही पण त्याने हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारताचा ताबा घेतला. म्हैसूरच्या टिपू सुलतानचे राज्य उलथून टाकण्यासाठी त्याने फ्रेंच जेकोबींच्या भीतीचे खोटे कारण वापरले. यानंतर त्याने उत्तर दख्खनमधे मध्य भारतातील सत्तेसाठी मराठ्यांशी खडतर लढाई पुकारली.

ज्याला पुढे दुसरे मराठा युद्ध असे नाव देण्यात आले त्या युद्धात लॉड वेलस्लीने (हा पुढे ड्यूक ऑफ वेलिंग्टन झाला) प्रसिद्ध विजय मिळविला. त्यामुळे मराठ्यांच्या संघटणाला तडा गेला. वेलस्लीच्या मते त्याने २३ सप्टेंबर १८०३ मधे जिंकलेले आष्टीचे युद्ध ही त्याच्या आयुष्यातील सर्वात स्क्तरंजित व सर्वोत्तम लढाई होती. पाच दिवसांच्या लढाईत विजयी होऊनही मार खा ल्या सैन्यातील जखमी सैनिकांना भारताचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या अजिंठा या छोट्या खेड्याच्या उत्तरेला आणले गेले. तेथे एक छोटी गढी सैनिकांचे रुग्णालय म्हणून वापरली गेली. हे लष्कर अजिंठ्याच्या आसपास एक महिनाभर मुक्कामी होते. तललवकरच अधिकाऱ्यांच्या भोजनगृहात अशा अफवा पसरली की तेथून दक्षिणेकडे एक मैत्त अंतरावर गुहांमधे अतिशय सुंदर व देखणी दृश्ये चितारलेली आहेत. त्या ठिकाणी एका छोट्या ओढ्यामुळे दगडांची झीज होऊन एक अरुंद दरी तयार झाली होती. तिली वाघदरी असे म्हणत. तिथे वाघांचा वावर असल्यामुळे तेथे जाणे टाळलेले बरे असे लोकांचे मत होते. याचमुळे या गुफा व आतील चित्रकथा शतकानुशतके टिकून राहिल्या होत्या. इकडे इंग्रजांच्या फौजा उत्तरेकडे वळल्या. शांततेच्या तहावर सह्या झाल्या व अजिंठ्याच्या गुफा विस्मृतीत गेल्या.

जरी जोन वेलस्ली हा एक निर्लज्ज साम्राज्यवादी होता तरी त्याचे पक्के मत होते की ज्या अधिकाऱ्यांना भारताविषयी माहिती आहे त्यांनाच तेथे पाठवावे. कंपनीच्या त्लंडन येथील कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांना अंधारात ठेवून त्याने कलकत्त्याच्या विल्यम फोर्टच्या एका कोपऱ्यामधे एक नवीन विद्यालय उभारले जेथे आय.सी.एस् (॥वाद्या ७9 561५065) मधे भरती झालेले विद्यार्थी भारतीय भाषा व रितीरिवाज शिकू त्लागले. सन १८१८मधे येथे शंभरापेक्षा जास्त भारतीय भाषाविद फोर्ट विल्यममधे नोकरीला होते. ही वेलस्लीच्या शब्दांत "भारतीयांच्या चालीरिती व रितीरिवाज यांचे ज्ञान मिळविण्याची सवोत्कृष्ट पद्धत" होती. कॉलेजमध्ये एक उत्तम प्रंथालयही होते ज्यात बारा हजारावर ग्रंथ वहस्तलिखिते होती. वेलस्लीला त्यावेळी हीक ना नव्हती की ह्या कॉलेजचा बंगालवर काय परिणाम होईल--फोर्ट विल्यमच्या शिक्षणामुळे बंगालच्या पुनर्जागरणाची सुरुवात झाली; राम मोहन राय सारख्यांना प्रेरणा मिळाली आणि सुधारणांची परिणती ब्रिटिश सत्तेच्या अंतात झाली.

फोर्ट विल्यम कांलेजशी जे जवळचे संबंध ठेवून होते त्यात एक होता हेन्री कोलब्रुक. सन १८०१ मधे तो एशियाटीक सोसायटीचा अध्यक्ष म्हणून निवडून आला आणि १८१४ मधे भारतातून निवृत्त होईपर्यंत तो या पदावर राहिला. त्याच्या कारकिदींतच सर विल्यम जोन्सचा स्वाभाविक व योग्य उत्तराधिकारी जॉन लेडन कोलकात्यात आला. हा स्कॉटीश सरहद्दीवरील एका मेंढपाळाचा मुलगा होता. त्याने पाद्री होण्यासाठी शिक्षण घेतले होते पण त्याचा कल धर्मशास्त्रांपेक्षा भाषांकडे जास्त होता. लेडनच्या मित्रांनी त्याच्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीत मद्रासमधे सर्जनजची जागा शोधली. पण लवकरच हे स्पष्ट झाले की त्याची प्रतिभा वेगळ्याच क्षेत्रात होती. भारतात आल्यावर दोन वर्षांनी त्याने आपल्या स्कॉटलंडमधील मित्राला लिहिले की "मी ठाम निर्धार केला होता की मला एक आवेशपूर्ण प्राच्यविद्यापंडित बनायचे आहे." त्याची म्हैसूर सर्वे मधे वैद्यकीय सहायक म्हणून नेमणूक झाली तेव्हा ही संधी त्याला चालून आली. "त्या प्रदेशाच्या नैसर्गिक इतिहासाची चौकशी करणे तसेच म्हैसूरच्या स्थानिक लोकांच्या चालीरिती व भाषा यासंबंधी माहिती गोळा करणे" हे त्याला दिलेले काम होते. त्याच्या कामाच्या दरम्यान तो तब्बल तेरा भारतीय भाषा शिकला; त्याही तेरा महिन्यांमधे!

लेडन एक वेगळीच व १ होती-- गर्विष्ट, रांगडा, दमदार आवाज असलेली. त्याचे स्कॉटीश उच्चार त्याच्या प्रदेशातील लोकांनाच पूर्णपणे समजत. परंतु त्याची विद्दत्ता इतकी स्पष्ट दिसत होती की लार्ड वेल्सलीच्या जागेवर आलेल्या लॉर्ड मिन्टो याने त्याला आश्रय दिला व त्याची "प्रोफेसर ऑफ हिंदुस्थानी म्हणून फोर्ट विल्यम कॉलेज येथे नेमणूक केली. या पदाबरोबर्च त्याला कलकत्ता टांकसाळीमधे धातूंचा पारखी म्हणूनही नोकरी मिळाली. यामुळे त्याचा पोटापाण्याचा प्रश्न सुटत्ता व त्याने भारतीय संशोधनासाठी स्वत:ला झोकून दिले. त्याने त्याच्या मित्राला लिहिले की "या प्रयत्नांत मी जर प्राच्यविद्येत सर विल्यम जोन्स पेक्षा शंभरपट अधिक ज्ञान न मिळवता मेलो तर स्कॉटीश सरहद्दीवरील कुणीही

माझ्यासाठी एक अश्रुही वाया घालवू नये." एका पाठोपाठ एक अशा आजाराने ग्रस्त असतांना देखील असे भाष्य धाडसाचेच म्हणावे लागेल.

मुघल बादशाह बाबरचे आत्मचरित्र 'बाबराामा'चे इंग्रजी भाषांतर पूण केल्यानंतर लेडनला हेत्री कोलब्रुकने तेव्हाचा सचिव निवृत्त होत असल्याने एशियाटिक सोसायटीचे सचिवपद स्वीकारण्यास सांगितले. या पदासाठी कुठलेही मानधन मिळत नव्हते. परंतु सोसायटीतील हे एक प्रमुख पद होते. त्यामुळे त्याचा स्वतःचा आदर्श असलेल्या सर विल्यम जोन्सच्या पावलावर पाऊल टाकीत चालण्याची संधी त्याला मिळाली असती. परंतु नेमक्या ह्याच वेळी ज्या नियतीला त्याने निर्भयपणे आव्हान दिले होते तिने त्याला एक मोठा धक्का दिला. लॉर्ड मिंन्टोने त्याला आपला दुभाषी म्हणून जावा येथे येण्यासाठी आमंत्रित केले. २५ ऑगस्ट १८१९ रोजी बटाव्हिया येथील डच वसाहतीत पोहचताच कुठलाही वेळ न दवडता तो तेथील अतिशय दुर्लभ भारतीय हस्तलिखिते असलेल्या वाचनालयात गेला. परंतु त्या खोलीमधीत्त वातावरणामुळे कुणालाही जीवघेणा ताप येईल असे म्हणत तो थस्थर कापत बाहेर आला. त्यानंतर तीनच दिवसांनी त्याचा मृत्यू झाला.

सर्वांत लायक उमेदवार गमावल्यामुळे हेत्री कोलब्रुकला त्या जागेवर नवीन उमेदवार शोधणे भाग पडले. कलकत्ता टाकसाळीत धातूपारखी म्हणून हॅरिस हेमन विल्सन ह्या लेडनच्या हाताखाली असलेल्या तेवीस वर्षीय बुद्धिवान डॉक्टर युवकाची नेमणूक झाली. प्रेमळ, सुस्वभावी व वरच्या वर्गात संबंध असणारा असा डॉ. विल्सन हा सर्वच बाबतीत लेडनच्या विरूद्ध होता. भारतात येण्याआधी त्याचा सर्व अभ्यास वैद्यकशास्त्र, रसायनशास्त्र व धातू-परिक्षा यापुरताच सीमित होता. त्याची सचिवपदासाठीची निवड खचितच उचित नव्हती पण एकदा नेमणूक झाल्यावर त्याने गंभीरपणे काम सुरू केले आणि आपली निवड सार्थ ठरविली.

सचिव पदावर काम करतांना त्यात्ता सर विल्यम्सने केलेली संस्कृतची अनेक भाषांतरे त्याच्या वाचण्यात आली. ही भाषांतरे अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी त्याने संस्कृत-इंग्रजी शब्दकोशाचा शोध घेतला. पण त्याला शब्दकोश काही मिळाला नाही. मग त्याने ठरविले की स्वतःच शब्दकोश तयार करावा. या कामात जवळपास एक दशक गेले पण त्यामुळे त्याची संस्कृत भाषेवरची पकड इतकी मजबूत झाली की तो त्या काळातील अग्रेसर संस्कृतज्ञ झाला.

'एशियाटीक सोसायटीच्या सचिव पदावर डो. हरेस हेमन विल्सन जवळ जवळ बावीस वर्षे राहित्ता. पण ह्या श्रेष्ठत्वाची त्याला किंमत मोजावी लागली.

सन १८१४ मधे कोलब्रुकच्या भारतातील निवृत्तीनंतर सोसायटीचे अनेक अध्यक्ष आले आणि गेले परंतु विल्सनच्या अधिकाराला कोणीच आव्हान देऊ शकले नाही. त्यामुळे बेलगामपणे त्याने त्याला योग्य वाटेल तशा प्रकारे चौरंगी लेन व पार्क स्ट्रीटच्या कोपऱ्यावर असलेल्या आकर्षक नव्या इमारतीत एशियाटिक सोसायटीचे कामकाज चालवले.

भारतीयांना योग्य अधिकार द्यावे अशी अविरत मागणी करणाऱ्या विल्सनने भारतीयांना एशियाटीक सोसायटीचे सभासदत्व खुले केले. संस्कृत व हौशी रंगभूमी ह्या त्याच्या अत्यंत आवडत्या दोन गोष्टींसाठी त्याने अत्यंत उत्साहात काम केले. त्याचा विवाह सारा सीडन्ज या अभिनेत्रीच्या नातीशी झाला होता. हे त्याला रंगभूमीची आवड निर्माण व्हायचे कारण होते.

विल्सनने केलेल्या अनेक महत्वपूर्णं कामांमधीलल एक म्हणजे त्याने १८२४ मधे बनारसच्या तोडीचे संस्कृत कोलेज कोलकाता येथे स्थापन केले. पण त्याला प्रसिद्धी मिळाली ती त्याचे संस्कृत व्याकरण व अनेक प्राचीन काव्यांचे भाषांतर आणि त्याने केलेले अठरा पुराणांवरील काम यामुळे. पुराणे वेदव्यासांनी लिहिली आहेत अशी मान्यता होती पण विल्सनच्या संशोधनाने सप्रमाण सिद्ध केले ती भविष्यवाणीच्या रूपात ब्राह्मणी चष्म्यातून लिहिलेला इतिहास असून त्यापैकी कुठलेही पुराण दुसऱ्या शतकाच्या आधीचे नाही.

पुराणांच्या र्चनाकारांनी जे राजे प्राचीन धर्मग्रंथांनी घात्ून दिलेले नियम व अटी यांचे पालन करते होते त्या राजांच्या नोंदी दिल्या होत्या. राजा नेहमी क्षजरियच असावा पण ब्राह्मण मंत्र्यांच्या स ने राज्य करणारा असावा अशा ह्या पुराणांनुसार अटी होत्या. क्षजिय हिंदू राजशक्तीचे बाहू तर ब्राह्मण डोके!

जेव्हा जेव्हा राजसत्तेसंबंधी जातीचे हे नियम तोडले जातात तेव्हा तेव्हा दैवी शक्तीचा कोप होतो, जसे खालच्या जातीतील नंद्राजाच्या बाबतीत झाले.

विल्सन यासाठीही ओळखला जातो की त्याने राजतरंगिणी हा विस्मरणात गेलेला काव्यग्रंथ शोधून काढता व त्याचे भाषांतर केले. राजतरंगिणी ही बाराव्या शतकातील ब्राम्हण कवी क ण याने स्चलेली ११८ कवितांची काश्मिरी राजांची काव्यात्मक बखर आहे. यामधे क णाने प्रामुख्याने स्वतःच्या जीवनात घडलेले प्रसंग किंवा काहीसे आधीचे अशा प्रसंगांचे वर्णन केले आहे. परंतु क णने त्याला उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक स्त्रोतांवरून मुस्लिम प्रवेशापूर्वीच्या काश्मीरबद्दलही लिहीले आहे. त्याच्या स्त्रोतांवर विश्वास ठेवायचा तर हे मानावे लागेल की बुद्धाच्या पाखंडी विचारांचा* अंमल एके वेळी ह्या संपूर्ण प्रदेशावर होता.

राजतरंगिणीनुसार काश्मीरमधे बुद्धाची शिकवण सप्राट अशोक घेऊन आला. सम्राट अशोकाने काश्मीर खोऱ्यामधे श्रीनगर शहराची स्थापना केली. या खोऱ्यांत अनेक मंदिरे बांधली आणि बुद्धाची शिकवण शेजारील देशांमधे नेली, ज्यात तार्तार हा सध्याच्या रशियाचा एक भागही होता. राजतरंगिणीचा रचयिता अशोकाबद्दल अत्यंत वैरभाव दाखवतो. मात्र याविरुद्ध तो अशोकाचा मुलगा व त्याचा उत्तराधिकारी जालुकाविषयी गौरवोट्रार काढतो. क णच्या मते हा धैर्यवान राजा जालुक बुद्धविचार नाकारून श्रद्धाळू शिवभक्त बनला आणि त्याने आपल्या देशातून सर्व म्लेच्छांना (विदेशींना) हाकत्तून दिले.

पण राजा जालुकही खूप आदर्श शासक ठरला नाही. आपल्या राज्यशासनाच्या शेवटच्या काळात तो परत बुद्धविचारांकडे वळला. त्याचा मुत्तगा व उत्तराधिकारी राजा दामोदर याच्यावर बुद्धविचाराची इतकी छाप पडली की त्याने त्यासाठी ब्राम्हणी व्यवस्थेचे शत्रुत्व पत्करले.

ज्याने बुद्धाची शिकवण काश्मीरमधे आणली तो हा अशोक आणि पुराणातील वंशावळीप्रमाणे मगधातील मौर्य राजघराण्याचा तिसरा राजा एकच असेल तर अर्थातच ततो एक शक्तिशाली सम्राट होता ज्याच्यात सत्तेच्या जोरावर काश्मीरमधील प्रस्थापितांना आव्हान देऊन नवीन बंडखोर विचारांना रूजवण्याची धमक होती. आता विल्सनला एक मोठे कोडे असे पडले की जालुक वा दामोदर किंवा अशोकाचे वडिल व आजोबा यांची जी नावेक णने दिली होती त्यांचा पुराणातील वंशावळीत अजिबात उ 'ख नव्हता.

एक गोष्ट स्पष्ट होती की राजतरंगिणीकार आणि पुराणकार दोहोंत बुद्धाची शिकवण व बौद्ध शासक यांच्याबद्दल सारखाच ब्राह्मणी वैरभाव होता. नक्कीएच ह्या पूर्वप्रहाच्या रंगात भाषांतरकारही रंगले. हरेस हेमन विल्सन याने ब्राह्मणी संस्कृत या आपल्या आवडत्या विषयाव्यतिरिक्त इतर विषयांबद्दल फारशी आस्था दाखवली नाही. हॉरेस अनेक गुणसंपन्न असूनही सर विल्यम जोन्ससारखी व्यापक दृष्टी व सर्वसामावेशक आवाका नसल्याने जोन्ससारखी प्रगती त्याला करता आली नाही. एशियाटीक सोसायटीचे सचिव असतांनाच्या त्याच्या दीर्घ कार्यकाळात मध्यवर्ती नेतृत्वाच्या अभावी जोन्स आणि कोलब्रुकने तयार केलेले पत्रव्यवहार करणाऱ्या संशोधकांचे व्यापक जाळे हळूहळू लुप्त झाले. या क्षेत्रातील नवनवीन शोधांची माहिती येत होती पण ती कुठलीही दखल न घेतली जाता तशीच पडून राहू लागली. या संशोधनाचे ना मूल्यमापन झाले ना त्याची आधीच्या शोधांशी संगती तलावली गेली.

बौद्ध संशोधनाच्या बाबतीत तर हे फार मोठ्या प्रमाणात झाले. आतापर्यंत बरेचसे अपस्चित पिटक व पिटकेतर धार्मिक ग्रंथ चीन, सिलोन आणि ब्रम्हदेश येथून प्रकाशात येऊ लागले होते. यांत दिव्यावदान हा बौद्ककथांचा संग्रहही होता. या सर्व ठोस प्रमाणांमुळे बुद्ध विचारांचे उगमस्थान भारतातच आहे या आधीच्या प्राच्यविद्यातज्ञांच्या मताला पुष्टी मिळाली. शाक्यमुनी गौतम बुद्ध आता कुनेच्या क्षेत्रातून बाहेर आला. गंगेच्या मध्यवती पठारावरील मगध राज्यात त्याचे वास्तव्य होते हे आता स्पष्ट झाले. त्याने वयाच्या पस्तीसाव्या वर्षी बोधि प्राप्त केली व त्यानंतर पुढील पंचेचाळीस वर्षे लोककल्याणासाठी नैतिक धर्माचे उपदेश सर्वत्र दिले. साधारणपणे इ.पू. ५४४ मधे वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षी तो कालवश झाला. त्या अवस्थेचे वर्णन बौद्ध ग्रंथांमधे महापरिनिर्वाण (महापरिनिब्बान) असे केलेले आढळते. या शेवटच्या सनावळीच्या कामाचे श्रेय फ्रान्सीस बुकॅननतला जाते. तो स्कोटीश शल्यविशारद व वनस्पतीशास्त्रज्ञ होता. बौद्ध धर्माची भारतीय मुळे शोधण्याचे काम करणाऱ्यांत सर्वांत मोठे योगदान बुकॅनानचे आहे. जितके मोठे त्याचे योगदान तितक्याच प्रमाणात तो अन्याय्यपणे दुर्लक्षित व उपेक्षित राहिला.

एक तरुण सर्जन म्हणून राजनैतिक शिष्टमंडळाचा सदस्य या नात्याने त्याला बर्मा व नेपाळ येथे जावे लागले. बुकॅननचे सुदैव असे की त्याला जीवित बौद्ध धर्माची अगदी स्पष्टतया दोन वेगवेगळी रूपे पहावयास मिळाली. यानंतर पुढे त्यातला कंपनीने मद्रास येथे नवीनच ताब्यात घेतलेल्या भूभागाचे सर्वेक्षण करण्यासाठी नेमले. सन १८०९ मधे कंपनीने बंगालच्या विभागात नवीनच समाविष्ट केलेल्या बिहार या प्रदेशाचे सर्वेक्षण करण्याचे काम त्याला दिले गेले. हे सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी बुर्केननला सात वर्षे लागली. त्यात त्याला अतिप्राचीन इतिहासाच्या खुणा बिहारमधे सर्वन विखुरलेल्या दिसल्या. यापैकी एक पाटण्यापासून ऐंशी मैल दक्षिणेस असलेले 'बुद्धणया मंदिर' हे होय. याला आज 'महाबोधी मंदिर' असे म्हटले जाते. येथे बुकेननला मोडकळीस आलेली वखर हिंदू मंदिर वाटणारी एक वास्तू सापडली. मंदिरात काही हिंदू उपासक रहात होते. आजूबाजूला वरवर हिंदू वाटणाऱ्या देवतांच्या दगडी प्रतिमा होत्या. तेथील उपासक दोन गोष्टींचा विशेष उ ख करीत होते. एक दगडी ओटा ज्याला 'विष्णुपाद' (विष्णुचे पाऊल) असे संबोधले जात होते आणि दुसरे म्हणजे एक पिंपळ वृक्ष जो ब्रम्हदेवाने स्वत: लावला होता.

अगदी योगायोगाने बुकॅननला स्वतःला बौद्ध म्हणवून घेणारा एक स्थानिक माणूस भेटला. त्याने सांगितले की आवा येथील बर्मी राजाने 'गौतम बुद्धाशी निगडीत प्रमुख पवित्र जागांचा शोध घेण्यासाठी भारतात पाठवलेल्या दोन बौद्ध यात्रेकरुंनी त्याला बौद्ध धर्माची दिक्षा दिली होती.

या नवीनच बौद्ध झालेल्या माणसाला त्या बर्मी लोकांनी सांगितले होते की गौतम हा सद्धर्माचा उपदेशक होता. त्याने 'धर्म-अशोक? नावाच्या राजाच्या संरक्षणात बोधगया येथे खूप खूप पूर्वी वास्तव्य केले होते आणि हे मंदिर पूर्वी भारतातले धर्माचे केंद्रस्थान' होते. आज देखील हे आवा येथील प्रजेसाठी सर्वांत जास्त वंदनीय आहे. हिंदूनी त्यावर हक्कद सांगण्याच्या खूप खूप पूर्वीपासून या मंदिरातील दगडी ओटा व त्या जवळील पिंपळाचे झाड बौद्धांसाठी अत्यंत पूज्य होते. दगडी ओटा आणि पिंपळ वृक्ष हे बुदधगया मंदिराच्या निर्मितीच्या खूप आधीपासून तेथें होते. ते राजा धर्म-अशोक यानेच बांधले होते. "आवा येथून आलेल्या दोघांचे याबाबत एकमत झाले की गौतमाचे वास्तव्य बुद्धणया येथे होते आणि त्याच्या इच्छेनुसार धर्म-अशोकाने हे मंदिर बांधले होते. या राजाचा दरबार पाडरीपुक (पाटलिपुत्र) येथे होता."

व्यवस्थित पहाणी केल्यानंतर बुकॅननच्या लक्षात आले की हिंदू ज्यांना त्यांच्या देवतांच्या मूर्ती म्हणत होते त्या बहुतेक दगडी मूर्ती त्याने ब्रम्हदेश आणि काठमांडू येथे पाहिलेल्या बौद्ध मूर्तीप्रमाणेच दिसत होत्या. निर्विवादपणे बुद्धणया येथील धर्म- अशोकचे हे मंदिर नक्कीच बौद्ध मंदिर होते. जसजसे बुकॅनन दक्षिण बिहारमधील आपले सर्वेक्षणाचे काम करत पुढे सरकू लागला, तसतसे त्या बौद्ध माणसाने दावा केल्याप्रमाणे हा संपूर्ण प्रदेश खरोखरच बौद्ध शिकवणीचे केंद्र होता ही गोष्ट अधिकाधिक स्पष्ट होत गेली.

बोधगयेच्या उत्तरेला तीन दिवस पायी प्रवास केल्यानंतर राजगीर हे गांव दिसते. पुराणांमधे याचा उ ख मगधचा पहिल्ता राजा जरासंधाचे शहर असा दिसतो. परंतु बुकॅननला बौद्ध माहीतगाराकडून मिळालेल्या माहितीनुसार राजगीर हे देखील बौद्धांसाठी अत्यंत महत्वाचे ठिकाण होते. ही राजा बिंबिसारची राजधानी होती जो शाक््यसमुनी बुद्धाचा समकालीन होता.

राजगीर येथून आपल्या सर्वेक्षण करणाऱ्या समूहाचे नेतृत्व करीत बुकॅनन बिहारमधील एका ओसाड गावातल्या कि पर्यंत पोहचला. तेथून आणखी पुढे पश्चिमेला तो बारागंज (आजचे बरागांव) येथे पोहचला.

"येथे बुकेननत्ता अवशेषांचा विस्तीर्ण समुदाय दिसता. नीट पाहिल्यावर त्याच्यात अनेक विटांच्या भिंतींचा आणि इमारतींचा पाया दिसून आला. याठिकाणी बरीचशी शंखाकृती लहान लहान टेकाडे वर आलेली होती, जी मंदिरे असावीत." त्या बौदड़ माहितगाराला याबद्दल विस्तृत काही सांगता आले नाही परंतु तेथील एका जैन मुनीने सांगितले की राजा श्रेणिक व त्याच्या वंशजांच्या महालाचे ते अवशेष आहेत. त्याने लिहीले, "त्या पुजाऱ्याने सांगितले की श्रेणिक (सेन) राजाच्या काळात पुष्कळसे लोक बुद्धपूजक होते. त्याने त्या साऱ्या मूती, अवशेष व प्रतिमा पाखंड्यांच्या म्हणून त्यांची हेराळणी केली."

बुकॅनन व त्याच्या माणसांनी त्या अवशेषांमधील मुख्य भागांचे निरिक्षण सुरू केले."उत्तर-दक्षिण इमारतीची एक मोठी रांग जी उपरोक्त अवशेषाच्या पश्चिमेला होती-- अंदाजे २००० फूट आणि जवळ जवळ २४० फूट रुंद. ह्या रांगेत मधे मोठी मोकळी चौकोनी जागा असलेल्या वाड्यांसारख्या इमारती होत्या व त्यांचा वर्षानुवर्षे विटांची खाण म्हणून वापर केला गेला होता. ही नासधूस अत्यंत जलद गतीने चालू असूनदेखील बर्या्च मोठ्या प्रमाणात अवशेष अजूनही दिसत होते." मोठ्या शंखाकृती ढिगाऱ्यांमधून बऱ्याचशा मूती डोकावताना दिसत होत्या. बुकॅननने त्याच्याबरोबर आणलेल्या रेखाटनकारांकडून सुस्थितीत असलेल्या मूर्तींची रेखाटने काढली व तेथून ते पुढे सरकले. त्यांनी अजाणतेपणी नालंदा येथील भव्य महाविहाराचे अवशेष शोधून काढले होते! एक सुप्रसिद्ध बौद्ध विद्यापीठ जे ५१८ वर्षांपूर्वी महम्मद बख्तियार आणि त्याच्या मुजाहिदीन फौजेने जाळून भस्म केले होते.

सन १८१४ मधे आपल्या आजारपणामुळे बुकॅननला हे सर्वेक्षणाचे काम आटोपते घ्यावे लागले. त्याला सांगण्यात आले की कलकत्ता येथील कंपनीच्या वनस्पतीशास्त्राच्या बागेमधीतलत अधिक्षकाची जागा त्याला मागताक्षणी मिळेल परंतु त्याच्या कागदपत्रावरील मालकी हक्कां्संबंधात गव्हर्नर जनरलशी उद्भवलेल्या वादामुळे त्याने राजीनामा दिला. तो स्कॉटलंडत्ता रिकाम्या हाताने परतत्ता. त्याचे सारे अहवाल, लेख आणि रेखाचित्रे कलकत्त्याच्या रायटर्स बि "ैंगमधे जमा झाली. ती पुढे बावीस वर्षे कोणीही न वाचता तशीच पडून राहिली.

बुकॅननसारखाच अत्यंत मेहनती त्याचा समकालीन स्कॉटीश कॉलीन मॅकेन्झी याच्याबाबतीत देखील हेच घडले. लष्करी अभियंता आणि नकाशे बनवणाऱ्या कोलीन मॅकॅन्झीने याच कालावधीमधे दक्षिण भारतामधे जैन संशोधनाच्या कार्यात अत्यंत महत्वाची प्रगती केली होती. याने ईस्ट इंडिया कंपनीत अभियंता अधिकारी म्हणून काहीशा उशिरा म्हणजे वयाच्या २८ व्या वर्षी नोकरी पत्करली होती. सन १७९९ मधे म्हैसूरच्या टिपू सुलतानाचा पराभव झाल्यानंतर नवीनच जिंकलेल्या म्हैसूर आणि दख्खनच्या प्रदेशाचे सर्वेक्षण करण्यासाठी नेमलेल्या भाषांतरकार, रेखाचित्रकार आणि नकाशाकारांच्या संयुकृत संघाचे नेतृत्व त्याने जवळपास एक दशकापर्यंत केले. जोन्सप्रमाणे मॅकेन्झी देखील त्यात्ता सहकार्य देणाऱ्या समर्पित ब्राम्हण पंडित व जैनांच्या क्रणाची जाणीव बाळगून होता. तो त्याची कबुली देत असे. तो त्याच्यांप्रती आपुलकी बाळगून होता. त्याबद्दल त्याने नंतर लिहीले, “एका स्थानिक ब्राम्हण माणसाशी (मैत्रीपूर्ण) नाते तयार झाले. भारतीय ज्ञानाच्या भव्य दरवाजाच्या आत शिरण्यासाठी हे माझे पहिले पाऊल होते. मला भाषांचे कुठलेही ज्ञान नसतांनाही मला प्रोत्साहन देऊन ज्याचा मी खूप काळापासून शोध घेत होतो ते मिळवून देण्याचे साधन बनलेल्या या विद्वान व्यक्तीचा मी सदैव कणी आहे.”

वर वर्णिलेला ब्राम्हण म्हणजे २२ वर्षीय कावेली व्यंकट बोरिया होय. हा अलौकिक बुढिमत्तेचा विठ्ठान होता. त्याचा तापाने मृत्यू ओढवण्यापूर्वी त्याने मॅकेन्झीबरोबर सात वर्षे घालवली. “दुःखद अंत झालेल्या बोरियाच्या विद्ठत्तेचा प्रत्यक्ष उपयोग सुरु केल्याक्षणी भारतीय ज्ञानाचा नवीन मार्ग खुल्ला झाला. अगदी कमी वयातच आम्ही त्याला मुकलो. तरी त्याने सांगितलेली उदाहरणे आणि दिलेल्या सूचनांचे पालन त्याच्या शिष्यांकडून अत्यंत आनंदाने केले गेले. तेथूनच हळूहळू जणू एक छोटेसे संघटनच स्थापन झाले. असे योगायोगाने घटीत झालेले संघटन की ज्यात पद्धतशीरपणे घालून दिलेल्या तंत्रानुसार आमच्या संपूर्ण परगण्याचे विस्तृत सर्वेक्षण करता आले.” ह्या संघटनेत बरेच भारतीय आणि काही ब्रिटीश रेखाचित्रकारही होते. त्यांचे पगार मॅकेन्झी आपल्या खिशातून देत होता. यामुळे त्याला जुनी हस्तलिखिते, नाणी, चित्रे, शित्लालेख आणि याव्यतिरिक्त त्याच्या पुराणवस्तूसंग्रहकाच्या नजरेस पडतील त्या वस्तू जमा करण्याची हौस पूर्ण करण्याची संधी मिळाली. मॅकेन्झीने गोळा केलेल्या जैन ग्रंथांमधे बाराव्या शतकातील व्यासंगी विठ्ठान आचार्य हेमचंद्र यांनी लिहिलेले “परिशिष्टपर्वण' याचा समावेश होता. यामुळे मगधच्या मौर्य राजवंशावर नवा प्रकाश पडला. मौर्यांचा प्रथम राजा चंद्रगुप्त तसेच चाणक्याच्या मदतीने त्याचा झालेला उदय याचे अत्यंत विस्तृत वर्णन यात सापडते. या जैन आवृत्तीमधे चंद्रगुप्ताची आई ही राजाचे मोर (मौर्य) पाळणाऱ्या समाजातील होती असे म्हटले आहे. त्या समाजाचा प्रमुख असलेल्या तिचा पती मारता गेल्यामुळे तान्ह्या चंद्रगुप्ताला घेऊन ती लपून बसली. एके दिवशी हे लहान मूलत एका जैन तपस्व्याच्या (वेश पालटलेला चाणक्य ब्राम्हण होता) नजरेस पडले. हा चाणक्य राजा नंदाकडून अपमानित झाला होता व त्याला तेथून पळून जावे लागले होते. त्याचा सूड घ्यायची योजना तो आखत

होता. चंद्रगुप्ताला गावातल्या इतर मुत्तांवर हुकुमत गाजवत असतांना त्याने पाहिले. त्याने ओळखले की राजा म्हणून नेतृत्व करायचे सर्व गुण या मुलामधे आहेत. त्याने त्या मुल्लाचे अपहरण करून त्याला योग्य प्रकारचे शिक्षण दिले. चाणक्य व चंद्रगुप्त दोघांनी मिळून एकजितपणे पाटलिपुत्रवर ह्। केला. परंतु त्यात त्यांना अपयश आले. नंद राजावर अशाप्रकारे सरळ ह् चुकीचा होता हे चाणक्याता उमगले. त्याने माघार घेऊन हिमालयाच्या परिसरात पहाडी राजा 'पर्वतक'' याच्याशी संधान साधले. या एकजित फौजांनी दीर्घकाळपर्यंत लष्करी मोहीम चालवली. एका- एका भागावर कब्जा करीत शेवटी पाटलिपुत्र काबीज केले आणि राजा नंदाला तेथून हद्दपार होण्यास भाग पडले. चंद्रगुप्ताने राजा नंदाच्या एका मुलीशी लग्न केले आणि पर्वतकाने दुसरीशी लग्न केले. परंतु या नववधूकडून पर्वतकाला चुकून विष दिले गेले व तो मृत्यु पावला. यामुळे चंद्रगुप्त तेथील्त एकमेव राजा राहिला. चाणक्य त्याचा प्रमुख मंत्री बनला. ही घटना साधारणतः शाक्यतमुनी बुद्ध यांचे समकालीन व जैन धर्माचे संस्थापक भगवान महावीर यांच्या मृत्युनंतर १५५ वर्षानंतर घडली असावी.

ही कथा बऱ्याच प्रमाणात मुद्राराक्षस या नाटकांत दिल्यासारखीच होती. पण येथे चंद्रगुप्ताबद्दल अधिक माहिती होती -- भद्रबाहु नावाच्या जैन संताने चंद्रगुप्ताला अनागोंदी व यादवीच्या काळात तसेच बारा वर्षाच्या दुष्काळाच्या काळात मार्गदर्शन केले. भद्रबाहुने चंद्रगुप्ताला जैन नसलेल्या धर्मगुरुंपासून वाचवले. (सर्व जैन ग्रंथांचे याबाबत एकमत आहेत की) त्याच्या प्रभावाखाली चंद्रगुप्ताने सिंहासनाचा त्याग केला आणि भद्रबाहुबरोबर दक्षिण भारतात गेला. तेथे एक जैन श्रावक म्हणून त्याचा मृत्यू झाला.

मॅकेन्झीचे सर्वांत घनिष्ठ संबंध जैन व ब्राम्हण सहकाऱ्यांशीच आले होते. त्यामुळेच बऱ्याच उशिरापर्यंत भारताच्या बौद्ध इतिहासाबद्दल तो अनभिज्ञ राहीला. तरी देखील १७९७ च्या फेब्रुवारी महिन्यात कृष्णा नदीच्या दक्षिणेला (पूर्व आंध्र प्रदेश) भौगोलिक सर्वेक्षण करताना मॅकेन्झीला अशी माहिती मिळाली की तिथला स्थानिक राजा इमारत बांधकामासाठी साधनसामुग्री गोळा करीत असतांना त्याला पुरातन वस्तुंचा मोठा साठा सापडला आहे. जराही वेळ न दवडता तो तेव्हा अमरापूर असे नाव असलेल्या व आता अमरावती म्हणून प्रसिद्ध असलेल्या जागेवर गेला. संपूर्णपणे मोठमोठ्या विटांनी बनलेल्या एका प्रचंड वर्तुळाकार ढिगाऱ्याला राजाच्या लोकांनी खणण्यास सुरुवात केल्यावर या पुरातन वस्तू दिसून आल्या. तेथे त्यांना सभोवताली मोठे संगमरवरी खांब व त्यांच्यावर संगमरवराच्या सपाट लाद्या दिसून आल्या. त्यांवर अत्यंत सुंदर, नाजूक कलाकुसरीचे कोरीव काम दिसून आले. मॅकेन्झीला त्या जागेवरून रिकाम्या हाताने परतावे लागले पण त्यापूर्वी त्याने तेथील कोरीव काम केलेल्या लाद्या पाहिल्या. यांतीत्त एका लादीवर हत्तीवर बसलेला एक राजा एका तटबंदी असलेल्या शहरावर सशस्त्र ह् चे नेतृत्व करताना दाखवला होता. मॅकन्झीच्या मते त्याने आत्तापर्यंत भारतात पाहिलेले ते सर्वांत सुंदर शि होते.

पुढील सतरा वर्षे तो आपल्या इतर कामात गर्क होता. पण सन १८८३ च्या डिसेंबरमधे त्याने काही दिवस रजा काढली. त्या काळात तो आपल्या स्वतःच्या महायांत्रेवर, गंगेच्या वरच्या बाजूला, निघाला. नेहमीप्रमाणेच त्याने रेखाचित्र व जलरंगातील चित्रे काढण्यासाठी पगारी चित्रकार बरोबर घेतले. त्यांच्यासोबत पुरातत्त्वीय दृष्टीने महत्वाच्या जागांना भेट देण्याच्या उद्देशाने तो निघाला. दि) येथे त्याने फिरोझशाहच्या स्तंभाला व दि) रिजवरील जुळ्या स्तंभांचे जे काही अवशेषशि क होते त्यांना भेट दिली. अलाहबादला त्याने तिसरा स्तंभ पाहिला आणि त्यानंतर उत्तर बिहारमधील बखरा (वैशाली) येथे चौथा स्तंभ पाहिला. बनारसला त्याने सारनाथ येथील अवशेष पाहिले. ते बौद्ध आहेत हे त्याला तेव्हा माहीत नव्हते. जोनाथन डंकनच्या वेळी असलेल्या दोन स्मारकांपैकी एक त्यापासून मिळणाऱ्या घरबांधणीची सामग्री घेऊन नष्ट करण्यात आले होते. दुसर्या स्मारकाबद्दल मॅकेन्झीला 'सारनाथचा राजा बुधसेन याची समाधी? असे सांगण्यात आले. ह्याचा आकार अमरावतीला त्याने १७९७ला पाहिलेल्या अवशेषासारखाच होता परंतु त्या दोहोंमधे काही नाते असेल असे त्याच्या लक्षात आले नाही.

कॉलीन मॅकेन्झी मद्रासला परतला तेव्हा तो ईस्ट इंडिया कंपनीचा पहिला सर्वेयर जनरत्त बनला होता. त्याला पूर्ण कर्नलचा दर्जा होता. आता त्याला आपल्याला पटेल तसे काम करण्याचा अधिकार आणि साधनसंपत्ती होती. आणि म्हणूनच सन १८९६ च्या मार्च महिन्यात तो अकरा रेखाचित्रकार आणि सवेक्षण करणाऱ्यांचा मजबूत संघ घेऊन अमरावती येथील ढिगाऱ्यांच्या अवशेषाकडे आला. मॅकेन्झीला अजूनही असे वाटत होते की ते खूप जुने जैन स्मारक असावे. परंतु नुकत्याच पूर्ण केलेल्या यात्रेमुळे आपले मत चुकीचे असू शकते अशी शक्यकता तो नाकारत नव्हता. पण तेथे पोहचल्यावर तो खचलाच! ज्याचा शोध घ्यायला तो आला होता त्या इमारतीचा पूर्णपणे नाश झाला होता. त्याच्या मध्यभागी असलेला सर्व गाभा खणून बाहेर टाकला होता. त्या ठिकाणी शंभर चौरस फूटाचे तळे बनले होते. तेथील तीन-चतुर्थांश कोरीव शिंत्ता गायब झाल्या होत्या. फक्त एक भाग जसाच्या तसा राहिला होता. सन १७९७ मधे त्याने पाहिलेल्या कोरीव काम असलेल्या शिला जवळच्या तळ्याच्या पायऱ्यांसाठी, तीन मंदिरांच्या बांधकामात आणि काही मशिंदींसाठी वापरतेल्या दिसल्या याबद्दल मॅकेन्झीने दु:ख व्यक्त करीत लिहिले, “थोडक्यात म्हणजे हे अमूल्य पुरातन पाषाण बर्याच सार्वजनिक व खाजगी इमारतींच्या कामासाठी वापरते गेले होते. मुस्लिम मशिंदीसाठी वापरलेल्या दगडांवरील कोरीव काम कठीण अशा दगडांनी घासून मिटवले होते.”

येथे जे काही अवशेष शि कं होते, त्यावरून मॅकेन्झीच्या लक्षात आले की मूलतः त्या स्मारकाची सचना सारनाथ येथील स्मारकाप्रमाणेच परंतु खूप भव्य होती. मुख्य वास्तूखेरीज सभोवताली वर्तुळाकार मिरवणुकीचा किंवा प्रदक्षिणा पथ होता ज्याच्या आतील व बाहेरील बाजूस दगडी कठडा होता. या कठड्याच्या उस्लेल्या भागांपासून त्याने व त्याच्या माणसांनी जवळपास शंभरपेक्षा जास्त अत्यंत सुंदर कोरीवकाम असलेले खांब

आणि सपाट शिळा उकरून काढल्या. यावर चित्रीत केलेली बरीचशी तपशीलवार दृश्ये व देखावे हे इतिहासातील किंवा दंतकथेतील असावेत. त्यामधे केवळ राजे व राण्याच नव्हे तर त्याबरोबरच झाडे, सिंहासन, छत्री, बैल्लगाडीचे चाक, दोन पदचिन्हे, नागाच्या संरक्षणाखाली बसलेल्या देवता आणि सर्वात महत्वाचे म्हणजे खूप भव्य घुमटाकार असलेली रचना अशा अनेक लक्षणीय वस्तूंच्या पूजेचे देखावे होते. येथील देखाव्यांमधील घुमटाकार वास्तू मॅकेन्झीने सारनाथ येथे बघितलेल्या स्मारकांसारख्याच होत्या आणि अमरावतीचे स्मारक त्याच्या वैभवशाली काळात जसे दिसत असेल तशा दिसत होत्या.

सुदैवाने भावी पिढयांसाठी मॅकेन्झीच्या रेखाचित्रकारांनी काही अत्यंत सुंदर चित्रे काढली जी आज ब्रिटीश लायब्ररीमधे व्यवस्थित जतन करून ठेवली आहेत. मॅकेन्झीने स्वतः जवळपास ब्याऐंसी शिळा आणि खांब मछतलीपट्टम येथे हलविण्याची व्यवस्था केली व तेथून बोटीद्वारे कलकत्ता येथे नेण्याची व्यवस्था केली. परंतु यातील केवळ सातच अवशेष एशियाटिक सोसायटीच्या वस्तुसंग्रहाललयापर्यंत पोहचू शकले. उरलेले अवशेष मछलीपट्टमच्या उपजि धिकाऱ्याने शहरातील एका चौकाचे सुशोभीकरण करण्यासाठी वापरले. त्या बांधकामाला आज Mr Robertson’s Mount असे म्हटले जाते. पुढे एक पुरातत्त्व अभ्यासक अमरावतीला भेट देण्यास गेला तोपर्यंत उस्ले-सुरतले अवशेष देखील हलवले गेले होते किंवा जाळून त्यांचा चुना केला गेला होता.

अमरावतीच्या गतवैभवाचे महत्व ओळखण्याची जबाबदारी पुढील पिढ्यांवर पडली. हे भारतात आत्तापर्यंत उभारल्या गेलेल्या बौद्ध स्मारकांमधील कदाचित सर्वोत्तम असे स्मारक होते.

मॅकेन्झी आणि त्याच्या समकालीनांना त्या भव्य, सुंदर शि कृतीवर दाखवलेल्या प्रतिमांचा, चित्रांचा अर्थ लावता येत नव्हता. त्यांच्या हेही लक्षात आले नाही की आधीच्या कोरीव काम केलेल्या शिळांच्या मागच्या बाजूत्ता पुन:श्र नवीन दृश्ये कोरण्यात आली होती जेणेकरून आधीची दृश्ये इतरांच्या दृष्टिपासून लपवली गेली.

यापैकी एक शिळा पॅरिस येथील Musee Guimet या वस्तुसंग्रहालयात ठेवली आहे. ह्या शि 1ची नासधूस झाली असली व ते अपूर्ण असेल तरी तरी त्यावर एका राजाच्या दोन्ही बाजूला दोन ललहान पुरुष आकृती दिसतात. अंजलीमुद्रा केलेले हे दोन पुरुष राजाकडे तोंड केलेले दिसतात. कटीवस्त्राच्या वर राजाचे पोट सुट्लेले दिसते. राजाने एक विशेष पवित्रा घेतलेला आहे. त्याचा उजवा हात उंचावलेला तर डाव्या हाताची मूठ छातीवर ठेवली आहे. एक खूपशा आर्याउ असलेले स्थचक्र त्याच्या मागच्या स्तंभाच्या वरील भागावर दिसते. त्याबरोबर एक दुसरा खूप उंच खांब दिसतो जो तुटलेला आहे परंतु दि १ येथील फिरोझशाहच्या स्तंभाशी व इतर स्तंभांशी मिळताजुळता आहे. खोगीर असलेत्ला परंतु पाठीवर स्वार नसलेत्ता एक घोडा राजाच्या पायाशी उभा आहे. 'एका बाजूला

चैत्यासारखी एक इमारत आणि उरलेल्या भागावर एक स्थूल स्त्री झाडाची फांदी पकडून उभी आहे. तिन्ही पुरुष आकृत्यांचे चेहेरे मुद्दामहून विठूप केलेले दिसतात.

वरील शि चेच एक साधे रेखाटन स्थानिक रेखाचित्रकार मुरुगेसा मुदलीयार याने काढले आहे. वरील भागात राजाच्या डाव्या बाजूला दोन पुरुष तर उजव्या बाजूला दोन स्त्रिया आहेत. बाजूलाच एक घोडा व हत्ती दिसून येतात. राजाचा उजवा हात उंचावलेला आहे व दुसरा हाताची मूठ आधीच्या शि त दाखवल्याप्रमाणे छातीवर धरलेली आहे. येथे देखील त्याचा चेहरा विद्रूप केलेत आहे. अधिक बारकाईने निरिक्षण करणाऱ्याला यामधे इतर साधर्म्यं दिसून येते. चित्राच्या खालीतत भागात राजा सिंहासनावर बसलेला असून राणी खाली बसलेली आहे व त्याच्यामागे एक सेवक छत्री घरून उभा आहे (छत्री हे एक राजचिन्ह आहे). ज्याला आता आपण धर्मचक्र (धम्मचक्क) म्हणतो ते मागे दर्शविले आहे. त्याच्यापुढे दोन भिक्षु भिक्षापात्र घेऊन आहेत, जे त्याने भरले आहे. यामधे परत हत्ती आणि घोडा सेवेकरता उभे असलेले दिसतात. वरील व खालील भागातील चिंत्रांमधे स्पष्टपणे साधर्म्य आहे.

यानंतर बराच काळ लोटल्यावर, सन १८८० च्या पूर्वांधाला व्यावसायिक पुरातत्त्व संशोधक जेम्स बर्जीस याने अमरावती आणि आजुबाजूच्या परिसरामधे उत्खनन केले तेव्हा तेथे आढळून आलेल्या या शि ंचे ऐतिहासिक दस्तावेज म्हणून किती महत्व आहे याची जाणीव होऊ लागली.

बर्जीसनेच सर्वप्रथम हे लक्षात आणून दिले की तेथे उस्लेल्या बऱ्याचशा दगडी शिळांवर दोन्ही बाजूंनी कोरीव काम केलेले आहे. आणि या सर्व बांधकामाला सुरुवातीच्या काळातच हिंसक विध्वंसाता तोंड द्यावे लागले असावे. ही घटना ख्रिस्तपूर्व दुसर्यी शतकातील असावी ज्यावेळी मौर्यांच्या ऱ्हासामुळे झालेली पोकळी सातवाहन राजघराणाच्या उद्याने भरून येत होते. या स्मारकाची पुढे पुनरचना झाली -- सभोवतालच्या खांबांची रांग आणि चार प्रमुख दरवाजे जोडले गेले. यानंतरचा पुढील विस्तार काही शतकांनंतर केला गेला असावा जेव्हा या ठिकाणाहून जवळच असलेले धन्यकटक शहर (आताचे धरणीकोटा) आंध्रच्या सातवाहनांचे राजधानीचे शहर बनले.

अमरावतीची स्थिती पाहून ब्जीस निराश झाला. तो तेथून कृष्णा नदीच्या प्रवाहाच्या वरील दिशेला नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात प्राचीन अवशेष होते त्या भागाचे सर्वेक्षण करण्यासाठी गेला. हे बरेचसे अवशेष बुद्ध विहारांचे असल्याचे उघड झाले. बर्जीसच्या मते यांचीही अवस्था अमरावती स्तूपाप्रमाणेच झाली होती. अमरावतीच्या वरील बाजूस तीस मैलावर जगण्य्यापेट येथे सापडलेले एक बौध्द स्मारक हे त्यामानाने इतरांपेक्षा कमी क्षतीग्रस्त दिसले. धनाची टेकडी अशी स्थानिक ओळख असलेले हे स्मारक अमरावती येथील बांधकामाचीच छोटी आवृत्ती होती. याचे चारही दरवाजे, सभोवतालच्या खाबांची रांग आणि अनेक दगडी शिळा गायब झाल्या होत्या परंतु बर्या्चशा शिळा

जमिनीवर दुर्लक्षित पडलेल्या होत्या. याबद्दल बर्जीसने आपल्या संक्षिप्त वृतांतात लिहिले, "काहींवर खूपच वरवस्चे जुन्या वळणाचे कोरीव काम केलेले होते. इतर शिळांवरील काही अक्षरे इ.पू. २०० ते ४७० या काळातील मौर्य पद्धतीची होती."

यातील सुस्थितीतील शि ंची रेखाटने बर्जीसने केली आणि आपल्या अधिकृत वृतांतामधे जोडली. ही रेखाटने पॅरिस येथील वस्तुसंग्रहत्लयात असलेल्या अमरावतीतील ध्वस्त शि पेक्षा आणि चेत्रई वस्तुसंग्रहालायात असलेल्या अमरावतीच्या शि च्या वरील भागापेक्षा कितीतरी अधिक पटीने सुव्यवस्थित आहेत.

ही तिन्ही शि चक्रवती सम्राटाची आहेत. जगज्जेता चक्रवती सप्राटाच्या संक नेचे मूळ आधीच्या वैदिक साहित्यात सापडते. त्यामधे सम्राट हा सर्वशक्तिमान व युगप्रवर्तक सार्वभौम राजा नैतिकता, सुख आणि शक्ती यांचे, चराचर सृष्टीचे वैश्विक विधानानुसार नियंत्रण करणारा स्त्रोत आहे. तो शत्रूंचा विनाश करण्यासाठी एका चक्राचा हत्यार म्हणून वापर करतो, जे हिंदु देवतांच्या मिथकांच्या उत्क्रांतीत विष्णुचे एक शस्त्र बनले. परंतु अमरावती आणि आजूबाजूला मिळालेल्या या दृश्यांमधे असे दिसते की बौद्धांनी या चक्रवर्ती सम्राटाला आपलेसे करून घेतले होते.

बुद्धाचेच एक प्रकारचे व्यावहारीक खूप असलेला हा चक्रवती सप्राट धर्माचे 'पालन करून केवळ नैतिकतेच्या जोरावर विजय मिळवतो.


अमरावती येथील चौथ्या शि वरील प्रसंगातून पूर्ण चित्र स्पष्ट होते. अमरावतीच्या उत्तर कालखंडातील हे शि ब्रिटीश म्युझियममधीत्त अमरावती या मार्बल गॅलरीमधे ठेवले आहे. या ठिकाणी चक्रवर्ती सम्राटाने उत्कृष्ट दागदागिने व नाजुक नक्षीकाम केलेले अथवा तलम पारदर्शक वस्त्र परिधान केलेले आहे. एका सेविकेने त्याच्यावर धरलेले छत्र हे राजचिह् आहे. येथे त्याच्या बाजूला केवळ एकच स‍् गार दिसतो व राजाच्या डाव्या खांद्याच्या बाजूला असलेल्या राणीऐवजी चामरधारी यक्षिणी दिसतात.

या दृश्यातीत्त वेगळेपण हे की येथे चक्रवर्ती सप्राट आदर व्यक्त करतांना दाखवला आहे. तो अंजलीबद्ध स्थितीत समोर दर्शकांकडे तोंड करून उभा असलेला आहे. परंतु तो कशाला प्रणाम करतो ते दिसत नाही. ते कदाचित वरीत भागावर कोरले गेले असावे. परंतु अमरावतीच्या नासधुशीत नष्ट झाले असावे.


हेभव्य संगमरवरी शि पहिल्यांदा सन १८६७ मधे पॅरीस येथील एका प्रदर्शनात ठेवले गेले परंतु त्यानंतर तब्बल साठ वर्षांनी त्याचे खरे महत्व कळून आले.

अमरावती येथील या टिकून राहिलेल्या प्रतिमा, दृश्ये जाहीर करतात की चक्रवती सम्राटाची कथा भारतामधे खूप आधीच्या काळातच महायान बौद्ध परंपरेमधे स्थापित


झाली होती. भारतातूनच ती पुढे उत्तरेस चीनमधे गेली आणि पुढे चीनच्या पलिकडे तिचा प्रसार झाला.




सर चार्लस डॉयलीने डिसेंबर १८२४ मधे काढलेले बोधगयाच्या महाबोधि मंदिराचे चित्र. चित्रकाराला व त्याच्या समकालिनांना ह्या मंदिराचे व त्याच्याशेजारच्या बोधि वृक्षाचे महत्त्व अजिंबात माहिती नव्हते. डॉयली छिलहितो, "हे मंदिर एका मोठ्या चौथऱ्यावर उभे आहे. त्याच्या पश्चिमेला देशातील सर्वोत्तम पिंपळाच्या झाडांपैकी एक झाड आहे... येथे यात्रेकरू प्रार्थना करतांना दिसतात." (APAC, British Library)



कॉलीन मॅकेन्झी आणि त्याच्या दोहोंकडे जैन व ब्राह्मण पंडित. मॅकेन्झीची सर्व्हेअर जनरल म्हणून नेमणूक झाल्यानंतर थॉमस हिकीने काढलेल्या तैलचित्राचा एक भाग. (APAC, British Library)




सारनाथच्या विटा व पाषाणांनी बांधलेल्या स्मारकाचे जानेवारी १८१४ मधे शेख अब्दुल्लाने कॉलीन मॅकेन्झीसाठी केलेले रेखाटन. आज धर्मेख (धम्मेक) स्तूप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्तूपाचे तेव्हा 'Samaudh (cenotaph) of Rajah Booth-Sain' असे वर्णन केले गेले होते. (APAC, British Library)



मुरूगेस मुदलियारने सन १८५३ मधे रेखाटलेल्या अमरावती शिल्पांच्या नव्वदएक चित्रांपैकी एक. यात तीन वंदनीय बाबी दाखवल्या आहेत-- स्तूप (वर), धर्मचक्र (मधे) आणिं बोधिवृक्ष व त्याच्या बुंध्यापाशी वज्रासन. (APAC, British Library)




(तोडफोडीने) चेहरा भंगलेले विश्वावर सुराज्य करणाऱ्या चक्रवर्ती राजाचे शिल्प. (Musee Guimet, Paris)



अमरावतीच्या महास्तूपावरील दोन शिल्प. मुरूगेस मुदलियार याने १८५३ मधे काढलेले चिंत्र. मूळ शिंल्प चेन्नाई म्युझिंयममघे आहे. (APAC, British Library)




जग्णयापेटचे चक्रवर्ती सम्राटाचे शिल्प. सम्राटाच्या आजूबाजूला अनेक प्रतिके आहेत-- त्याच्या पायाशी खोगीर असलेला घोडा व हत्ती दोन्ही बुद्धाचे प्रतिके; त्याच्या डोक्यावर राजचिह्न असलेले छत्र; (APAC, British Library)



चक्रवर्ती राजाचे शिल्प. बहुधा हे पहिल्या शतकातील असावे. हे अत्युकृष्ट शिल्प आता ब्रिटीश म्युझियमच्या अमरावती मार्बल्स या संग्रहात आहे. (British Museum)

६. हॉरेस हेमन विल्सनचा दीर्घ दुष्प्रभाव



सांचीचा महास्तूप (ज्याला ब्रिटीश सुरूवातीला Great Tope म्हणत). विल्यम मरेने काढलेल्या चित्रावरून जेम्स प्रिन्सेपने १८३७ मधे Journal of the Asiatic Society of Bengal मधे प्रकाशनासाठी शिळाछाप (lithograph) तयार केला.

श्रीलंकेच्या थेट उत्तर टोकावरील जाफना कि 1 त्या काळी आशियातील सर्वांत बुलंद कि होता. परंतु सर्व बाजूने-- जमिनीवरून, समुद्रावरून व आकाशातून -बॉम्बह ' झेलून आता त्याची भपग्नावस्था झाली आहे. हा कि पोतुंगीजांनी ईस्ट इंडिजच्या बेटांमधून व श्रीलंकेतून चालणाऱ्या मसाल्यांच्या व्यापारी मार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी बांधला. स्थानिक सिंहत्तन (सिंहांची भूमि) या शब्दावरून त्यांनी लंकेचे नामकरण सिलेंओ असे केले. सन १६५८ मधे कोलंबोवरीलल ह्र तून बचावून पळालेल्या पोर्तुगीजांनी काही काळ येथे आश्रय घेतला होता. जिला ब्रिटीश लोक डच ईस्ट इंडिया कंपनी म्हणून ओळखत असत त्या नवीन शासकांनी काही काळाने त्यांना हुसकावून लावले. डचांनी पुढे कि ची

तटबंदी अधिक मजबूत केली. त्यामुळे सन १७९६ मधे जेव्हा ब्रिटिशांनी या कि चा ताबा घेतला तेव्हा केवळ ध्वज बद्लण्यापलीकडे त्यांना काहीच काम उरले नव्हते.

त्रामिळ टायगर्स नावाचा फुटीरवादी बंडखोर संघटनेने जुलै १९८३ मधे श्रीलंकेत अंतर्गत यादवी युद्ध सुरु केले. तोपर्यंत हा कि 1 (त्याला डच कि 1 असे म्हणत) सुस्थितीत होता. जाफना व तेथीत्त कि 1 ही दीर्घकाळ चाललेल्या भयंकर उग्र अशा यादवीची रणभूमि होती. हे युद्ध शेवटी मे २००९ मधे संपुष्टात आले.

तेथील दगडविटांच्या पसाऱ्यात कुठेतरी मेजर जार्ज टनोर याचे थडगे आहे. आयरिश सरदार लॉर्ड विंटरटनचा हा धाकटा मुलगा होता. लार्ड विंटरटनने ७३ व्या रेजिमेंट ऑफ फूट मधे लेफ्टनंट पदावर असतांना डचांविख्छच्या मोहीमेत भाग घेतत्ता होता. त्यानंतर कि चा लष्करी प्रशासकीय अधिकारी म्हणून तो तेथेच राहीला. त्याने एका निर्वासित फ्रेंच उमरावाच्या मुलीशी लग्न केले होते. जाफना कि तच मार्च १७९९ मधे त्यांचा मुलगा जार्ज याचा जन्म झाला. काही वर्षांनी छोट्या जोरजला शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले गेले. त्याचे वडील मात्र येथेच राहीले.

ब्रिटिशांनी या बेटाचा ताबा घेतल्यावर त्यांनी या बेटाचे नामकरण आंग्ल पद्धतीने सिलोन असे केले. हे बेट ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतीय मालमत्तेचाच भाग बनले असते पण ब्रिटीश सरकारला भारताच्या गव्हर्नर जनरत्तला त्तगाम घालता येत नसल्यामुळे ते कंपनीच्या बाबत साशंक होते. त्यामुळे सिलोन ही एक क्राऊन कॉलनी बनले आणि सिलोन सिव्हील सर्व्हीसेसच्या अधिपत्याखाली आले. सुदैवाने फ्रेडरिक नोर्थ हा तेथील पहिला गव्हर्नर बनता. भारतात त्याचा समकालीन मार्कस वेलस्ली याच्या प्रमाणेच तो सुद्धा सरंजाम घराण्यातील होता. ते दोघे इटन व ख़ाइस्ट चर्च, ऑक्सफड्चे विद्यार्थी होते. फ्रेडरिक हा वेलस्लीइतका महत्वाकांक्षी नव्हता. परंतु अधिकारीवर्ग स्थानिक लोकांच्या बरोबरीने काम करण्याची इच्छा असणारा असावा, त्यांच्यावर हुकुमत गाजवणारा नव्हे अशा वेलस्लीच्याच मताचा होता. बौद्ध धर्माचा अभ्यास करणाऱ्या सिलोनमधील पहिल्या विदेशी माणसांमधे फ्रेंच वनस्पतीशास्त्रज्ञ जोसेफ डी जॉईनविली आणि जाफनामधे व आजुबाजूला त्याचा मृत्यूपर्यंत म्हणजे १८१३ साली वयाच्या पंचेचाळीसव्या वर्षापर्यंत काम करणारा कॅप्टन जार्ज टनोर होते. नोर्थच्या या प्रशासनामधीत्त एक कुशल अधिकारी होता वकील अलेक्झांडर जॉन्स्टन. तो सिलोनचा पहिला प्रमुख सरकारी वकील (एडवोकेट जनरत्त) होता आणि पुढे सिलोनचा सर्वोच्च न्यायाधीश बनला. हा अत्यंत विद्ठान माणूस इतका अबोल होता की दोन-तीन वाक्यांची गरज असेल तेथेही तो एखादे वाक्य बोलत नसे. जॉन्स्टनतलला सिलोनचा सर विल्यम जोन्स असे साधारपणे म्हणता येईल. त्याने आपल्या ललहानपणीची अकरा वर्षे मद्रास आणि मदुराई येथे घालवली होती. कॉलीन मॅकेन्झीने त्याला अनौपचारिकपणे शिकवले होते. त्यामुळेच की काय पण मोठा झाल्यावर त्याला तामिळ शैव आणि सिंहली बौद्ध यांच्याबद्दल अत्याधिक जिज्ञासा होती.

'एडव्होकेट जनरत्त म्हणून काम करीत असतांना जोन स्टोन याने या बेटावस्चा गुलामांचा व्यापार बंद केला आणि ज्युरीद्वारा न्यायनिवाडा करण्याची व्यवस्था सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. याबरोबरच त्याने सर्वांना शिक्षणाचा मार्ग खुला केला. कलकत्यातील जोन्सप्रमाणेच त्याने ठरविले होते की न्यायप्रक्रियेत स्थानिक कायद्यांचा समावेश झाला पाहिजे आणि यासाठी त्याने "सिलोनमधील विविध धर्म व जातिजमातीच्या परंपरागत नियमांचा अभ्यास' केला. पुढे त्या आधारावर सिलोन ज्युडीशिंयल कोडची रूपरेखा आखली गेली.

अशाप्रकारे विविध सुधारणा अमलात आणण्याच्या खटपटीत असताना जॉन्स्टन याची राजपक्षे याच्याशी अत्यंत घनिष्ठ मैत्री झाली. हा पूर्वी गुलामांचा व्यापारी होता आणि त्याला बेटावरील सर्वांत वजनदार व्यक्ती समजले जायचे. जॉन्स्टनला जेव्हा बौद्ध संघातील ज्येष्ठांच्या सहकार्याची गरज भासायची तेव्हा त्याच्या वतीने राजपक्षे मध्यस्थीसाठी पुढे यायचा. राजपक्षेने त्याला तीन हस्तलिखिते मिळवून दिली ज्यांत "आत्तापर्यंत अस्तित्वात असलेले मूळ बुद्ध धर्माचे, त्याच्या शिकवणीचे, सिलोनमधे तिचे झालेले आंगमन, त्याचा स्थानिक सरकारच्या नैतिक मूल्यांवर व राजकारणावर झालेला परिणाम याचे सर्वात विश्वासाह वर्णन होते."

या तीन हस्तलिखितांपैकी दोन ग्रंथ सिंहली भाषेत होते. तिसरे पालि भाषेत होते. त्यात्ता जॉन्स्टनने महावंसी असे म्हटले परंतु त्याचे नाव महावंस होते. सन १८१९ मधे सिलोन येथून निवृत्त होताना सर अलेक्झांडर जॉन्स्टनने ही त्यांना मिळालेली ही तीन हस्तलिखितांची भेट आपल्याबरोबर नेली.

साधारण याच काळात पहिल्या प्रोटेस्टंट धर्मप्रचारकांचे बेटावर आगमन झाले. यामधे एक रेव्हरंड विल्यम बक्त्ती फॉक्स हा होता. त्याने बायबलचा स्थानिक भाषांमधे भाषांतर करण्यांचा सपाटा लावला. हे करीत असतांना शेवटी त्याने सन १८१९ मधे सिलोन-पोतुंगीज, सिंहली व इंग्रजीचा शब्दकोश तयार कंरून प्रकाशित केला. यामुळे सन १८२३ साली जेव्हा तो इंग्लंडमधे परतला तेव्हा जोन्स्टनने स्वतःला त्यावेळच्या युरोपमधीत्त पालि आणि सिंहलीचा सर्वोत्तम विहान असे घोषित केले. परंतु पालिचे ज्ञान त्याने कोठून मिळविले आणि त्यातला खरोखरच पालि वाचता येत होती की नाही हे 'एक कोडेच आहे. कारण पालिंदेखील त्या वेळेपर्यंत संस्कृतसारखीच केवळ संन्याशांमधे वापरात असलेली भाषा होती. वि. न्सन यांच्या कष्टपूर्ण प्रयत्नांआधी संस्कृतची जी अवस्था भारतात होती तशाच प्रकारे सिलोनमधील सिंहली बौद्ध भिक्षुंनी ती शिकवायला नकार दिला होता. तरीसुद्धा आपल्याकडील सिलोनच्या तीन ग्रंथांचे इंग्रजीमधे प्रकाशन करावे असे जेव्हा ठरवले तेव्हा जॉन्स्ट्नल्ता विल्यम फॉक्सकडेच वळावे लागले. फॉक्सने केलेल्या महावंसाच्या तथाकथित भाषांतराचा पहिला खंड The Mahavansi, the Raja-Ratnacari and the Raja-vali, forming the Sacred and Historical Books of Ceylon सन १८३३ मधे इंग्लंड येथे प्रकाशित झाला. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर केवळ

प्रकाशक एडवर्ड उपहॅम याचेच नाव होते. त्याचे प्रकाशनाच्या आदल्या वर्षीच निधन झाले होते. हा संशयास्पद गोंधळ अधिक वाढायला असे कारण घडले की रेव्ह. फॉक्स स्वतः पुस्तकाच्या प्रकाशनानंतर काही महिन्यातच मरण पावला. नेमके कारण सांगता येत नाही पण फॉक्सचे हे भाषांतर ब्रिटनमधे दुर्लक्षित केले गेले. कदाचित यामुळे की या भाषांतराचा मुख्य प्रेरक सर अलेक्झांडर जॉन्स्टनला स्वतःच त्याबद्दल शंका येऊ लागली. एक बाब नक्की की हे लंकेतील महावंसाचे सर्वप्रथम प्रकाशित झालेले इंग्रजी भाषांतर असले तरी ते नक्कीच एका अपूर्ण सदोष अशा मूळ पालितून सिंहलमधील भाषांतराचे भाषांतर होते.

विशेष म्हणजे त्यात लिहिले होते की (भाषांतरकार ज्याला दुसरा पियतिस्स म्हणत तो) लंकेचा एक प्राचीन राजा आणि अशोक ह्या एका भारतीय राजामधे जवळचे नाते होते. “या दोन्ही राजांची पक्की मैत्री व स्नेहभाव होता”. या दोघांमधे अनेक भेटी आणि पत्रांची देवाणघेवाण होत असे. भारताच्या धर्म-अशोकाने (धम्मासोक) पियतिस्साला लिहिले होते की तो बुद्धाच्या शिकवणुकीचे पालन करतो आणि लंकेच्या राजाने देखील तसेच करावे अशी त्याची इच्छा आहे. या दोन राजांच्या मैत्रीचे खूप दूरगामी परिणाम झालेले दिसतात कारण या दोन राजांच्या राजवटीतच लंकेमधे बौद्ध धर्म स्थापित झाला. त्यामुळे या बेटाचा संपूर्ण इतिहास बदलला.

या दोघांच्या संबंधांचे महतव सप्रमाण सिद्ध करण्यासाठी महावंसकारांनी भारतीय राजघराण्यांची माहिती देण्यासाठी किंतीतरी अध्याय समर्पित केले आहेत. यांत शाक्ययमुनी बुद्धाच्या समकालीनांपासून ते राजा धर्म-अशोकापर्यंतच्या सर्व मागधी राजांचा समावेश होतो. पाचवे प्रकरण पूर्णपणे धर्म-अशोकाच्या राजवटीची माहिती देण्यात खर्ची पडले आहे. त्यापैकी अशोकाचे आजोबा चंद्रगुप्त चाणक्य ब्राम्हणाच्या मदतीने सत्तेवर कसे आले ही माहिती सर विल्यम जोन्स यांनी भाषांतरीत केलेल्या मुद्राराक्षस या संस्कृत नाटकाते दिल्याप्रमाणेच आहे. चंद्रगुप्ताचा मुलगा बिंदुसार याने त्याचा उत्तराधिकारी म्हणून त्याचा मोठा मुलगा सुमन याला कसे नेमले होते आणि राजा बिंदुसाराच्या इतर नव्वयान्नव मुलांपैकी एक प्रियदर्शी (पियदस्सी) होता असे त्यात वर्णन आहे. फॉक्स याने केलेल्या वर्णनानुसार प्रियदर्शीला तरुणपणी त्याच्या वडिलांनी विदीशा या शहरात पाठवले जेथे “त्याने राजकुमारी विदिशा हिच्याशी लग्न केले... ती शाक्य घराण्यातील होती... तो पुढे उदेनी (उज्जैन) या शहरात शासक झाला--राणी विदिशापासून त्याला एक मुलगा आणि एक मुत्गी अशी दोन अपत्ये झाली. तो सर्व बाबतीत संपन्न होता म्हणून त्याला राजकुमार अ-शोक असे म्हटले जाई.”

या एकमेव परिच्छेदामुळे त्यावेळी कोणाच्याही लक्षात न आलेला एक महत्त्वाचा दुवा जोडला गेला तो असा की राजा बिंदुसाराच्या दुसर्याट पत्नीपासून झालेल्या मोठया मुतल्लाचे नाव प्रिंयदर्शी (पियदस्सी) असे होते आणि तोच पुढे अशोक म्हणून ओळखला जाऊ लागला. फॉक्सलिखीत वर्णनाप्रमाणे ह्याच राजकुमार प्रियदर्शी" अशोकाने वडिलांच्या मृत्यूनंतर मगधाच्या सिंहासनावर ताबा मिळवला. त्यामुळे त्याचा भाऊ

राजकुमार सुमन याने "अशोकाविरुद्ध युद्ध पुकारले ज्यात अशोक विजयी झाला. हा विजेता पुढे संपूर्ण जंबुट्टीपाचा सार्वभौम सम्राट बनला".

महावंसातीत्त पुढील पाच प्रकरणे लंकेचा राजा दुसरा पियतिस्स आणि भारतातील राजा अशोक (धम्मासोक, धम्म-असोक) यांच्या मैत्रीचे वर्णन करतात.

शेवटच्या प्रकरणामधे राजा अशोकाच्या चव्वेचाळीस वर्षाच्या राजवटीचे संक्षिप्त विवरण एका परिच्छेदात दिले आहे.

त्याने सर्वप्रथम आपल्या शत्रुंवर विजय मिळवला. परंतु पुढे चार वर्ष राज्याभिषेक करून न घेता तसेच राज्य चालवले. राज्याभिषेकानंतर पहिली तीन वर्षे त्याने ६०,००० पाखंड्यांना आश्रय दिला. चौथ्या वर्षी ज्येष्ठ भिक्षु निग्नोध याच्या प्रभावाखाली त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्याच वर्षापासून त्याने ९६ किलो सोने खर्च करून ८४,००० मंदिरांची निर्मिती सुरु केली, जे काम त्याने पुढील तीन वर्षांत पूर्ण केले. राजगादीवर बसल्यापासून सहाव्या वर्षी त्याने आपल्या मुतल्तगा (मिहिंदु) महिंद्र आणि मुत्तगी संघमित्रा या दोघांना भिक्षु आणि भिक्षुणी बनवले... सतराव्या वर्षी त्याने साऱ्या बुद्ध साहित्याचे संगायन घडवून आणले आणि त्याचे मुळ शुद्ध स्वरूपात जतन केले... गादीवर बसल्यापासून अठराव्या वर्षी त्याने सिलोन येथे पवित्र बोधि वृक्षाचे रोप पाठवले. यानंतर बारा वर्षांनी आपली पत्नी राणी असंधिमित्राच्या मृत्युनंतर तिचे दहन केले. या नंतर चार वर्षांनी त्याने तरुण तिस्सरक्खितेशी विवाह केला... (अशोकाच्या ह्या) दुसर्याय लग्नानंतर तिसर्यात वर्षी तिस्सरक्खिताने देषभावनेने पवित्र बोधिवृक्ष मरून जावा म्हणून त्यावर घाव घातला. यानंतर मात्र त्याची राजवट चार वर्षांपर्यंतच टिकली.

ही विलक्षण कथा सन १८३३ मधे इंग्लंड येथे छापली गेली पण ती पूर्णपणे दुर्लक्षित झाली. परंतु ही बातमी जेव्हा सिलोनमधे पोहोचली तेव्हा तेथील तरुण मुत्लकी अधिकारी जार्ज टर्नोर याला मोठा धक्का बसला. जॉर्ज ट्नोर वयाच्या विसाव्या वर्षी सन १८२० मधे आपल्लया जन्मभूमित सिलोन सिव्हील सर्व्हीसमधे शिकाऊ उमेदवार म्हणून परत आला होता. त्याने या बेटाची राजधानी कोलंबो व तिच्या अवतीभवती वेगवेगळ्या पदांवर कनिष्ठ अधिकारी म्हणून पहिली सहा वर्षे काम केले. पुढे त्याची सॅफ्रेंगण परणण्यात बढतीवर नेमणूक झाली. याचे मुख्यालय रत्नपुर या गावात होते जे सिंहली बौद संस्कृतीचे एक केंद्र होते. जोर्ज तोपर्यंत सिंहली भाषा चांगल्या प्रकारे बोलू आणि लिहू लागला होता. परंतु सिंहलीची मूळ भाषा पालि, जिच्यात तेथील बौद्ध ग्रंथ लिहिलेले होते, त्याला येत नव्हती. स्थानिक भिक्षुंनी विरोध करूनदेखील टनोंरने पालिं भाषेचा अभ्यास सुरु केला आणि तेथे गेल्यापासून एक वर्षाच्या आतच तो ही प्राचीन भाषा वाचू लागला. हा अभ्यास करत असतांना अत्यंत मौल्यवान परंतु फारसा वाचला न जाणाऱ्या पालि ग्रंथाचे-- महावंस (महावंश)-- नाव त्याच्या कानावर पडले. महावंसमधे लंकेतील चोपन्न राजांची सविस्तर

माहिती दिली होती आणि याबरोबरच एकशे अकरा राजांची माहिती चूलवंसात (चूतलवंश) दिली होती.

बेटावरील बहुसंख्य विहारांनी आपल्याकडेच मूळ ग्रंथांच्या अस्सल प्रती असल्याचा दावा केला होता. त्यामुळे महावंस या ग्रंथाची प्रत मिळायला काही अडचण नव्हती. परंतु एक मोठी अडचण अशी आली की या ग्रंथात सुरस व चमत्कारिक अतिशयोक्तीचा इतका भरणा होता की प्रकांड पालि पंडित असलेल्या बौद्ध भिक्षुंना देखील तो अत्यंत दुर्बोध होता. टनोस्च्या प्रयत्नांबद्दल ऐकून ग ' नावाचा बौद्ध भिक्षु त्याच्याकडे आला. त्याने समजावले की या मूळ ग्रंथाबरोबर एक टीका (मूळ ग्रंथावर स्पष्टीकरण देणारा ग्रंथ) आवश्यक आहे जेणेकरून या काव्यातील गूढ कमी होईल्ल आणि ते अधिक सुस्पष्ट, सूबबद्ध कथन वाटेल. ग याने नंतर अशा टीकेचा शोध घेतला व अंतिमतः दक्षिण सिलोन मधील तंग जवळ मूलकिरिग 1 येथील प्राचीन पर्वत- विहारात त्याला एक टीका सापडली. ही टीका आणि त्याच विहारातून मिळालेली महावंसाची अस्सल प्रत यांचा आधार घेत शब्दजंजाळातून मार्ग काढत लंकेतीत्त दोन हजार वर्षांच्या बौद्ध इतिहासाच्या सूत्रबद्ध वर्णनापर्यंत पोहचणे टर्नोरतला शक्यत झाले. टनोस्ला हे लक्षात आले की महावंस या ग्रंथाची पहिली काही प्रकरणे लिहिण्यासाठी लेखकांनी या आधीच्या ग्रंथाचा-दीपवंस (दीपवंश)-- आधार घेतला असावा. दीपवंसविषयी ‘‘इ.पू. ५४३ ते सन ३०१ पर्यंतच्या कालखंडातीत्त सिलोनचे मुख्य 'ऐतिहासिक वर्णन’’ असे टर्नोरने म्हटले आहे.

ट्नोर्च्या सांगण्यावरून ग यांने परत एकदा शोध घेऊन दीपवंसची मूळ प्रत शोधून काढली. अशा प्रकारे सुसज्ज होऊन सन १८२७ मधे जोर्ज टर्नोरने महावंसच्या बिनचूक इंग्रजी भाषांतराचे काम हाती घेतले. मात्र त्यापुढील चार वर्षे, १८२८ ते १९३२, महसूल आयुक्त म्हणून काम करीत असतांना कार्यालयीन कामानिमित्त त्याला रत्नागिरी ते त्रमनकुडवा व पुढे कॅण्डीपर्यंत जावे लागले. यामुळे भाषांतराच्या कामात बऱ्याचवेळा खंड पडला.

सन १८३४ मधे रॉयल एशियाटीक सोसायटीच्या वृत्तांतात ‘‘ऐतिहासिक शहर अनाराजपूर किंवा अनुराधापूर आणि मिहीनताले येथीत्त टेकडीवरील मंदिर याबद्दल कॅप्टन जे.जे. चॅपमन यांनी केलेली टिप्पणी’’ या नावाने एक लेख प्रकाशित झाला होता. रेव्हरंड फॉक्स महावंसाचे भाषांतर करीत आहे याची सर्वप्रथम माहिती ट्नोरता वरील लेख वाचल्यानंतरच समजली.

कॅण्डीच्या उत्तरेस दाट जंगलांनी व्यापलेल्या मध्य पठारावर कॅप्टन चॅपमन शिकारीच्या मोहीमेवर असताना तेथे अनेक मैल पसरलेल्या मानवनिर्मित तलाव व इतर अवशेषांचा त्याने अभ्यास केला होता. त्याने म्हटले की हे तलावांचे जाळे इतिहासातील सर्वात प्रगत कामाच्या तोडीचे आहे. त्यावरून स्पष्ट होते की तो सिलोनमधला

आजच्यापेक्षाही अधिक लोकसंख्येचा आणि अधिक प्रगतिशील व संपन्न असा तो काळ होता.

या भग्नावशेषांमधे दिसून आतली उ 'खनीय गोष्ट म्हणजे याठिकाणी विटांचे अनेक घंटाकार ढिगारे मातीमधे दडलेले होते. त्यापैकी काहींची उंची २५० फूट एवढी होती.

हे अनुराधपूर ह्या प्राचीन शहराचे अवशेष होते. ह्या अवशेषांची माहिती अनेक वर्षांपासून ब्रिटिशांना होती पण त्यांचे अवलोकन वा अभ्यास झाला नव्हता. चॅपमनने जे पाहिले व अनुराधापूर येथे अस्तित्वात असलेल्या छोट्याशा विहारातीत्त नायकाकडून त्याला जे समजले ते अत्यंत विस्मयकारी होते. या बेटावरील सर्वांत जुन्या आख्यायिकेचा प्रत्यक्ष संबंध या वास्तूशी होता. या आख्यायिकेप्रमाणे शाक्यटमुनी बुद्धाने ज्या पवित्र बोधिवृक्षाखाली बोधि प्राप्त केली त्या वृक्षाची फांदी अद्भुतरित्या भारतातून या बेटावर आली. चॅपमनला हे सांगण्यात आले की हा कुठलाही चमत्कार नसून हे एक ऐतिहासिक सत्य आहे. महावंसातील उताऱ्याचा आधार घेऊन त्याने याची खात्री केली. फॉक्सचे भाषांतर प्रकाशित होण्यापूर्वीच त्याच्या वाचनात आले होते आणि प्रकाशकाने त्यातील उतारे उद्धृत करण्यास त्याला परवानगी दिली होती.

जॉर्ज ट्नोरने तब्बल सहा वर्ष महावंसाच्या भाषांतराचे काम केले होते. त्या काळात त्याला “आजूबाजूच्या लोकांनी थोडीही सहानुभूति दाखवली नव्हती.” त्या ग्रंथाच्या (दुसर्याच कुणी केलेल्या) इंग्रजी भाषांतराची प्रत सर्वप्रथम पहाताना त्याच्या मनाला काय यातना झाल्या असतील याची आज आपण फक्त क ना करू शकतो. त्या सहा वर्षातील बराचसा काळ त्याने एकांतात घालवला होता.

सन १८३३ च्या सिलोन कालनिदेशिकेत त्याने स्वतःच महावंसाचा सारांश प्रकाशित केला होता. पण ती एक फक्त ख्परेषा होती आणि सिलोनच्या बाहेर कुणालाही त्याबद्दल उत्सुकता वाटली नाही. परिणामतः टर्नोरने हाती घेतलेले महावंसाच्या भाषांतराचे काम पूर्णपणे सोडून द्यायचे ठरवले.

या पूर्वीच्या दोन दशकांत ईस्ट इंडिया कंपनीच्या फौजा भारताच्या खूप अंतर्गत भूभागापर्यंत घुसून मराठ्यांविरुद्ध, तसेच मध्यभारतात गंगेच्या पठाराच्या दक्षिण आणि पश्चिमेला असलेल्या पेंढाऱ्यांच्या लुटारू टोळ्यांविरुद्ध आणि हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या नेपाळी गुरख्यांविरुद्ध लढत होत्या. आता ह्या फौजांच्या अधिकाऱ्यांनी यापुढचे शोध लावले.

सन १८१४ च्या मार्चमधे कंपनीच्या सैन्याच्या दोन तुकड्या उत्तर बिहारमधे शिरल्या. त्यांचे उद्दीष्ट होते नेपाळ्यांना हिमालयाच्या पायथ्याशी परतावून लावायचे. या फौजांचा कूच करण्याचा मार्ग लौरिया-अराराज येथील दगडी स्तंभाजवळूनच गेला होता. जणू भावी पिढ्यांच्या माहितीसाठीच या स्तंभाचे जलरंगामधे चित्र लेफ्टनंट जे. हॅरिस याने

पूर्वीच काढून ठेवलेले होते. पुढे झालेल्या तहानुसार नेपाळी लोकांना उत्तर बिहार कंपनीच्या स्वाधीन करावा लागला आणि काठमांडू येथे ब्रिटीश रेसिडेंट्ची उपस्थिती पत्करावी लागली.

सन १८१८ मधे मध्य भारतात एक अत्यंत महत्त्वाचा शोध लागला. भोपाळच्या नैकत्य दिशेला मिलसा (आजचे विदीशा) या गावाजवळ एका गोलाकार टेकडीच्या पायथ्याशी कर्नल हेत्री टेलर व त्याच्या फौजेने आपली छावणी टाकली असताना हा शोध लागला. या टेकडीला स्थानिक लोक चैत्यगिरी म्हणत. आज त्याला सांची म्हटले जाते. नेहमीच्या सवयीनुसार टेतरबरोबरचे अधिकारी सायंकाळच्या मेजवानीची तरतूद करण्यासाठी दिवसाच्या शेवटी शिकारीला निघाले. सांचीची टेकडी चढून माथ्यावर गेल्यावर त्यांना त्यांच्या सभोवताली कितीतरी आश्चर्यकारकरित्या सुस्थितीत असलेले विटांचे व गिलावा दिलेले अवशेष दिसून आले. यांना ते टोप्स (एकवचन टोप) म्हणत जो संस्कृत 'स्तूप' आणि पालि 'थूप' यांचा अपभ्रंश होता. या सर्वांमधे सर्वांत मोठा टोप हा अर्धवर्तुळाकार घुमटाच्या आकाराचा होता. त्याच्या सभोवताली प्रचंड लाल दगडाच्या कठड्याने बंदिस्त असा परिक्रमापथ होता. ह्या गोलाकार कठड्याला चार दिशांनी अत्यंत सुशोभित प्रवेशद्वार चार भागात विभागले होते. प्रत्येक प्रवेशद्वारावर नाजूक कोरीवकाम केले होते. या चार पैकी तीन लक्षवेधक प्रवेशद्वारांच्या कमानी आजदेखील उभ्या होत्या! त्यांच्यावर सर्व बाजूने अतिशय सुंदर, सफाईदार शि काम केले होते.

या अधिकाऱ्यांपैकी कमीत कमी तीन या अवशेषांची रेखाटने करण्यास परत आले. त्यांना हे जैन मंदिर वाटत होते. त्यापैकी लेफ्टनंट जॉन बेंगनो याने टिप्पणी केली की इतस्तत: पडलेल्या बऱ्याचशा दगडी मूर्तींचे चेहेरे जाणीवपूर्वक विद्रूप केलेले होते. बॅगनो ला मध्यभागी असलेल्या अर्धगोलाकार स्मारकाभोवती असलेले कोरीव नक्षीकाम केलेले दरवाजे सर्वांत जास्त आकर्षक वाट्ले. एका रेखाट्नात त्याने मुख्य आकृत्यांची यादी दिली--

पंख असलेला वाघ... मागे बसलेल्या स्त्रीला वाहून नेणार हत्ती... पंख असलेले हरिण... आणि हत्ती... देवीला स्नान घालत असलेले हत्ती... खांबावर असलेल्या चक्राची किंवा सूर्याची पूजा... बसलेल्या सिंहाच्या आकृती... काही इमारती, दोन वृक्ष... वृक्ष व पूजा करणाऱ्यांची गर्दी... जिच्या मध्यभागी सशस्त्र सैनिकांनी घेरलेला चार घोड्यांचा रथ आहे अशी एक मिरवणूक... कमळावर बसलेत्ती देवी... चक्र किंवा सूर्याची पूजा करणाऱ्या दोन महिला... बसलेल्या बैलाची आकृती... एका इमारतीभोवती असलेले पूजक... वृक्षाखाली उभी असलेली एक स्त्री... गदाधारी... खूपशा देवता व त्याखाली पूजा करणाऱ्यांची लांब रांग... एका चक्राला आधार देणारे चार हत्ती.

बॅगनो चा वरिष्ठ मेजर विल्यम फ्रँकलिन याला मात्र दक्षिण दिशेला असलेल्या कमानीवरील कोरीव कामाबद्दल आकर्षण वाटले. त्या टोपाला त्यांनी 'प्रेर टोप* असे नाव दिले होते. हे प्रवेशद्वार तुटून खाली पडले होते. यातील सुशोभित खांब तुटून जमिनीवर पडलेले असल्यामुळे त्यांचे निरीक्षण सोपे होते. फ्रँकलिनने खाली बसून या कमानीच्या एका चौकटीवर असलेल्या सुंदर देखाव्याचे चित्र रेखाटले. त्याला हे माहीत नव्हते की हे चित्रच पुढे अशोकाच्या जीवनाचे गूढ उकतणण्यासाठी एक महत्वाचा दुवा ठरणार होते.

या चित्रात असे दिसते की सेंट पॉल कॅथेड्ल्लच्या घुमटासारखे असलेल्या स्मारकाजवळ एक राजा घोडयांच्या रथात बसून येत आहे. या स्मारकावरती दोन देवदूत हवेत तरंगत आहेत. आणि तेथे डोक्यावर आकर्षक टोप्या घातलेले बरेचसे पुरुष आणि महिला त्या स्मारकाप्रति आदर व्यक्त करताना दिसत आहेत.

याच वर्षी इ.स. १८१८ साली अँडरयु स्टर्लिंग या तरुण अधिकाऱ्याने एक अत्यंत वेगळा शोध लावला. भारताच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या कोलकाता आणि विशाखापटणम् यामधील भुवनेश्वर (ओरिसा) याठिकाणी त्याला हा शोध लागला. स्टर्लिंग हा आपल्या सरकारी कामासाठी भुवनेश्वर ह्या हिंदूंच्या पवित्र शहरापासून पश्चिमेस 'पाच मैलावर असलेल्या खंडगिरी टेकड्यांपाशी आला होता. येथे मधमाशांच्या पोळ्याप्रमाणे दगडात कोरलेल्या अनेक गुफा होत्या. त्यांचा ताबा बऱ्याचशा जैन व हिंदू तपस्व्यांनी घेतलेला होता. त्यांनी स्टलिंगला सांगितले की “या जागेचा उगम बुद्धकाळातता आहे. बौद्ध धर्माचा आश्रयदाता राजा ललाट इंद्रकेसरी याच्या राणीने येथे शेवटचे वास्तव्य केले होते.” अर्धी टेकडी चढून गेल्यावर स्थानिक लोक हत्तीगुफा नावाने ओळखत अशी एक नैसर्गिक गुहा होती. स्टर्लिंगला दिसले की गुहेच्या वर डोकावणाऱ्या कड्यावर साधारण पंधरा फूट लांब व दहा फूट उंच एवढा भाग घासून गुळगुळीत केलेला आहे आणि त्यावर सतरा ओळींचा एक शिंलालेख आहे.

त्याने आपल्या सर्वेक्षण प्रमुख कर्नतत कालीन मॅकेन्झीला कळविले, “या शिंलालेखांबद्दल व जेव्हा बुद्धाची शिकवण प्रचलित होती त्या काळाबद्दल ब्राम्हणांमधे घृणा आहे आणि त्या विषयाबद्दल ते एक शब्दही बोलू इच्छीत नाहीत. याप्रमाणेच या जि ह्यातील जैनांकडूनही याबद्दल काहीही स्पष्टीकरण मिळवण्यात मी असफल ठरलो.” स्टलिंगच्या या शोधानंतर काही महिन्यांनी कोलीन मॅकेन्झी हा स्वतः हत्ती गुफेजवळचा शिलालेख पहाण्यासाठी आला. त्याने लगेचच ओळखले की या लेखातील अक्षरे ही दि "तील स्तंभावरील अक्षरांशी एकदम मिळतीजुळती आहेत. त्याच्या मार्गदर्शनाखाली स्टलिंगने या शिलालेखाची एक प्रत्यक्ष हस्तलिखित प्रत (eye copy) बनवली आणि अशी नोंद केली की भारतभर सर्वदूर पसरतेल्या अनेक प्राचीन स्मारकांवर असेच लिखाण सापडल्याच्या सूचना मिळत आहेत. “कोणीही वाचक थोडेसे कष्ट घेऊन खंडगिरी येथील शिलालेखाची तुलना दि) येथील फिरोझशहाची लाट, अलाहाबाद येथील स्तंभ, सख्न येथील भीमसेनचा लाट, एलिफंटा येथील काही भाग आणि वेरूळ येथील शिलालेखातीत्त

काही भाग या सर्वांशी पडताळून पाहील तर ही सारी अक्षरे सारखीच मिळतीजुळती आहेत असे आढळून येईल.”

स्टर्लिंगच्या या नोंदीत एक अधिक माहिती दडलेत्ती आहे-- भुवनेश्वर येथील भास्करेश्वर या हिंदू मंदिराच्या आत त्याने पाहिलेला प्रचंड पाषाण स्तंभ. स्टरलिंगला असे वाटले की या चाळीस फूट उंच असलेल्या दगडी स्तंभाभोवतीच मंदिर बांधले गेले असावे. पुढे सन १८८० मधे भास्करेश्वर लिंगाबद्दल जी नोंद सापडते तिच्यात त्याची ठेची केवळ चार फूट सांगितली आहे. या सर्वांचे संदर्भ लक्षात आले नसते पण १९२९ मधे भास्कसेश्वर मंदिराच्या उत्तरेस फक्त चाळीस फूट अंतरावर एका खड्ड्यामधे सिंहाचे डोके आणि खांदे असलेल्या भागाचे दगडी शि सापडले. यापाठोपाठच पुढे येथून पश्चिमेस दोन मैत्लावर एका जुन्या तलावात घंटाकृती स्तंभशीर्ष व स्तंभाचे तुकडे एका पाण्याच्या टाकीत सापडले. या सगळ्या शोधामुळे भास्करेश्वर मंदिराच्या ठिकाणी एके काळी उभ्या असलेल्या एकाच स्तंभाचे हे विविध भाग असावेत ह्या दाव्याला अधिक वजन प्राप्त झाले.

परंतु मंदिराच्या व्यवस्थापकांच्या धार्मिक भावनांमुळे हा शोध पुढे नेता आला नाही.

अमरावती स्तूपाबद्दल शोधून काढलेल्या प्रमुख गोष्टी व याबरोबरच शिलालेखांच्या अनमोल साठ्यांचे चित्र, नाणी, मूर्ती, ताम्रपट तसेच त्याने व त्याच्या सहकाऱ्यांनी अनेक वर्ष गोळा केलेल्या शिलालेखांच्या नकला व चित्रे ह्यांची देखील माहिती प्रकाशित होईत्त असा एक मोठा ग्रंथ लिहावा असे कालीन मॅकेन्झीच्या मनात होते. परंतु खंडगिरी येथीत्त टेकड्यांजवळ स्टर्लिंगच्या हत्ती गुंफेला मेट देईपर्यंत तो गंभीररित्या आजारी पडला होता. सन १८२१ च्या ग्रीष्म क्रतुत त्याला समुद्रकाठच्या मोकळ्या हवेत जाण्याचा स देण्यात आला. वयाच्या ६९ व्या वर्षीं हुबळी नदीतून बंगालच्या खाडीकडे प्रवास करीत असतांना कालीन मॅकेन्झीचा मृत्यू झाला.

मॅकेन्झीचे मित्र व चाहते यांच्या प्रयत्नांमुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या सूचनेवरून हॉरेस हेमन विल्सन याने मॅकेन्झीचा हा सारा खजिंना त्याच्या तरुण विधवा पत्नीकडून १०००० पौंडांना विकत घेतला--त्या काळात ही प्रचंड किंमत होती. पण विल्सनचा रस केवळ मॅकेन्झीच्या १५०० हस्तलिंखिंतांमधे होता ज्यांपैकी बहुतेक प्राचीन संस्कृत ग्रंथ होते. यातील उर्वरित १५२ शिंलालेखांच्या नकत्ता व भाषांतरे, २६३० रेखाचित्रे आणि ६२९८ नाणी ही एशियाटीक सोसायटीच्या तळघरात पडून कुजत राहिली. हा खजिना अनेक दशकांनंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या लंडनमधील लेडनहॉल स्ट्रीयवरील मुख्यात्तयात पाठवण्यात आला. यातील बरीचशी कागदपत्रे वाळवी लागून खराब झाली. यातून वाचलेली एक प्रत म्हणजे मद्रास प्रेसिडेसीतीत्त बे री आणि कु नूर या दोन शहरांच्या मधील एका विहिरीतल्या पाषाणावर कोरलेल्या शिलालेखाची प्रत होती. ही प्रत सन १७९० मधे मद्रास प्रांताचे सर्वेक्षण करतांना मॅकेन्झीने मिळवली होती.

परंतु या शिलालेखाचे महत्त्व १९४६ पर्यंत प्रकाशात आले नाही. त्या साली ही कागदपनत्रे एका संशोधकाच्या दृष्टिस पडली आणि त्याने ती पुढे भारत सरकारमधील शिंलालेखतज्ञाकडे पाठवली. या प्रतीबरोबर जोडलेल्या दिशादर्शक टिप्पणीमुळे मूळ शिलालेख १९५२ साली शोधता आला. त्यामुळे आतापर्यंत अज्ञात असलेल्या अशोकाच्या लघु शिलालेखाचा (Ashokan Minor Rock Edict) शोध लागला.

हॉरेस हेमन विल्सनच्या डोळ्यावर जणू झापडे लावली होती. त्याच्या ह्या संकुचित दृष्टीचा दुसरा शिकार ठरत्ता-- मेजर जेम्स टॉड ज्याने राजपुततान्यात (आजचे राजस्थान) राजकीय प्रतिनिधी म्हणून अठरा वर्षे नोकरी करत असतांना कॉलीन मॅकेन्झीच्या खालोखाल विविध गोष्टींचा विपुल संग्रह केला होता. सुरुवातीला टॉडचे लक्ष मध्य भारतात राज्य करणार्याट राजपूत वंशाकडे होते परंतु शेवटच्या काही वर्षांमधे त्याला तिथली पुरातन नाणी गोळा करण्यात अधिक स्वारस्य वाटू लागले. त्यासाठी त्याने काही प्रतिनिधींची देखील नेमणूक केली. हे लोक पावसाळ्याच्या दिवसात मथुरा व गंगाकिनाऱ्याच्या इतर शहरात जाऊ लागली. "पाण्याच्या प्रवाहामुळे जुनी बांधकामे वाहून जातांना किंवा जुन्या भिंती कोलमडतांना जे जे गवसेल, उघड्यावर येईल ते सारे ही माणसे गोळा करीत सुटली व अशा प्रकारे टोंडने जवळपास २०,००० विविध प्रकारची नाणी संग्रहीत केली."

सन १८२३ मधे ढासळत्या प्रकृतीच्या कारणास्तव टोंड याला भारत सोडण्याचा स देण्यात आला. म्हणून तो मुंबईला जाण्यासाठी निघाला. त्याने त्यासाठी बराच लांबचा रस्ता निवडला आणि पश्चिम भारतातल्या काठियावाड द्वीषक तील पवित्र गिरनार पर्वतावर असलेल्या सुप्रसिद्ध जैन मंदिरांमधे तो पोहचला. या डोंगरांच्या खालच्या उतारावर तो व त्याचा काफिला एका प्रचंड अर्धवर्तुळाकार गडद ग्रॅनाइट्च्या शिळेपाशी आला. तिचा आकार गुडघ्यावर झुकलेल्या हत्तीप्रमाणे होता आणि त्याचा सबंध पृष्ठभाग लिखाणाने भरलेला होता.

टोंड लिहितो, "हे स्मारक अनेक भागांमधे, आयताकृतींमधे विभागले गेले होते. प्रत्येकात नेहमीच्या प्राचीन लिपीतील शिलालेख कोरलेले होते. प्रत्येक अक्षर जवळपास दोन इंच उंचीचे अगदी समसमान मांडणी केलेले आणि अत्यंत सुस्थितीत होते. मी त्याला 'एक पुस्तकदेखील म्हणू शकतो. त्या दगडावर ही अक्षरे इतकी एकसारखी कोरली गेली आहेत की ती सर्व आपण एका पुरातन लिपीची असल्याचे नक्कीच म्हणू शकतो. ही लिंपी--जिला मी पांडु लिपी म्हटले-- कोण्या एकांच माणसाचे कामाला असावे. परंतु कोण होता तो माणूस ?"

स्टर्लिंग आणि मॅकेन्झी यांना भुवनेश्वर्ता आढळले तसेच त्यालाही ह्या शिलालेखाचे दि १ येथील विजय स्तंभावरील लेखाशी साधर्म्य सापडले. टोंडने जैन भाषांतरकाराच्या मदतीने त्याचे दोन भाग लिहून काढले.

टोंडने एशिंयाटीक सोसायटीच्या सचिवातला आपल्या या शोधासंबंधी पाठवलेल्या संदेशातला काहीच उत्तर मिळाले नाही. हे अत्यंत दुर्दैवी होते कारण अँन्ड्यू स्ट्लिंगने नुकतीच पूर्व किनाऱ्यावरील ओरिसातील खंडगीरी येथील हत्ती गुफेत त्याने शोध लावलेल्या शिलालेखाची सचित्र माहिती स्वखर्चाने प्रकाशित केली होती. भारतीय उपखंडाच्या या दोन विरुद्ध टोकांना असलेल्या या दोन शिंलालेखांचा आपापसात अत्यंत जवळचा संबंध आहे ही गोष्ट पुढील तेरा वर्ष कोणाच्याच लक्षात आली नाही.

टोंडने त्याचा सारा संग्रह इंग्लंडला परत नेला. तेथे गेल्यावर त्याने भारतातील ग्रीककालीन नाण्यांबद्दलल अत्यंत नावीन्यपूर्ण लेख लिहिला. ग्रीकांनंतर वायव्य भारतातील शासकांच्या नाण्यांवर जे काही लिहिले आहे त्याबाबत आपण अनभिज्ञ आहोत याची त्याने कबुली दिली. टोंडने लिहिले की "ही अक्षरे काहीशी ग्रीक असल्यासारखी वाटतात आणि यात काही शंका नाही की सिंधमधे राज्य करणाऱ्या पार्थियन (पारद) व शक राजांची ही नाणी होती". टॉडने या लेखाचे प्रकाशन एशियाटीक रिसर्चेसमधे केले नाही. इंग्लंडमधे नव्याने स्थापलेल्या अभ्यासकांच्या सोसायटीच्या पहिल्याच अंकामधे त्याने आपत्ता लेखा छापता. ही सोसायटी एशियाटीक सोसायटीच्या मदतीसाठी होती असे म्हटले गेले तरी ती प्रत्यक्षात तिची विरोधक होती.

ह्या नवीन संस्थेची-- द रॉयत्त एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन आणि नॉर्दर्न आयर्लण्डची (RAS)--स्थापना १८२३ साली झाली. हेन्री कोलब्रुकने भारतातून निवृत्त झाल्यापासून त्याच्याप्रमाणेच प्राच्यविद्यवेत रूची असलेल्या व भारतातून निवृत्त झालेल्या लोकांना एकत्र जमवले होते. दिनांक ७ जून १८२३ रोजी सेंट जेम्स स्ट्रीटवर (RAS च्या उद्घाटनाची बैठक झाली. आपला मार्गदर्शक आणि सु गार असलेल्या सर विल्यम जोन्सचा आदर्श ठेवत हेत्री कोलेब्रुक याने आपल्या पहिल्याच भाषणात नवीन सोसायटीची उद्दिष्टे विस्तृतपणे सांगितली. त्याने असे जाहीर केले की पाश्चिमात्य संस्कृतीची पाळेमुळे आशियात सापडतात. इंग्लंडला जागतिक शक्ती बनवण्यात भारताचा मोठा हातभार आहे. हे कण फेडणे ही इंग्लंडची जवाबदारी आहे आणि त्यासाठी आशियाचा सर्वांगाने व्यापक अभ्यास करणे गरजेचे आहे.

याप्रसंगी उपस्थित असलेल्या मान्यवरांमधे आद्य संस्कृत विद्वान चार्लस वि ।न्सन, सिलोनमधील कायदेपंडित सर अलेक्झांडर जॉन्स्टन आणि निवृत्त कर्नल जेम्स टोंड होते. टोंडने RAS चा पहिला ग्रंथपाल म्हणून काम करण्याचे कबूल केले.

टोंडने सर्वप्रथम त्याचे ऐतिहासिक Annals and Antiquities of Rajasthan दोन भागात लिहून काढले. त्यासाठी त्याला उणीपुरी पाच वर्षे लागली. पण पुढे आजारपणामुळे त्याला Travels in Western India हे पुस्तक पूर्ण करता आले नाही. सन १८३५ मधे टोंडचा मृत्यू झाला व त्याच्या मृत्युनंतर हे पुस्तक चार वर्षांनी प्रकाशित झाले. अर्थात टोंडचा गिरनार शिलालेखाचा महत्त्वपूर्ण शोध १८३९ पर्यंत अज्ञातच राहीला.

एशियाटिक सोसायटी किंवा (२५७ या दोन विद्वत्तापूर्ण संस्थांमधे काही मतभेद होते अशी कुठलीही नोंद सापडत नाही. असा तर्क मांडता येईत्त की सन १८२२ मधे फ्रान्स येथे Societe Asiatique ची स्थापना झाल्यावर त्याला प्रत्युत्तर म्हणून सन १८२३ साली इंग्लंड येथे RAS ची स्थापना झाली आणि आशियाच्या अभ्यासासाठी एकाऐवजी दोन संस्था बऱ्या असा विचार झाला असावा. परंतु इंग्लंडमधीत्त दोन संस्थांमधे आपापसात स्ेह नसावा असे एक-दोन संकेत मिळतात. त्यापैकी एक म्हणजे 'एशियाटीक सोसायटीने एका पत्रकात जाहीर केले होते की त्यांच्या संस्थेचे नाव बदत्तून 'एशियाटीक सोसायटी ऑफ बंगाल असे ठेवावे आणि तिने RAS शी संलग्न व्हावे हा RAS ने त्यांना पाठवलेत्ता प्रस्ताव धुडकावण्यात आतला आहे. दुसरे म्हणजे RAS पहिल्याच पत्नकाची प्रत, ज्यामधे संस्थेची उद्दिष्ट्ये छापत्ती होती, कंपनीच्या मद्रास आणि मुंबई येथील मुख्यालयात पाठवण्यात आली, परंतु बंगालला नाही.

भारतामधे काही धार्मिक दबावाखाली आणि इतर सुधारकांमुळे हळूहळू होत असलेल्या इंग्रजीकरणाला या दोन्ही अभ्यासू संस्थांचा, आपापसात मतमेद असूनही, विरोध होता. RAS संस्थापक सदस्य मिलार्डस् हेस्टींग व वेलस्ली आणि त्यांच्यानंतर आलेले गव्हर्नर जनरतत हे "भारतातील अंधःकारमय व क्रूर अंधश्रद्धेला ख्रिस्ती प्रकाश आणि सत्याच्या करुणेने बदलून टाकू" अशा चर्च ऑफ इंग्लंडच्या क्लॅफॅम संप्रदायाच्या विचारसरणीच्या झंझावातासमोर पाय रोवून उभे राहिले होते.

सन १८१३ ला इंडिया अक्ट पारीत झाल्यावर या मिशनऱ्यांना मार्ग मोकळा झाला. कलकत्ता हे बिशपच्या नियंत्रणाखाली आले आणि मिशनरींचा ओघ सुरु झाला. याबद्दल तत्कालीन ख्रिस्ती इतिहासकारांनी लिहिले, "मूर्तिपूजकांच्या प्रभावक्षेत्रात एक छोटीशी पाचर घट्ट बसली आहे आणि सत्याची ताकद तिला आतवर घुसवत आहे". हेच शब्द काही शतके आधी एखाद्या मुस्लिम इतिहासकारानेही लिहीलेले असू शकत होते!

"बायबल्ादि ग्रंथ आता खुलेपणे वाटले जाऊ लागले. हिंदू व इतर मूर्तिपूकांना सहन करण्याचे दिवस आता संपले होते".

एकीकडे बालिकाहत्या, गुलामगिरी आणि सतीची पद्धत याला कायद्याने बंदी आली होती तर दुसरीकडे या सुधारणांबरोबर्च एकंदरीत भारतीय संस्कृतीबद्दल टीका व अनादर वाढीस लागत्ता होता. सन १८२१ मधे लंडन येथील कंपनीच्या संचालक मंडळाकडून दुसर्यांादा गव्हर्नर जनरत्तचे पद सांभाळणाऱ्या लॉर्ड हेस्टींजत्ता एक पत्र पाठवण्यात आले. त्यात हेस्टींजत्ता अशी ताकीद दिली गेली की "फक्त हिंदू किंवा मुस्लिम परंपरा शिकवल्यामुळे ते शिकवण्यासाठी तुम्ही स्वतःला बाध्य करता जे मोठ्या प्रमाणात निरर्थक, काही प्रमाणात अनैतिक व अत्य सार्थक आहे". यानंतर नऊ वर्षांनी संचालक मंडळाने ठरविले की 'पोर्वात्य शिक्षणपद्धती* ऐवजी इंग्रजी आणावी. "आम्हांस असे वाटते की सर्व स्थानिकांना इंग्रजी भाषेच्या परिपूर्ण ज्ञानार्जनाची व्यवस्था व त्यासाठी प्रोत्साहन देण्यात

यावे. युरोपियन साहित्याच्या उच्च दर्जाचा आणि चांगल्या सत्त्वाचा पूर्ण परिणाम ज्यांना त्याची मूळ भाषा समजते अशांवस्च दिसून येईल.''

इंग्लंड आणि भारतातील प्राच्यविद्या अभ्यासकांनी व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी या धोरणाला प्रचंड विरोध केला, परंतु त्यांची संख्या कमी होती व पुढे येणाऱ्या प्रत्येक दशकांत ती अजूनच कमी होत गेली.

या काळात पुन्हा एकदा मुंबई प्रांताच्या पूर्वेकडीत्ल इलाक्यामध्ये काही गुफांमध्ये अत्यंत विस्मयकारक चित्रे काढलेली आहेत अशा बातम्या लष्करी वर्तुळामध्ये परत ऐकू येऊ लागल्या. सन १८२४ मधे सोळाव्या लान्सर घोडेस्वार तुकडीमधील तरुण लेफ्टनंट जेम्स अलेक्झांडर आपल्या पलटणीत खात्रीशीर माहिती घेऊन आला की हे गुफांचे ठिकाण औरंगाबाद पासून उत्तरपूर्व दिशेला साठ मैलांवर असलेले अजिंठा हे आहे. त्याने शिकारीसाठी रजा घेतली होती व एका स्थानिक वाटाड्याबरोबर तेथील गावकऱ्यांनी दिलेल्या धोक्याच्या सुचनेकडे दुर्लक्ष करून तो अजिंठा गावाच्या खालील बाजूस वाघद्रीत शिरत्ता होता. तेथे त्याला दिसले की वाघेवा नदीच्या आकस्मित वळणामुळे तिथे एक नैसर्गिक वर्तुळाकार सभागृहासारखी जागा तयार झाली आहे. तिथे जणू नाट्यगृहातील दुमजली बंदिस्त बा नीतील दोन रांगा असाव्या त्याप्रमाणे दिसणाऱ्या काळ्या बसा दगडात कोरलेल्या सव्वीस गुफा आहेत.

अलेक्झांडर आणि त्याचा वाटाड्या या कड्यावर धडपडत चढले आणि वटवाघळांनी व्यापलेल्या त्या गुफांच्या खालच्या मजल्यापर्यंत पोहचले. तेथे एका मोकळ्या ठिकाणी असलेल्या झाडाच्या फांदीचा आधार घेऊन ते गुफांच्या वरच्या रांगात गेले. या ठिकाणी मोठ्या आणि सर्वाधिक कोरीव काम असलेल्या गुफा कोरलेल्या होत्या. अनेक शतके त्या निर्जन असाव्यात असे स्पष्ट दिसत होते. ''नक्की्च ह्या गुफा कुण्या संन्यस्त पंथाच्या अनुयायांना राहण्यासाठी कोरल्या असाव्या,'' असे या घोडदळ अधिकाऱ्याने नंतर लिहिले. त्याने अशाच गुफा मुंबईजवळ कान्हेरी येथे पाहिल्या होत्या. परंतु जेव्हा मशालीच्या उजेडात त्याने आतील भाग पाहिला तेव्हा ह्या गुफांचे वैशिष्ट्य त्याला कळले. जवळ जवळ प्रत्येक गुफेचे छत आणि भिंती अत्यंत विस्मयजनक चित्रांनी सजवलेले होते. ''ही चित्रे कदाचित दोन हजार किंवा दोन हजार पाचशे वर्षांपूर्वी असलेल्या भारतीयांचे कपडे, त्यांची जीवनशेल्ली, त्यांचे उद्योग, त्यांचे दिसणे अशी जवळ-जवळ प्रत्येक गोष्ट दर्शवित होते--सुव्यवस्थित, गडद रंगानी रंगलेले, विविध चमकणाऱ्या छटा ज्यामध्ये फिका लाल रंग प्रामुख्याने दिसत होता, ब्राम्हणवादाचा उदय झाल्यामुळे सिलोनला पळवून लावलेले वळणदार केसांचे मूळनिवासी बौद्ध लोक''.

लेफ्टनंट अलेक्झांडरने या शोधाद्वारे इतिहासातीत्त एका संपन्न वैभवशाली जगाचे गवाक्ष उघडले. असे जग ज्यांत देव, यक्ष व हाडामांसाची माणसांच्या जीवन व मृत्युच्या संबंधित प्रत्येक घटना-- राजा व त्याचा राणीवसा यांपासून ती जंगलात एकांत रहाणाऱ्या


संन्याशापर्यंत--चितारल्या होत्या. प्रियाराधनाची आणि लढाईची, जय आणि पराजय, भपकेबाज थाटमाट आणि दारिद्र्य यांचे देखावे-- प्रत्येक तपशीलवार देखावा अधिक विश्वसनीय व जिवंत वाटत होता तो प्रत्येक बाबीच्या बारकाव्यांनी, जसे की, केशरचना, वेशभूषा, अलंकार, भांडी, शस्त्रे, वाघे आणि इतर बरेच काही. अनेक चित्रे धर्मविषयक होती ज्यात तेजोवलयांकीत बुद्धांच्या प्रतिमा ध्यानमुद्रेत, शिकवतांना, विश्राम करतांना अशा होत्या, त्यांवर जणू आकाशात तरंगणारे देवदूत होते. याबरोबरच आकर्षक, डौलदार बांध्याच्या, सुंदर अशा उघड्या छातीच्या स्त्री-पुरुषांची चित्रे होती-- उदास नजरेने बसलेत्ता एक राजा ज्याने एका हातात कमळाचे फूल धरून दुसर्यी हाताने राणीला विळखा घातला होता. हत्तीवर बसलेल्या राण्या व राजकन्या, त्यांच्या अवती- भोवती त्यांना रमवण्यासाठी आपले काम करतांना खुदखुटू हसणाऱ्या व गप्पा मारणाऱ्या खूषमस्कऱ्या दासी.

लेफ्टनंट अलेक्झांडरचा हा शोध लष्करी वर्तुळापुरताच मर्यादीत राहिला व पुढील पाच वर्षें त्या जागेवर पुन्हा कोणीही गेले नाही. आपल्या सहकारी अधिकाऱ्यांसमोर सॅण्डहरस्ट मिलीटरी अकॅडमी येथे सन १८२८ च्या ऑगस्टमध्ये अलेक्झांडरने दिलेल्या व्याख्यानाची प्रत सन १८३० मध्ये Transactions of the Royal Asiatic Society of Great Britain and Ireland च्या द्वितीय खंडात छापून प्रकाशित झाली. ह्याचे नाव पुढे बदलून Journal of the Royal Asiatic Society (JRAS) असे ठेवण्यात आले. त्यानंतरच अजिंठ्याचे हे विस्मयकारक गुपित सर्व जगासमोर उघड झाले.


लेफ्टनंट अलेक्झांडरच्या सॅण्डहर्स्ट येथीत्त व्याख्यानानंतर सहा महिन्यांनी कॅप्टन ग्रेसले आणि राल्फ यांनी अजिंठा गुफांना भेट दिली आणि तेथील भिंतीवर असलेल्या शिलालेखांच्या प्रती सोबत आणून त्यांनी "त्या काशीचे पंडित आणि तेथील महाविद्यालयाचे सचिव यांना दाखवल्या, परंतु त्यांना काहीही अर्थबोध झाला नाही".

राल्फने जे पाहिले त्याबद्दल क्षणोक्षणी मनावर उमटणाऱ्या प्रतिक्रियात्मक घटनांची त्याने ठळक, जागती नोंद ठेवली. हे वर्णन पुढे एका "most animated and $50०8॥०" पत्राचाराचा विषय झाले. हा पत्राचार कुणाशी चालला होता हे स्पष्ट होत नाही पण नंतरच्या एका संदर्भावर्न असे दिसते की राल्फने एशिंयाटीक सोसायटीच्या सचिवांचे घ्यान अजिंठ्याकडे आकर्षित करण्याचा व्यर्थ प्रयत्न केला होता.


अजिंठा लेण्यांबाबत राल्फच्या रंजक वर्णनाचे भारतात पहिले प्रकाशन व्हायला १८३७ साल उजाडावे लागले. हे एशियाटीक सोसायटीच्या (जिला आता Asiatic Society of Bengal नाव दिले होते) Journal of Asiatic Society of Bengal मधे छापून आले. नवीन व्यवस्थापनाखाली ही सोसायटी शेवटी हारेस हेमन विल्सनच्या प्रदीर्घ दुष्परभावातून बाहेर पडली.



सांचीच्या प्राथमिक भेटीदरम्यान मेजर विल्यम फ्रँकलिनने केलेल्या रेखाटनाच्या आधारावर त्यानेच काढलेले जलरंगातील चित्र. याला त्याने 'माळव्यातील जैन मंदिरातील शिल्पे' असे नाव दिले होते. (Royal Asiatic Society)




गिरनार शिंलालेख. लेफ्टनंट पोस्टान्सने काढलेल्या व JASB मधे १८३७ ला प्रसिद्ध झालेल्या ह्या चित्राच्या आधारावर कॅप्टन मरखम किट्टोने बनवलेला शिंळाछाप (lithograph)



(वर) अजिंठाच्या लेणी १० चे अंतरंग. ही लेणी इ. पू. दुसर्याप शतकातील आहे. लाकडी छताच्या चैत्यगृहाची प्रतिकृती असलेली वाघदरीत खोदलेली ही पहिली लेणी होती. हा थॉमस डिंबडीनचा शिळाछाप (lithograph) जेम्स फर्गुसनने Illustrations from the Rock Cut Temples of India, 1845 मधे वापरला होता.
(खाली) राजा त्याच्या राण्या व उपस्त्रियांच्या सोबत. जेम्स बर्गेसने रेखाटलेले हे चित्रही लेणी शन्व्या मित्तिचित्राचा माग आहे. बर्गेसच्या Original Drawings from the Buddhist Rock Temples of Ajanta मधून. (APAC, British Library)



६. प्रिन्सेपचा घाट




बनारसमधील गंगेचे दृश्य. जेम्स प्रिन्सेप बनारसमधे दहा वर्षे ईस्ट इंडिया कंपनी टांकसाळीत धातूविंशारद असतांना त्याने काढलेल्या एका चित्रावर आधारीत शिळाषछाप. (प्रिन्सेपच्या Benares Illustrated मधून)




हुबळीच्या घाटावर असलेल्या जेम्स प्रिन्सेपच्या स्मारकाचे चित्र असलेले एकोणिसाव्या शतकाच्या सातव्या दशकातील एक पोस्टकार्ड.



आकर्षक प्रयोगांच्या आधारे वीस वर्षाचा जेम्स प्रिन्सेप कोलकात्याला नवीनतम वैज्ञानिक शोधांची माहिती देतांना (१८२० मधे जॉर्ज चिन्नरीने काढलेल्या चित्रावर आधारीत शिळाछाप).



काठमांडू खोऱ्यात अशोकाने बांधलेल्या पाच प्राचीन स्तूपांपैकी एक. विल्यम हॉजसनच्या नेपाळी चित्रकारांपैकी एकाने काढलेले चिंत्र. याखाली हॉजसनने आपल्या हस्ताक्षरात लिहिले होते. The Ipi Thuda Vihar and Chaitya (monastery and stupa) at Patan in the Valley of Nepal. Built in the 1000th year of the Kali era by Sri nama Miora (the honoured one named Maurya) (Royal Asiatic Society)



गंगेच्या खोऱ्यातील बेहत व कनौज या दोन प्राचीन स्थळांत सापडलेल्या विविध नाण्यांचे जेम्स प्रिन्सेपने घेतलेले छाप. यात ज्यांना आज सच्छीद्र (0॥॥ला- 1811८86) नाणी म्हटले जाते त्यांचाही छाप आहे (उदा. क्रमांक २२, सगळ्यात खाली उजव्या कोपऱ्यात). अनेक नाण्यांच्या मागे स्तूपाचे प्रतिक दिसते (क्रमांक १, ५, ८व २२ (JASB, Vol. III, May 1834)

सन १९९२ पासून लोखंडी दोरांच्या सहाय्याने बांधलेल्या हुबळी नदीवरील एका अत्याधुनिक पूलाने कोलकाता आणि हावडा या शहरांना जोडले आहे. या पूलाचे अधिकृत नाव विद्यासागर सेतू/ असे असले तरी लोक त्याला “हुबळीवरील दुसरा पूत” असेच म्हणतात. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचे बंगाली पुनर्जागरणात महत्त्वपूर्ण स्थान आहे. या पूलाचे दक्षिणेकडीतत (कोलकात्याकडील) टोक फोर्ट विल्यमचे पाण्याकडील प्रवेशद्वार व पश्चिम तटबंदीला वेढते. फोर्ट विल्यम हा ईस्ट इंडिया कंपनीचा मजबूत कि 1 होता. आज

तेथे भारतीय लष्कराच्या पूर्व विभागाचे मुख्यालय आहे. याच ठिकाणी लार्ड वेलस्लीने फोर्ट विल्यम कॉलेज सुरू केले होते. याच कॉलेजात १८४९ साली आपल्या विद्वततेने नावाजलेले अवघे २१ वर्षे वय असलेले विद्यासागर संस्कृतचे प्रमुख पंडित बनले होते. विद्यासागर पुढे मोठमोठ्या कार्यात गुंतले तर फोर्ट विल्यम कॉलेजची अधोगति सुरू झाली. तेथे केंद्रीय विद्यालय सुरू झाले व त्यास्वरुपात ते एकप्रकारे शिक्षणाचे केंद्र बनून राहिले.

या पुलाजवळ आकर्षक शामियानासारखे बांधकाम असलेले आणखी एक जुने स्मारक आहे. याच्या सपाट छताला अनेक सुंदर स्तंभांनी आधार दिला आहे. आपले भविष्य घडवण्यासाठी बंगालमध्ये आलेले तरुण इंग्रज दूर समुद्रात नांगरलेल्या जहाजातून छोट्या फेरीद्वारे ह्याच ठिकाणी सर्वप्रथम प्रवेश करीत. हे एक प्रकारे भारताचे अनधिकृत प्रवेशद्वारच बनते. या ठिकाणी भारतात येणारे अनेक व्हाइसरॉय आणि इतर मान्यवरांचे स्वागत केले गेले. खास करून सन १८७५, १९०५ आणि १९१० मधल्या शाही मेटींसाठी हे स्मारक उ *खनीय ठस्ते. परंतु हा त्याच्या निर्मितीचा मूळ हेतू कधीच नव्हता. या इमारतीच्या एका बाजूच्या कांस्यफतलकावर ही माहिती मिळते-- "प्रिन्सेपच्या समन्मानाप्रित्यर्थ नागरिकांनी उभारलेले" Erected in the honour of JAMES PRINCEP by his fellow citizen_ (Citizens मधीत शेवटचा s गळून पडला आहे). त्यावर कोणत्याही तारखेचा उ 'ख नसला तरी ते सन १८४३ मध्ये उभारले गेल्याची माहिती आहे.

पुढील काही वर्षांनी हे स्मारक व ज्याच्या स्मरणार्थ ते बनवले होते त्याचाही विसर पडत गेला. प्रिन्सेप्स घाट ही त्याची मूळ ओळख जाऊन प्रिन्सेप घाट व त्याही पुढे प्रिन्सेस घाट अशी झाली. नंतर पुढे या ठिकाणी नदीच्या बाजूला असलेल्या रे स्थानकाचे नाव प्रिन्सेप घाट असे पडले. आता कोणत्यातरी जाहिरातीत किंवा एखाद्या सिनेमातील छायाचित्रणात पार्श्वभूमी म्हणून ही अद्भुत इमारत कधी कधी दिसते.

परंतु INTACH ह्या भारतातील राष्ट्रीय स्मारकांचे जतन आणि सांभाळ करणाऱ्या संस्थेच्या प्रयत्नामुळे गेल्या दशकात या स्मारकाची स्थिंती बदलत्ती आहे. स्वतःकडे निधीची कमतरता असूनदेखील INTACH ने ब्रिटीशांशी निगडीत स्मारके जतन करण्यात काही अर्थ नाही ही भारतीय मानसिकता बदलली. त्या दृष्टिने INTACH ने प्रिन्सेपचे स्मारक हे सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सुयोग्य मंच ठरेल्त अशा प्रस्ताव मांडला. उद्देश हा की भारताच्या स्थानिक परंपरांचा आणि ब्रिटीश काळाचा एक उचित मेळ घातला जावा.

जानेवारी २००८ मध्ये पहिला प्रिन्सेप घाट नृत्य महोत्सव आयोजित कर्न या प्रस्तावाला मूर्त स्वरूप देण्यात आले. जागतिक बँक आणि भारतीय लष्कराच्या औदार्यामुळे हा कार्यक्रम आयोजित करता आला.

अगदी याच ठिकाणी सप्टेंबर १८१९ मध्ये वीस वर्षाचा जेम्स प्रिन्सेप जहाजातून उतरून येथे आला आणि त्यानंतर तब्बल वीस वर्षांनी आपल्या मायदेशी जाण्यासाठी तो

तेथे आला परंतु त्यावेळी तो “पूर्णपणे कोलमडून गेलेला .... मानसिक तणावाने प्रस्त -... दु:खाने व्याकुळ .... कृश, दुर्बल व विकलांग असा होता”.

प्रिन्सेपचे मन व शरीर त्या व्याधींतून कधीच बाहेर येऊ शकले नाही. सन १८४० च्या एप्रिलमधे त्याचे इंग्लंडमघे निधन झाले. अंत दु:खद झाला तरी प्रिन्सेपने आपल्या आयुष्याची भारतातील कृतीशील वीस वर्षे अतिशय चांगल्या रीतीने घालवली. सुदैवाने ततो दोन खास ब्रिटीशांच्या संपर्कात आला. या तिघांत तो सर्वांत तरुण होता. त्यांच्यामध्ये केवळ काही महिन्यांचे अंतर होते. या तिघांनी भारतीय प्राच्यविद्या संशोधनाची दिशाच बदलून टाकली. आश्चर्य असे की या तिघांची रूचि एकाच विषयात असून, एकमेकांशी वारंवार पत्रव्यवहार असून आणि ते एकमेकांवर प्रभाव टाकत असूनही या तिघांची प्रत्यक्षांत कधीच भेट झाली नाही.

जॉर्ज टनोर हा तिघांमध्ये काही महिन्यांनी मोठा होता. त्याच्या खालोखाल ब्रायन हॉटन होजसन हा होता. तो सन १८१८मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या मुलकी सेवेमध्ये रूजू होण्यास कोलकाता येथे आला. हॉजसनच्या वरिष्ठांनी ओळखले की त्याची नाजूक प्रकृती भारतीय उष्ण हवामान सहन करू शकणार नाही. म्हणून त्यांनी त्याची नेपाळमधील काठपमांडूच्या रेसिडेंट्चा राजकीय सहाय्यक व सचिव म्हणून नियुक्ती केली. या ठिकाणी त्याने सुख्वातीला सहाय्यक म्हणून व १८२९ नंतर रेसिडेंट या पदावर अशी सततग सव्वीस वर्षे काढली.

या तिघांपैकी सर्वांत तरुण व सर्वांत शेवटी पूर्वेला आल्ला तो जेम्स प्रिन्सेप. त्याचा जन्म ब्रिस्टल येथे झाला होता. त्याच्या वडिलांनी बंगालमध्ये खूप संपत्ती कमावली व ती सारी इंग्लंडमध्ये गेल्यावर गमावली. यामुळे जेम्सचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. कधीकधी तर त्याला त्लहान भावाबरोबर एकच पॅन्ट आळीपाळीने वापरावी लागे. निळे डोळे, फिकट वर्ण, कुरळे केस, किरकोळ शरिरयष्टी असलेल्या जेम्सचे वर्णन त्याची बहीण एमिली हिने 'स्वमावतःच लाजरा व मूदुभाषी' असे केले आहे. किशोरवयात जेम्स तितकासा हुशार नव्हता. दृष्टिदोषामुळे त्याला वास्तुशास्त्राचा अभ्यास सोडून द्यावा लागला, भारतातील मुलकीसेवेत उमेदवारीची संधी त्याने नाकारली आणि शेवटी कंपनीच्या बंगाल येथील टांकसाळीत त्याला नोकरी मिळाली. येथील प्रमुख धातुविशारद, थोर संस्कृत पंडित आणि एशियाटिक सोसायटीचा सर्वेसर्वा हॉरेस हेमन विल्सन याच्या हाताखाली प्रिन्सेप कुशत्त धातूविशारद झाला.

अठरा महिन्यानंतर बनारस येथीत्त कंपनीच्या दुसऱ्या टाकसाळीचे व्यवस्थापन पाहण्यासाठी प्रिन्सेपची नेमणूक झाली. या ठिकाणी त्याने आपल्या वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग करून प्रथमच वाराणशी शहराची जनगणना केली. तसेच त्या शहराचा विस्तृत नकाशा तयार केला. आपल्या वास्तुकलेचा पुरेपूर वापर करून त्याने अनेक बांधकामे सुरू केली. यांत तीन कमानींचा पूत्त, औरंगजेबाने बांधलेल्या भव्य मशिदीच्या पायाची

पुर्नबांधणी आणि बनारस शहराच्या मध्यभागी साठलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी खोलवर बांधलेला भूमिंगत कालवा यांचा समावेश आहे. प्रिन्सेप हा स्वत: एक दर्जेदार कलाकार होता. बनारसला तो ठसे बनविणे व छपाई (etching and lithography) शिकला जे त्याला भविष्यात खूप उपयोगी ठरले.

प्रिन्सेप ज्या उत्साहाने बनारस शहराच्या सुधारणेसाठी चालू असलेल्या प्रत्येक प्रक त स्वतःला झोकून देई त्यामुळे समाजातील सर्व थरात त्याला अनेक मित्र मिळाले. त्यामुळेच १८३० मध्ये वाराणशीतल्या दोन प्रमुख जैन संप्रदायांत वाद उद्भवला तेव्हा त्यांनी त्याची मदत घेतली. त्या दोघांमधील वादाचा मुद्दा होता हा की बनारस शहराच्या हद्दीलगत सारनाथ येथीत्त भव्य घुमटाकार स्मारकाखाली कोणाचे अवशेष पुरलेले आहेत. त्यांनी प्रिन्सेपत्ता विनंती केली की आपले अभियांत्रिकी कौशल्य वापरून "हे बांधकाम खोदून त्याने हा वाद मिटवावा आणि त्यात बंदिस्त असलेली प्रतिमा नक्की दिगंबरी की श्वेतांबरी हे पटवून द्यावे. परंतु ९८३० मध्ये बनारस सोडल्यामुळे या प्रश्नाचे उत्तर मला शोधून काढता आले नाही." शहानिशा करण्याची ही विनंती जैनांनी थोडी उशीरा केली खरी पण तिचे त्याला विस्मरण झाले नाही.

याच काळात काठमांडू येथे ब्रायन होजसन आपल्या स्काम्या वेळेत अनेक उत्कंठावर्धक प्रश्नांची उकल करत होता.

नेपाळी शासकांचे ब्रिटिशांशी जुने शत्रुत्व आणि हॉजसनच्या मते "युरोपियनांनी आपल्या पवित्र गोष्टींबद्दल अनादर दाखवल्याबद्दल लोकांना वाटणारी तीव्र नापसंती" यामुळे नेपाळमध्ये आपल्या संपूर्ण नोकरीच्या कालावधीत त्याला काठमांडूच्या बाहेर असलेल्या ब्रिटीश रेसिडेन्सीच्या आवारात नजरकैदेत असल्यासारखेच रहावे लागले. या बंधनातून मार्ग काढण्यासाठी त्याने पदरमोड करून अनेक स्थानिक नेपाळींना कामास ठेवले, प्रशिक्षित केले आणि त्यांचा उपयोग आपल्या संशोधनकार्यात करून घेतत्ता.

काठमांडूच्या खोऱ्यातील बौद्ध धर्म हा हांजसनच्या संशोधनाचा पहिला विषय होता. त्यामुळे 'त्या वेळी जिवीत असलेला सर्वांत विद्ठान बौद्ध' भंते अमृतानंद् यांच्यापर्यंत त्रो जाऊन पोहचला. पुढे अमृतानंदांनी ब्राह्मणांच्या जातियवादावर टीका करणारा बौद्ध ग्रंथ हडसन यांना दिला तेव्हा हांजसनने बनारसहून आणलेल्या ब्राह्मण पंडिताशी त्यांचा वाद झाला. हाजसनच्या अमृतानंदांशी प्रदीर्घ, फलदायी स्नेहाचा परिपाक म्हणजे (हॉजसनच्या नेपाळमधील बौद्धांची माहिती मिळविण्याच्या विनंतीवरून) अमृतानंदांनी गोळा केलेला प्राचीन संस्कृत बौद्ध हस्तलिखितांचा साठा त्याच्याकडे जमा होऊ लागला.

अमृतानंदांमुळे होंजसनता कळले की काठमांडू खोऱ्यातील मूळ रहिवासी 'नेवार' यांनी सर्वप्रथम बौद्ध धर्म स्विकारला होता. तसेच काठमांडू परिसरातील हिंदू मंदिरे मूळात बौद्ध विहार होते. ह्या पडझड झालेल्या इमारती घुमटाकार चैत्याभोवती होत्या. या चैत्यावर (स्तूपावर) बुद्ध प्रतिमा आणि हिंदू देवतांच्या प्रतिमा होत्या. होजसनने स्थानिक

कलाकारांना या बांधकामांची चित्रे काढण्याचे काम दिले. त्या चित्रांवरून होंजसनने असा निष्कर्ष काढला की या चैत्यांपैकी सर्वांत जुने व सर्वांत साधे चैत्य पाटण गावात व त्याच्या परिसरात होते. हे श्री नाम मौर्य आणि धर्मराज यांनी बांधले होते असे म्हटले जाई.

सन १८२० ते १८२३ या कालावधीमध्ये ब्रायन हाजसनने २१८ पेक्षाही जास्त संस्कृत हस्तलिखिते कोलकाता येथीत्त एशियाटिक सोसायटीला पाठवली. (प्रदीर्घ दुष्प्रभाव असलेल्या) डॉ. विल्सन यांनी वेळोवेळी पोच दिली पण नंतर त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. यामुळे नाउमेद न होता हॉजसन त्याने मिळविलेले बौद्ध ग्रंथ पाठवितच राहिला. त्यात दोन तिबेटी बौद्ध पिंटकग्रंथांचे (कंजुर) पूर्ण संचदेखीतल होते. परंतु त्यांना देखील थंड प्रतिसाद मिळाला. नंतर त्याने त्याच्याकडे उस्लेल्या साहित्यातून जमेल तेवढी नवीन माहिती संकलित केली व सन १८२८ साली एशियाटिक रिसर्चचेसमधे 'नेपाळ आणि तिबेट येथील बौद्ध भाषा साहित्य आणि धर्म या संबंधीचे संशोधन? [Notices on the Languages, Literature, and Religion of the Bauddhas of Nepal and Bhot (Tibet)] हा लेख प्रकाशित केला.

बौद्ध धर्मावर हॉजसनने लिहिलेल्या चौदा लेखांपैकी हा पहिला लेख होता. त्याला याचे विशेष समाधान होते की ह्या लेखांना तत्कालीन युरोपातील पालि पंडितामधल्ा अग्रणी फ्रेंच प्राच्यविद्यापंडित युजीन बुहनुफ (Eugene Burnouf) याने उत्तम प्रतिसाद दिला. त्यांच्यात पत्रमैत्री झाली व बरेच संस्कृत ग्रंथ युजीनतला पाठवले गेले. हॉजसनच्या समकालीन इंग्रजांना त्याचे हे विनाकारण दातृत्व आवडले नाही कारण यामुळे बुहनुफ संस्कृत शिंकला व लवकरच म्हणजे १८४४ मधे त्याने एकोणीसाव्या शतकातील युरोपातील बौद्ध धर्मावरील सर्वात महत्त्वाचा ग्रंथ प्रकाशित केला -- भारतातील बौद्ध धर्माच्या इतिहासाचा परिचय (Introduction a l'historie du Buddhisme Indien).

हॉरेस विल्सनच्या या बाबतीतील निष्क्रियतेने होंजसन वैतागला होता. ह्याच विल्सनच्या कोत्या वृत्तीचा मोठा फटका अत्यंत विदठ्ठान परंतु विक्षिप्त हंगेरीयन सोमा डी कोरा यालापण बसला. हा विक्षिप्त विद्ठान हंगेरियन भाषेची पाळेमुळे शोधण्यासाठी मध्य आशियात अनेक वर्ष फिरत राहिला आणि सरतेशेवटी लडाखमधील बौद्ध विहारात तिबेटी भाषा शिकण्यासाठी राहिला. सन १८२४ साली डी कोरा याने आपले तिबेटी भाषा व साहित्याचे संशोधन मुक्त हस्ते एशियाटिक सोसायटीला उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मांडला. सन १८२७ साली हा प्रस्ताव त्याने पुन्हा एकदा पुढे आणला. मात्र विल्सनने दोन्ही वेळेला हा प्रस्ताव धुडकावला. त्यानंतर पुढीत्त तीन वर्षे डी कोरा याने झांस्कर येथे एकांतात अभ्यास करून पहिला तिबेटी शब्दकोष आणि व्याकरण लिहिले. त्याने ईस्ट इंडिया कंपनीकडे भारतात प्रवेश करण्याची अनुमती मागितली. सुदैवाने त्याचा हा मागणीचा अर्ज गव्हर्नर जनरल लार्ड बेन्टीन्क याच्या टेबलावर पोहचला. त्याने डी कोराच्या कामाचे महत्त्व ओळखले. व्यापारासाठी ते महत्त्वाचे होते. त्याने डी कोरा व त्याच्या हस्तलिखितांना एशियाटिक सोसायटीत प्रवेश दिला. येथे विल्सनने त्यातला अ सरकारी

वेतन देऊन ब्रायन हॉजसनने पाठविलेल्या संस्कृत आणि तिबेटी साहित्याचे वगीकरण करण्याचे व त्याची सूची बनवण्याचे काम दिले. ह्या कामाचा एक लाभ असा झाला की झांस्कर येथे असतानाच डी कोरा आणि हॉजसन यांच्यात सुरू झालेला पत्राचार त्यांना चालू ठेवता आला. या हंगेरीयन विठ्ठानाविषयी विल्सनचा वैरभाव तसाच चालू राहिला. त्याने आर्थिक कारण पुढे करून डी कोरा याचे तिबेटी व्याकरण आणि तिबेटी-इंग्रजी शब्दकोश यांच्या प्रकाशनास मान्यता दिली नाही.

पुढे १८३२ मधे विल्सनला ऑक्सफर्ड येथे नवनिर्मित संस्कृत विभागातीत्त बोडेन अध्यासनाचे प्रमुखपद मिळाले. यामुळे विल्सन एशियाटीक सोसायटीच्या दीर्घ काळ सचिवपदी राहिल्यामुळे सोसायटीच्या कार्यात निर्माण झालेला अडसर एकदाचा संपला. याच्या दोन वर्षे आधी जेम्स प्रिन्सेप कोलकाता येथे त्याच्या हाताखाली सहाय्यक धातुपारखी म्हणून कामासाठी लागला. विल्सनने त्याचे नाव एशियाटिक सोसायटीच्या संदस्यपदासाठी सुचविले होते. पुढे या दोघांनी मिळून एशियाटीक सोसायटीच्या संग्रहालयातील नाणी या विषयावर एशियाटीक सिसर्चेस मध्ये एकत्रित लेख लिहीता होता. या लेखाचा प्रमुख विषय सोने व चांदीच्या नाण्यांवर असलेली अक्षरे हा होता. “या पैकी काहींचे दि १तील फिरोजशाहच्या स्तंभावरील तसेच इतर स्तंभावरील अक्षरांशी साधर्म्य दिसून येते” असा त्यांचा संयुक्त निष्कर्ष होता.

या लेखाबरोबर उदाहरणादाखत्ल नाण्यांवरून कोरलेल्या चार पट्ट्या दिल्या होत्या. यापैकी काही नाणी इटालियन व्यापारी जनरल व्हेंच्युरा याने मनिक््या ल टोप (पंजाब) या ठिकाणी केलेल्या उत्खननात सापडली होती. हा सुप्रसिद्ध टोप पेशावर व कोलकाता शहरांना जोडणाऱ्या सडक-ए-आझम (ज्याला आता ग्रॅण्ड ट्रंक रोड) म्हणून ओळखतात त्याच्या बाजूला होता.

या पट्ट्या कोरण्याचे काम जेम्स प्रिन्सेप याने केले होते. याचा सुपरिणाम म्हणजे त्याने स्वतः भारतीय नाण्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास केला. रोमन आणि ग्रीक नाण्यांबद्दत्तच्या दोन लेखांनतर प्रिन्सेपने भारतीय नाण्यांबद्दल लेख लिहिले. तोपर्यंत अंधःकारमय असलेल्या नाणेशास्त्राच्या (numismatics) क्षेत्रात प्रिन्सेपने उत्तरोत्तर आपल्या ज्ञानामुळे अधिकारस्थान प्राप्त केले. विल्सन किंवा त्याच्या पूर्वसूरींप्रमाणे पारंपारिक शिंक्षण किंवा भाषा कौशल्य प्रिन्सेपकडे नव्हते परंतु ही उणीव त्याने शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून भरून काढली. त्यामुळे त्याचे संशोधन पद्धतशीर व साधार झाले.

आपल्या वरिष्ठांबरोबरच्या सहकार्यामुळे प्रिन्सेस एशियाटिक सोसायटीच्या हृदयस्थानी जाऊन बसला. काही महिन्यातच सोसायटीच्या सचिवपदी आपल्या जागी त्याने यावे या विल्सनच्या प्रस्तावाला त्याने होकार दिला. आता दोन अधिकारपदे त्याच्याकडे आली कारण तो कोलकाता येथील टाकसाळीतील प्रमुख धातूपारखी झाला व

एशिंयाटीक सोसायटीचा सचिवही. ज्या उत्साहाने व परिश्रमाने त्याने बनारसत्ता काम केले होते त्याच उत्साहाने त्याने सोसायटीच्या सचिवपदावर स्वाभाविक अधिकार निर्माण केला.

त्याने केलेले पहिले काम म्हणजे सोमा डी कोरा याला सन्माननीय सदस्यत्व देणे. त्याने डी कोराला रहावयास जागा देऊन त्याचे वेतन दुप्पट केले आणि त्याची दोन पुस्तके प्रकाशित करण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले. त्यानंतर प्रिन्सेपने फोर्ट विल्यम कॉलेजचा एक कारकून बाबू रामकोमल सेन याला स्वतःचा खाजगी सचिव म्हणून नेमले. सोसायटीच्या मान्यताप्रापूत पदावर नेमणूक झालेला हा पहिलाच भारतीय होता. बंगाली समाजसुधारक राममोहन रॉय यांच्या सुधारणांना विरोध करणारा असूनही बाबू रामकोमल सेन हा एक चांगला संस्कृत विढ्ठान होता. तो पुढे कोलकात्यातील संस्कृत विद्यापीठाचा प्राचार्य बनला.

प्रिन्सेपत्ता एशियाटीक सोसायटीमध्ये नवचैतऱ्य निर्माण करायचे होते. तितला आता एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल (ASB) असे नाव दिले होते. हाताळायतता अवघड अशा (फोलिओ आकाराच्या) एशिंयाटीक रिसर्चेसची जागा अता सुलभपणे हाताळता येईल अशा (ऑक्टेवो आकारात) नियमित छापल्या जाणाऱ्या जर्नतत ऑफ 'एशिंयाटीक सोसायटी ऑफ बंगाल (JASB) या मासिकाने घेतली. प्रिन्सेपने स्वतःची नेमणूक JASB चा संपादक म्हणून केली. पहिल्याच अंकात त्याने सर्वांना एकत्र येण्याचे आवाहन केले. सर विल्यम जोन्स आणि हेत्री कोलब्रुक यांनी केलेल्या जाहीर आवाहनांचे हे. जाणीवपूर्वक पडसाद होते. त्याने “सारे निसर्गतज्ञ, रसायनशास्त्रज्ञ, प्राचीनवस्तुसंग्राहक, भाषा संशोधक आणि साऱ्या वैज्ञानिक व्यक्ती ज्या आशियाच्या वेगवेगळ्या भागात आहेत” या सर्वांनी एकजूटीने संशोधनाचे काम करावे आणि “आपले संशोधन लिहून कोलकाता येथील एशियाटीक सोसायटीला पाठवावे” असा हाकारा कला.

याच्या मागील दशकात प्राच्यविद्येचे अभ्यासक ज्या पराभूत मानसिकतेचे शिकार झाले होते त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी हे जाणीवपूर्वक मोजून-मापून टाकलेले पाऊल होते. आणि त्याचा निश्चितच उपयोग झाला. पहिल्या फेरीपेक्षा अधिक नाट्यमयरित्या भारतीय संशोधनाची दुसरी फेरी सुरू झाली. यामध्ये दुसरा जोन्स केंद्रस्थानी तर आजूबाजूत्ता दूरवर पसरलेले विशेष विठ्ठान अशी सुखद सांगड घातली गेली-- कधी दुसर्याद बाजूला ब्रायन हॉजसन तर कधी उपखंडाच्या दुसऱ्या टोकास असलेत्ता जॉर्ज टनोर. परंतु प्रगतीचे प्रत्येक पाऊल जेम्स प्रिन्सेपवस्च अवलंबून होते. एका दशकापूर्वी “स्वभावतःच तल्लाजरा? असलेत्ता प्रिन्सेप आता प्रेरणादायी नेता झात्ता होता. वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. ह्यूज फा नर यांनी त्याची स्तुती करताना म्हटले, “तो स्वतः एक उत्साहमूर्ती होता. त्याने आपल्यातील हे चैतन्य भारतातील प्रत्येक संशोधकाकडे परावर्तित केले. त्याने प्रत्येक माणसाला निरिक्षण करण्याच्या व ते निरिक्षण नोंदवून ठेवण्याच्या नादी लावले. जणू काही तो आपल्याला बघतो आहे आणि आपल्यावर लक्ष ठेवून आहे असे

त्यांना वाटू लागले. त्याच्याशी सहानुभूतिपूर्वक संवादाचा आनंद हाच त्यांना आपल्या कष्टप्रद आणि त्रासदायक संशोधनाच्या कामाचा पुरेसा मोबदला वाटू लागला.

वेळ अगदी योग्य होती. एशियाटीक सोसायटीच्या संग्रहात असलेल्या नाण्यांसंबंधी पहिल्या संयुक्त लेखानंतर पत्रांचा पाऊस पडत्ता होता. बरीचशी चौकशी पंजाब आणि अफगाणिस्तानमधून आली. विदेशी व्यापारी जसे की इटालियन आणि फ्रैंच जनरल व्हेंच्युरा आणि कोर्ट; लेफ्टनंट अलेक्झांडर "बोखारा? बर्नस्, डॉ. जेम्स गेराडं आणि डॉ मार्टिन होनिनबर्गर यासारखे प्रवासी आणि स्वतःला केंन्टुकी, अमेरिका येथील म्हणवणारा साहसी वीर चार्लस मॅशन (त्याचे खरे नाव जेम्स लुईस होते) अशांचा समावेश होता. जेम्स लुईस हा ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करातून पळून गेलेला होता. तो अफगाणिस्तानातील बामियान येथे भव्य मूर्ति दिसल्याच्या बातमीनंतर तेथे भेट देण्याला उत्कंठीत झाला होता.

या पत्रांबरोबर्च काहींनी सोने, चांदी व तांब्याच्या नाण्यांच्या स्वरुपात ठोस पुरावे पाठवले होते. यामुळे जेम्स टोंडच्या निष्कर्षाला पुष्टी मिळत होती - बॅक्ट्रीया आणि जुन्या गांधार येथील मेसिडोनियन राज्य जाऊन पुढे त्यासारख्याच सक्षम इंडो-स्किथियन (भारत-शक) संस्कृतीचा उगम झाला जिने पुढे बौद्ध धर्म अंगिकारला व जी पुढे उत्तर भारतात खूप दूरपर्यंत पोहचली. स्पष्टतया बौद्ध धर्म मुस्लिम प्रवेशाच्या कितीतरी शतके आधी या सर्व प्रदेशात रूजलेला होता. डिसेंबर १८३३ मध्ये खैबरखिंडीच्या पलिकडून जलालाबादवरून डो. गेरार्डने जेम्स प्रिन्सेपल्ला लिहिले की पंजाब येथे असलेल्या टोप (स्तूप) प्रमाणेच कितीतरी टोप त्यांना तिथे आढळून आले. काबूत आणि जलालाबाद मधील पर्वतरांगांच्या कडेकडेने काबूत्त नदीच्या दोन्ही किनार्यांूलगत एकमेकांजवळ दाटीवाटीने उभारलेले हे स्तूप होते. स्थानिक लोक यांना 'भुतांची घरे' म्हणत असत. ती उकरल्यावर नाणी, दाग-दागिने आणि पवित्र अवशेष सापडत परंतु हे कोणी बांधले याबाबत ते पूर्णपणे अनभिज्ञ होते. गेरार्डने अंदाज बांधता, "आपण यांना ग्रीक राज्यकर्त्यांच्या समकालीन किंवा त्यांच्यानंतर आलेल्या क्षत्रपांपासून (छोट्या मांडलिक राज्यांपासून) आलेले मानायचे तर तेच विचार व त्याच शंका वारंवार येतात-- हे कोण राजे असावेत बरे?"

यादरम्यान पंजाबमध्ये साहसी फ्रेंच युद्धजीवी (soldier of fortune) जनरल क्तलॉड ऑगस्ट कूर्त हा महाराजा रणजितसिंहांच्या लष्करात तोफखान्याचे पुनर्गठन करीत होता. फावल्या वेळात तो नाणी आणि प्राचीन अवशेष मिळवण्यासाठी काही स्तूपांचे उत्खनन करीत असे. पेशावर्च्या दरीलगतच स्वाट डोंगराजवळ शहाबाजगढी या खेड्याजवळ एक खूप मोठा पाषाण त्याला सापडला-- "ज्यावर कोरलेली अक्षरे काळाबरोबर अस्पष्ट झाली आहेत". नेहमीप्रमाणे कूर्त याने त्या शिंलालेखाच्या संबंध अलेक्झांडर व त्याचे मॅसेडोनियन वारस याच्याशी जोडला पण तो या 'ग्रीक* शिलालेखाचा अर्थ लावू शकला नाही.

JASB मध्ये प्रकाशित झालेल्या प्रत्येक माहितीसोबत प्रिन्सेप स्वतःची टिपणे टाकत असे, कारण आता त्यात्ता त्याच्याकडे येणाऱ्या अनेकविध भारतीय नाण्यांच्या वाढत्या ओघामुळे, भारताच्या पूर्ववर्ती राजघराण्यांची माहिती समजणे सोपे जात होते. या पैकी सर्वात सुबक नाणी भूमध्यसागरी प्रदेशातील्ल नाण्यांच्या धर्तीवर होती. ती अलेक्झांडरच्या मॅसेडोनियन क्षत्रपांनी प्रथम वापरात आणली आणि पुढे बॅक्ट्रीया तसेच गांधारमधे ती चलनात होती. या नाण्यांच्या एका बाजूवर राजाचे चित्र होते. मागील भागात विविध माणसांच्या किंवा प्राण्यांच्या आकृत्या होत्या आणि त्यांच्या एका किंवा दोन्ही बाजूंवर ग्रीक अक्षरे होती. प्रिन्सेपने असे साधार दाखवून दिले की बॅक्ट्रीयाच्या उत्तरार्धातील नाण्यांवर एक बाजूस जरी ग्रीक अक्षरे होती तरी मागील बाजूस असलेल्या अक्षरांची लिपी वेगळी होती. ती वरवर ग्रीक वाटत होती पण प्रत्यक्षात वेगळीच होती. यातीत्त सर्वच नाही पण काही अक्षरे फिरोजशाहच्या स्तंभावर, टोंडला गिरनार येथे सापडलेल्या शित्तालेखावर आणि ओरिसातील खंडगिरी येथे अँन्ड्यू स्टलिंगला सापडलेल्या शिंलालेखातीतल अक्षरांशी मिळती-जुळती होती.

प्रिन्सेपलला हे कळायला काही काळ गेला की जिल्ला तो गांधारी भाषा समजत होता ती पूर्णपणे वेगळीच भाषा होती-- जिला आज खरोष्टी म्हणून ओळखले जाते. स्वतःची लिपी असलेली ही भाषा बऱ्याचदा उजवीकडून डावीकडे लिहिले जाई. आपल्या शेवटच्या लेखामध्ये प्रिन्सेपने जाहीर केले होते की त्या अज्ञात भाषेतील जवळ जवळ अर्धी व्यंजने आणि तीन स्वर त्याने शोधून काढले आहेत. खरोष्टी मूलतः आर्माईक ह्या पर्शियन साप्राज्याच्या अधिकृत भाषेवर आधारीत आहे हे भाषातज्ञांना समजायला जवळपास अर्धशतक जावे लागले. यापुढेही एका शतकानंतर हे कळले की मौर्यांची ब्राह्मी लिपी ही खरोष्टीमधूनच उदयास आली होती आणि भारतीय भाषेतील उच्चार अधिक चांगल्या प्रकारे व्यक्त करण्यासाठी तिच्यात सुधारणा केली गेली होती.

नाण्यांचा अजून एक वेगळा प्रकार समजण्यास अत्यंत कठीण ठरला. कर्नल कोलीन मॅकेन्झी याने सिद्ध केले होते की ही छोटी छोटी नाणी भारतात सर्वत्र वापरात होती. याबद्दल प्रिन्सेपने लिहीले की, “अनियमित आकारांची ही नाणी चौकोनी, त्रिकोणी, गोलाकार, अंडाकृती इत्यादी आकारात होती व त्यावर साधारणतः काहीही कोरलेले नव्हते; ती बहुतांश सपाट होती; क्वचितच काहींवर अस्पष्ट व संदिग्ध अशी चिन्हे असायची.”

ही चिन्हे सिंह आणि हत्ती यांची पण अधिकतः अत्यंत साधी म्हणजे किरणांसहित सूर्य किंवा फुलीच्या आकाराप्रमाणे होती. एक चिन्ह त्याच्या नजरेत भरले, ते म्हणजे एका पिरॅमिडसारख्या इमारतीवर एकावर एक ठेवलेले तीन गोलाकार घडे किंवा निमुळते घुमट... त्याने चाणाक्षपणे ओळखले की हे नक्कीच कुठल्यातरी पवित्र टेकडीचे चिह्न असावे. त्याचे हे अनुमान खरे ठरले. पुढील अभ्यासात त्याने अगदी बरोबर अंदाज केला की आज ज्याला punch marked म्हणजे भोक पाडून बनवलेले नाणे असे म्हटले जाते, ते

भारताच्या अगदी सुरूवातीच्या काळातीत्त असावेत. प्रिन्सेपने पुढे असे अनुमान काढले की साध्या-सोप्या पद्धतीने बनविलेल्या ह्या सच्छीद्र नाण्यांची जागा पुढे ग्रीक पद्धतीच्या नाण्यांनी घेतली असावी. ही नाणी पुढे ग्रीक - बॅक्ट्रीयन शासकांनी आणि त्यांचे वारस शक व कुषाण यांनी वापरली असावी. वास्तविकतः त्या संपूर्ण कालखंडात ही नाणी टाकसाळीत तयार केली जात होती.

प्रिन्सेपत्ला या नाण्यांबद्दल मदत करण्यासाठी एक उत्साही कनिष्ठ अभियंता अलेक्झांडर कनिंगहॅम हा पुढे आला. हा एकोणीस वर्षाचा युवक १८३३ साली कलकत्ता येथे लष्करभरतीसाठी उमेदवार म्हणून आला होता व काम मिळेपर्यंत बेकार अवस्थेत बसला होता. दोन वर्षानंतर बनारस येथे बदली झाल्यावरही कनिंगहॅम प्रिन्सेपच्या मृत्यूपर्यंत त्याच्या संपर्कात होता. चार दशकांनंतर ह्याबद्दल लिहिताना कनिंगहॅम म्हणतो, "इतक्या मोठ्या कालावधीनंतर देखील त्याच्या पत्रांत अजूनही ती ताकद आहे की त्यांच्या संशोधनबंहृल्ल मला उत्साह वाटावा. त्याचा आनंदी, औदार्यपूर्ण स्वभाव त्याच उत्साहाने माझ्याशी संवाद साधत आहे."

हा पत्राचार बव्हंशी भारतीय नाण्यांबद्दल होता. पण त्याबरोबरच सारनाथच्या भव्य स्तूपासंबंधी प्रिन्सेपच्या अपूर्ण राहिलेल्या एका कामासंबंधी होता. प्रिन्सेपच्या विनंतीनुसार व त्याच्या खर्चाने कनिंगहमने मजुरांची एक टोळी आपल्या सोबत घेतली. कुठल्याही धार्मिक गटाच्या भावना दुखावणार नाहीत याची खात्री करून सारनाथ येथे ज्याला आज 'धम्मेख (धमेंख) स्तूप* म्हणून ओळखले जाते, त्याच्या माथ्यावर पोहोचण्यासाठी त्याच्या बाजूला १४३ फूट उंचीची त्लाकडी उतरंड रचली. सन १८३५ च्या जानेवारीमधे त्यांनी हे काम सुरु केले. त्याने व त्याच्या कामगारांनी या स्मारकाच्या वरून मध्यभागी एक दांडा खाली घुसवत नेला. परंतु त्याला अपेक्षेपेक्षा खूप जास्त वेळ त्ागला कारण वरच्या बांधकामाततले दगडी चिंरे एकमेकांशी लोखंडी पकडीने सांधलेले होते. अशा पद्धतीने १९० फूट खोलीपर्यंत गेल्यावर पुढे त्यांचे काम सोपे झाले कारण तेथून खाली दगडांऐवजी विटा वापरल्या होत्या. अशा रीतीने खणतखणत ते तळाशी जमिनीपर्यंत पोहचले परंतु त्यांना काहीही सापडले नाही. याबद्दल कनिंग्हॅमने लिहिले, "अशा प्रकारे हा भव्य मनोरा उघडून बघण्याचे माझे काम पूर्ण झाले. चौदा महिन्याच्या परिश्रमानंतर आणि ५०० रूपयांपेक्षा जास्त खर्च करून" या उत्खननाच्या सुरवातीलाच सापडलेली एक गुप्तकालीन (इ. पू. ३३० ते ५५०) कोरीव शिळा एवढेच काय ते हाती लागले.

असे असले तरी या उत्खनन काळात त्याची एका वृद्ध माणसाशी मैत्री झाली. सन १७९५ मध्ये जोनाथन डंकनने उ ख केलेल्या या जागेवरील विटा इत्यादी वाहून नेण्याच्या कामात या वृद्धाचा सहभाग होता. कनिंगहैमता अशी माहिती मिळाली की पूर्वी येथे झालेल्या खाणकामामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या स्तूपाएवढाच भव्य असा दुसरा स्तूप पूर्णपणे नष्ट झाला होता. परंतु त्यामुळे त्याच्या खाली एका भूमिगत खोलीत ठासून भरलेल्या अनेक मूती उघड्या झाल्या. त्यामुळे दुष्ट शक्ती बाहेर येऊन उपद्रव करतील या

भीतीने लोकांनी घाई-घाईत त्यांना परत मातीखाली झाकून टाकले. त्या वृद्धाने कनिंगहैमत्ता त्या जागेवर नेले. तेथे कनिंगहमच्या कामगारांनी "अगदी लहान दहा चौरस फूटाच्या जागेत एकत्र ठेवलेल्या जवळपास ६० अत्यंत आकर्षक मूर्ती व कोरीव शि ' बाहेर काढली". ह्या साऱ्या मूर्ती बौद्ध होत्या व त्या जाणूनबुजून लपवून ठेवल्या होत्या.

त्यावर असलेल्या राखेच्या प्रचंड थरामुळे कनिंगहॅमने असा निष्कर्ष काढला की येथील बौद्धांचे वास्तव्य अचानक लागलेल्या आगीच्या संकटामुळे संपले असावे.

यानंतर नोकरीतीत्त बदलीच्या आदेशानुसार कनिंगहैम गव्हर्नर जनस्तचा व्यक्तीगत सचिव म्हणून रुजू झाला. त्या कोरीव मूर्तीपैकी केवळ वीस मूर्ती कोलकाता येथे एशियाटीक सोसायटीला जलवाहतूकीद्वारे पाठविण्याची व्यवस्था करण्यापुरताच जेमतेम वेळ त्याला मिळाला. त्यानंतर तब्बत्त चार वर्षांनी तो बनारस येथे परतला. तेथे त्याला कळले की काशीचा दंडाधिकारी डेव्हीडसन याच्या आदेशानुसार शहरातील पहिल्या लोखंडी पूलाच्या बांधकामाकरता नदीत बांध घालण्यासाठी त्या उर्वरित चाळीस मूर्ती आणि पन्नास गाड्या भरतील एवढे कोरीव दगड वरुणा नदीमध्ये फेकून देण्यात आले होते.

ह्या उद्वेगजनक विध्वंसाचा कनिंग्हैमच्या मनावर खोलवर परिणाम झाला आणि पुढे तो ऐतिहासिक वास्तुंचे जतन करण्यासाठी पुनःपुन्हा आग्रही भूमिका घेऊ लागला.

तरुण अलेक्झांडरकडून मिळालेल्या मदतीचा जेम्स प्रिन्सेपने वारंवार उ 'ख केला. परंतु यात प्रिन्सेपची कुशाग्र बुद्धिमत्ताच जास्त महत्त्वाची होती. एकूण सहा वर्षाच्या कालावधीत त्याने भारतीय नाणे संशोधनाबद्दल एकापाठोपाठ एक अनेक विद्वत्तापूर्ण लेख लिहिले. त्यात त्याने खूपदा स्वतः तयार केलेले नाण्यांचे छापे वापरते. ह्यामुळे गुप्तांनंतरच्या काळापर्यंत भारतीय नाणेसंशोधनाचा पाया रचला गेला. ही मोठीच कामगिरी होती; पण ह्याही पेक्षा त्याचे मोठे काम होते संस्कृतपूर्व भाषांवरचे. परंतु येथे एकातून दुसर्या ची सुरुवात झाली होती. भारतीय नाण्यांवरील अक्षरांचा शोध घेत घेत प्रिन्सेप फिरोजशाहचा स्तंभ व इतर स्तंभांवरील अक्षरे तसेच अन्य शिलालेखांपर्यंत पोहचला होता.

सर विल्यम जोन्स, हेत्री कोलब्रुक आणि इतरांनी केलेले संशोधन एशियाटीक रिसर्चेसच्या सुरुवातीच्या अंकामध्ये त्यांनी प्रामाणिकपणे लिहून ठेवले होते पण पुढे ते विस्मरणात गेले होते. सुरुवातीला प्रिन्सेपला त्याची काहीच माहिती नव्हती. तरी बनारस येथे असतांना त्याने अलाहाबादच्या कि ला भेट दिली होती तेव्हा हे पाहून तो अत्यंत उद्विग्र झाला की किल्याच्या प्रवेशद्वाराजवळ तुटलेल्या अवस्थेत पडलेल्या स्तंभावरील अक्षरांची ऊन आणि पावसामुळे झीज होत चालली होती.

त्याने लिहीले, "अत्ताहाबाद येथील हा स्तंभ उध्वस्त होऊन पडलेला पाहिला तेव्हा त्यावरील कोरीव अक्षरांची प्रत काढून ती जतन करण्याची इच्छा झाल्याशिवाय राहिली नाही. मुघल सप्राट जहांगीर स्वतःचे नाव व वंशावळ या शिलालेखाच्या मधेच एका पट्टीवर

कोख्न तेवढ्यावरच थांबला. इंग्रजांनी अशा विडंबनेवर योग्य टीका केली. तरीही त्यांच्या स्वतःच्या निष्क्रियतेमुळे थोड्याशा वर्षांत झालेले नुकसान कडव्या मुस्लिम राजाच्या विध्वंसापेक्षाही खूप अधिक होते."

या विषयाचा तो जसजसा अभ्यास करु लागला तसतसे प्रिन्सेपचे त्या उन्मूळ स्तंभावर्च्या अज्ञात लिपीबद्दलचे कुतूहल वाढत गेले. या लिपीत्ता त्याने क्रमांक ९' असे नाव दिले. त्याच्या संपर्कात असलेला अलाहाबादमधील बंगाल इंजिनिअर्सचा लेफ्टनंट थॉमस बर्ट याला त्याने पत्र लिहिले आणि काही आठवड्यातच त्यातला चित्रांचा एक संच मिळाला. त्याने त्याचे छापे घेतले व JASB च्या मार्च १८३४ च्या अंकात प्रकाशित केले. या लेखाला काठमांडू येथून ब्रायन होजसनची त्वरीत प्रतिक्रिया आली. प्रिन्सेपने हे पत्र एशियाटीक सोसायटी ऑफ बंगालच्या मेमधील सभेत वाचून दाखवले.

हॉजसनने पत्राची सुरुवातच तक्रारीने केली. काही वर्षापूर्वी त्याने हॉरेस विल्सनला नेपाळला जात-येत असतांना पाहिलेल्या माटि लाट स्तंभाची (आज लौरिया नंदनगढ स्तंभ म्हणून ओळखला जाणारा) रेखाटने पाठवली होती आणि बरोबरच त्या स्तंभावर असलेल्या प्राचीन शिलालेखाची नक्कल (eye copy) देखील पाठविली होती. परंतु डॉ. विल्सनने काहीही उत्तर दिले नाही. आता त्याने त्याला आढळलेल्या अजून दोन स्तंभांचे चित्र पाठविले. जॉन मार्शल, फादर मार्को डेला टोम्बा आणि इतरांनी ह्या तीन स्तंभांबद्दल याआधी लिहून ठेवले होते.

ब्रायन होजसन आणि सोमा डी कोरा या दोघांनी स्वतंत्रपणे असे मत मांडले होते की तिबेटन अक्षरांचे मूळ लिखित संस्कृत वरून आले आहे. होजसनने आता प्रिन्सेपलला असे लिहिले की त्याची क्रमांक ९ लिपी ही त्याच भाषेचे पूर्वीचे रूप होते. "ह्या अक्षरांचा भारतात सर्वदूर झालेला प्रसार पाहता ती देवनागरीपासूनच बनली आहे यात तिळमात्र शंका नसावी आणि यातून असा निष्कर्ष निघतो की ही भाषा संस्कृत असावी."

अलाहाबाद येथून लेफ्टनंट बर्टकडून मिळालेली क्रमांक १ ची प्रत आणि 'एशियाटीक सोसायटीकडीतल या क्रमांक १ च्या प्रतींचा संच (ज्या चार दशके आधी कॅप्टन होअर याने फिरोजशाहच्या स्तंभावरून घेतल्या होत्या) यांनी सज्ज झालेला जेम्स प्रिन्सेप आता त्यामागील सत्य शोधू लागला. त्याने या सर्व अक्षरांचे कष्टप्रद पूथःक्करण सुरू केले. "माझ्या तववकरच आकलनात आले की प्रत्येक मूळ अक्षराचे पाच मुख्य स्वरमेद होते. या साऱ्यांचे रूप त्याच्याशी निगडीत असलेल्या प्राचीन संस्कृत क्रमांक २ मधील पाच स्वर व्यंजनांशी अनुख्पता दर्शवित होते. ही एकमेव बाब हे सिद्ध करायला पुरेसी होती की ही भाषा संस्कृत परिवारतीलच होती.

प्रिन्सेपने असा अचूक अंदाज बांधता की ही पाच झूपे संस्कृतमधील व इतर इंडोयुरोपियन भाषेतील्ल पाच स्वरांसारखेच आहेत (a, e, i, o, u). सर्व मुळाक्षरे आणि त्यांचे मुख्य स्वरभेद यांचा त्याने तक्ता बनवला. यात त्याला, आजच्या संस्कृतवर आधारित

आधुनिक भारतीय भाषांपेक्षा कमी पण प्राचीन भाषेत अपेक्षित अशी एकोणतीस मुळाक्षरे सापडली. एक ठराविक पंधरा अक्षरांचा संच त्याने ठळकपणे अधोरेखित केला. त्याच्या निरिक्षणानुसार ही अक्षरे सारख्याच अनुक्रमाने प्रत्येक विभागाच्या किंवा परिच्छेदाच्या सुरुवातीला आलेली होती.

हा पंधरा अक्षरांचा संच क्रमांक १ समजण्यासाठी कळीचा मुद्दा ठरेल असा प्रिन्सेपल्ला विश्वास होती. ब्रायन होजसनने पाठवलेल्या माटि लाट शिंलालेखाच्या प्रतीवरील प्रत्येक भागदेखील्त त्याच पंधरा अक्षरांच्या संचाने सुरू होत होता हे पाहून प्रिन्सेपची अधिकच खात्री पटली.

मग त्याने अलाहाबाद, दि "१ आणि बिहार येथील लेखांची हुबेहूब नक्कल असलेले तीन संच शेजारी ठेवून त्यांचा परत बारकाईने अभ्यास केला. तेव्हा एक विलक्षण बाब त्याच्या लक्षात आली, “हे तीनही शिलाल्लेख एकमेकांशी तंतोतंत मिळणारे होते. अर्थात बेतिया येथीत्त शितल्ालेखातील शब्द अन् शब्द फिरोजशाह स्तंभावर होता, जो 'एशियाटीक रिसर्चेसच्या सातव्या अंकात चार सलग पट्ट्यांमध्ये प्रकाशित झाला होता (कॅप्टन होअरच्या प्रत्यक्ष बघून काढलेल्या नकला). अलाहाबाद येथील शिलालेखाचा जो भाग शि क राहिला होता तोही अगदी जसाच्या तसा या पट्टीवर कोरलेला आढळतो.”

प्रिन्सेप आपल्या शोधाबद्दल अनुमान करू लागला, “ही अक्षरे कदाचित कुठल्यातरी राजाच्या विजयाची घोषणा करतात, की ती त्याच्या अधिपत्याखालील भूप्रदेशाच्या सीमा दर्शवितात, की ते बौद्ध किंवा ब्राह्मणी धर्मग्रंथातील उतारे आहेत, या साऱ्यांचे समाधानकारक उत्तर तेव्हाच मिळू शकेत्त जेव्हा या भाषेचा शोध लागेल.”

हॉजसनचे पत्र आणि प्रिन्सेपचे उत्तर १८३४ च्या JASB च्या अंकामध्ये छापून आले तेव्हा वाचकांमध्ये उत्साही खळबळ उडाली. हा उत्साह द्विगुणित होण्याचे कारण म्हणजे त्यावेळी उत्तर बिहार मधीत्त एका (ज्याला आज लोरीया-अराराज स्तंभ म्हणतात) स्तंभावरील शिलालेखाची प्रत आणि प्रिन्सेपकडे असलेल्या तीन प्रतींवरील लेख शब्दशः सारखाच होता हे प्रिन्सेपने दाखवून दिले. प्रिन्सेपने लिहिते, “आता आपल्याकडे 'एकसमान असणाऱ्या शिलालेखांच्या चार प्रती आहेत. नुकतीच मिळालेली एक प्रत, दि " आणि मत्थिंया येथील तिन्ही प्रती परिपूर्ण आहेत, तर अलाहाबाद येथील शिलालेखाची नासधूस झालेली आहे.”

या अविष्कारामुळे प्रिन्सेप क्रमांक १ ची अधिक उदाहरणे गोळा करण्यासाठी प्रयत्न करू त्लागला. कॅप्टन एडवर्ड फेल याने सांचीच्या भव्य स्तूपाला भेट दिल्याची माहिती सर्वप्रथम १८१९ मध्ये कलकत्ता जर्नलमध्ये छापून आली होती. ती माहिती प्रिन्सेपने JRAS मध्ये पुन्हा प्रकाशित केली तसेच सांचीची अधिक रेखाटने आणि महत्त्वाचे म्हणजे तेथील शिलालेखांच्या नकला पाठविण्याचे आवाहन केले.

नेमक्या याच वेळेला सिलोन येथे दूर अंतर्गत भागात असलेल्या जॉर्ज ट्नोरने या चर्चेत भाग घेतला. कुठल्या कारणामुळे महावंसाचे काम पुन्हा सुरु करण्याची प्रेरणा त्याला मिळाली हे समजू शकत नाही, परंतु काही महिने विचार केल्यानंतर त्याने कोलकाता येथे जेम्स प्रिन्सेपल्ला महावंस या ग्रंथाच्या महत्त्वाबद्दल एक छोटा लेख पाठवला ज्यात बौड़ धर्माच्या पूर्वार्धाची अचूक माहिती दिली होती. जेम्सला तो इतका गौण वाटला की त्याने फार विचार न करता तो त्याचा जुना मार्गदर्शक प्रा. हॉरेस हेमन विल्सन याला ऑक्सफर्ड येथे त्यांचे मत जाणून घेण्यासाठी पाठवून दिला. विल्सनच्या छिंद्रान्वेषी टिपण्या प्रिन्सेपने टर्नोरच्या लेखाखाली तळटीपेत JASB च्या सप्टेंबर १८३६ च्या अंकात प्रसिद्ध केल्या.

विल्सनने The Mahavansi, the Raja-Ratnacari and the Rajavali, forming the Sacred and Historical Books of Ceylon च्या दोन भागाचे रेव्ह. विल्यम फॉक्स यांनी केलेल्या भाषांतराला काही अनुदान दिले होते. महावंसावरून असे दिसते की मौर्य राजा अशोक याने स्वतः बौद्ध धर्माचा स्विकार केला होता आणि बौद्ध धर्माचा भारत व भारताबाहेर प्रसार करण्यासाठी सर्वांत महत्वाची भूमिका बजावली होती हा टनोंरने मांडलेला महत्त्वाचा मुद्दा विल्सनता अजिबात रच्चला नाही. विल्सनने जाहीर केले-- ही सारी निरर्थक बडबड आहे (This was all nonsense); अशोक शिंवभक्त होता हे सर्वांना माहीत आहे; इतकेच नव्हे तर "अशोकाच्या धर्माचा येथे काहीही संबंध नाही. कदाचित तो स्वतःच श्रहेचे स्थान असेल. विल्सन पुढे म्हणाला की ब्राह्मणांच्या पुराणांच्या आणि कवि क णाच्या काश्मिरी राजांबद्दलच्या राजतरंगिणीच्या तुलनेत महावंस हा पूर्णपणे अविश्वसनीय दस्तावेजी पुरावा आहे.

सार्वजनिकरित्या केलेले हे दोषारोप ट्नोरतता आवडले नाही. त्याने भाषांतर केलेली महावंसाची पहिली वीस प्रकरणे प्रकाशित करण्यासाठी बंगालच्या एशियाटीक सोसायटीकडे मदत मागितली. कदाचित विल्सनशी जवळचे नाते असल्यामुळे प्रिन्सेपने ही विनंती एशियाटीक सोसायटीचे उपाध्यक्ष रेव्हरंड विल्यम मित्तल याच्यासमोर ठेवली. हे शहाणपणाचे पाऊल ठरले. कारण मिल हा स्वत: जरी एकेश्वरवादी ख्रिश्चन आणि कोलकात्यातील नवीनच स्थापन झालेल्या बिशप कॉलेजचा प्राचार्य होता तरी तो संस्कृतचा जाणकार होता आणि एक खरा अभ्यासक होता.

टनोरने पाठविलेले हस्तलिखित वाचून मित्तल अत्यंत अचंबित झाला-- टनोरच्या दाव्याप्रमाणे महावंस खरोखरच एक अतिप्राचीन आणि महत्वाचा मूळ दस्तावेज होते यांत त्याला काही शंका राहिली नाही. महावंस पुराणांपेक्षाही कितीतरी शतके आधीचा तर होताच पण ऐतिहासिक दस्तावेज म्हणून तो पुराणांपेक्षा कितीतरी अधिक विश्वसनीय होता असे दिसत होते. हा ग्रंथ जरी सिलोनशी संबंधित होता तरी मिलने जाहीर केले की मुस्लिमपूर्व भारतीय इतिहासाबाबतचा हा सर्वात मौल्यवान ग्रंथ आहे. पुढे मिलने ही बाब अधोरेखित केली की "ख्रिस्तपूर्व सिलोनचा इतिहास आणि मगध यामध्ये एक विशेष चित्तवेधक नाते दिसून येते"-- जे नाते महावंसाच्या भाषेमुळे अधिक जवळचे वाटते.

ही भाषा पालिं होती. टनोरने दाखवून दिले की पालि ही बिहारची प्राचीन अभिजात भाषा होती जिला मगध प्राकृत म्हणत. असे दिसते की या प्राकृत मागधी भाषेतूनच पालि आणि संस्कृत उदयास आल्या असाव्यात.

रेव्हंड मिल याने टर्नोसला दिलेल्या निसंदिग्ध पाठिंब्यामुळे ४ जानेवारी १८३६ रोजी कलकत्ता येथे एशियाटीक सोसायटीची बैठक बोलविण्यात आली. सर्व उपस्थितांनी प्रो. विल्सनचा स॒ 1 धुडकावून लावला आणि ‘‘टनोर्च्या प्रकाशनासाठी भारत सरकारकडून पूर्ण मदत देण्यात येईत्त या बाजूने मतदान झाले’’. या निधीमुळे जार्ज टर्नोर्ला Epitome of the History of Ceylon, Compiled from Native Annals: and the First Twenty Chapters of the Mahawanso हे पुस्तक सिलोन येथील कोट्टा चर्च मिशन प्रेसमधून त्याच वर्षी प्रकाशित करता आले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लेखकाने अत्यंत मुद्देसूदपणे विल्सन आणि इतरांनी भारताच्या अतिप्राचीन इतिहासाबद्दल केलेले अनेक चुकीचे दावे खोडून काढले.

टर्नोरने हे देखील दाखवून दिले की महावंसाचा मूळ स्त्रोत दीपवंस हा ग्रंथ होता. त्यात शाक््यदमुनी बुद्धाच्या आयुष्याबद्दल सर्वांत जुनी माहिती उपलब्ध होती व त्याबरोबस्व बौद्धांचा भारत आणि श्रीलंकेमधील पुढील सात शतकांच्या इतिहासाचीही नोंद होती. त्यामुळे ऐतिहासिक घटनांना एक वेगळाच दृष्टिकोण मिळाला. आत्तापर्यंत इतिहास ब्राम्हण लेखकांनी केवळ त्यांच्या दृष्टीने उभा केला होता. महावंसाने त्या इतिहासातला सरळ आव्हान दिले.

महावंस मूळतः बौद्ध संघाचा लंकेतीलल इतिहास सांगणारा ग्रंथ होता. परंतु त्यामध्ये बुद्धकाळापासूनच्या भारतातील घटनांचा देखील समावेश होता. यातील कालगणनेचे दोन संदर्भ फारच उपयोगी होते. एका कात्तगणनेत शाक्य.मुनि बुद्धाच्या मृत्यूपासून वर्षें मोजली जात तर दुसर्यी कालगणनेत राज्यकर्त्या सम्राटाच्या राज्यारोहणापासून वर्षें मोजली जात. बौद्ध कालगणनेनुसार शाक््यमुनि बुद्धाच्या मृत्यूचे वर्ष हे शून्य वर्ष गणले जाते. ते मगधराज अजातशत्रुच्या शासनाचे आठवे वर्ष गणले जाते. बुद्धानंतर बरोबर एक शतकानंतर दुसरे बौद्ध संगायन पार पडले जे राजा काळाशोकाच्या शासनाचे दहावे वर्ष होते. त्याच्या दहा पुत्रांनी पुढील्त बावीस वर्षे राज्य केल्यानंतर तेथे नऊ नंद भावंडांचे राज्य आले. यातील शेवटचा धनानंद याला ब्राह्मण मंत्री चाणक्याने सिंहासनावरून खाली खेचले. टनोंरने त्याच्या भाषांतरात लिहित्ले,

‘‘त्याला मारल्यानंतर चाणक्याने संपूर्ण जम्बुद्दीपाच्या राजगादीवर मौर्य राजघराण्याच्या वंशजाला बसविले. तो विक्रमी, कल्याणकारी व गुणसंपन्न होता. त्याचे नाव होते चंद्रगुप्त. त्याने चौतीस वर्षे राज्य केले. त्याचा मुलगा बिंदुसार याने अट्टावीस वर्षे राज्य केले. बिंदुसाराला वेगवेगळ्या स्त्रियांपासून एकशे एक मुले होती. त्यापैकी एक अशोक आपली धार्मिक वृत्ती व विलक्षण प्रज्ञेमुळे सर्वांत ताकदवान ठरला. वेगवेगळ्या

मातांपासून जन्मलेल्या आपल्यया नव्यान्नव भावांना यमसदनास पाठवून त्याने जम्बुद्दीपावर स्वतःचा एकछत्री अंमल प्रस्थापित केला. लक्षात घ्या की बुद्धाच्या मृत्यूपासून ते त्याच्या राज्यारोहणापर्यंत दोनशे अठरा वर्षाचा कालावधी गेला होता.''

दुसर्या शब्दात सांगायचे म्हणजे मगधचा राजा म्हणून अशोक हा शाक््यधमुनी बुद्धाच्या मृत्यूनंतर दोनशे अठरा वर्षांनी गादीवर बसला.

सम्राट अशोकाच्या राजगादीपर्यंतच्या प्रवासाचे वर्णन ट्नोर्च्या भाषांतरामध्ये आहे. अशोकाने आपल्या वडिलांचा वध करून राज्य बळकवण्याची योजना बनवली आहे अशा अफवेमुळे त्याला अवंती राज्याची राजधानी असलेले उज्जैन येथे पाठविण्यात आले. त्या प्रवासात त्याचा मुक्काम विदिशा येथे पडला असताना एका व्यापाऱ्यांची सुंदर तरुण मुलगी देवी हिच्याशी त्याची भेट झाली व तिच्याशी त्याने लग्न केले. पुढे उज्जैन येथे तितला महीन्द (महिन्द्र) नावाचा सुंद्र मुल्लगा झाला आणि दोन वर्षानंतर संघमित्ता (संघमित्रा) नावाची मुलगी झाली. एक दशकानंतर उज्जैन येथे आपल्या वडिलांचा प्रतिनिधी म्हणून अशोक राज्य करीत असतांना, बिन्दुसार राजा मृत्युशय्येवर असल्याची वार्ता त्याला मिळाली. तो त्वरीत पाटलिपुत्नर येथे पोहचला आणि वडिलांच्या मृत्यूशय्येजवळ गेला. ''पित्याचे निधन झाल्या झाल्या त्याने राजधानीवर आपला हक्कव प्रस्थापित केला आणि त्या वैभवशाली शहरात आपल्या मोठ्या भावाला मारून संपूर्ण राज्य बळकावले''.

मगधावर चार वर्षे राज्य केल्यानंतर अशोकाचे स्थान इतके बळकट झाले की त्याला अधिकृत राज्याभिषेक करवून घेता आला.

अशोकाने आपत्ता लहान सहोदर भाऊ तिस्स (तिष्य) याला उपराजा नेमले. अशोकाच्या हिंसक वर्तनामुळे त्याला चंड-अशोक म्हटले जाऊ लागले. पुढे त्याच्या मनात धर्माविषयी अनेक प्रश्न येऊ लागले. त्याचे वडील राजा बिंदुसार याचा ब्राह्मणी धर्मावर विश्वास होता. त्यांनी ६०,००० ब्राह्मणांना आश्रय देऊन त्यांच्या भोजनदानाची व्यवस्था केली होती. अशोकाने वडिलांची ही परंपरा पुढे तीन वर्ष चालू ठेवली. परंतु पुढे आपल्या दरबारातील ब्राह्मणांची नीच वागणूक बघून त्याने विविध धर्माच्या एकेका प्रतिनिधीला बोलावण्याचा आदेश दिता जेणेकरून त्यांना प्रश्न विचारून त्यांची शिकवण समजून घेता यावी. अशा प्रकारे विविध मतांची तपासणी सुरू असतांना त्याला आपल्या महालाच्या खिडकीतून खाली रस्त्याने जाणारा एक संयमी व शांत दिसणारा तरुण बौद्ध भिक्षु दिसला. या तरुण भिक्षुचे नाव निग्नोध असे होते. अशोकाने सत्तेवर येण्यासाठी आपला सावत्र थोरला भाऊ सुमन याता मारले होते व ह्या भावाचाच निग्नरोध हा पोरका मुत्तगा निघाला. निग्नोधातता आपल्या सिंहासनावर बसवून अशोकाने स्वतःचे समाधान होईपर्यंत खरी शिकवण काय आहे याबद्दल प्रश्न विचारते ''आणि जेव्हा त्या पृथ्वीश्वराने त्याची उत्तेरे एकली तेव्हा तो शाक््यपमुनी बुद्धाच्या शिकवणुकीचा अनुयायी झाला''.

अशोक आता बौद्ध उपासक बनला. आपल्या दरबारातील ब्राह्मणांना त्याने हुसकावून लावले आणि त्यांची जागा साठ हजार भिक्षुंनी घेतली. त्या सर्वांमध्ये थेर मोगलीपुत्त तिस्स सम्राट अशोकाचा आचार्य बनला. पुढे सव्वीस वर्षे राज्य चालवत असतांना, अशोकाच्या मृत्यूपर्यंत त्याचा अशोकाच्या जीवनावर मोठा प्रभाव राहीला.

अशोकाला जेव्हा समजले की बुद्धाचे (व त्याच्या प्रमुख शिष्यांचे) एकूण चौर्‍यां शी हजार उपदेश आहेत तेव्हा त्याने अशी आज्ञा दिली की चौऱ्यांशी हजार ठिकाणी स्तूप आणि विहार उभारण्यात यावेत. आपत्ती राजधानी पाटलिपुत्राच्या बाहेर त्याने अशोकाराम हा भव्य विहार बांधला. हे सर्व विहार त्याने तीन वर्षाच्या कालावधीत बांधले वते सर्व पूर्ण झाल्याचा आनंद साजरा करण्यासाठी एका भव्य समारंभाचे आयोजन केले. त्यावेळी त्याने सढळ हाताने उत्तमोत्तम उपहारांची भेट दिली आणि समारंभपूर्वक अशोकराम या विहारास स्वतः भेट दिली. या कृत्यामुळे त्याचे ‘‘धम्म-अशोक' (घम्माशोक, धर्माशोक) असे नामाभिधान झाले.

या दिवशी हा थोर राजा सुशोभित होऊन आपल्या परिवारातील सर्व स्त्रिया, आपल्ले मंत्रीगण आणि मोठ्या संख्येने फौजफाटा घेऊन जणू धरती कापीत अशोकरामापर्यंत पोहचला. तेथे तो सर्व संघाच्या मध्यभागी उभा राहिला व त्याने सर्वांना आद्रपूर्वक नमस्कार केला. तेथे गोळा झालेल्यांमध्ये ऐंशी कोटी भिक्षु आणि नव्वद लाख भिक्षुणी होत्या. या संघाने तेथे चमत्कार केला आणि सम्राट अशोकाचे धर्मपरिवर्तन केले. पूर्वी आपल्या दुष्ट कर्मांमुळे चंड-अशोक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोकाला आता त्याच्या धर्मवान कार्यामुळे धर्माशोक (धम्माशोक) म्हणू लागले.

सम्राटाच्या दानशूर्तेचे थेर मोग्णलिपुत्त तिस्सने कौतुक केले. मग त्याने सम्राटाला समजावून सांगितले की महिन्द्र व संघमित्रा या आपल्या दोन मुत्तांना संघात प्रवेश करण्याची अनुमति देऊन तो यापेक्षा मोठे पुण्यकर्म करू शकतो. त्यावेळी महिन्द्रचे वय वीस वर्षे तर त्याच्या बहिणीचे वय अठरा वर्षे होते. अशोकाने धम्म स्वीकारल्यानंतर सहा वर्षांनी त्याच्या या दोन मुलांनी संघप्रवेश केत्ता. यानंतर धम्माशोकाचा धाकटा भाऊ तिस्स याने भिक्षु होण्याची अनुमती मागितली. ती त्याला काहीशा अनिच्छेनेच देण्यात आली.

धर्म अशोकाच्या उदारपणामुळे बौद्धांना चांगले दिवस आले. परंतु त्यामुळे काही पाखंडी संघात शिरले. ते त्यांचे पाखंड बुद्धाच्या नावावर पसरवू लागले. यामुळे बौद्धांमध्ये प्रचंड संभ्रम उडाला. याचे वर्णन मोग्णलिपुत्त तिस्स याने ‘‘धर्मावर एखाद्या फोडाप्रमाणे आलेले हे भयानक गळू आहे’’ असे केले. ही दुफळी पुढे सात वर्षे टिकून राहीली. शेवटी राजाला त्यात लक्ष घालावे लागले. पण त्या वेळी आचार्य मोग्णलिपुत्त तिस्स एकांत ध्यानासाठी हिमालयात गेलेले असल्याने अशोकाने आपला एक मंत्री तेथे हा वाद मिटवण्यासाठी पाठवला व त्यात काही भिक्षु मारले गेले.

सम्राट अशोकाला अत्यंत क्लेश झाले. त्याने आचार्य मोग्गलिपुत्त तिस्स यांना परत बोलावले. शेवटी आपले एकांत ध्यान अर्ध्यावर सोडून ते परत फिरले. त्यांना आणण्यासाठी राजाने एक जहाज गंगेतून वरच्या बाजूला पाठवले. त्यानंतर सम्राट अशोकाने अशोकारामाजवळ साऱ्या संघाची महासभा बोलावली. या ठिकाणी प्रत्येक भिक्षुने त्याची नक्की मान्यता काय याचे विवेचन केले. त्यात साठ हजारजणांना पाखंडी म्हणून संघाच्या बाहेर काढले आणि मोगलिपुत्त तिस्साच्या मार्गदर्शनाखाली उर्वरित भिक्षुंनी सद्धर्माचे परत संकलन केले. याला ''तिसरे बौद्ध संगायन' म्हणतात. हे संगायन नऊ महिने चालले आणि ते धम्माशोकाच्या राजवटीच्या सतराव्या वर्षी संपले.

या दरम्यान सुरम्य लंकेची सुप्रसिद्ध राजधानी अनुराधापूर येथे साठ वर्षे राजसत्ता उपभोगल्यानंतर राजा मुतासिंव याचे निधन झाले होते. त्याच्या जागी त्याचा दुसरा मुल्तगा राजा बनल्ा, ज्याने स्वतःचे नाव देवानांपियतिस्स (देवांना प्रिय असा तिस्स) असे ठेवले. यानिमित्त मौल्यवान रत्नांची मेट देण्यासाठी आपला मित्र राजा धम्माशोक याच्या शिवाय दुसरा कुणी सुयोग्य नाही असे त्याला वाटले. रत्ने सुखरूपपणे नेण्याची जबाबदारी त्याने आपला पुतण्या महाअरिठ्ठ याच्यावर सोपवली. त्याने सात दिवस समुद्रयात्रा व पुढे सात दिवस जमिनीवर असा पाटलिपुत्रापर्यंत प्रवास केला आणि सप्राट धम्माशोकासमोर ही मौल्यवान रत्ने भेट म्हणून सादर केली.

याला प्रतिसाद म्हणून मगधराजाने त्याला गंगेचे पवित्र पाणी, ''राजघराण्यातील 'एक अत्यंत सुदर कुमारिका? व ''एकशे साठ पोते पर्वतावरील तांदूळ जो पोपटांनी जमा केलेला होता? इत्यादी भेटी दिल्या.

या सोबत धम्माशोकाने भेट म्हणून एक धर्म-उपदेश पाठवला, ''मी बुद्ध, धम्म आणि संघाला शरण गेलेलो आहे. मी शाक्यांयच्या धर्माचा अनुयायी झालो आहे. हे महाराजा, तू सुद्धा सत्याची कास धर व श्रद्धापूर्वक या कल्याणधर्माचा स्वीकार करून मुक्तिपथाला शरण ये.''

या दोन सप्राटांमधील धर्मसंदेशांच्या देवाण-घेवाणीनंतर याच्याहीपेक्षा खूप महत्वाकांक्षी अशी धर्मप्रचाराची योजना आखली गेली. महावंसानुसार याचे श्रेय अशोकाकडे न जाता, आचार्य मोग्गलिपुत्त तिस्स याला जाते. त्याने भारतीय उपखंडाच्या कानाकोपऱ्यात व त्याही पलिकडे अनेक धम्मटूत पाठवले. यामध्ये दक्षिण दिशेला अशोकाचा मुलगा महिन्द्रच्या नेतृत्वाखाली पाच थेर भिक्षु पाठवले. या सर्वांवर रमणीय लंकेत शाक्यमुनींच्या सुरम्य धर्माची स्थापना करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली.

महावंसाचा बराचचा भाग महिन्द्रच्या लंकेतीत्त धर्मप्रचाराच्या मोहिमेच्या वर्णनाने व्याप्त आहे हे आपण समजू शकतो. महिन्द्रच्या प्रवज्येनंतर बारा वर्षांनी तो तेथे पोहोचला. लंकेला निघण्यापूवी महिन्द्र आपल्या आईचा निरोप घेण्यासाठी विदिशा येथे गेला. त्यावेळी त्याची बहीण संघमित्रा हिचा मुत्तगा सुमन हा देखील त्याच्याबरोबर होता. त्याची आई देवी

ही चैत्यगिरी विहारात (आजची सांची) रहात होती. आपल्या लाडक्या पुत्राला बघून ती स्वाभाविकपणे अतिशय प्रसन्न झाली.

एक महिना आपल्या आईसोबत चैत्यगिरी विहारात वास्तव्य केल्यानंतर महिन्द्र आणि त्याच्याबरोबरचा संघ जलमार्गाने किंवा थलमार्गाने नव्हेतर आकाशमार्गाने जाऊन लंका बेटावर मध्यभागी असलेल्या डोंगराच्या माथ्यावर उतरले. मिहीनताले येथे लंकेचा राजा देवानांपियतिस्स याने त्यांचे स्वागत केले आणि आपले सर्व कुटुंब व मंत्रिगणांसहीत त्याने बौद्ध धर्माचा स्विकार केला.

अनेक प्रकरणांनंतर असा उ 'ख आढळतो की भिक्षु सुमनला त्याचे आजोबा सम्राट अशोकाच्याकडे बुद्धाचे शारिर-अवशेष मिळवण्यासाठी पाठवण्यात आले. मगधाला आल्यावर अशोक बोधगया येथे बोधिवृक्षाची पूजा करण्यात मग्न असल्याचे सुमनला दिसले. त्याला अशोकांकटडून बुद्धाचे भिक्षापात्र मिळाले. यानंतर सुमन हिमालयात जाऊन बुद्धाचे गळपट्टीचे हाड व एक दात घेऊन आला. हे मौल्यवान पवित्र शारिरधातू लंकेला नेण्यात आले. तेथे राजा देवानांपियातिस्स याने अनुराधापूर येथे एका भव्य स्तूपात त्यांची प्रतिष्ठापना केली.

नंतर राजा देवानांपियातिस्स याने संघमित्रेच्या (जी आता लंकेतील भिक्षुणीसंघात थेरी होती) हारा अशोकाला बोधिवृक्षाची एक फांदी लंकेत पाठवण्याची विनंती केली. परंतु बोधिवृक्षाला कुठलीही इजा न होता ही फांदी कशी काढावी या विचाराने सप्राट अशोक अतिशय व्यथित झाला. परंतु एका विधिद्वारे त्याने बोधिवृक्षाची फांदी काढून एका कुंडीत लावली व समुद्रातून जाणाऱ्या नावेत संघमित्रेच्या देखरेखेखाली पाठवली. ही छोटी नाव गंगेच्या पात्रातून समुद्राकडे जात असताना, राजा आणि त्याचे सैन्य ही बोट जेथे पोहचेल त्या ताप्रलिप्ती बंदरापर्यंत सात द्विस प्रवास करून गेले. या ठिकाणी शेवटच्या निरोप समारंभात राजा गळ्यापर्यंत समुद्राच्या पाण्यात उतरता व त्याने रोपाला जहाजावर चढवून निरोप दिला. समुद्र किनाऱ्यावर उभे राहून दोन्ही हात उंचावून त्या दूर जाणाऱ्या झाडाच्या फांदीकडे दु:खावेगाने अश्रु ढाळत राजा अनिमिष नेत्रांनी बघत राहीला. त्या दूर जाणाऱ्या बोधिवृक्षच्या फांदीचा वियोग सहन न झाल्याने तो जोरजोरात हुंदके देऊन रडत होता आणि तशा स्थितीतच अशोक राजा आपल्या राजधानीकडे परतला.

लंकाधीशाने अनुराधपूर येथील आपल्या उद्यानात बोधिवृक्षाच्या फांदीचे रोपण केले. त्याने आपल्या शेजाऱ्याचे अनुकरण करून संपूर्ण बेटावर ठिकठिकाणी स्तूप आणि विहारांची निर्मिती केली. महावंस म्हणतो, "अशा प्रकारे लंकेचा शासक देवानांपियतिस्स याने आपल्या राजवटीच्या पहिल्याच वर्षी आपल्या प्रजेच्या अध्यात्मिक लाभासाठी हे कार्य केले. त्याच्या या दयाळूपणामुळे त्याच्या आयुष्यभर तो सुखात नांदता, व त्याचे सर्व प्रकारे मंगल झाले." त्याने चाळीस वर्षे राज्य केले. त्याच्या मृत्यूनंतर आठ वर्षांनी *लंकेचा प्रकाश' महिन्द्राचा मृत्यू झाला. मात्र या घटनेपासून पुढे महावंसामधे भारतातील घटनांचे

वर्णन कमी दिलेले दिसते. फक्त पुढे विसाव्या प्रकरणाच्या सुरुवातीला एका संदिग्ध उताऱ्यात सम्राट अशोकाच्या राजवटीच्या तिसाव्या वर्षी त्याची बौद्ध राणी असंधिमित्ता हिचा मृत्यु झाला आणि त्यानंतर चार वर्षांनी त्याने पुर्नविवाह केला असा उ 'ख आहे-

कामविकाराने प्रस्त धर्मोशोकाने त्याच्या मृत पत्नीच्या सेविकेला पट्टराणीचे पद दिले. त्यानंतर तीन वर्षांनी ती दुष्ट, गर्विष्ठ व आत्मकेंद्रित स्त्री "राजा माझ्याकडे दुर्लक्ष करतो, त्याचे सर्व लक्ष केवळ बोधिवृक्षाकडे असते" या विचाराने क्रोधित झाली व तिने मंडूकाचा विषारी दात वापरून बोधिवृक्षाला नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर चार वर्षांनी (असंधिमित्तेच्या मृत्युनंतर व अशोकाच्या राज्याभिषेकाच्या सदतीस वर्षांनंतर) हा महान सप्राट मर्त्यलोकाच्या अंतिम परिणतीला प्रापूत झाला.

वरील संक्षिप्त वर्णनातून स्पष्ट दिसते की आयुष्याच्या शेवटी राजा अशोकाच्या परिवारात सारे काही आलबेल नव्हते. तो गादीवर आल्यापासून तीस वर्षानंतर त्याची प्रिय राणी, जी बुद्धानुयायी होती, मरण पावली. त्यानंतर चार वर्षांनी त्याने त्याच्या दिवंगत पत्नीच्या सेविकेशी विवाह केला व तित्ला नवीन पट्टराणी बनवले. आपल्या नवऱ्याची बौद्ध धर्माविषयी श्रद्धा बघून तिला मत्सर वाटल्ला. तिने त्याच्या राजवटीच्या सदतीसव्या वर्षी बोधिवृक्ष नष्ट करण्याचा प्रयत्न केला. सप्राट अशोक पुढे ललवकरच मरण पावला. परंतु त्याचा मुत्तगा किंवा त्याची मुलगी यांच्या मृत्युनंतर जसे प्रशंसेचे उद्गार महावंसात आहेत तसा एकही उद्गार सप्राट अशोकाबद्दल त्याच्या मृत्युनंतर लिहीलेला नाही. हा अपेक्षाभंग जाणवण्याइतका स्पष्ट आहे. राजा देवानांपियतिस्सचा घनिष्ठ मित्र व त्याचा आदर्श, ज्याच्यामुळे लंकेत बौद्ध धर्माला चालना मिळाली, अशा सम्राट अशोकाच्या आयुष्याचा अंत त्याच्या स्वतःसाठी व बौद्ध जगतासाठीही निराशाजनक होता.


तढतर महावंसाचा भारतात काही रस रहात नाही. केवळ एकदाच भारताच (जम्बुद्वीपाचा) उ 'ख केलेला आढळतो जेव्हा लंकेच्या नंतरच्या एका राजाने अनुराधापूर येथे एक नवीन स्तूप बुद्ध-धातुची (शरीर अवशेष) स्थापना करण्यासाठी बांधला. त्याच्या उद्धाटनासाठी भारत व त्यापलिकडील बौद्ध भिक्षुंना आमंत्रित केले होते. महावंसात लिहिल्याप्रमाणे या कार्यक्रमासाठी हजारो भिक्षु हजर होते. ते राजगीर, इसीपत्तन, श्रावस्तीचा जेतवन विहार, वैशाली येथील महावन विहार, कोसंबी, पाटलिपुत्र येथीत्त अशोकाराम, काश्मीर, प वमोग्ण, अलासंदा (अलेक्झान्ड्रिया, जे यवनांचे शहर होते व कदाचित आजचे कंदाहार असावे), विंध्य, बोधिमंद विहार, वनवासदेश आणि भव्य कैत्ताश विहार अशा निरनिराळ्या ठिकाणांवरून आले होते. यावरून असे दिसते की अशोकाच्या मृत्यूनंतर एक शतकांनंतरदेखील श्रीलंका आणि मायदेशी भारतात बौद्ध धर्माची जोरदार भरभराट होत होती.

जॉर्ज ट्नोस्च्या Epitome of the History of Ceylon, Compiled from Native Annals: and the First Twenty Chapters of the Mahawanso हे सप्रमाण दाखवून दिले की सप्राट अशोक हा केवळ बौद्ध धर्म लंकेत प्रस्थापित करण्यासाठी एक साधन नव्हता तर तो भारतीय इतिहासातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व होते. त्याची जवळजवळ संपूर्ण उपखंडावर सार्वभौम सत्ता होती व त्याच्या प्रभावामुळे बौद्ध धर्माचा त्याच्या राज्याच्या सीमेबाहेर सर्वदूर प्रसार शक्य झाला.

आणि ज्यांनी डोळे झाकले नव्हते त्यांना हे सहज समजून येणे शक्य् होते की सांची येथील स्तूपांचा समूह अशोकाच्या कथेत किती महत्त्वाचा असेल. महावंसानुसार राजकुमार अशोकाची पहिली पत्नी देवी त्याला विदिशा येथे भेटली. पुढे ती तिने स्वतःच निर्मिती केलेला चैत्यगिरी विहार येथे राहिली होती. याच ठिकाणाहून त्यांचा मोठा मुलगा महिन्द्र त्याच्या सहकारी मिक्षुंबरोबर लंकेला बौद्ध धर्माची शिकवण घेऊन गेला. विदिशा शहराच्या जवळपास बऱयाच टेकड्या आहेत परंतु सर्वांत जवळची टेकडी म्हणजे सांची ही होय. हेच कारण होते की सम्राट अशोकाच्या व त्यानंतरच्या काळात देखील ह्या भागाकडे विशेष लक्ष दिले गेले.

टर्नोर्च्या या शोधांच्या पा ्र्वभूमीवर लवकरच फिरोजशाहच्या सोनेरी स्तंभाच्या रहस्यमय कथानकाचा उत्तगडा करणारा शेवट्चा अंक सुरू होणार होता ज्यातून दोन रहस्ये उल्लगडणार होती.


८. राजा प्रियदर्शी उवाच




सांची स्तूपाच्या दानांच्या छाप्यांचे प्रिन्सेपचे पान. यांचा एकत्रित अभ्यास करून प्रिन्सेपने ब्राह्मी लिपीचा उलगडा केला. (JRAS, Vol. VIII, July 1837)



लेफ्टनंट मरखम किट्टो. पार्श्वभागात घौली येथील अशोकाच्या शिलालेखाचा हत्तीसदृश पाषाण. मागे दूर अंतरावर भुवनेश्वीरच्या मंदिरांचे कळस. (Lithographic Sketches, 1850 मधील कोल्सवर्थी ग्रँट याने रेखाटलेले चित्र)



घौलीचा शिंलालेख. तेथील हत्तीचे डोके वर दिसते आहे. अलेक्झांडर कॅडीने १८९५ मधे घेतलेले छायाचित्र. (APAC, British Library)



जेम्स प्रिन्सेपने सांचीच्या शिल्पांच्या चित्रांसाठी आवाहन केल्यावर ज्या वाचकांनी त्याला प्रतिसाद दिला त्यांच्यापैकी एक कॅप्टन विल्यम मरे होता. तो सौगर व नर्मदा प्रभागाच्या कमांडरचा सहायक होता. त्याने प्रिन्सेपला महास्तूपाच्या दक्षिण तोरणाच्या दोन आडव्या पाषाणांवरील शिल्पांची दोन रेखाटने पाठवली. प्रिन्सेपने 3॥88 साठी यांतील जास्त आकर्षक चित्र निवडले. यात एका शहरावर ससैन्य चालून गेलेला गजारूढ राजा आदेश देतांना दिसतो. मरे व प्रिन्सेप या दोहोंना हे

माहीत नव्हते की हे दोन्ही दृश्ये अशोकाच्या गाथेतील होते जिचा उलगडा व्हायला अजून ऐशी वर्षे जायची होती. (यातील वरच्या दृश्याचे रेखाटन व नंतर छायाचित्र इतरत्र दिले आहे) (Royal Asiatic Society)

सन १९३७ हे साल ब्रिटनमध्ये व्हिक्टोरियन कालखंडाच्या सुरुवातीचे वर्ष म्हणून ओळखले जाते. भारतातील राजकीय इतिहासकारांसाठी मात्र १८३७ एक काळे वर्ष ठरले ज्यामध्ये ऑक्सफर्ड येथील प्रो. एच. एच. विल्सन आणि कोलकाता येथील जेम्स प्रिन्सेपचे वडिल बंधु हेत्री थोबी प्रिन्सेप यांच्या नेतृत्वाखालील प्राच्यविद्या अभ्यासकांच्या मोहिमेत्ता थॉमस मेकॉले आणि लार्ड बेन्टीकच्या नेतृत्वाखाली इंग्रजीवादी व इवॅन्जेलिकल्स यांच्याकडून मोठा पराभव पत्करावा लागला. या पराभवाची परिणती म्हणजे भारतामध्ये शिक्षणाची मुख्य भाषा म्हणून इंग्रजी लादली गेली तसेच स्थानिक भाषांमध्ये लिहीलेल्या साहित्याच्या छपाईसाठी मिळणारे सरकारी अनुदान बंद करण्यात आले.

परंतु भारतीय विद्यांचे अध्ययन करणाऱ्यांसाठी १८३७ हे वर्ष भारतीय इतिहास व भाषाशास्त्र या विषयांकरता विस्मयजनक घडामोडींचे वर्ष होते. यावषी एकापाठोपाठ एक असे अतिशय विलक्षण शोध इतक्या शीघ्रपणे पुढे येत राहिले की एकास समजून घेऊन त्याचा अन्वयार्थ लावण्याआधीच पुढचा शोध जाहीर होत असे.

या वर्षांच्या सुरुवातीलाच जॉन प्रिन्सेपने जाहीर केले की बंगाल येथील एशियाटिक सोसायटीच्या संग्रहात असलेले दोन दगडी शिलालेख “चोरीचा माल” आहे. या आधी काही महिने त्याने ओरिसातील त्याच्याशी संपर्क ठेवणाऱ्या सहकाऱ्याला भुवनेश्वररजवळ खंडगिरी येथील शिलालेख परत एकदा तपासण्यास सांगितले होते. हे शिलालेख वीस वर्षांपूर्वी अन्डरयू स्टर्लिंग याने सर्वप्रथम शोधून काढले होते. परंतु स्थानिक ब्राह्मणांनी या तपासणीला विरोध केला. त्यांनी तक्रार केली की काही वर्षांपूर्वी एका इंग्लिश कर्नलने त्यांच्या मंदिरातील्त पुष्कळशा दगडी मूर्ती व शिलालेख चोख्न नेले होते. या बातमीमुळे नाराज झालेल्या प्रिन्सेपने स्वतःच एशियाटीक सोसायटीच्या संग्रहातून त्याचा शोध घ्यायचा प्रयत्न सुरु केत्ता. हे करत असताना त्याला खर्यो चोराचा छडा लागला. दिवंगत जनर्त चार्ल्स 'हिंदू? स्टुआर्ट हा तो चोर होता. “ब्रिटिशांनी हिंदू रीतिरिवाज स्वीकारावे व इंग्लिश मेमसाहेबांनी त्यांच्या आरोग्यासाठी विलायती घट्ट कपडे टाकून देऊन साडी नेसावी” असा प्रचार करून त्याने खूप पूर्वी कोलकात्यातील ब्रिटिशांमधे मोठे वादळ निर्माण केले होते. प्रिन्सेपने ह्या दोन शिळा समुद्रमागे ओरिसाची तेव्हाची राजधानी कटक इथे पाठवल्या जेथे त्याच्या माणसाने त्या त्यांच्या खर्या मालकांना परत केल्या.

हा प्रिन्सेपचा माणूस होता ६व्या नेटीव इन्फन्ट्रीचा लेफ्टनंट मर्खम किट्टो. तो आता एक प्रकारे वाळीत टाकला गेला होता. तो कंपनीततला निरूपयोगी व्यक्ति होता. हा प्रवीण पुरातत्त्व अभ्यासक वयाच्या सतराव्या वर्षीं सन १८२५ मधे लष्कराचा रंगरूट शिपाई म्हणून भारतात आत्ता होता पण येथील सहकारी अधिकाऱ्यांशी त्याचे पटले नाही. तो एमिली ह्या एका कर्नलच्या मुलीच्या प्रेमात पडला आणि १८३५ मधे तिच्याशी विवाहबद्ध झाला. त्याअगोद्रच तिला त्याच्यापासून (एकून नऊपैकी) पहिली दोन मुले झाली होती.

त्याने आपल्या वरिष्ठांवर दडपशाहीचा आरोप केला होता. त्यामुळे त्याचे कोर्ट मार्शल करण्यात आले. त्यात त्याला “आज्ञापालन न करणारा बंडखोर, उद्धट, भांडकुदळ अधिकारी” व “सज्जनाला न शोभणारे वर्तन” या कारणांनी अपराधी ठरवून लष्करातून बडतर्फ करण्यात आले. जेम्स प्रिन्सेपने या अडचणीच्या काळात त्याची मदत केली. त्याला कोळसा कमिटीच्या सचिवपदी तात्पुरती नोकरी मिळवून दिली. या नोकरीमुळे त्याला कोळशाच्या शोधाचे निमित्त पुढे करून ओरिसात सर्वत्र फिरता आले.

दोन शिळा परत केल्याच्या कृतीमुळे निर्माण झालेली सदिच्छा किट्टोच्या फायद्याची ठरली-- त्याला खंडगिरी शिंलालेखाची नकल करण्याची परवानगी मिळाली. हे करतांना त्याला दुसर्यृा एका शिंलालेखाची माहिती मिळाली जो भुवनेश्वस्च्या दुसऱ्या बाजूला दया (ह्या दया--म्हणजे करूणा-नावाचा संदर्भ उशीरा लक्षात आला) नदीच्या पलिकडे होता. या शिंलालेखाचा शोध घेण्याचा त्याचा प्रयत्न स्थानिक उडिया लोकांच्या विरोधामुळे अयशस्वी झाला. पण बनारसहून आलेल्या एका हिंदू संन्याशाने मध्यस्थी केल्यामुळे त्याला त्या शिलालेखाचा शोध शक्यआ झाला. “ओरियांना आपण त्यांच्या पूजेच्या ठिकाणी गेलेले बि ,, तल आवडत नाही. मला त्या स्थानापासून अगदी काही यार्डांवर असतांना मुद्दाम चुकीची माहिती देऊन दूर पाठवले गेले. ह्या दिशाभुलीमुळे मी मैलापेक्षा जास्त अंतर दूर गेलो. तेथे मला एक माणूस भेटला ज्याने मला मशालीच्या उजेडात योग्य ठिकाणी पोहोचवले. मी तेथील जंगलात अग्नी पेटवून पूर्णपणे झाडाझुड्टपांनी झाकलेला शिलालेख पाहित्ता होता.”

किट्टोने अनुभवलेला हा वैरभाव भारतीय पुरातत्त्वशास्त्रज्ञांसाठी आजही एक मोठी अडचण आहे. बऱ्याच वेळा तो धार्मिक भावनांमुळे असतो पण त्याहीपेक्षा कितीतरी अधिक वेळा ह्या समजुतीमुळे विरोध होतो की जुने अवशेष खणण्यासाठी जो कुणी येतो तो तेथे दडलेला गुप्त खजिना घेण्यासाठीच येतो आणि शिळांवरचे किंवा स्तंभावस्चे लिखाण हे तो खजिना मिळवण्याची कळ (कि)॥) आहे.

किट्टो जेव्हा शित्तालेखाची नकल करायला त्या पाषाणाकडे सकाळी परत आला तेव्हा त्याच्या पायथ्याशी त्याला एक अस्वलीने अडवले. ती व तिची दोन पि यांनी तेथे मुक्काम केला होता. त्यांना टाळण्यासाठी किट्टो कडा चढून गेला, जेथे त्याला एक लहानसा हत्ती दिसला-- “हत्तीचा पुढचा भाग, चार फूट उेच, उत्कृष्ट कारागिरी असलेला... पाषाणातून खोदलेला”. अस्वलीची पि ' पळून गेली होती पण अस्वली तिथेच होती. मग किट्टोने तिल्ला गोळी घालून ठार केले. त्यानंतरच तो पाषाणावरीलल लिखाणाचे निरीक्षण करू शकला.

किट्टोने अश्वत्थामा शिलालेख असे नाव दिलेला हा शिलालेख पुढे धौलीचा शिलालेख म्हणून प्रसिद्ध झाला. धौली हे शेजारच्या खेड्याचे नाव आहे. शिलालेखातील राजाज्ञा दया नदीच्या बाजूला असलेल्या तीन छोट्या पाषाण टेकड्यांपैकी एकीच्या

खडकावर कोस्लेल्या आहेत. "या जागेवर पंधरा फूट लांबीचा व दहा फूट उंचीचा खडक कापलेला आहे आणि त्याला घासून गुळगुळीत केला आहे. त्यावरील लेख चार भागात विभागले आहेत आणि असे दिसते की ते वेगवेगळ्या वेळी कोरले आहेत. त्यातील पहित्ता सर्वात जुना दिसतो--त्यावरील अक्षरे तुलनेने मोठी व फारशी खोल कोरलेली नाही. चौथा भाग एका ठळक रेषेने वेगळा केलेला आहे व त्यावरील लिखावट काळजीपूर्वक कोरलेली दिसते."

किट्टोने धौलीच्या शिलालेखाची नकल कोलकात्यात अगदी योग्य वेळी पोहोचली; कारण त्याचवेळी आणखी दोन शिलालेखांच्या नकला तेथे आल्या होत्या. पहिली गिरनारच्या भव्य हत्ती पाषाणावरील लेखांची नकल होती-- हा शिलालेख कर्नल टोंडने १८२३ मधे शोधत्ता होता. वाथेन नावाच्या माणसाने प्रिन्सेपच्या सांगण्यावरून केलेली ही आधी रेव्हरंड डो जॉन विल्सन ह्या स्कॉटीश सर्जन व मिशनरीने केलेल्या नकलेची नकल होती. डॉ विल्सनने मुंबईत मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली होती. त्याबरोबरच तो एक उत्कट प्राच्यविद्या अभ्यासक होता. दुसरा लेखांचा संच सांचीच्या मोठ्या स्तूपाहून आला होता. ते काम प्रिन्सेपच्या लेखांची नकल व शि ।ंची रेखाटने पाठविण्याच्या विनंतीवख्न रॉयल इंजिनिअर्सच्या कॅप्टन एडवर्ड स्मिथ याने केले होते.

स्मिथने सांचीच्या शिल्लालेखांच्या नकलांबरोबर तेथील्ल चार ह्वारांवरील शि ।ंची अनेक जिवंत रेखाटने पाठवली होती. पण प्रिन्सेपचे सारे लक्ष केवळ लेखांकडे होते. याचे कारण होते की त्याच्याकडे आता गंगेच्या खोऱ्यातील अनेक स्तंभलेखाबरोबरच तीन दूरदर्च्या वेगवेगळ्या ठिकाणांवरून-- पश्चिम, मध्य व पूर्व-- मिळालेली क्रमांक १ लिपीतील लेखांच्या नकला आलेल्या होत्या.


दिनांक ७ जून १८३७ त्ता एशिंयाटीक सोसायटीच्या सभेत प्रिन्सेप बोलायला उभा राहिला तेव्हा त्याने जाहीर केले, "हे शित्लालेख अत्यंत योग्य वेळी येथे पोहोचले आहेत." त्या ऐतिहासिक सभेच्या इतिवृत्तांतात मात्र फक्त एवढेच लिहिले गेले-- "सचिवांनी शिलालेखांबदतल्ल एक नोंद वाचली, ज्यांत त्यांना विशेष कुतूहत्त होते कारण त्यामुळे त्यांना दीर्घकाळ ज्या लाट लिपीचा किंवा अलाहाबादच्या क्रमांक १ चा शोध घेण्यास मदत झाली. आणि परिणामस्वरूप ते दि १, अलाहाबाद, बेटिया, गिरनार आणि कटक (धौलीचा शिलालेख) हे वाचू शकले-असे लक्षात आले की हे सर्व एकमेकांशी संबंधित आहेत, त्यांचा उगम व त्यांचा मतितार्थही."

प्रिन्सेपची नोंद पुढे JRASमधे प्रकाशित झाली व त्यामुळे भविष्यात त्याने क्रमांक १ लिपी कशी शोधली याचे पायरी-पायरीने स्पष्टीकरण मिळणे शक्या झाले.


सांचीचा लेख दोन प्रकास्चा होता. पहिल्या दोन लेखांमधे चौथ्या शतकातील गुप्त राजघराण्यातील जमीनीच्या वतनांची नोंद होती. बाकीचे तेवीस क्रमांक १ लिपीतील छोटे छोटे लेख होते जे स्तूपांच्या भोवतालच्या स्तंभाच्या रांगेत आडव्या शिंल्ांवर ढोबळपणे

कोरले होते. शि च्या सुबकपणापुढे हे लेख खूपच ओबडधोबड दिसत होते. “हे वरवर ओबडधोबड वाटणारे लिखाणच त्या प्राचीन स्तंभलेख व शिलालेखांची लिपीची तसेच भाषेची ओळख करून देण्यास कारणीभूत ठरले ज्याचे कुतूहल सर विल्यम जोन्सच्या काळापासून विद्वानांना होते.”

प्रिन्सेपने पुढे समजावले की तो जेव्हा सोसायटीच्या जर्नलमधे प्रकाशनासाठी एका लिथोग्राफ पट्टीवर हे सांचीचे शिलालेख एकत्र मांडत होता तेव्हा त्याच्या लक्षात आले की प्रत्येकाचा शेवट दोन अक्षरात होत होता. सहा रेषांनी बनलेले सर्पाकृती अक्षर व त्यानंतर इंग्रजीतील उलटा 1 व त्याच्या एका बाजूला एक बिंदू.



“त्यांचा संदर्भ लक्षात घेता व त्यांचे अतिसंक्षिप्त रुप बघता मला लगेच वाटले की ते एकतर मृत्युची माहिती देत असतील किंवा, जास्त शक्य ता अशी की, श्रद्धाळूंच्या देणग्या वा भेटींचा उ *ख असावा”. अनेक ठिकाणी या दोन अक्षरांआधी एक तिसरे अक्षर सापडले, जे दोन टोकाच्या हुकप्रमाणे किंवा जहाजाच्या नांगराप्रमाणे ज्यात एक टोक वरऐवजी खालच्या बाजूला होते.



एक अधिक आनंददायक योगायोग असा की केवळ काही दिवसांपूर्वी प्रिन्सेप पश्चिम भारतातील सौराष्ट्रातील नाण्यांचा अभ्यास करीत होता. “सौराष्ट्राच्या नाण्यांवरुन मला एक-दोन दिवस आधीच हा उलगडा झाला होता की हे षष्ठीचे एकवचन पालित स्स व संस्कृतमधे स्य होते”. जर हा षष्ठीचा -चा, ची, चे-प्रत्यय असेल तर हा तर्क स्वाभाविक होता की ह्या छोट्या वाक्यांशाचा उरलेला भाग दान व दात्याचे नाव होता “चे दान”.


पालि व संस्कृत दोहोत दान व दानं हे क्रियापद व नाम आहे. प्रिन्सेपने लगेचच दानं हा शब्द ओळखला आणि त्याबरोबरच 'द' व “न' ही मुळाक्षरेही. या दोन अक्षरांनी व षष्ठीच्या एकवचनी प्रत्ययाने प्रिन्सेपचा चार वर्षांचा एकाग्र अभ्यास नाट्यमयरीत्या एकत्र

आला व भारतीय भाषाशास्त्रातील हा युरेका क्षण ठरला. "मी ह्या अक्षरांचे इतके अवल्लोकन केले होते, त्यांची मला इतकी ओळख झाली होती की आता उरलेली अक्षरे मला लगेच पुनर्परिक्षणात सहज सांगता आली. केवळ काही मिनिटांतच मला पूर्ण मुळाक्षरे मिळाली. मग मी त्यांची दि)चा स्तंभलेखाच्या संदर्भात पुनर्तपासणी केली."

ह्या मोठ्या शोधाची माहिती दिल्यावर मात्र प्रिन्सेप मागे सरकला. त्याने सोसायटीला सांगितले की तो आधी क्रमांक १ चे छपाईचे खिळे तयार करीत आहे व ते तयार झाल्यावरच तो फिरोजशहाच्या स्तंभाचे पूर्ण भाषांतर देईत्त. सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांच्या समाधानासाठी मग त्याने काही छोटे छोटे भाग त्यांना सांगितले. त्याने सांगितले की क्रमांक १ ची भाषा "मागधी... मूळ भाषा जिच्यावर अधिक जटील संस्कृत आधारित होती. काळजीपूर्वक बघितल्यावर हे लक्षात येते की प्रत्येक मूळाक्षर हे संस्कृतच्या मूळाक्षराशी सुसंगत होते, केवळ देवनागरीच नाही तर, कनौज, पालि, तिबेटन, हत्ल कॅनरा (प्राचीन कन्नड) आणि संस्कृतपासून उत्पन्न सर्व भाषांच्या लिपी..."

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर क्रमांक १ ही मगधांची लिपीबद्ध भाषा भारतातल्या बहुतेक भाषांची पूर्वज होती. डावीकडून उजवीकडे लिहितल्ली जाणाऱ्या ह्या भाषेतल्या तिच्या बाराखडीत तेहतीस मूळाक्षरे होती-- प्रत्येक मूळाक्षर एका व्यंजनापासून त्याच्या अस्वरसंधीने बनलेले, इतर स्वर मूळाक्षराला काना-मात्रा देऊन बनलेले, स्वर सुरुवातीला असले तरच त्यांना स्वतःचे अक्षर, ही लिपी त्यावेळच्या लोकप्रिय भाषा प्राकतला (संस्कृतच्या आधीची भाषा) लिखित स्वरूप देण्यासाठी बनली होती. सुर्वातीला प्रिन्सेपने तिचे "भारतीय पालि" असे नामकरण केले पण पुढे त्याला लक्षात आले की पूर्वीच्या ब्राह्मणांनी तिला ब्राह्मी असे नाव दिले होते. आज ती ब्राह्मी म्हणूनच ओळखली जाते व तिच्या सर्वात प्राचीन रूपाला अशोकाची ब्राह्मी म्हटले जाते.

एकदा ब्राह्मी लिपीचा बोध झाल्यावर प्रिन्सेपने त्वरीत यशस्वीपणे सांची स्तूपावरील तेवीस दानांच्या नोंदींचे भाषांतर केले आणि दान देणाऱ्यांची नावे ओळखली. त्यानंतर अनेक ह्विभाषिक इंडो-बॅक्ट्रीयन नाण्यांवरील -- एका बाजूला ग्रीक (यवन) तर दुसर्यार बाजूला क्रमांक १-- अक्षरांचे भाषांतर केले. नंतर बोधगयातीतत अनेक छोट्या शिलालेखांचे भाषांतर केल्यावरच प्रिन्सेपला वाटले की आता तो फिरोजशहाच्या स्तंभलेखाला हात घालायला हरकत नाही, त्याच्या पहिल्या पंधरा अक्षरांच्या वाक््यां शापासून सुर्वात करून जो दि १, अलाहाबाद, गिरनार, धौली व इतरत्र सर्व स्तंभावरील लेखांच्या जवळ जवळ प्रत्येक परिच्छेदाच्या सुरवातीला आढळत होता. "नेहमी येणारे रूप जे माझ्या मूळाक्षरांप्रमाणे असे आहे"--



देवानांपिय पियदसी लाजा हेवं आह

लाजा शब्दाने प्रिन्सेप व त्याचा पाली जाणणारा सिंहली सहायक रतनपाल सुरूवातीला गोंधळले पण लवकरच त्यांच्या लक्षात आले की हे स्थानिक बोलीभाषा लिहिण्याच्या सवयीमुळे झाले होते व अपेक्षित शब्द राजा होता. अशा प्रकारे त्यांनी “देवानांपिय पियदसी राजा” असे लिप्यंतर केले. शेवटचे शब्द, हेवं आह म्हणजे असे म्हटला, सर्व मिळून झाले ते असे--देवांना प्रिय प्रियदर्शी राजा असे म्हटला.

प्रिन्सेप म्हटला की हे शब्द सरळसरळ राजाज्ञा दर्शवित होते. “ह्या शब्दांचे साधे रूप आपल्या धर्मग्रंथातील शब्दप्रयोग दर्शवित होते; जसे, 'पैगंबर असे म्हट्ला' किंवा पर्शियन सम्राटाचा जाहीरनामा 'पर्शियाचा राजा सायरस असे म्हटला”.

प्रिन्सेपला वाटले की ही शाक्यमुनी बुद्धासारख्या कुण्या थोर समाजसुधारकाची शिकवण होती. पण दुसऱ्या वाक्याच्या भाषांतराने हे स्पष्ट झाले की हे शब्द फक्त राजाचेच असू शकतात, कारण त्या वाक्याची सुरुवात होती सद्दाविसती वस अभिसितेनामे--माझ्या राज्याभिषेकाच्या सत्ताविसाव्या वर्षी -- ज्याची शिलालेखात इतरत्र चार जागी पुनरावृत्ती झाली होती.

मग प्रिन्सेपला प्रश्न पडला की हा राजा कोण-- स्पष्ट होते की हा अत्यंत बलशाली राजा होता कारण “त्याच्या राजाज्ञा सर्व भारतभर पसरल्या होत्या” री प्रिन्सेपच्या माहितीनुसार अकबर सोडला तर कुण्याही भारतीय राजाचे स्तंभालेख व शिलालेख पसरलेल्या इतक्या विशाल भूप्रदेशावर साम्राज्य नव्हते. त्याने भारतातील सर्व हिंदू वंशावळी तपासल्या होत्या व त्याला टेवानांपिय पियदसी (देवानांप्रिय प्रियदर्शी) अशा नावाचा कुणीही राजा सापडला नव्हता.

या नावासाठी एकच उमेदवार दिसत होता पण तो भारताबाहेरचा होता. “रर्नोच्या Epitome of Ceylonese History मधे आपल्याला एकदा व फक्त एकदा देवानांपियतिस्स राजाचे नाव येते जे की या नावाशी बरेच मिळतेजुळते आहे.” जॉर्ज ट्नोच्या महावंसाच्या भाषांतरात हा लंकेचा राजा देवानांपियतिस्स कसा भारताच्या सम्राट धर्माशोकाच्या (जो मौर्य रांजा अशोकच असणार) प्रयत्नांनी बुद्धानुयायी झाला होता ह्याचे वर्णन होते. “हा लंकेचा राजा तर ह्या शिंलालेखांचा निर्माता नव्हता? या देवानांपियतिस्सने

त्याच्या नवमताच्या उत्साहात त्याच्या नव्या धर्माची शिकवण टूरटूरपर्यंत पोहचवली तर नव्हती?"

ऑगष्ट १८३७ मधे झालेल्या एशिंयाटीक सोसायटीच्या सभेत जेम्स प्रिन्सेपने फिरोझशहाच्या स्तंभाचे पूर्ण भाषांतर प्रस्तुत केले. त्याने सांगितले की त्याच्या मते "देवानांपियतिस्स या लंकेच्या राजाने आपण जुन्या मान्यता सोडून बुद्धमत स्वीकारते हे जाहीर करायला ही बौद्ध धर्माच्या संदेशांची शृंखला निर्माण केली होती".

जरी हे शिंलालेख शाक्ियधपुनी बुद्धाचा स्पष्ट निदेश करत नसले तरी त्यांचा संबंध सरळ बुद्धविचारांशी होता. माळेतील धाग्याप्रमाणे धर्म हा शब्द त्या पूर्ण लेखांत दिसत होता. "नेहमी धम्म किंवा धर्म याचा निर्देश होता." प्रिन्सेपने धर्माचे भाषांतर काहीशा चुकीने नैतिकता किंवा '२७॥9101? असे केले. ह्या लेखांचा गाभा होता धर्म-संदेश पण हे सुद्धा स्पष्ट होते की त्या लेखामागील ताकद ज्याचे नाव दि च्या लेखात थोडेथिडके नव्हे तर सोळा वेळा आले होते त्या लेखकांची होती. "असे वाटते की लेखाचा मुख्य रोख दुसर्यां ना सदाचरणाची शिकवण देण्यापेक्षा सारखे एस मे कते (मी असे केले) असे म्हणत लेखकाच्या गुणांना प्रकाशित करण्याचा असावा."

प्रिन्सेपने हा उत्तगडा केला की त्याच्याकडील सात आदेशांपैकी ज्याला आज स्तंभलेख १-७ म्हणतात तो पहिला आदेश फिरोझशहाच्या स्तंभाच्या उत्तरेकडील बाजूला कोरला होता. येथे तीन वेगवेगळ्या भागात मजकूर कोरला होता ज्याच्यापैकी प्रत्येकाची सुख्वात अशी होती, "देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे म्हटला." चौथा आदेश पश्चिमेकडील बाजूस, पाचवा दक्षिणेस, सहावा पूर्वेस आणि सातवा व सर्वात मोठा पूर्वेच्या भागात सुरू होऊन पूर्ण स्तंभाला वेढलेला होता.

"देवांचा प्रिय प्रियदर्शीं राजा असे सांगतो की" अशी सुख्वात असलेल्या स्तंभलेख २ चे प्रिन्सेपने भाषांतर केले पण ते फारसे अचूक नव्हते. प्रिन्सेप व रतनपातलल दोहोंनाही अनेक वाक्यांचा अर्थ कळला नव्हता असे त्यांच्या भाषांतराची आधुनिक भाषांतराशी तुत्तना केली तर स्पष्ट होते. मराठी वाचकांसाठी येथे आधुनिक भाषांतर दिले आहे आणि प्रिन्सेपचे मूळ भाषांतर इंग्रजी परिशिष्टात दिले आहे.

राज्याभिषेकानंतर सव्वीसाव्या वर्षी मी हा धर्मलेख लिहिला. इहलोक व परलोकांत सुखप्राप्रि धर्माविषयी खरे प्रेम, तीव्र आत्मपरिक्षण, खूप आदर, (पापाबद्दल) आत्यंतिक भय आणि अतीव उत्साह यांच्याशिवाय शक्यक नाही. माझ्या शिंकवणुकीने धर्माविषयीचा आदर आणि प्रेम दिवसेंदिवस वाढले आहे आणि यापुढेही वाढतच जाईल. माझे उच्च, मध्यम, खालच्या पदांवस्चे अधिकारी धर्माचे पालन करतात, धर्मानुख्प वागतात; आणि ते इतरांनाही मार्गदर्शन करण्यास समर्थ आहेत. सीमाप्रदेशातीत्त महामात्यही तसेच करत

आहेत. माझ्या ह्या सूचना आहेत-- धर्माचे पालन करावे, धर्माद्वारे सुख द्यावे आणि धर्मानुसार रक्षण करावे.

दुसर्याम स्तंभलेखाचे भाषांतर सोपे होते. त्यातही धर्माचे निरूपण होते. प्रियदर्शी राजाने येथे धर्माचा अर्थ सदाचरण व सत्कृत्य असा केला होता. प्रिन्सेपने भाषांतर केले सत्कृत्य म्हणजे "अनेक कृत्ये टाळू नये--करूणा व दान, शुद्धता व पाकित्रय." प्रियदर्शी राजाने स्वतः "गरिब व रूग्णांसाठी, हरिपाद व चतुष्पाद प्राण्यांसाठी, हवेतीत्त पक्षी व जलचरांसाठी अनेक कल्याणकारी कामे केली होती". शेवटी त्याने ह्या लेखांमागची भूमिका मांडली होती, "सर्वांनी ध्यान द्या, आणि ह्या आदर्शाप्रमाणे वागा. ते चिरकाल टिकेल. जो या आदर्शानुसार वागेल त्याला अनंत सुख मिळेल."

जेम्स प्रिन्सेपचे स्तंभलेखांचे भाषांतर येथे दिलेले नाही. सातव्या स्तंभलेखाच्या शेवटच्या वाक्याच्या भाषांतरात मात्र प्रिन्सेपला लेखकाच्या संदेशाचा गाभा पकडता आला की लेखकाला हा संदेश भावी पिढ्यांनी वाचावा असे वाटे.

हे ह्यासाठी केले आहे की हे माझ्या मुलांसाठी, मुलांच्या मुलांसाठी-- सूर्य-चंद्र असेपर्यंत टिकावे. त्यांनी हे लक्षात घ्यावे व त्याचे पालन करावे-- आणि त्याविषयी आदर व सन्मान बाळगावा. मी माझ्या राज्यारोहणाच्या सत्तावीसाव्या वर्षी हा लेख लिहून घेतताा आहे-- असे देवांचा प्रिय म्हणतो, "पाषाणस्तंभ उभे करा व त्यांच्यावर हा धार्मिक संदेश कोरा, जेणेकरून दूर भविष्यातही तो टिकून राहीत्त".

याचे आधुनिक भाषांतर अधिक अचूक पण इतकेच हृदयस्पर्शीं आहे. (परिशिष्ट पहा.)

प्रिन्सेपचा ब्राह्मी (क्रमांक १) लिपीचा शोध, त्याचे सांचीच्या दानाविषयीच्या नोंदींचे भाषांतर व फिरोझशहाच्या स्तंभाच्या सात स्तंभलेखांचे भाषांतर इतक्या गतीने आले की इतर प्राच्यविद्या अभ्यासकांना काहीही उसंत मिळाली नाही. पण प्रिन्सेपने जुलै JASBच्या अंकात देवांचा प्रिय राजा प्रियदर्शी हा लंकेचा राजा देवानांपियतिस्स असा (खूप ठाम नाही) दावा केल्यानंतर लगेच कोलंबोहून जार्ज टनोरने नाट्यमय प्रतिसाद दिला.

ट्नोरने लिहिले, "मी एक अत्यंत महत्त्वाचा शोध लावला आहे. माझ्या Epitome च्या प्रस्तावनेत मी लिहिले आहे की १८१२ मधे जार्ज नोदारीस, मुदलियार (दालचिनि विभागाचा प्रमुख व तेव्हाचा एक बौद्ध भिक्षु) यांनी सयामहून सिलोनला पालि ग्रंथांचा एक मौल्यवान संग्रह आणत्ला होता." यात एक ग्रंथ होता दीपवंस ज्याच्यावर महावंसाच्या सुरूवातीच्या इतिहासाची माहिती आधारित होती. पण दीपवंसची माहिती ही महावंसापेक्षा अधिक विश्वसनीय होती. टनोरने महावंसाचे भाषांतर केले होते. दीपवंसाची पाने चाळतांना

टनोरने एक परिच्छेद वाचत्ता ज्याने पियदसी (प्रियदशशी) कोण होता याबाबत नवी माहिती मिळाली. तो परिच्छेद होता, “बुद्धाच्या महापरिनिब्बानाच्या दोनशे अठरा वर्षांनी पियदस्सी... ...चंद्रगुप्ताचा नातू व बिंदुसाराचा पुत्र, जो त्यावेळी उज्जैनचा शासक होता”.

हा ट्नोंरचा शोध होता-- फिरोझशहाच्या स्तंभाचा देवांचा प्रिय राजा प्रियदर्शी हा लंकेचा देवानांपियतिस्स नसून त्याचा समकालीन मौर्य सम्राट अशोक होता. मिशनरी विल्यम फॉक्सने असाच निष्कर्ष त्याआधी चार वर्षे काढला होता पण त्याला त्याची पावती न मिळताच तो मृत्यु पावला होता. त्यामुळे जॉर्ज टर्नोर्वर स्तुतिसुमने उधळली गेली. ते योग्यही होते. अशा प्रकारे स्तंभलेख व शिलालेखांचा खरा लेखक अशोक मौर्यच होता यात कुठलीही शंका राहिली नाही-- भारताच्या हरवलेल्या इतिहासाच्या कोड्याच्या उत्तरातील एक मैलाचा दगड प्रकाशात आला.

प्रिन्सेपने JASB च्या ऑगष्ट अंकात पुढील शोध प्रकाशित केला--त्याने गयेच्या उत्तरेकडीत्त नागाजुंनी गुफातीलत दोन लेखांच्या नकलांवखून त्यांचे भाषांतर केले होते. ह्या विल्यम हॅरिंटनच्या नकला होत्या, ज्या त्याआधी चाळीस वर्षे धूळ खात पडल्या होत्या. हे लेखही ब्राह्मीत होते आणि इतरांसारखेच होते. पण एकीचा निदेश ब्राह्मणाची गुफा तर दुसरीचा गवळ्याची गुफा असा होता. प्रिन्सेपच्या भाषांतरानुसार “देवांना प्रिय दशरथाने त्याच्या राज्याभिषेकानंतर त्गेच” त्या बौद्धांच्या सर्वात श्रद्धाळू संप्रदायाला दिल्या होत्या. दशरथाने तेच बिरूद वापरले होते जे अशोकाने वापरले होते. दुसरे असे की दशरथाचे नाव अनेक पुराणांच्या वंशावळीत होते. “पुराणांच्या वंशावळीत पाहता आपल्यातला बौद्ध धर्माच्या आश्रयदात्या अशोकाच्या खालील नावाच्या खाली दशरथाचे नाव दिसते.” यावरून हा निष्कर्ष निघतो की अशोकाच्या नातवाने मगधावर राज्य केले होते आणि कदाचित त्याच्याशी नाते दर्शविण्यासाठी त्याचेच बिरूद वापरते होते.

त्या वर्षाच्या अखेरीस मार्खम किट्टोने धौलीच्या शिलालेखाची अधिक चांगली प्रत कोलकात्याला पाठविल्यावर प्रिन्सेपने 'शोधांच्या शुंखलेतीत्त अजून एक दुवा? जाहीर केला. प्रिन्सेपच्या वतीने किट्टोलला एक अधिक चांगल्या प्रतीची नकतत काढायला सांगण्यात आले होते. हे सहजसाध्य नव्हते. त्यात्त्ता त्या अस्वलीच्या पि ना, जे आता मोठे झाले होते, परत सामोरे जावे लागलेच पण शिलालेखाची प्रत घासून तयार करतांना तो पडला होता. “नकलेच्या कामात मी इतका गर्क झालो होतो की माझ्या पायाखाली भक्कम आधार नाही हे मी विसरलो. माझा सेवकही झोपी गेला व त्यानेही माझा आधार काढून घेतला. परिणाम असा की माझा तोल गेला व मी सरळ डोक्यावर खाली आदळलो.”

ही उत्कृष्ट दर्जाची नकल प्रिन्सेपकडे पोहोचली तेव्हा तो गिरनारच्या लेखाच्या अचूक नसलेल्या समक्ष प्रतीचे (eye copy) वाचन करत होता. “मी गिरनारच्या लेखात चाचपडत होतो. तोही स्तंभलेखांप्रमाणे अशोकाचे आदेश होते... जेव्हा मी कटक (धौली) येथील शिलालेखाची प्रत हाती घेतली तेव्हा किट्टो त्याची लिथोग्राफीक प्रत माझ्या

जर्नलसाठी तयार करीत होता. गिरनारचा आणि धौलीचा शित्लालेख बव्हतांश सारखेच होते हे पाहून मी आश्चर्यचकीत व हर्षविभोर झालो.''

हे दोन महान शिलालेख भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यांवर असून व त्यांच्यात नऊशे मैलांचे अंतर असूनह्दी जवळजवळ सारखाच संदेश देत होते. प्रिन्सेपने लिहिले, ''पहिल्यापासून दहाव्यापर्यंत ते सारखेच होते.'' यानंतर त्यांच्यात फरक पडतो. गिरनारमधे तीन आदेश आहेत जे धौलीत नाही तर धौली शिलालेखात दोन आदेश असे आहेत जे गिरनारमधे नाही. अशा प्रकारे गिरनारतला आज ज्यांना बृहद शिलालेख १-१४ म्हटले जाते ते आदेश आहेत तर धौलीता यातील १९ ते १३ नाहीत. तेथे दोन वेगळे लेख आहेत, वगळलेले वा स्वतंत्र आणि २ (SRE 1 and 2). मार्खम किट्टोच्या घौलीच्या दोन प्रतींमुळे प्रिन्सेपच्या हे लक्षात आले की त्याला जी नकलेची चूक वाटत होती ती प्रत्यक्षात चूक नसून दोन शिलालेखांच्या भाषेतील फरक होता, त्या एकाच प्राकृतच्या दोन स्थानिक बोलीभाषा होत्या.

गिरनार व धौलीचे शिलालेखांची तसेच फिरोझशहाचा स्तंभ व गंगेच्या खोऱ्यातील इतर स्तंभांची शेली सारखी होती व त्यांचा शाही लेखक एकंच होता; पण त्यांचा मसुदा व निर्मितीचा काळ भिन्न होता.

फिरोझशहा स्तंभ व इतर स्तंभलेख जाहीर करत होते की ते राज्यारोहणाच्या सव्वीस वर्षांनंतस्चे होते; तर गिरनारच्या व धौलीच्या तिसऱ्या लेखाची सुरूवात होती, ''देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे म्हणतो. माझ्या राज्यारोहणाच्या बारा वर्षांनंतर ही आज्ञा केली जात आहे.'' दुसर्यां शब्दात सांगायचे तर शिलालेखांची निर्मिती ही स्तंभलेखांच्या चौदा वर्षे आधी झाली होती.

प्रिन्सेपच्या हेही लक्षात आले की गिरनार व धौलीचे लेख स्तंभलेखांपेक्षा कमी दर्जाचे होते. इतके की कधी कधी ते अव्यवस्थित वा अस्ताव्यस्त वाटत होते. जणू काही त्यांचा मजकूर पूर्वनियोजित सुसंगत विचार न करता सांगितता होता. त्यात अनेकदा पुनरावृत्ती होती व विषयांतरही. अशा प्रकारची विसंगती की सांगणारा जणू हुकूमशहा होता आणि धर्माच्या खऱ्या स्वरूपाबद्दल व त्यांचा अंमल कसा करावा याबद्दल त्याला स्पष्ट क ना नव्हती. ह्या त्याच्या गोंधळलेला स्थितीमुळे प्रिन्सेपचे भाषांचराचे काम अधिक अवघड झाले होते.

पहिल्या बृहद शिंलालेखाची सुरूवात साधी होती-- ''देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याने हा धर्मादेश लिहून घेतला''. त्यानंतर त्याने सर्व प्रकारच्या जीवहत्येवर बंदी घातली, उत्सवांमधील प्राणीहत्याही वर्ज्य केली. एक गमतीदार बाब अशी की ह्यात अशोकाच्या स्वतःच्या चवीबद्दल व त्याच्या मांसाहार सोडण्याबह्दलच्या अनिच्छेबइ्दल माहिती मिळते. (भदंत श्रावस्ती धम्मिकाच्या भाषांतरावर आधारीत.)

माझ्या राज्यात कुठल्याही प्राण्याला मारू नये वा त्याचा बळी दिला जाऊ नये. उत्सवांचे आयोजन करू नये कारण देवांना प्रिय राजा प्रियदर्शीत्ता या उत्सवात बरेच दोष दिसतात, जरी हे खरे असले की काही उत्सव देवांना प्रिय राजा प्रियदर्शील्ला योग्य वाटतात. पूर्वी देवांना प्रिय राजा प्रियदर्शीच्या पाकशाळेत रोज लाखो जीव मारले जायचे. आता रोज फक्त दोन मोर व एक हरीण मारले जाते. त्यातही कधी कधी हरीण मारले जात नाही. पुढे हे तीन प्राणीही मारले जाणार नाहीत.

सर्व प्राण्याचा सन्मान (जीवहत्या वर्ज्ये करून) हा त्याच्या नंतरच्या अनेक आदेशांचा एक भाग होता. शिलालेख २ मधे मनुष्य व प्राणी दोहोंना वैद्यकीय मदत, नव्या विहिरींचे खोदकाम तसेच प्रजेच्या सोयीसाठी रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण यांचा उ 'ख आहे. शिलालेख ३ मधे प्रजेने माता-पित्याचा सन्मान करावा, इतरांच्याप्रति दातृत्व दाखवावे व संयमी जीवन जगावे असा आदेश होता. काहींचा सूर व्यक्तिगत होता, कधी कधी तर काहीसा विक्षिप्तही. शिलालेख ६ मधे लिहिले होते की राजाला सर्वकाळ सर्व बातम्या दिल्या जाव्यात.

पूर्वी राज्यकारभाराची कामे वेळेवर होत नसत व राज्याची वित्तंबातमी सर्वकाळ राजाला मिळत नसे. पण आता मी अशी आज्ञा दिली आहे की केव्हाही, मी जेथे असेल तेथे-- जेवत असलो तरी, अंतःपुरात असलो तरी, शय्यागृहात असलो तरी, रथात असो वा पालखीत, उद्यानात वा इतस्त्र कुठेही-- बातमीदारांनी मतला येऊन प्रजेच्या संदर्भातील कुठलीही बाब असेल तरती माझ्या निदर्शनास आणावी जेणेकरून मी प्रजेचे काम सर्व ठिकाणी करु शकेल.

तरीही या सर्व आदेशांचा मुख्य मुद्दा धर्माचे पालन हा होता. शिंत्तालेख ११ मधे धर्माची आध्यात्मिक नाही तर प्रायोगिक व्याख्या केली आहे.

धर्माच्या दानासारखे दुसरे दान नाही. धर्माच्या सोबतीसारखा दुसरा सखा नाही. धर्माच्या औदार्यासारखे दुसरे औदार्य नाही, धर्माच्या नात्यासारखे दुसरे नाते नाही. धर्म म्हणजे काय --दास व सेवक यांच्याशी उचित वर्तन; माता-पित्याची सेवा; सखेसोबती, नातेवाईक, श्रमण-ब्राह्मण यांना दान आणि जीवहत्या न करणे. म्हणून पिता, पुत्र, मालक, मित्र, सहचर व शेजारी यांनी म्हणावे; हे कल्याणकारी आहे, असे करावे. धर्माचे दान देणाऱ्याचे इहलोकी व परलोकी दोन्हीकडे कल्याण होते.

त्याच्या राज्यारोहणाच्या दहाव्या वर्षानंतर त्यात्ता मिळालेल्या शिकवणुकीनुसार अशोक धर्माचा प्रसार स्वतःच्या राज्यात व राज्याबाहेरही करत होता. हा विषय होता शिलालेख ८ चा-- “पूर्वी राजे मौजमजेसाठी सहलींवर जात असत; त्यांत शिकार व इतर मनोरंजन होत असे. पण देवांना प्रिय राजा प्रियदर्शी त्याच्या राज्यारोहणाच्या दहा वर्षांनंतर संबोधिच्या यात्रेवर गेला व अशाप्रकारे त्याने धर्मयात्रा सुरू केल्या.” संबोधिचा अर्थ अशोक शाकक्ृयामुनी बुद्धाच्या संबोधिच्या ठिकाणी बोधगयेत्ा गेला असा असू शकतो किंवा कदाचित त्याला बुद्धाची शिंकवण मिळाली असाही असू शकतो. कसेही असो, हा वादातीत पुरावा होता की अशोकाला बुद्धाची शिकवण मिळाली होती.

शिलालेख ५ वरून आपल्यातला कळते की धर्मप्रसाराच्या कामासाठी अशोकाने एक विशेष अधिकारी वर्ग तयार केला होता ज्याला धर्म महामात्र (धर्म अमात्य) म्हणत. त्यांची नेमणूक राज्यारोहणाच्या तेरा वर्षांनंतर सुरू झाली आणि त्याच्या साम्राज्यात व बाहेरही “ते ग्रीक (यवन), कंबोज, गांधार, राष्ट्रीक, पिटिनिक व इतर पश्चिमेच्या लोकांकडे काम करतात”.

हे धर्म अमात्य सर्व धर्मांत-संप्रदायात काम करीत. सर्वात छोट्या शिलालेख ७ चा विषय धार्मिक सहिष्णुता आहे. "देवांना प्रिय राजा प्रियदर्शींची मनीषा आहे की सर्व धर्मांनी (धर्माच्या लोकांनी) सगळीकडे रहावे, कारण सर्व धर्म आत्मसंयम व चित्तशुद्धीची शिकवण देतात. पण लोकांच्या वेगवेगळ्या आशाआकांक्षा असतात व त्यामुळे त्यांनी वांच्छीत सर्व काही किंवा त्यातील काही भागाचे पालन करावे.”

हे श्रद्धा व उपासनेचे स्वातंत्र्य हा शितलालेख १२ (गिरनार) चा विषय होता ज्यात सर्व प्रकारच्या धार्मिक कार्याला उत्तेजन दिले होते. “इतर संप्रदायांची शिकवण ऐकावी व तिचा सन्मान करावा”. पुढे हा आदेश म्हणतो, “देवांना प्रिय राजा प्रियदर्शी त्याला दिल्या जाणाऱ्या भेटवस्तू वा इतर सन्मानाला महत्त्व देत नाही. त्याला असे वाटते की सर्व संप्रदायांच्या तत्त्वांची वृद्धी व्हावी”.

शिंलालेख १४मधे ही माहिती दिली होती की अशोकाचे शित्तालेख कशाप्रकारे लिहिले गेले होते. प्रिन्सेप म्हणतो, “हे एक प्रकारचे सरतेशेवटी सारांश सांगणे होते. आपल्यातला कळते की हा सर्व लेख एकाच वेळी राजाज्ञेनुसार ज्याचे नाव आता नीट वाचता येत नाही अशा कुणी लिपिकाने तयार केलेल्या मूळ अस्सत्त दस्तावेजावरून कोरण्यात आला. हे उ खनीय आहे की तंतोतंत हेच शब्द कटक (धौली) येथील पाषाणावर सापडतात.” शिलालेख १४ मुळे प्राच्यविद्या अभ्यासकांना एक प्रकारे इशारा मिळाला की असे अनेक शिलालेख अजून सापडायचे होते.

देवांना प्रिय राजा प्रियदर्शीने हे धर्मलेख काही संक्षिप्त, काही मध्यम आकाराचे तर काही विस्तृत स्वरूपात लिहिले आहेत. सगळे सर्व ठिकाणी सापडणार नाही, कारण माझे

साम्राज्य अतिविशाल आहे; पण अनेक लिहिले गेले आहेत आणि मी पुढेही अनेक लिहवून घेणार आहे. येथे काही विषय पुनःपुन्हा मांडले आहेत कारण ते मधुर आहेत, कारण लोकांनी त्यांच्यानुसार वागावे. जर काही अपूर्ण असतील तर ते तेथील स्थानामुळे किंवा विषयाचा आशय लक्षात घेऊन किंवा लिपिकाच्या गलथानपणामुळे.

पण हे सर्वकाही नव्हते. प्रिन्सेपला पियदसी (प्रियदर्शी) याच्या खर्या ओळखीबाबत अत्याधिक उत्साहवर्धक असण्याचे कारण मिळाले. ते म्हणजे शिंलालेख २ व १३ (गिरनार) मधे लपलेल्या ऐतिहासिक नोंदी.

शिलालेख रचा विषय आहे राजा प्रियदर्शीद्वारा उपलब्ध केली गेलेली वैद्यकीय सेवा त्याच्या राज्यातच नव्हे तर राज्याबाहेर पश्चिमेच्या शेजारी राज्यातही होती. प्रिन्सेपने भाषांतर केले, “राजा प्रियदर्शीने जिंकलेल्या सर्व प्रदेशात तसेच इतर श्रद्धाळूंनी व्याप्त भागात जसे चोल, पिड, सतियपुतञ्न आणि केरत्तपुत्र, अगदी तरम्बपत्रीपर्यंत (ताप्रपर्णीपर्यंत)-र्य्बरोबस्व ग्रीक एटिओकसच्या राज्यात, जेथे एटिओकसचे सेनापती शासन करतात--सर्वत्र, स्वर्गातही, प्रिय राजा प्रियदर्शीची दुहेरी वैद्यकीय सेवा उपलब्ध होती.”

चोळ व पांड्य (पिड) ही दक्षिण भारतातील राजघराणी होती तर सतियपुत्र व केर्लपुत्र हे भारताच्या पश्चिम किनारपट्टीच्या दक्षिण भागात होती. तम्बपत्नी तप्रोबन होते--हे सिलोनचे (श्रीलंकेचे) प्राचीन नाव होते. त्यानंतर शब्द होते 'अंतियोक नामे योन लाजाय'. यांचा प्रिन्सेपने अर्थ लावला ग्रीक राजा एटिओकस. त्याने लगेच असे गृहीत धरले की हा ग्रीको-पर्सियन (यंवन-इराणी) एटिओकस सोटर होता ज्याने चंद्रगुप्तावर ह 1 केला होता व त्यात तो हरता होता. त्याचा पिता सेल्युकस निकेटरच्या हत्येनंतर इ.पू. २८१ मधे एटिओकस रांजगांदीवर बसला व इ.पू. २६१ मधे त्याच्या मृत्युपर्यंत त्याच्या आक्रसत गेलेल्या राज्यावर त्याने अंमल केला.

पण सर्वात विस्मयजनक उलगडा झाला तो गिरनारच्या शिलालेख १३ मधे. त्यात अशोकाने त्याच्या राज्यारोहणाच्या आठव्या वर्षात नृशंस युद्धानंतर कलिंगावर मिळवलेल्या विजयाचा उ ख होता. मेगास्थेनिसच्या India वर्न प्रिन्सेपला कलिंग नाव परीचित होते. हे प्रिन्सेपच्या काळात ओरिसा म्हणून ओळखले जाणारे मध्य-पूर्व भारतातील प्राचीन राज्य होते. मेगास्थेनिसने लिहिले होते की चंद्रगुप्ताच्या काळात कलिंगची राजधानी पार्थालिस होती व तिच्या रक्षणार्थ जी विशाल सेना होती तिच्यात साठ हजार पायदळ, सातशे युद्ध-हत्ती व एक हजार घोडेस्वार होते. गिरनारच्या शिलालेखाप्रमाणे कलिंग सैन्य अशोकाच्या सेनेपुढे टिकाव धरू शकले नाही व अशोकानेच दिलेल्या कबुलीनुसार अशोकाच्या सेनेने कोणतीही दयामाया दाखवली नाही. हा शिलालेख

सुचवतो की ह्या नृशंस नरसंहारामुळे अशोकाला इतके क्लेश झाले की तो बुद्धानुयायी झाला. हे तपशीलवार सांगण्यात आले आहे. (पूर्ण लेखासाठी परिशिष्ट पहा.)

राज्यारोहणानंतर आठ वर्षांनी देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याने कलिंग देश जिंकला. या युद्धात दीड लाख देशोधडीला लागत्ते, एक लाख मारले गेले व यापेक्षा कितीतरी अधिक इतर कारणांनी मृत्यु पावले. कलिंगविजयानंतर देवांना प्रिय धर्मभीरू झाला, तो धर्मकार्य व धर्मानुशासन यांत रमू लागला. आता देवांना प्रियत्ता कलिंगविजयाबद्दल अत्यंत पश्चाताप होत आहे...

आता हे स्पष्ट झाले की हा लेख धौलीच्या पाषाणावर का कोरलेला नव्हता-- कलिंगाच्या जनतेच्या भावना (त्या पराजयाची आठवण देऊन) दुखवू नये असे अशोकाच्या (आता भावूक झालेल्या मनातला) वाटत होते. ह्याचाही आता उलगडा झाला की धौलीजवळच्या नदीला दया? हे नाव का देण्यात आले.

शिलालेख १३ च्या शेवटी अशोकाच्या वंशजाना त्याचा आदर्श ठेवून अहिंसेच्या मार्गाने शासन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे (बुद्धांच्या उपदेशांच्या संकततनात *अदण्डेन असत्थेन* म्हणजे दण्डाशिवाय व शस्त्राशिवाय शासन करण्याचा आदर्श वारंवार येतो).

खरोखरच देवांना प्रिय राजा प्रियदर्शी सर्वाप्रति अहिंसा संयम व न्याय बाळगू इच्छितो, अगदी गुन्हा घडला असला तरी. आता देवांना प्रिय राजाला धर्मविजयच खरा विजय वाटतो... मी हा धर्मलेख ह्यासाठी लिहवून घेतला आहे की माझी मुले... खापर-पणतू यांनी नवीन मोहिमा काढू नये किंवा सैन्य मोहिमा काढल्याच तर संयम बाळगावा, तसेच कठोर शिक्षा देऊ नये किंवा त्यापेक्षाही उत्तम म्हणजे त्यांनी केवळ धर्मविजय मिळवावा कारण त्याचा त्लाभ इहलोकी व परलोकी अशा दोन्ही ठिकाणी होतो.

त्याच लेखाच्या मधल्या भागात अधिक बाबींची नोंद होती पण टोंडच्या १८२३ च्या भेटीनंतर एका श्रद्धाळू जैन साधुने गिरनार पर्वतावर जायचा रस्ता रुंद करण्यासाठी दाख्गोळा वापरून गिरनारच्या खडकाची बरीच नासधूस केली होती. त्या स्फोटाने शिलालेख १३ ची डावी बाजू भंगली होती. उर्वरीत भागावरून प्रिन्सेप केवळ एवढेच समजू शकला की भारतीय उपखंडातीत्त त्या सात राज्यांचा जेथे अशोकाने धर्मविजय मिळवला होता तसेच पश्चिम सीमेपतलतीकडील जेथे त्याने धर्माचा प्रभाव पाडला होता अशी 'सहाशे योजने टूरपर्यंत' (तीन हजार मैल) राज्यांचा उ 'ख होता. पाच विदेशी राजांचा उ 'ख होता

ज्यातीत्त आता फक्त दोनच नावे वाचता येण्यासारखी होती-- अशोकाचा मित्र एटिओकस व इजिप्तच्या टॉलेमींपैकी एक.

इतर तीन नावांची अनुपलब्धी प्रिन्सेपसाठी खूपच क्लेशकारक होती. तरीही एटिओकस व टोलेमीच्या (जे समकालीन असणार) उ 'खामुळे त्याला ह्या शिलालेखाच्या कालखंडाचा अंदाज करता आला. पहिले नाव त्याने इ.पू. २८९ ते २६ दरम्यान राज्य करणाऱ्या एटिओकस सोटरचे (सेल्युकस निकेटरचा पुत्र) गृहीत धरले. टॉलेमीही ह्याच कालखंडातील असणार. इजिप्तच्या टॉलेमिक घराण्याचा संस्थापक टॉलेमी ह्याने स्वतःला इ.पू. ३०५ मधे राजा घोषित केले होते. पण हा पहित्ता टॉलेमी इ.पू. २८५-२८३ मधे मृत्यु पावला होता--म्हणजे एटिओकसने त्याच्या पित्याच्या पश्चात गादी मिळवल्याच्या दोन वर्षे आधी. यामुळे शिंलालेखातीत टॉलेमी हा दुसरा टॉलेमी असणार, टॉलेमी दुसरा फितलाडेस्फोस, जो इ.पू. २८५/२८३ ते २४६ इजिप्तचा राजा होता. हा एंटिओकस राज्यावर आल्यापासून त्याच्या मृत्युपर्यंत (इ. पू. २८१ ते २६१) गादीवर होता. त्यामुळे हा शिलालेख इ. पू. २८१ ते २६१ याच काळखंडातला होता. आणि हा लेख अशोकाच्या राज्यारोहणाच्या नंतर बारा वर्षांनी लिहिला होता म्हणजे तो इ.पू. २९३ ते २७३ च्या दरम्यान मगधराज झाला होता.

हा कालखंड १७८९ मधे विल्यम जोन्सने अनुमान केलेल्या चंद्रगुप्ताच्या राज्यारोहणाच्या वेळेशी (इ.पू. ३१७ किंवा त्यानंतर तवगेच) जुळत नव्हता. चंद्रगुप्ताने चोवीस वर्षे तर त्यानंतर बिंदुसारने पंचवीस वर्षं राज्य केले होते. त्यानंतर म्हणजे इ.पू. २६& मधे अशोक राजा झाला. हे वर्षं प्रिन्सेपने निष्कर्ष काढलेल्या कालखंडाच्या सहा वर्षे नंतरचे होते.

प्रिनसेपने हे लक्षात घेतले नव्हते की दुसर्यार टॉलेमीनंतर तिसरा टॉलेमी व एंटिओकस सोटरनंतर दुसरा ऐटिओकस राज्यावर आता होता. एक पिढीनंतर व पूर्ण शिलालेखांच्या शोधानंतर अशोकाच्या ह्या तीन मित्रराजांची नावे कळली व नक्की कालखंड ठरवता आला.

अनेकविध प्रगतीत ही एक अपवादात्मक चूक होती. सन १८३८च्या वसंत क्रतुच्या सुर्वातीपर्यंत प्रिन्सेपच्या स्तंभ व शिंलालेखांच्या कामामुळे अशोकाशी संबंधित स्थूत्त कालगणना ठरवली गेली होती-- राज्यारोहणाच्या आठव्या वर्षी त्याने कलिंगवर स्वारी केली जेथील विध्वंसाने तो धर्माकडे वळला होता (शिलालेख १३). दहाव्या वषी त्याने धार्मिक स्थळांची यात्रा केली ज्यादरप्यान त्याने “श्रमण-ब्राह्मणांना भेटून दान दिले, वृद्धांना सोने दिले, ग्रामीण भागातील लोकांना भेटून धर्म समजावून सांगितत्तता आणि त्यांच्याबरोबर उचित धर्मचर्चा केली” (शिलालेख ८). बाराव्या वर्षी त्याने वेगवेगळ्या रुपात “बहुजन हिताय बहुजन सुखाय* धर्मलेख लिहून घ्यायला सुरव्वात केली जेणेकरून “त्यांचे पालन करून ते धर्मात पुष्ट होतील”. (शिलालेख ६). बाराव्या व तेराव्या वर्षी अशोकाने

धर्मदूतांचा एक संघ स्थापन केला ज्याची जबाबदारी साम्राज्यात व बाहेरही धर्मप्रसार करणे ही होती (शिलालेख ३, ५). सव्वीसाव्या व सत्ताविसाव्या वर्षी त्याने अधिक धर्मलेख लिहवून घेतले जे पाषाणावर नाही तर स्तंभावर कोरले होते. (स्तंभलेख १, ४, ५, ६व ७)

प्रिन्सेपच्या भाषांतरांनी हे निर्विवादपणे सिद्ध केले की हे सारे शिलालेख व स्तंभलेख एका सर्वशक्तिमान राजाने, मौर्य अशोकाने--ज्याला त्याची प्रजा देवांना प्रिय राजा अशी ओळखत असे, लिहून घेतले होते. ह्या आदेशांची शेली वैयक्तिक व काहीशी चमत्कारिक होती. तिच्यात पुनरावृत्ती होती व ती कधी कधी कठोर होती. पण एक नक्कीी हा राजा प्रजेशी दिलसे-हृदयापासून संवाद साधत होता. ह्या शिलालेखांवरून अशोकाचे विरोधाभासांनी भरलेले चित्र समोर येते-कुशाप्र बुद्धीचा, आत्मविश्वासपूर्ण, कौशल्याने सत्ता हाताळणारा आणि प्रजेवर पित्यासारखी देखरेख करण्यासाठी आपत्ती दैवी नियुक्ती असल्याचा समज असलेला. यात हे ही दिसते की तो खूप आध्यात्मिक होता. शील-सदाचारात; गरीबांच्या प्रति करूणा व त्यांना मदत करण्याच्या भावनेत; अपरिग्रह व संयमात; सर्व संप्रदायांच्या प्रति सहिष्णुतेत; जीवहिंसेच्या विरोधात; आत्मपरिक्षण, सत्य, मनःशुद्धी ह्या सदुणांत व सर्वात महत्त्वाचे म्हणजे धर्मप्रेमात आकंठ बुडालेला. थोडक्यात, हे लेख एका अह्वितीय आणि क्रांतिकारी शासकाने लिहिले होते.

केवळ धघर्मविजय, नैतिकतेने विजय--एका महाबतशाती सम्राटाने असे समजुतीचे, शांतिपूर्णं विचार मांडावे, इतकेच नव्हे तर ते आपल्या शासनाचा मूलाधार करावे हे अद्वितीय होते, वेगळे होते तसेच वेद् वा इतर तत्कालीन ग्रंथातील विचारांच्या पूर्णपणे विरोधात होते. अशोकाचे धार्मिक सहिष्णुतेचे आवाहन व त्यांची प्राणीहत्येवर बंदी हे ही तितकेच क्रांतिकारी होते. पहिल्यामुळे ब्राह्मण पुरोहितांच्या वर्चस्वाला धक्का बसला तर दुसऱयामुळे रक्तरंजित हिंसक यज्ञांना (जे तत्कालिन ब्राह्मणी परंपरेचा केंद्रबिंदू होते) मोठा फटका बसला.

'अशोकविधेचा' (Ashokan Studies) उगम १८३७ ह्या विस्मयजनक घडामोडींच्या वर्षात झाला आणि तिची पुढील वर्षींच्या हेमंत क्रतुपर्यंत खूप भरभराट झाली. पण सप्टेंबर १८३८ मधे प्रिन्सेपला मेंदूज्वरामुळे प्रचंड मस्तकशूळ उठला. त्तवकरच त्याच्या बौद्धिक क्षमतांचा हास झाला आणि त्यामुळे त्याची एक असहाय, मुका रुग्ण म्हणून इंग्लंडला रवानगी झाली. त्यानंतर सात महिन्यांनी तो लंडन येथे वयाच्या 'एक्केचाळीसाव्या वर्षीं मृत्यु पावला.

प्रिन्सेस मृत्युशय्येवर आहे हे माहीत नसल्यामुळे जॉर्ज टर्नोखे त्याला १८ ऑक्टोबर, १८३८ रोजी पत्र लिहिले होते. त्यातला त्याने JARS मधे प्रकाशित झालेला महावंसावरील आपला लेख जोडला आणि सांगितले की हा त्याचा शेवटचा लेख असेल--"थोड्याच दिवसात मी कँडीवरून कोलंबोला जाईन. माझ्या नवीन जबाबदाऱ्या, बौद्ध पंडितांपासून व


येथील ग्रंथालयांपासून दूर अंतर यामुळे मी पुढील काही काळ तरी ह्या विषयावर अधिक संशोधन करण्यास असमर्थ असेल.''

टनोरसाठी सुद्धा ही ताटातूट शेवटचीच होती. हिवतापग्रस्त ट्नोरने निवृत्ती स्वीकारली व १८४३ मधे इटलीत वयाच्या त्रेचाळीसव्या वर्षी त्याचा मृत्यु झाला.



ह्या खराब दर्जाच्या जेम्स प्रिन्सेपच्या छापात तो आजारी दिसतो--ह्याच आजाराने चार महिन्यांनी त्याचा प्राण घेतला. (Colesworthy Grant, Lithographic Sketches, 1850)

९. ब्रायन हॉजसनचा उपहार



सम्राट अशोकाने काठमांड्र खोऱ्यात पाटणच्या आसपास बांधलेल्या पाच स्तूपांपैकी मध्यवर्ती स्तूप. "Ashoka's temple —called Chillundeo—in the centre of Patun." सन १८५० ते १८६३च्या दरम्यान ब्रिटीश रेसिडेंसीतील डॉ. हेत्री ओल्डफिल्ड सर्जनने काढलेले जलरंगचित्र. (APAC, British Library)



सन १८५८ला इंग्लंडला परतल्याच्या नंतर काही वर्षांनी ब्रायन हौटन हॉजसन. लुईस स्टार्र- कान्झियानीने रंगवलेले व्यक्तिचित्र. याची तारीख माहीत नाही. यात बहुधा हौटन त्याच्या Indian Political Service च्या गणवेशात असावा पण यावर त्याचे Legion d'Honneur दिसत नाही. (National Portrait Gallery)

पूर्व हिमालयातून कांचनगंगेची हिमशिखरे पहाण्यासाठी सर्वोत्तम स्थान म्हणजे दार्जिलिंग शहराच्या वरील रत्न पाहणीची 1हणाचा टेकडी कोलकात्याच्या तलकात्याच्या इंग्रज अधिकाऱ्यांनी काऱ्यं । जेव्हा दार्जिलिंगची निवड उन्हाळी निवासासाठी केली तेव्हा ते ह्या टेकडीच्या जलपहार सोंडीवर रहायला गेले. तिला पेटलेली टेकडी म्हणत कारण वसंत क्रतुत तिच्यावरील र्होडोडेन्ड्ान वृक्षांना लाल फुलांचा बहर येत असे. येथे युरोपियन पद्धतीच्या इमारती बांधल्या होत्या ज्यांचा वापर दिडशे वर्ष भारतातील सर्वात जुन्या पब्लिक स्कूलपैकी एक सेंट पॉल्स करीत होते.

तेथील मालकाकडून पंच्याहत्तर एकर जागा विकत घेतल्यानंतर ही शाळा येथे १८६४ मधे येथे स्थलांतरीत झाली. मालकाचे घर मुख्याध्यापकाचे निवासस्थान झाले. आज त्याला रेक्टी म्हणतात. ही कदाचित दार्जिलिंगमधील आजही अस्तित्वात असलेली सर्वात जुनी इमारत आहे. हिचे मूळ नाव ब्रायनस्टोन आहे आणि १८५८ पर्यंत हे ब्रायन हॉटन होजसनचे घर होते.

अठराव्या शतकाच्या शेवटी व एकोणीसाव्या शतकाच्या आरंभी जे तीन आद्य भारतीय विघेचे अभ्यासक जन्मात्ता आले होते--जेम्स प्रिन्सेप, जॉर्ज टर्नोर व ब्रायन हॉँजसन-- त्यांच्यापैकी ज्याची तब्येत सर्वात नाजूक होती तो सर्वात जास्त जगला. हॉटन चौ्र्यावन्नव वर्षे जगला. तो साठीच्या शेवटी असतांना त्याचे वर्णन असे केले गेले, "उंच, सडसडीत घरंदाज माणूस, अक्कडबाज मिशा असलेला, पट्टीचा शिंकारी व म्हणून भल्या पहाटे उठणारा" पण तो उदास व कायम तक्रारीचा सूर असलेत्ता माणूस होता ज्याला असे वाटे की त्याचे संशोधन "चोरत्ने गेले किंवा उपेक्षित राहिले".

इंग्लंडच्या १८३८-४१ च्या पहिल्या अफगाण युद्धाच्या अपयशानंतर विशेष वजन वा अधिकार नसलेल्या लोड ऑकलंडच्या जागी लार्ड एलेनबरो भारताचा गव्हर्नर जनरल म्हणून आला. एलेनबरोता माहित होते की हेकेखोर राजकीय अधिकाऱ्यांनी लॉर्ड ऑकलंडचे मतपरिवर्तन केले होते. त्यामुळे त्याने त्यांचा प्रभाव कमी करायचे ठरवले. त्याने ब्रायन हॉजसनत्ता, जो तेव्हाही नेपाळचा ब्रिटीश रेसिडेंट होता, नेपाळच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याचा आदेश दिला. हॉजसनला वाटे की त्याचे नेपाळच्या राजदरबारात चांगले वजन आहे आणि ते तो योग्य प्रकारे वापरत आहे. त्याने अनेक वेळा मध्यस्थी करून किंवा गुप्त मसलतीद्वारे नेपाळमधील आक्रमक सैनिकी पक्षाचे ईस्ट इंडिया कंपनीशी युद्ध टाळले होते. होंजसनचा चरित्रकार सर विल्यम हंटर म्हणतो की त्या वेळी "त्याने राजकीय वर्तुळात उच्च वर्तुळामधे कायम होणाऱ्या काहीशा अन्यायाविरूद्ध जरा जास्तच जोरदार निषेध नोंदवला". त्याची शिक्षा म्हणून त्याची सिमल्यात्ला असिस्टंट कमिशनरच्या कनिष्ठ पदावर नेमणूक केली गेली. त्याने लगेच राजीनामा दिला आणि आपल्या सर्व कागद्पत्रांसहीत तो इंग्लंडला रवाना झाला. वाटेत तो अ समय फ्रांसमधे युजेन बुहनुफला भेटला व त्याने 00॥8696 १6 81८6 ला काही हस्तलिखिते भेट दिली.

पण होजसनचे आशियाशी प्रेमप्रकरण अजून संपायचे होते. मायदेशी स्थिरावू न शकल्याने एक वर्षाच्या आतच तो आपले संशोधन पुढे सुरू ठेवण्यासाठी आपल्या तरुण पत्नीबरोबर भारतात परतला. नेपाळमथे प्रवेश करायला बंदी असल्यामुळे तो दार्जिलिंगला गेला. येथे तो ज्या घरात राहिला त्याला त्याने ब्रायनस्टोन नाव दिले व तेथे तो मानवशास्त्राच्या (Ethnology)) अभ्यासात गढून गेला. मात्र त्याच्या पत्नीच्या वाढत्या आजारपणामुळे १८५८ मधे त्याने भारत सोडला व तो कायमचा इंग्लंडला परतता. त्याच्या भारतीय विद्येत (Indology), प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र व इतर वैज्ञानिक शाखांमधील बहुमोल कार्याची त्याच्या सरकारने जाहीर दखल घेतली नाही. त्याला ऑक्सफर्डची मानद डॉक्टेट मिळायला १८८९ उजाडले. बोडलियन ग्रंथालय, रॉयल 'एशियाटीक सोसायटी, नॅचरल हिस्ट्री म्युझियम, झुतलोजीकल सोसायटी, क्यू येथील रॉयल बोटॅनिकल गार्डन व इतर संशोधन संस्थाना त्याने शेकडो संस्कृत ग्रंथ व हजारो रेखाटने दान दिली. तरीही त्याने फ्रेंच अभ्यासकांना मौल्यवान मदत केली व फ्रांसचा सर्वोच्च सन्मान Legion d'Honneur स्वीकारता म्हणून त्याला त्याच्या देशवासीयांनी माफ केले नाही असे दिसते.

युजेन बुहनुफचे Le Lotus de la Bonne Loi त्याच्या पश्चात १८५२ मधे प्रकाशित झाले. ते त्याने होंजसनला अर्पण करतांना लिहिले होते की तो 'बौद्ध अभ्यासाचा संस्थापक" होता. हें योग्यच होते. बुहनुफने ही बाब प्रकाशात आणली की बौद्ध संप्रदायात दोन परंपरा होत्या-उत्तेरेची महायान परंपरा जिंचे ग्रंथ मुख्यतः संस्कृतमधे होते व दक्षिणेचा थेरवाद ज्याचे ग्रंथ पालि भाषेत होते. महायान परंपरेत शाकयमुनी बुद्धाच्या महापरिनिर्वाणाच्या (महापरिनिब्बान) वेगवेगळ्या तारखा दिल्या होत्या. चीन, जपान, कोरियात इ.पू. ९४९ तर तिबेट व नेपाळमधे इ.पू. ८८९; आणि अशोक त्यानंतर एक शतकाने राजा बनला अशी नोंद होती. दक्षिणेच्या (मुख्यतः सिलोन, सियाम व बर्माच्या) थेस्वादी परंपरेत असे दुमत नव्हते. त्यांचे एकमत होते की बुद्धाचे परिनिर्वाण इ.पू. ५४४त्ता झाले होते व अशोक मौर्याचे राज्यारोहण त्यानंतर २१८ वर्षांनी, म्हणजे इ.पू. ३२६ ला, झाले होते. बुहनुफच्या मते ही तारीखही प्रत्यक्ष तारखेच्या खूप आधीची होती. भारतीय विद्याभ्यसकांमधे हळूहळू एकमत झाले की बुद्धाचा मृत्यु इ.पू. ४८६ मधे झाला आणि अशोक २१८ नाही तर १९८ वर्षांनी, इ.पू. २६€ला, राजगादीवर बसला.

हॉजसनमुळे दिव्यावदान या संस्कृत ग्रंथाचा अभ्यास करू शकणारा बुहनुफ हा पहिला पाश्चिमात्य विद्‌ठान होता. यात बौद्ध संतांवर अडतीस अवदान वा नीतीकथा होत्या. यातील एक कथा होती अशोकावदान जिच्यात अशोकाच्या जीवन व मृत्युचे जवळजवळ दहा हजार काव्यपंक्तीत वर्णन केले होते.

यापूर्वी पाश्चिमात्य जगाचे अशोकाबदलचे ज्ञान हे दोन स्त्रोतांतून आले होते-- अशोकाचे स्तंभ व शिलालेख आणि जोर्ज ट्नोस्चे महावंसाचे भाषांतर जो थेरवादी परंपरेनुसार बौद्ध इतिहास होता. ह्या थेरवादी र्चनाकारांनी अशोकाचे चिंत्र धर्माचा आश्रयदाता व प्रचारक तसेच लंकेच्या दोन पूजनीय व्यक्तींचा, महिन्द्र व संघमित्रा यांचा, पिता असे रंगवले होते. त्यांनी थेरवादी परंपरेच्या पुरानाचार्य मोग्णा पुत्त तिस्स यांचा अशोकाला मार्गदर्शन करण्यात तसेच लंका व इतस्त्र धर्मदूत पाठविण्यात व तिसर्याण धर्म-संगायनाच्या आयोजनात सिंहाचा वाटा असल्याचे लिहिले होते.

बुहनुफच्या हाती आलेले अशोकावदान मात्र काहीशी वेगळी कथा सांगत होते. हा महायान ग्रंथ होता. महायान संप्रदायाचे मूळ तिसऱ्या संगायनात होते. सुख्वातीला दोन्ही संप्रदायांनी मौखिक परंपरेने प्राकृतात बुद्धाची शिकवण तिपिटकाच्या रूपात सांभाळली होती. इसवी सनाच्या पहिल्या शतकात हे पहिल्यांदा लिखित स्वरूपात संकलित केले गेले. थेरवादी परंपरेने पालि-प्राकृतचाच वापर सुरू ठेवला तर उत्तरेच्या परंपरेने ब्राह्मणांची अधिक आधुनिक भाषा संस्कृतचा उपयोग केला.

अशोकावदान संस्कृतमधे आहे व त्यातील अशोकाचे चित्र महावंस वा शिलालेखांपेक्षा वेगळे आहे. अशोकवदानात कलिंग युद्धाचा, तेथील नरसंहाराचा वा अशोकाच्या पश्चातापाचा अजिबात उ 'ख नाही. त्यात तिसर्यो संगायनाचा वा बौद्ध

संघातील फुटीचाही उ 'ख नाही. त्यात मोग्गलिपुत्त तिस्स किंवा भारताबाहेरच्या धर्मप्रचारांचाही माहिती नाही. अशोकावदानात हे दिले आहे की महायान परंपरेच्या संतांनी चंड अशोकाच्या सुरूवातीच्या हिंसक वृत्तीला कसा लगाम घातला व त्याला सद्धर्माकडे कसे वळविले. येथे अशोक निग्नोधामुळे नाही तर सं ुणी भिक्षु समुद्र याने भयंकर छळानंतरही दाखवलेल्या संयमामुळे व शांतीमुळे बुद्ध धर्माकडे आकर्षित झाला. मोग्गलिपुत्त तिस्सच्या ऐवजी अशोकाच्या मार्गदर्शकाचे नाव स्थविर उपगुप्त असे दिले आहे. उपगुप्त अशोकाला उपदेश देतो व त्याच्या धर्मयात्रांचे आयोजन करतो. अशोकाचे वर्णन अत्यंत क्रूर व विक्षिप्त असे केले आहे. तो बौद्ध शिकवणुकीमुळे बदलतो, असे दाखवले आहे. अशोकातील ह्या बदलाची ही नीतीकथा आहे. तिच्यात अशोकाच्या खाजगी आयुष्याबद्दल व त्याचा दुःखद वृद्धापकाळ व मृत्यु यांबद्दल काही विचित्र व अविश्वसनीय बाबी दिल्या आहेत.

अशोकावदानाची सुरूवात उपगुप्ताच्या मागील जन्मातील संतवृत्तीच्या विस्तृत वर्णनाने होते. नंतर तो मथुरा येथे अत्तरे विकणाऱ्याच्या घरात जन्म घेतो आणि पुढे प्रवज्जा घेऊन संघप्रवेश करतो. त्यानंतर अशोकाचा निवेदनात प्रवेश होतो. मागील एका जन्मात लहानपणी अशोक बुद्धाला मूठभर माती दान म्हणून देतो. त्या कर्माचे दूरगामी परिणाम होतात. बुद्ध ते दान स्वीकारतो व भविष्यवाणी करतो की ह्या दानकर्मामुळे हा मुत्तगा त्याच्या मृत्युनंतर शंभर वर्षांनी अशोक म्हणून जन्म घेईल.

अशोकावदानात त्यानंतर मगधाच्या राजांची यादी दिली आहे ज्यात चंद्रगुप्ताला पूर्णपणे गाळले आहे तर बिंदुसाराला केवळ नंदाचा पुत्र असे म्हट्ले आहे. अशोकाची आई सुभद्रांगी ही चंपारण्याच्या एका ब्राह्मणाची मुत्तगी असते व बिंदुसाराच्या राण्या मत्सरापोटी तित्ता बिंदुसारापासून दूर ठेवतात. ती मग केशभूषाकाराचे काम शिकते व जेव्हा तिला बिंदुसाराची दाढी करण्याची संधी मिळते तेव्हा ती त्याला सत्य सांगते. बिंदुसार तिला पट्टराणी करतो. त्यांच्या मिल्नाचे पहिले फळ असलेल्या मुलाचे नाव अशोक म्हणजे शोक नसलेला यासाठी की त्याच्या जन्माआधीच त्याची आई मुक्त झालेली असते. पण बिंदुसार त्या मुलाला जवळ करत नाही कारण त्याची त्वचा खरबरीत असते व तिचा स्पर्श सुखद नसतो. हा त्याने दिलेल्या मातीच्या दानाचा परिणाम असतो. अशोक एक बेशिस्त युवक म्हणून वाढतो. त्यात्ता एका ज्योतिषाकडे पाठविण्यात येते. ज्योतिषी सांगतो की तो त्याच्या पित्यानंतर राजा होईल. बिंदुसार यामुळे नाराज होतो कारण त्याला त्याचा मोठा मुलगा सुशीम याला राजगादी द्यायची असते. त्यावेळी तक्षशिला येथे बंडाळी होते. बिंदुसाराला ही अशोकाचा काटा काढण्याची संधी आहे असे वाटते त्यामुळे तो त्याला, सैन्य देऊन पण शस्त्रे न देताच, तक्षशिलेला पाठवतो. राजकुमार अशोक मग काश्मीमधे दोन बलशाली पहाडी योद्ध्यांच्या मदतीने बंड मोडून काढतो. हे योद्धे बहुदा स्थानिक ग्रीक शासक किंवा भाडोत्री सैनिक असावेत.

दरम्यानच्या काळात राजगादीचा वारस सुशीम त्याच्या पित्याच्या प्रधानाच्या टकलावर चेष्टेत टपला मारून त्यातला अवमानित करतो. प्रधानाला वाटते की हा अविचारी सुशीम राजा झाल्यावर त्याची तलवारही अशीच अनिर्बंध चालवेल. प्रधान मग त्याचे सर्व मंत्री व आपला मुलगा राधागुप्त यांना सुशीमाच्या विरोधात व अशोकाच्या पक्षात आणतो. जेव्हा तक्षशिलेत दुसर्यांसदा बंड होते तेव्हा प्रधान राजाला स देतो की सुशीमला तेथे पाठवावे. राजा सुशीमची रवानगी करतो. त्यानंतर लगेच बिंदुसाराला गंभीर आजार होतो व तो सुशीमाला परत बोलवतो. पण मंत्रीगण तो संदेश मुद्दामच उशीरा पाठवतात व इकडे अशोकाच्या शरीरावर आंबेहळद चोपडून तो आजारी असल्यामुळे प्रवास करू शकत नाहीत असे भासवतात.

जेव्हा हे स्पष्ट होते की बिंदुसार शेवटच्या घटका मोजतो आहे तेव्हा अशोक संपूर्ण राजवस्त्रांसह त्याच्यासमोर जाऊन त्याला स्वतःला तात्पुरता राजा घोषित करायला सांगतो. हे ऐकून बिंदुसार इतका संतापतो की त्यामुळे त्याला रक्ताची उलटी होते व तो मृत्यु पावतो.

पित्याच्या मृत्युची बातमी ऐकताच सुशीम पाटलिपुत्राला परततो. अशोक त्याच्या पहाडी योद्ध्यांना शहराच्या दोन ड्वारांचे रक्षण करण्याची जबाबदारी देतो. राघागुप्त तिसऱ्या द्वारावरउभा ठाकतो तर चौथ्याची, पूर्व दरवाजाची, राखण स्वतः अशोक करतो. मग सुशीम अशोकाच्या जाळ्यात सापडतो. जॉन स्ट्रॉंगच्या अनुवादावर आधारीत त्याचे वर्णन असे-

राधागुप्ताने एक कृत्रिम हत्ती बनवत्ता व त्यावर अशोकाची मूर्ती ठेवली. त्याच्या सर्व बाजूला खंदक खणला आणि बाभळाच्या लाकडांचे निखारे त्यात भरून ते बांबूंनी झाकले. त्यानंतर त्याने सुशीमला टोमणा मारला, 'अशोकाला मारू शकलास तर तू राजा होशील.' सुशीमने लगेच त्याच्या सावत्र भावाशी लढण्यासाठी पूर्व द्रवाजाकडे धाव घेतली. पण तो निखाऱ्यांनी भरलेल्या खंदकात पडला आणि त्याचा अकाळी व वेदनादायक मृत्यु झाला.

मगधच्या राजगादीवर बसल्यावर अशोक त्याचे खरे खूप दाखवतो. (अशोकावदानच्या अतिरंजित क्रोर्यकथेत असे वर्णन आहे पण याला दुसरा ऐतिहासिक प्रमाण नाही.) जेव्हा त्याचे मंत्री त्याच्या फुले व फळझाडे तोडण्याच्या आदेशाला विरोध करतात तेव्हा तो त्यांच्यातील्ल पाचशेंचे शिरकाण करतो; व जेव्हा त्याला हे कळते की राणीवशातील स्त्रियांना त्याच्या खरबरीत त्वचेचा स्पर्श अप्रिय आहे तेव्हा तो त्यांना जिवंत जाळतो. तो चंडगिरीक नावाच्या एका क्रूर पहाडी माणसाची ज द म्हणून (त्याच्या शिक्षेच्या अंमलबजावणीसाठी) नेमणूक करतो. तो एक बाहेरुन अतिशय नयनरप्य पण आतून नरकयातना देणारा तुरूंग बांधतो. चंडगिरीक जो कुणी त्याच्या आत येईल त्याला पाच प्रकारच्या महायातना देऊ लागला. पण जेव्हा समुद्र नावाचा सामणेर (सामणेर ही संघप्रवेशातील भिक्षु बनण्याआधीची पहिली पायरी असते) पिंडपातातला जात असतांना

त्याच्या तुरुंगाच्या आत जातो तेव्हा चंडगिरीकाच्या छळाचा त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही. चंडगिरीक ही बाब राजाला सांगतो. राजा स्वतः तेथे येतो आणि समुद्राची समता व तितिक्षा (क्षांति, सहनशीलता) पाहून आश्चर्यचकीत होतो. समुद्र मग राजाला सांगतो की तो शाक््य(मुनी बुद्धाच्या शिकवणुकीमुळे संसार्चक्राच्या सर्व भवबंधनातून व भयबंधनातून मुक्त झालेला आहे. तो अशोकाला हेही सांगतो की बुद्धाने भविष्यवाणी केली होती की त्याच्या परिनिर्वाणाच्या शंभर वर्षांनंतर एक अशोक नावाचा बलशाली राजा पाटलिंपुत्रावर राज्य करेल. हा चक्रवती राजा बुद्धाच्या धर्मचक्राचे (धम्मचक्क) पालन करेल. तो धर्मराजा होईल व बुद्धाच्या शारिरधातुंसाठी चौर्यां शी हजार धर्माराजिक (स्तूप) बांधून त्यात त्यांची स्थापना करेल. समुद्र पुढे म्हणतो “पण येथे तर महाराजांनी हा तुरुंगरूपी नरक निर्माण केला आहे व हजारो लोकांना ठार मारले आहे.” [ह्या नरकाचा उ 'ख शिलालेखांत कुठेही नाही. किंबहुना शिलालेखात अशोक कलिंगच्या युद्धामुळे तो पश्चातापदग्ध होऊन हिंसाचारापासून दूर गेला असे अशोक म्हणतो, तेव्हा त्याने ह्या नरकाचा उ 'खही करणे अपेक्षित आहे. त्यामुळे हा चंडगिरीक व नरक ही अशोकावदानकारांच्या क नेची भरारी आहे असे वाटते.]

अशोकावर ह्या शब्दांचा इतका परिणाम झाला की तो लगेच शाक्यमुनी बुद्धाची भविष्यवाणी खरी करण्याचे वचन देतो. तो बुद्धानुयायी होतो. तो तो तुरूंग नष्ट करतो व चंडगिरीकालाही. मग तो भदंत उपगुप्ताला त्यांचा मार्गदर्शक बनण्याची विनंती करतो.

सुधारलेला राजा आता बुद्धाच्या शारीरधातुसाठी चौऱ्यांशी हजार धर्माराजिक बांधणे इत्यादी पुण्यकमें करू लागतो. यासाठी तो पाटलिपुत्राबाहेरील कुक््कु टारामच्या (कुक्कुट > आराम कुक्कुट म्हणजे कोंबडा व आराम म्हणजे विहार, मठ) यश थेराची मदत घेतो. तक्षशित्लेच्या लोकांच्या विनंतीखातर तो तेथे साडेतीन लाख स्तूप बांधतो आणि यक्ष त्याच्या आज्ञेवरून भारतीय उपखंडाच्या किनाऱ्यावर दहा लाख स्तूप बांधतात. उपगुप्त मग अशोकाला सर्व बौद्ध तीर्थस्थानांच्या यात्रेला नेतो. यात्रेची सुख्वात लुंबिनीपासून होते. तेथे अशोक हजार सुवर्ण मोहोरांचे दान देतो व एक स्तूप बांधतो. तो कपिलवस्तु, बोधगया, सारनाथ व कुशीनगर येथेही तसेच करतो. कुशीनगरतला तो भावनावेगाने बेशुद्ध होतो. मग त्याचे सेवक त्याला परत शुद्धीवर आणतात.

अशा प्रकारे बौद्ध तीर्थस्थानांना भेट दिल्यानंतर उपगुप्त अशोकाला बौद्ध परंपरेतीत्त इतर महान संतांच्या स्तूपांना मेट द्यायला घेऊन जातो. पण अशोकाची विशेष श्रद्धा जडते ती बोधिवृक्षावर. जेव्हा तो बोधगयेता परत जातो, त्याला असे आढळते की हा वृक्ष वठत चालला आहे. तेव्हा तो परत शोकाकुल होऊन बेशुद्ध होतो. त्यातला कळते की त्याची मुख्य राणी तिष्यरक्षितेने बोधिवृक्षावर जादूटोणा केला आहे कारण ती अशोकाने त्याचा परंपरागत संप्रदाय सोडून दिल्यामुळे क्षुब्ध झाली असते. राणीला तिची चूक कळते. ती मग बोधिवृक्षाच्या मुळाशी तो अश्वत्थ पुन्हा जोर घरेपर्यंत रोज हजार भांडे दूध टाकू लागते. त्यानंतर अशोक जाहीर करतो--

मी पुन्हा ते अतिपुण्याचे काम करेन अन् या पवित्र बोधिवृक्षाला सुगंधी जत्लाभिषेक करीन
अतिभव्य पंचवार्षिक महोत्सवाने मी संघाचा आदर सत्कार करेन

अशोक मग पाटलिपुत्रात पंचवार्षिक महोत्सवाची घोषणा करतो ज्यात देशभरचे व अगदी हिमालयापलिकडचे भिक्षु भाग घेतात. तो त्या सर्व भिक्षुंचा सत्कार करतो व एका स्थविर भिक्षुला साम्राज्यभर सद्धर्माची शिकवण पोहोचविण्याची जबाबदारी देतो.

अशोकावदानाच्या शेवटी सम्राटाचे म्हातारपण व मृत्यु यांची माहिती मिळते. अशोकाची राणी पद्मावती एका मुलाला, धर्मविवर्धनला, जन्म देते. अशोक त्याच्या सुंदर डोळ्यांना बघून भारावून जातो. राजकुमाराच्या डोळे हिमालयातील कुणाल पक्षासारखे असल्यामुळे तो त्याचे नाव कुणाल ठेवतो. एक स्थविर भिक्षु भविष्य जाणतो की कुणाल पुढे अंध होणार. तो कुणालतला अनित्यतेची शिकवण देतो. पुढे अशोकाची पट्टराणी तिष्यरक्षिता कुणालच्या डोळ्यांच्या प्रेमात पडते व त्याच्याकडे आकर्षित होते. तो तिची सलगी अव्हेरतो व तिला 'आई' म्हणतो. ती मग त्याला नष्ट करण्याचा चंग बांधते.

येथे इतिहासाची पुनरावृत्ती होतांना दिसते. तक्षशिंलेत परत बंड होते. कुणात्तला ती बंडाळी मोडण्यासाठी पाठवले जाते. तक्षशिलेचे लोक त्याचे मनापासून स्वागत करतात व त्याला सांगतात की त्यांचा राग राजा व त्याच्या अहंकारी मंत्रीगणांवर आहे. इकडे पाटलिंपुत्रात अशोक गंभीर आजारी पडतो. त्याच्या शरीरातून अशुद्ध स्राव वाहू लागतो. तो कुणालत्ता परत बोलावतो. तिष्यरक्षितेला भीती वाटते की तिच्या अनैतिक वागण्यामुळे राजा बनल्यावर कुणाल तिला मृत्युदंड देईल. ती मग अशोकाच्या आजारावर उपाय शोधू लागते. अशोकासारखा आजार असलेला कुणी रू"्ण आहे का याची ती चौकशी करते. असा रूग्ण सापडल्यावर तिच्याकडे आणला जातो. ती त्याला माखून टाकते व शवविच्छेदनात शोध लागतो की त्याच्या पोटात एक मोठा कृमी आहे. त्या कृमीला (जंताला) मारण्यासाठी ती बऱ्याच औषधांचा असफल प्रयोग करते. शेवटी ती कांदा वापरते व त्यामुळे तो कृमी मरतो. मग ती राजाला कांदा खाऊ घालते व आजारातून बरे करते. त्याचे बक्षीस म्हणून ती राजाकडे मागणी करते की तित्ता एक आठवड्यासाठी राज्य करु द्यावे. मग ती तक्षशिलेला 'राजाज्ञा' पाठवते व तीनुसार कुणालचे डोळे फोडले जातात.

कुणालता आपली ही गती होणार हे माहीत असते. तो विरोध करत नाही. त्यानंतर तो व त्याची पत्नी ग गग) गाणे म्हणून पोट भरतात. ते पाटलिपुत्राला परतात. राजवाड्याच्या भिंतीबाहेर कुणात्त गात असतांना अशोक ते ऐकतो व त्याला आत बोलावून घेतो. आत तो कुणालतला ओळखतो व दुःखातिरेकाने रडत जमिनीवर कोसळतो. तो मग कुणालची कर्मकहाणी ऐकतो व त्यामुळे त्याचा क्रोधाप्रिभडकतो. तो तिष्यरक्षितेत्ता जिवंत जाळण्याचा आज्ञा देतो. राजाने राणीला माफ करावे म्हणून कुणाल राजाची मनधरणी करतो. कुणालच्या मनात त्याच्या दुष्ट सावत्र-आईबद्दल्ल केवळ करूणा असते म्हणून

त्याची दृष्टी परत येते. राजा त्याचा क्षमासंदेश ऐकतो -- तरीही तिष्यरक्षितेत्ता जिवंत जाळले जाते.

यानंतर अशोक त्याचा अनुज विताशोक याला दु:ख व दु:खमुक्तीबद्दल सांगतो आणि यश स्थविराच्या मदतीने विताशोक प्रवज्जा घेतो. विताशोक आधी 'पाटलिपुत्राजवळच्या कुक्ुकुशटारामात जातो पण तेथील गोंगाट सहन न होऊन तो हिमालयात निघून जातो. यादरम्यान कुणी बुदधदेष्टा स्वतःचे चित्र सगळीकडे दाखवू लागतो. त्यात बुद्ध त्याच्या पायाशी पडलेत दाखवलेत्ा असतो. अशोक क्रुद्ध होतो व त्याच्या शिरच्छेदासाठी इनाम जाहीर करतो. त्यावेळी एक गवळी विताशोकाला बघतो. यावेळी विताशोकची दाढी व केस वाढलेले असतात. तो गवळी विताशोकालाच बुद्देष्टा समजतो. गवळी त्याचे मुंडके उडवतो व राजाकडे मुंडके घेऊन इनाम मागायला येतो. अशोक त्याच्या लहान भावाला ओळखतो व शोकाकुल होतो. उपगुप्त अशोकाला समजावतो की अशोकाचे क्रोर्यच त्याच्या भावाच्या मृत्युला कारणीभूत झाले आहे.

अशोकावदानानुसार ह्या थोर सप्राटाचे शेवट्चे दिवस दु:खद होते. तो जसजसा आजारी व क्षीण होऊ लागतो तसतसा तो संघाला जास्त दान देऊ लागतो. इतका की राज्याची तिजोरी रिकामी होण्याची वेळ येते. कुणालचा मुत्तगा संपदी याची राजगादीचा उत्तराधिकारी म्हणून नेमणूक झालेली असते. तो त्याच्या स ुगारांच्या सांगण्यावख्न सरकारी तिजोरीतील रक्केम भिक्षुंना वाटण्यास मनाई करतो. मग अशोक त्याचे व्यक्तीगत सामान दान देऊ लागतो-- आधी त्याची सोन्याची ताटे, मग चांदीची ताटे, नंतर तांब्याची ताटे व शेवटी तो ते सर्व दान करून मातीच्या भांड्यात जेवू लागतो. शेवटी त्याच्याकडे केवळ अर्धा आवळा शि क रहातो. तोसुद्धा अशोक ह्या शब्दांनी कुक्ुकुटटारामालता दान देतो-

पूर्वी जो अवघ्या वसुंधरेवर राज्य करणारा तिच्यावर त्याच्या सार्वभौमतेचे छत्र धरणारा या जगावर दुपारच्या सूर्याइतक्या तेजाने तळपणारा होता; आज तो राजा निर्धन झाला आहे, त्याच्या कर्मविपाकामुळे त्याची कीर्ति संपत्ती आहे, जणू सायंकाळी सूर्याचा अस्त होतो आहे.

मृत्युशय्येवरीलल अशोक तो आवळा कुटून त्याचा काढा बनवतो व संघाला पाठवतो. तो राधागुप्ताला विचारतो की पृथ्वीवर कुणाचे राज्य आहे. उत्तर मिळते त्याचेच राज्य आहे. मग तो कसाबसा उठतो व सर्व दिशांना वळून दानांजली करीत जाहीर करतो की तो सर्वं पृथ्वी बुद्धाच्या संघाला दान देत आहे. तो ते शब्द एका कागदावर लिहून घेतो, दातांनी मोहोरबंद करतो व मृत्यु पावतो. खजिन्यातील उरलीसुरली संपत्ती वापरून मंत्री राजाचे राज्य संघाकडून परत विकत घेतात. त्यानंतर अशोकाचा नातू संपदी याचा राज्याभिषेक होतो.

पण येथे अशोकावदान संपत नाही. त्यानंतरची कथा अशी-- संपदीचा पुत्र बृहस्पती व त्याचा पुत्र वृषसेन. वृषसेनाचा पुत्र पुष्यधर्मन व त्याचा पुत्र पुष्यमित्र. अशोकावदानातील पुढील वर्णन असे की पुष्यमित्रला अशोकाइतकेच प्रसिद्ध व्हायचे असते. तो त्याच्या ब्राह्मण पुरोहिताता त्याचा मार्ग विचारतो. पुरोहित त्याला सांगतो की दोन प्रकारे तो प्रसिद्ध होऊ शकतो-- एकतर राजा अशोकाने जे केले ते करून म्हणजे चौऱ्यां शी हजार स्तूप बांधून किंवा ह्या सर्व स्तूपांचा विध्वंस करुन. पुष्यमित्र दुसरा मार्ग स्वीकारतो. तो कुक्कुतटारामवर चालून जातो. तेथील भिक्षुंना तो सांगतो की जीव वाचवा किंवा विहार वाचवा. भिक्षु प्राणांचे बलिदान द्यायत्ता तयार होतात. पण पुष्यमित्र भिक्षु व विहार दोंहोंना नष्ट करतो. मग तो सर्व बौद्ध विहारांच्या विरूद्ध मोहीम उघडतो व मिक्षुच्या प्रत्येक मुंडक्यासाठी इनाम जाहीर करतो. जेव्हा एक रक्षक यक्ष पर्वताखाली पुष्यमित्राला चिरडून टाकतो तेव्हा हे थांबते.

अशोकावदानाची शेवटची ओळ-- पुष्यमिंत्राच्या मृत्युबरोबर मौर्यवंश संपला.

अशोकावदानात अनेक स्पष्ट चूका आहेत-- बिंदुसाराता नंदाचा मुलगा म्हणणे, राजघातकी ब्राह्मण पुष्यमित्र शेवटचा मौर्य असे म्हणणे, इ.

या ग्रंथातील मौर्य राजांची नावेसुद्धा विष्णु, मत्स्य, वायु व ब्रह्मांड पुराणांपेक्षा निराळी आहेत. (पुराणातील वंशावळी प्रस्तुत पुस्तकाच्या तिसर्याह प्रकरणात दिली आहे.) एक नक्कीप की अशोकानंतरच्या मौर्य राजांच्या नावांबद्दल बराच गोंधळ आहे. ह्यावरून असा निष्कर्ष निघतो की या महान सम्राटाच्या शेवटच्या वर्षांत त्याचे साम्राज्य काहीसे कमजोर झालेले दिसते आणि त्याच्या मृत्युनंतर त्याच्या साम्राज्याचे दोन किंवा अधिक तुकडे पडले असावेत. अलेक्झांडरनंतर झाले तसेच येथेही अशोकानंतर वेगवेगळ्या व्यक्तींनी राजगादीवर अधिकार सांगितला व त्यासाठी त्यांच्यात संघर्ष झाला.

बुहनुफ ‘‘बौद्ध धर्माचा इतिहास' पूर्ण करत असतांनाच रशियाहून बातम्या येऊ लागल्या की प्राचीन भारतीय बौद्ध धर्मासंबंधी यापूर्वी अनुपलब्ध असलेली काही कागदपत्रे सापडली आहेत. या बातम्यांचा उगम वोल्गाच्या तीरावरील कझान विद्यापीठाच्या मंगोलियन भाषा विभागात होता. तेथील विद्यार्थी मूळ तिबेटीतून अनुवाद केलेला एक हस्तलिखित ग्रंथ अभ्यासत होते. सन १८४० मधे ह्यापैकी एक विद्यार्थी, वॅसिलि वॅसिलिएव, पेकींगच्या (आजचे बिजिंग) रशिंयन ऑर्थोडॉक्स चर्च मिशनमधे गेला होता. तेथे त्याने ह्या ग्रंथाची ललाकडी छाप्यांवर्न बनवलेली मूळ तिबेटन प्रत मिळवली. हा ग्रंथ होता ग्या-गर चोस-ब्युंग, अर्थात भारतातील बौद्ध धर्माचा इतिहास. लेखक होता तारानाथ नावाचा तिबेटी लामा.

तारानाथच्या भारतातील बौद्ध धर्माचा इतिहासात चव्वेचाळीसपैकी तीन प्रकरणे राजा अशोकवर आहेत. ह्यामुळे 'कहानी में एक और ह्विस्ट' आला. हे अर्वाचीन काळात म्हणजे १६०८ मधे लिहिले होते तरी त्याचा आधार दिव्यावदान व इतर दोन ग्रंथ होते जे

आता उपलब्ध नाहीत. येथे अशोकाकडे ईशान्य चष्म्यातून पाहिले गेले आहे. ईशान्य यासाठी की हा उत्तरेच्या महायान परंपरेचा ग्रंथ असून उत्तर मगघातील प्राचीन बौद्ध संघाला प्राधान्य दिले आहे. या ग्रंथानुसार अशोकाचा मार्गदर्शक आचार्य मथुरेचा स्थविर उपगुप्त नसून पाटलिपुत्राबाहेरीलत कुक्कुटारामचा प्रमुख स्थविर यश आहे. महावंसात याच कुक्कुटारामाला अशोकाराम म्हटले आहे.

तारानाथचा इतिहास इतका चुकांनी भरलेत आहे की अनेक इतिहासकार त्याला काहीही महत्त्व देत नाहीत. पण अशोकाच्या जीवनाचा व काळाचा वेध घेण्यासाठी त्यातील काही बाबी मदत करतात. यात अशोकाला एका व्यापाराच्या मुलीला उत्तर मगधातीत्त चंपारण्याचा राजा नेमितपासून झालेला पुत्र म्हणून घोषित केल्ले आहे. त्याच्या ऐषारामी भावांपेक्षा अशोक वेगळा असतो. तो साधे जीवन जगतो व जमिनीवर झोपतो. जेव्हा काश्मीर व नेपाळचे पहाडी लोक बंड करतात तेव्हा त्यांचे बंड थंड करण्यासाठी अशोकला पाठविण्यात येते. अशोकाच्या यशावर खुष होऊन राजा त्याला पाटलिपुत्राचा शासक नेमतो. राजा नेमितनंतर त्याचे मंत्री अशोकला पाटलिपुत्राचा राजा बनवितात. येथे तो अनेक देवतांची पूजा करतो. त्यातील एक म्हणजे उमादेवी (शिवाची पार्वती). अशोकाच्या राणीवशात पाचशे स्त्रिया असतात. "अनेक वर्षे कामभोगात रमल्यामुळे त्याला कामाशोक असे नाव पडते."

अशोक त्याच्या सावत्र भावांशी युद्ध करतो व त्या सर्वांचा पाडाव करून हिमालय ते विंध्य या सर्व प्रदेशाचा राजा बनतो. तो आता अधिकच अहंकारी व क्रूर होतो. हिंसक कृत्यांमधेच त्याला समाधान लाभते म्हणून त्याला चंडाशोक (चंड अशोक) असे नाव पडते. त्यानंतर स्थविर यशाचा एक सामणेर शिष्य, अशोकावदानमधील वर्णनाप्रमाणेच, अशोकाच्या यातनागृहात शिरतो व त्याच्यावर त्या कूर छळाचा काहीही परिणाम होत नाही. मग त्यानंतर यश अशोकाचे मतपरिवर्तन करतो. त्यानंतर अशोक अत्यंत श्रद्धाळू होतो व दिवसरात्र पुण्यकर्मात घालवू लागतो.

यश साऱ्या भिक्षुंना पाटलिपुत्रातता बोलवतो. या सभेसाठी तो एक मोठे सभागृह बांधतो. या आयोजनात साठ हजार भिक्षु भाग घेतात व ते तीन महिने चालते. त्यानंतर अशोक पुन्हा एकदा मोहिमेवर निघतो व "रक्तपाताशिंवाय सर्व राज्ये, विंध्याच्या दक्षिणेकडीलही... उत्तर हिमालयातील... लि-युललच्या पलिकडील हिमशिखरांचा प्रदेश (खोतान-- तिएन शान पर्वत); पूर्व, दक्षिण व पश्चिमेत्ता समुद्राने घेरलेले पूर्ण जम्बुद्वीप तसेच पन्नास छोटी बेटे" आपल्या अधिपत्याखाली आणतो.

अशोक मग यशथेराच्या स नुसार बुद्धाचे शरीरधातु (शरीर अवशेष) गोळा करतो व त्याच्या साम्राज्यभर (उत्तरेला लि-युलपर्यंत) चौऱ्यांशी हजार स्तूपांमधे त्याची स्थापना करतो. तारानाथ त्यानंतर अशोकाच्या लाडक्या मुतल्ताची, कुणालची, कथा सांगतो-- कसे त्याला अंध केले जाते इ. इ. पण अशोकावदानाच्या कथानकात व येथे 'एक फरक असा

की तारानाथच्या कथेत कुणाल अंधत्वामुळे राज्य करायला अपात्र होतो व त्यामुळे भिक्षु बनतो. ‘‘त्यामुळे राजगादीवर त्याचा हक्कह असूनही त्याचा मुलगा विगतशोक याला राज्य मिळते’’.

तारानाथच्या इतिहासातही अशोकाचा शेवट बव्हंशी अशोकावदानसारखाच होतो पण अशोकाच्या शेवटच्या क्षणासंबंधी सांगतो की एक सेविका दुपारच्या उष्म्यात अशोकाला वारा घालत असतांना झोपी जाते व तिच्या हातातून याकच्या शेपटीचे चामर पडते. त्यामुळे अशोक क्रुद्ध होतो. ‘‘राजा विचार करतो, 'पूवी राजे लोक माझे पाय धुवायचे. आता ही तुच्छ सेविका माझा असा अपमान करतेय.’’ अशा प्रकारे तो क्रुद्ध मनस्थितीतीत मृत्यु पावतो व या क्रोधामुळे तो पाटलिपुक््नेच्या एका तळ्यात नागराज म्हणून जन्माला येतो.’’

अशोकावदानात लंकेचा अजिंबात उ 'ख नाही, तारानाथच्या इतिहासात मात्र आहे. पण तारानाथनुसार लंकेत सद्धर्म अशोकामुळे नाही तर कृष्ण नावाच्या स्थविरामुळे गेला. कृष्णाला लंकाराज आसन-सिंह-कोस याने आमंत्रित केले होते. स्थविर कृष्णाने ‘‘लंकेत तीन महिने सडर्म शिकवला आणि अनेकांना मुक्तीच्या चार अवस्थांपर्यंत पोहोचविले.’’ तारानाथनुसार कृष्णाचे कार्य सुदर्शन पुढे नेतो. सुदर्शन अशोकाच्या राज्यारोहणाच्या काही वर्षे आधी मृत्यु पावतो. यावरून असे दिसते की लंकेत बौद्ध धर्म अशोकाच्या नव्हे तर चंद्रगुप्ताच्या काळात गेला. अनेक आधुनिक इतिहासकारांचेही हेच मत आहे. [अशोकाने लंकेबरोबर व लंकाधीश देवानांपियतिस्सबरोबर मैत्रीपूर्ण संबंध स्थापन केले यात शंका नाही पण काहीही पूर्वपिठिका नसतांना केवळ अशोकाच्या एका पत्राच्या आधारावर तो बौद्ध झाला असावा हे संभवत नाही. महिंद्र लंकेला गेला हे नक्की पण त्यात चमत्कार अर्थातच नंतर जोडले आहेत. हे तर्कसंगत वाटते की लंकेत आधीच बुद्धाची शिकवण गेली होती व ती अशोकाच्या काळात इढमूत झाली.]

तारानाथच्या यादीत अशोकनंतर त्याचा नातू विगतशोक व त्यानंतर पणतू वीरसेन राजा होतो. वीरसेन संपत्तीची हिंदू देवता लक्ष्मीची आराधना करतो व अमाप संपत्ती जमवतो. ह्याचा अर्थ वीरसेन बुद्धानुयायी नाही. पण नंतर तारानाथ लिहितो, ‘‘वीरसेन तीन वर्षे सर्व भिक्षुंची सेवा करतो व प्रत्येक चैत्यासाठी शंभर दानवस्तू देऊन जगभरच्या चैत्यांची पूजा करतो’’. हे ही असेल की वीरसेन अशोकाची सर्वधर्मसमभावाची परंपरा पुढे चालवत होता.

एका वेगळ्याच चंद्रवंशाचा उ 'ख करून तारानाथ मग आपल्याला अधिकच बुचकळ्यात टाकतो. या राजवंशाची स्थापना चंद्रगुप्त करतो-- हा चंद्रगुप्त मौर्यच असायला हवा. चंद्रगुप्तानंतर बिंदुसार येतो. त्यानंतर श्रीचंद्र (हा कदाचित बिंदुसाराचा मोठा मुलगा सुशीम असावा), मग धर्मचंद्र (अशोकाच्या धर्म अशोक नावाशी साधर्म्य). यानंतर अकरा नावे येतात ज्या सर्वांच्या शेवटी चंद्र असतो व जी नावे इतर कुठल्याही वंशावळीत सापडत

नाहीत. यातीत्त शेवटचे तीन राजे तारानाथच्या मते अत्यंत बलशाली व निरत्नांबद्दल श्रद्धाळू असतात. शेवटी तारानाथ लिहितो, “नेमचंद्राच्या नंतर राजपुरोहीत पुष्यमित्र शुंग बंड करतो व सत्ता ताब्यात घेतो”. हा अर्थातच तोच पुष्यमित्र आहे ज्याचा उ 'ख पुराणांत व महावंसात सेनापती म्हणून मिळतो; जो शेवटच्या मौर्याची गादी उलथवून शुंगवंशाची स्थापना करतो.

वॅसिली वॅसिलिएवच्या प्रयत्नानंतरही तारानाथच्या बौद्ध धर्माच्या भारतातील इतिहासाबाबत अनेक बाबी विसाव्या शतकापर्यंत रशिया व जर्मनीबाहेर अज्ञातच राहिल्या. फ्रांसचे युजेन बुहनुफ व स्टानिस्लास जुलिएन हे थोर विद्वान खरे पण तरीही त्यांनीही अशोकावदानाची अवहेलना केली. प्रा. जॉन स्ट्रॉंग यांनी केलेला अशोकावदानाचा पहिला इंग्रजी अनुवाद छापून प्रकाशित व्हायला १९८३ साल उजाडावे लागले.

पण ज्यांना आता आपण शेवटचे प्राच्यविद्यापंडित म्हणू किंवा पहिले भारतीय विद्याभ्यासक, पुरातत्त्वसंशोधक, पुरातनभाषातज्ञ व शिंलालेखसंशोधक म्हणू त्यांना हे ग्रंथ फारसे महत्वाचे वाटत नव्हते. त्यांचे सर्व लक्ष दोन वेगळ्याच गप्रंथाकडे वळले होते.

ह्यातील पहित्ता होता १८३६ मधे प्रकाशित झालेत चिनीतीर्थयात्री फा-हेनच्या पाचव्या शतकातील प्रवासवर्णनाचा (बौद्ध राज्यांचा इतिहास) फ्रेंच अनुवाद (Foe Koue Ki, ou Relations des Royaumes Bouddhiques). दुसरा ग्रथ ह्युएन-त्संगच्या जीवनाचा व त्याच्या इ. स. ६२९ ते ६४५ च्या दरम्यान भारतातील प्रवासाचा इतिहास होता ज्याचे भाषांतर स्टानिस्लास जुलिएनने फ्रेंचमधे केले होते (Historie de la vie de Hiouen-tsang et de ses voyages dans l’Inde depuis l’an 629 jusqu’en 645). हे फाहेनपेक्षा अधिक प्रसिद्ध असलेल्या व त्याच्यानंतरच्या ह्युएन-त्संगचे प्रवासवर्णन होते.

फ्रांसमधील ह्या दोन प्रकाशनांची इंग्लंडमघे काहीही चर्चा झाली नाही. अपवाद होता तो मूठभर भारतीय विद्याभ्यसकांचा ज्यांना आता हरवलेला बौद्धकालीन भारतीय भूगोल परत शोधण्याची संधी आहे असे वाटले. भारतात जेम्स प्रिन्सेप फा-हेनच्या प्रवासवर्णनाच्या प्रकाशनाने आनंदीत झाला. ते घडायला पॅरीसमधे अनेक वर्षे गेली. 'पण भारतात प्रिन्सेपच्या हातात ते भाषांतर पडले नाही. त्याने दुःखी अंतःकरणाने उद्गार काढले, “अरेरे! भारतात हे भाषांतर ह्याची देही ह्याची डोळा कधीतरी बघता येईल काय?”


पण हें उद्गार छापखान्यात कागदावर उमटायच्या आधीच प्रिन्सेप व्याधी प्रस्त, दुर्बल व मरणासन्न झाला होता. तो इंग्लंडला परतल्यावर व त्याच्या मृत्युनंतर ही जबाबदारी त्याच्या सर्वात तत्पर शिष्यांवर येऊन पडली. एक होता कॅप्टन मार्खम किट्टो-- ज्याने धौलीचा शिलालेख शोधला होता--जो स्वतः एक उमदा व सरळमार्गी माणूस होता पण त्याला वरिष्ठांना नाराज करण्याची दुर्दैवी सवय होती. दुसरा होता सैन्य अभियंता कॅप्टन अलेक्झांडर कनिंगहॅम ज्याने पूर्वी प्रिन्सेपत्ता भारतीय नाण्यांच्या अभ्यासात मदत केली

होती. हा स्थूत्त, ठेंगणा, टक्कल पडू लागलेला पण अगदी मजबूत शरीरयष्टीचा माणूस होता.

१०. पश्चिमेच्या कथा



मारतात आलेल्या यात्रिकरुंमधे सर्वश्रेष्ठ, चीनी बौद्ध मिक्षु ह्युएन-त्संग. दनहाँगच्या मोगाव गुफांमधील नवव्या शतकातील मित्तीचित्र. (Wikimedia PD-Art)



शाक््यधमुनी बुद्ध संकिसा येथे पृथ्वीवर उतरतांनाचे इ. पू. दुसऱ्या शतकातील शिल्प. बुद्धाला केवळ प्रतिकांद्रारा दर्शवले आहे. त्याची पावले शिडीच्या सर्वात वर व सर्वात खाली दिसत आहेत. (Cunningham, *The Stupa of Bharhut*, 1879)

सन १९६&व्या ऑगष्टमधे चीनच्या सांस्कृतिक क्रांतीने सर्वाधिक हिंसक खूप धारण केले होते. हिरव्या वेषातील लाल रक्षक तरूण व तरूणी शहरांमधे व खेडोपाडी चार जुन्या गोष्टींचा विध्वंस करीत सुटले होते-- माओने लक्ष्य केलेल्या सांस्कृतिक क्रांतीच्या जुन्या परंपरा, जुनी संस्कृती, जुत्या सवयी व जुने विचार. चीनच्या शांस्की परगण्यातील शियान [न भागात एक असाच जमाव शहराच्या सर्वात लाडक्या सातमजली 1 प्राचीन इमारतीवर-- 'दायन ता' अर्थात जंगली हेसाचा पॅगोडा (Wild Goose Pagoda)--चालून गेला. हा जमाव घोषणा देत होता, 'जुने तोडून टाका, नवे निर्माण करा. त्यांनी दरवाजे तोडले. भिक्षुंना बाजूला ढकलले आणि मुख्य गाभाऱ्यातील बुद्ध व बोधिसत्त्वांच्या मूर्ति खाली पाडण्यासाठी त्यांच्या गळ्याभोवती दोरखंड बांधू लागले. त्याचवेळी शासनाच्या सांस्कृतिक अवशेष विभागाचा अधिकारी तेथे पोहोचला. त्याने प्रमाणपत्र आणले होते की त्या मूर्ती व पॅगोडा हे राष्ट्रीय संपत्ती आहे व त्यांना धक्का पोहोचता कामा नये.

पण त्या पॅगोड्यातील बहुमूल्य बौद्ध सूत्रांच्या ग्रंथसंपदेच्या संरक्षणार्थ असला कुठलाही हुकूम नव्हता. हे ग्रंथ त्या पँगोडाच्या निर्मितीच्या काळातील म्हणजे सहाव्या शतकातील होते. काही तर त्याही पूवीचे होते. हे सर्व ग्रंथ पॅगोड्याच्या परिसरात रचून त्यांना आग लावण्यात आली. त्या ज्वाला रात्रभर धगधगत होत्या.

बौद्ध ग्रंथांचा चिनीभाषेतील पहिला अनुवाद इ. स. १४८ ला एका पार्थियन राजकुमाराच्या आगमनानंतर झाला होता. त्याने लोयांग येथे बौद्ध विहाराची स्थापना केली व संस्कृत ग्रंथांचे चिनीभाषेत अनुवाद करण्यास सुरूवात केली. चौथ्या शतकात बौद्ध धर्माला चीनमधे राजाश्रय मिळू लागला. त्याच्या वाढत्या लोक प्रियतेबरोबरच बुद्धभूमितून, भारतीय उपखंडातून, मूळ ग्रंथांची मागणी जोर धरू लागली. त्यामुळे 9॥8) मधील चिनीभिक्षु फाहेन व त्याचे चार सहकारी सन ३९९ मधे बुद्धभूमिकडे निघाले. हा प्रवास पंधरा वर्षे चालला.

फाहेन हा काही चीनमधून भारतात येणारा पहिला बौद्ध तीर्थयात्री नव्हता. पण ज्याचे प्रवासवर्णन उपलब्ध होते व अनेकांकडून वाचले जात होते असा तो पहिला तीर्थयात्री होता. त्याच्या प्रवासवर्णनाचे नाव होते फो-म्यो-जी, अर्थात 'बौद्ध राज्यांचा इतिहास?. त्याचे नशीब चांगले असे की त्याच काळात पहिल्यांदा चिनीसम्राट बौद्ध धर्माकडे वळला होता.

पामीर्मधे सिंधुच्या प्रवाहाबरोबर प्रवास करत सन ४०२ च्या वसंत क्रतुत फाहेन वु-चांग ह्या बौद्ध राज्यात पोहोचला. हा उद्यान-प्रदेश (आजचा महाबन, स्वाट, उत्तर पाकीस्तान) जणू बौद्ध स्वर्गच होता. येथे बुद्ध-धर्माची भरभराट झाली होती. हेमंत क्रतुत फाहेन गांधार्च्या पठारावर पोहोचला. येथेही बहुतेक लोक बौद्ध होते. पण हे हिनयान परंपरेचे होते. तेथे विपुल विहार व भिक्षु होते.

त्याला गांधारात अनेक स्तूप दिसले ज्यात बौद्ध संतांचे शरीरधातु ठेवण्यात आले होते. पुरूषपूर (आजचे पेशावर) येथे दोन भव्य स्तूप पाहून फाहेन आनंदीत झाला. हे स्तूप कुषाण राजा कनिष्क याने बांधले होते. त्यातील्त एकात कुषाणांनी युद्धातील तूट म्हणून भारतातून आणलेले शाक्यमुनी बुद्धाचे भिक्षापात्र होते.

पण केवळ सप्राट कनिष्कानेच बौद्ध धर्माला राजाश्रय दिला नव्हता व स्तूप बांधले नव्हते. कुषाणांच्या आक्रमणाच्या कितीतरी आधी एका बलशाली सप्राटाने हा आदर्श घालून दिला होता. कनिष्क केवळ त्याच्या पावलावर पाऊत टाकत होता. ह्या राजाला चीनमधे वुयु-वान अर्थात शोक नसलेला राजा म्हणत. ह्याच वुयुने चीनमधे बौद्ध धर्म पहिल्यांदा नेला होता व त्याची ओळख संपूर्ण मध्य साम्राज्यात (चीनमधे) चक्रवती राजा अशा होती.

फाहेनला त्याच्या प्रवासात अनेक वेळा वुयु राजाचे नाव ऐकायला मिळाले. पहिल्यांदा त्याने उद्यान प्रदेश व पठाराच्या मधील पर्वत ओलांडला तेव्हा तो ज्या प्रदेशात गेला तो त्याच्या वर्णनाप्रमाणे "तेथे (पूर्वी) धर्मविवर्धन, वुयुचा मुल्लाचे, राज्य होते". यानंतर फाहेनचे वुयु संबंधी सर्व संदर्भ त्याने बांधलेल्या स्तूपांच्या संदर्भात येतात.

गांधार प्रदेशात तीन महिने काढल्यावर फाहेनचे तीन सोबती चीनला परतले. तेथून फाहेन व उरलेले यात्रेकरू पंजाबमधून प्रवास करत मथुरेला पोहोचले. ह्या राज्यांच्या शासकांची धर्मावर श्रद्धा होती. ते बौद्ध नव्हते पण संघाच्याप्रति श्रद्धा बाळगून होते. ते भिक्षुंना दान देत, त्यांच्या उपस्थितीत शिरस्त्राण काढून ठेवीत व स्वतःच्या हाताने त्यांना पिंडपात देत. ['सहत्ते' अर्थात स्वतःच्या हाताने देणे हे चांगल्या प्रकारे दिलेल्या दानाचे एक लक्षण मानले जाते.]

'फाहेन भारतात आला तेव्हा गुप्त घराण्यातील सर्वात प्रतापी राजा विक्रमादित्य राज्य करीत होता. याला चंद्रगुप्त असेही ओळखले जाते. चंद्रगुप्त मौर्य व या राजात गोंधळ होऊ नये म्हणून याला दुसरा चंद्रगुप्तही म्हट्ले जाते. कुषाणांच्या ऱ्हासानंतर गुप्त अधिकाधिक बलवान होत गेले व फाहेन आला तेव्हा गुप्त साम्राज्य सिंधुच्या मुखापासून गंगेच्या मुखापर्यंत पसरते होते. पुराणांमधे विक्रमादित्याला विष्णुचा उपासक सांगितले गेले तरी तो सर्व धर्मांचा सन्मान करत असे. फक्त वर्णांच्या बाबतीत त्याचे विचार कडवे दिसतात.

इ. स. ४०४ चा उन्हाळा फाहेनने संकिसाला काढला. त्याला माहीत होते की ती ही जागा होती जेथे बुद्ध त्याच्या आईला सडर्म शिकवून तिहेरी शिंडीने स्वर्गातून परत पृथ्वीवर आला होता.

फाहेन लिहितो की संकिसाला राजा वुयु याने खूप पूर्वी एक मोठा विहार बांधला होता. तेथे शिडीच्या मधोमध उभ्या बुद्धाची सोळा हात (०५७) उंचीची मूती होती. त्या विहाराच्या मागे त्याने पाषाणाचा स्तंभ उभा केला होता ज्याची उंची पन्नास हात होती. वुयु हे अशोकाचे चिनीनाव आहे. हा अशोकाच्या स्तंभाचा सर्वात जुना संदर्भ आहे.

फाहेनने त्यानंतर शाक्यवमुनी बुद्धाच्या जीवनाशी संबंधित अनेक स्थळांना भेट दिली. यात अर्थातच चार सर्वात पवित्र मानल्या गेलेल्या जागा होत्या-लुंबिनी जेथे सिद्धार्थ गौतमाचा जन्म झाला होता; बोधगया जेथे त्याला संबोधि प्राप्त झाली व तो बुद्ध झाला; सारनाथचे मृगदाय (मिगदाय) जेथे त्याने पहिले प्रवचन "धर्मचक्रप्रवर्तनसूब (धम्मचक्कप्पवत्तनसुत्त)' दिले; आणि कुसीनारा (कुशीनगर) जेथे बुद्धाचे महापरिनिर्वाण (महापरिनिब्बान) झाले. यातील पहिल्या स्थळी गेल्यावर तो दक्षिणेकडे आता व पाच नद्यांच्या संगमाच्या ठिकाणी त्याने गंगा पार केली. ही जागा मगधाची राजधानी पाटलिपुत्राच्या वरच्या बाजूला होती.

फाहेन लिहितो की तेव्हा ती वुयुची राजधानी होती. त्याचे महाल व सभागृह अजूनही शाबूत होते. शहराच्या उंच भिंती व भव्य दरवाजे अजूनही चांगल्या स्थितीत होते. सर्वत्र इतकी सुंदर शिं' होती की "ते कुण्या मानवी हातांचे काम असणे शक्यध नव्हते." फाहेनने त्यामुळे जाहीर केले की हे सर्व वुयुच्या आज्ञेप्रमाणे काम करणाऱ्या अतिमानवी शक्तींचे काम होते! पाटलिपुत्र व त्याच्या आजूबाजूला वुयुशी संबंधित अनेक जागा होत्या. यांत शहराच्या मधोमध एक कृत्रिम टेकडी होती जी अशोकाने त्याच्या भिक्षु असलेल्या लहान भावाला एकांत मिळावा यासाठी तयार केली होती. शहराच्या बाहेर एक विशाल स्तूप होता. हा बुद्धाच्या शरीरथातुंच्या विभागणीनंतर ते ज्या आठ स्तूपांत ते ठेवले होते त्यापैकी एक होता. अशोकाने या स्तूपांना उघडून त्यातील धातु इतर स्तूपांमधे वाटले होते. पाटलिपुत्रचा स्तूप सर्वात प्रथम उघडला गेला होता. फाहेनने त्याच्या जवळ दोन स्तंभ पाहिले जे वुयुचे म्हटले जात होते. यातीत्त पहित्ता चौदा-पंधरा हात व्यासाचा व तीस हात उेचीचा होता. त्यावर कोरले होते, "वुयुने जम्बुद्दीप संघाला दान दिले व पैसे देऊन परत घेतले. हे त्याने तीन वेळा केले." दुसरा स्तंभही तेवढ्याच उंचीचा होता व त्याच्या शीर्षस्थानी सिंहाची मूर्ती कोरली होती. या स्तंभलेखात राजा वुयुने गाव बांधल्याबद्दल व ते कुठल्या दिवशी, कोणत्या महिन्यात व वर्षात बांधले याची माहिती होती. वुयुच्या या स्तूपाच्या शेजारी एक महायान विहार होता. फाहेन तेथे तीन वर्ष राहिला. तेथे तो संस्कृत शिंकला व त्याने अनेक सूत्रांच्या नकला केल्या. येथील वास्तव्यात त्याने राजगीर (राजगृह, राजगह) व बोधगयेला तसेच बोधिवृक्षाला भेटी दिल्या.

फाहेनच्या वर्णनात या ठिकाणी तो, अशोकावदानमधे सांगितल्याप्रमाणे, वुयुचा इतिहास सांगतो. मागील एका जन्मात तो लहानपणी बुद्धाच्या भिक्षापात्रात मूठभर माती दान म्हणून देतो आणि त्या दानकर्मामुळे हा मुलगा जम्बुद्दीपावर राज्य करणारा लोह- चक्र असणारा राजा होतो.

लोह-चक्राचे विशेष असे की बौद्ध परंपरेप्रमाणे जेव्हा एखादा चक्रवर्ती राजा सिंहासनावर बसतो तेव्हा त्याला स्वर्गातून एक चक्र मिळते. हे सोन्याचे, चांदीचे किंवा तांब्याचे वा लोखंडाचे असते. चक्र कुठल्या धातुचे यावर त्या चक्रवती राजाचा राज्यकाळ व दर्जा ठरत असतो. अशा प्रकारे राजा वुयु चक्रवती सम्राट तर होता पण चक्रवर्तीच्यात काहीसा अपरिपूर्ण'.

इ. स. ४०७ मधे फाहेनने हळू-हळू व टप्या-टप्याने परतीचा प्रवास सुरू केला. त्यात त्याला चार वर्षे लागली. त्यातीत्त दोन वर्षे त्याने सिंहलट्वीपात घालवली. फाहेनने भारत सोडला त्यावेळी भारताच्या वायव्य सरहद्दीवर मध्य आशियातील भटके लोक होते. त्यांना चिनीये-ताय किंवा होआ म्हणत; युरोपात हून्स व भारतात हूण म्हणत. सन ४१० पर्यंत या हूणांची पहिली फळी बॅक्ट्रीया व गांधार येथे वसली होती. जेव्हा परत मोठ्या प्रमाणावर श्वेत हूणांचे आक्रमण झाले तेव्हा हे पसरत आतवर आले. पाचव्या शतकाच्या मध्यापर्यंत गुप्तांचे राज्य गंगेच्या मध्य खोऱ्यापुरतेच सीमित राहिले होते.

पर्शियात विसाव्या सस्सानींद सप्राटाने, नावाजलेला खुस्नोने, विविध भटक्या टोळ्यांच्या संघटनेशी युती करून श्वेत हूणांचा पाडाव केला. पण पूर्व गांधार व उत्तर भारतात काही ठिकाणी हूणांचे वर्चस्व टिकून राहिले. मध्य आशियातील इतर स्थलांतरीत टोळ्यांशी त्यांचा संघर्ष होत राहिला. या भागात मग अनेक लहान लहान संस्थाने तयार झाली. त्यांनी स्थानिक संस्कृतीचा स्विकार केला, ब्राह्मणांचे धार्मिक अधिकार मान्य केले व शुद्धीचे विविध कर्मकांडे करून त्यांनी स्वतःला अधिकृत क्षत्रिय राजपूत म्हणून घोषित केले! या नव्या क्षरियांपैकी सर्वात सामर्थ्यवान होता राजा हर्षवर्धन (Harsha, the Great). त्याने गंगेकिनारी कनौज येथून सहाव्या शतकात जवळपास चाळीस वर्षे राज्य केले.

हर्षाच्या उदयाचा काळ हा महम्मद पैंगबराच्या नेतृत्वाखाली अरबी एकतेचा, चीनमधे तांग राजघराण्याच्या सुख्वातीचा आणि काहीशा कमी प्रमाणात ब्रिट्नमधे तलहान-लहान अँग्लो-सॅक्सन संस्थानांच्या उदयाचा काळ होता.

एरवी कालगणनेच्या बाबतीत प्राचीन भारतीय इतिहास अंधुक व गोंधळात टाकणारा आहे. पण ह्याच काळात एक स्पष्ट उजेडाची तिरीप दिसते. याच काळात सर्वात महत्त्वपूर्ण बौदुध यात्रेकरू चिनी भिक्षु ह्युएन-त्संग भारतात आला. याचा जन्म पूर्व चीनमधे सन ६०२ मधे झाला होता. चीनमधील बौद्ध धर्माच्या सुवर्णकाळात वयाच्या विसाव्या वर्षी त्याने संघप्रवेश केत्ता. या काळात चीनमधे सप्राटांमागून सम्राट बौद्ध धर्माचा पुरस्कार करीत होते. लियांग घराण्याच्या वु-डी (५०२-५४९) याने अशोकाचा आदर्श समोर ठेवला होता. तो प्रयत्नपूर्वक अशोकाचा कित्ता गिरवत होता. त्याने भव्य विहार व स्तूपांच्या निर्मितीचा सपाटा लावला.

चीनमधे फाहेनमुळे ज्या देशात वुयु व कनिष्कासारखे चक्रवती धर्मराजे राज्य करतात असा पश्चिमेकडील स्वर्ग असे भारताबद्दल मत झाले होते. भारत हा धर्माचे मूळ अशी चीनमधे भावना होती. ह्याच भावनेने प्रेरीत होऊन ह्युएन-त्संग स्वतः बौद्ध ग्रंथाच्या शोधात भारताच्या प्रवासाला निघाला. तांग घराण्याचा सम्राट ताय-झोंग याने देशाट्नास प्रतिबंध केला होता. त्या बंदीला न जुमानता ह्युएन-त्संग सन ६२९तलला भारताकडे निघाला. त्याच्या चरित्रिकारानुसार ह्युएन-त्संग उंच व देखणा होता. त्याचे डोळे सुंदर नि वर्ण उजळ होता. त्याचा चेहरा गंभीर असे व त्याची वर्तणूक घरंदाज होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो खरोखर जिज्ञासापुरूष होता. त्याने भारतात येण्यासाठी फाहेनच्या मार्गापेक्षा अधिक उत्तरेकडील रस्ता निवडला. ह्युएन-त्संग तिएन-शान पर्वत ओलांडून सध्या मध्य आशियातील छोटे देश आहेत तेथे आला. त्याकाळी तेथे गोक्यर्क (दैवी तुर्क) लोकांचे वर्चस्व होते. तेथे त्याला विरोध झाला. मग तो जरा सुसह्य अशा सस्सानिदांच्या प्रदेशात गेला. येथे त्याला विखुरलेले भिक्षुंचे संघ दिसले जे हूणांची लूटमार सहन करूनही टिकले होते. हे भिक्षु पश्चिमेला समरकंद (Kangguo), बोखारा (Anguo) व पश्चिम अफगाणिस्तानातील ब (Talaquan) इथपर्यंत पसरले होते. येथेच ह्युएन-त्संग अभ्यासासाठी थांबता व त्याने आपल्या बौद्ध ग्रंथाच्या संग्रहासाठी महत्त्वपूर्ण ग्रंथ

मिळवण्यास सुरूवात केली. मग ह्युएन-त्संग फाहेनच्या प्रवास-मार्गावव आला आणि त्याने बामियानच्या दोन प्रचंड बुद्ध मूर्ती पाहिल्या. तेथे त्याने "अनेक विहार पाहिले ज्यांत हजारो भिक्षु रहात होते". तेथून तो गांधारची उन्हाळी राजधानी कपिशा (बेग्राम) येथे गेला. त्यावेळीही तेथे बौद्ध राजा राज्य करत होता. "तो त्याच्या प्रजेवर प्रेम करतो व तिची काळजी घेतो. तो जिरत्नांचा (बुद्ध, धर्म, संघ) सन्मान करतो." कपिशेहून हा चिनीभिक्षु उंच पर्वतकडे ओलांडून पूर्व गांधारात, भारतीय प्रदेशात, प्रवेश करतो.

आपल्या प्रवासवर्णनात ह्युएन-त्संगने भारतीय लोकांची व त्यांच्या रीतिरिवाजांची विस्तृत माहिती दिली आहे. हे लेखन त्याने भारतातून चीनत्ता परतल्यावर सम्राट तायझोंगच्या आज्ञेनुसार केले. सम्राटाला खूष करण्यासाठी ह्युएन-त्संगने सम्राटाच्या मनातील भारत व सत्य परिस्थिती यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला. जेव्हा जेव्हा सप्राटाला अपेक्षित वर्णन वस्तुस्थितीत्ता धरून नव्हते तेव्हा तेव्हा त्याने तपशीलात बदल केला. तरीही हे स्पष्ट होते की ह्युएन-त्संगल्ला भारतात बौद्ध धर्म उतरंडीवर घसरू लागलेला होता व ब्राह्मणी धर्माचा उत्कर्ष सुरू झालेला दिसला. पुरूषपुर (पेशावर) हे फाहेनच्या काळात एक भरभराटीला आलेले बौद्ध केंद्र होते. ह्युएन- त्संग गेला तेव्हा ते ओसाड पडले होते व तेथील स्तूपांची पडझड सुरू झाली होती. कनिष्काची सर्वोत्तम बौद्ध संपदा असलेल्या बुद्धाच्या भिक्षापात्राची स्थापना ज्यात केली होती त्या विशाल स्तूपाचा केवळ पाया शि कं होतां. ते पात्र पर्शियाला नेण्यात आले होते. पुरुषपुरहून ह्युएन-त्संग उत्तेरेला मालाकंद पर्वतांची रांग ओलांडून उद्यान प्रदेशात आला. तेथेही त्याला सर्वर पडझड दिसते. "सुबवस्तु (स्वात) नदीच्या दोन्ही बाजूला पूर्वी चौदाशे विहार होते पण आता त्यातील अनेक ओसाड पडले आहेत". पूर्वेकडे प्रवास करत ह्युएन-त्संग मो-हा-फा-न (संस्कृत महावनचे चिनीरूप) पर्वत जो पुढे महाबन म्हणून ओळखला जाऊ लागला येथे पोहचला. तेथे शिंबि (सिवि) जातकातील बोधिसत्त्व कबुतराला ससाण्याच्या तावडीतून सोडविण्यासाठी त्याच्या मांडीचे मांस कापून देतो त्या स्थानी राजा वुयुने बांधलेल्या स्तूपाची त्याने पूजा केली.

ह्युएन-त्संगच्या प्रवासवर्णनात वुयु-वानचा हा पहित्ता उ 'ख होय. यानंतर मग बऱ्याचदा वुयुचे नाव येते. ह्युएन-त्संग असे भासवतो की राजा वुयुचा प्रभाव अजूनही भारतात दिसतो पण प्रत्यक्षात त्याची स्तूपादि स्मारके ओसाड व दुर्लक्षित दिसतात. त्याच्या मुद्याला पुष्टी मिळावी म्हणून ह्युएन-त्संग वुयुच्या ऐतिहासिक स्त्रोतांवर आधारीत अनेक कथा सांगतो. हे स्त्रोत तसेच फाहेन व ह्युएन-त्संगची प्रवास वर्णने पश्चिम जगताला अनेक शतकें अज्ञात राहिली.

सिंधु पार करून ह्युएन-त्संग एकेकाळच्या महान तक्षशिला शहरात आतला. येथेही त्याला अवकळाच दिसली. तेथे त्याने अनेक स्तूप पाहिले ज्यापैकी नैक्रत्येकडील एक स्तूप अशोकाने बांधला होता. या ठिकाणी त्याचा पुत्र कुणालाचे डोळे काढले गेले होते. त्याच्या

दुष्ट सावत्र आईच्या सांगण्यावरून कुणालाचे डोळे कसे काढण्यात आले होते ती गोष्ट ह्युएन-त्संग येथे सांगतो.

तक्षशिलेहून ह्युएन-त्संग काश्मीरला गेला. तेथे तो तेथील बौद्ध राजाचा अतिथी म्हणून राहिला. तेथेही त्याला त्याने बांधलेले स्तूप व विहार यांवरून राजा वुयुचा प्रभाव दिसला. ह्युएन-त्संग परत एकदा मगधराज वुयुची थोरवी सांगतो. "तो चारी प्रकारे जन्मलेल्या प्राण्यांचे संरक्षण करतो". [पृथ्वीवर चार प्रकारचा जन्म घेणारे प्राणी मानले जातात - जरायुज, अंडज, स्वेदज और उद्भिज.] ह्युएन-त्संग येथे एक अशी कथा सांगतो की राजा वुयु एकदा पाखंडी स्थविर भिक्षुच्या शिष्यांना गंगेत बुडवून मारण्याची आज्ञा देतो. ते काश्मीरला पळून जातात व परत यायला नकार देतात. मग राजा स्वतः त्यांची क्षमायाचना करायला काश्मीरला येतो आणि त्यांच्यासाठी काश्मीरमधे पाचशे विहार बांधून देतो.

ह्युएन-त्संगने हिमालयात तीन वर्षे सूत्ांचा अभ्यास केल्यानंतर गंगेच्या वरच्या खोऱ्यात आपली यात्रा चालू ठेवली. त्यात्ता सर्वन बौद्ध धर्माचा ऱ्हास झालेला दिसता. पण कपिशाला पोहोचल्यावर त्याच्या आशा प वीत झाल्या. हे शहर फाहेनच्या काळात संकिसा म्हणून ओळखले जात होते. येथे शाक््यबमुनी बुद्ध दिव्य शिंडीने स्वर्गातून पृथ्वीवर उतरत्ता अशी दंतकथा आहे. ह्युएन-त्संग येथे पोहोचला तोवर ती शिंडी नाहीशी झाली होती. पण "राजा वुयुचा स्तंभ व त्यावरील सिंहाची मूर्ती तशीच होती". ह्युएन- त्संगच्या मते हा स्तंभ सत्तर फूट उंच होता-- "गडद जांभळ्या रंगाच्या चमकदार सूक्ष्म रवेदार पाषाणाचा. त्याच्या वर बसलेल्या सिंहाची मूर्ती शिडीच्या दिशेने तोंड केलेली. स्तंभावर सर्वत्र विचित्र काहीतरी कोरलेले होते."

चिनी यात्रेकरू आता भारतातील सर्वात बलशाली सम्राट हर्षवर्धनच्या (Harsh, the Great) राज्याच्या सीमेवर पोहोचता. सन ६३६ ला तो कनौजता पोहोचला तेव्हा त्याला सप्राटापुढे हजर केले गेले. सप्राटाने त्याला त्याच्या देशाविषयी अनेक प्रश्न विचारले. त्यानंतरही ह्युएन-त्संग हर्षवर्धनला भेटत्ता. तो हर्षवर्धनाच्या व्यक्तिमत्वामुळे व त्याच्या तत्त्वारधिष्ठीत जीवनप्रणालीमुळे प्रभावित झाला. ह्युएन-त्संगसाठी ही तत्त्वे वुयु- वानच्या आदर्शांसारखीच होती. हर्षवर्धनने स्वतःला बौद्ध न म्हणवता बुद्धाचीच तत्त्वे अंगिकारली होती.

'पण जसजसा ह्युएन-त्संग आजच्या उत्तरप्रदेश व बिहारमधे प्रवास करीत गेला तसतसा त्याला बौद्ध धर्माचा ऱ्हास स्पष्ट दिसू लागला. ह्युएन-त्संग एकीकडे त्या प्रदेशातील [याला पालि साहित्यात मज्झिंम देस म्हणतात] वैभवशाली बौद्ध इतिहासाचे वर्णन करतो तर दुसरीकडे त्याला दिसणारे स्तूप आणि विहार ओसाड व पडझड झालेले दिसतात. मोठमोठे भूप्रदेश निर्जन झालेले दिसत होते. तरीही सर्वजन चिनी यात्रेकर्ला वुयु-वानच्या प्रभावाचा वारसा स्पष्ट जाणवत होता. श्रावस्ती शहर उजाड झाले होते पण तेथील जेतवन

विहाराच्या पूर्व प्रवेशद्वाराबाहेर त्याला दोन सत्तर फूटी स्तंभ दिसले, "डाव्या स्तंभाच्या शीर्षस्थानी चक्र आहे तर उजव्याच्या वर एक वृषभाचे शि आहे." बुद्धाचे बालपण जेथे गेले ते कपिलवस्तूही उजाड झाले होते पण तेथेही बाहेर त्याला असेच दोन स्तंभ दिसले. दोहोंवर सिंहाचे शि व शिलालेख होते. तेथून जवळच लुंबिनी सरोवराजवळ सिद्धार्थाच्या जन्मस्थानी एक स्तंभ व स्तूप उभारण्यात आला होता. ह्युएन- त्संगच्या म्हणण्यानुसार एका ट्रेंगनने स्तंभाचे मात्र दोन तुकडे केले होते.

जसाजसा तो बिहारमधे दक्षिणेकडे जाऊ लागला तसतसे ह्युएन-त्संगला राजा वुयुचे इतर स्तंभ दिसले-- एक शाक्ययमुनी बुद्धाच्या परिनिर्वाणाच्या जागी कुशीनगर (कुसीनारा) येथे मोठ्या स्तूपाशेजारी "एक स्तंभ असून त्यावर तथागताच्या निर्वाणाची नोंद आहे"; एक स्तंभ शाक््य मुनींच्या चितेच्या स्थळी; एक चंदु देशात ज्यावर एक सिंहाचे शि होतेव 'देत्यांना पराभूत केल्याची" माहिती कोरलेली होती; एक लिच्छवींनी त्यांना मिळालेल्या धातुंच्या आठपैकी एका भागावर वैशाली येथे "पन्नास-साठ फूट उंच व त्यावर सिंहाची मूर्ति असलेला स्तंभ"; वाराणसीच्या बाहेर दोन स्तंभ "एक वरूणा नदीच्या पश्चिमेला तर एक पूर्वेला, यातील पहिला आरशासारखा गुळगुळीत होता" आणि तो वुयुने बांधलेल्या शंभर फूट उंच स्तूपाच्या समोर होता. दुसरा बुद्धाने जेथे धर्मचक्रप्रवर्तनाचे प्रवचन त्याच्या पहिल्या पाच शिष्यांना दिले होते त्या सारनाथच्या मृगदाय (मिंगदाय) वनामधे होते. ह्युएन-त्संग लिहितो--

त्या विशाल परिसरात... एक दोनशे फ़ूटाहून उंच स्तूप आहे ज्याच्या माथ्यावर आंब्याचे शि कोरलेले आहे... त्याच्या वायव्येला राजा वुयुने बांधलेत्ता दगडी स्तूप आहे. ह्याचा पाया खचला आहे तरीही उरलेला भाग शंभर फूट उंच आहे. त्याच्यासमोर एक सत्तर फूट उंच दगडी खांब आहे जो जेडसारखा गुळगुळीत नि आस्शासारखा चमकणारा आहे. या ठिकाणी तथागतांनी सम्यक संबोधि मिळाल्यानंतर धर्मचक्रप्रवर्तन केले.

तेथून उत्तरेला प्रवास केल्यावर ह्युएन-त्संग नेपाळला पोहोचला. त्याने पाहिले की तेथील लिच्छवी राजा पूर्ण बौद्ध होता तर त्याच्या प्रजेत बौद्ध व हिंदू यांचे मिश्रण होते. "बौद्ध विहार व हिंदू मंदिरे एकमेकांच्या अगदी जवळ-जवळ, एकमेकांना चिकटून आहेत". त्यानंतर ह्युएन-त्संग भारतातील पठारांकडे परततलता व गंगा पार करून पाटलिपुत्राला आला. एके काळची ही वैभवशाली नगरी आता उजाड झाली होती. "(तेथे) शेकड्यांनी विहार, मंदिरे व स्तूप यांचे पडझड झालेल्या अवस्थेतील अवशेष होते; फक्त दोन-तीनच इमारती शाबूत होत्या".

ह्युएन-त्संगत्ता ह्या अवशेषांमुळे फाहेनचे वर्णन ताडून पहाता आले व वुयुच्या काळात ते शहर कसे असेल याचा अंदाज करता आला. येथे त्यातला (फाहेनच्या वर्णनानुसार) अशोकाच्या यातना-गृहाची जागाही सापडली तेथे एक स्तंभ उभा होता.

शहराच्या दक्षिणेला फाहेनने वर्णन केलेला धातुगर्भ स्तूपही सापडला. तो आता एका बाजूने पाया खचल्यामुळे उपड्या पडलेल्या भिक्षापात्रासारखा दिसत होता. चकाकणारा दगडी खांब तसाच होता पण त्यावरील कोरीव लिखाण अस्पष्ट झालेले होते.

शहराच्या नैक्रत्येला कुक्ुकु टाराम हे ह्युएन-त्संगने पाहिलेले शेवट्चे अशोककालीन अवशेष. हा विहार अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर लगेचच बांधला होता. येथीत्त बौद्ध संगायनात एक हजार मिक्षु व उपासकांनी भाग घेतला होता. मरणासन्न अशोकाने त्याच्या शेवटच्या दिवसांत त्याची एकमात्र 'मालमत्ताः असलेला अर्धा आवळा ह्याच विहाराला दिता होता. त्याचे स्मारक म्हणून येथे आमलक स्तूप उभारण्यात आला होता.

ह्युएन-त्संग शेवटी बोधगयेला गेला. तेथे मंदिर व बोधि वृक्षाला वाळूच्या टेकाडांनी घेरलेले पाहून त्याला दुःखद आश्चर्याचा धक्का बसला. तो लिहितो, “असे म्हणतात की जेव्हा (या मंदिरावरील) बोधिसत्त्वाचे पुतळे दिसेनासे होतील तेव्हा बुद्ध धर्माचा अंत होईल. आता दक्षिणेच्या कोपऱ्यातील पुतळा छातीपर्यंत पुरता गेला आहे.” मग तो अशोकावदानात उ 'ख नसलेल्या अशोकाच्या कृत्यांचे तपशीलवार वर्णन करतो.

जेव्हा राजा वुयु सिंहासनावर बसत्ता तेव्हा त्याची पाखंडी विचारांवर श्रद्धा होती आणि त्याने बौद्ध वास्तुंची तोडफोड केली होती. त्याने आपले सैन्य पाठवले व तो स्वतः बोधिवृक्ष तोडण्यासाठी गेला. त्याने मुळे, बुंधा, फांद्या व पाने सर्व तोडली व मंदिराच्या दक्षिणेला शंभरएक पावलांवर त्यांचा ढिंगारा केला. मग त्याने अग्निहोत्री ब्राह्मणांना ते त्यांच्या देवासाठी जाळायला सांगितले. पण तो अग्नी व धूर संपण्याच्या आधीच त्या अग्नीत दोन तजेलदार हिरवे वृक्ष जोमाने फुटले.

हा चमत्कार पाहिल्यावर राजा वुयुला पश्चाताप होतो व तो उस्लेल्या मुळांना दूध घालतो. त्या वृक्षाच्या पूजे-अर्चेत इतका मग्न होतो की घरी जायचेही विसरतो. त्यामुळे त्याची पत्नी बोधिवृक्षाला नष्ट करायचे ठरवते.

पाखंडी विचारांच्या राणीने एका माणसाला रात्री गुप्तपणे तो वृक्ष तोडायत्ा पाठवले. जेव्हा राजा वुयु वृक्षाच्या पूजेसाठी गेला तेव्हा त्या वृक्षाचा फक्त बुंधा शि क राहिलेला पाहून अत्यंत दुःखी झाला. त्याने मनःपूर्वक पूजा करून त्या वृक्षाला मधुर दूध घातले. आणि काही काळातच बोधि वृक्ष परत वाढू लागला. अत्यंत आदराने व विस्मयपूर्वक अशोकाने झाडाभोवती दहा फूटाहून अधिक उंचीच्या भिंती बांधल्या. हे दगडी भिंतीचे कुंपण आजही टिकून आहे.

ह्युएन-त्संग लिहितो की नुकताच परत बोधिवृक्षावर हु झाला होता. यावेळी हु करी होता बंगालचा राजा शशांक. याने सम्राट हर्षवर्धनाच्या मोठा भाऊ राज्यवर्धनाची हत्या केलेली होती. ह्युएन-त्संग शशांकचे वर्णन “पाखंडी विचारांचा दुष्ट राजा? असे करतो. शशांक निस्सीम शिवभक्त होता व तेवढाच कडवा बुद्धविरोधक. त्याने बंगाल व बिहारमधे बौद्ध विहारांना नष्ट करण्याचा सपाटा लावला. बोधिवृक्षाच्या तर तो खूपच विरोधात होता. त्याने तो वृक्ष तोडला, त्याला आग लावली व त्यानंतर त्यावर ऊसाचा रस ओतला जेणेकरून वृक्ष परत फुटू नये. ह्युएन-त्संग लिहितो, “अनेक महिन्यांनी वुयुचा शेवटचा वंशज असलेला मगधचा राजा पूर्णवर्मन दु:खाचा सुस्कारा टाकून म्हणतो, *प्रज्ञासूर्य मावळता आहे आणि फक्त बोधिवृक्ष शि क होता. आता तोही नष्ट करण्यात आला आहे. जगात बघायला काय शि क आहे'?”

राजा पूर्णवर्मन मग त्या वृक्षाला हजारो गायींचे दुध घालतो आणि वृक्ष एका रात्रीतून दहा फूट वाढतो. त्यानंतर तो वृक्षाभोवती नवीन चोवीस फूट उेचीच्या भिंतीचे कुंपण घालतो. “अशा प्रकारे बोधिवृक्ष आता दगडी भिंतीच्या पलिकडे आहे. त्याच्या फांद्या भिंतीच्या वर जवळपास दहा फ़ूट वाढल्या आहेत.”

बोधगयेच्या भेटीनंतर चिनी यात्रेकरूने बौद्ध ग्रंथांच्या अभ्यासात तीन वर्षे घालवली. ह्या काळात तो नालंदाला राहिला. नालंदा त्या काळात बौद्ध अभ्यासाचे सर्वात मोठे केंद्र होते व तेथे संपूर्ण आशिया खंडातील विद्यार्थी येत असत. ह्युएन-त्संग सांगतो की हे विद्याथी अत्यंत अभ्यासू विद्वान होते. त्यांचे सहकारी त्यांच्या गुणवत्तेचा सन्मान करत व त्यांची कीर्ति देशाबाहेरील शेकडो प्रदेशात पसरली होती. शेकडो वर्षांच्या बौद्ध विचार व तत्त्वज्ञानांचा वारसा नालंदाला व नालंदाच्या शेजारील संलग्न विहारांना लाभला होता. यामुळे ह्युएन-त्संग जेव्हा ६४० साली मगध सोडून गेला तेव्हा त्याने अनेक संस्कृत ग्रंथ व सूत्रांची हस्तलिखिते आपल्याबरोबर नेली. तसेच तो योगाचार या बौद्ध तत्त्वज्ञानात पारंगत झाला. त्याच्यामुळे योगाचार परंपरा मग चीन व पुढे कोरिया व जपान येथे पसरली.

त्यानंतरही ह्युएन-त्संगने तीन वर्षे प्रवास केला व त्यानंतरच तो चीनत्ता परतला. तो पूर्व चीनच्या शिंयान येथे सन ६४५ला पोहोचला तेव्हा त्याच्या आगमनाने चीनच्या बर्यारच भागांत आनंदोत्सव साजरा झाला. सम्राट तायझोंगच्या मानमरातबाकडे पाठ फिरवून तो शियानच्या बाहेर नवीनच बांधलेल्या दा चिएन ह्या विहारात शिकवण्यासाठी व ग्रंथांचे अनुवाद करण्यासाठी राहू लागला. येथे त्याने भारतातून बरोबर आणलेल्या ग्रंथसंपदेसाठी व त्याच्या अनुवाद कार्यासाठी 'दायेन ता? म्हणजे जंगली हेसाचा पॅगोडा बांधला. ह्युएन-त्संगचा ६६४ मधे मृत्यु झाला पण तोवर हा विहार हिमालयाच्या उत्तरेकडील बौद्ध अभ्यासाचे सर्वात महत्त्वाचे केंद्र झाला होता. येथे पन्नास भाषांतरकार रहात असत. ह्या सगळ्यांना ह्युएन-त्संगने स्वतः संस्कृत शिकवलेले होते. ह्या काळात त्याने सम्राटाच्या आज्ञेवरून दा तांग शियो ती (Great Tang Records of the Western Regions) हा ग्रंथ लिहित्ता जो पुढे खूप लोकप्रिय झाला.

तांग घराण्याच्या सामर्थ्यशाली मध्यवर्ती शासनामुळे बौद्ध धर्माचा चीनमधे जोरदार प्रसार झाला. पण ''तिसरे संकट' आल्यामुळे ह्याला अचानक खिळ बसली असे चिनीबौद्ध स्त्रोत सांगतात. हे ''तिसरे संकट' होते सम्राट वु-त्संगने सुरू केलेली बौद्धांची छळवणूक. त्यानंतरच्या अंधकारमय शतकांमधे ह्युएन-त्संगचे व्यक्तित्व जनमानसाच्या मनांत एक मिथक बनत्ले व लोकप्रिय मिंग कांदबरीत (शियू-जी, अर्थात पश्चिमयात्रा) ते भिक्षुंचे निपिटक बनले. अलिकडच्या शतकांत ही कादंबरी मर्कट-राजा म्हणून प्रसिद्ध झाली. हिच्या आधारावर प्रसिद्ध टीव्ही मालिका Monkey तयार केली गेली जिचा आपला एक विशेष प्रेक्षकवर्ग तयार झाला होता.

मध्य साम्राज्याची (चीनची) अलिप्तता व तेथील सप्राटांची बाहेरच्या जगाबद्दल्लची उदासीनता यामुळे ह्युएन-त्संग व फाहेनची प्रवासवर्णने बाहेरच्या जगासाठी एकोणीसाव्या शतकापर्यंत अज्ञात राहिली.

सन १८४श्मधे ह्युएन-त्संग व फाहेनच्या भारतातील प्रवासवर्णनांचे (Great Tang Records of the Western Regions and Record of Buddhistic Kingdoms) काही मनोवेधक भाग फ्रांसच्या शैक्षणिक नियतकालिकांत प्रकाशित होऊ लागले होते. भारतात जेम्स प्रिन्सेपचा शिष्य अलेक्झांडर कनिंगहॅम याने त्याकडे पहिल्यांदा लक्ष दिले. सन १८४र्मधे त्याने संकिसाचे प्राचीन नगर (जेथे बुद्ध स्वर्गातून धरतीवर उतरत्ता होता) फाहेनच्या वर्णनावरून यशस्वीरित्या शोधून काढले व फाहेनचे वर्णन अचूक असल्याचा विजयी निर्वाळा दिला. फाहेनने लिहिले होते की संकिसा कनौजपासून वायव्येला सात योजनांवर आहे. कनौजला अवकळा आली होती तरी हे गाव अजून टिकून होते. कनिंगहरंमने तेथून शोध सुरू केला. योजन भारतातील अंतर मोजण्याचे जुने परिमाण होते-- राजसेना एका दिवसात जितके अंतर चालून जाईल तितके अंतर म्हणजे योजन. कनिंगहमने हे सात मैल गृहित धरले. त्या दिशेला पन्नासएक मैल घोडदौड केल्यावर तो संकस्स नावाच्या एका छोट्याशा खेड्यात पोहोचला. त्याने नंतर लिहिले, ''हे जेमतेम पन्नास-साठ घरांचे खेडे पूर्वी कि 1 असलेल्या एका टेकाडावर वसले होते पण त्याच्या सर्व बाजूंना सहा मैलांपर्यंत अनेक विटा व मातीचे ढिगारे होते जे प्राचीन शहराची तटबंदी मानली जाते''.

ह्या शोधाने प्रेरीत होऊन कनिंगहैमने ईस्ट इंडिया कंपनीत्ता एक पुरातत्त्व संशोधक नेमण्याची विनंती केली. अशी सुयोग्य व्यक्ति जी ''ह्युएन-त्संग व फाहेनच्या 'पाऊलखुणांचा मागोवा घेईल''. त्याचे आवाहन कुणी ऐकले नाही. चार वर्षांनी त्याने परत एकदा आवाहन केले व जाहीर केले की भारतातील पुराण अवशेषांचे जतन करणे हे कंपनीचे भारतातील राजसत्ता म्हणून महत्त्वाचे कर्तव्य आहे. हे कर्तव्य जितके त्ववकर कंपनी पार पाडेल तितके चांगले! त्याने लिहिले, ''अठरा पुराणांतील्ल सर्व निर्थक माहितीच्या प्रकाशनापेक्षा भारतातील सर्व स्मारकांचा व शि चा, नाण्यांचा व लेखांचा शोध

व त्यांचे प्रकाशन यामुळे भारताच्या सार्वजनिक व वैयक्तिक प्राचीन इतिहासाबद्दल खचितच कितीतरी पट अधिक माहिती मिळेल''.

पुराणांवरचे त्याचे भाष्य म्हणजे पुराणांच्या भाषांतराशी संलग्न असलेल्या प्रा. हॉरेस हेमन विल्सन यात्ता सरळसरळ टोमणा होता. आणि तो टोमणा बरोबर लागला! कंपनीच्या लंडनमधीत्त संचालकांनी ठरविले की एक पुरातत्त्व संशोधक (हलाव8०00ां०4। १५७) आवश्यक आहे. त्यांनी प्रा. विल्सनचा स घेतला. हे पद जेम्स प्रिन्सेपचाच शिष्य कॅप्टन मार्खमला मिळाले. यामागे एक कारण होते, ते म्हणजे त्याने केलेले भाब्रा शिलालेखाचे (आज ज्याला बैराट-कोलकाता लघु शिलालेख म्हणतात) भाषांतर. रॉयल इंजिनिअर्सच्या उत्साही कॅप्टन थॉमस बर्टला जुन्या जयपूर-दि) रस्त्यावर राजस्थानच्या सीमेनजीक ''बीजक की पहाडी'' (लेखाची टेकडी) वर एका राखाडी ग्रॅनाईटवर हा शिलालेख सापडला होता. ह्या पाषाणाचा एक भाग घासून गुळगुळीत करण्यात आला होता व त्यावर ब्राह्मी लिपीत आठ ओळी कोरलेल्या होत्या.

ह्या छोट्याशा शिंलालेखामुळे कनिंगहम व किट्टो यांच्यात एक सुसंस्कृत स्पर्धा सुरू झाली होती. कनिंगहॅम सव्वीस वर्षाचा महत्त्वाकांक्षी, उच्च वर्गात संबंध असलेला तरूण होता. तो बर्याकच वेळा त्याच्या सैनिकी कर्तव्यांपेक्षा भारतीय विद्येलाच जास्त महत्त्व देत असत्ला तरी त्याच्याबद्दल सैन्यात व राजकीय क्षेत्रात चांगले मत होते. किट्टो त्याच्यापेक्षा सहा वर्षे मोठा होता. किट्टो औपचारिक शिक्षण नसलेला, ''स्वतःच अभ्यास करून संशोधक झालेला, संस्कृतचा अभ्यास नसलेत्ता व भाषेवर फारसे प्रभुत्व नसलेत्ता'' असा होता. त्याची कोर्ट मार्शलमधीत्त शिक्षा स्वतः गव्हर्नर जनरततने रहबातल ठरविली पण त्याच्याकडे सैन्याधिकारी संशयानेच पहात. तरीही सुरूवातीला ह्या दोहोंत मार्खम किट्टो त्याच्या बैराट-कोलकाता लघुशिलालेखाच्या भाषांतराच्या 7२॥६३मधील प्रकाशनानंतर वरचढ होता.

'किट्टोने भाषांतर ''कमल्लकांत या विद्वान पंडिताच्या मदतीने' केले होते व नंतर ते का निक भरारी असल्याचे सिद्ध झाले कारण, विठ्ठान असो वा नसो, त्या पंडिताला तो शिलालेख वेदांमधीत्त क्रचा असल्याचे वाटले होते. किट्टो गोंधळात पडला कारण यापूर्वीचे अशोकाचे सर्व शिलालेख व स्तंभलेख भव्य होते व हा आठ ओळींचा शिलालेख तुलनेने खूपच प्राथमिक वाट्त होता. इतर सर्व शिलालेखांची सुख्वात ''देवानांपिय पियदसी राजा हेवं आह'' (देवांना प्रिय प्रियदर्शी राजा असे म्हय्ला) अशी होती तर येथे सुरूवातीची ओळ होती ''पियदसी लाजा मगे संघं अभिवादेनं'' (मगधचा प्रियदर्शी राजा संघाला अभिवादन करतो).

फ्रेंच विद्वान बुहनुफने या लेखाचे अधिक अचूक भाषांतर केले तेव्हा लक्षात आले की ही राजाज्ञा होती व बौद्ध संघाला उद्देशून होती. येथे अशोक भारतीय उपखंडाचा सम्राट म्हणून नाही तर मगधचा राजा या भूमिकेतून बोलत होता. प्रथम जिरत्नांना (बुद्ध, धम्म व

संघ) अभिवादन करून नंतर तो संघाला बुद्धाची (भगवता बुधेन) विशिष्ट धर्मसूत्र वाचायला सांगतो. मग तो सात सूत्रांची (सुत्तांची) नावे देतो जी भिक्षु, भिक्षुणी व उपासकांनी कायम ऐकावी व पाठ करावीत.

बौद्‌ विद्वानांमधे अशोकाने सांगितलेली ही सुत्ते नक्की कोणती याबद्दल एकमत नाही पण ती तुलनेने कमी महत्त्वाची सुत्ते असावीत. येथे एक प्रश्न उभा राहतो की मगधराजाने हा शिलालेख कोरून घेण्याच्या आटापिटा का केला असावा. उत्तर तेवढेच सरळ दिसिते-- ही बौद्ध संघाला आज्ञा होती की त्याने मगधराजाच्या मतानुसार बौद्ध धर्माचे पालन करावे.

बैराट-कोलकाताचे लेख केवळ बुहनुफ वगैरेसारख्या विद्वानांच्या या मताला पुष्टी देत होता की अशोक केवळ एक अत्यंत श्रद्धाळू बुद्धानुयायी नव्हता तर त्याने बौद्ध धर्माचा इतिहास त्यांच्या सक्रीय सहभागाने घडविलाही होता. त्याचा सहभाग इतका होता की तो संघाला कोणती सुत्ते पाठ करावीत याचाही स॒ 1 देतो (त्यांच्या काळात सर्व धर्मसूत्रे गुरुकडून शिष्याला मौखिक परंपरेतून शिकवली जात). प्रो. हॉरेस विल्सनलाही या शिंलालेखाचे नेमके भाषांतर झाल्यावर हे मान्य करावे लागले की पियद्‌्‌सी राजा हा बौद्ध सम्राट होता. तरीही तो ह्या मतात्ला चिकटून राहिला की पियदसी राजा कुणीही असो, पण अशोक नक्कीच नव्हता! एक बाब तेव्हा कुणाच्याही लक्षात आली नाही की हा शिलालेख नक्कीच अशोकाच्या सर्वात आधीच्या शिलालेखांपैकी आहे आणि एकच असा लेख ज्यात अशोकाने स्पष्टपणे बुद्धाचा उ 'ख केला आहे. यानंतर मात्र त्याने त्याचा धर्म (धम्म) केवळ बौौद्धांचाच नाही तर सार्वजनिक, सर्वसामावेशक असाच सांगण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.

किट्टोचा बैराट-कोलकाता शिलालेखाचा अनुवाद स्वैर होता, बिनचूक नव्हता. तरीही प्रा. विल्सन त्याने प्रभावित झाला. आणि म्हणून जेव्हा ह्युएन-त्संगच्या प्रवासाचा मागोवा घेण्यासाठी कनिंगहम व किट्टो या दोघांचीही नावे पुढे आली तेव्हा अधिक गुणवान उमेदवाराची निवड झाली नाही.

नवनियुक्त पुरातत्त्व संशोधक कनिंगर्हमवर कुरघोडी करायत्ता इतका आतुर होता की मे १८४६ मधे त्याची नेमणूक झाल्या झाल्या कडक उन्हाळा असून तो बिहारकडे निघाला. किट्टोकडे ना पुरेशी उपकरणे होती ना कर्मचारी वर्ग. पण त्याच्याकडे एक गोष्ट होती जी त्यांहूनही महत्त्वाची होती-- एबेल रेमुसातच्या Foe Koue Ki, ou Relations des Royaumes Bouddhiques चे इंग्रजी भाषांतर. हे त्याच्या जे. डब्लू. लैडली ह्या एशियाटीक सोसायटीच्या मित्राने केवळ त्याच्यासाठी करून दिले होते. फाहेनचे वर्णन अगदी अचूक होते व त्यामुळे किट्टोने दक्षिण बिहारमधीत्त शाक्यीमुनी बुद्धाशी संबंधित अनेक स्थळे शोधून काढली. पाटण्यात त्याच्या पदरी निराशाच पडली. तेथे किट्टोला पाटलिपुत्राच्या वैभवशाली गतइतिहासाच्या काहीही खुणा सापडल्या नाही. मगधची

पहिली राजधानी राजगीर (राजगृह) येथे मात्र त्याला फाहेनने वर्णन केलेल्या बऱ्याच जागा सापडल्या.


सन १८४७-८ च्या हिवाळ्यात कॅप्टन किट्टोने परत बिहारमधे त्याची भटकंती सुरू केली. बोधगया येथे त्याने तेथील बुद्धमंदिराच्या (आज ज्याला बोधगया म्हणतात) खालच्या भागात जमा झालेली वाळू साफ केली. तसे करतांना तेथील दगडी कुंपण उघडे झाले व त्यावरील कोरीव काम दिसू लागले. त्यांचे महत्त्व त्याला कळले नाही तरी त्याने त्यापैकी चाळीसपेक्षा अधिक शि ंची रेखाटने केली. त्यातील काही केवळ सजावटीसाठी मात्र होती--वेगवेगळे प्राणी व का निक पशू. इतर शिं मधे माणसे, स्तूप, बोधि वृक्ष, धर्मचक्र आदिंची पूजा करतांना दाखविले होते. त्यानंतर त्याने बाराबर व नागार्जुनी टेकड्यांमधील्त पाषाणगुफांचा काळजीपूर्वक अभ्यास केला. तेथे त्याला ब्राह्मी लिपीतील चार नवीन शिलालेख सापडले. त्याने मग आपण केलेल्या नकलांच्या प्रती सरळ युजेन बुहनुफला पाठविल्या. बुहनुफने लगेच स्पष्ट केले की यापैकी तीन लेख अशोकाच्या आज्ञेवरून लिहिले गेले होते व त्यात त्याने स्वतःचा उ ख फक्त राजा पियदसी असा केला आहे. देवानांपिय शब्द यात नव्हते. यातील दोन गुफांसाठी अशोकाने त्याच्या राज्यारोहणाच्या बारा वर्षांनी व तिसरीसाठी एकोणीस वर्षांनी त्याने दान दिले होते. बुहनुफने हेही सांगितले की या तीन गुंफांचे दान बौद्धांना, जैनांना वा हिंदूंना केले गेले नव्हते तर आजीविक नावाच्या एका नास्तिक संप्रदायाला केले होते. त्याचा संस्थापक मक्खा्लि गोसाल (मस्करी गोशाल) होता. हा बुद्ध व महावीर जैन यांचा समकालीन होता. तदवतर हेही लक्षात आले की अशोकाचा वंशज दशरथानेही तीन नागार्जुनी गुफांचे दान प्रिन्सेपल्ला वाटायचे त्याप्रमाणे बौद्धांना नाही तर आजीविकांना दिले होते. अशा प्रकारे आपण बघतो की अशोक व त्याचे वंशज बौद्धेतरांनासुद्धा राजाश्रय देत होते-हे शिलालेख ७ मधील अशोकाच्या मताप्रमाणेच होते.

किट्टोने बिहारचे सर्वेक्षण चालू ठेवले. पण त्याच्या कामाने तो वरिष्ठांना तो खूष करू शकता नाही व त्यामुळे त्यातला बनारसत्ता नवीन क्वीन्स कॉलेज बांधण्यासाठी पाठवण्यात आले. हे जोनाथन डंकनच्या संस्कृत कॉलेजच्या जागी निर्माण करण्यात येत होते. किट्टोला हे काम बि , लल आवडत नव्हते. त्याने कनिंग्हमला सांगितले की या कामामुळे त्याला पुरातत्त्व संशोधनाच्या कामाला बि ,, ल वेळ मिळत नव्हता. किट्टो त्यामुळे जास्तच व्यथित झाला होता कारण कनिंगहॅमला १८३५ साली धम्मेक स्तूपाच्या उत्खननाच्या वेळी जी गोष्ट माहीत नव्हती ती त्याला फाहेन व ह्युएन-त्संग यांच्या प्रवासवर्णनांमुळे कळली होती-- हे स्थान बुद्धाच्या चार प्रमुख पवित्र स्थळांपैकी एक होते. हे तेच मृगदाय (मिंगदाय) होते जेथे शाक्यमुनी बुद्धाने धर्मचक्रप्रवर्तनसुत्ताचा उपदेश दिला होता. ह्युएन-त्संगने ह्या जागेचे व तेथील दोन विशाल स्तूपांचे आणि 'जेडसारखा गुळगुळीत नि आरशासारखा चमकणारा? अशा अशोकस्तंभाचे विस्तृत वर्णन केले होते.


'किट्टोला सारनाथला उत्खननाची संधी शेवटी १८५१-२ च्या हिवाळ्यात मिळात्ती पण त्याने ती दवडली. याचे कारण त्याची खराब होत चाललेली तब्येत असावे. त्यात्ता तेथे भयंकर विध्वंसाखेरीज काही दिसले नाही व हातीही काही लागले नाही. "सर्वन लुटालूट व जाळपोळ; भिक्षु, मंदिरे, मूर्ती सर्वांचाच नाश झालेला. काही ठिकाणी हाडे, लोखंड, लाकूड व पाषाण यांचे मोठमोठे ढिगारे. आणि हे एकाहून अधिक वेळेला झालेले दिसत होते."

ही किट्टोची शेवटची कामगिरी होती. आता त्यालाही त्याचा आदर्श जेम्स प्रिन्सेपसारखीच आजाराची लक्षणे दिसू लागली आणि त्याचीही रवानगी इंग्लंडला करण्यात आली. तेथे तो लवकरच मृत्यु पावला. कनिंगहॅम त्याच्या मृत्युची बातमी ऐकल्यावर हळहळला, "बिचारा किट्टो!" पण आता कनिंगहॅमला पुरातत्त्व संशोधनात कुणीही स्पर्धक राहिला नव्हता.

११. अलेक्झांडर कनिंग्हेम द ग्रेट



महास्तूपाजवळील सिंहशीर्ष, तुटलेल्या दरवांजावरील आडवे दगड व शिल्पांचे इतर भग्नअवशेष. १८७०ला पुरातत्त्व संशोधक जोसेफ बेगलार याने काढलेले छायाचित्र. (APAC, British Library)



सन १८७५ ला जेम्स क्रॅडॉक याने काढलेले शाहबाझगड येथील हत्तीसशश पाषाणाचे छायाचित्र. याच्या पूर्वेकडील पृष्ठभागावर शिलालेख १ ते १९ कोरलेले आहेत. (APAC, British Library)

सन १८४५ व ९८४९ मधे ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याने दोन युद्धे जिंकली. यामुळे पंजाब कंपनीच्या ताब्यात आला व कंपनीची सत्ता वायव्येला खैबर-खिंडीपर्यंत प्रस्थापित झाली. मेजर अलेक्झांडर कनिंगहम या दोन्ही युद्धात लढला. पण दरम्यानच्या काळात त्याला लडाखला भारत व तिबेटमधील सीमा (आजही हा विवाद कायम आहे!) निश्चित करण्याच्या कामासाठी सरहद्द आयोगाचा प्रमुख म्हणून पाठवण्यात आले. हे अत्यंत खडतर काम होते तरीसुद्धा त्यातूनही वेळ काढून त्याने काश्मीर खोऱ्यातील मंदिरांचा अभ्यास केला. त्यांची वास्तुकला त्याला भारतीय पठारांवरील मंदिरांपेक्षा उच्च दर्जाची वाटली. त्याला वाटत होते की हे ऐतिहासिक ग्रीक प्रभावामुळे असावे. याबाबत तो चूक होता. तो श्रीनगरच्या शेजारील 'सॉलोमनचे तख्त' या हजार फूट उंचीच्या शिखरावर शंकराचार्याचे शिवमंदिर बघण्यासाठी चढून गेला. ह्या मंदिराला त्याचे नाव नवव्या शतकातील शंकराचार्यांवरून देण्यात आले होते. असे म्हटले जाई की हे मंदिर त्यांनी बांधले होते. पण जेव्हा स्थानिक ब्राह्मणांनीही ह्या मंदिराची निर्मिती जालुकाने केली असे सांगितले तेव्हा कनिंगहमला सुखद धक्का बसला. राजतरंगिणीमधे शेव जालुकाचे खूप गुणगान यासाठी गायले गेले होते की त्याने त्याच्या वडिलांच्या (अशोकाच्या) अतिरेकी बौद्ध अभिनिवेशानंतर काश्मीरात परत हिंदु धर्माची स्थापना केली होती.

कनिंगहम पंजाबच्या उत्तरसीमेवरीत्त एका पुरातत्त्व स्थळाला भेट द्यायला विशेष आतुर झाला होता. हा JRAS मधे नुकत्याच प्रकाशित झालेल्या दोन लेखांचा विषय होता. पहिल्याचा लेखक होता अमेरिकन चार्लस् मॅसन (याचे खरे नाव काय होते कुणास ठाऊक) व दुसर्या चा लेखक होता एडविन नॉरीस. हा विनम्र, स्वाध्यायी भाषातज्ज्ञ अनेक वर्षे कंपनीच्या लंडन येथील्ल कार्यालयात सामान्य कारकून म्हणून काम करून कोनींश

भाषेच्या अभ्यासानंतर आता असिरिया व बेबिलान येथील क्युनिफॉर्म लिपीचा अभ्यासक झाला होता. [ही लिपी ओल्या मातीच्या पाटीवर बोथट टोकाच्या कांडीने लिहिल्यामुळे आत पाचरीसारखा आकार कोरला जाई.] हे दोन्ही शिलालेख पंजाबच्या सरहद्दीवर होते. यातील पहिल्ला पगारी फ्रेंच जनरत्त कोर्ट याने १८३० नंतर शोधता होता पण ही माहिती जेम्स प्रिन्सेपत्ला मिळायला इतका उशीर झाला की त्याने कोलकात्याला त्याची नोंद घेण्यापलिंकडे काही केले नाही, किंबहुना करू शकला नाही.

सन १८३८ मधे चार्लस् मॅसन जीवावर उदार होऊन तेथे गेला व त्याने शहाबाझगढी ह्या खेड्यापासून हजारएक यार्डावर एका टेकडीवर एका विशाल पाषाणाच्या दोन भागावर असलेल्या शिलालेखाची कापडावर घासून प्रतिकृती बनवली. त्याने प्रत्यक्ष बघून हाताने केलेली नक्‍्क त्त व तो पाषाण काळजीपूर्वक साफ करून मग दर्जेदार ब्रिटीश कॅलिको कपड्यावर घासून केलेली नक्कल, दोऱ्ही इंग्लंडला रॉयल 'एशियाटीक सोसायटीकडे पोहोचल्या. तेथे 'सर्वव्यापी* प्रा. हॉरेस हेमन विल्सन संचातललक होता. त्याने ही लिपी आतापर्यंत सापडलेल्या अशोकाच्या स्तंभलेख व शिंलालेखांच्या ब्राह्मी लिपीपेक्षा खूपच वेगळी असल्याचे पाहून त्या दोन्ही नकला सोसायटीचा दुय्यम सचिव एडविन नॉरीसकडे दिल्या.

काही दिवसांच्या अभ्यासानंतर नोरीसने “ह्या लेखातील्ल काही अक्षरे पुनःपुन्हा येत असल्याचे पाहून व बॅक्ट्रीयाच्या नाण्यांवरून त्यातील एक शब्द पियस... ओळखला पण त्याआधीची तीन अक्षरे तो ओळखू शकता नाही... पण माझ्या पुढील शोधकार्यामुळे व टर्नोर्च्या महावंसातील नामावलीमुळे माझी खात्री पटली की हा शब्द देवानाम्पिय आहे.” सर्वात महत्त्वाचा फरक हा होता की येथे हा शब्द पालि वा संस्कृतप्रमाणे डावीकडून उजवीकडे नाही तर आर्माइकप्रमाणे उजवीकडून डावीकडे लिहिला होता.

हा अशोकाचा शिलालेख आहे हे ओळखल्यावर नॉरीसने |२१७चा दुसरा एक सदस्य जॉन डॉसनची मदत घेतली. डॉसनने अनेक वर्षे भारतात अध्यापन केले होते. त्यांनी शहाबाझगढी व गिरनार येथील शिलालेखांची तुलना केली तेव्हा त्यांना जाणवले की ही एकाच मसुद्याची दोन रूपे होती आणि त्यांची भाषा व लिपी एकमेकांशी मिळत्याजुळत्या किंवा संबंधित असूनही वेगवेगळ्या होत्या.

शहाबाझगढीचा शिलालेख जेम्स प्रिन्सेपच्या बॅक्ट्रीयन-पालित-खरोष्टीत-- लिहिला होता व यामुळे प्रिन्सेपच्या या मताला दुजोरा मिळाला होता की ह्या दोन स्वतंत्र लिंप्या वायव्य सरहद्देवर वापरात होत्या आणि ह्या दोन्ही संस्कृतपूर्व व पा्लिपूर्व प्राकृत भाषेसाठी वापरल्या जात होता.

नॉरीसने त्याच्या मृत्युच्या काही महिने अगोदर रॉयत्त एशियाटीक सोसायटीच्या सभेत त्याचा शहाबाझगढीबद्दलचा लेख प्रस्तुत केला होता. तो १८४६ साली JASB च्या हेमंतातीत्त अंकात प्रा. विल्सनने प्रकाशित केला. लेखाबरोबर जरी विल्सनने नॉरीसबहत्

स्तुतीपर दोन शब्द लिहिले तरी तो आपल्या या मतावर ठाम राहिला की या शिलालेखांचा अशोकाशी काहीही संबंध नाही.

सन १८४७च्या जानेवारीत कनिंग्हेमने बोटींचा पूत्त करून अट्केजवळ सिंधु पार केली व नवशेराच्या उत्तरेला युसुफझाई [नोबेल पुरस्कार प्राप्त मलाला युसुफझाईमुळे आता हे नाव प्रसिद्ध झाले आहे] पठारावरील होती मर्दान ह्या गावाला पोहोचला. त्याने हे अधिकृत परवानगीशिवाय केले व त्याबद्दल तो अनेक वर्षे मौन राहिला. हे गाव हेन्सी लम्सडेनने १८४७मधे स्थापलेल्या प्रसिद्ध Corps of Guides Cavalry and Infantry चे मुख्यालय बनण्याच्या तीन वर्ष आधीची ही घटना होती. हे गाव मोक्याच्या जागी होते-- स्वात खोऱ्याला जाणाऱ्या पेशावर ते मललकंद खिंड मार्ग व दुसरा पूर्व-पश्चिम व्यापारी मार्ग सडक-ए-आझम हा महामार्ग -- या दोन प्रमुख रस्त्यांवर, सडक-ए-आझम हा महामार्ग काबूल नदीच्या बाजूने चारसद्दापर्यंत जातो व तेथे महाबनच्या पर्वतरांगांच्या पायथ्याला विळखा घालून पठाराच्या टोकाला सिंधु नदी ओलांडतो.

शहाबाझगढी हे खेडे होती मर्दानच्या पुढे काही मैलावर सडक-ए-आझमला अंबेला खिंडीतून येणारा रस्ता मिळतो तेथे महामार्गाच्या दुतर्फा वसले होते. येथे गावाच्या व महामार्गाच्या शेजारी एका टेकडीवर सम्राट अशोकाने गिरनार व धौलीला केले तसे शिलालेख प्रदर्शित केले होते.

कनिंगहमने लिहिले, "अशोकाचा हा महान शिलालेख टेकडीवर ८० फूट उंचीवर एका मोठ्या ओबडधोबड पाषाणावर कोरला होता. शिलालेखाचा पश्चिम भाग शहाबाजगढीच्या बाजूत्ता होता तर जास्त लिखाण असलेला पूर्व भाग टेकडीच्या चढाकडे होता. पाच ग्रीक राजांचे नाव असलेला शेवटचा भाग मात्र पश्चिमेकडे होता." ह्या 'पाषाणाला ओबडधोबड म्हणण्यात कनिंग्हॅमने चूक केली होती. प्रत्यक्षात त्याचा आकार, इतर दोन शिंलालेखांच्या शिंलांप्रमाणे, बसलेल्या हत्तीसारखा होता. ह्या तीन शिलातलेखांच्या जरिकोणात (शहाबाझगढी, गिरनार, धौली) तीन हजार मैलांची भूमि सामावलेली होती. यावरून अशोकाचे साम्राज्य किती मोठे होते याचा प्रत्यय येतो.

कंनिंगहमला शिंलालेखाची प्रत्यक्ष नकत्त (eye copy) करायला किंवा घासून प्रतिकृती घ्यायत्ता वेळ नव्हता पण त्याला दिसले की शहाबाजगढीच्या आजूबाजूता अनेक अवशेष होते. स्थानिक युसुफझाईंच्या खेडुतांनुसार ही एके काळी राजधानी होती. त्यांनी कनिंगहरमत्ता अवशेषांचे अनेक ढिगारे दाखवले जे पूर्वी शहराच्या हद्दीच्या आत होते. त्यातील्त दोन खपराई व खप्परदरा ह्या प्रसिद्ध जागा उत्तर व पूर्वेच्या दरवाजांचे अवशेष होते. "तेथीत्त जमिनीची पाहणी केल्यावर तेथे सर्वर पसरलेले विटांचे तुकडे व मातीच्या भांड्यांचे तुकडे पाहून त्यांच्या बोलण्यात तथ्य असल्याचे दिसून आले." कनिंगहमला समजले की या गावाचे नाव पश्तु भाषेत शाह-बाझ-गढी म्हणजे 'राजगरूडांच्या राजाचे घर' असे टेकडीवरील शिलालेखाच्या स्मारकामुळे पडले होते. काहीजण त्याला एका मुस्लिम

संताची कबर मानत होते तर इतर कुण्या काफीराचे स्मारक समजत. कनिंगहमने मग जोन लेडनने केलेल्या मुघल सम्राट बाबराच्या बाबरनामा या चरित्रात्मक ग्रंथाचे भाषांतर तपासले.

सन १५१९ मधे जुन्या महामार्गावरून प्रवास करतांना बाबराने शहाबाझगढी येथे मुक्काम केला होता. त्याला तेथील टेकडीचा माथा रमणीय वाटला होता. पण तेथील स्मारक त्याला अजिबात रूचले नाही. ''इतक्या रमणीय व आनंददायी जागेवर कुण्या काफीराचे थडगे मला अत्यंत अनुचित वाटले. मी हुकूम दिला की ते स्मारक जमीनदोस्त करण्यात यावे.'' बाबरच्या या कृतीने कनिंगहमच्या मनात अनेक प्रश्नांचे वादळ उठले पण त्याला त्यांचे उत्तर मिळायला तेवीस वर्षे जावी लागली.

पंजाबच्या वायव्य सरहद्दीवर प्रवासाच्या दरम्यान त्याला समजले की अजून एका लष्करी अधिकाऱ्याला पुरातत्त्व संशोधनात रस आहे. हा अधिकारी, मेजर जेम्स एबॉट, पंजाब इलाक्याच्या व्यवस्थेसाठी आणलेल्या-आधी शीख राज्यकर्त्यांच्या मदतीला व पुढे त्यांच्याऐवजी--ब्रिटीश राजकीय अधिकाऱ्यांच्या फळीतीत्त एक होता. तो अंकल 'एबॉट म्हणून ओळखता जात असे. तरूणपणी त्याने घोडेस्वार दलाचा अधिकारी असतांना मोठ्या धाडसाने खिंवा येथे काही रशियन ओलिसांची सुटका करून स्वतःची छाप पाडली होती. त्या धाडसी छाप्यात त्याची तलवारीच्या हाताची दोन बोटे तुटली होती. पण त्या शोर्यामुळे त्याला १८४६ साली हाझरा येथे ब्रिटीश हुकुमत प्रस्थापित करण्यासाठी निवडले गेले-हे अफगाणिस्तानातील ते हाझरा नव्हे जेथे तेथील शियांवर अत्याचार होतात; तर सिंधुच्या पूर्वेला आता फारसे माहीत नसलेले उत्तर पाकिस्तानातील हाझरा. तेथे सहा वर्षात तो हझारवाल पहाडी टोळ्यांमधे इतका मिळून मिसळून गेला की त्याच्या वरिष्ठांना ते खचले नाही आणि त्यांनी त्याची तेथून बदली केली. पण एबॉटला हाझराची इतर कुण्याही युरोपियन माणसाला पूर्वी कधीही नव्हती इतकी चांगली माहिती झाली होती. व्यासंगी वृत्तीचा असल्याने त्याने हाझराचा भूतकाळ शोधण्याचे काम सुरू केले. या अभ्यासाची सुरूवात होती सिकंदर (अलेक्झांडर) व त्याच्या सोबतच्या मॅसेडोनियनांचे आक्रमण.

सिंधू नदीच्या एका बाजूता जेम्स एबॉट्चे हाझरा होते तर दुसर्या् बाजूला महाबनच्या विशाल पर्वतरांगांच्या छायेतील स्वात व बुनेरचे पर्वत. हा बिकट प्रदेश होता. ब्रिटीश ज्यांना ''हिंदुस्तानी फॅनॅटीक्स' म्हणत त्या मुस्लिम जिहादींच्या टोळ्यांमुळे तो अधिकच बिकट झाला होता. यामुळे एबॉट कधीही महाबन पर्वतावर पाऊल ठेऊ शकला नाही. पण त्याने हे अनुमान काढले की हाच तो एओर्नोंस पर्वत होता ज्याच्यावर पहाडी सैन्याने सिकंदरत्ता रोखण्याचा शेवट्चा प्रयत्न केला होता. त्याने लिहिले, ''एरियंनने 'एओरनोंसचे केलेले वर्णन महाबनला लागू पडते. असा डोंगरमाथा ज्याच्या पूर्वेला उच कडे आहेत व त्यातून एकच सोंड सिताना व उम्ब यांच्या मधे सिंधु नदीपर्यंत येते.'' 'एबॉट्ला ह्याची खात्री यामुळे झाली की सिकंदरने एओनोंसच्या पायथ्याशी एम्बोलिना नावाच्या जागी मुक्काम ठोकला होता.

आणि महाबनच्या खालच्या उतरंडीवर दोन खेडी होती, एक अम्ब व दुसरे बलिमह, "एक नदीच्या खोऱ्यात तर दुसरे त्याच्या लगोत्तग वर पर्वतावर."

डॉ. हेत्री बेल्यू या लम्सडेनच्या Corps of Guide च्या सर्जनने एबॉट्च्या मताला दुजोरा दिला. डॉ. बेल्यूने त्याचा मिलिंटरीतीत्त सर्व कार्यकाळ पेशावस्च्या खोऱ्यात घालवला होता. त्याला स्थानिक भाषा अवगत होत्या व युसुफजाईच्या पठाणांची त्याला चांगली माहिती होता. यामुळे तो फक्त एका लष्करी सर्जन राहिला नव्हता. मर्दानवरून नऊ मैल स्वातच्या रस्त्यावर त्याने व त्याचा वरिष्ठ हेरी लम्सडेनने तख्त-ए-बाही ह्या बौद्ध विहारांच्या समूहाचा अभ्यास केला होता. येथे व पेशावर खोऱ्यात इतरत्र त्यांना नाणी व इतर प्राचीन अवशेष सापडले होते ज्यावरुन तेथे "एकामागून एक ... ग्रीक, ग्रीकोबॅक्ट्री यन, इंडोबॅक्ट्रीयन, शक, ब्राह्मण... " यांचे अस्तित्व असल्याचे सिद्ध होत होते. येथे एकामागून एक संस्कृती बहरल्या होत्या. बौद्धांवर शेवटी ब्राह्मणवादाने विजय मिळवता, पण गझनीच्या महमूदाने अकराव्या शतकात दोन्ही परंपरांचा बीमोड केला. "विध्वंसासाठी आगीचा वापर केलेला दिसतो. कारण उत्खननात तसे दिसून येते. तेथील राहिवासी घाईघाईत तेथून पळाले होते अशा खुणा दिसतात".

स्वात व महाबनवर ब्रिटीशांचे राज्य नव्हते. पण बेल्यूने टेहळणीसाठी लोकांना पाठवून त्या भागाचा नकाशा तयार केला. त्यावरून त्याने सिकंदरच्या स्वारीचा मार्ग ठरविला. त्याला माहिती मिळाली की महाबनच्या शिखरावर अजूनही "एक पडझड झालेला दुर्गम असा विशाल दगडी कि आहे". "स्थानिक परंपरेनुसार सिकंदरे सिंधु नदी तराफ्यावरून महाबनच्या पायथ्याशी पार केली. तो अम्बवरून हाझरातील दरबंदतला गेला. परंपरा हेही सांगते की त्याला तेथे भेटतेल्या एका संन्याशाच्या सिडिमुळे त्या अभेद्य कि पवर सिकंदरने ताबा मिळवता होता."

अलेक्झांडर कनिंगहमला मात्र सिकंदरपेक्षा चिनीप्रवाशांची वर्णने जास्त महत्त्वाची वाट्त होती. त्याने ह्या विषयावर JASB मधे दोन लेख प्रकाशित केले होते जे मुख्यतः अनुमानांवर आधारित होते. नंतर तो बंगाल आर्मींत गेला. तेथे त्याने आपले अभियांत्रिकी कौशल्य डिस्तेंबर १८४८मधे अँग्लो-शीख युद्धात वापरले. तो चिलियनवाला व गुजरातच्या तुंबळ युद्धांत व तसेच मार्च १८४शमधे पंजाब ब्रिटीश साम्राज्याचा भाग झाला त्यावेळी हजर होता.

कनिंग्हममधे अवाजवी व अनाठायी आत्मविश्वास होता. त्यामुळे तो आपली चूक कबूत्त करत नसे. त्याला प्राचीन भारतीय शि कला व वास्तुशास्त्र यांवरील (प्रत्यक्षात नसलेत्ता) ग्रीक प्रभाव दाखवून द्यायचा होता. त्याच्या पुरातत्त्व संशोधन पद्धती विध्वंसक होत्या. पण तो ज्याला Field Archaeology (प्रत्यक्ष संबंधित जागेवर केंलेले उत्खनन व संशोधन) म्हणत असे त्याचे महत्व ओळखण्यात तो त्याच्या काळाच्या कितीतरी पुढे होता. त्याला ह्याची जाणीव होती की उत्खनन व शिलालेखांचा अभ्यास (Epigraphy) बरोबरच

व्हायत्ता हवा. तसेच पुरातन स्थळांचे रक्षण, जतन व संवर्धन ह्याचे महत्त्व तो ओळखून होता. त्याने सन १८५१२ मधे भारतात पहिल्यांदाच पद्धतशीर उत्खननाचे कार्य सुरू केले. त्याने शेवटचे उत्खनन बोधगया येथे सन १८९२ मधे केले. त्याने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणची (भा.पु.स., Archaeological Survey of India, ASI) स्थापना केली व तीस वर्षे त्याचा संस्थापक-निदेशक (Founder and First Director) म्हणून पुरातत्त्व संशोधनाच्या विकासाला दिशा दाखवित राहीला.

कर्निंगहमच्या लहान भावाची, जोसेफची, मध्य भारतात भोपाळ येथे राजकीय अधिकारी (पॉलिटीकल एजंट) म्हणून नेमणूक झाली आणि भारतीय पुरातत्त्व संशोधनात नवीन युग सुरू झाले. भोपाळच्या वायव्येला पंचवीस मैलावर सांची आहे. तेथील टेकडीवर अनेक स्तूप होते. त्यापैकी मध्यभागातला स्तूप विशाल होता. तेव्हा त्याला महास्तूप Great Tope म्हणत. सन १८३७मधे प्रिन्सेपने त्यावरील लिपी शोधल्यापासून हा बराच चर्चेत होता. पण त्याची भौगोलिक दुर्गमता, जिने त्याला "मैरवी शेवांच्या व कडव्या मुस्लिमांच्या विध्वंसक विद्वेषापासून" वाचवले होते, आता संपली होती. सन १८२२ मधे कॅप्टन जॉन्सन (भोपाळ येथील सहायक राजकीय अधिकारी) याने हा स्तूप वर्न खालपर्यंत खोदला होता. हे करतांना स्तूपात एक मोठी भेग पडली होती, तसेच भोवतालच्या कुंपणाचा काही भाग व पश्चिमेकडील दरवाजा पडला होता. त्यानंतर त्याने दुसर्या् दोन मोठ्या स्तूपांचा विध्वंस केला. त्यांना नंतर स्तूप २ व स्तूप ३ असे नाव देण्यात आले.

आतापर्यंत प्राचीन स्थळांचा मोठ्या प्रमाणात विध्वंस होत होता-- गुप्त धनाच्या शोधात स्थानिक लोक; बांधकामाच्या साहित्यासाठी जमीनदार; नवीन रस्ते, रे, पूत यांसाठी दगडविटांचे तुकडे शोधणारे ठेकेदार व कंटाळलेले पण ज्यांच्याकडून अशा वर्तनाची अपेक्षा नव्हती असे ब्रिटीश अधिकारी या सर्वांनी त्या काळात ही नासधूस चालवली होती. सन १८५१ मधे सांचीला केले गेलेले उत्खनन आजच्या मापदंडानुसार विध्वंसक असले तरीसुद्धा वरील पार्श्वभूमीवर ते पहिल्यांदा पद्धतशीरपणे केले गेलेले उत्खनन होते. यात सर्व बाबींचे नकाशे काढण्यात आले, रेखाटने केली गेली, नोंदी घेतल्या गेल्या व त्यांचे विश्लेंषण करण्यात आले. कनिंगहमने हे काम त्याचा सहकारी अभियंता लेफ्टनंट फ्रेड मेसी ह्या कुशल रेखाटनकार व सर्वेक्षणकाराच्या मदतीने केले. त्याआधी दोन वर्षे सांचीच्या शि व शिलालेखांच्या नोंदी करण्यासाठी मेसीला भोपाळला पाठवण्यात आले होते. आता मात्र त्याला कनिंगहॅमचे वरीष्ठ पद व नैपुण्य यासमोर मान तुकवावी लागली.

कनिंगहॅमने सारनाथप्रमाणे येथेही महास्तूपाच्या सर्वात वरच्या टोकातून खाली एक वासा टाकून सुरूवात केली पण येथेही त्याला काहीही सापडले नाही. त्याला काहीही मानवी अवशेष न सापडल्याने ते एक स्मारक होते, धातुगर्भ स्तूप नव्हता हे त्याला समजले. विटांच्या घडीव बांधकामावर साधा मुलामा देण्यात आला होता. सांची स्तूप सारनाथपेक्षा वेगळा असा की याच्याबाहेर परिक्रमापथाभोवती दगडी कुंपण होते व चार दिशांना चार

भव्य तोरणे (प्रवेशद्वार) होती. यातील्त दोन अजूनही उभे होते तर दोघांचे तुकडे होऊन ते जमीनदोस्त झाले होते.

"ही चार प्रवेशद्वारे सांचीच्या सर्वात सुंद्र व मूल्यवान वस्तू आहेत," कनिंगहमने नंतर आपल्या अहवालात म्हटले. "ते पूर्णपणे घरगुती दृश्ये व धार्मिक कृत्ये दर्शविणाऱ्या कोरीवकामाने भरलेले आहेत". या चार प्रवेशद्वारांच्या खांबांचा भार हत्ती, सिंह व यक्ष (गण, बुटके) वाहत होते. उभ्या भागांच्या मधे हत्तीवरील स्वार व घोडेस्वार यांच्या आकृत्या होत्या. बाहेरील बाजूस नर्तकी होत्या. खांबांचा पृष्ठभाग वेगवेगळ्या भागांमधे विभागला होता. प्रत्येक भागात धार्मिक वा कौटुंबिक दृश्ये कोस्लेली होती. प्रत्येक द्वारावर एकावर एक अशा एकोणीस फ़ूट लांबीच्या तीन आडव्या पाषाणाच्या तुळया होत्या. त्यांच्यावरही विस्तृत देखावे कोरलेले होते. कनिंगहंमने असे अनुमान काढले की हे शाक्य मुनी बुद्धाच्या आयुष्यातील प्रसंगांचे किंवा जातक कथांचे चित्रण असावे. त्याबरोबरच स्तूपांचे व बोधिवृक्षाच्या पूजेच्या प्रसंगांचे चित्रण होते.

कनिंगहंमत्ता शिलालेखांमधे जास्त रस होता त्यामुळे त्याने अनेक अत्यंत सुंदर शि च्या रेखाटनाचे काम त्याच्या कनिष्ठ सहकाऱ्याकडे सोपवले. जेम्स प्रिन्सेपने सन १८३७ मधे शोधल्याप्रमाणे ह्या लेखांमधे मुख्यतः दानांची नोंद होती. कनिंगहमने अशा जवळपास दोनशे नोंदींची नोंद केली. खांबांची रांग व प्रवेशद्वार यांच्यासाठी कुण्या राजेरजवाड्यांनी वा धार्मिक संस्थेने नव्हे तर वेगवेगळ्या दात्यांनी दान दिले होते. यात 'एक-तृतियांश महित्ला होत्या. खांबांवर भिक्खु शब्दाचे जुने रूप भिच्छु होते तर दरवाजांवर भिक्खु शब्दाचा वापर होता. यावरून कनिंगहेमने निष्कर्ष काढता की खांबाची रांग अशोकाच्या काळातील होती तर प्रवेशद्ठारावरील कमानी अशोकानंतर एखाद्या शतकाने उभारल्या गेल्या असाव्यात. दक्षिणद्वारावरील सर्वात वरच्या आडव्या पाषाणपट्टीवरील 'एका देखाव्याच्या मध्यभागी स्तूपावरीत्त नोंद कनिंगहुमच्या मताचे समर्थन करत होती-- "सामणेर वसिष्ठाचा मुलगा आनंद यांचे दान. श्री सातकर्णींच्या राज्यकाळात".

कनिंगहमने हा सातकर्णीं म्हणजे विष्णु पुराणातील आंध्रच्या सातवाहन राजांच्या वंशावळीतील सहावा राजा, पहिला सातकर्णी, असावा असे अनुमान काढले. कनिंगहमत्ता सातवाहनांची चांगली माहिती होती कारण स्वतःचा चेहरा आपल्या नाण्यांवर छापणारे ते पहिले भारतीय राजे होते. अशोकाच्या काळापर्यंत ते मौर्यांचे मांडलिक होते पण अशोकाच्या मृत्युनंतर ते स्वतंत्र झाले. पहिल्या सातकर्णीने उत्तर भारतातील शुंगाचा पराभव करून जवळजवळ संपूर्ण मध्य भारत सातवाहन साम्राज्यात आणला होता. कनिंगहमचा गोंधळ यामुळे उडाला की सातवाहन घराण्यात अनेक सातकर्णी नावाचे राजे होऊन गेले होते. यापैकी एक जण होता बौद्ध सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी ज्याने पहिल्या शतकात राज्य केले होते. कनिंगहमने तारखांचा गोंधळ केला किंवा या दोन सातकरणींमधे गफलत केली व चार प्रवेशद्वारांचा काळ पहिले शतक ठरविला.

कनिंग्हॅमने दरवाज्यांवरील शिं ंकडे लक्ष न दिल्यामुळे त्याच्या हे लक्षात आले नाही की त्यांतील अनेक प्रसंग तुलनेने अर्वाचीन काळातील होते आणि काहीतर त्या शि कारांच्या वर्तमानकालीन आठवणीतील असावेत. तुकडे तुकडे होऊन जमीनदोस्त झालेल्या दक्षिणद्वाराच्या बाबतीत तर हे अगदीच खरे होते.

कनिंगहॅमने ह्या दक्षिणद्वाराच्या इतस्ततः विखुरलेल्या खांब व पाषाणपट्टांवरील प्रसंगांचे वर्णन अगदीच वरवर केले होते. त्याने केवळ इतकेच लिहिले की एका शि त एक राजा र्थातून स्तूपाकडे जात आहे. स्तूपाच्या दुसर्याक बाजूला तोच राजा स्तूपाला वाकून नमन करीत आहे व अनेक नागराज त्याला अनुमोदन देत आहेत. मेजर फ्रँकलिनने सन १८२० मधे हे दृश्य रेखाटले होते आणि कॅप्टन मरेने JASB मधे छापण्यासाठी जेम्स प्रिन्सेपसाठी ह्याचे रेखाटन केले होते. त्यांच्याप्रमाणेच कनिंगहमच्या नजरेतूनही यातील एक महत्वाची बाब सुटली होती-- येथे व याच कमानीवरीलल इतर दोन शिं आति एक मोठा हत्ती होता व त्या हत्तीवरील माहूताच्या डोक्यावर घातुंची पेटी वा रक्षापात्र होते.

फ्रेड मेसीने ह्या व इतर शि ंची रेखाटने केली. यांचा खरा अर्थ समजायत्ता अजून सत्तरएक वर्षे जावी लागली! यातील एक प्रसंग विशेष महत्त्वाचा ठरता. हा कमानीच्या आधाराच्या स्तंभावरील बाजूच्या भागावर होता. त्यात एका मंडपासारख्या वास्तूच्या आत, अशोकाने बांधलेल्या भिंतीच्या आत बोधगयेचा बोधिवृक्ष व त्याच्या बुंध्याशी वज्रासन दाखवले होते. त्याच्या लगेचच खाली एक राजा (राजछत्राने त्याची ओळख परते) व पाच स्त्रिया वरच्या दिशेने बघत आहेत. असे दिसते की राजाला दोन बाजूला दोन स्त्रिया आधार देत आहेत.

इतर तीन प्रवेशद्वारांवरील प्रसंगांचा अर्थही कनिंगहॅम व त्याच्या समकालीनांच्या लक्षात आला नाही. यातील मेसीने रेखाटलेली दोन शि विशेष महत्त्वाची आहेत. त्यातील एकात पश्चिम प्रवेशद्वाराच्या स्तंभावरील शि त बोधिवृक्ष आहे, पण मंडप व भिंतीशिवाय. एक स्थूत्त राजा त्याच्या स्त्रियांबरोबर त्या वृक्षाला प्रणाम करतो आहे. दुसरा प्रसंग उत्तर प्रवेशद्वाराच्या स्तंभाच्या पृष्ठभागावरील आहे. त्यात एक स्तूपाच्या अवतीभोवती पूजा करणारे अनेक लोक दाखवले आहेत, त्याचबरोबर हा एखादा उद्घाटन सोहळा वाटावा अशा प्रकारे अनेक वाद्य वाजवणारे आहेत. एका पूजकांच्या डोक्यावर घातुची पेटी आहे.

ह्या प्रतिमेकडे कनिंगहैमचे लक्ष गेले. यात उपासकांचा पेहराव आहे-- आखूड स्कर्ट, उत्तरीय वस्त्र (०081८), निमुळत्या टोप्या वा डोक्याभोवती बांधलेली वस्त्र-पट्टी आणि ज्यांच्या वाद्या गुडघ्यापर्यंत बांधल्या आहेत अशी पादत्राणे. यातील एकजण जोड-बासरी तर दुसरा तुणतुण्यासारखे वाद्य (1810) वाजवतोय. ही दोन्ही वाद्ये व पेहराव ग्रीकांचे आहे, भारतीयांचे नाही. या बाबींवरून असे दिसते की हा गांधार किंवा तक्षशिला येथील स्तूपाचा धातुनिधान सोहळा आहे.

या महास्तूपानंतर आजूबाजूच्या भागात उत्खननाचे कार्य सुरू झाले. चारही प्रवेशद्वारांच्या समोर त्यांना बुद्धाच्या मूर्ती असलेली मंदिरे सापडली. दक्षिण प्रवेशद्वाराच्या बाजूलाच दि १ व अलाहाबाद येथे करनिंग्हमने पाहिलेल्या दगडी स्तंभासारख्या आर्शाप्रमाणे गुळगुळीत असलेल्या पाषाणाच्या स्तंभाचे तुकडे सापडले. त्यावर ब्राह्मी लिपीत आठ ओळी लिहिल्या होत्या. या लेखाचा वरचा भाग पुसर झाला होता. कनिंगहॅम लिहितो, "लेखाची सुरूवात जवळपास दिसेनाशी झाली आहे."

मला वाटते की पहित्ता शब्द "देवानां" असावा; त्यानंतर कोरा भाग व नंतर "मग"; असे वाटते की पूर्ण ओळ अशी असावी-- देवानां (पिय) मगध राजा मगधराज देवानांप्रिय दुसरी ओळ काही प्रमाणात ओळखता येते-- (आ)भि(वदेम)नाम चेतियगिरि चेतियगिरिंच्या संघाला प्रणाम करतो.

तिसर्याद ओळीच्या शेवटी संघं शब्द स्पष्ट दिसत होता. त्याचबरोबर "मिखु च भिखुनी" भिक्खु व भिक्खुणी हे शब्दही सहज वाचता येत होते. लेखाची शेवटची ओळही स्पष्ट होती. "माझी अशी इच्छा आहे की संघ कायम एकसंघ रहावा."

हा अशोकाच्या संघभेदाच्या विरुद्ध असलेल्या शित्लालेखांपैकी सापडलेला पहिला लेख होता (यांना Schism Edict म्हटले जाते), ज्यात तो संघाला फूट टाळण्यांचा व एकत्र रहाण्याचा स देतो. अशोकाने जर येथे असा स्तंभलेख उभा केला होता तर हे अनुमान निघते की त्याने असेच शिलालेख इतस्त्र महत्त्वाच्या बौद्ध स्थानांवरही खोदवून घेतले असतील. पण आजपावेतो केवळ सांची, सारनाथ व कौसांबी येथे असे Schism Edicts सापडले आहेत. पण ह्यांची संख्या नक्कीच जास्त असावी.

कनिंग्हमने असे अनुमान काढले की ह्या स्तंभाची मूळ उंची ३१ फूट ११ इंच असावी. त्याच्या मोजमापातून हे लक्षात आले की स्तंभाच्या मधोमध हलका फुगीरपणा यावा असा आकार त्याला दिला होता. यावरून हे स्तंभ निर्माण करणाऱ्याने ग्रीकांचीच पद्धत वापरली होती असे दिसते. ग्रीक यात तरबेज होते. याबरोबर स्तंभावर अनेक खोलवर घेतलेले छेद दिसत होते. ते बहुधा त्याला कापून त्या तुकड्यांचा उपयोग रोलरसारखा करण्यासाठी केले गेले होते.

तेथील भग्न शिं आंचा व दगडांचा ढिगारा साफ करतांना अशोकाच्या मूळ स्तंभावर असणारे स्तंभाचे शीर्ष व त्याखालील भाग (bell, abacus and capital) सापडले. चार दिशांना चार फूट उंचीचे चार सिंह एकमेकांना पाठ लावून उभे असल्याचे ते शि होते, त्यामुळे उत्खनन करण्याऱ्यांना खूप आनंद झाला. ह्या सिंहांची मुंडकी उडवलेली होती. पण शरीराचा उरलेला भाग व पाय सुरक्षित होते. "इतके देखणे शि , त्यांचे स्नायु व त्यांचे पंजे-नखे इतके बिनचूक की त्यांची ग्रीक शि ंशी सहज तुलना व्हावी." ज्या वर्तुळाकार

भागावर हे सिंह उभे होते त्या वर्तुळाकार चौथऱ्यावरदह्दी छान कलाकुसर होती, “ग्रीक शैलीप्रमाणे दिसणारी पाने व हसांच्या चार जोड्या. हे पक्षी अनेकदा जोडीने दाखवण्यात येतात आणि हिंदूंमधे ते दाम्पत्यप्रेमाचे प्रतीक समजले जातात. त्यामुळे ते मान लांब व डोके खाली करून चोचीला चोच लावतांनाच्या प्रणयमुद्रेत दाखवले जातात.”

उत्तर बिहारमधील हा चौथरा लौरिया नंदनगढ येथील स्तंभाच्या चौथऱ्यासारखाच होता पण तेथे हंस एका ओळीत दाखवले होते तर येथे जोडीने.

उत्तर द्वाराच्या शेजारी पहिल्या स्तंभाच्या उंचीचा व आकाराचा एक स्तंभ होता पण त्याच्यावर सिंहांचे नाही तर मनुष्याचे शि होते-हे शि माणसाच्या आकारापेक्षा मोठे होते. कनिंग्हैमने लिहिले, “चेहऱ्यावरील भाव शांत पण प्रसन्न आहे. भारतीय शि कलेच्या सर्वोत्कृष्ट नमुन्यांपैकी हे एक आहे. संभवत: हे शिं अशोकाचेच असावे.” पण ही त्याची क ना तेवढी होती. कारण हा पुतळा प्रत्यक्ष गुप्तकाळातील आहे.

कनिंग्हमने सांचीच्या इमारतींची तीन कालखंडात विभागणी केली. त्याच्या मते स्तूप अशोकपूर्व काळातील; कुंपण, स्तंभ इत्यादी अशोककालीन तर चार प्रवेशद्वारे अशोकानंतर्ची होती. यात त्याचे मत फक्त याबाबतीत बरोबर होते की या शिं समूहाचे निर्माणकार्य तीन कालखंडात झाले होते. स्तूपाचे आतीत्त विटकाम, लेख असलेला स्तंभ व त्यावरील सिंह अशोकाच्या काळातील होते. पण मोर्यकाळाच्या शेवटी तेथे बरीच नासधूस झाली होती. यामागे बहुतेक शुंग घराण्याचा संस्थापक पुष्यमित्र ब्राह्मणाचा हात असावा. पण पुष्यमित्राच्या एक किंवा अधिक वंशजांनी स्तूपाचा जीर्णोद्धार केला होता आणि त्यावर दगडी काम व आजूबाजूला कुंपण टाकून तो मोठा केला होता. तिसर्या कालखंडात चार प्रवेशद्वारे उभारली गेली. यात सुरवातीला दक्षिण प्रवेश द्वार उभारते गेले असावे. यावर लिहिले आहे की ते सातकर्णींच्या कालखंडात उभारले गेले. 'पण कोणता सातकर्णी? जरी हे दगडात कोरलेले होते तरी हे नक्की की ते आधी तेथे व इतरत्र अस्तित्वात असलेल्या लाकडी शि ंवर आधारीत होते. ह्या काळात शिं चा तलाकडाकडून पाषाणाकडे प्रवास सुरु झाला होता. त्यांची निर्मिती साम्राज्य उभे करणाऱ्या पहिल्या सातकर्णीशी जोडण्यात कनिंगहॅम कदाचित बरोबरही असू शकेल. ह्या सातकर्णीने इ.पू. १२५ मधे झालेल्या त्याच्या मृत्युच्या आधी पन्नासएक वर्षे राज्य केले होते. जर हा काळ बरोबर मानला--अनेक अभ्यासकांच्या मते हा एक शतकभर चुकीचा, आधीचा आहे--तर त्यातील जुने शि कार अशोकाच्याच शतकात जन्मले असणार.

महास्तूपानंतर कनिंगहैम व मेसी यांनी इतर सत्तावीस स्तूप उघडले. यातील दहा सांचीच्याच टेकडीवर होते व इतर आजूबाजूच्या टेकड्यांवरील बौद्ध स्थानांवर होते. प्रत्येक उत्खननात त्यांना धातुच्या पेट्या सापडल्या ज्यात एक किंवा अधिक घातुच्या डब्या होत्या ज्यात रक्षा व अस्थिंचे अवशेष होते. प्रत्येकीवर ज्या बौद्ध संतांचे ते धातु होते त्यांची नावे ब्राह्मी लिपीत कोरलेली होती. काहींमधे अधिक पार्श्वभूमीही दिली होती. उदा. --“कश्यप

गोन्राचा अर्हत जो पूर्ण हिमवंताचा धम्मदूत होता". उत्खनन करणाऱ्यांच्या लक्षात आले की यातील अनेक नावे महावंसातील नावांशी मिळतीजुळती होती. ज्याला कनिंगहँमने क्रमांक २ चा स्तूप असे नाव दिले होते त्यात पाच धातुपेट्या मिळाल्या. त्यांत अशोककालीन संघातील दहा व्यक्तींचे अस्थिअवशेष होते. ज्याच्या नेतृत्वाखाली इ.पू. २४९ चे संगायन झाले होते व दोन संगायनानंतर हिमवंतात धम्मदूत म्हणून पाठविण्यात आले होते त्या मोग्गलिपुत्त तिस्स याच्याही अस्थी यात होत्या. यावरुन हा निष्कर्ष निघतो की हा स्तूप इ.पू. २२०च्या आधीचा नसावा कारण तोपर्यंत अशोकाचे सर्व समकालीन मरण पावले असणार.

स्तूप क्र. ३ मधील अवशेषही अतिमहत्वाचे निघाले. त्यात शाक्यनमुनी बुद्धाचे अगप्रशिष्य सारिपुत्त व मोग्ग न यांचे अस्थिअवशेष मिळाले. याच दोन अरहतांचे घधातुअवशेष इतरही स्तूपात सापडले. यावरून स्पष्ट होते की शारिरधातु अनेक ठिकाणी स्थापित करण्याची प्रथा अशोकाच्या काळात प्रचलित होती. कनिंगहैमने असा निर्विवाद दावा केला, "हे शोध मला प्राचीन भारताच्या सुरुवातीच्या इतिहासासाठी अत्यंत महत्वाचे वाटतात कारण ते अशोकाच्या राज्याच्या सर्वात कुतूहुत्तपूर्ण भागाची कथा खरी ठरवतात". विशेष लक्षणीय बाब ही की त्यांची महावंसाच्या वर्णनाशी सांगड घालता येते.


कनिंगहमने निष्क्षं काढला की सांची व भिलसा (आजची विदिशा) हेच महावंसातील चेतियगिरि आहे जेथे अशोकाची पहिली पत्नी देवी रहात होती आणि जेथे महिंद्र व संघमित्रा लहानाचे मोठे झाले होते. ह्याच देवीने तेथे विहाराची स्थापना केली होती किंवा त्याला मदत तरी केली होती. महास्तूपाच्या स्तंभांची रांग व प्रवेशद्वार हे अशोकाच्या उत्तराधिकाऱ्यांचे कार्य असले तरी अशोकासाठी ह्या स्थानाचे महत्व खूप होते. येथूनच अशोकाने त्याच्या धर्मदूताच्या भूमिकेची सुरूवात केली ज्याद्वारे त्याने पूर्ण जम्बूद्ठीपात व पलिकडेही धर्मप्रसार केला होता.

अर्थातच कनिंगहॅमच्या अहवालाला तलगेचच प्रो. हॉरेस विल्सनने आव्हान दिले. विल्सन अजूनही आक्सफर्ड येथील संस्कृतच्या बोडन अध्यासनावर होता आणि अजूनही तो हे मानायला तयार नव्हता की शिंलालेखांचा व स्तंभलेखांचा लेखक अशोक होता. कनिंगहमने मग उत्तरादाखल The Bhilsa Topes चे प्रकाशन केले. त्याने त्यात मेसीचे नकाशे व रेखाटने यांचा भरपूर वापर केला होता. त्यानंतर स्वातंत्र्यपूर्व भारतातील जितके पुरातत्त्व खात्याचे अहवाल प्रकाशित झाले त्यांच्यासाठी हे प्रकाशन एक आदर्श नमुना होते. त्याने विल्सनच्या मतांचे क्रमशः खंडण केले व असे करतांना त्याने ब्राह्मणांच्या "भिकारड्या' मतांवर विसंबून राहण्याच्या विल्सनच्या वृत्तीविषयी त्याचा तिरस्कार लपवण्याचा काहीही प्रयत्न केला नाही. येथे पुरातत्वाचा जबरदस्त शोध होता जो "अशोकाबद्दल महावंसातीत्त वर्णनाचा संपूर्ण व वादातीत पुरावा होता." The Bhilsa Topes च्या प्रकाशनाने विल्सनचे तोंड बंद झाले आणि पियद्स्सी कोण होता हा वादही


संपुष्टात आला. तसेच इ.पू. तिसर्या् शतकातील बौद्ध धर्माचा पुरस्कर्ता व प्रसारकर्ता म्हणून अशोकाचे महत्वही सर्वमान्य झाले.

अठराव्या शतकाच्या तिसर्यो दशकापासून डॉ. विल्सनचे प्राच्यविध्‌ेच्या क्षेत्रात वर्चस्व होते. हे वर्चस्व अनेकदा प्राच्यविद्येसाठी तोट्याचे होते. सन १८६० मधे त्याच्या मृत्युनंतर जणू भारतीय विघ्येच्या गळ्यातील धोंडा तुटून पडला. तरीही विल्सनचा प्रभाव ऑक्सफर्डमधे टिकून होताच. विल्सनचा तरूण जर्मन प्रतिस्पर्धी मॅक्सी मु र हा खरे तर विल्सननंतर संस्कृतच्या बोडेन अध्यासनाचा प्रमुख बनायला हवा होता. प्रत्यक्षात विल्सनचा माजी विद्यार्थी मोनियर विल्यम याला ते पद मिळाले.


कनिंगहमला वाटे की त्याचे सांची व भिलसा येथील शोधकार्य नुकतेच मेसोपोटेमियात हेत्री लेनार्डने केलेल्या शोधांइतकेच महत्वाचे होते. लेनार्डचे Illustrations of the Monuments of Nineveh हे आकर्षक व प्रभावी सचित्र पुस्तक काही वर्षांपूवीच प्रकाशित झाले होते. पण भारताबाहेरील खूपच कमी अभ्यासकांनी कनिंगहमच्या शोधात रूचि दाखवली आणि ब्रिटीश जनता तर पूर्ण उदासीन राहिली. प्राचीन इजिप्तचा इतिहास त्यांना रोमांचित करत होता कारण १७९८ मधे नेपोलियनने इजिप्तवर ताबा मिळवला तेव्हा त्याच्याबरोबर अनेक विदठ्ठान होते.



सांचीच्या महास्तूपाच्या भग्न दक्षिंण तोरणाचा काही भाग. विटांचा स्तूप व भोवतालचे कुंपण मागे दिसत आहे आणि तोरणावरील आडव्या दगडी पट्ट्या पुढे दिसत आहेत. जेम्स वॉटरहाऊसने १८६१ मधे घेतलेले छायाचित्र. (APAC, British Library)



तोरणावरील मधल्या आडव्या पट्टीवरील शिल्पाचा काही भाग. यात एक राजा रथात बसून स्तूपाकडे चालला आहे. सन १८८१ मधे राजा दिनदयाळ यांनी घेतलेले एक छायाचित्र (तडा गेलेल्या काचपट्टीसह) (APAC, British Library)




अशोकाचा शामिंयाना व कुंपणाच्या भिंतीसह बोधिवृक्ष. खाली राजाला दोन स्त्रिया आधार देत आहेत. (फ्रेडेरिक मैसी, *Sanchi and its Remains*, 1892)



सांचीच्या महास्तूपाच्या पश्चिम तोरणाच्या स्तंभावरील एक दृष्य. यांत बोधिवृक्षाच्या आजूबाजूला कुंपण, शामियाना इत्यादी नाही. त्याला वंदन करणाऱ्यांचा म्होरक्या४ एक स्थूनकाय व्यक्ती आहे. (Maisey, Sanchi and its Remains, 1892)



नवीनच बांधलेल्या स्तूपाला वंदन करणारे संगीतकार व इतर श्रद्धाळू. यांचा पोशाख नक्कीच भारतीय नाही. हे सांचीच्या महास्तूपाच्या उत्तर तोरणाच्या बाजूच्या पट्टीवरील दृष्य आहे. (Maisey, *Sanchi and its Remains*, 1892)



तुटलेल्या अशोकस्तंभाच्या शीर्षाचे फ्रेड मैसीने काढलेले चित्र. (Maisey, *Sanchi and its Remains*, 1892)

१२. ऐन भरातील सर अलेक्झांडर




भारहूतच्या स्तूपाच्या पूर्व तोरणाचा एक स्तंभ. सोबत कठडा व सांधा. जोसेफ बेगलारने १८७४ मधे घेतलेले छायाचित्र. (Cunningham, *The Stupa of Bharhut*, 1879)




ऑक्टोबर १८६२ मधे भारतीय सेनादलातून निवृत्तीच्या वेळी अलेक्झांडर कनिंग्हैम (मध्यभागी), सोबत इतर रॉयल इंजिनिअर अधिकारी. (Royal Engineers Museum, Chatham)



अलेक्झांडर कनिंगहैमला १८६४ मधे संकस्स (सांकाश्य) गावाबाहेरील शेतात सापडलेले अशोकस्तंभाचे शीर्ष. हे छायाचित्र जोसेफ बेगलारने १८७०च्या दशकात घेतले. मूळ प्रत खराब झाली आहे. (APAC, British Library)



अलेक्झांडर कनिंगहॅमने त्याच्या Inscriptions of Asoka, 1877 ह्या पुस्तकात प्रकाशित केलेले रेखाटन. कालसीचा हत्ती, RE 13 व RE 14 चा भाग.



कैमूरच्या धबधब्याच्या पायथ्याशी असलेल्या रूपनाथ शिंलालेखाच्या पाषाणाचा अलेक्झांडर कनिंगहॅम यांनी केलेला ठसा. सोबत इतर तीन अशोक शिलालेखाची रेखाचित्रे. (Inscriptions of Asoka, 1877)

ब्रिटीश ज्याला शिपायांचे बंड (इंडियन म्युटिनी) म्हणतात तो भारतीय उपखंडात प्रचंड उलथापालथ करणारा स्वातंत्र्यलढा १८५७ च्या उन्हाळ्यापासून १८५८च्या शेवटपर्यंत चालला. त्याबरोबरच इंस्ट इंडिया कंपनीचे भारतातील राज्य संपले व राणीचे राज्य आले. राणीचा प्रतिनिधी म्हणून व्हाईयरॉय भारतावर राज्य करु लागला. चार वर्षांनंतर अलेक्झांडर कनिंगहॅम कर्नलच्या पदावरून पेन्शनसह लष्करातून निवृत्त झाला. त्यावेळी घेतलेल्या ग्रुप फोटोत तो त्याच्या वयाचा, सेहेचाळीस वर्षांचा, नक्कीच दिसतो.

पण मायदेशी जाण्यापूर्वी त्याने पहिल्या व्हाईयरॉय लॉर्ड कॅनिंगकडे रदबदली केली होती. केवळ दोन महिन्यात तो भारतात परतला. आता तो मेजर-जनरल व भारत सरकारचा "बिहार व इतरत्र पुरातत्त्व सर्वेक्षक होता व तो "विशेष लक्षणीय अवशेषांच्या अचूक नोंदी करण्यासाठी* या काहीशा धूसर कामगिरीवर आला होता. जणू त्याचा जन्म त्याच कामासाठी झाला होता.

त्याला कुठल्याही प्रकारचे बजेट देण्यात आले नव्हते. त्याचा महिना ४५० रुपयांचा अधिकृत पगार व महिना ३५७ रूपयांचा प्रवास भत्ता हेच काय त्याच्या हातात येत होते. पण सुरुवात करायला त्याला हे पुरेसे होते. त्यामुळे कनिंगहॅम प्राचीन भारताच्या भूगोलाच्या शोधार्थ स्वतःला झोकून देऊ शकला. तो सर्व उत्तर भारत पिंजून काढण्यात

हिवाळा घालवत असे आणि उन्हाळ्यात आपली निरीक्षणे व संशोधन लिहून काढीत असे. ह्या सर्वेक्षणांचे फळ होते Archaeological Survey Reports चे तेवीस खंड जे आजही वाचकाला थक्क करतात-- त्यांच्या विशाल व्याप्तीमुळे तसेच त्यांच्या शोधांमुळे.

पहित्ला हिवाळा त्याने बिहार व उत्तर प्रदेशवर (त्यावेळचे ईशान्य प्रांत व अवध ज्यांना पुढे युनायटेड प्रॉव्हीन्सेस म्हटले जाई) लक्ष केंद्रीत केले. स्टानिस्लास जुलिएनच्या ह्युएन-त्संगच्या प्रवासवर्णनाच्या भाषांतराचे (Memoires sur les Contrees Occidental) दोन खंड सन १८५७-८ मधे प्रसिद्ध झाले होते. आता कनिंगहॅम फाहेन व ह्युएन-त्संगच्या प्रवासवर्णनांच्या प्रति आपल्या झोळीत बरोबर ठेवत असे. यामुळे तो त्या चिनीप्रवाशांनी भेट दिलेल्या प्रत्येक स्थळाला शोध घेऊ शकला. यात श्रावस्ती, कोसांबी व अयोध्या ही प्राचीन शहरेही आली. अलाहाबादच्या पश्चिमेत्ता यमुनेच्या वळणावर कोसांबीला त्याला एक अशोकस्तंभ सापडला ज्याचा उ 'ख ह्युएन-त्संगने केला नव्हता. ह्याच्यावरील शीर्षभाग गायब होता. एका आगीत तो नुकताच खराब झाला होता. त्यावर ब्राह्मी लेखही कोरलेले नव्हते. पण तो अजूनही तेथे उभा होता. अयोध्येला ह्युएन-त्संगने अनेक विहारांचे अवशेष पाहिले. यातीत्त एका विहारात “अशोकाचा स्तूप त्या जागी उभा होता जेथे बुद्धाने देवांना धर्मदेशना दिली होती”. कनिंगहेमला अशोकस्तंभाच्या वरचा केवळ उलट्या घंटेच्या आकाराचा भाग सापडला जो आता नागेश्वरनाथ मंदिरात शिवलिंगाचे पीठ म्हणून वापरात होता.

गंगेच्या दक्षिणेला त्याला अधिक यश मिळाले. तेथे त्याने पहिल्यांदा फ्रान्सिस बुकॅननने वर्णन केलेले बिहार कि च्या दक्षिणेला असलेल्या सुप्रसिद्ध नालंदा विद्यापीठाचे अवशेष सापडले. बोधगयेला त्याने तेथीत्त मंदिराचा व बोधिवृक्षाचा परिसर साफ केला आणि मार्खम किट्टोने १८४७ साली उकरून काढलेले तेथील दगडी कुंपणही परत साफ केले. तेथे त्याला किट्टोने ज्यांची रेखाटने केली होती अशे अनेक शिं असलेले पाषाणस्तंभ सापडले. त्यांच्यापैकी अनेक आता मंदिराला लागूनच असलेल्या इमारतीच्या छताला आधार देण्यासाठी वापरते गेले होते. ह्या इमारतीत हिंदू भाविक राहत होते.

त्यावरील कलाकुसरीच्या शेलीवरून व ब्राह्मी लिपीतील दात्यांच्या नावांवरून कनिंगहमने असे अनुमान काढले की हे कुंपण अशोकाच्या फारसे नंतरचे नसावे. त्यांचा अंदाज चुकीचा ठरता. सन १८७५मधे जेव्हा परत उत्खनन करण्यात आले तेव्हा तेथे त्यापेक्षा प्राचीन व साधे कुंपण सापडले. या दोन्ही शोधांतून ह्युएन-त्संगच्या वर्णनाची अचूकता प्रमाणित झाली. ह्युएन-त्संगने लिहिले होते की मूळचे अशोकाचे कुंपण बौड़विरोधी राजघातकी पुष्यमित्राने तोडले होते व त्यानंतर जे दुसरे कुंपण बांधण्यात आले होते ते बंगालच्या शशांक राजाने तोडले होते.

बोधिवृक्षाची स्थिती चिंताजनक होती. सन १८१२ मधे फ्रान्सिस बुकॅननने हा वृक्ष पूर्णं बहरात असलेला पाहिला होता. पण अर्धशतकानंतर कनिंगहंमला दिसता तो 'जीर्ण

झालेला? त्याच्या फांद्या 'साल नसलेल्या व कुजलेल्या* अशा स्थितीत. सन १८७६ ला कनिंग्हैमने परत भेट दिली तेव्हा तो वृक्ष नाहीसा झाला होता. वादळात उन्मळून पडल्यावर तो काढून टाकत्ता होता. सन १८८०-१ च्या हिवाळ्यात त्याने चौथी भेट दिली त्यावेळी त्याला असे वाटले की कदाचित त्या वृक्षाची काही मुळे वाचली असावीत. वज्रासनाच्या पश्चिमेला वालुकामय मातीत खोदल्यावर त्याला जुन्या अश्वत्थाचे दोन भाग दिसले. त्याला जाणीव होती की बोधिवृक्षाचा अखंडपणा आता धोक्यात होता. त्याने तेथीत्त सगळ्यात जवळच्या बोधिवृक्षाची एक फांदी घेतली व वजासनाच्या शेजारी लावली. कननिंगहैमने लावलेल्या ह्या रोपट्याने जीव धरत्ता व तेच आता बोधिवृक्ष झाले आहे. बौद्ध तीर्थयात्री त्याची आता शाक्यमुनी बुद्धाच्या काळातील बोधिवृक्षाचा खरा वंशज म्हणून पूजा करतात.

सन १८६४ला कनिंगहॅम त्याच्या पहिल्या यशस्वी मोहिमेच्या ठिकाणी-- संकिसाला--पोहोचला. तथागत बुद्ध येथे स्वर्गातून उतरले अशी मान्यता होती. त्याच्याकडे आता ह्युएन-त्संगचे प्रवासवर्णन होते आणि त्या बरोबरच अशोकाच्या स्तंभाचे वर्णन व इतर अधिक माहिती होती, "जांभळ्या रंगाचा चकाकणारा अतिशय कडक व शीर्षस्थानी बसलेला सिंह असलेला". आताचे संकिस्स गाव एका मोठ्या चौकोनी टेकाडावर वसलेले होते. स्थानिक लोक त्याला किला म्हणत. या किल्याच्या पाऊण मैल दक्षिणेला विटांच्या छोट्या भरीव टेकाडावर बिसारी देवीचे हिंदू मंदिर होते. कनिंगहंमने ही खूप जागृत देवी असल्याचे लिहिले आहे. तो मंदिराच्या दिशेने चालू लागला तेव्हा एका मोठ्या शिलेसारख्या वस्तूला अडखळून तो जवळजवळ पडलाच. त्याने आजूबाजूची झाडेझुडुपे साफ केली तेव्हा तो प्राचीन स्तंभाचे शीर्ष असलेली हत्तीची मूर्ती असल्याचे दिसले.

चमकदार हततक्या रंगाच्या संडस्टोनमधे बनवलेत्ती ही हत्तीची चार फूट मूर्ती अर्धवट होती. तिची सोंड, हस्तिदंत, कान व शेपूट गायब होते. तरीही कनिंगहमच्या मते हे "भारतातील आतापर्यंतचे (त्याच्या माहितीतील) ह्या प्राण्याचे सर्वोत्तम शि होते. पायावरील शिरा काळजीपूर्वक तासल्या होत्या आणि पायाची बोटे बिनचूक व उत्तम होती." कनिंगहैमने सांचीला शोधलेल्या शीर्षाप्रमाणे ही मूर्ती वर्तुळाकार पीठावर उभी होती व खाली तसाच आकार होता. पण येथे तो बदकांऐवजी चित्ररूप पानांनी सजवलेला होता. ज्या मूळ स्तंभावर हा हत्ती उभा होता तो स्तंभ काही कनिंगहमला सापडला नाही. तरीही त्याने बिनदिक्कत हे जाहीर केले की हे सम्राट अशोकाचेच काम होते आणि ह्युएन-त्संगने संकिसाला स्तंभावर सिंहाचे शीर्ष पाहिले असे यामुळे लिहिले की त्यावेळीही या हत्तीची सोंड तुटलेली होती व "अशा प्रकारे विद्रूप झालेल्या हत्तीला तो सिंह समजला".

याच हिवाळ्यात कनिंगहम कोसांबीला तेथे त्याने वर्षापूर्वी शोधलेल्या स्तंभाचे उर्वरीत भाग शोधण्यासाठी परतला. येथे त्याने एक छोटा व बराच तोडफोड झालेला शिलालेख शोधला जो सांचीच्या संघमेद लेखासारखाच होता. याने ही गोष्ट सिद्ध झाली की हा (खेळीमेळीने एकत्र रहाण्याचा) संदेश अशोकाने अनेक बौद्ध विहारांना पाठवला होता.

अर्थात, प्रत्येक नवा शोध चिनी प्रवाशांच्या वर्णनांवर्नच लागला असे नाही. फॉरेस्ट नावाच्या एका व्यक्तीने दिलेल्या माहितीच्या आधारे कनिंग्हम दि)च्या उत्तरेला गेला. तो मसुरीच्या थोड्या पश्चिमेला जेथे यमुना डोंगर सोडून पठारावर प्रवाहीत होते त्या कलसी गावापर्यंत गेला. येथे त्याला नदीच्या वर एका कड्याची माहिती मिळाली ज्यावर एक हत्तीच्या आकाराचा शेवाळाने झाकलेत्ता पांढरा क्वार्टझ होता. या खडकाच्या तीन बाजू घासून गुळगुळीत केलेल्या होत्या व त्यातील दोन पार्श्वभागांवर अशोकाचे चौदा शिलालेख व्यवस्थितपणे कोरण्यात आले होते. ते लिखाण व त्यातीत्त मजकूर गिसारच्या शिंलालेखांसारखेच होते. खडकाच्या उत्तर बाजूस मोठे हस्तिदंत असलेला व वळलेली सोंड असलेल्या हत्तीचे सुबक शिं हा एक अधिक शोधही लागला. हत्तीच्या पुढील व मागच्या पायांमधे ब्राह्मी लिपीत लिहिले होते-गजतपमे.

बर्या च विचारमंथनानंतर कनिंगहंमने कबूत्त केले की त्याला त्या शब्दामागची भूमिका समजू शकली नाही. कदाचित ते त्या खडकाचे नाव असावे कारण इतर तीन शिलालेखांप्रमाणे ह्या खडकाची निवड त्याच्या हत्तीसारख्या आकारामुळे केली गेली होती हे नक्की. आज या शब्दाबद्दलचे सगळ्यात चांगले स्पष्टीकरण असे की गजतमे याचा अर्थ सर्वोत्तम हत्ती असा आहे. हे अशोकाच्या आवडत्या हत्तीचे नाव असू शकेल किंवा बुद्धाचे चिह् म्हणूनही याचा उपयोग असू शकेल. [पालि तिपिटकात बुद्धासाठी अनेकदा महानाग असे संबोधन वापरते जाई. पालि आणि संस्कृत भाषेत नाग म्हणजे हत्ती.]

कालसीचा हत्ती हे हत्तीचे तिसरे असे शि होते की जे अशोकाच्या शिलालेखाच्या जवळ सापडले होते. पहिले होते धौलीच्या खडकातील कोरलेला हत्ती. दुसरे संकिसा येथील हत्तीचे शि . सर्व शि अत्यंत वस्तुनिष्ठ होती.

शेवाळाच्या खाली कालसीचा शिलालेख अतिशय सुस्थितीत होता. कनिंगहेमने लिहिले, “कालसीची लिखावट इतरांपेक्षा सुस्थितीत सापडली, विशेषतः त्या भागात जेथे पाच ग्रीक राजांची नावे होती--अन्टीओकस, टॉलेमी, अँन्टीगोनस, मगस आणि अलेक्झांडर.” ही नावे नक्की कोणती हा प्रश्न एकदाचा निकालात निघाला आणि अशोकाच्या रांज्यारोहणांचा नेमका काळ ठरवणे शक्यी झाले.

हे आता स्पष्ट झाले होते की-- १) अँन्टीगोनस हा पहिला अँन्टीगोनस नव्हता तर त्याचा नातू दुसरा अँन्टीगोनस होता, ज्याने मॅसेडोनियात इ. पू. ३१९ मधे अँन्टीगोनीड घराण्याची स्थापना केली होती व ज्याचा मृत्यु वयाच्या ऐंशीव्या वर्षी इ. पू. २३९ मधे झाला होता. २) अन्टीओकस हा अँन्टीओकस सोटर नव्हता तर त्याचा कमी यशस्वी पुत्र दुसरा अन्टीओकस होता. हा इ. पू. २६२ मधे आपल्या पित्यानंतर राजगादीवर बसला होता आणि त्यानंतरचा त्याचा वेळ इजिप्तच्या दुसर्या टोलेमीशी लढण्यात गेला होता. ३) टॉलेमी हा दुसरा टॉलेमी होता जो इ. पू. २८३ मधे टॉलेमिक इजिप्तचा राजा झाला होता. दुसरा

अँन्टीओकस व दुसरा टॉलेमी यांनी इ. पू. २५७च्या आसपास आपापसात शांततेचा तह केला होता. दोघांचाही मृत्यु इ. पू. २४६त्ता झाला होता.

कालसी शिलालेखात स्पष्ट उ 'ख असलेल्या बाकी दोन राजांपैकी--मगस व अलेक्झांडर--पहिल्ता दुसर्या् टॉलेमीचा सावत्र भाऊ होता ज्याने इ. पू. २७७ ला वेगळा होऊन सायरीन (बहुतांशी आजचा लिबिया) स्थापित केला. हा इ.पू. २५५ च्या आसपास मगसच्या मृत्युपर्यंत इजिप्तपासून स्वतंत्र राहिला. सरतेशेवटी, ज्यांची नावे दिली आहेत त्या राजांपैकी पाचवे नाव दुसर्या अलेक्झांडरचेच असणार. हा इ. पू. २७२ मधे त्याचा पित्ता एपिरसचा (बहुतांशी आजचा आ. निया) पायरहस याच्यानंतर गादीवर बसला. त्याने अन्टीगोनसत्ता मॅसेडोनियातून हाकत्ून लावले व अँन्टीगोनसचा मुतल्तगा दुसर्याा डेमेट्रियसने परत मॅसेडोनिया जिंकेपर्यंत तेथे राज्य केले.

या पाच राजांचा काळखंड असा--

दुसरा अन्टीगोनस इ.पू. ३१९ ते २३९

दुसरा अन्टीओकस इ.पू. २६२ ते २४६

दुसरा टॉलेमी इ.पू. २८३ ते २४६

मगस इ.पू. २७७ ते (जवळपास) २५५

अलेक्झांडर इ. पू. २७२ ते (जवळपास) २५४

वरील विविध कालखंडावरुन असे दिसते की गिरनार, शहाबाझगढी आणि कालसी येथील शिलालेख कोरण्याचा आदेश इ. पू. २६२ (दुसर्याय अँन्टीओकसच्या राज्यारोहणाचे वर्ष) व इ. पू. २५ (मगसच्या मृत्युचे वर्ष) या कालावधीत दिला गेला.

शिलालेख १२ मधे अशोकाने पश्चिमेकडीत्त आपत्ला सर्वांत जवळचा शेजारी असलेल्या दुसर्या् अँन्टीओकसचा उऊ ख केला. परंतु आश्चर्य म्हणजे इ. पू. २५५ मध्ये मेसिडोनियातून स्वतंत्र होऊन बॅक्ट्रीया व पार्थियाचे सार्वभौम राजे झालेले सत्रप डीओडोटस आणि अँन्ड्रागोरसचा उ 'ख अशोकाने केलेला नाही. यामुळे हा शिलालेख या घटनेच्या आधीच कोरता गेला असावा या निष्कर्षाला बळ मिळते. शिंत्तालेख ३ स्पष्टपणे जाहीर करतो की -“मी राजा झाल्यानंतर बारा वर्षांनी ही आदेश दिता”. याचा अर्थ अशोकाचे मगधचा राजा म्हणून राज्यारोहण इ. पू. २६२ - २५७ च्या ९२ वर्षे आधी झाले असावे, म्हणजेच इ. पू. २७४-२६७ मधील वर्ष. कनिंगहॅमने इ. पू. २६७चे समर्थन केले.

सन १८६५-६६ च्या हिवाळ्याच्या सुरुवातीत्ता जनरत्त कनिंगहमने उत्तर पंजाबला दुसरी भेट दिली. आत्तापर्यंत त्याची अशी समजूत होती की कोर्ट, मसून आणि इतरांनी

उत्खनन केलेला प्रसिद्ध मणिक्याल (पंजाब) टोप (स्तूप) हीच प्राचीन तक्षशीलेची जागा असावी. पण सिकंदरच्या स्वारीच्या वर्णनांची तुत्तना फाहेन व ह्युएन-त्संगच्या प्रवासवर्णनांशी करता त्याला तक्षशिला तेथून खूपच लांब, हाझराच्या डोंगरांपासून दक्षिणेला पठारापर्यंत पसरलेल्या मार्ग 1 डोंगररांगेच्या वक्राकार टोकाच्या मागे वसलेले होते हे कळले. आत्ताआत्तापर्यंत हे शेजारच्या इस्लामाबाद शहरातील राजनैतिक अधिकारी व त्यांचे कुटुंबीय यांचे सहलीचे आवडते ठिकाण होते. आज ते प्रतिबंधित स्थान आहे. पण जर आपण त्या टेकडीवर उभे राहून पश्चिमेकडे पाहिले तर आपल्या लक्षात येते की हे शहर किती सुयोग्य स्थानी वसले होते. त्यात्ता तीन बाजूंनी डोंगरांचे संरक्षण मिळाले आहे आणि मार्ग खिंडीवर नियंत्रण ठेवायला ते योग्य ठिकाण आहे. मार्ग 1 खिंडीतून महामार्ग (The Great Highway) व नुकताच झालेला रे मार्ग मार्ग पर्वताला छेदून जातो.

तरक्षशिलेत कनिंगहमने तीन वस्त्यांची ठिकाणे शोधली. प्रत्येक वस्ती स्वतंत्र तटबंदीच्या आत होती. यातील सिरसुक सर्वात चांगल्या अवस्थेत होते. ह्याची नगररचना रोमन नंगरांप्रमाणे व्यवस्थित होती--काटकोनी रस्त्यांचे जाळे, उच चौथऱ्यांवरील मंदिरे व चिरेबंदी दगडाच्या मजबूत भिंती आणि नगरद्वारे. पण तेथील सर्वांत जुनी व सर्वांत मोठी वस्ती 'बीर' होती. तिच्या पूर्वेत्ता अनेक स्तूपांचे ढिगारे होते. महाराजा रणजीतसिंहने नेमलेला फ्रेंच जनरल क्तोंद बेतिस्त कोर्ट याने हा स्तूप पूर्वी खणून चिरून उघडा केला होता त्यामुळे स्थानिक लोक त्याला 'चीर' टोप म्हणत. पुढील पंधरा वर्षे तक्षशिला वारंवार कनिंगहॅमला एका लोहचुंबकाप्रमाणे खेचत होती, कारण भारताच्या प्राचीन इतिहासात या नगरीचे किती महत्व होते याची जाणीव त्याला होती. सन १८७८-७९च्या शीत क्रतुत त्याने तेथे शेवटची भेट दिली. तेव्हा त्याचे वय पासष्ट होते. ब्रिटीशकालीन भारतानुसार, जेथे सेवानिवृत्तीचे वय साधारणपणे पन्नास होते, तो खूपच वयस्कर होता. त्यावेळेपर्यंत त्याने उत्खननाच्या अधिक प्रगत शास्त्रीय पद्धती शोधून काढल्या होत्या. आता तो छोट्या छोट्या वस्तू जसे खापरे (potsherd), भांड्यांचे तुकडे आणि लिंपणाचे व गिलाव्याचे तुकडे यांनादेखील महत्व देत होता. तरी देखील त्याचे मुख्य लक्ष तक्षशिला येथे सापडलेल्या नाण्यांवरच होते. या संपूर्ण परिसरात चौकोनी आकाराची ठसे उमटवलेली (punch marked) नाणी विखुरलेली होती. काहींच्या केवळ एकाच बाजूला ठसा मारलेला होता. त्यामुळे त्याने असा निष्कर्ष काढला की हे भारतातील ठसे ठोकून बनवलेल्या नाण्यांचे सर्वात प्राचीन रूप होते आणि बहुधा ग्रीक यायच्या आधीपासून तक्षशिला येथील टाकसाळीत ती बनली असावीत.

त्याने ठसे ठोकलेल्या नाण्यांचा खजिनाच जमा केला होता. त्यासोबत त्याला अनेक ग्रीक पद्धतीची नाणी मिळाली. यात ग्रीक-बॅक्ट्रीयन राजे पँटालिऑन व अगॅथोकल्स (ही युथिडोमसनंतर इ. पू. २००च्या आसपास गादीवर बसलेल्या डेमेट्रियसची मुले असावीत) यांची नाणी होती. ह्यावरून असे दिसते की जरी मौर्यांचा सिकंद्राच्या गांधारातील उत्तराधिकाऱ्यांशी जवळचा संबंध आला तरी त्यांनी आपली मूळ ठसे ठोकून नाणी

पाडण्याची पद्धत तशीच ठेवली. हे ठसे त्या प्रदेशाशी किंवा स्थानिक टांकसाळींशी संबंधित होते.

कनिंगहमत्ता जर अशोकाच्या किंवा त्याच्या आजोबांच्या--चंद्रगुप्ताच्या--पाऊलखुणा तक्षशिलेत सापडण्याची अपेक्षा असली तर मात्र त्याची ती मनीषा पूर्ण झाली नाही. हे काम जान मार्शल या त्याच्या नंतर आलेल्या डायरेक्टर जनरलने पूर्ण केले. त्याने तब्बल पंधरा वर्षे तक्षशिला येथे उत्खनन करण्यात घालवली. त्याचे या जागेवर इतके प्रेम बसले की त्याने स्वतःसाठी तेथे एक टुमदार बंगली बांधून घेतली. अशोक काही वर्षे या शहरात त्याच्या पित्याचा राजप्रतिनिधी म्हणून राहिला होता. या शहराचा आणि अशोकाचा संबंध दर्शविणारा दुवा एका शिंलालेखाच्या स्वरुपात सापडला. हा लेख आर्माईक भाषेत एका शिंलेवर कोरलेला होता. मूळ शिंलालेखाचा थोडासाच भाग आता शिल्लक दिसतो. त्या शिलालेखाचा तुकडा एका भिंतीत वापरलेला होता. हा तक्षशिंलेत सिरकप येथे मिळाला. इ. पू. २०० मध्ये एक ग्रीक शेलीतीत्त नवीन शहर ग्रीको-बॅक्ट्रीयन राजा डिमेट्रीयस याने बांधले होते. तेथे बांधकामाच्या साहित्यात त्याचा वापर केला जात होता.

या शिलालेखातील प्रत्येक ओळीचा अर्धा भाग नष्ट झाला होता. यातील प्राण्यांप्रति अहिंसा, श्रमण-ब्राह्मणांचा आदर, पालक व वडीलधाऱ्यांच्या आज्ञांचे पालन, पुण्यकर्माला प्रोत्साहन यामुळे याचे शाहबाझगढी आणि मानसेरा येथील शिलालेख ३ व १९ शी साधर्म्य दिसते. (मानसेरा येथील शित्तालेख १८८० च्या दशकाच्या मध्यात शोधला व वाचला गेला होता. तो अशोकाचा पाचवा शिलालेख होता.) या दगडी तुकड्याच्या खाली प्रियदसी हे नाव टिकून होते व त्याबरोबरच प्रियदसीच्या मुलांचाही उ 'ख होता.

सन १८६४ - ६७ च्या आपल्या मोहिमेच्या शेवटी कनिंगहॅम परत गंगेच्या खोऱ्याकडे वळला तेव्हा त्याला नैराश्य यावे अशी घटना घडली. अगोदरच्या चार हिवाळ्यात त्याने उत्तर भारतातीत्त १६० पेक्षाही अधिक प्राचीन स्थळांचे सर्वेक्षण करून त्यांची ओळख पटवली होती. लॉर्ड कॅनिंगने त्याच्यावर टाकलेल्या विश्वासाला त्याने न्याय दिला होता. परंतु पहिल्या व्हाइसरॉयच्या जागी आलेला लॉर्ड लॉरेन्सने आर्थिक तरतूदींमध्ये कपात करण्याचे धोरण अवलंबले. कनिंगहॅम कोलकात्याला परतला तेव्हा त्याला माहीत झाले की या कपातीत आता त्याच्या पुरातत्त्व खात्यावर कुऱ्हाड पडली होती.

इंग्लंड येथे लष्कराचे निवृत्तीवेतन घेत कनिंगहमने काहीशी निष्क्रीय अशी चार वर्षे काढली. तरीही या वेळेचा सदुपयोग करीत त्याने The Ancient Geography of India: the Buddhist Period हे पुस्तक लिहिले. जानेवारी १८६९ मध्ये लॉर्ड लारेन्सच्या जागी लार्ड मेयो कोलकाता येथे आला. परत एकदा राजकीय हवामानाचा वातकुक्कुट फिरला. सन १८७१ मधे जनरत्त कनिंग्हम भारतात परत एकदा भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचा महानिदेशक म्हणून रुजू झाला. त्याबरोबरच तो त्याला Knight Commander of Indian Empire ही पदवीही मिळाली. सर अलेक्झांडरला त्याच्या कामासंबंधी मिळालेले आदेश

असे होते - "त्याने संपूर्ण देशभरात शोध घ्यावा, प्राचीन कालखंडातल्या, सौंदर्यामुळे महत्वाच्या वाटणाऱ्या वा ऐतिहासिक महत्वाच्या वास्तू व इतर अवशेष यांच्या पद्धतशीर नोंदी व वर्णन करावे". हे शब्द उत्साहवर्धक होते पण कनिंगहेमच्या अधिकारक्षेत्रात मद्रास व मुंबई प्रेसिडेन्सी येत नव्हते. त्याच्या दोन कनिष्ठ सहकाऱ्यांना पगार देण्याइतका निघी त्याला जरुर दिला होता-- त्यापैकी पहिला होता, बंगालच्या सार्वजनिक बांधकाम खात्यातत्ा जोसेफ बेगलार नावाचा आर्मेनियन अभियंता आणि दुसरा आर्चीबा कार्लाईल नावाचा इंग्रज जो भारतामध्ये एका लहानशा संस्थानिकाच्या मुलांना शिकवण्यासाठी आला होता आणि नंतर भारतातच एका वस्तुसंप्रहातलयात व्यवस्थापक (Curator)) म्हणून राहिला होता.

कर्निंगहम, बेगलार, कार्लाईल आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी ९८७० ते १८८० या कालावधीत पुरातत्त्व संशोधनासंबंधी जे काम केले त्याला न्याय देणे हे या पुस्तकाच्या आवाक्याबाहेस्चे आहे. या कामापैकी थोडासा भागच सप्राट अशोक आणि त्या काळातील इतिहासाशी संबंधित आहे. कनिंगहमच्या ह्या संशोधनाची सुख्वात सन १८७१ च्या सुरुवातीला बंगालच्या एशियाटीक सोसायटीमध्ये एका फळीवर त्याला सापडलेल्या एका छोट्या पेटीमुळे झाली. त्या पेटीवर लिहीले होते 'रूपनाथ - सलिमाबाद परगणा".

झूपनाथ मंदिर भारतीय उपखंडाच्या मधोमध आहे. अत्यंत साध्या पद्धतीचे हे मंदिर रमणीय अरण्यातील मोकळ्या जागेत आकर्षकपणे उभे आहे. कैमूर पर्वतरांगेतून येणाऱ्या धबधब्यांनी जोडलेले तीन छोटे-छोटे तत्वाव आहेत. त्यापैकी एक तलावाशेजारी हे मंदिर आहे. ही जागा वर्दळीच्या रस्त्यापासून काहीशी दूर जबलपूर्च्या उत्तरेला ३५ मैलांवर आणि स्लीमानाबादच्या पश्चिमेला १५ मैल आहे. कर्नल जेम्स 'ठगी' स्लीमन येईपर्यंत यांचे नाव सलिमबाद असे होते. स्लीमनने एकोणीसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात भारतातील या भागातल्या खूनी, दरोडेखोर 'ठगी' टोळ्यांचा मोठ्या प्रमाणात बिमोड केला [आजचा ठग शब्द या ठगांच्या टोळ्यावर्न आला आहे. मध्य भारतात मोठ्या प्रमाणात आढळणारे हे ठग प्रवाशांबरोबर राहून त्यांचा विश्वास संपादन करत व पुढे त्यांचा खून करून त्यांच्या चीजवस्तू लुटत असत]. नाथ संप्रदायाशी पूर्वापार संबंध असलेल्या रूपनाथ मंदिरात शिवपूजेसाठी भाविक यात्रेकरू येत असत. हे नाथसंप्रदायी वेगवेगळे मार्ग अनुसरतात परंतु त्यांना जातिभेद अजिबात मान्य नाही. नवव्या शतकातील मच्छींद्रनाथ यांना ते नाथसंप्रदायाचे संस्थापक मानतात. योगमार्गाने सिद्धावस्था प्राप्त करण्याचा मार्ग त्यांनी शोधला असे मानले जाते. हा नाथ संप्रदाय भगवान शंकराला आपला आद्यगुरु मानतो पण ते ब्राम्हणी परंपरेपासून दूर आहेत. भारतात बौद्ध परंपरेच्या शेवटच्या काळात आध्यात्मिक विकासासाठी तांजिक मार्गांचा वापर करण्याची प्रथा रुढ झाली. त्याचाच वारसा नाथ संप्रदायाने पुढे चालवला.

र्पनाथसारखी नाथ संप्रदायाची मंदिरे शक्यदतो निर्जन डोंगरभागात किंवा एकाकी जंगलात आढळतात. आज रूपनाथ जवळच्या तीन तलावांवर बंधारे बांधले आहेत.

त्यामुळे एका तलावातील पाणी खालच्या पठारापर्यंत पसरले आहे. अन्यथा हे स्थान एकोणीसाव्या शतकाच्या मध्याला, कर्नल एतलीसचा नोकर जेव्हा येथे आला तेव्हा, होते तसेच आहे. तो बहुधा फेब्रुवारी-मार्चच्या सुमारास शिवरात्रीच्या यात्रेसाठी येथे आला असावा. हा अनामिक नोकर रूपनाथवरून तेथील तळ्याजवळच्या एका शिलालेखाची नक्कल (6/6-००७०४) करून घेऊन आला आणि त्याने ती आपल्या मालकाकडे सुपूर्द केली, ज्याने ती पुढे एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगालतला पाठवली. ती तेथे एका फळीवर एका बंद पेटीत पटून राहीली. पुढे १८७१ मध्ये सोसायटीच्या संग्रहालयाची कपाटे धुंडाळतांना सर अलेक्झांडर यांना एका फळीवर ठेवलेली ही पेटी दिसून आली. त्यांनी लगेचच आपला वरिष्ठ सहायक जोसेफ बेगलर याला बिहारमधल्या गया आणि मुंगेर यामधील सलिमांबाद जि ह्याचा शोध घ्यायला सांगितले पण त्याला तेथे काहीच सापडले नाही. परंतु कनिंग्हम गप्प बसणाऱ्यातला नव्हता. त्याने आणखी चौकशी करून अशी माहिती काढली की आणखी दुसरे एक सलिमाबाद आहे ज्याचे नामकरण आता स्लिंमानाबाद असे झाले होते. बेगलारने पुन्हा नव्याने शोध घेतला आणि लगेचच रूपनाथ व तेथील शिलालेख दोन्ही सापडल्याचे कळवले.

कनिंगहॅम स्वत: ते पाहण्यासाठी त्वरित निघाला. त्याने त्याबद्दल लिहिले, "केमूर डोंगरातून येथे एक छोटा प्रवाह निघतो आणि तीन छोट्या धबधब्यातून खाली आल्यावर डोंगराच्या पायथ्याशी एका निवांत खोलवर जागी तलावात जाऊन विसावतो. येथील तिन्ही तलावांना पवित्र मानले जाते. वरच्या कुंडाला रामकुंड त्याखालच्याला लक्षूमण कुंड आणि सर्वात खालच्या कुंडाला सीताकुंड नाव आहे. मात्र ही जागा पाषाणाच्या कपारीतील शिवलिंगामुळे रूपनाथ म्हणूनच प्रसिद्ध आहे." सीताकुंडाच्या बाजूला एका सपाट दगडावर पाच ओळींचा शित्लालेख कोरलेला होता "ज्याचा वरचा भाग वर्षिक जत्रेच्यावेळी शतकानुशतके लोकांनी बसून बसून गुळगुळीत झालेला आहे".

ज्याला आज लघु शिलालेख (MRE) म्हणतात तो हा अशोकाचा शिलालेख होता. त्यातील अक्षरे इतकी ओबडधोबड होती की ब्राम्ही लिपीचे अगदी प्रथमिक ज्ञान असलेल्या कोणतरी हे कोरले असावे असे कनिंगहमला वाटले. नेहमीच्या उद्घोषाने याची सुरुवात झाली आहे. 'देवानां पिय' असे म्हटत्ला, यामध्ये वैयक्तिक नाव प्रियदर्शी आणि राजा हे बिरूद गाळलेले आहेत. पुढे यामध्ये प्रियदर्शीने बौद्ध धर्म कसा स्विकारला आणि बौद्ध संघाशी त्याचे नाते याबद्दलची ठळक व्यक्तीगत माहिती दिली आहे. "मी उपासक झाल्यापासून आता अडीच वर्षे उलटली आहेत. पण आत्तापर्यंत मी फारसा उत्साही नव्हतो. परंतु आता एक वर्षांपासून अधिक काळ मी संघाला भेट देत आहे व आता खूपच उत्साही झालो आहे."

यातील महत्वाचा शब्द म्हणजे उपासक म्हणजे गृहस्थ अनुयायी आणि 'यमे संघे उपेति" याचे शब्दशः भाषांतर 'संघाकडे गेलो'. येथे असे म्हणायचे असावे की सुरुवातीला अशोक बौद्ध उपासक झाला आणि त्यानंतर एक-दीड वर्षाने भिक्षु होऊन तो बौद्ध

संप्रदायात आला. म्हणजे कदाचित तो दीक्षा घेण्यासाठी आवश्यक तो अनुग्रहं-विधी (गॉ65) पार पाडून तो भिक्षु झाला व चीवर धारण करून विहारात राहिला [या अनुमानाला इतरत्र कुठेही पुरावा मिळत नाही]. या शिलालेखात पुढे सांगितले आहे की अशोकाचा या नवीन धर्माप्रति उत्साह वाढल्यामुळे भारतातील लोकं जे पूर्वी देवतांना मानत नव्हते ते आता त्यांना कसे मानू लागले.

हा शिलालेख पुढे सांगतो की अशोकाच्या धार्मिक उत्साहामुळे भारतातील लोक जे पूर्वी देवांपासून दूर राहत आता देवांजवळ आले होते. त्यानंतर तो सर्वांनी धर्मकार्यात उत्साही असावे असे आवाहन करतो.

सामान्य लोकसुद्धा जर त्यांनी (धर्मकार्यात) उत्साह दाखवला तर स्वर्गप्राप्ती करु शकतात. ह्या घोषणेमागचा उद्देश तोच आहे. सामान्य असो वा श्रेष्ठ असो, सर्वांनीच उत्साही असावे. सीमावर्ती प्रदेशातील त्लोकांनासुद्धा ह्याची माहिती व्हावी व उत्साह टिकून रहावा. मग हा उत्साह वाढेल, खूप वाढेल, दिडपट वाढेल. ही घोषणा राजाने यात्रा करतांना दोनशे छप्पन्न वेळा केली आहे.''

हे शब्द सरळ सरळ नवमतवाद्याचे होते. यात नुकत्याच नव्या धर्मात प्रवेश केलेल्याचा आवेश होता, आपले नवीन विचार आपल्या जनतेमधे वाटण्याची आतुरता होती. इतकी आतुरता की तो धर्मप्रसारासाठी यात्रेवर निघाला असे दिसते. आज ज्याचे वर्गीकरण लघु शिलालेख १ (MRE I) असे केले जाते त्यावरून हे सिद्ध होते की महावंसात लिहिल्याप्रमाणे अशोकाने नक्कीच बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती. महावंसात म्हटले होते की राजगादीवर बसल्यानंतरची तीन वर्षे अशोक आपल्या पूर्वापार चालून आलेल्या धार्मिक परंपरांवर विश्वास ठेवून होता. त्यानंतर त्याचा पुतण्या निग्नोध याच्या प्रभावामुळे त्याची बौद्ध धर्माशी ओळख झाली. त्याच्यामुळे अशोकाने बौद्ध संघाला भेट दिली, बौद्ध भिक्षुंना आपल्या राजवाड्यात आमंत्रित केले. यानंतर त्याने अनेक विहार आणि स्तूप बांधण्याची भव्य मोहीम हाती घेऊन आपल्या संपूर्ण राज्यात बुद्ध-धर्माचा प्रसार करण्याचा आदेश दिला.

रूपनाथ येथील लघु शिलालेखाचा शोध लागल्यापासून कनिंगहमने त्याअगोदर काही वर्षे आधी सापडलेल्या दोन अन्य शिलालेखांचा परत नव्याने अभ्यास केला. यातील पहिला शिंत्तालेख बनारस आणि गयाच्या मधे ग्रॅड ट्रंक रोडच्या बाजूत्ता असलेल्या सासाराम गुहेत होता. सन १८३९ मध्ये या शिलालेखाची एक प्रत (eye -copy) कलकत्ता येथे ASB कडे पाठवण्यात आली होती. पण त्याला इतका उशीर झाला होता की जेम्स प्रिन्सेप ती बघू शकला नाही आणि तेव्हापासून ती प्रत तेथील फळीवर बुरशी लागून तशीच पडून राहिली होती. जोसेफ बेगलरतला मग सासारामची ही गुहा आणि तिच्यातील शिलालेख शोधण्याचा आदेश दिला गेला. त्याने ते काम केले. ही रवपनाथच्या लघु शिलालेखाचीच दुसरी आवृत्ती होती. परंतु याच्या तळाशी दोन महत्वाची वाक्ये अधिक

टाकली होती-- “आणि हा लेख शिंलांवर कोरून घ्यावा. आणि जेथे जेथे (माझ्या राज्यात) शिलास्तंभ आहेत, तेथेही हा मजकूर कोख्न घ्यावा.”

येथे आपल्या मायदेशी मगध भूमीवर राजा अशोक सांगत होता की त्याचे बौद्ध धर्मांतरण दगडांवर कोरून ठेवावे आणि त्याच्या राज्यातील स्तंभावर देखील ते कोरावे. याचा स्पष्ट अर्थ असा निघतो की त्यापूर्वी अशोकाचे असे आदेश (शिलालेख) पूर्वी अस्तित्वात नव्हते. या आधारे तसेच सासाराम आणि रूपनाथ येथील ओबडधोबड कारागिरी आणि खराब लिखाण बघता असे वाटते की आतापर्यंत सापडलेल्या शिलालेखात हे दोन्ही लघुशिलालेख सर्वात आधीचे होते. हे शिलालेख अधिक विस्तारपूर्वक व अधिक सुबक लिखाण असलेल्या गिरनार, धौली, शाहबाझगढी आणि कालसी यांच्या आधीचे होते. तसेच हे चार सुबक शिलालेख स्तंभलेखांच्या आधीचे होते.

ज्या तिसऱ्या शिल्लालेखाचे पुन्हा परिक्षण केले गेले तो म्हणजे १८४० मध्ये कॅप्टन बर्टने राजपुतान्याच्या (राजस्थानच्या) उत्तर सीमेवर शोधलेला बैराट-कलकत्ता शिलालेख. यावरील मजकूर आणि त्याची घडणावळ रूपनाथ आणि सासारामच्या लघुशिलालेखापेक्षा बरीच वेगळी होती. हा कातळावर गुळगुळीत केलेल्या पृष्ठभागावर किंवा जास्त शक्याता अशी की एका स्तंभावर कोरलेला वाटत होता. त्याच्यावरील मोठी व सुस्पष्ट अक्षरे व्यवस्थित कोरलेली होती. कननिंगहैम व त्याचा कनिष्ठ सहायक आर्चीं कार्लाईल या दोघांनी जेथे तो शिलालेख सापडला होता त्या जागेवर शोध घेतला. बैराट गावाच्या दक्षिणेला एका मोठ्या पुढे आलेल्या विशाल शिंलेच्या खाली तो सापडला होता. त्यांना दिसले की ह्या शिलेशेजारी दोन विहारांचे अवशेष व टेकडी सपाट करून तिच्यावर उभारलेला स्तूप होता. स्पष्ट होते की शिलालेख व विहार संबंधित होते. “हा जाहीरनामा विशेषकरून मगधच्या संघाला उद्देशून असल्याने आपल्यातला असे मानता येईल... ... की यांच्या प्रती बाहेरील बौद्ध संघांना पाठवण्यात आल्या होत्या जेणेकरून राजाच्या बुद्ध धर्मावरील अढळ श्रद्धेची नोंद व्हावी.”

कनिंग्हैम व कार्लाईल आजूबाजूच्या प्रदेशाची पाहणी करत होते तेव्हा कार्लाईलत्ला “पिरॅमिडच्या आकाराचे, काळे, दातेरी कडांचे केवळ ज्वालामुखीजन्य (०१४८ 810 ७8$॥॥) विशाल पाषाणांनी बनलेले टेकडीचे शिखर दिसले.” ह्या पैकी एक घराएवढा विशात्त पाषाण खाली घरंगळून आला होता आणि त्याच्या खालच्या भागात कार्लाईलत्ा. तिसरा शिलालेख दिसत्ता ज्याला आज बैराट लघुशिलातलेख म्हणतात.

यापुढचा शोध अधिकच नाट्यमय होता. सन १८७३-४ च्या हिवाळ्यात अलेक्झांडर कनिंगहम बुंदेत्लखंडाच्या जंगली प्रदेशातून दक्षिणेकडे भारताच्या मध्यस्थानी जबलपूरता निघाला होता. बौद्ध भूगोलाच्या भाषेत तो “दक्षिणेला उज्जैन व भिलसा, उत्तेरेला कोसांबी व श्रावस्ती, तसेच पूर्वेला पाटलिपुत्न यांच्यामधील सरळ स्त्यावर” होता. तो आपल्या पथकाच्या पुढे घोडदौड करत असतांना अरूंद महियार खोऱ्याच्या सुख्वातीला त्याच्या

अनुभवी नजरेला दूरवर एक स्तूपासारखे टेकाड दिसले आणि त्याच्यावर एका दगडी कठड्याचे खांब बाहेर आलेले अगदी स्पष्टपणे दिसत होते.

पहिल्यांदा कनिंगहमत्ता केवळ इतकेच दिसले की हा आकाराने व रचनेने सांचीसारखा पण प्रत्यक्षात अधिक अमरावतीशी अधिक साधर्म्य असलेला स्तूप होता. अमरावतीसारखा यासाठी की येथील बहुतांश दगड व विटकाम हे बांधकामाचे साहित्य म्हणून आधीच उकरले गेले होते. तीन महिन्यांनी तो त्या स्तूपाच्या उत्खननासाठी कामगारांच्या ताफ्यासह तेथे परतला. त्याने त्याला Great Stupa of Bharhut नाव दिले. Tope ह्या निकामी नावाचा वापर आता थांबला होता.

दहा दिवसाच्या उत्खननानंतर स्मारकाचे जे अवशेष उघड झाले ते बघून हे स्पष्ट झाले की ऐन वैभवाच्या काळात हे स्मारक अगदी सांचीच्या महास्तूपाप्रमाणेच विलोभनीय असल्ले पाहिजे. मूळच्या चार स्वागताच्या प्रवेशद्वारांपैकी फक्त दोघांचे तुटलेले काही भाग शि क होते. तसेच त्यांना जोडणाऱ्या खांबांच्या गोलाकार कुंपणापैकी काही भाग शिं क होता. या दोन प्रवेशड्रारांचे विशात्ल आडवे दगड तुकडे होऊन खाली पडले होते. परंतु त्यांचे चार उभे दगड व उरलेल्या एक-चवुर्थांश कुंपणाचे सदतीस खांब आणि ऐंशी आडवे दगड यांची फारशी मोडतोड झाली नव्हती. कुंपणाचे हे उमे खांब आणि आडवे दगड भरपूर कोरीव कामाने सजविलेले होते (सांचीच्या कुंपणात मात्र असली कोरीव सजावट नव्हती).

या खांबांची सगळ्यात विलक्षण बाब म्हणजे त्यांच्यावर स्वर्गीय राजे आणि इतर निम्न स्तराच्या देवता - नागराज, देव-देवता, यक्ष-यक्षिणी--यांची मानवी आकाराची तीस शि * तीनही बाजूला कोरली होती. यात देवता व यक्षिणी होत्या-- जाणूनबुजून मादक दिसण्यासाठी कोरलेली विशात्त वक्षस्थळे, सिंहकटी व प्रशस्त नितंब आणि एक हात कायम वर झाडाची फांदी पकडलेला तर दुसरा गुप्तांगाजवळ किवा गुप्तांगाला स्पर्श करतांना.

ह्या मातूदेवतांच्या मूती (fertility figures) त्याच खांबांच्या दुसर्यू बाजूला कोरलेल्या पुरूषी मूर्त्यांपेक्षा एकदम वेगळ्या होत्या. त्या सर्व आदर्श राजाची शि - प्रतिमा होती-गंभीर व शांत चेहरा, ध्यानमम्न वाटावे अशी हाताची घडी. ही शि काराची अंजली मुद्रा दाखविण्याची पद्धत मात्र होती.

'पण अलेक्झांडर कनिंगहंमसाठी सर्वात कुतूहलकारक शिं होते ते एका योद्ध्याचे-- “त्याचे डोके अनावृत्त होते, आखूड कुरळे केस एका रूंद पट्टीने बांधलेले होते, पट्टीची लांब मोकळी टोके वाऱ्यावर उडत होती. त्याचा लांब बाह्यांचा अंगरखा ((॥॥0) मांड्यांपर्यंत पोहोचला होता.” योद्ध्याचा पोशाख, पादत्राणे व पट्टीने बांधलेले केस यावरुन तो ग्रीक (यवन) वाटत होता. कदाचित तो भाडोत्री सैनिक असावा ज्याने चंद्रगुप्त व अशोक या दोघांनाही सिंहासन जिंकायला मदत केली असावी. त्याची तलवार मात्र वादातीत भारतीयच होती. कनिंग्हैमने लिहिले, “आपल्याकडे एरियनाचे वर्णन आहे. ते सर्व खूप रुंद

पात्याची तलवार वापरतात पण त्यांची तलवार क्वचितच तीन क्युबीटपेक्षा (साडे चार फूट) जास्त लांब असते. ते जवळच्या लढाईत ती तलवार दोन्ही हातांनी पकडतात जेणेकरून जोरदार वार करता यावा." काही खांबांवर कारागिरांनी खरोष्टीत काहीतरी कोर्ले होते ज्यामुळे वायव्य भारताशी संपर्काचा अधिक पुरावा मिळाला. ह्यावरून असे दिसले की काही शि कार गांधार प्रदेशातून आणलेले होते.

अवशेषांतीत्त पट्ट्या, भिंतींचे कठडे, गोलाकार शि यावरील इतर मानवी व धार्मिक कार्यांची दृश्ये काही कमी आकर्षक नव्हती. ते सांची वा अमरावतीच्या अवशेषांच्या तुलनेने कमी सुबक व काहीसे ओबडधोबड होते. यावरून ते त्यांच्या आधीचे असावेत.

कनिंगहमता सांचीच्या उत्खननाच्या वेळी होती त्यापेक्षा आता सुरुवातीच्या बौद्ध परंपरेची खूप जास्त माहिती झाली होती. त्याने त्या हृश्यातील वीस-एक इश्ये जातक कथांतील म्हणून लगेच ओळखली. इतर दृश्ये शाक्यमुनी बुद्धाच्या आयुष्यातील महत्वाच्या घटनांची होती. पण विशेष म्हणजे त्यांच्यात बुद्ध दिसत नव्हता--त्याला रिकाम्या सिंहासनावरीतल्त पगडी वा घोड्यावरीलत रिकामे खोगीर असे प्रतिक रूपात दर्शवले होते. सांची व अमरावतीप्रमाणेच बोधि वृक्ष, तेथीत्त वज्रासन, स्तूप, धर्मचक्र ही पूजनीय प्रतिके अनेक ठिकाणी दिसित होती.

बोधिवृक्ष कधी सुरक्षा कुंपणासह तर कधी त्याशिवाय असा दाखवला होता. बोधिवृक्षाबरोबर त्या शिं मधे इतरही अनेक वृक्ष दिसत होते. त्यामुळे कनिंगर्हमला वाटले की अमरावतीतील बौद्ध अवशेषात जसा नाग-सर्प संप्रदाय प्रामुख्याने दिसत होता त्याप्रमाणे भारहूत प्रदेशातीलत बौद्ध धर्म कुण्या वृक्षपूजा करणाऱ्या संप्रदायाशी संलग्न होता.

आजूबाजूच्या भागातील अनेक लोकांच्या समोर ही सर्व शि ' उघडकीस आणली गेली. कनिंगहॅम लिहितो, "ह्या विलक्षण शि मुळे बरेच कुतूहत्त निर्माण झाले. त्लाट साहेबांना ह्या शि बरोबर काय लिहिले आहे हे वाचता येते हे पाहून हे कुतूहल अजूनच वाढले." प्रत्येक नव्या (शि च्या) शोधाबरोबर त्याला विचारते जात होते की (त्यावर) कशाबद्दल लिहिले होते आणि जेव्हा तो दात्याचे किंवा देव-देवतेचे नाव सांगे तेव्हा प्रचंड निराशेची प्रतिक्रिया होत असे. "त्यांची अशी क ना होती की असे उत्खनन केवळ लपवलेला खजिना मिळवण्यासाठी केले जाते."

सांचीप्रमाणेच येथे दात्यांबद्दललची थोडक्यात माहिती ब्राह्मी लिपीत लिहिलेली होती. पण याबरोबरच कोरलेल्या इश्यांचे शीर्षक वा मथळेही होते जे दृश्याच्या विषयाची माहिती देत होते. ब्राह्मी लिपी अगदी अशोकाच्या शिलालेखांसारखीच होती पण त्यांत कुठेही अशोक वा पियदसी (प्रियदर्शी) यांचा उ ख नव्हता.

'एप्रिलमधल्या जीवघेण्या उकाड्यात काम करणे कठीण झाल्यामुळे उत्खननाचे काम थांबवण्यात आले. जेव्हा नोव्हेंबरमधे परत सुरू करण्यात आले तेव्हा प्रवेशद्वाराचे पुरेसे तुकडे मिळाल्यामुळे पूर्व प्रवेशद्वार परत जोडून तयार करता आले. कनिंगहमने आजूबाजूच्या प्रदेशाची पाहणी केली. त्यातला अजून दोन कठड्याचे खांब तसेच दोन शि 'ही सापडली. एका "सुज्ञात जातक कथेचा हरवलेला अर्धा भाग" ज्याचे "अधःपतन खोब्याचा दगडाच्या निकृष्ट कामासाठी" झाले होते. सन १८७५च्या जानेवारीत भारहूतला दिलेल्या तिसर्या भेटीत कनिंगहमतला दोन गायब प्रवेशद्वारांपैकी एकाचा खांब सापडला. त्याने मग आतापर्यंत सापडलेले सर्व अवशेषाचे कोलकाता येथील इंडियन म्युझिंयमला न्यायचे ठरवले. ह्याला "विध्वंसाचा गंध' येत असल्याचे त्याच्या इंग्लंडमधील समकालिनांनी म्हटले. त्यांच्या मते हे स्टोनहेंज (Stonehenge— हे इंग्लंडमधील प्रसिद्ध प्राचीन दगडी अवशेष आहेत) वि शरहून लंडनला आणण्यासारखे होते. पण करनिंग्हेम आपल्या निर्णयावर ठाम होता. त्याने लिहिले, "विध्वंसाचा गंध स्विकारायची माझी तयारी आहे. कारण मी सर्वात अधिक महत्वाची शि ' वाचवली आहेत. मी जी काही मागे भारहूतला सोडली होती ती सर्व लोकांनी लंपास केली आहेत."

जनरल सर अलेक्झांडर कनिंगहमने भारहूतवर अहवाल तयार करायला घेतला तेव्हा तेथील स्तूपाचे कठडे व प्रवेशद्वार यांच्या प्राचीनत्वाबद्दल त्याला काहीही शंका नव्हती. "भारहूतची अक्षरे तंतोतंत अशोकाच्या काळातील लिपीसारखी असणे हा ते 'एकाच काळखंडातीत्त आहेत याचा पुरेसा पुरावा आहे." हे केवळ भावनिक आधारावर केलेले विधान नव्हते. पश्चिम हिमालयातील कांगड़ा येथील ज्वालामुखी मंदिराच्या शेजारी एका शेतात सापडलेल्या चांदीच्या नाण्यांच्या भल्या मोठ्या खजिन्याचे काही वर्षांपूर्वी कनिंगहमने परिक्षण केले होते. त्यात तीसएक नाणी अपोलोडोटस सोटरची होती. हा तक्षशिला ते गुजरातपर्यंत पसरलेल्या इंडो-ग्रीक राज्याचा अधिपती होता आणि त्याचा काळ साधारणतः इ. पू. १७५ ते १६० होता. ही नाणी नुकतीच टाकसाळीतून आलेली दिसत होती. याचा अर्थ ती त्या राजाच्या काळात पुरती गेली होती. पण त्यापेक्षा जास्त नाणी भारतीय होती. त्यातील काही अमोघभूती ह्या राजाची होती. हा इसवी पूर्व दूसऱ्या शतकातीत्त मध्य काळातील राजा होता, हे ज्ञात होते. ह्या सर्व नाण्यांवरच्या ब्राह्मी लिपीत अशोकाच्या ब्राह्मीच्या तुलनेने अनेक बदल केलेले होते. यावरून हे स्पष्ट होते की ती नाणी इ. पू. १७५च्या आधीची नव्हती.

कनिंगहैमने वाचलेल्या भारहूतच्या अनेक शिलालेखांपैकी एका सर्वात महत्त्वाच्या शिलालेखामुळे (जे स्तूपाच्या पूर्व प्रवेशद्वाराच्या स्तंभावर अतिशय स्पष्टपणे कोरलेले होते) त्याचे मत डळमळीत झाले. बाबू राजेंद्रलात्त मित्रा या कोलकात्याच्या संस्कृतज्ञाच्या मदतीने कनिंगहंमने त्याचा असा अर्थ लावला, "त्याच्या शि सजावट व चौथऱ्यासह हे तोरण सुगणच्या राज्यात वच्छीचा पुत्र राजा धनभूतीने आणि गोतीचा पुत्र, विसदेवाचा नातू व गागींचा पणतू अग राजाने करवून घेतले". मित्रा व कनिंगहॅम ह्या दोहोंनी हे गृहीत धरले की

सुगनम हा शब्द शूप्च या मौर्यांच्या छोट्या मांडलिक राजाशी संबंधित होता. याशिवाय, इतर काही नावे कनिंगहमला आधी मथुरा येथे सापडलेल्या बौद्ध कठड्यावरील नावांशी मिळती-जुळती होती. यावरून त्याने निष्कर्ष काढला की भारहूतचे कठडे व प्रवेशद्वार इ. पू. २४० ते २१०च्या दरम्यान उभारले गेले होते-- दुसर्या) शब्दात सांगायचे तर अशोकाच्या कारकिर्दीच्या शेवटी किंवा त्यानंतर लगेचच.

आज ह्यावर एकमत आहे की सुगनम शब्द शुंगांसाठी वापरलेला आहे. शुंग घराण्याची स्थापना अशोकानंतर पन्नास वर्षांनी पुष्यमित्र शुंग ह्या सेनापतीने तेव्हाच्या मौर्य सम्राटाची हत्या करून केली होती. भारहूतचा मूळचा विटांचा स्तूप नक्कीच अशोककालीन होता पण सभोवतालचे कुंपण व प्रवेशद्वार साधारणतः इ. पू. १८० मधे उभारले गेले. अर्थात आजही कनिंगहमचे कट्टर समर्थक आहेत ज्यांना असे वाटते की त्याच्या भारहूत स्तूपाच्या प्रकाशनाचे शीर्षक योग्यच होते--A Buddhist Monument ornamentd with numerous sculptures illustrative of Buddhist Legend and History of the Third Century B.C.


कनिंगहॅमने स्वतःला हा प्रश्न विंचारायत्ता हवा होता की जर भारहूत स्तूप अशोकाच्या काळात किंवा त्याच्यानंतर त्लगेचच बांधता गेला होता तर तेथे अशोकाची इतर कुठलीही स्मारके (अशोक स्तंभ, अशोकाची शि) का नव्हती? यात्ता एक उत्तर असे असू शकते की भारहूतमधे धर्माशोकता स्थान नसण्यामागे प्रबळ राजकीय कारण होते. खांबांचे कुंपण व प्रवेशद्वार बांधले तेव्हा शुंग घराण्याचे राज्य होते, ज्याची स्थापना शेवटच्या मौर्य सम्राटाचा खुनी पुष्यमित्र शुंग याने केली होती व त्यानंतर त्याने बराच बौडविरोधी विध्वंस केला होता.

आणि तरीही भारहूत येथे अशोकाच्या स्मृतीत्ता अभिवादन केलेले असावे-- कनिंगहम एका कोरलेल्या आकृतीचे वर्णन केवळ “हत्तीवरीलत एक शाही धातू-वाहक” असे करतो. पूर्व प्रवेशद्वाराच्या एका स्तंभाच्या बाजूच्या कुंपणातीत्त पाषाणावर प्रमुख ठिकाणी ही आकृती हत्तीवर दर्शविली आहे. त्याच्या बाजूला दोन छोटे हत्ती आहेत व बाजूला ध्वजधारक घोडेस्वार आहेत. त्याने धातूपेटी छातीजवळ घट्ट पकडली आहे.


भारहूतची शि , तसेच सांची व अमरावतीची शि ', अशोकाचाच वारसा आहेत कारण त्यांची उभारणी अशोकाने जे कार्य सुरू केले त्यातूनच झाली आहे. ही शि ' आपल्यातला अशोककालीन व अशोकानंतर लोक बौद्ध म्हणून कसे रहात व कशी उपासना करत हे दाखवणारे सर्वोत्तम स्त्रोत आहेत.




भारहूतच्या महास्तूपाबाहेरील जाणीवपूर्वक कामुक दाखवलेली यक्षिणी--वस्तुतः ऊर्जा व प्रजनन यांचे प्रतिक असलेली वृक्षदेवता. बौद्ध कलेचे मुख्य प्रतिक असलेल्या ह्या आकृतींचे हेसर्वात प्राचीन रूप आहे. ज्या वृक्षाला ह्या देवता मिठी मारताना दाखवल्या आहेत तो अशोक वृक्ष (*Saraca indica*) हिंदू, बौद्ध व जैन तिघे पवित्र मानतात. सन १८७४ जोसेफ बेगलारने घेतलेले छायाचित्र. (Cunningham, *The Stupa of Bharhut*, 1879)



यक्ष, देवता आणि नागांचा राजा चाकवाक., (Cunningham, *The Stupa of Bharhut*, 1879)




भारहूतच्या कुंपणाच्या खांबावरील ग्रीक योदुध्याचे शिल्प. जोसेफ बेगलारने १८७४ मधे घेतलेल्या या छायाचित्रात एक स्थानिक आदिवासी महिला शिल्पाशेजारी बसलेली दिसते आहे. (APAC, British Library)



बोधिवृक्ष व त्याच्या बुंध्याशी असलेले वज्रासन, स्तूप व धर्मचक्राच्या रूपात दर्शवलेला सद्धर्म यांच्या पूजेची दृष्ये. येथे तिन्ही दृष्ये एकाच स्तंभाच्या पुढील व दोन्ही बाजूच्या संयुक्त छायाचित्रात दाखविली आहे. याला कनिंगहॅमने प्रसेनजीत स्तंभ म्हटले कारण ही दृष्ये प्रसेनजीत या तिन्ही ठिकाणी वंदन करतांनाची असावीत. (Cunningham, *The Stupa of Bharhut*, 1879)

१३. भारतीय शिलालेखांचा ठेवा



हत्तीसदृश गिरनार पाषाणाचा लेख कोरलेला मध्यभाग. हा शिलालेख गिरनार पर्वताच्या माथ्यावर जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला आहे. (APAC, British Library)



जौगाडा शिलालेखातील पहिले पाच लेख. यात ''European gentleman' ने केलेली तोडफोड दिसते आहे. (From Alexander Cunningham, *Inscriptions of Asoka*, 1877)





गुरू आणिं शिष्य. डावीकडे प्रोफेसर जॉर्ज ब्युहलर ज्याचा १८९८ मधे बुडून अकाली मृत्यु झाला. उजवीकडे सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, KCIE, ज्यांची आज महाराष्ट्रात एक विद्ठान यापेक्षा एक समाजसुधारक अशी ओळख जास्त आहे.

जौगाडा ही जागा सहज सापडण्यासारखी नाही. भुवनेश्वरपासून दक्षिणेला किनाऱ्याच्या रस्त्यावरून दोन तास गाडीने गेल्यावर गंजाम हे ठिकाण त्वागते. येथे

क्रषीकुल्या नदीचे मुख आहे. या ठिकाणी किनाऱ्यापासून आतीत्त बाजूस नदीच्या वळणांना वळसे घालत आपण पुरुषोत्तमपूर नावाच्या खेड्यात पोहोचतो. येथे जौगाडा नाव कुणीही ऐकलेले नाही. पण असेच पुढे जात राहिला तर असे ठिकाण लागते जेथील नदी ओलांडण्यासाठी अरुंद पूल हाच एकमेव पर्याय आहे. येथे एक निमुळता फाटा फुटतो व खाली सरळ पांदिया ह्या वस्तीत जातो. तेथील लोकांना तुम्हाला नक्की काय हवे आहे हे नेमके माहीत आहे. ते तत्परतेने तुम्हाला तेथे जाण्याचा रस्ता दाखवतात. हा रस्ता पुढे जाऊन जौगाडा टेकडीच्या पायथ्याशी दगडांच्या ढिगाऱ्याजवळ जाऊन संपतो. आता नेमकी शिळा शोधणे एवढेच कायते शि क राहते. आणि ती बघा! त्या ठिकाणी हत्तीच्या आकाराची ती शिळा क्षितिजावर दिसून येते. तिच्या पायाशी काँक्रीटचे व लोखंडी तुळ्यांचे कुरूप बांधकाम दिसते जणू काही प्राणी-संग्रहालयातीत्त एखादा पिंजराच.

ज्याला आज जौगाडा शिलात्लेख म्हणून ओळखले जाते, त्याबद्दलची माहिती सन १८३० च्या मध्याला कॅप्टन मार्खम किट्टो याने सर्वप्रथम दिली होती. त्याने जेम्स प्रिन्सेपला लिहीले होते त्याने एका ‘‘२७० चौरस फूट आकाराच्या शिलालेखाबद्दल' ऐकले होते पण तो त्याला शोधू शकला नव्हता. जौगाडा टेकडी त्यावेळी मद्रास प्रेसिड्सीचा भाग होता जो आता दक्षिण ओडिशात येतो. पाव शतकानंतर किट्टोचा शिलालेख शोधून काढला गेला. त्याचा शोध बहुधा मद्रास येथील मुलकी अधिकारी वा र एलियट याने लावला असावा. मात्र काही विशेष कारणामुळे त्याबाबतीत त्याने बराच काळ मौन बाळगले होते!

आज अमरावती येथील संगमरवरी शि वाचणारा माणूस म्हणून एलिंयटचे स्मरण केले जाते. सन १८२० मध्ये तो मद्रास मुल्लकी सेवेत शिरत्ता आणि त्याचा बराचसा कार्यकाल मद्रास प्रेसिडेन्सीतच गेला. सुरुवातीला त्याला शिकारीच्या छंद होता पण पुढे त्याला प्राणीशास्त्र, भारतीय भाषा, प्राचीन अवशेष ह्या गंभीर विषयांची गोडी लागली. सन १८४५ मध्ये कृष्णा नदीच्या दक्षिणेकडील गुंटूर विभागात त्याची बदली झाली. त्याअनुषंगाने त्याच्यावर अमरावती येथील महास्तूपाच्या अवषेशाची जवाबदारी येऊन पडली. कर्नल कालीन मॅकेन्झीनंतर या अवशेषाचे अजून नुकसान झाले होते. मेकॅन्झीच्या रेखाटनकारांनी चित्रीत केलेली शि ' चुन्याच्या खड्ड्यात नष्ट झाली होती आणि मासुलीपटमच्या जि धिकाऱ्यांनी त्याच्या शहरातील एक चौक सजवण्यासाठी तेथिल तेहतीस शिळा काढून नेल्या होत्या. अमरावती येथील स्तूपाच्या उत्खननाची माहिती पुढे 'एलियटने समुद्र प्रवासात कुठेतरी हरवली, परंतु त्याने मद्रासला पाठवलेली संगमरवरी शि " सुस्थितीत होती. सन १८५९ मध्ये एलियटची ही ४२१ संगमरवरी शि ' बोटीने लंडनला पाठवली गेली. तेथे ती एका जुन्या घरात विस्मृतीच्या पडद्याआड दडून राहिली. शेवटी वास्तुशास्त्राचा इतिहासतज्ञ जेम्स फर्ग्युसन याने त्यांचा माग काढला.

जौगाडा शिंललालेख विठूप करण्यापाठीमागे मुख्य संशयित वा र एलियट्च आहे. सन १८५७च्या सुख्वातील्ला त्याने त्याच्यापेक्षा वयाने वीस वर्षे लहान अशा एका मद्रासच्या

मुलकी अधिकाऱ्याबरोबर या जागेला भेट दिली. त्यावेळी तो शिलालेखाचा पाषाण नंतर ज्या अवस्थेत सापडला त्यापेक्षा फारच उत्तम स्थितीत होता.

सन १८५४ मध्ये एलियट तो भाग सोडून गेला आणि ही गोष्ट उघड झाली की एक युरोपियन सठूहस्थ आणि एक सिव्हीलियन (इंडियन सिव्हील सर्व्हीसच्या सदस्याला तेव्हा सिव्हिलियन म्हणायचे) यांनी या शिळेला भेट दिली होती. त्यांनी हा शिलालेख सुटा करून, तोडून नेण्याचा अपयशी प्रयत्न केला. पण त्याचा अत्यंत घातक परिणाम झाला. स्थानिक ग्रामीण लोकांनी दिलेल्या माहितीनुसार "त्यांनी चिंचेचा गरम कोळ आणि पाण्याचा मारा त्या दगडावर केला आणि त्यावर हातोड्याने घाव घातले ज्यामुळे शिलालेखाचा एक मोठा भाग तुटून पडला".

हा विध्वंसक अर्थातच मौन राहिला. जौगाडा शिलालेखाची अधिकृत माहिती तेथील जि आधिकारी डब्ल्यू. एफ. ग्रॅहम याने सन १८७२ साली दिली. ग्रॅहमचा अहवाल Indian Antiquay च्या प्रथम अंकात छापून आला तेव्हा सरवा र एलिंयट, KCIE, भारतातून निवृत्त होऊन रॉयल एशियाटीक सोसायटीचा प्रमुख सदस्य बनला होता. जौगाडा येथील तो "सिविलीयन? कोण त्याचा तपास घेतला गेला नाही.

गिरनार, धौली, शाहबाझंगढी आणि कालसीनंतरजौगाडा हा सम्राट अशोकाच्या प्रमुख शिलालेखांपैकी अजून एक प्रमुख शिलालेख ठरला. इतर शिलालेखांप्रमाणे त्यावर शिलालेख १ ते १० आणि १४ (RE 1-0 आणि 14) कोरलेले होते. परंतु शिलालेख क्रमांक ११-१३ (RE 11-13) यांच्या ऐवजी दोन इतर शिलालेख (ज्यांना Separate Rock Edicts SRE 1 आणि 2 म्हणतात) असे कोरले होते. हे मुख्य शिलालेखांच्या बाजूला दोन चौकटीत कोरले होते आणि तुलनेने कमी नुकसान झालेले होते.

जेम्स प्रिन्सेपत्ला भुवनेश्वर येथील धौली शिंलालेखावर हेच सापडले होते. यावरून हे समजण्यास मदत झाली की शिलात्ेख क्रमांक ११-१३ (RE 11-13) या दोन्ही ठिकाणी, जौगाडा आणि धौली, का वगळले होते. या दोन्ही जागा प्राचीन कलिंगच्या सीमेच्या आत एक उत्तरेला तर एक दक्षिणेला अशा होत्या.

ह्या तीन न कोरलेल्या शिलालेखांत सम्रार अशोकाने आपका कलिंगवर मिळालेला विजय आणि त्यानंतर तेथील हाहाःकार पाहून त्याला झालेला पश्चाताप यांचा उ 'ख आहे. कलिंग येथील शिंतालेखांवर हे उ ख मुद्दामहून टाळलेले होते. युद्धात होरपळलेल्या कलिंगाच्या लोकांच्या भावनांचा अजून दुखवू नये या विचाराने हे केले असावे.

जौगाडा आणि धौली येथे शिलालेख ११-१३ च्या ऐवजी जे लेख होते ते तोसाली (धौली) आणि समप (जौगाडा) येथील अशोकाच्या महामात्यांना उद्देशून होते. त्यात त्यांना सम्राटाच्या सूचनांचे पालन करण्याची आज्ञा होती-- त्यांनी न्यायभावाने, कोणताही भेदभाव न करता, आपुलकीने, काळजीपूर्वक तेथील लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी

काम करावे जेणेकरून कलिंगमधील प्रजाजन आपापसात शांततेने राहतील. या संदर्भात सम्राट अशोक कदाचित त्याची सर्वात प्रसिद्ध शिकवण जाहीर करतो, ज्यात तो सांगतो की तो त्यांच्या सर्व प्रजाजनांच्या हितासाठी, सुखासाठी राज्य करतो.

“सारी प्रजा माझे अपतूय आहे. मी माझ्या स्वतःच्या मुलांसाठी जी अपेक्षा करतो आणि त्यांच्या इहत्लोक व परलोकातीतल हितासाठी आणि सुखासाठी जी इच्छा बाळगतो तीच मी सर्व प्रजाजनांसाठी बाळगतो. मी किती (अधिक) प्रमाणात ही इच्छा बाळगतो हे तुमच्या लक्षात येणार नाही. जरी काहींना ते लक्षात आले तरी त्या इच्छेची तीव्रता त्यांच्या ध्यानात येणार नाही.”

वरील संदेशाचाच धागा SRE 2 शिलालेख पकडतो पण त्यात एक विशेष उ "खनीय संदेश “जे प्रदेश जिंकलेले नाहीत तेथील लोकांसाठी” दिलेला आढळतो. त्यांच्या मनात “त्यांच्याबद्दल राजाची काय इच्छा आहे” असा प्रश्न पडला असेल तर त्यासाठी अशोकाचे उत्तर असे--

माझी एकमेव इच्छा हीच आहे की त्या सर्वांनी माझे भय न बाळगता जगावे, त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवावा. (आणि) मी त्यांना सुखच देईन, दुःख नव्हे. पुढे त्यांनी हे लक्षात घ्यावे की जे क्षमेला पात्र आहेत त्यांना राजा क्षमा करेल आणि त्याला असे वाटते की त्यांनी धर्माचे पालन करावे, जेणेकरून त्यांना इहलोकात व परत्तोकात देखील सुखाची अनुभूति येईल. माझ्यावर जे क्रण आहे त्यातून मुक्त होण्यासाठी मी हे तुम्हाला सांगतो आहे. तुम्ही लक्षात घ्या की मी माझी शपथ आणि माझे वचन तोडणार नाही. त्यांना (जे प्रदेश जिंकलेले नाहीत तेथील लोकांना) आश्वासन द्या की “हा राजा पित्याप्रमाणे आहे. त्याला स्वतःबद्दल्ल जसे वाटते, तशाच भावना त्याला तुमच्याबद्दल आहेत. आपण सारे त्याला त्याच्या मुलांप्रमाणेच आहोत”.

हा संदेश कलिंगच्या दक्षिण आणि पश्चिमेची लोकांसाठी होता ज्यांना अशोकाने अजून जिंकलेले नव्हते. तेथीलल लोकांनी अशोकाच्या सैन्याला विरोध केल्यामुळे करलिंगावर झालेले भयंकर परिणाम पाहिले होते. आता सम्राट त्यांना सांगू इच्छीत होता की तो आता एक बदललेला माणूस होता आणि तो आता त्यांच्यावर केवळ धर्म-विजय मिळवू पहात होता.

अशोकाने भारताचे दक्षिणेकडील टोक तसेच लंकेचे बेट कधीही जिंकले नाही. महावंस सांगतो त्याप्रमाणे त्याला तसे करण्याची गरजही पडली नाही कारण त्याने हे कार्य अत्यंत शांततापूर्ण मार्गाने धर्मप्रचाराच्या द्वारे केले.

पाचव्या शिलालेखाच्या शोधामुळे एक स्पष्ट आकृतीबंध (पॅटर्न) दिसू लागला. पाचही शिलालेख मनुष्यवस्तीच्या शेजारी टेकडीवर हत्तीच्या आकाराच्या शिळेच्या बाहेरील बाजूवर कोरलेले होते. जौगाडा आणि धौली येथील शिलालेखांवरून खाली तटबंदीच्या आतील अवशेष दिसत होते. धौली येथे तोसाली हे प्राचीन शहर जवळच्याच दया नदीच्या दुसर्यो किनाऱ्यावर आहे. पण तेथीतत मातीच्या व विटांच्या प्रचंड भिंती आणि त्याबाहेरील खंदक आजदेखील स्पष्टपणे दिसून येतो. जौगाडा येथील टेकडी एका कोपर्यात समप शहराच्या तटबंदीशी जोडलेली दिसते. समप हे एक प्रकारे ग्रीक शहरांत दिसणाऱ्या उंचावरील वस्तीप्रमाणे (acropolis) भासते. येथीतत मातीकाम (तोसालीएवढे) भव्य नाही पण आजही आपण पाहू शकतो की समपची रचना चौरसाकृती उत्तर-दक्षिण धुरीवर, दोन्ही बाजूला प्रवेशद्वार असलेली अशी ग्रीक पद्धतीने केलेली होती.

येथील मातीकाम एवढे सुबक नाही. परंतु उघडया डोळ्यांना असे दिसते की मूळ शहर समप हे उत्तर-दक्षिण चौकटीत बसलेले होते. दोन्ही बाजूला दोन प्रवेशद्वारे होती. हे सारे प्रीक स्चनेप्रमाणेच होते. समपच्या आकारावर्न व स्थानावरून ते कलिंगाच्या दक्षिणार्धातील एक महत्वाचे प्रशासकीय केंद्र असावे हे नक्की. शिवाय जवळच नदी व समुद्रकिनारा असल्यामुळे ते आतील भूप्रदेशात तसेच किनाऱ्यावरील व्यापारासाठी सोयीचे असणार.

सन १८५८मधे वा र एलियटने जौगाडा येथे वरवरचे उत्खनन केले त्यात त्याला पहिल्या शतकातील कुषाण नाण्यांचा साठा सापडला. १९५६७ मधे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या श्रीमती देबला मित्रा यांनी येथे व्यवस्थित उत्खनन केले. इ.पू. तिसर्याख शतकात अशोकाच्या कारकिर्दीत समपची स्थापना झाली होती हे त्यांनी दाखवले. मौर्यकालीन सच्छीद्र नाणी व विविध प्रकारचे कामाचे व सजावटीचे साहित्य हे याचे द्योतक होते की ही एक सम्पन्न व प्रगतीशील नगरी होती. तोसालीला असाच आकृतीबंध सापडतो. यावरून असे दिसते की अशोकाच्या कलिंगच्या विजयानंतर तेथील नवीन प्रशासकीय केंद्रे म्हणून लगेचच ह्या दोन्ही शहरांची स्थापना करण्यात आली होती.

ज्या संस्कृतज्ञाने पहिल्यांदा जौगाडा येथील शिलालेखाचा अभ्यास केला आणि त्याबद्दल लिहिले ते भारतीय विठ्ठान आणि समाजसुधारक होते-- सर डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर. त्याकाळी भारतातले भारतीय संशोधनाचे मुख्य केंद्र बनलेल्या मुंबई विद्यापीठामध्ये ते संस्कृतचे सहाय्यक प्राध्यापक होते.

पश्चिम किनाऱ्यावरील मुंबईने आता कोलकात्याला मागे टाकले होते. जनरल सर अलेक्झांडर कनिंगहमच्या मते बंगालच्या एशिंयाटीक सोसायटीचा ताबा ज्यांना तो निसर्गवादी (naturalists) म्हणत असे त्यांच्याकडे गेला होता आणि केवळ तेच तेथील वस्तुसंग्रहातललयाची दिशा ठरवित होते हे त्याचे कारण होते. इत:पर की कनिंगहंमने स्वतः श्रावस्ती येथे शोधलेला बुद्धाचा पुतळा पुन्हा एकदा पहाण्यासाठी तो जेव्हा तेथे गेला तेव्हा

त्याला तो पुतळा “भुसा भरलेली हरिणे आणि काळविटांच्या कळपाच्यामधे केलेत्ता दिसला आणि त्यामुळे त्याच्या पायथ्याशी कोरलेला लेख अजिबात दिसत नव्हता”.

असे असले तरी मुंबईत वंश, जात-पात यांची पकड दोन्ही बाजूंनी खूपच कमी होती हे मुंबईच्या उद्याचे खरे कारण होते. एकामागे एक जाणते विद्वान गव्हर्नर आल्यामुळेही त्याचा लाभ झाला. यामध्ये प्राच्यविद्या अभ्यासक जोनाथन डंकन याचा महत्वाचा हातभार होता. डंकन सन १८१९ मध्ये मुंबईचा गव्हर्नर असतांना मृत्यु पावला. त्यांने भारतीयांना प्राच्यविद्या अभ्यासात सहभागी करण्याची गरज ओळखली होती.

पूर्वी जी धडाडी कोलकात्याची विशेषता होती ती आता मुंबईचे खास वैशिष्ट्य बनली. याचा शैक्षणिक क्षेत्रात परिणाम एलफिन्स्टन कॉलेजच्या उद्यात झाला. सन १८६७ मध्ये ते मुंबई विद्यापीठाचे एक मुख्य केंद्र बनले. [पुढे ह्याच कॉलेजात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोलंबियाला जाण्यापूर्वी शिक्षण घेतले.]

त्यानंतर एका दशकाच्या आतच तेथील प्राच्यविद्या विभाग विडत्तेसाठी सुप्रसिद्ध झाला. याचे मुख्य श्रेय प्रो. जॉर्ज ब्युहत्तर याला जाते. त्याच्या मार्गदर्शनाखाली भारतीय पुरातन लेखांचा अभ्यास (पुरालेखीय अध्ययन) हा केवळ छंद न राहता एक सुव्यवस्थित अभ्यासाचा विषय बनला. विद्यापीठामध्ये संस्कृतचा व नंतर पालीचा अभ्यास हा सन्माननीय विषय झाला. विद्यापीठातून शिकलेल्या संस्कृत तज्ञांची एक नवीन पिढी तयार झाली जी आता केवळ युरोपातील पंडिताच्या सहायकांचे काम करण्यात समाधानी नव्हती.

भारतीय प्राच्यविधेचे तिसरे सुवर्णयुग आता सुरु झाले, ज्यामध्ये भारतीय विठ्ठान डॉ. ब्युहत्तर आणि डॉ. जॉन फ्लिंट (ICS) यांसारख्या विदेशात जन्मलेल्या आणि भारतात काम करणाऱ्या विद्ठानांशीच नाही तर त्यांच्यासारख्याच युरोपातील विद्वानांशीसुद्धा बरोबरीच्या नात्याने काम करू लागले. मुंबई येथे पहिले स्थानिक पदवीधर होण्याचा मान प्रा. बु र यांचा आवडता महाराष्ट्रीयन ब्राम्हण शिष्य रामकृष्ण भांडारकर यांना मिळाला. त्यांचा जन्म १८३७ ह्या विस्मयजनक घडामोडींच्या वषी झाला होता. जेव्हा १८६८ मध्ये डॉ. ब्युहत्तर यांना बढती मिळून ते वरच्या पदावर गेले तेव्हा त्यांच्या जागेवर डो. भांडारकर संस्कृतचे प्राध्यापक झाले. पण केवळ चार वर्षांनी त्यांच्या जागी पंचवीस वर्षे वयाचा ऑक्सफर्डचा विठ्ठान डॉ. पिटर पिटरसन याला बसवण्यात आले. याचा ब्युहललर आणि इतरांनी निषेध करूनही वरिष्ठांनी हा निर्णय मागे घेतला नाही. आता भांडारकर यांच्यासमोर पिटरसनच्या हाताखाली काम करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. अधिक मानहानीची बाब अशी की भांडारकर ज्याला त्यांचे सर्वात मोठे यश मानत होते त्या कार्याचे श्रेय त्यांच्याबरोबर पिटरसनही घेऊ लागला. हे कार्य होते आत्तापर्यंत अज्ञात असलेल्या अनेक संस्कृत व पालि हस्तलिखितांचे संकलन व संपादन. पिटरसन तेथेच राहणार आहे हे स्पष्ट झाल्यावर पुणे येथील्ल डेक्कन कॉलेजमध्ये संस्कृतचे प्रध्यापक म्हणून भांडारकरांसाठी एक नवीन पद निर्माण करण्यात आले. यातूनच पुढे डॉ. भांडारकरांनी

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था स्थापन केली. तिचे उद्धाटन १९१७ साली व्हाईसरॉयच्या हस्ते झाले. तोपर्यंत भांडारकरांना उपरावपद (Knighthood) देऊन गौरवण्यात आले होते.

आज डॉ. भांडारकरांची ओळख जातिव्यवस्थेच्या राक्षसाविरुद्ध लढणारी आणि सनातनी ब्राम्हणी विचारांशी लढा देणारी, तसेच हिंदूंमधे धार्मिक सुधारणेसाठी प्रयत्न करणारी व्यक्ती अशी आहे. पण त्यांची इतिहास संशोधक ही ओळखही तितकीच महत्वाची आहे. त्यांनी दक्खनच्या प्राचीन राजकीय इतिहासाची योग्य सांगड घातली. त्यांनी दाखवून दिले की मौर्य साम्राज्याच्या अस्तानंतर सातवाहन घराण्याचे (यांना ओघ्न असेही म्हणत) मध्य भारतात चार शतकाहून अधिक काळ वर्चस्व होते आणि मौर्य साम्राज्य लयास गेल्यानंतर त्यांनी बुद्ध धर्माला राजाश्रय देण्याचे महत्वाचे काम केले ज्यामुळे प्राचीन बौद्ध स्मारकांपैकी सर्वांत भव्य-दिव्य स्मारकांची (वेरूळ-अजिंठाच्या लेण्यांपासून ते आग्रेयेला अमरावतीपर्यंत) निर्मिती झाली.

भारतातील इतर दोन अग्रणी संस्कृत तज्ञांनी अशोकाबइत्तची बरीच माहिती उघडकीस आणली. ते म्हणजे भाऊ दाजी लाड आणि भगवानलाल इंद्रजी. डो. भाऊ दाजी लाड हे एल्फिन्स्टन कॉलेजचे सुरुवातीचे विद्यार्थी होते. ते वैद्यकीय व्यवसाय करीत असतांना परंपरागत हिंदू औषधांची माहिती कळावी म्हणून संस्कृत शिकू लागले आणि (RAS च्या मुंबई शाखेचे अग्रगण्य सदस्य बनले. त्याच्या जर्नलसाठी ते नियमित लेख लिहीत. त्यांनी भारतीय संशोधनासाठी दिलेल्या योगदानाची कदर म्हणून सन १९७५ साली मुंबई येथील व्हिक्टोरिया आणि अ र्र वस्तुसंग्रहायत्तयाचे नाव बदत्ून ते भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहातलय असे करण्यात आले. मात्र भाऊ दाजींचे सहकारी आणि प्रत्यक्ष जागेवर जाऊन संशोधन करणारे, विनम्र स्वभावाचे भगवानत्ताल इंद्रजी यांच्या वाटेला तितकीशी प्रसिद्धी आली नाही. त्यांनी आपल्या कामाच्या १९ वर्षामध्ये भारतातच नव्हे तर नेपाळपर्यंत सर्वज्ञ प्रवास करून अनेक शिलालेख, हस्तलिखिते, जुनी नाणी यांचा शोध घेतला. त्यामुळेच भाऊ दाजी भारतीय पुरालेखीय अध्ययनाच्या प्रगतीसाठी इतके महत्वाचे योगदान देऊ शकते.

इंद्रजी स्वत: जुनागढच्या संस्थानातून आले होते जिथे गिरनारचे डोंगर आणि त्याच्या पायथ्याशी अशोकाचा शिलालेख असलेत्ता पाषाण आहे. खरे पहाता, या विशाल पाषाणामुळेच सर्वप्रथम इंद्रजी प्राचीन लिखावटीच्या अभ्यासाकडे वळले होते. गिसार येथील दगडावर ब्राम्ही लिपीतील दुसरा शिलालेख आहे असे बऱ्याच काळापासून माहीत होते. परंतु भाऊ दाजी आणि इंद्रजी या दोघांच्या एकत्रित विडठत्तेमुळेच त्या लेखाचे १८६३ मध्ये प्रथम योग्य वाचन झाले व तो रुद्रदामन शिंल्लालेख म्हणून प्रसिद्ध झाला.

या लेखाचा अधिकांश भाग बलशाली विजेता रुद्रदामन याच्या स्तुतीने व्यापला आहे. नाण्यांच्या अभ्यासावरून याची ओळख शक राजा रुद्रदामन | म्हणून आधीच झाली

होती. दुसर्याच शतकाच्या मध्यात त्याचे माळव्यावर राज्य होते. लेखाचा योग्य अर्थ लावल्यावर हे स्पष्ट झाले होते की हा शिलालेख गिरनार पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या धरणाची भिंत व तलावाची मोठी डागडुजी आणि दुरुस्ती पूर्ण झाल्यानिमित्ताने कोरला होता. आधी तुफानी वादळामुळे या धरणाला भगदाड पडले होते. दुरुस्तीचे काम राजा रुद्रदामनचा मंत्री आणि स्थानिक शासक सुविशाख याने हाती घेतले. त्याने स्वतःचे वर्णन "कर्तृत्ववान, संयमी, खंबीर, विनीत, प्रामाणिक, लाच न घेणारा, ज्याने आपल्या चांगल्या राजकारभाराने आपल्या राजाचे पुण्य, प्रसिद्धी आणि गौरव यांत वृद्धी केली" असे केले आहे.

रुद्रदामन शिलालेखावरून उघडकीस आलेली सर्वात उऊ खनीय बाब म्हणजे त्यावर असा उ 'ख केला होता की येथील मूळ ततव आणि धरण बांधण्याचे काम मौर्य सम्राट चंद्रगुप्ताच्या पुष्यगुप्त नावाच्या विभागीय शासकाने केले होते. त्यानंतर पुढे "यवन राजा तुशस्फा या मौर्य सप्राट अशोकाच्या प्रतिनिधीने अधिक सुधारणा करून कालवे काढले होतें." दुसयर्ाो शब्दात सांगायचे तर, चंद्रगुप्ताच्या काळात बांधलेल्या मूळच्या धरणात पुढे राजा अशोकाचा स्थानिक प्रतिनिधी तुशस्फा या ग्रीको-बॅक्ट्री यन राजप्रतिनिधीने सुधारणा केल्या. या शिलालेखात इतरही माहिती मिळते-- जसे की राजा रुद्रदामन याची धर्माप्रति असलेत्ती गाढ आस्था, त्याची करुणा आणि लढाईशिंवाय इतरत्र माणसे न मारण्याची शपथ. यावरून हे स्पष्ट होते की दुसर्याई शतकापर्यंत अशोकाचे नाव आणि त्याची शील-सदाचाराची शिकवण टिकून होती.

सन १८७४ मध्ये डॉ. भाऊ दाजी यांच्या मृत्युमुळे इंद्रजीची परिस्थिती बिकट झाली. तरी देखील आपल्या वरिष्ठाच्या सावलीतून बाहेर पडल्यावर ते स्वतंत्र अभ्यासक झाले. याचे एक उदाहरण म्हणजे त्यांनी गुप्तहेराप्रमाणे लावलेला सोपारा शिलालेखाचा शोध.

सन १८८२ मध्ये ठाणे जि ह्याच्या जि धिकार्याहकडून मिळालेल्या माहितीनुसार इंद्रजी रे ने मुंबईहून सोपारा किनाऱ्यापर्यंत गेले. खाडीच्या बाजूला वसलेले सोपारा वसई येथील पोर्तुगीज वसाहतीच्या अवशेषापासून काही मैल अंतरावर होते. जि धिकाऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारे इंद्रजींनी अनुमान केले होते की त्याने वर्णन केलेला कि 1 हा वस्तुतः बौद्ध स्तूप असावा व प्रत्यक्षात त्यांचे अनुमान खरे ठरले. सोपारा हे एक बंद्र असल्यापासून त्या ठिकाणी बोटीतून उतरण्याचा धक्का म्हणून एक कृत्रिम तलाव बांधलेला होता. त्या ठिकाणी इंद्रजींना एका चौकोनी गुळगुळीत दगडावर ब्राम्ही लिपीत कोरलेल्या काही ओळी दिसून आल्या. त्या शिलालेख ७ (RE 7) च्या एका भागातील ओळी आहेत हे त्यांनी ओळखले. स्थानिक लोकांनी सांगितले की पूर्वी तेथे एक खूप मोठा दगड होता. त्यावर यापेक्षाही अधिक काहीतरी लिहिलेले होते. परंतु नुकताच तो नाहीसा झाला होता.

इंद्रजींना खात्री होती की त्या भागातील धार्मिक स्थळांचा शोध घेतला तर या शिंलालेखाचे अजून काही भाग मिळू शकतील. परंतु राजकीय कारणामुळे तशी पाहणी करण्यास त्यांना परवानगी मिळाली नाही. शेवटी सन १९५५ मध्ये या गुळगुळीत दगडाचा दुसरा तुकडा सोपारा येथे सापडला. त्याच्यावर शितलालेख ९ (RE 9) चा काही भाग कोरलेला होता. इंद्रजी यांनी पूर्वी दावा केल्याप्रमाणे ह्या जागेवर अशोकाचा एक महाशिलातलेख होता ह्या दाव्याला दुजोरा मिळाला.

ग्रीक भूगोलवेत्ता टॉलेमी तसेच अनेक अरब भूगोलवेत्त्यांनी सोपारा बंदराचा उ 'ख केलेला होता. इंद्रजींनी आत्तापर्यंत जे काही वाचले होते त्यावरून ही मुंबईच्या उत्तर किनाऱ्यावरील अपरांत प्रांताची राजधानी होती. इंद्रजीनी लिहिले, "ह्याचे वर्णन एक धार्मिक शहर म्हणून बौद्ध, ब्राम्हणी आणि जेन ग्रंथांमधे मिळते. अशोकाने अपरांत प्रदेशात आपत्ता एक धर्मदूत धम्मरक्खित (धर्मरक्षित) याता पाठविले होते. तो योन 'किंवा यवन म्हणजेच ग्रीक अथवा बॅक्ट्रीयन असावा... मला वाटते की धम्मरक्खिताने सोपाराला आपल्या धम्मप्रसाराच्या कार्याचा केंद्रबिंदू केले आणि सोपारा येथूनच संपूर्ण पश्चिम भारतात बौद्ध धर्माचा प्रसार झाला."

याच कालावधीत बंगालमधे स्थानिक संस्कृततज्ञांसाठी बहुगुणी भाषातज्ञ राजेन्द्रलाल मित्रा हे आदर्श ठरले होते. सन १८४६ मध्ये ह्या बंगाली कायस्थाची 'एशिंयाटीक सोसायटी ऑफ बंगालचा ग्रंथपात्त आणि उपसचिव म्हणून नेमणूक झाली. मित्रा पुढे सोसायटीचे मुख्य सचिव झाले. त्यानंतर त्यांनी एकोणीस वर्षे सोसायटीचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले आणि शेवटी ते त्या संस्थेचे पहिले भारतीय अध्यक्ष बनले. त्यांनी 1२१५७ साठी थोडेथोडके नाही तर ११४ विठ्ठत्तापूर्ण लेख लिहिले. आज मित्रा यांना तडजोड न करणारा सुधारक म्हणून ओळखतात. त्यांनी राष्ट्रीय कामासाठी लिखाण केले. बिहार आणि बंगाल येथील निळीच्या लागवडीचे काम करणाऱ्या मजूरांची परिस्थिती सुधारावी म्हणून आंदोलन केले. त्याबरोबरच मित्रांनी भारताच्या इतिहासाचे जतन व्हावे यासाठी परखड प्रयत्न केले. सन १८६७ च्या शेवटी त्यांनी ओडिशातील जुन्या इमारती, मंदिरे व 'तुमुली' (थडप्यांवरील ढिगारे, पण खरे म्हणजे बौद्ध स्तूप) यांच्या सुव्यवस्थित अभ्यासासाठी बंगालच्या सरकारचे पाठबळ मिळवले. या कार्याचे फळ म्हणजे यानंतर त्यांनी दोन मोठ्या खंडात Antiquities of Orissa प्रकाशित केले. हे भारतातील अशा पहिल्या प्रकाशनांपैकी होते ज्यात छायाचित्रांचा वापर केला होता. यानंतर मित्रा आणि सर कनिंगहॅम यांच्यात बराच पत्रव्यवहार झाला. कनिंगहॅम अनेकदा वास्तूकलेच्या शेलींपासून जुन्या लेखांच्या उलगड्यापर्यंत अनेक विषयांवर मित्रांचे मत घेत असे.

कनिंगहंमने उत्तर भारतात हातात घेतलेले बरेचसे क्षेत्रकार्य (fieldwork) आता त्यांचे दोन सहायक जोसेफ बेगलार आणि आरचीं कार्लाईल पुढे चालवत होते. जोसेफ यांनी दोन प्राचीन स्तूप शोधून काढले होते. त्यातीत्त एक युनायटेड प्राविन्सेसच्या (उत्तर प्रदेशच्या) पूर्व सीमेवर देवरिया येथे सापडला तर दुसरा विदिशा आणि सांची टेकडीच्या

उत्तरेला काही मैलांवर बेशनगर येथे आढळला. दोन्ही ठिकाणी भारहूतसारखेच शि युक्त दगडी कुंपण आणि प्रवेशद्वारे होती, परंतु त्यांची जाणूनबुजून तोडफोड केली गेली असावी असे वाटावे इतके त्यांचे नुकसान झाले होते.

सन १८७४-५ आणि १८७५-६ मधील दोन हिवाळ्यांत आर्चीं कार्तताईल याला चमकण्याची संधी मिळाली. या काळात त्याने सर्वप्रथम फ्रान्सिस बुकॅनन याने नोंद केलेल्या उत्तर बिहारमधील बर्याच बौद्ध स्थळांना पुन्हा एकदा भेटी दिल्या. यावेळी त्याने अनेक अशोकस्तंभांचे पुनर्वलोकन केले. तो लौरिया अराराज स्तंभावरील शिंलालेखाची नवीन नकत्त करीत असतांना हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या तराईच्या जंगलात रहाणारे काही थारू आदिवासी त्याला भेटायला आते.

त्या थारू आदिवासींनी तशाच प्रकारचा एक स्तंभ उत्तरेकडे काही अंतरावर असल्याचे सांगितले--"एक जमिनीत गाडलेला स्तंभ ज्याला ते भीमाची लाठ असे म्हणत आणि जो लौरिया येथील स्तंभशीर्षासारखा आहे असे त्यांनी सांगितले". थारुंच्या मार्गदर्शनाखाली चार्ली त्या जंगलात घुसला. ते जंगल तेव्हादेखील भयानक धोकादायक मानले जात असे. बाहेरचा कुणीही तेथे गेला आणि रात्री मुक्कामी थांबला तर त्याला जीवघेणी बाधा होईल (असा पक्का समज होता).

नेपाळ सीमेजवळ रामपूर्वा खेड्याच्या बाहेर कार्लाईललत्ला स्तंभाचा वरचा भाग दिसला. "स्तंभ जमिनीत तिरप्या अवस्थेत पडलेला होता. त्याचे टोक उत्तरेकडे होते." स्तंभाच्या बाजूलाच बसलेल्या सिंहाचे शि असेलेले त्याचे शीर्ष पडले होते. त्याखाली आधाराचे पीठ (abacus) आणि घंटा जोडलेली होती. मात्र सिंहाच्या पंजाच्यावरती त्या शि चे दोन तुकडे झालेले होते. शौींर्षाच्या पायथ्याच्या बाजूत्ता खाली मन केलेली हसांची जोडी होती. त्याची शैली व पवित्रा लौरिया-नंदनगढ येथील स्तंभावरील शि सारखीच होती.

दलदलीत पडलेला तो स्तंभ कार्लाईलने थारू लोकांच्या मदतीने इतपत उघडा केला की त्याच्या वरच्या अर्ध्या भागावरील ब्राह्मी लिपीतील शिंत्तालेख दिसू लागला. दलदलीत बरेच पाणी साठले असल्याने अधिक खोलवर जाणे शक्यप नव्हते. कार्लाईलने नकलेची एक कच्ची प्रत बनवली. त्यात त्याला त्याच्या बरोबरच्या माणसांनी कमरेपर्यंतच्या पाण्यात उतरून मदत केली. ही नक्कल इतकी चांगली होती की तिच्यावरून हा अजून एक स्तंभावरील शिलालेख (Pillar Edict) म्हणून ओळखता आला. हा आत्तापर्यंत शोधलेला पाचवा स्तंभलेख होता.

या सिंहस्तंभाच्या दक्षिणेला ३०० यार्डावर दुसर्यात एका स्तंभाचा तुकडा जमिनीबाहेर डोकावत होता. कार्लाईल आणि त्याच्या माणसांना लवकरात लवकर सुरक्षित परतण्याची घाई होती. त्यामुळे तेथील संशोधनाचे काम पुरातत्त्ववेत्त्यांच्या पुढील पिढीला करावे लागले. त्यांना पुढे तेथे वशिंड असलेल्या बैलाचे शि व त्याखाली पायथ्याचे पीठ (abacus) व घंटा सुस्थितीत असलेले स्तंभशीर्ष सापडले ज्यावर मौर्यकालीन वैशिष्ट्यपूर्ण

चमक होती. कार्लाईलच्या स्तंभ शीर्षातील सिंहाचे डोके आणि धडाचा वरचा भागसुद्धा शोधला गेला. सिंहाच्या तोंडाचा भाग थोडासा खराब झालेला होता परंतु बाकी तो चांगल्या स्थितीत होता.

रामपूर्वाच्या अशोकस्तंभाचे वृषभशीर्ष आता नवी दि) येथील राष्ट्रपती भवनाच्या व्हरांड्याच्या एका चौथऱ्यावर ठेवले आहे. हे भारताच्या राष्ट्रपतींचे अधिकृत निवासस्थान आहे. या ठिकाणी भेट देणे आणि त्याचे छायाचित्र काढणे अलाहाबाद कि तील अशोक स्तंभाचा फोटो काढण्याइतकेच अशक्य आहे.

नेपाळ सीमेवरील हिमालयाच्या पायथ्याशी असलेले हे दोन स्तंभ शोधल्यानंतर कार्लाईलने असा अंदाज केला की हे स्तंभ सम्राट अशोकाने कुठल्यातरी शाही तीर्थयात्रेचे स्मारक म्हणून उभे केले असावेत. त्याने लिहिते, “चार वेगवेगळे अशोकस्तंभ मगधाकडून उत्तरेला नेपाळकडे जाणाऱ्या रस्त्यावर असल्याचे आता माहीत आहे... म्हणून मत्ता अजून उत्तरेकडे नेपाळच्या तराई भागात कुठेतरी अजून एखादा स्तंभ किंवा शिलालेख सापडण्याची शक्यचता वाटते.” कार्लाईलने वर्तवलेला हा अंदाज किती अचूक होता याची खात्री त्यानंतर दोन दशकांनी पटली.

कार्लाईलला मिळालेले सर्वांत मोठे यश म्हणजे त्याने कासिया येथे बुद्धाच्या भव्य परिनिर्वाण मूर्तीचे केलेले उत्खनन होय. ह्या मूर्तीचे वर्णन खूप खूप पूर्वी ह्युएन- त्संगने केले होते. यामुळे हे सिद्ध झाले की जेथे शाक्यमुनी बुद्धांने शेवटचा श्वास घेतला होता ते हे प्राचीन कुशीनगर होते. त्याने तेथे केलेले उत्खनन तसेच केसरियाच्या महास्तूपाजवळ आणि उत्तर बिहारमधील इतर ठिकाणी केलेल्या उत्खननांवरून स्तूपांची परंपरा किती सर्वदूर पसरत्ली होती हे स्पष्ट होत होते. या परंपरेमुळे बिहारचा भूप्रदेश बदत्ून गेला होता. याचा जनक अशोक असला तरी त्याचे उत्तराधिकारी शुंग, कुषाण आणि गुप्त यांनी ही परंपरा पूर्णत्वाला नेली होती.

आर्चीबा कार्लाईल भारतीय पुरातत्त्व खात्यासाठी व कनिंगहमसाठी अनेक वर्षे अत्युत्तम काम करत राहीला. विशेषतः मध्य भारतातील इतिहासापूर्वकालीन गुहा- चित्रांचा अभ्यास आणि बुंदेलखंड व भागेलखंड येथील अश्मयुगीन हत्यारांच्या अभ्यासामुळे तो जीवाश्म-शास्त्राच्या (0581 ७1885) जनकांच्या पंक्तीत जाऊन बसला.

त्याचे अहवाल आकर्षक असत पण नेहमीच चांगल्या कारणांनी नव्हे. याचे कारण असे की तो कधी कधी आपले अनुदार व अर्वाच्य विचार प्रगट करत असे. त्यात त्याचे वंशवर्चस्ववादी विचारही असत. त्याच्या मते ब्रिटीश आणि पारशी हेच केवळ सर्वोत्कृष्ट आर्य तर हिंदू निकृष्ट (त्याच्या शब्दात coffee dregs म्हणजे उरलेला, तळाचा वा निकृष्ट) आर्य होते. सन १८८५ पर्यंत कार्लाईलच्या विक्षिप्तपणाचे रूपांतर गंभीर मानसिक आजारात (paranoia)झाले होते. त्यामुळे कनिंगहमला त्याला सक्तीने निवृत्त करावे लागले. त्यावेळी अलेक्झांडर कनिंगहमही सत्तरीला पोहोचला होता पण त्याने आपण

अपरिहार्य आहोत असा प्रचार करून निवृत्ती टाळली होती; आणि एका अर्थी ते खरेही होते.

बेगलार आणि कार्लाईल यांनी प्रत्येक्ष जागेवर जाऊन केलेल्या संशोधनामुळे कनिंगहमत्ता भारतीय पुरातत्त्वाचा विस्तृत दृष्टिकोनातून (larger perspective) अभ्यास करणे शक्यी झाले. ते करताना त्याने त्यावेळच्या प्रमुख पुरालेखतज्ञांशी-- जसे मुंबई येथीत्त जार्ज ब्युहत्तर आणि रामकृष्ण गोपाळ भांडारकर, कोलकाता येथिल राजेंद्रलाल मित्रा, ऑक्सफर्ड येथील मॅक्स मु र आणि पॅरिसचा त ख तरुण विद्वान एमिल सेनार्त-जवळचा संवाद साधला. या सर्वांच्या सहकार्यामुळेच कनिंगहमतता १८७७ मध्ये त्याचे Inscriptions of Ashoka हा Corpus Inscriptionum Indicarum ह्या महाग्रंथाचा पहिला भाग प्रकाशित करता आला. जेम्स प्रिन्सेपने ह्या ग्रंथाचे स्वप्न खूप पूर्वी १८३६ च्या सुरुवातीला पाहिले होते. या एकाच खंडामध्ये प्रथमच अशोकाच्या सर्व शिलालेखांचे संकततन करण्यात आले होते आणि त्या शिंलालेखांची अगदी सुख्वातीपासून नुकतीच प्रमाणित अशी अनेक भाषांतरेही देण्यात आली होती.

अशोकाच्या शिंलालेखांची गणती आता सहा शिलालेख (RE—Rock Edicts), सात लघु शिलालेख (MRE—Minor Rock Edicts), सात स्तंभलेख (PE—Pillar Edicts) आणि पंधरा गुफेतील शिलालेख अशी भरत होती. कनिंगहेंमच्या मते अशोकाने कोख्न घेतलेल्या अनेक शिलालेखांपैकी हे थोडेच होते. त्याचे अनुमान होते की एके काळी स्तंभलेखसुद्धा मोठ्या संख्येने असावेत परंतु ते व्यावहारिक कारणांनी "अशोकाच्या अधिपत्याखालील क्षेत्राच्या मध्यभागी, यमुनेपासून गंडकी नदीपर्यंत" या मर्यादित क्षेत्रात असावेत कारण हे स्तंभ सुतलततान फिरोजशाह याने केले तसे तराफेवजा बोटींच्या सहाय्यानेच वाहून नेणे शक्यअ होते.

कनिंगहैमने आत्तापर्यंतचे सारे पुरावे एकत्र करून--पुराणांतील मौर्यांबइलच्या नोंदी, श्रीलंकेचे 'वंस* साहित्य, Legend of King Ashoka, Divine Stories, फाहेन व ह्युएन त्संगची प्रवासवर्णने, शिलालेख व स्तंभलेख यांत दिलेली माहिती यांचा ताळमेळ बसवून--सप्राट अशोक व त्याच्या मौर्य पूर्वजांच्या जीवनातीत्त महत्वाच्या घटनांची क्रमवारी लावली.

इ. पू. ४७८ - शाक््य्मुनी बुद्धाचे महापरिनिर्वाण

इ. पू. ३१६ - चंद्रगुप्त मौर्याचा राज्याभिषेक (२४ वर्षाची राजवट)

इ. पू. २९२ - बिंदुसार मौर्याचा राज्याभिषेक (२८ वर्षाची राजवट)

इ. पू. २७७ - राजकुमार अशोकाची उज्जैनचा शासक म्हणून नेमणूक

इ. पू. २७६ - महिंद्रचा जन्म

इ. पू. २६४ - बिंडुसारचा मृत्यु. अशोकाचा राज्यासाठी भावांबरोबर चार वर्षे संघर्ष.

इ. पू. २६० - अशोक मौर्याचा प्रियदर्शी (पियदसी) म्हणून राज्याभिषेक

इ. पू. २५७ - अशोकाचा बौद्ध धर्म स्वीकार

इ. पू. २५६ - अँन्टीओकसशी तह

इ. पू. २५५ - अशोकाचा मोठा मुलगा महींद्र याचा संघप्रवेश (संघदीक्षा)

इ. पू. २५१ - सर्वांत आधीचा शिलालेख

इ. पू. २४४ - मोगलीपुत्त तिस्साच्या अध्यक्षतेखाली तिसरे संगायन

इ. पू. २४३ - महिंद्रचे धर्मप्रसारासाठी श्रीलंकेला प्रयाण

इ. पू. २३४ - स्तंभलेखांचे वितरण

इ. पू. २३१ - राणी असंधिमित्राचा मृत्यु

इ. पू. २२८ - अशोकाचा तिष्यरक्षिता (तिस्सरक्खिंता) हिच्याशी विवाह

इ. पू. २२६ - राणी तिष्यरक्षिताचा बोधिवृक्ष नष्ट करण्याचा प्रयत्न

इ. पू. २२५ - अशोक संन्यस्त जीवन जगू लागतो

इ. पू. २२४ - अशोकाचा मृत्यु

परंतु कनिंगहैमचे Inscriptions of Ashoka प्रकाशित होण्याआधीच ह्या घटनावळीतील काळखंडांबद्दल डच विदठ्ठान प्रो. जोहान हेन्ट्रीक कर्न याच्या संशोधनामुळे संभ्रम निर्माण झाला होता. प्रो. कर्न लेडन विद्यापीठात जाण्यापूर्वी १८६७च्या दशकात काही काळ बनारसमधल्या संस्कृत आणि क्वीन्स कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक होते. कर्नच्या मते शाक््यामुनी बुद्धाचे निर्वाण इ.पू. ४७८ मध्ये नव्हे तर इ.पू. ३८८ मध्ये झाले होते; तसेच त्याचे महापरिनिर्वाण आणि अशोकाचे राज्यावरोहण यामध्ये ११८ वर्षाचे अंतर होते. त्यामुळे अशोकाचे राज्यारोहण इ.पू. २७० मध्ये झाले. याचा अर्थ कनिंगहैम अशोकाच्या कालगणनेमध्ये दहा वर्षांनी चुकला होता.

“(कर्नने काढलेल्या) निष्कर्षाशी मी सहमत नाही असे म्हणण्याचीही खरे तर गरज नाही” असे कनिंगहेमने जाहीर केले. परंतु कमीतकमी अशोकाशी संबंधित कालगणनेबाबत तरी कनिंगहॅम (कदाचित) चूक होता आणि कर्न (कदाचित) बरोबर होता. नंतरच्या अनेक विद्ठानांचे हेच मत आहे. आज सर्वसाधारण मत असे आहे.

इ. पू. ३२२-२९९ - चंद्रगुप्त मौर्याची राजवट.

इ. पू. २९९-२७४ - बिंदुसाराची राजवट,

इ. पू. ३3०२ -- अशोकाचा जन्म.

इ. पू. २८५ - अशोकाचा थोरा मुत्तगा महिंद्र याचा जन्म.

इ. पू. २८२ - अशोकाचा थोरली मुलगी संघमित्रा हिचा जनम.

इ. पू. २७४-२७० - चार वर्षांचे स्थित्यंतर,

इ. पू. २७० - अशोकाचा राज्याभिषेक.

इ. पू. २६६ - अशोकाचा उपासक म्हणून बौद्ध धर्माचा स्वीकार, बौद्ध स्मारकांच्या निर्माणकार्याचा आरंभ.

इ. पू. २६१ -- अशोकाचा कलिंगवर विजय.

इ. पू. २६० - अशोक पहिला लघुशिलालेख कोरून घेतो. बौद्ध स्थानांच्या पहिल्या तीर्थयात्रेवर जातो. स्तूपांचे निर्माणकार्य सुरू करतो. त्याची राणी पद्मावती कुणालत्ला जन्म देते.

इ. पू. २५९ -- अशोक कलिंग शिलालेख कोरून घेतो.

इ. पू. २५९ -- अशोक शिलालेख कोरून घेतो. बाराबार गुफा आजीविकांना देतो.

इ. पू. २५३ -- अशोक तिसऱ्या बौद्ध संगायनाचे आयोजन करतो.

इ. पू. २५२ - महिंद्रचे धर्मप्रसारासाठी श्रीलंकेला प्रयाण. अशोक धर्मप्रसाराचा कार्यक्रम हाती घेतो.

इ. पू. २५२ - अशोक बौद्ध स्थानांच्या दुसर्याल तीर्थयात्रेवर जातो. लुंबिनीलाही मेट देतो.

इ. पू. २४३-२४२ - अशोक स्तंभलेखांचे वितरण करतो.

इ. पू. २४० -- अशोक पंचवार्षिक उत्सव साजरा करतो.

इ. पू. २३९ -- अशोकाची राणी असंधिमित्राचा मृत्यु.

इ. पू. २३५ - अशोकाचा तिष्यरक्षिता (तिस्सरक्खिता) हिच्याशी विवाह. अशोकाचा मुल्तगा व उत्तराधिकारी कुणाल याची तक्षशिलेवर नेमणूक.

इ. पू. २३४ - कुणालांचे डोळे काढले जातात. राणी तिष्यरक्षिता राजदरबारात बौड़विरोधी गटाचे नेतृत्व करते व तिला देहदंड दिला जातो. अशोक अधिकाधिक विकलांग होतो. कुणालचाअ वयीन मुलगा संप्रती याची राज्याचा उत्तराधिकारी म्हणून नेमणूक.

इ. पू. २२४ - अशोकाचा मृत्यु.

जनरत् अलेक्झांडभे आपला हिवाळ्यातील प्रवास चालूच ठेवला. इ.स. १८८२-८३ मध्ये तो मथुरेत्ता परत आला. मुस्लिमांच्या मूर्तिमंजकतेमुळे तेथे खूपच विध्वंस झाला होता. तेथील अनेक पुरातन ढिगारे आता त्यांची गुपिते उघड करीत होते. त्यात कुषाण काळातील

विलोभनीय बौद्ध व जैन शिं ही होती. याआधीच्या अतिप्राचीन बौद्ध शि मधे एक विशाल पुरूष मूर्ती मिळाली. तिची खूप मोडतोड करण्यात आली होती पण तरीही तिची वैशिष्ट्यपूर्ण गुळगुळीत चमक टिकून होती. या मूर्तीच्या तळाशी सुरुवातीच्या अशोककालीन ब्राम्ही लिपीतील ओबडधोबडपणे कोरलेले शब्द होते. त्यावरून कनिंगहॅमने त्याच्या निर्मितीचा काळ इ. पू. तिसर्याय शतकातीत्त असावा असे अनुमान काढले. आत्तापर्यंत भारतात सापडलेल्या मूर्तींपैकी ती सर्वांत जुनी मूर्ती होती. त्याने असा अंदाज बांधला की ती मूर्ती यक्षाची असावी पण ती स्थूलकाय होती हा उ 'ख त्याने केला नाही. हे नक्कीच बुटके (गण, शिंवगण) यांचा अपवाद वगळता यक्षांचे लक्षण नाही. त्याने हा ही ऊ ख केला नाही की त्याचा गोलाकार चेहरा जवळजवळ सपाट झाला होता.

अशोक अभ्यासात (Ashokan Studies) कनिंगहमचे शेवटचे योगदान म्हणजे आज बोधगयेतील प्रसिद्ध महाबोधी मंदिराचा जीर्णोद्धार सन १८७७ मध्ये ब्रह्मदेशाच्या (म्यंमाच्या) राजाच्या आज्ञेनुसार ब्रह्मदेशी कामगारांनी केलेला पुर्नबांधणीचा विध्वंसक प्रयत्न ही त्याची सुरुवात होती. बंगाल सरकारे राजेन्द्रलाल मित्रा यांना तेथील परिस्थितीचा आढावा घेण्यास सांगितले. तेथीत्त परिस्थिती बघून मित्रांना धक्काच बसत्ता. त्यांनी आपल्या परखड अहवालात लिहिले, "त्यांनी (ब्रह्मदेशी कामगारांनी) त्यांच्या उत्साही पण चुकीच्या आणि दिशाहीन कामाने प्रचंड हानी केली आहे. त्यांनी आत्तापर्यंत केलेले उत्खनन व केलेली तोडफोड यामुळे जुन्या खुणा नष्ट झाल्या आहेत आणि त्यांनी जेथे जेथे काम केले आहे तेथे तेथे आता कुठलीही प्राचीन गोष्ट सापडत नाही."

ब्रह्मदेशी कामगारांना तेथून हाकलून लावले गेले आणि ते सारे काम पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या (ASI) हातात देण्यात आले. जोसेफ बेगत्तार त्या जागेवर प्रमुख म्हणून नेमला तर मित्रा त्याचे स गार. महाबोधी मंदिर व त्याचा सभोवतालचा परिसर यांचा गुंतागुंतीचा इतिहास अत्यंत काळजीपूर्वकपणे शोधला गेला. त्यावरून असे दिसते की मूळचे मौर्यकालीन मंदिर आणि बोधिवृक्षाचे संरक्षक कुंपण याच्याजागी दुसर्या शतकात कुषाण राजा हुविष्क याने अतिभव्य मंदिर व मोठे कुंपण बांधले होते. अशोकाने बांधलेल्या मूळ कुंपणाचे बरेचसे भाग मिळाले, त्यामध्ये अशोकाच्या मूळ मंदिराला आधार देणारे चार स्तंभदेखीत्त होते. आणि सर्वांत विलक्षण म्हणजे अशोकाने बोधिवृक्षाच्या पायथ्याशी ठेवलेले वज्रासनदेखील सापडले. हा सारा शोध भारहूतच्या शिं मधे दिसणाऱ्या बोधगयेच्या देखाव्याशी मिळताजुळता होता.


आज अशोकाच्या वज़ासनाचा वरचा भाग सुशोभित आवरणाखाली झाकला गेला आहे. खालचा भाग बोधिवृक्षाची वाढ झाल्यामुळे जमिनीत पूर्णपणे दबला गेला आहे. तरीदेखील चौथऱयाच्या पाषाणावर बाजूने कोरलेली अकॅन्थसच्या पानांची बेलबुट्टी आजही आपण पाहू शकतो. ही अशोकस्तंभांच्या शीर्षांवरील कलाकुसरीसारखी आहे.

अवशेषांत सापडलेल्या जुन्या महाबोधी मंदिराच्या दगडी प्रतिकृतीच्या मदतीने करनिंगर्हैम, मित्रा आणि बेंगलार यांनी हे अवघड (आधी ब्रह्मदेशी कामगारांनी बिघडवलेले) कार्य जास्तीत जास्त उत्तमरित्या पूर्ण केले.


सरतेशेवटी, निवृत्ती स्वीकारण्यासाठी सर अल्लझेंडर कनिंग्हमचे मन वळवण्यात आले तेव्हा त्याचे वय ७१ वर्षे होते. तो सप्टेंबर १८८५ मधे मुंबईहून परत जाण्यासाठी इंडस नावाच्या स्टीमर बोटीत बसला. ती बोट पुढे श्रीलंकेजवळ एका खडकावर आपटून फुटली. यांत कनिंगहमचा नाण्यांचा बराच मोठा साठा बुडाला. पण कनिंगहम जरादेखील ओरखडा न उमटता सुरक्षित किनाऱ्यावर पोहोचला. आपण आपल्याजवळील सोन्याची व चांदीची नाणी अगोदरच इंग्लंडत्ता पाठवून दिली याबद्दल त्याने स्वतःची पाठ थोपट्ली. ती नाणी आज ब्रिटीश म्युझियममधे आहेत. यानंतर आठ वर्षांनी साउथ केन्स्जिंगूटन येथे त्याचा मृत्यु झाला. तोपर्यंत त्यांने फाहेन व ह्युएन त्संग यांच्या मदतीने सोडवायचा प्रयत्न केलेल्या बौद्ध जिग-सोंमधील हरवलेले जवळजवळ सर्व तुकडे मिळाले होते. सर्वच नाही, काही बाकी उरले होते.




रामपूर्वा येथील कार्लाईलच्या पहिल्या स्वंमाचे १९०७ मधे डॉ. दयाराम साहनी यांच्या मार्गदर्शनाखाली केलेले उत्खनन. छायाचित्रात वर डाव्या बाजूला सिंहशीर्ष दिसत आहे. (APAC, British Library)



परखमचा गूढ विशालकाय पुतळा. याच्या पायाशी कोरलेल्या शब्दांवरून हा मौर्य आहे. (APAC, British Library)




बोधिंवृक्षाच्या बुंध्याशी असलेला सम्राट अशोकाने बांधलेले वज्रासन. वर सुरक्षेसाठी उभारलेल्या शामिंयान्याच्या एका स्तंभाच्या शीर्षावर हत्ती आहे. Cunningham, The *Stupa of Bharhut*, 1879)



१८८०च्या दशकात महाबोधिं मंदिराच्या जीर्णोद्धारानंतर दिसत असलेले सम्राट अशोकाचे वज्रासन व अलेक्झांडर कनिंग्हैमने पुनर्रोपन केलेला बोधिवृक्ष. अनागारीक धर्मपाल बसलेले दिसताहेत. सन १८९१ मधे त्यांच्या बोधगयेच्या यात्रेनंतर सुरू झालेल्या बौद्ध सुधारक चळवळीतील महत्त्वाचे व्यक्तिमत्व. (APAC, British Library)

१४. कनिंगहमच्या पश्चात भारत



जनरल समशैर खड्ग राणा यांनी केलेल्या उत्खनननानंतर दिसणारा लुंबिनीचा स्तंभ. त्यावरील लेख जमिनीच्या स्तराच्या खाली जेमतेम दिसतो आहे. डॉ. अँन्टॉन फ्युहरर यांनी काढलेले छायाचित्र. (APAC, British Library)

सर अलेक्झांडर कनिंगहमच्या कार्यक्षेत्रात मद्रास व मुंबई प्रेसिडेंसी येत नव्हते. सन १८७३ मध्ये पावाच्या ॥विघछा% चा संपादक व जेम्स फर्ग्युसनचा पट्टशिष्य डॉ. जेम्स बर्जेस यांची पश्चिम भारताचा पुरातत्त्व सर्वेक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली. दोन वर्षानंतर जेम्स फर्ग्युसन, सर वो. र एलियट आणि इंग्लंडमधील इतर मान्यवरांनी भरपूर

रदबदली केल्यामुळे त्याच्यावर दक्षिण भारतातल्या पुरातत्त्व उत्खननाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला गेला. कनिंगहॅमच्या निवृत्तीनंतर त्याची संपूर्ण भारताचा प्रमुख महासर्वेक्षक म्हणून नेमणूक झाली. अशा रितीने त्याने त्याच्या जुन्या प्रतिस्पर्ध्यांवर मात केली असे चित्र दिसू लागले. तरीही कनिंगहेंमचा वरिष्ठ सहाय्यक जोसेफ बेगलार बंगालचा पुरातत्त्व सर्वेक्षक या पदावर होता आणि तो बर्जेसच्या वर्चस्वाला आव्हान देत होता.

बर्जेसची रूचि कनिंगहमपेक्षा फारच वेगळी होती. त्याने पुरातत्त्वापेक्षा वास्तुकलेवर लक्ष केंद्रीत केले. पश्चिम भारतातील बौद्ध लेण्या आणि तेथील शिलालेखांमधे त्याला विशेष रस होता. कदाचित त्यामुळे त्याने अमरावतीकडे पुरेसे लक्ष दिले नाही. कनिंगहेमच्या दृष्टीने मात्र अमरावती हे अत्यंत महत्वाचे पुरातत्त्व स्थळ होते परंतु त्याला त्याची प्रत्यक्ष पहाणी कधीच करू दिली नव्हती.

याचा परिणाम असा झाला की अमरावतीचे नुकसान होतच राहीले. हौशी पुरातत्त्व अभ्यासक व बांधकामाचे साहित्य शोधणाऱ्या स्थानिक लोकांनी तेथे वारेवार उत्खनन केले. सरतेशेवटी मद्रास प्रांतांच्या गव्हर्नरने या सर्वांना ह्या जागेवर बंदी घालण्याचा आदेश दिला. त्यामुळे अखेर १८८२ मध्ये बर्जेस जेव्हा तेथे उत्खननासाठी पोहचला तेव्हा त्याने स्वतःच म्हटल्याप्रमाणे त्याला तेथे केवळ “एक मोठा खड्डा? दिसता.

बर्जेसचे अमरावती येथील एकमेव काम हे की त्याने तेथे उरलेल्या बऱ्याचश्या शिळांवर दोन्ही बाजूंना कोरीव काम असल्याची नोंद केली. तसेच त्याने अशीही नोंद केली की स्तूपातला अगदी पूर्वी मोठ्या विध्वंसाला सामोरे जावे लागले असावे. ही घटना कदाचित इ. पू. दुसर्या शतकात, जेव्हा मौर्य साम्राज्याच्या अस्तानंतर निर्माण झालेली पोकळी सातवाहन राजघराणे भरून काढत होते तेव्हा घडली असावी. अमरावतीच्या जवळच असलेले धन्यकटक शहर जेव्हा आंध्र सातवाहनांची राजधानी बनले तेव्हा अमरावतीच्या स्तूपाची पुर्नबांधणी करून त्याचा बराच विस्तार करण्यात आला. तरी देखील बर्जेसला याचे थोडेफार श्रेय द्यावेच लागेल की त्याने पुढे अमरावतीच्या वरच्या भागातल्या पुरातत्त्व स्थळांचे सर्वेक्षण केले व जगैयापेट येथील उठाव-शिं ' (basreliefs)शोधून काढली.

जगैयापेटच्या कोरीव शिं मधे तेव्हाही कुणी फारसा रस दाखवला नाही व आजही ती उपेक्षितच आहेत. तरीदेखील अमरावती येथील चक्रवती सप्राटाच्या उरत्ययासुरत्या प्रतिमा आणि या शिळांना एकत्र पाहिले असता हे स्पष्ट होते की चक्रवती सम्राट हीक ना भारतात बऱयापैकी प्रस्थापित झाली होती आणि येथूनच पुढे ती चीन आणि त्याच्याही पुढे विस्तारत गेली.

दक्षिण भारतातील हैद्राबाद आणि म्हैसूर ही दोन मोठी संस्थाने बर्जेसच्या अधिकारक्षेत्रात येत नव्हती. त्या ठिकाणी अशोक-अभ्यासाचे काम स्थानिक हौशी लोकांकडे होते. येथील एक उ 'खनीय संशोधक म्हणजे बेंजामिन लुईस राइस. त्याचा जन्म

बेंगलुरू येथे १८३७ या विस्मयकारी घटनांच्या वर्षात झाला होता. सन १८& मध्ये एका शाळेत मुख्याध्यापक म्हणून तो तेथे परतला होता. त्यावेळी बेंगलुरू तेव्हाच्या म्हैसूर संस्थानाचे ब्रिटिश प्रशासन केंद्र होते. पुढे राइसला म्हैसूर राज्यातल्या शाळांचा निरिक्षक आणि लोकशिक्षणाचा निदेशक म्हणून नेमण्यात आले. या कामानिमित्त त्यात्ता राज्यभर घोड्यावरून फिरावे लागत असे. अशा प्रवासात त्याला बऱ्याच ठिकाणी कोरलेल्या शिळा दिसून आल्या व त्यांच्याबद्दल त्याची उत्सुकता वाढतच गेली. स्थानिक संस्कृत आणि कन्नड पंडितांच्या मदतीने तो या प्राचीन शिलालेखांचा संग्रह आणि भाषांतर करू लागला. बघता-बघता त्याच्याकडे नऊ हजारावर शिलालेखांचा प्रचंड साठा जमला. निवृत्त झाल्यावर त्याला म्हैसूर राज्याचा पुरातत्त्व निर्देशक म्हणून नेमले गेले. सन १८०६ मधे वयाच्या सत्तराव्या वर्षी भारत सोडेपर्यंत तो या पदावर कायम राहिला.

लुईस राइसचे एक मोठे कार्य म्हणजे त्याचा बारा खंडांचा Epigraphia Carnatica हा ग्रंथ. परंतु याहीपेक्षा लक्षणीय कार्य म्हणजे त्याने म्हेसूर राज्यात १८९२ साली तीन अशोककालीन लघुशिंलालेख (MRE) शोधून काढले. हे तिन्ही त्याला बेंगलुरूच्या उत्तेरेला १५० मैलावर कर्नाटकातील चित्रदुर्ग जि ह्यात छिन्ना हगारी नदीजवळ ब्रम्हगिरी, जटींगा-रामेश्वर आणि सिद्धपुर या जवळ-जवळच्या ठिकाणी सापडले. हे तीनही शिलालेख एकाच व्यक्तीने लिहिलेले होते. खाली खरोष्टी भाषेत चपडा (Capada) अशी त्या व्यक्तीची सही होती. आणि त्याने स्वतःचे वर्णन लिपिक असे केले होते. यावरून राइसला असे वाटले की कदाचित तो तक्षशिला भागातून आला असावा. म्हणून त्याने लिहीले, “असा निष्कर्ष निघतो की हा लिपिक साम्राज्याच्या उत्तर टोकाकडून दक्षिण टोकाकडे बदली झालेला अधिकारी असावा. याचा अर्थ असा की आपल्याला वाटते त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात त्या काळात मुक्तपणे अंतर्गत दळणवळण होत होते."

लुईस राईस सोडून जाण्याच्या काही काळच आधी त्याच्या अधिकारात एक याहीपेक्षा अधिक महत्वाचा ऐतिहासिक शोध लागला. तंजावर येथीत्त एका ब्राम्हणाने नवीनच उघडलेल्या म्हैसूर प्राच्यविद्या वाचनालयाला ताडपत्रावरील संस्कृत भाषेतील काही हस्तलिखिते भेट दिली. त्यापैकी एक होते 'अर्थशास्त्र' ज्यात राज्याच्या सुव्यवस्थेसाठी राजाची निवड कशी करावी, त्याला प्रशिक्षण कसे ध्यावे व मार्गदर्शन कसे करावे याची माहिती पंधरा प्रकरणात दिली होती. अनेक शतके भारतीय राज्यांमधे हा ऐतिहासिक ग्रंथ सर्वत्र प्रचलित होता परंतु कदाचित या ग्रंथाच्या धर्मनिरपेक्ष शिकवणुकीचा इतर ब्राह्मणी धर्मग्रंथांशी मेळ बसत नसल्यामुळे नंतर या साऱ्या प्रती जवळजवळ नाहीशा झाल्या. शाम शास्त्री या म्हैसूर प्राच्यविद्या वाचनालयाच्या ग्रंथपालांनी हा ग्रंथ ओळखेपर्यंत तो पूर्णपणे अनुपलब्ध आहे असे मानले जात होते.

अर्थशास्त्राची जी प्रत उपलब्ध होती ती सुरुवातीच्या गुप्तकाळातील विष्णुगुप्त ह्याने संपादीत केली होती किंवा बदल केली होती. पण मूळ ग्रंथाचा लेखक चाणक्य ब्राह्मणच मानला जातो. त्याला कौटिल्य (कावळ्यासारखा) असेही म्हटले जाते. हा

मुद्राराक्षस ह्या राजकीय नाट्याचा नायक होता, तसेच पुराणांचाही. याने इ. पू. चौथ्या शतकात शूद्र राजा नंद याचे राज्य उलथवून आपत्ता शिष्य चंद्रगुप्ताला सिंहासनावर बसवले होते. चाणक्यच या ग्रंथाचा लेखक आहे ह्याचा पुरावा ग्रंथातच मिळत होता कारण ग्रंथाच्या शेवटून दुसर्याच परिच्छेदात लिहिले होते की ह्या ग्रंथाच्या निर्मात्याने "बलपूर्वक व शीघ्रतेने आपल्या मातृभूमिला, तिच्या संस्कृतीला, तिच्या विह्ठत्तेला (आणि) तिच्या सैन्यबळाला नंद राजांच्या पाशातून स्वतंत्र केले होते".

अर्थशास्त्र हे चाणक्याकडून त्याच्या शिष्यांना तोंडी सांगितले गेले. लिखित स्वरूपात येईपर्यंत शिष्यपरंपरेने ते मौखिक स्वरूपातच जतन केले. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला म्हेसूर राज्यात हा ग्रंथ पुन्हा प्रकट झाला तेव्हा त्याची सर्वत्र दखल घेतली की हा चंद्रगुप्त व त्याच्या लगेचच्या उत्तराधिकाऱ्यांनी प्रशासनासाठी आधार मानलेला राज्यशास्त्र व प्रशासन यावरील एक उच्च दर्जाचा, व्यावहारिक-आणि त्या काळातील क्रांतिकारी--ग्रंथ होता.

तो क्रांतिकारी यासाठी होता की त्याच्या लेखकाच्या मते चांगल्या राज्यकारभारासाठी प्रार्थना, देवांना आहुती किंवा ब्राम्हणांना दान-धर्म करणे महत्त्वाचे नाही तर प्रशिक्षित नेतृत्व महत्त्वाचे असते. राजासाठी आवश्यक कौशल्याचे प्रशिक्षण देता येते. मात्र प्रशिक्षणा्थींत जिज्ञासू वृत्ती हवी, शिकण्याची क्षमता हवी, जे शिकवले जाते त्याच्यातून योग्य निष्कर्ष काढण्याची क्षमता हवी आणि आपल्या शिक्षकांच्या आज्ञेचे पालन करण्याची तयारी हवी. चांगल्या आचार्यांच्या संपर्कात येऊन होतकरू राजा त्यांचा आदर्श समोर ठेवून स्वयंशिस्त शिकतो. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढतो आणि ज्ञानप्राप्तीची क्षमता वाढते. निर्विरोध राज्य करण्यासाठी राजा शिस्तबड, ज्ञानी, जनतेच्या कल्याणाची काळजी असणारा, प्रजावत्सल व न्यायप्रिय असणे अनिवार्य असते. चाणक्याच्या ग्रंथातील सर्वांत प्रसिद्ध परिच्छेद असा आहे, "प्रजेचे सुख तेच राजाचे सुख नि त्यांच्या कल्याणात त्याचे कल्याण. आपल्याला सुखावह ती गोष्ट चांगली असा विचार न करता, प्रजाजनांना जे सुखावह असेल तेच त्याने लाभदायक समजावे." चंद्रगुप्ताच्या नातवाने याच ग्रंथाचे अध्ययन केले असावे. याच भावना त्याच्या शिलालेखात आपल्यातला पहायला मिळतात.

भारतातील आर्यांची राजेशाही ही एक नियमित शासनव्यवस्था होती. खूप पूर्वी दंतकंथेतीतलत राजा पूथु यात्ता देवांनी अराजक माजलेल्या मानव जातीवर राज्य करण्यासाठी नेमले होते व त्याला दैवी शक्ती प्रदान केली होती. मात्र चाणक्याने ही पारंपारीक मान्यता स्विकारण्यास नकार दिला. त्याच्या म्हणण्यानुसार पहिला राजा मनु होता ज्याला लोकांनीच शासन करण्यासाठी सर्वात योग्य व्यक्ती म्हणून निवडले होते. त्याची निवड दैवी शक्तीमुळे नाही तर राजा व प्रजा यातील करारामुळे झाली होती. राजा जोपर्यंत प्रजेचे कल्याण करतो तोवर त्याला कायदा आणि सुव्यवस्था कडकपणे लागू करण्याचा अधिकार होता. राजा जन्माने क्षजिय असावा ही पूर्व-अट होती, तरीसुद्धा केवळ

विद्ठत्ता, नेतृत्वगुण, खंबीरपणा व स्वंयशिस्त असलेला राजाच राज्य करायला लायक होता. त्याला आपल्या मंत्रीगणांचा स1 घेणे आवश्यक होते आणि त्याने आपल्या महामंत्र्याचा पितृतुल्य आदर करणे पण अपेक्षित होते. हा महामंत्री अर्थातच ब्राह्मण असे. अर्थशास्त्रात राजाच्या बरोबरीने उभा राहू शकणारी एकमेव व्यक्ती अशी त्याची महती गायली आहे. जर राजा क्रूर हुकूमशहा बनला किंवा तो त्याच्या प्रजेला कंगाल करु लागला तर त्याला पदच्युत करण्याचा अधिकार महामंत्र्याला होता.

ग्रंथाचे शीर्षक दर्शवते त्याप्रमाणे चाणक्याने राज्याचे आर्थिक स्थिती उत्तम ठेवण्याच्या राजाच्या जबाबदारीवर बराच जोर दिलेला आहे. कारण चांगल्या राज्यासाठी ज्यामुळे उद्योग, व्यापार आणि शेती भरभराटीस येते असे सुव्यवस्थित व नैतिक प्रशासन आवश्यक असते. याबरोबरच चाणक्याने राजेशाहीच्या काही कठोर अंगांवरही जोर दिला--राज्य कसे बळकट करावे, शत्रूच्या प्रदेशात घुसताना कोणती चतुर रणनीति वापरावी, शत्रूचा कि 1 कसा ताब्यात घ्यावा, गुप्तहेरांचे जाळे कसे वापरावे याबरोबरच त्याने शेजारील राज्यशक्तींशी सामना कसा करावा आणि त्यांना नामोहरम करण्यासाठी सात क्लृप्त्या (साम-दाम, शिक्षा वा दंड, लाच, फसवणूक, लबाडी आणि विरोधकांमध्ये फूट पाडणे) कशा वापराव्या ते सांगितले होते.

या गोष्टींमुळे लोकांचे लक्ष या ग्रंथाकडे वेधले गेले. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात भारतातील राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात हा चर्चेचा विषय बनला. त्यावेळी चाणक्याचे वर्णन भारतीय मॅकआयव्हेली (Machiavelli) असे करण्याची फॅशन झाली होती. भारताचे भावी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी ब्रिटीशांच्या तुरुंगात असतांना Discovery of India हे पुस्तक लिहिले त्यात मात्र त्यांनी ही तुत्तना साफ नाकारतली--मॅकआयव्हेली हा पराभूत झालेला तत्त्ववेत्ता होता. या उलट चाणक्य आपल्या कुना वास्तवात उतरवण्यात यशस्वी झाला होता.

साहसी व षड्यंत्र रचणारा, अभिमानी व उपायकुशल, अपमान न विसरणारा, आपले ध्येय कायम लक्षात ठेवणारा, शत्रूला ठगवण्यासाठी व हरविण्यासाठी कुठलीही युक्ती वापरणारा असा तो पूर्ण साम्राज्याचा लगाम स्वतःच्या हाती ठेवून होता. तो सम्राटाकडे शास्ता ह्या दृष्टीने नाही तर आवडता शिष्य ह्या भावनेने बघत होता... आपले ध्येय साध्य करण्यासाठी चाणक्य काहीही करायला तयार होता. तो बराचसा तत्त्वहीन होता. पण ध्येयप्राप्तीचे साधन योग्य नसेल तर ध्येय हरवेल हे कळण्याइतका सूज्ञही होता.

असे दिसते की पंडित नेहरूसाठी चाणक्य तितकाच आदर्श होता जितका तो त्याने सिंहासनावर बसवलेल्या राजाच्या नातवासाठी होता. नेहरूंचे अर्थशास्त्राच्या लेखकाबद्दल किती चांगले मत होते याचे द्योतक म्हणजे भारताचे पंतप्रधान झाल्यावर त्यांनी नवी दि "तील दूतांवासांच्या नवीन वसाहतीला चाणक्यपुरी असे नाव दिले.

"अर्थशास्त्र विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात प्रकाशात आले त्यावेळी अशी अनेक विद्वत्तापूर्ण प्रकाशने आली की ज्यामध्ये मौर्य घराण्यावर अधिक प्रकाश टाकण्यात आला. डॉ. एमिल सेनार्त यांचे Inscriptions de Piyadassi (1881) हे पुस्तक म्हणजे कनिंगहॅमच्या कामात सुधारणा होती आणि डॉ. युजीन (अरन्स्ट) ह ट्शने त्यात अधिक सुधार केले.

डॉ. युजीनच्या Inscriptions of Ashoka (1925) ची सुधारीत आवृत्ती आजही एक प्रमाण-ग्रंथ मानला जातो. कोलकाता येथीत संस्कृत कॉलेजचे माजी प्राचार्य एडवर्ड कावेल ब्रिटनमधे केंब्रिज विद्यापिठात संस्कृतचे पहिले प्राध्यापक बनले. कोंवेल यांनी प्रो. मॅक्‍्सेमुलर यांना त्यांच्या Sacred Books of the East Series या ग्रंथमालेसाठी सहकार्य केले होते. त्यांनी रोबर्ट अलेक्झांडर नील (जातककथांचा भाषांतरकार) यांच्या बरोबर दिव्यावदानचे भाषांतर केले. तिकडे श्रीलंकेत आद्य अभ्यासक जॉर्ज टर्नोर याचे कार्य पुढे सिलोन सिव्हील सव्हिसेसच्या पुढच्या पिढीतील दोन प्रशासकांनी आपल्लया खांद्यावर घेतले. ते दोघे म्हणजे रोबर्ट सिझर चाय सं आणि थॉमस ऱ्हीस डेव्हीड्स हे होत. सन १८७२ मध्ये चाय रस इंडिया ऑफीसमधे उपग्रंथपालल बनला आणि त्याच वर्षी त्याने पाली भाषेच्या शब्दकोषाचा पहित्ता भाग छापून प्रकाशित केला. पुढे तो लंडन विद्यापीठात पालिचा पहिला प्राध्यापक बनला. सन १८७६ मध्ये त्याच्या मृत्युनंतर ऱ्हीस डेविड्स यांनी त्यांच्या कार्याची धुरा पुढे चालवली. सन १८८१ मधे त्यांनी पालि टेक्स्ट सोसायटीची स्थापना केली.

यावेळी भारतीय उपखंडातील भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग वाईट स्थिंतीतून जात होता कारण बरेचसे स्थानिक प्रांत आपापल्यातता बलशाली बनवण्याचा प्रयत्नात होते. दोन अफगाण युद्धामुळे अफगाणिस्तानमधे जाणे शक्या नव्हते. नेपाळची स्थिंती फारशी वेगळी नव्हती. तेथील राणा राजे भारतातील ब्रिटीश सरकार व त्याच्या हेतूबद्दल अत्यंत साशंक होते. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी परिस्थिती बदलू लागली -- पश्चिम नेपाळच्या शासकाने एक कोरीव शिलालेख असलेला स्तंभ पाहिला असल्याची बातमी आली. स्थानिक लोक त्या स्तंभाला "भीमसेन की निंगली? (भीमसेनाची चिलीम) असे म्हणत. मार्च १८९५ मध्ये वायव्य प्रांत आणि अवध (आजचा उत्तर प्रदेश) येथीत्ल सरकारी पुरातत्त्व सर्वेक्षक डॉ. एन्टॉन फ्युहरर याला हत्तीवरून नेपाळ सीमा ओलांडण्याची परवानगी मिळाली. त्याने स्तंभाचे दोन भाग शोधले. त्यातीत्त खालच्या लहान स्तंभावर ब्राह्मी भाषेत--थोडासा खराब झालेला, परंतु वाचता येण्यासारखा--छोटासा शिलालेख होता.

फ्युहररने यांनी या लेखाच्या प्रति बनवून आपला गुरू व आश्रयदाता डॉ. जार्ज ब्युहलर याच्याकडे पाठवले. डॉ. जॉर्ज त्यावेळी व्हिएन्ना येथील विद्यापीठात संस्कृतचे प्राध्यापक होते. त्यांनी दाखवून दिले की आत्तापर्यंत ज्ञात असलेल्या अशोक- स्मारकांपेक्षा हे वेगळे होते. प्रो. हरी फा यांनी केलेले त्याचे आधुनिक भाषांतर याप्रमाणे--

जेव्हा देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याने आपल्या राजवटीची चौदा वर्षे पूर्ण केली तेव्हा त्याने कोणागमन बुद्धाच्या स्तूपाचा विस्तार करून तो दुप्पट आकाराचा बनवला. राजवटीच्या विसाव्या (?) वर्षीं त्याने स्वतः जाऊन (त्याला) वंदन केले आणि (तिथे) एक दगडी स्तंभ उभारला.

या शिल्लालेखावरून असे दिसते की आपल्या राजवटीच्या चौदाव्या वर्षी म्हणजे अंदाजे इ. पू. २५६ मध्ये अशोकाने अगोदरच अस्तित्वात असलेल्या कोणागमन बुद्धाच्या स्तूपाचा विस्तार करण्याची आज्ञा दिली. हे शाक््य मुनी बुद्धाच्या आधीचे बुद्ध होते. यानंतर सहा वर्षांनी इ. पू. २५० मध्ये अशोकाने या जागेला भेट दिली. चिनी यात्रेकरू ह्युएन-त्संग याने कपिलवस्तु शहराच्या नैक्रत्येला अशाच प्रकारचा स्तूप आणि त्याच्या बाजूला असलेला अशोकाचा स्तंभ पाहिलेला होता.

अतोनात प्रयत्न करूनही कनिंगहॅम आणि त्याच्या सहकाऱ्यांना कपिलवस्तु, जेथे राजकुमार सिद्धार्थ म्हणून बुद्धाचे बालपण गेले होते, आणि लुंबिनी, जेथे बुद्धाचा जन्म झाला होता, या दोन्ही शहरांचा शोध लागत्ला नव्हता.

फ्युहररच्या शोधामुळे कपिलवस्तु शहर आणि लुंबिनी वन यांचा शोध घेण्यासाठी एक प्रकारे स्पर्धा सुरु झाली. कारण ह्युएन-त्संग आणि फाहेन या दोघांनी लुंबिनी कपिलवस्तुजवळ असल्याचे आणि कपिलवस्तु श्रावस्तीपासून पूर्वेत्ता बरेच दिवसांच्या अंतरावर असल्याचे लिहून ठेवले होते. सन १८६३ मध्ये अलेक्झांडर कनिंगहॅम यांनी श्रावस्तीचा शोध लावला होता. या दोन महत्वाच्या बौद्ध स्थानांच्या शोधाच्या स्पर्धेची कथा इतरत्र सांगितली आहे. त्यात आपल्यातला कळते की नोव्हेंबर १८९६ मध्ये डॉ. फ्युहररतता नेपाळमध्ये परत प्रवेश करण्याची परवानगी मिळाली आणि प्रवेश केल्यानंतर त्याला जनरल खड्ग-समशेर राणाच्या छावणीत नेण्यात आले. तेथे त्याला वरपासून खालपर्यंत एक मोठी चीर पडलेला एक उभा असलेला स्तंभ दाखवण्यात आला. जनरलच्या सैनिक-अभियंत्यांनी स्तंभाच्या पायथ्याशी पाच फूट खोल खणल्यावर त्याला साडेचार ओळी अत्यंत सुबकतेने कोरलेला ब्राम्ही लिपीतला सुस्थितीतील शिंत्तालेख दिसून आला.

फ्युहररने दुसऱ्या ओळीच्या शेवटी वाचले "हिद बुघधे जाते साक्य्मुनी" (इथे शाक्यरमुनी बुद्ध जन्मला) तेव्हा त्या साडेचार ओळींचे महत्व त्याच्या लक्षात आले. आपल्याला लुंबिनी सापडली आहे हे त्याच्या लक्षात आले. ह्युएन-त्संगने आपल्या वर्णनामध्ये अशोकस्तंभाला मध्यभागी ट्रेंगनमुळे चीर पडली होती असे लिहून ठेवले होते; आणि येथे उर्वरीत स्तंभावर चीर स्पष्टपणे दिसत होती.

त्या स्तंभावरील शेवटच्या वाक्याचा नक्की अर्थ काय याबह्ल विठ्ठानांमधे आजही मतभेद आहेत. मात्र बाकी ओळींचा अर्थ निर्विवाद आहे. त्याचे प्रोफेसर फा यांनी केलेले भाषांतर असे--

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याने त्याच्या राजवटीच्या विसाव्या वर्षी स्वत: येथे येऊन वंदन केले. कारण शाक्‍्यचमुनी बुद्धाचा जन्म या जागेवर झाला होता. त्याने या ठिकाणी दगडी कुंपण बांधले आणि दगडी स्तंभ उभारता. कारण (विश्वाच्या) शास्त्याचा जन्म या ठिकाणी झाला होता. त्याने लुंबिनी गावाला सर्व करांपासून सूट दिली आणि आठ हिस्से दिले.

लुंबिनी आणि निगाली सागर येथील स्तंभ आणि त्यावरील शिलालेख या दोघांची निर्मिती इ. पू. २५० मध्ये सम्राट अशोकाच्या शाही तीर्थयात्रेमुळे झाली होती हे स्पष्ट आहे. तिसऱ्या स्तंभाचा आता फक्त बुंधा उरला होता, तो डॉ. फ्युहररने निगाली स्तंभापासून नैक्रत्येला काही मैत्त अंतरावर शोधून काढला. हे जवळपास नक्की होते की तो स्तंभही अशोकाच्या त्याच यात्रेत उभारला गेला होता. या स्तंभांमुळे हे वादातीतपणे सिद्ध झाले की ह्युएन-त्संग आणि अशोकावदानात म्हट्ल्याप्रमाणे अशोक पवित्र बौद्ध स्थळांच्या प्रदीर्घ धम्मयात्रेवर गेला होता. त्याने लुंबिनी येथून यात्रेस सुरुवात करून पुढे जवळच्या कपिलवस्तुत्ता भेट दिली आणि तेथे त्याने अनेक स्मारक स्तूप व स्तंभाची उभारणी केली होती.

फ्युहरर आणि भारतीय पुरातत्त्व संशोधनाचे दुर्दैव असे की ह्या जर्मन पुरातत्त्व संशोधकाने त्याच्या नेपाळच्या पहिल्या भेटीबद्दल अतिरंजित अतिशोयक्त दावे केले होते. कपिलवस्तु ही प्राचीन नगरी शोधण्याच्या साहसी व अविचारी प्रयत्नांत त्याने दावा केला होता की त्याने ती नगरी तिच्या पूर्ण वैभवात पाहिली होती. अशा प्रकारे फ्युहररने स्वतःसाठी खड्डा खणला. जेव्हा हे उजेडात आले की तो ब्रह्मदेशातून आलेल्या बौद्ध भिक्षुला बनावटी धातु (बौद्ध संतांचे शरीर अवशेष) विकत होता, तेव्हा तो खड्डा अधिकच खोल झाला. फ्युहर्रता कामावरून निलंबित केले गेले. पण त्याच्या ह्या उपद्व्यापामुले त्याचा गुरू, जार्ज ब्युहलर, याला मनस्ताप झाला असावा असे वाटते. एप्रिल १८९८मधे रात्री उशीरा जॉर्ज लेक कॉन्स्टन्स मधे नौकाविहाराला गेला तो परतलाच नाही. ती शोकांतिका व बनावटी दाव्यांचे संशय यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकातील बिहारमधील पुरातत्त्व शोधांचा शेवटचा टप्पा झाकोळून गेला. यातील तीन शोध अशोकाच्या कथेसाठी महत्त्वाचे होते.

यातील पहिला शोध उत्खननातून लागलेला नव्हता. उत्तर बिहारमधील गोरखपूर विभागाचे कमिशनर डॉ. विल्यम हॉय यांनी १८९२ मध्ये हा शोध लावला. हॉय हे पुरातनवस्तु संग्राहक होते. राप्ती नदीच्या आजूबाजूच्या ढिगाऱ्यांमध्ये शोध घेत असतांना ते सोहगौरा खेड्यातील एका म्हाताऱ्या माणसाशी गप्पा मारू लागले. त्यांना त्या वृद्धाकडून कळले की तरुणपणी त्याला खणताना एक लहानसा ताम्रपट सापडला होता आणि तो त्याने स्थानिक जमीनदाराला भेट दिला होता. हॉयने त्याबद्दल चौकशी केली. काही महिन्यांनी त्या जमीनदाराचा मुत्तगा हॉयच्या कार्यालयात ती ताप्रपट घेऊन आला आणि त्याने त्यांना तो भेट दिला. हा 'सोहगौरा पट' तांब्याऐवजी काशाचा (ब्रॉँझचा) निघाला. हे

वैशिष्टपूर्ण होते. ही पट्टी अडीच इंच लांब आणि पावणे दोन इंच रुंद होती आणि आश्चर्यजनकरित्या चांगल्या स्थितीत होती. अधिक वैशिष्टपूर्ण बाब ही की त्याच्यावर चिन्हे व अक्षरे दोन्ही होती आणि त्यांचा ठसा इतका खोल होता की ती चिन्हे व अक्षरे स्पष्ट दिसत होती. यावरचे चार ओळींचे लिखाण अशोककालीन ब्राह्मी लिपीत होते. या सर्व ओळींच्या वरती सात स्वतंत्र चिन्हे होती. - कुंपणाच्या आत असलेले दोन वेगवेगळ्या जातीचे वृक्ष, खांब व शाकारलेले छत असलेल्या तीन मजली दोन इमारती, एक भाल्यासारखी वस्तू, एक गोलाकारावर वृषभाकृती आणि मध्यभागी तीन अर्धवर्तुळाकार घुमट आणि त्यावर अर्धचंद्र असलेत्ता एक स्तूप होता. या इमारतींची चिन्हे सोडली तर बाकी सारी चिन्हे पूवीच्या भारतातील सच्छीद्र नाण्यांवर दिसून आलेली होती.

योगायोग असा की हॉयच्या हाताखाली विन्सेंट स्मिथ नावाचा एक ICS अधिकारी काम करत होता. त्याला सर अलेक्झांडर कनिंगहुमबद्दल अतिशय आदर होता. पुढे एका दशकानंतर निवृत्त होऊन तो ऑक्सफर्डला गेला आणि अशोकाचे पहिले चरित्र लिहीले. तसेच त्याने Oxford History of India चा पहिला खंड लिहिता. हॉय आणि स्मिथ यांनी संयुक्तपणे सहगौरा येथील तामप्रपटाबद्दल एक लेख ASB ला सादर केला परंतु हा पट मौर्यकालीन होती यापेक्षा अधिक प्रकाश ते टाकू शकले नाही. सुदैवाने त्यांनी या पटाचे काही फोटो काढले आणि एक प्रत प्रो. ब्युहल्तर यांना पाठवली. त्यांनी सांगितले की ही भाषा प्राकृत आहे तसेच ते श्रावस्ती येथील धार्मिक अधिकाऱ्यांचे आज्ञापत्र आहे. त्यात लिहिले होते की वंसागप्राम येथील दोन धान्याच्या कोठारांत तातडीने धान्य, डाळी आणि इतर खाद्यपदार्थ पुरवणे आवश्यक आहे. हा पुरवठा रोखून धरू नये. परंतु डॉ. ब्युहलरत्ला त्या चिन्हांचे तितकेच कोडे होते, जितके ते आजच्या पुरालेखतज्ञांना आहे. सोहगौरा पटाबद्दल असे म्हटले जाते की ती कदाचित चित्रलिपीपासून पूर्ण अक्षर लिपीपर्यंतच्या स्थित्यंतराची द्योतक आहे. हे काहीसे रोझेटा स्टोनसारखे (Rosetta Stone) आहे. [हा इ. पू. १९६ मधे पाचव्या टॉलेमीने इजिप्तमधे प्रसारीत केला होता. त्यावर सारख्याच आशयाचा मजकूर तीन लिप्यांमधे कोरलेला आहे. हा दगड आता ब्रिटीश म्युझियममधे असून तेथील इतर कुठल्याही वस्तूपेक्षा जास्त दर्शक याला मेट देतात.] सोहगौरा पटामुळे भारतातून लुप्त झालेल्या सरस्वती लिपीबद्दल बरेच अंदाज बांधले गेले. ती चर्चा (येथे अप्रस्तुत असून) आता आपण (तिला) इंटरनेटवरच राहू देऊ! येथे उ 'खनीय हे की १९३१ मधे सोहगौरा पटाशी साम्य दाखवणारा एक शिलापट बंगालमधे एका खेडूताने खणून काढता होता. सन १८०८ मधे बुकेननने नोंद केलेले व कनिंगहंमने ज्याचा अ शोध घेतला होता ते पूर्व बंगालमधील (आजचा बांगलादेश) विशाल तटबंदीचे शहर महास्थान येथे पुरातत्व संशोधक प्राथमिक उत्खनन करत असतांना हा शिलापट सापडला होता. त्या शित्लापटावर ब्राम्ही लिपीत लिहिलेल्या सात ओळींमध्ये जवळपास तसाच संदेश कोरलेत्ता होता. मगधच्या कुणा अनामिक शासकाचा तो आदेश होता. अत्यंत उद्वेगजनक बाब ही की वरच्या ओळीच्या सुख्वातीच्या भागाचे इतके नुकसान झाले होते की ते वाचता येत नव्हते. त्यामध्ये पुंडूनगर या नगराच्या धार्मिक अधिकाऱ्यांना असा आदेश होता की संवग्िय

गावच्या लोकांना नैसर्गिक आपत्ती व, आश्चर्य म्हणजे, पोपटांकडून झालेला त्रास कमी करावा. त्याचप्रमाणे धनधान्याची कोठारे व खजिना भरून ठेवावेत. [त्याकाळी पोपटांपासून होणाऱ्या ञ्रासाचा उऊ 'ख पहिल्या शतकात सातवाहन हाल राजाने संकलित केलेल्या गाथासप्रशतीतही सापडतो. गाथा क्र १००१मधघे पोपटांचे थवे शेतातल्या साळी खात असल्याचा उ 'ख आहे.--शेफालिका, राजा बढे व अरविंद मंगळूरकर, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे प्रकाशन, १९८४, मुंबई.]

हे दोन्ही संदेश नक्कीच समकालीन होते व मौर्य काळातले होते. ते दर्शवतात की त्या काळात एक उच्च दर्जाची राज्यव्यवस्था आणि त्याच तोडीची संदेश देवाण- घेवाणीची व्यवस्था अस्तित्वात होती. चंद्रगुप्ताच्या काळात एकदा बारा वर्षे दुष्काळ पडला होता आणि या संदेशात दुष्काळी मदतीचा उ ख आहे. त्यामुळे हे संदेश चंद्रगुप्ताच्या राजवटीतील असले पाहिजे असा एक समज आहे. परंतु चंद्रगुप्ताच्या राजवटीचे वर्णन ज्या ग्रीकांनी केले आहे, त्यांनी अशा उच्च दर्जाच्या संदेश-वहनाच्या व्यवस्थेचा उ ख नक्कीच केला असता. त्यांनी तसे केले नाही यावरून आणि बाकी साऱ्या पुराव्यावरून हे दोन्ही संदेश अशोककालीन असावेत असे वाटते. काहींच्या मते सोहगौरा पटाच्या मध्यभागी असलेला स्तूप व त्यावरील चंद्रकोर हे अशोकाचे स्वतःचे राजचिन्ह असावे. तो कांस्य-धातूचा पट बनवण्यासाठी धातूंच्या प्रगत ओतीव कामाची माहिती असणे आवश्यक होते. त्यात वापरलेले मेणाचे तंत्र पुढे थेट आठव्या शतकापर्यंत भारतात कुठेही दिसत नाही.

डॉ. होय यांनी सोहगौरा पट ASB ला भेट दिला. संस्थेच्या या पडत्या काळात तेथील वस्तुसंग्रहाललयाचा कारभार इतका अनागोंदी पद्धतीने सुरु होता की सोहगौरा पट्टी हरवली आहे हे ASB च्या लक्षात यायला आणि त्याची अधिकृत कबुली द्यायला काही वर्षे गेली. कदाचित भविष्यात कधी तरी एखाद्या दिवशी कोलकता येथीत्त पार्क स्ट्रीट क्रमांक १ वरील ASB च्या मुख्य कार्यालयात असलेल्या अनेक कपाटांपैकी कुठल्यातरी कपाटाच्या मागे तो पडलेला सापडेल. परंतु तोपर्यंत तो हरवल्याने अपरिमित हानी झाली आहे. तो भारतात सापडलेत्ता सर्वांत प्राचीन कांस्य-पट होता. आतापर्यंत त्याच्यासारखे दुसरे काहीही सापडलेले नाही.

पाटणा येथे अशोकासंबंधी अजून एक शोध लागला. आतापर्यंत पुरातत्त्व संशोधनाला पाटण्याने निराशच केले होते. कनिंगहैमने हे सारे शहर व त्याचा परिसर यांचा बराच शोध घेतला होता पण त्याच्या हाती काहीही लागले नव्हते. त्याची खात्री पटली होती की ग्रीकांनी वर्णन केलेले चंद्रगुप्तकाततीन महान राजधानीचे पाटलिपुत्र शहर पूरात नष्ट झाले आहे. परंतु भारतीय आरोग्य सेवेतील डॉ. एल. ए. वॉडेल याने कनिंगहंमतला खोटे ठरवले. वोंडेल हे एक काटेरी व्यक्तिमत्व होते. तो शीघ्रकोपी आणि आपल्या उद्दाष्टप्राप्तीसाठी कोणतीही तत्त्वे आणि साधनशुचिता न पाळणारा होता. लुंबिनी व कपिलवस्तुचा खरा शोध आपणच लावला आहे, असे तो समजत असे. प्रत्यक्षात बाबू पूर्णचंद्र मुखर्जी यांनी तिलौराकोटच्या जंगलात निगाली सागरच्या पश्चिमेला थोड्याच

अंतरावर कपिलवस्तु शहराचा शोध लावला होता. वोडेलने आपल्या या सहकारी पुरातत्त्व संशोधकाचे करीअर बिघडविण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.

आपल्या समकालीन अभ्यासकांप्रमाणेच वाडेलने देखील चिनी यात्रिकरुंच्या प्रवासवर्णनांचा बारकाईने अभ्यास केला होता. सन १८९२ मध्ये आपल्या वैद्यकीय नोकरीतून दोन दिवसांची रजा काढून तो दार्जिलींगवरून पाटण्याला आला. फाहेन व ह्युएन-त्संगच्या वर्णनांवर आधारीत एक नकाशा त्याने बरोबर आणला होता. त्यावरुन त्याला वाटले की चिनी यात्रेकरूंनी भेट दिलेली स्मारके पाटण्याच्या सर्वात जुन्या वस्तीत असावीत तसेच अशोकाचा राजवाडा व त्याने बांधलेला अशोकाराम हा महान विहार लोहमार्गाच्या दक्षिणेला सापडेल. त्या काळी ते शहराचे दक्षिणेचे टोक होते. त्याने नंतर लिहिते, “मला याचे आश्चर्य वाटले की त्यावेळच्या महत्वाच्या जागा-अशोकाचा राजवाडा, विहार व बाकी स्पारके--इतक्या स्पष्ट दिसत होत्या की चिनी यात्रेकरूंच्या प्रवासवर्णनाच्या आधारे एका दिवसाच्या अत्य काळात मी त्या सार्याष शोधून काढल्या.” वाडेत्तच्या शोधांमधे बराचसा आशादायक क नाविलास दिसतो परंतु तो योग्य मार्गावर होता. त्याने तपासलेली पहित्ती जागा पाटणा कॉलेजपासून दक्षिणेस अर्धा मैल दूर होती. तो वीस फूट उंचीचा व साधारणतः पाव मैल घेराचा विटांचा ढिगारा होता. तो आता पूर्ण झाकला गेला आहे. वाडेल गेला तेव्हा त्याला “मिंकना पहाडी” म्हणजे भिक्षुंची टेकडी असे मूहणत--हे नाव तसे संयुक्तिक होते. वाडेलच्या मते अशोकाने त्याचा लहान भाऊ तिस्स (तिष्य) याच्यासाठी बांधलेल्या विहाराचे ह्युएन-त्संगने जे वर्णन केले होते त्याच्याशी हे स्थान मिळतेजुळते होते. वाडेलने शोधून काढलेली अशोकाचा कुप्रसिद्ध "नरक? सुद्धा केवळ असेच अनुमान होते. बौद्ध होण्याआधी चंड-अशोक कैद्यांचा जेथे अमानुष छळ करत असे तो हा नरक-सडश तुरुंग होता. शहराच्या बाहेर लोहमार्गाच्या पलिकडे (आजच्या गुलजारबाग रे * स्थानकाच्या नैक्रत्येलला) वाडेलने एक प्राचीन विहीर-“आगम कुंऑ' म्हणजे तळ नसलेली विहीर--शोधून काढली. वाडेलने शोधलेली किंवा आपण शोधली असा त्याने दावा केलेली, ही विहीर सम्राट अकबरच्या वेळेला दुरुस्त करून तिच्यावर छत घातले होते. परंतु ती दुष्ट पाशवी शक्तींशी निगडीत आहे असा समज असल्याने तिच्यातील पाणी कोणीही पित नव्हते.

महत्वाचे म्हणजे ही विहीर शितळादेवीच्या मंदिराशेजारी होती. खूप पूवी सन १८२०मध्ये या भांगात मौर्यकालीन यक्षी मातृदेवतांच्या ((811॥/ 90०१०७५५) तीन मूर्ती सापडल्या होत्या असे वाचण्यात आल्यामुळे सन १८७९ मध्ये अलेक्झांडर कनिंगहॅम या ठिकाणी त्यांचा शोध घेण्यास आला होता. त्यापैकी दोन मूर्ती »588 च्या म्युझियममधे त्याने नदीमार्गे पाठवून दिल्या होत्या आणि तिसरी मूती मागे ठेवली होती. तिचा त्याने पुनर्शोध घेतला तेव्हा ती शिंतळादेवी मंदिरात स्थापित झाली होती. आता तिची पूजा होत असल्याने तिला तेथून हत्तवणे शक्य नव्हते.

वाडेलल्ला कनिंग्हॅमची देवी (प्रत्यक्षात एकमेकींकडे पाठ असलेल्या दोन देवता) मंदिराच्या प्रांगणात अर्धवट पुरलेली सापडली. त्यांचे कनिंगहमने भारहूतला उत्खनन केलेल्या यक्षींच्या मूतीशी असलेले साम्य त्याला प्रकर्षाने जाणवले. त्याने चौकशी केली तेव्हा त्याला कळले की तो (पायथ्याशी मूर्ती असलेला) खांब अर्धा मैल पश्चिमेवरून येथे आणला होता. आपण ह्युएन-त्संगच्या मार्गाचा मागोवा घेत हा शोध घेतला असा दावा त्याने नंतर केला असला तरी प्रत्यक्षात या दोन यक्षी स्तंभाच्या शोधात तो जवळील कुमराहार खेड्यापर्यंत जाऊन पोहचला होता.

हे संपूर्ण खेडे तिथला जमीनदार शेख अक्रम-उत्तू-हक याच्या मालकीचे होते. वाडेलता शेखकडून मिळालेल्या माहितीवरून व त्याने जे काही पाहिले त्यावरून त्याला खात्री पटली की आपल्याला सम्राट अशोकाच्या राजवाड्याची जागा सापडली आहे.

शेखने सांगितले की पूर्वी या भागात बऱ्याचशा मूर्ती सापडत होत्या. काही काळ आधीच त्याच्या स्वतःच्या घराच्या अंगणात खणत असतांना त्याच्या वडिलांना काही मूर्ती सापडल्या होत्या व हिंदू ललोक त्या घेऊन गेले होते. शेखला किंवा त्याच्या पूर्वजांना विहीर खणताना किंवा घराचा पाया खणताना मिळालेले बौद्ध कुंपणाचे भाग व पाषाण स्तंभ शेखने मोठ्या आनंदाने वाडेलता देऊन टाकले. वाडेलने स्वत: शोध घेतल्यावर त्यालाही दगडी स्तंभाचे आणि कुंपणाचे बरेच तुकडे दिसून आले. याचाच अर्थ असा की कोणे एके काळी या परिसरात अशोक शेतीतील बौद्ध स्तूप उभा असावा. त्याला समजले की कुमराहार गावात किंवा आसपास जेव्हा विहिरीचे खोदकाम करण्यात येते तेव्हा साधारण १५ ते २० फूटांवर लाकडाचे मोठे खांब किंवा तुळया यांचा अडथळा नेहमी येतो. ते ऐकून वाडेलच्या मनात “मेगॅस्थेनिसने वर्णन केलेल्या शहराभोवतीच्या जुन्या लाकडी भिंती” आल्या.

आपल्या या किरकोळ पूर्व-परिक्षणाने उ [सित होऊन वाडेलने अर्थसहाय्य मिळवण्यासाठी बंगाल सरकारत्ा अर्ज केला आणि सन १८९६ मध्ये तो कुमराहार व अन्य तीन जागांवरील उत्खननावर देखरेख करण्यासाठी पाटण्याला परत आला. लोहमार्गाजवळ साधारण १५ फूट खोलीवर त्यातला एक लाकडी कुंपणाचा तुकडा सापडला वा त्याचबरोबर ग्रीक शैलीतील खांबाचे एक अतिशय सुंदर सुशोभित शीर्ष सापडले. हे अशोककालीन किंवा त्यानंतरचे असावे. कुमराहार गावात वाडेलला “त्या सप्राटाचे एकाच शिळेतून बनविलेल्या व त्याचे लेख कोरलेल्या प्रचंड अशोकस्तंभाचे” मोठमोठे तुटलेले भाग दिसून आले.

कुमराहाच्र्या दक्षिणेकडीत्त जमिनीचे सर्वेक्षण करताना वाडेलला कोरड्या पडलेल्या नदीचे खचलेले पात्र दिसले. त्यावरून असे दिसत होते की पूर्वी कधी तरी गंगेला मिळण्यापूर्वी सोन नदी दुभागली होती. त्यापैकी मोठे पात्र पाटणा शहराच्या बंकीपूर भागातून (ब्रिटीश सिव्हील लाइन्समधून) जात होते आणि दुसरे छोटे पात्र पाटण्याच्या

दक्षिणेला जाऊन गंगेला मिळत होते. अशा दोन पात्रांमुळे तयार झालेल्या बेटावर पाटलिपुत्र शहर बांधले होते. जेव्हा कुमराहाराच्या दक्षिण टोकावर वाडेलला त्लाकडी धक्का (गोदी) दिसून आला, तेव्हा खरोखरच पाटणा बेटावर होते याची त्याला खात्री पटली.

सन १८९७ मध्ये वाडेल कुमराहार येथे पुन्हा एकदा उत्खनन सुरु करण्यासाठी आला परंतु तेथे त्याच्याआधीच काही तज्ञ पुरातत्त्व संशोधकांनी काम सुरु केले होते. ते पाहून तो नाराज झाला. हे काम कोलकाताच्या इंडियन मुझियमचे बाबू पी. सी. मुखर्जी यांनी सुरु केले होते. मुख्र्जींना आधीच कुमराहर येथे सहा अशोक स्तंभांचे अवशेष सापडले होते हे पाहून वाडेलच्या संतापात अधिकच भर पडली. ते स्तंभाचे अवशेष जमिनीखाली राख आणि ढिगाऱ्यांच्या जाड थरात गाडलेले सापडले. हे स्तंभ उष्णतेने फुटून जावेत म्हणून मुद्दामहून कुणीतरी हे काम केले होते, असा वाडेलचा समज झाला. आपल्या क्षेत्रातील अतिक्रमणामुळे वाडेल खूप चिडला. त्याने मुखर्जींच्या निलंबनासाठी अयशस्वी प्रयत्न केला. मानहानी झालेल्या डॉ. फ्युहररने सुरू केलेले नेपाळच्या तराई भागातील पुरातत्त्व सर्वेक्षण पुढे नेण्यासाठी दोन वर्षानंतर मुखर्जी यांची नेमणूक करण्यात आली. यावेळीही वाडेलने हस्तक्षेप करून या बंगाली पुरातत्त्व शास्त्रज्ञाला हटवण्यासाठी मोहिम सुरु केली. आनंददायक बाब ही की या स्पर्धेत मुखर्जींचा विजय झाला. त्यांनी तिलौराकोट येथे प्राचीन कपिलवस्तु नगरी शोधून काढली तेव्हा वाडेत्त इतरत्र फसव्या मागावर भरकटलेला होता!

असे असले तरी वाडेलने पाटणा येथील पुरातत्त्व संशोधनाची सुरूवात केली हे विसरून चालणार नाही. त्याचबरोबर त्याने शेख अक्रम-उत्तू-हकने दिलेल्या माहितीवरून मातृदेवतांच्या अजून दोन मूर्ती शोधल्या होत्या. त्याने ह्या चमकणाऱ्या मूर्ती कुमराहार्च्या पश्चिमेला अर्धा मैल अंतरावर नया तोला जवळच्या एका मंदिरात (आजचे राजेंद्रनगर रे स्थानक) शोधून काढल्या. शिंतलादेवी मंदिराप्रमाणेच या यक्षी पाठीलापाठ लावून स्तंभाला आधार देण्याच्या स्थितीत होत्या परंतु त्यांची घडण कितीतरी पटीने अधिक सुंदर होती. या मूती मानवी आकारापेक्षा थोड्याशा लहान नि कटीमेखला सोडल्या तर नग्नावस्थेत होत्या. दोन्ही मूर्ती आपापले नितळ हात गुळगुळीत वक्षस्थळांच्या वर उंचावून झाडाची फांदी पकडण्याच्या स्थितीत होत्या.

हे शि अतिशय विलोभनीय असले तरी सर्वोत्तम मूर्ती असल्याचा मान दुसऱ्याच एका मूर्तीला जातो. ही पाटणा वस्तुसंग्रहाललयातीतलत मौर्यकालीन आणि शुंगकालीन शि ।ंच्या विलोभनीय संग्रहातीत्त एक देवता मूती होती. दीदारगंज यक्षी म्हणून ओळखले जाणारे हे शि निश्चितच आतापर्यंत सापडलेल्या मौर्य युगातील सर्वोत्तम कलाकृतींपैकी एक आहे. ही मूर्ती अशोक स्तंभासाठी वापरलेल्या हलक्या वालुकामय दगडाची (light sandstone) आहे आणि ती कदाचित त्याच खाणीतील दगडाची असावी-- तिला अशोकस्तंभांची आणि अशोककाळातील सवोत्कृष्ट शि कलांची वैशिष्टयपूर्ण चमक होती.

वाडेलने शोधलेल्या वृक्षदेवतेप्रमाणेच या सुंदर मूर्तीचीही कृशकटी, गोलाकार उठावदार वक्षस्थळ, पृथुत्त नितंब व पोटावर मांसल ड्विवली असून त्यावर घोटीव चमक असल्यामुळे ती झळाळत होती. आजही घालतात त्याप्रमाणे तिने आपल्या डोक्यावर परंपरागत शृंगारपट्टी परिधान केलेली आहे. त्याबरोबरच तिने कर्णभूषणे, गळ्यात कंठीहार, हातात कोपरापर्यंत कंकणे, पायात कलाकुसर असलेले भरदार पैंजण घातले आहेत. तिच्या हातात उजव्या खांद्यावर चवरी ठेवलेली आहे. नक्कीच एका भव्य भारदस्त वमध्यावधी बुद्धमूर्तींच्या दोन बाजूला चवऱ्या ढाळणाऱ्या सेविकामूर्तींच्या जोडीपैकी ही एक असावी. तिला भारतीय शि कलेतली व्हीनस-डी-मिलो म्हणतात. पण त्यामुले तिचा फारसा गौरव होत नाही. ती ग्रीक व्हीनसपेक्षा जास्त आकर्षक आहे. आपल्या ग्रीक बहिणीप्रमाणे नाजूक कलाकुसर केलेल्या कटीमेखलेने सावरून धरलेल्या आणि लज्जारक्षणार्थ परिधान केल्या तलम कटिवस्त्राच्या चुण्या तिच्या कमरेपासून खाली उतरल्या आहेत. ग्रीक व्हीनसच्या कमीत कमी दिड शतक आधी ज्या शि काराने हे शि तयार केले तो प्रॅक्सिटेलिस इतकाच प्रवीण होता. [व्हीनस डी मिलोला मिलोसची अफ्रोडाईट असेही म्हणतात. हे प्राचीन ग्रीक शि प्रेम आणि सौदर्य यांची ग्रीक देवता अफ्रोडाईट हिचे आहे अशी मान्यता आहे. अफ्रोडाईटता रोमन लोक व्हीनस म्हणत. ते शि इ. पू. ९०० ते १३० च्या दरम्यान प्रॅक्‌्सिं टेलिस या शि काराने घडवले होते.]

दीदारगंज यक्षीच्या शोधाशी वाडेत्तचा काहीही संबंध नाही. ती मूर्ती १९१७ मध्ये बांकीपूर्च्या पश्चिमेला गंगेच्या किनारी चिखलातून बाहेर डोकावताना दीदारगंजच्या एका खेडताला दिसती. कदाचित सोन नदीचा प्रवाह पाटलिपुत्राच्या जवळ असतांना तिच्या पूराच्या लोंढ्याबरोबर वहात येऊन ती तेथे पोहोचली असावी.

वाढेल व मुखर्जी यांनी कुमराहार येथे सुरु केलेले काम अमेरिकन पुरातत्त्व संशोधक डेव्हीड स्पूनर याने पूर्ण केले. त्याने पूर्वी पेशावर खोऱ्याच्या परिसरात कुषाणकालीन बौद्ध स्थळांचे उत्खनन करून ह्या कार्याचा पहिला अनुभव घेतला होता. सन १९१३ मध्ये स्पूनर कुमराहर येथे आला आणि प्रथमच मोठ्या प्रमाणावर व सुनियोजित पद्धतीने तेथे उत्खननाचे काम केले. या कामासाठी पारशी उद्योगपती सर रतन टाटा यांनी अर्थसहाय्य केले होते. या ठिकाणच्या उत्खननात गुप्तकालीन इमारतींच्या विटांचा थर संपल्यावर त्याखाली मुखर्जींना सापडलेला जळालेती लाकडे आणि राखेचा जाड थर त्याला दिसून आला. त्यात एकमेकांपासून पंधरा फूट अंतरावर, दहा-दहा स्तंभांच्या आठ ओळीत असलेले कमीतकमी बहात्तर वालुकामय दगडांच्या स्तंभांचे तुकडे सापडले. अठरा हजार चौरस फूट क्षेत्राच्या एका अतिमव्य सभागृहाचे ते अवशेष होते. हे दगडी स्तंभ सुरुवातीला लाकडी तुळयांना आधार देत उभे असणार. स्पूनरच्या सिद्धांताप्रमाणे पुढे स्तंभांच्या आणि सभागृहाच्या छताच्या वजनामुळे खालच्या मऊ मातीत ते हळूहळू धसत गेले असावे. या प्रचंड सभागृहाची तुलना केवळ अलेक्झांडरच्या आगीमध्ये अंशत: नष्ट झालेल्या

आक्मेनीड राजांनी बांधलेल्या पर्सेपोलरीस येथील अनेक खांबी भव्य सभागृहाशीच होऊ शकते.

या ठिकाणी लाकडी तुळयांच्या खूप खाली सभागृहातून सरळ नदीपर्यंत जाणारा एक लाकडी जिना सापडला. स्पूनरतला येथे सापडलेली प्रत्येक गोष्ट ही मौर्ययुगातीतल किंवा त्यानंतरची होती. हे विशात्त सभागृह पाटलिंपुत्र शहराच्या बाहेर मोकळ्या पटांगणावर बांधले होते हे स्पष्ट होते. नक्कीच हे एका बलाढ्य राजाचे काम होते आणि हे बांधकाम राजवाड्याचे नाही तर सभागृहाचे होते.

ह्या सर्वांवरुन हे स्पष्ट होते की ही अशोकाने आयोजित केलेल्या तिसऱया बौद्ध संगायनाची जागा होती. हे संगायन त्याच्या दृष्टीने इतके महत्वाचे होते की त्याने भारतातील पहित्तीच विशाल दगडी स्मारकवास्तू बांधायची ठरवले. त्याने बहुधा यासाठी थेट पर्शियातून अनेक वास्तुविशारद आणि पाथरवट मागवले. स्पूनरने हा अंदाज योग्य बांधला परंतु मौर्य शासक हे स्वत: मूळचे पर्शियन होते असा दावा करून त्याने स्वतःचे सारेच गृहीतक बिघडून टाकले. भारतीय राष्ट्रवादाचे केंद्र असलेल्या पाटण्यात स्पूनर्चा "मौर्य मूळचे पर्शियन" असल्याचा दावा आवडला नाही. जॉन मार्शलने तो त्वरित खोडून टाकला. वाडेलने शोधलेल्या स्तंभशीर्षांची निर्मिती जरी नाही तरी प्रेरणा मात्र खचितच ग्रीको-रोमन होती.

एकोणिसाव्या शतकातील अशोकासंबंधीचा शेवटचा महत्वाचा शोध १८९८ साली उत्तर बिहारमध्ये लागता-- डो. फ्युररने जाहीर केले की त्याने बुद्धाचे जन्मस्थान लुंबिनी आणि कपिलवस्तु शहराचा शोध लावला आहे. जानेवारी १८९९ मध्ये जेव्हा जेव्हा एका उत्खनन कार्यात फ्युरर कसाबसा आपला लौकीक टिकवून ठेवण्याच्या प्रयत्न करत होता तेव्हा तेथून काही मैलावर एक स्थानिक जमीनदार विल्यम क्लर्लॅक्स्टन पेप्पे याने पिपरहवा येथे त्याच्या जमिनीवर असलेल्या अनेक स्तूपांच्या ढिगाऱ्यांपैकी सगळ्यात मोठ्या स्तूपाचे उत्खनन केले. ही जागा विशेष ठिकाणी होती-- नेपाळ सीमेपासून दक्षिणेला अर्ध्या मैलावर, लुंबिनी आणि तेथील अशोकस्तंभापासून वायव्येला १० मैलावर, निगली सांगर अशोकस्तंभापासून दक्षिणेला १७ मैलावर, गोटीहवा अशोकस्तंभापासून नैक्रत्येला ९२ मैलावर आणि प्राचीन कपिलवस्तुच्या तिलौराकोट या जागेपासून नैक्रत्येला १५ मैलावर अशी ही जागा होती.

त्या स्तूपाच्या मध्यभागी व अगदी तळाशी २४ फूट खोलीवर वालुकामय दगडाची (sandstone) एक मोठी पेटी पेप्पेला सापडली. तिचे वजन जवळपास पाऊण टन इतके होते. तिच्यात मऊ दगडापासून (soapstone) बनवलेल्या पाच धातूपेटिका, एक स्फटिक-पात्र तसेच फुलांच्या आकारात जडवलेली रत्ने, उपरत्रे ((semiprecious stones) व इतर अर्पण वस्तु ठेवलेल्या होत्या. ह्या शोधामुळे पसरलेल्या सुर्वातीच्या उत्साहात त्यातील काही अस्थी आणि रक्षा-अवशेषांकडे दुर्लक्ष झाले होते. नंतर ते सयामच्या (थायलंडच्या) राजाला

भेट म्हणून पाठवले गेले. याचबरोबर एका अस्थिकलशाच्या बाहेरच्या भागात काही ब्राम्ही अक्षरे ओबडधोबडपणे कोरलेली होती. ती अक्षरे सर्वप्रथम विन्सेट स्मिथ आणि त्यानंतर फ्युरर यांनी वाचली. त्या अक्षरांची फ्युररने हाताने केलेली नक्कल व्हिएन्ना येथे जार्ज ब्युहत्तरकडे पाठवली.

अनेक पुरालेखीय तज्ञांप्रमाणे ब्युहत्लर तेथे मिळालेल्या सु की ती या तीन शब्दांमुळे गडबडून गेले. परंतु कोरलेल्या उर्वरीत शब्दांचा अर्थ स्पष्ट होता -

दैवी बुद्धाचे शारीर-धातू असलेला हा स्तूप शाक्य सुकीती बंधु तसेच त्यांच्या भगिनी, मुले आणि पत्नी (यांचे दान आहे).

प्रो. ब्युहत्तर यांना खात्री होती की विल्यम पेप्पे यांना शाक्यतमुनि बुद्धाच्या शरीर-अवषेशाचा शाक्यां चा हिस्सा सापडला होता. म्हणजेच त्यावरीत्त अक्षरे म्हणजे भारतात आत्तापर्यंत सापडलेत्ता सर्वांत जुना कोरीव लेख होता. पेप्पे यांनी उघडलेला हा विटांचा स्तूप अशोकावदानात व ह्युएन-त्संगने वर्णिल्याप्रमाणे अशोकाने मूळ बुद्ध अवशेषांवर बांधलेल्या मातीच्या स्तूपाच्यावर बांधलेला असावा असे गृहीत धरले गेले. येथे ११७२- ७३ साली के. एम. श्रीवास्तव यांनी दुसरे उत्खनन केले. त्यांनी दाखवून दिले की हा स्तूप कुषाणकालीन आहे आणि आधीच्या मातीच्या स्तूपावर बांधलेला आहे. परंतु याबरोबरच अजून एक गोष्ट प्रकाशात आली की आधीची अस्थी-अवशेष असलेली दगडाची पेटी ज्या ठिकाणी होती त्याखाली दोन फूटांवर अगोदर अस्थी-अवशेष ठेवण्यात आले होते. ती दगडाची पेटी तिच्यातील धातूपेटिका इत्यादींसह ठेवण्याच्या वेळी ते अवशेष तेथून काढले होते.

पेप्पेचे फ्युहरस्शी असलेले संबंध व त्यानंतर ब्युहलर्चा मृत्यू यामुळे पिपरहवाबइत आणि तेथील कोरलेल्या अक्षरांभोवती शंकेचे धुके टिकून राहिले आहे. तरीदेखिल टोकाचा कुतर्क करणारे काही बौद्ध संशोधक सोडून इतर सार्यांहना पिपरहवा येथील लेखाच्या विश्वासाहतेबद्दल व त्याच्या अतिप्राचीनत्वाबद्दल काहीही शंका नाही.

आजपर्यंत अशा प्रकारचे अंदाजे पन्नास बुद्धधातू अवशेषांचे लेख भारतीय उपखंडात सापडलेले आहेत. यातील बरेचसे अफगाणिस्तानमधे किंवा त्याच्या आसपास प्राचीन गांधार प्रदेशात आहेत. त्यांचा दुसरा मोठा एक समूह मध्य भारतात सांची परिसरात सापडला आहे. बौद्धांचे हृदयस्थान असलेल्या मगधात असा केवळ एकच लेख पिपरहवा येथे सापडला आहे. केवळ याच ठिकाणी सापडलेल्या अस्थि-अवशेषांबद्दल असे शब्द आहेत-- 'सलिलनिधाने बुद्धस भगवते सकीयानम" म्हणजे "शाक्यमुनी बुद्धाच्या धातू-अवशेषांचे पात्र'. इतरत्र कुठेही धातूपेटिकेसाठी "निधाने' असा शब्द वापरलेला नाही. याऐवजी इतर सर्व ठिकाणी अधिक सामान्यपणे समुदगा किंवा मंजुसा असे शब्द वापरते आहेत. ह्यामुळे पिपरहवा येथील कोरीव लेख अस्सल आहेत असाच अर्थ निघतो. पुरालेखीय अभ्यासक रिचर्ड सोलोमोन म्हणतात, "यातील भाषा अर्धमागधीचा (प्राचीन

मगधी प्राकृत) उत्कृष्ट नमुना आहे... शंभर वर्षांपूर्वी या बराचशा अज्ञात भाषेची इतकी उत्तम नक्कल करायला खूपच विठ्ठान भाषापंडीत लागता असता.''

पिपरहवा येथे हा लेख कोणी आणि कधी ठेवला? त्यातील शब्दांच्या साधेपणामुळे तो ब्राम्ही लिपीच्या निर्मितीच्या काळांतील असावा किंवा मगध राज्याच्या दूर कोपर्या त असलेल्या या भागातील ब्राम्ही भाषेचे ते ग्रामीण रूप असावे. परंतु हे मत ही बाब लक्षात घेत नाही की जिच्यात अस्थिकलश सापडला ती दगडी पेटी वैशिष्ट्यपूर्ण होती आणि अवशेषांच्या बरोबर ठेवलेल्या अर्पण-वस्तूंचा दर्जा उच्च होता व संख्याही भरपूर होती (या जवळपास १४०० पेक्षाही अधिक वेगवेगळ्या अर्पण-वस्तु होत्या). यांत मौल्यवान दगडांचे मणीकाम होते जे दुसऱ्या कुठल्याही धातु-अवशेषाच्या पेटीत सापडत नाही. नक्कीभच कुण्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तीच्या आज्ञेवरून ह्या वस्तू व पाषाण पेटी बनवले गेली असावी. या पेटीचा दगड गंगेच्या खोऱ्यातील चुनार येथून आला असावा जिथला दगड अशोकाच्या इतर स्मारकांसाठी वापरला होता.

पिपहरा येथे केलेल्या दोन उत्खननांच्या पुराव्यावरून असा अंदाज बांधता येतो की शाक्‍्यां नी आपल्या वंशातील महान व्यक्तीच्या शरीर-अवशेषांचा त्यांना मिळालेला हिस्सा कपिलवस्तु शहराजवळ (स्तूपात) पुरून ठेवला असेल. सम्राट अशोक किंवा त्याच्या प्रतिनिधींनी शाक्यसमुनींचे अस्थिअवशेष पुनश्च एकदा सर्वज्र वितरण करण्याच्या मोहिमेअंतर्गत ते हलवले असावेत. असा उ 'ख अशोकावदान, ह्युएन-त्संगचे प्रवासवर्णन व इतर स्रोतांमधे सापडतो. त्यानंतर सम्राट अशोकाने त्या ठिकाणी परत एकदा पवित्र धातूंचा काही भाग समारंभपूर्वक ठेवला आणि त्यावरती एक साधा स्तूप बांधला ज्याचा विस्तार पुढे कुषाणांनी केला.


एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या महिन्यामध्ये अनेक विठ्ठान या लुंबिनी-कपपिलवस्तु-पिपरहवा वादामध्ये अडकले होते. त्यांत भारतातील विन्सेंट स्मिथ आणि लंडन येथिल RAS चे सचिव पालि विद्वान टी. डब्ल्यू. ऱ्हीस डेव्हिंड्स यांचा सहभाग होता. सन १९००मधे स्मिथने कंटाळून मदतपूर्व सेवानिवृत्ती घेतली आणि तो पूर्णवेळ इतिहास संशोधक बनला. एक वर्षानंतर त्याने ,Ashoka, the Buddhist Emperor of India हे पुस्तक प्रकाशित केले. याचवेळी टि. डब्ल्यू ऱ्हीस डेव्हीडस् देखील अशोकावर पुस्तक लिहीत होता परंतु आजारपणामुळे तो ते काम पूर्ण करू शकला नाही. म्हणून त्याने १९०३ मध्ये Buddhist India हे पुस्तक प्रकाशित केले. या दोन पुस्तकांमुळे अशोकाचे नाव केवळ विद्‍ृवत्जगतापुरते सीमित न राहता ते सामान्यांना पण सुपरिचित झाले. दोन हजार वर्षांच्या अज्ञातवासानंतर भारताचा हा सम्राट परत एकदा लोकांसमोर प्रकट झाला.




सम्राट अशोकाने त्याच्या राज्यारोहणानंतर वीस वर्षांनी उभारलेला निंगाली सागर शिलालेख. डॉ. अन्टॉन फ्युहरर यांनी घेतेलेले १८९५चे छायाचित्र. (APAC, British Library)



डॉ. विल्यम हॉयने बंगालच्या एशियाटीक सोसायटीला भेट दिलेला मौर्यकालीन सोहगौरा पट. हा पुढे हरवला किंवा चोरीला गेला. (JASB, 1894)



पाटण्याच्या तळ नसलेल्या विहिरीच्या बाजूना शीतळादेवी मंदिराच्या आवारात दिसणारा बौद्ध कुंपणाचा स्तंभ ज्यावर दोन यक्षींची शिल्पे आहेत. अलेक्झांडर केंडीने १८९५ मधे घेतलेले छायाचित्र. (APAC, British Library)




स्पष्टपणे ग्रीक शैलीत असेलेले भव्य स्तंभशीर्ष. यात अशोककालीन व ग्रीको- पर्शियन चिन्हे एकत्र दिसतात. (From Waddell's *Report on teh Excavations at Pataliputra (Patna)*, 1903)







डॉ. वॉडेलच्या कांतीमय नया तोला वृक्षदेवतांच्या अत्युत्कृष्ट शिल्पांपैकी एक. पण त्यांच्यापेक्षा दिदारगंज यक्षी-खरे तर चौरीधारिणी (चामरधारिणी) म्हणजे चवरे ढाळणारी सेविका--(वर उजवीकडे) सुंदर आहे. (दोन्ही फोटो नमिंत अरोराच्या सौजन्याने)



कुमराहर येथील डेविड स्पूनरच्या उत्खननाचा काही भाग. (वर) एक अशोक स्तंभ व इतर अनेक स्तंभांचे तुकडे वेगवेगळ्या ढिगाऱ्यात दिसत आहेत. (खाली) अशोकाच्या विशाल सभागृहाच्या लाकडी तुळ्या साफ करतांना कामगार. (APAC, British Library)



१५. विसाव्या शतकातील अशोक



सारनाथ येथील अशोकस्तंमाचे सिंहशीर्ष. पुढे लेख असलेला स्तंभ दिसतो आहे. चार सिंहांच्या डोक्यावर असलेले घर्मचक्राचे फक्त काही तुकडे सापडले. माधव प्रसादने १९०५ मधे घेतलेले छायाचित्र. (APAC, British Library)

हा छान योगायोग होता की भारताला आधुनिक पुरातत्त्व संशोधनाच्या पद्धतीची ओळख करन देणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि भारतातील पहिल्या ब्रिटीश प्राच्यविद्यापंडिताचे नाव एकच होते-- जोन मार्शल. आणि त्याची नेमणूक करणारा लॉर्ड कर्झन हा कदाचित एकमेव असा ब्रिटीश व्हाईसरॉय होता ज्यात्ता वॉरेन हेस्टिंजइतकेच भारतीय संस्कृती व इतिहास याबद्दल कुतूहल होते. कर्झनने लिहिले होते, “the

sacredness of India haunts me like a passion". भारतीय संस्कृतीबद्दलच्या या आस्थेपोटीच त्याने आग्रह धरला की भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचा (ASI) पूर्णपणे कायापालट करायला हवा, त्याच्यावर मध्यवती नियंत्रण हवे आणि त्याला पुरेसा निधी दिला जावा जेणेकरून त्याचे कार्य योग्य प्रकारे चालवता यावे. त्याने ASI च्या प्रमुखपदी स्थानिक माणसाची नेमणूक करायला नकार दिला आणि योग्य प्रशिक्षित व्यक्तीची नेमणूक करविली. ज्याने आशियात कधीही पाऊल टाकले नव्हते असा तो केवळ २६ वर्षांचा तरूण होता तरीही!

पहिल्या जॉन मार्शलनंतर २३८ वर्षांनी हा दुसरा जॉन मार्शल भारतात आला आणि पुढील सव्वीस वर्षांत त्याने भारतीय पुरातत्त्व संशोधनाचा व त्याबरोबर ASI चा चेहरा-मोहराच बदलून टाकला. आपल्या निवृत्तीनंतर काही वर्षांनी त्याने लिहीले होते, "मला अगदी सुरुवातीलाच असे वाटू लागले की भारतीय पुरातत्त्व शास्त्राचे भवितव्य भारतीयांनीच त्यात रस घेण्यावर अवलंबून आहे; आणि माझा विभाग बळकट करण्यासाठी अधिकाधिक संख्येने भारतीयांची भरती करणे हाच सर्वोत्तम उपाय होता." मार्शल याने त्यासाठी एक सरकारी शिष्यवृत्ती जाहीर केली. ही शिष्यवृत्ती सर्वप्रथम दया राम साहनी यांनी मिळवली. पुढे ते मार्शलपाठोपाठ ASIचे महासंचालक झाले. दुसरी शिष्यवृत्ती आर. डी. बॅनर्जी यांनी मिळवली. यांनीच १९२२ साली मोहेंजोदडो येथील उत्खननात शोध लावला की आर्यांच्या पूवी येथे सिंधु संस्कृती अस्तित्वात होती. सुरुवातीला मात्र मार्शलला काही अत्यंत उच्चविद्याविभूषित तर काही हौशी स्थानिक युरोपियन संशोधकाची मदत घ्यावी लागली. यातील हौशी लोक एका लांबलचक शृंखलेचे शेवटचे टोक होते.

ह्या हौशी पुरातत्त्व अभ्यासकांपैकी एक होता बनारस विभागांचा कार्यकारी अभियंता एफ. ओ. ओएर्टल. त्याची या कामासाठी एकमेव पात्रता ही होती की त्याने ब्रह्मदेशात सार्वजनिक बांधकाम खात्यात काही वर्षे काम केले होते. सन १९०४-५ च्या हिवाळ्यात जॉन मार्शलच्या परवानगीने आणि त्याच्या मार्गदर्शनाखाली ओएर्टलने सारनाथला-- कनिंगहंमने जेथे फारसे उत्खनन केले नव्हते त्या भागात धम्मेख स्तूपाच्या पश्चिमेला-- उत्खनन सुरू केले. तेथे त्याला त्या जागेवरील मुख्य मंदिर सापडले. ते गुप्तकालीन चौकोनी मंदिर त्याच्या आधीच्या एका वास्तूवर बांधलेले होते. ह्या आधीच्या वास्तूत घासून गुळगुळीत केलेल्या चुनार दगडांचे कुंपण होते. ते नक्कीच अशोककालीन होते. मंदिराच्या पश्चिमेला ओएरटेलला एका अशोकस्तंभाचा खालचा भाग सापडला. हा जमिनीत गाडलेतला होता आणि त्याच्यावरील तीन शिंलालेखांपैकी सर्वात जुन्या लेखाच्या चौथ्या ओळीच्या जागी तो तुट्ला होता. त्या स्तंभाचे तीन असे तुकडे आसपास सापडले की ज्यांच्यावर काही लेख होते. त्या सर्वांना एकत्र जुळवून जवळपास पूर्ण शिलालेख वाचता आला. हा सम्राट अशोकाचा भिक्षु आणि भिक्षुणींना उद्देशून लिहिलेला अजून एक

संघभेद शिलालेख (Schism Edict) होता ज्यात त्यांना संघभेद न करण्याची ताकीद दिली होती.

सन १८५४ला कनिंग्हेम व मैसीने सांचीच्या स्तंभावर मोडतोड झालेले विल्लोभनीय स्तंभशीर्ष (capital), ज्यावर एकमेकांकडे पाठ केलेले चार सिंह होते, शोधले होते. ओएर्टेलने सारनाथला त्यावर बाजी मारती. त्याने तेथील सिंहमुद्रा (सिंह- स्तंभशीर्ष) स्तंभापासून काही यार्डावर खोदून काढली. ह्युएन-त्संग साधारणतः सन ६३७ला मृगदायवनात आला होता तेव्हा हे शीर्ष स्तंभावर होते. ती सिंहमुद्रा केवळ सांचीच्या सिंह्मुद्रेपेक्षा सुस्थिती होती असे नाही तर तिची शि कलाही सांचीच्या सिंहमुद्रेपेक्षा कितीतरी अधिक उच्च दर्जाची होती हे पाहून त्यावेळी उपस्थित असलेले सर्वजण हर्षो दीत झाले. अर्थातच हे मूळ शिं होते व सांचीला होती ती प्रतिकृती होती. दोहोंत अजून एक फरक होता-- शीर्षाच्या खालील पट्टी (abacus). सांचीच्या शिं त हसाच्या जोड्या होत्या तर सारनाथच्या शि त अत्यंत सुबकपणे कोरलेले शेपटी उंचावलेला सिंह, हत्ती, वृषप आणि चौखूर उधळलेला घोडा असे चार प्राणी होते. मध्यभागी चोवीस आऱ्यांचे धर्मचक्र होते.

ह्या सर्व प्राण्यांचे बौद्ध धर्मात विशेष स्थान आहे. सिंह शाक्यसिंह गौतम बुद्धाचे प्रतिक आहे. हत्ती महामायेच्या स्वप्नात तिच्या गर्भात प्रवेश करणारा बोधिसत्त्व आहे. ह्याचे दुसरे महत्त्व असे की शाकयमुनी बुद्ध जंगली हत्तींचे दमन करणारे होते. घोडा त्यावेळचे राजचिह् होते तसेच राजकुमार सिद्धार्थाला महानिष्क्रमणाच्या मार्गावर नेणाराही घोडाच होता. वृषभ महाप्रसवक आहे, वीर्याचे प्रतिक आहे आणि येथे तो बुद्ध- धर्माचे प्रतिक आहे.

सांची व सारनाथ या दोन्ही ठिकाणच्या मूळ शि ंमध्ये ह्या चार सिंहांच्या डोक्यावर एक मोठे धर्मचक्र होते. परंतु दोन्ही ठिकाणी त्या चक्राचे इतके तुकडे झाले होते की त्याची पुनर्जोडणी करणे शक्य नव्हते. कनिंगहमने अंदाज बांधला की सांची येथील स्तंभ आणि त्यावरील सिंह-शीर्ष भूकंपामुळे किंवा दुसर्याय एखाद्या नैसर्गिक आपत्तीमुळे कोसळले असावे. परंतु सारनाथ येथे माणसांनी जाणूनबुजून नासधूस केलेली दिसत होती. सारनाथ येथीत्त सिंहमुद्रा अशोककाळातीत्त शिं कलेचा सर्वोत्तम नमुना आहे. हा शिं कार मौर्यकालीन मायकेल-एऐजेलोच होता असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. त्याचे आपल्या कलेवर इतके प्रभुत्त्व होते की कुण्याही असिस्थिन, पर्शियन किंवा ग्रीक शि काराच्या तोडीचे त्याचे शि होते. कदाचित त्यानेच दीदारगंज यक्षीचीही निर्मिती केली असावी. तो कलाकार आणि त्याचे इतर सहकारी (ज्यांनी आज उपलब्ध असलेले अशोक स्तंभ, स्तंभ शीर्ष, घंटा इत्यादी बनवते असावेत) हे अचानक कुठून आले हे कळत नाही. त्यांच्या आधी भारतात अशी कला दिसत नाही. अपवाद फक्त कनिंगहमच्या सहाय्यकांना परखम व बेसनगर येथे सापडलेल्या ओबडधोबड स्मारक शि कृतींचा. ही नवी सुबकता इतस्त्र कुठूनतरी आती असणार. उपलब्ध शि कडे बघता असे वाटते की हे सेलुसिड बॅक्ट्रीयाचे ग्रीको-पर्शियन कारागीर असावेत. अशोकाचे त्यांच्याशी असलेले कौटुंबिक नाते, त्याचे वडील व आजोबा यांचे त्यांच्या पाश्चिमात्य शेजाऱ्यांशी संबंध आणि अशोकाने

स्वतःच शिंत्लालेखांमधे उ 'ख केलेले त्याचे संबंध पाहता हे संभवनीय आहे. असे दिसते की शि कारांचा व पाथरवटांचा हा समूह (बॅक्ट्रीयातून) भारतात आला ज्यामुळे लाकडाऐवजी दगडी शि बनवायला सुरूवात झाली. हा अतिशय खर्चिक बंदल राजाज्ञा व राजाश्रयाशिवाय शक्य नव्हता.

पण जर ह्या महान शि काराला अशोकाचा राजाश्रय होता तर आपल्याला त्याच्या आश्रयदात्याची शि ' का सापडत नाहीत? अशोकाच्या समोर पर्शियन व ग्रीक राजांचे उदाहरण नाण्यांवरील त्यांच्या चित्रांच्या खपात होते. तरीही त्याने तसे केले नाही (स्वतःची प्रतिमा नाणे किंवा दगडांवर कोरली नाही). अशोकाच्या काळात बुद्धाच्या मूर्ती बनवत नसत. ही बुदधमूर्तींची मनाई कदाचित मौर्यांनी स्वतःच्या छबीवरही घातली असावी. हेही तितकेच संभव आहे की अशोकाच्या काळात त्याच्या मूती बनवण्यात आल्या पण त्यातील कोणत्याही आजपावेतो टिकल्या नाही (किंवा अजून सापडल्या नाहीत). अर्थात कनिंगहेंमला परखम येथे सापडलेली व देवी मानली गेलेली विशाल दगडी मूर्ती मौर्य राजाची असू शकेल.


हे शि कार व पाथरवट वायव्येकडून आले असावेत आणि त्यांना राजाश्रय मिळून त्यांनी मथुरेत्ता व कदाचित वाराणसीलाही कार्यशाळा सुरू केली असावी. ह्यातून 'एका भारतीय परंपरेचा उगम झाला ज्यातून भारहूत, सांची, अमरावती तसेच इतर अनेक आता नष्ट झालेली व विस्मरणात गेलेली बौद्ध व जैन स्मारकांमधील शि * निर्माण झाली.

ओणएर्टलत्ता सारनाथ येथे उत्खननात जे काही सापडले ते पाहून ती जागा पुरातत्त्वाच्या दृष्टीने अतिशय महत्वाची आहे व ती PWD च्या ताब्यात देऊ नये असे मार्शलला वाटले. मार्शलला पुढे येथे इतके विविध महत्त्वाचे शोध लागले आणि इतक्या अभिजात दर्जाच्या वस्तू सापडल्या की त्याने उत्खननासाठी अधिक निधीची मागणी केती. या निधीतून त्याने भारतातीत्त पहिले उत्खननाच्या जागेवरील वस्तुसंग्रहालय (Site Museum) उभारले. अशाच प्रकास्ची वस्तुसंग्रहालये त्याने सांची आणि तक्षशिला येथेही निर्माण केली आणि पुढील पंचवीस वर्षें तो या दोन्ही ठिकाणी वारंवार भेट देत राहिला.

या दरम्यान इतर शिलालेखांचा शोध लागत गेला. त्यांत लघुशितलालेख जास्त आहेत. यांचा एक समूह (जुऱ्या) म्हैसूर राज्यात सापडला-- सन१९१५त्ला कर्नाटकातील रायचूर जि ह्यातील मस्की येथे, १९२८ला आंध्रातील अनंतपूर जि ह्यातील एररागुडी येथे (हा पाच पाषाणांवर कोरलेले शिलालेख १ ते १३ असलेल्या एर्रागुडी महाशिलालेखाच्या शेजारी सापडला), १९३श्ला कर्नाटकातील रायचूर जि ह्यातील गोवीमठ येथे तसेच पालकीगुंडु येथे आणि १९४कला आंध्र प्रदेशातील कुर्नूल जि ह्यातील राजुल-मंदागिरी येथे.

मस्की येथील लघुशिलालेख या सर्वांपेक्षा वेगळा आहे. सोन्याच्या खाणीचा शोध घेणाऱ्या एका माणसाने तो शोधला. अक्षरांचे बरेच नुकसान झाले होते परंतु हे वाचता येत

होते की इतर शिलालेखांतील नेहमीच्या सुरुवातीच्या शब्दांऐवजी मस्की शिलालेखाची सुरुवात अशी होती.



दे वा ना पि य स अ सो क स

आजपावेतो ह्या एकाच ठिकाणी अशोकाचे नाव दगडावर कोरलेले सापडते. कदाचित काही शिलालेखांचा शोध अजून लागायचा आहे; तसेच मानवी विध्वंसाने किंवा नैसर्गिक कारणाने इतर काही कायमचे नष्ट झाले असावेत.

दोन अफगाण युद्धामुळे अफगाणिस्तानमधे ब्रिटीशांबद्दल जो संशय निर्माण झाला होता तो विसाव्या शतकातही टिकून होता. त्यामुळे सरतेशेवटी १९२० मध्ये आधुनिकतेकडे कल असलेल्या पाशा अमानु हच्या काळात जेव्हा अफगाणिस्तान पश्चिमेशी संवाद साधू लागला तेव्हा अफगाणिस्तानमध्ये उत्खनन करण्याचा एकाधिकार फ्रेंचांना मिळाला. हे काम आ फ्रेड फाऊशर याच्या मार्गदर्शनाखाली झाले. फाऊशरने बनारस येथील संस्कृत कॉलेजमध्ये शिक्षण घेतले होते. त्यानेच जॉन मार्शलच्या कृपेने भारताच्या वायव्य सरहद्द प्रांतात व सांची येथे उत्खननाच्या कामाचा आरंभ केला होता. फाऊशरनेच गांधार येथील धार्मिक कलेला ग्रीक-बौद्ध (Graeco-Buddhist) ही संज्ञा दिली होती. कनिंगहॅमप्रमाणेच त्यांचा दावा होता की अभिजात गांधार कलेचा दूरगामी प्रभाव भारत आणि त्यापुढेही पडला होता. सिकंदर व ह्युएन-त्संग यांच्या मार्गाचा अनेक महिने मागोवा घेत घेत फाऊशरने अफगाणिस्तानात अनेक पुरातन जागांचा शोध लावला. त्याच्याच नेतृत्वाखाली बेग्राम येथील गांधार्ची उन्हाळी राजधानी कपिशा येथे १९३६ साली उत्खनन सुरु झाले. पुढे तेथे बेगरामचा खजिना (Begram Treasure) सापडला. यानंतर एकापाठोपाठ अनेक विलक्षण शोध लागत गेले. अनेक आंतरराष्ट्रीय मार्गांवर गांधारचे महत्त्वाचे स्थान होते तसेच मौर्ययुगाच्या आधी, त्यादरम्यान आणि त्यानंतर देखील त्या प्रदेशात जे बदत्त घडले त्यांत गांधारची महत्त्वाची भूमिका होती हे सिद्ध करणारे अनेक पुरावे मिळाले. या उत्खननांमधे ग्रीक, आर्माईक आणि ब्राम्ही लिपीत लिहिलेले अनेक शिलालेख सापडले. परंतु यातील फक्त एकाचा प्रत्यक्ष संबंध अशोकाशी होता. हा शिलालेख १९३० साली जलाताबाद शहराच्या पश्चिमेला लाघमन भागात सापडला होता. तो दगडाच्या त्रिकोणी तुकड्यावर आर्माईकमध्ये कोरलेला होता. त्यावर अशोकाच्या शिंलालेखांचेच प्राकृत भाषेतील काही अंश होते, जे आर्माईकमधे लिप्यंतर करून कोरलेले होते. पुढे १९५८ पर्यंत मात्र अशोकासंबंधीत असे काहीही सापडले नाही. सन १९५८ मध्ये अगदी योगायोगाने कंदाहार

कडून पश्चिमेत्ता हेरातकडे जाताना प्राचीन महामार्गाच्या बाजूत्ता एका डोंगराच्या सोंडेच्या पायथ्याशी एक दगडी शिळा सापडली. तिच्यावर ग्रीक आणि आर्माईक या दोन्ही भाषेत लिहिलेले अशोकाचे आदेश होते. दोन्ही भाषेतील लेखांत थोडा फरक होता परंतु दोघांवर अशोकाने एकच संदेश दिला होता. ग्रीक भाषेमध्ये अशोकाचे नाव ''पियोडासेस' असे लिहीले होते. त्यावर अशोकाच्या राजवटीचे दहावे वर्ष अशी तारीख आहे. हत्या करू नये, इतरांचा आदर करावा अशा इतर शिलालेखांचेच पडसाद त्यात आहेत.

पाच वर्षानंतर प्राचीन कंदाहारच्या अवशेषांपासून काही अंतरावर दुसरा शिलालेख सापडला. हा पूर्णपणे प्रीक भाषेत होता. यावर शिलालेख १९चा शेवटचा भाग आणि शिलालेख १३चा सुरुवातीचा भाग होता. त्याच वषी एक वेगळाच शिलालेख कंदाहारच्या बाजारात मिळाला. या दगडाच्या तुकडयावर स्तंभालेख ७ चा काही भाग आर्माईकमधे कोरलेला होता. या सार्याड शोधांवरून असे दिसते की अशोकाचे अनेक शिलालेख व स्तंभलेख किंवा दोहोंचे संयुक्त लेख एके काळी पाटण्याहून १३०० मैल दूर गांधारातील कदाहारपर्यंत उभारते होते.

जॉन मार्शलच्या पुनर्बांधणीमुळेच आज सांची इतके प्रेक्षणीय व् आ ददायक स्थान बनले आहे. जणू सांची वारंवार मार्शलला साद घालत होती व तो वारंवार तिच्या भेटीला जात होता. सन १८१८ मध्ये त्याने सांचीबद्दल एका मित्राला लिहिले की सांची ''नेहमीइतकीच सुंदर आणि विलोभनीय आहे, कदाचित पूर्वीच्या काळापेक्षाही अधिकच''. सांचीबद्दलचे हे आकर्षण ह्या कारणानेही होते की त्याचा जुना मित्र आ फ्रेड फाऊशर--प्रतिथयश विद्ठान आणि अत्युत्तम फ्रेंच सटूहस्थ' याच्या मते सांची येथील भव्य स्तूपाची प्रवेशद्वारे आणि स्तूप २ चे तोरण ही मूळतः धर्मप्रसाराची स्मारके होती.

पहिल्या महायुद्धाच्या शेवटी डॉक्टरांच्या स् जुसार मार्शलने राजीनामा दिला. निराशेचा दीर्घ सुस्कारा सोडत त्याला सांचीचे काम तसेच अपूर्ण सोडावे लागले. मात्र उमरावपदाचे आमिष दिसल्यावर त्याचे मन बदलले. काही महिन्यांच्या रजेनंतरच तो पूर्ण उमेदीने परत आतला आणि ASIच्या महासंचालकपदी त्याने पुढील दहा वर्षे काढली. या वाढीव कार्यकाळामुळे मार्शलने अधूनमधून सांची येथे जाऊन अजून दोन वर्षे फाऊशरबरोबर काम केले. त्यानंतर मात्र सन १९२१ साली फाऊशर्ची अफगाणिस्तानमधे फ्रेंच पुरातत्त्व विभागाचा अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. त्यामुळे त्या दोघांनी एकत्रित लिंहिलेत्ता तीन खंडांचा अप्रतिम ग्रंथ The Monuments of Sanchi प्रकाशनासाठी तयार व्हायला दोन दशके उलटली. यात आणखी एक दुःखद अडचण अशी आली की या कामातील त्यांच्या तिसऱया सहकार्याकचा तो सांचीत गुप्त खजिना शोधत आहे असे समजून दरोडेखोरांनी खून केला. मग मार्शलचा दुसरा एक शिष्य संस्कृतज्ञ एन्. जी. मजुमदार याने या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी मदत केली. शेवटी १९३शत्ता या ग्रंथाची मर्यादीत आवृत्ती प्रकाशित झाली. त्यानंतर भारत स्वतंत्र झाला आणि फाळणीचा आघात झेलीत असताना १९४७ साली परत एकदा या ग्रंथाची मर्यादीत आवृत्ती प्रकाशित झाली.

मार्शल व फाऊशर यांनी The Monuments of Sanchi या ग्रंथात दाखवले की बौद्ध स्तूपांची परंपण अशोकाने उभारलेल्या धातू-स्तूपांपासून सुर्वात झाली. तसेच अशोकाचे शिंलालेख व स्तंभलेख ''यांना एक एक प्रकारचे पाविञ्य प्राप्त झाले... ... आणि त्यांना धर्माचे प्रतीक मानण्यात आले''. त्यांनी पुढे दाखवले की महास्तूपाची चार प्रवेशद्वारे भौतिकदृष्टीने व आध्यात्मिकदृष्टीनेही अशोकाचीच होती-- विशेषेकरून सगळ्यात आधी निर्माण केलेले दक्षिण प्रवेशद्वार जे मोडतोडीनंतरही त्यांच्या मते चारांतील सर्वात सुंदर होते.

हे दक्षिणेकडील प्रवेशद्डार अशोकस्तंभाच्या बाजूला उभारते होते. ते पूर्णपणे अशोकाच्या शैलीतील होते. त्याच्या दोन स्तंभांवर सारनाथच्या अशोकस्तंभासारखी सिंह्मुद्रा, हेस, अरकॅन्थस (acanthus) पानांची नक्षी होती. मधल्या आडव्या पट्टीच्या बाहेरील बाजूस दाखवलेल्या देखाव्यात सप्राट अशोक स्वत: दोन घोड्यांच्या र्थात बसून रामप्रामच्या बुद्ध-धातूच्या स्तूपाल्ला भेट देताना दिसत आहे. तेथील रक्षक नागदेवता अशोकाचे स्वागत करत आहेत. हे नागराजे तेथे ''मानवी रूपात पण नागफणा असलेले, स्तूपाची पूजा करताना, भोग्यवस्तू अर्पण करतांना किंवा कमळे असलेल्या तत्तावातल्या पाण्यातून बाहेर येताना दिसत आहेत''. हे तेच दृश्य होते जे मेजर फ्रँकलीन आणि कॅप्टन मुरे यांनी एखोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला रेखाटले होते.

याच दृश्यातील कथा पुढे आतल्या बाजूला तुटलेल्या आडव्या दगडी तुळईवर दाखवलेली आहे. हा दुसरा देखावा केंप्टन मरेने रेखाटून जेम्स प्रिन्सेपत्ता १८३७ मध्ये पाठवला होता. उजव्या बाजूला राजा स्थात उभा होता, त्याच्या बाजूला एक हत्ती आहे, मध्यभागी शहराला सेनेचा वेढा आहे आणि डावीकडे राजा जणू आक्रमणाचे नेतृत्व करत होता. हे बुद्धाचे शारिर-धातू मिळवण्यासाठी झालेल्या युद्धाचे दृश्य असावे असे सामान्यतः समजले जाते. शाक््यवमुनि बुद्धांचे अस्थि-अवशेष घेण्यासाठी आठ राजांमध्ये संघर्ष झाला होता. ही कथा अधिक स्पष्टपणे दुसर्याअ प्रकारे ईशान्य आणि पर्श्चिम प्रवेशद्वारावरील शि ंत दाखवली आहे. परंतु मरेने आपल्या रेखाटनात त्या विशालकाय हत्तीवर अस्थि-अवषेशाचे पात्र दाखवले नव्हते. मुकुट घातलेल्या राजाने ते पात्र डोक्यावर घरले होते. मात्र हे सारे दृश्य लेफ्टनंट फ्रेड मेसी याने नंतरच्या रेखाटनात अचूक दर्शवले होते.

प्रत्यक्षात हे दृश्य अशोकावदानातील वर्णनानुर्प असून यात आपल्या चतुरंग सेनेसह अशोक राजगीर या शहरावर चालून गेला; तेथील बुद्धाचे अस्थि-अवशेष घेऊन परत पाटलिपुत्र येथे आला आणि नंतर त्याने रामप्राम स्तूपाकडे प्रयाण केले. हे दृश्य मूळतः त्या चौकटीच्या लगेच वर दाखवलेले होते परंतु तुकड्यांची पुर्नबांधणी करताना ते चुकून उलटे लावले गेले. त्यामुळे ते आता बाहेरील बाजूस दिसत आहे. हा योगायोग असणे शक्य नाही की आतील भागावर दिसणाऱ्या दृश्यात स्तूपांची रांग, बोधिवृक्षाची पूजा करणारा नागराज, यक्षी मातृदेवता आणि एक मानवी राजा (जो बहुधा राजा अशोकच असावा) दिसत आहेत.

याच दक्षिणेकडील प्रवेशद्ठारावर दाखवलेल्या इतर दृश्यांवर्न असे दिसते की ते सम्राट अशोकाचे स्मारक म्हणूनच उभारले गेले असावे. त्याच्या पश्चिम स्तंभावरील दृश्यामुळे असे म्हणण्यास पुष्टी मिळते. यामध्ये पुनः एकदा राजा अशोक दोन घोड्यांच्या रथात दाखवला आहे. त्याच्यापुढे एक धिप्पाड गदाधारी रक्षक आहे. पुढच्याच दृश्यात परत हाच राजा त्याच्या दोन राण्यांच्या मधे उभा दाखवला आहे. ते बोधगयाच्या बोधिवृक्षाखाली उभे आहेत. राजाने उजवा हात एका राणीच्या खांद्यावर ठेवला आहे, तर त्याचा डावा हात दुसर्यो राणीने पकडला आहे. हे दृश्य असामान्य आहे. या महत्वाच्या दृश्याबद्दल आ फ्रेड फाऊशर लिहितो, ‘‘येथे एक राजपुरुष त्याच्या दोन राण्यांनी आधार दिल्यासारख्या अवस्थेत दिसतो. पण... हा अशोकच असला पाहिजे. एक तर तो त्याचा पूज्य व लाडका बोधिवृक्ष मरणासन्न आहे हे कळल्यावर शोकावेगाने मूर्च्छित झाला असावा किंवा (सोपा सरळ अर्थ काढायचा तर) आपल्या धम्मयात्रेमधे या अतिपवित्र जागेच्या दर्शनाने भावावेगात त्याचा तोल गेला असावा’’.

नुकत्याच काढलेल्या छायाचित्रात आपल्याला दिसते की या दृश्यातील अशोक काहीसा ठेंगणा व स्थूत्व आहे. तसेच त्याचे डोके फुग्यासारखे मोठे आहे. या शि काराने अशोकाला प्रत्यक्ष बघितले असेल हे शक्यल नाही (कारण ते शि अशोकाच्या मृत्युनंतर अनेक वर्षांनी तयार केले गेले). परंतु या भागात त्यावेळी अशोकाच्या स्मृती नक्कीच ताज्या असल्या पाहिजेत. त्यामुळे हे मानायला हरकत नसावी की सप्राटाच्या खऱ्या ख्पाशी ही प्रतिमा मिळतीजुळती होती. हा केवळ योगायोग नव्हता की त्या इृश्याखाली ब्राम्ही लिपीत असा उ 'ख आहे की हे शि जवळच्याच विदिशातील हस्तीदंताचे काम करणाऱ्या कारागिरांनी बनवले होते.

अन्य प्रवेशद्वारावर अशोकासंबंधीची इतर अनेक दृश्ये चित्रीत केलेली आहेत. पूर्व प्रवेशद्वाराच्या तळाच्या आडव्या पट्टीबाहेरील दृश्यात अशोक परत एकदा बोधिवृक्षाला वंदन करतांना दिसतो. फाऊशरने लिहीले आहे, ‘‘थकलेला दिसणारा अशोक हत्तीवरून खाली उतरत आहे. एक राणी त्याला आधार देत आहे. नंतर ते दोघे पुढे जाऊन त्याच दगडी कुंपणाच्या आतील बोधिवृक्षाता वंदन करताना दिसतात... दुसर्याऊ बाजूला, संगीतवाद्यांच्या साथीने, लोक समारंभपूर्वक बोधिवृक्षाकडे जात आहेत. पुढे दिसणाऱ्या व्यक्ती त्याला पाणी देण्यासाठी भरलेले कलश घेऊन जातांना स्पष्ट दिसताहेत’’.

जॉन मार्शल याचे स्पष्टीकरण असे करतो की, ‘‘राणीने असूयेच्या भरात केलेल्या 'करणी'नंतर त्या वृक्षाला पाणी देण्यासाठी, त्याचे मूळ शुद्ध सौंदर्य त्यातला परत प्रदान करण्यासाठी राणी तिष्यरक्षितेता घेऊन अशोक बोधिवृक्षाला समारंभापूर्वक भेट द्यायला आलेला दिसतो’’.

पश्चिम प्रवेशद्वारावरील अनेक दृश्यांमधे अशोकाने केलेल्या पवित्र बौद्स्थानांच्या धर्मयात्रेची दृश्ये आहेत. दक्षिण द्वारावरील अशोकाचे भावनातिरेकामुळे तोल जात असलेले

स्थूल रूपच एके ठिकाणी साध्या बोधिवृक्षाची पूजा करतांना दाखवले आहे. फ्रेड मेसीने नकळत नेमके हेच चित्र १८५१ मध्ये रेखाटले होते. दारावरील मधल्या आडव्या पट्टीवरील विहंगम दृश्य अस्थि -अवशेषांसाठी झालेल्या युद्धाचे आहे. अशोक बुद्धाचे अस्थि-अवशेष आणतो आहे असे ते दृश्य आहे असेही म्हणता येईल. ह्याच शिलापट्टीच्या एका टोकाला एक मोठे डोके असलेत्ता राजा रथावर आरुढ दिसतो आणि त्याच पट्टीच्या दुसऱ्या टोकाला हाच राजा थकलेल्या अवस्थेत एका आधुनिक वाटणाऱ्या खुर्चीत विश्रांती घेतांना दिसतो. अनेक स्त्रिया त्याच्या दिमतीला आहेत. त्याच्या उजव्या हातात एक छोटा चेंडू किंवा एक फळ दिसते. मार्शतत व फाऊशर या दोघांनीही हे दृश्य काय दर्शविते आहे याचा अंदाज बांधण्याचा प्रयत्न केलेत नाही. पण ते इृश्य मरणासन्न अशोक व त्याचे शेवटची संपत्ती असलेत्ता आवळा यांचेही असू शकते.

The Monuments of Sanchi या ग्रंथाच्या प्रकाशनाला झालेता उशीर व त्याची चुकीची वेळ यामुळे भारतीय इतिहासकारांच्या एका संपूर्ण पिढीकडून त्याकडे सपशेल दुर्लक्ष झाले. शिवाय येथील शि कलेवर ग्रीकांचा प्रभाव होता हे फाऊशरचे मत काही देशप्रेमी लोकांच्या भावना पचवू शकत नव्हत्या. त्यामुळे त्या ग्रंथाकडे ते संशयाच्या नजरेने पहात होते.

हे केवळ धक्कादायकच नाही तर अत्यंत हृदयद्रावक आहे की चरित्रनायक म्हणून पात्र झाल्यात शंभरावर वर्षे उलटून गेली तरी ह्या शंभर टक्केन भारतीय सम्राटात्ता येथील लोकांनी अजूनही मनापासून स्विंकारलेले नाही. प्रथम विन्सेन्ट स्मिथ ह्या ब्रिटीश इतिहासकाराने अशोकावर अन्याय केला. Asoka: The Buddhist Emperor of India (1901) ह्या त्याच्या ग्रंथात त्याने दोन्ही प्रमुख बौद्ध ग्रंथ-स्नोत 'मिकारड्या भिक्षुंच्या मूर्ख कं ना म्हणून नाकारले. त्याच्या ग्रंथावर वे श पालि पंडित टी. डब्लू. ऱ्हीस डेविड्स यांनी लगेचच टीका केली. ऱ्हीस डेविड्सचे Buddhist India (1903) ह्या पुस्तकात पश्चिम जगताला बौद्ध धर्माबद्दल वाटणारे वाढते कुतूहल दिसत होते. या ग्रंथामुळे लेखक व समाजसुधारक एच्. जी. वेल्स याने त्याच्या लोकप्रिय ग्रंथात (The Outline of History) लिहिले की अशोक आदर्श रांजा होता--

जगाच्या इतिहासात हजारो राजे व सम्राट होऊन गेले जे स्वतःला ;Their Highnesses', 'Their Majesties' आणि 'Their Exalted Majesties' इत्यादी इत्यादी म्हणवून घेत. ते क्षणार्धापुरते चमकते व तितक्याच वेगाने नाहीसे झाले. पण अशोक (अजूनही) चमकतो आहे... आजपर्यंत तो (एखाद्या) तेजस्वी ताऱ्याप्रमाणे तेजाने चमकतो आहे.

भारतातील जे राष्ट्रवादी नेते ब्रिटीश राज्याच्या आधीच्या राज्यपद्धतीच्या शोधत होते, त्यांनी ही कु ना लगेचच उचलून धरली. यापैकी एक होते डॉ. राधाकुपुद मुखर्जी. त्यांनी १९२० साली लखनौ विद्यापीठात भारताच्या प्राचीन इतिहासावर दिलेली व्याख्याने

हा खऱ्या अर्थाने अशोक आणि त्या काळाविषयीचा इतिहास यांचा विद्ठत्तापूर्ण पाया होता. त्यांनी अशोकाला बृहद् इतिहासाचा संदर्भ दिला.

धर्मसत्तेच्या अत्युच्च तत्त्वांच्या आधारावर एक नैतिक राज्य स्थापन करण्याच्या त्याच्या प्रयत्नांमुळे त्याची तुलना इस्रायलच्या वैभवशाली काळातील डेविड व सोलोमनशी केली जाते. त्याने बौद्ध धर्माला दिलेल्या राजाश्रयामुळे एक स्थानिक धर्मपरंपरा विश्वधर्म बनल्यामुळे त्याची तुलना ख्रिश्चन धर्माच्या कॉन्स्टन्टाईनशी केली जाते. त्याच्या तत्त्वज्ञान व शीलामुळे मार्कस ऑरेलियसची आठवण येते. त्याच्या साम्राज्याच्या विस्तारामुळे (आणि काही प्रमाणात त्याच्या प्रशासनाच्या पद्धतीमुळे) तो शार्लमेनसारखा आहे. राकट, रांगडा, मनापासून आणि पुनरावृत्ती असलेल्या अशा त्याच्या आदेशांची शेली ऑलिवर क्रांमवेलच्या भाषणांप्रमाणे होती. सरतेशेवटी, त्याची तुलना ओमर खलिफा व अकबर बादशाहशी केली जाते ज्यांच्याशी त्याचे काही बाबतीत साम्य आहे.

मुखर्जींच्या पाठोपाठ भारतात अशोकाविषयी अभ्यास करण्याऱ्यांची एक लाटच आली आणि ती स्वातंत्र्योत्तर काळातही टिकून राहिली. देशप्रेमाच्या भरात काहीही अपवाद न वगळता साऱ्याच भारतीय इतिहासकारांनी अशोकावर कुठलाही विदेशी प्रभाव नव्हता; तसेच त्याची शिकवणूक ब्रिटीश सरकारविरुद्ध भारताचे राजकीय आणि अध्यात्मिक नेते महात्मा गांधी यांनी वापरलेल्या अहिंसा व सत्याग्रह या तत्वज्ञानासारखीच होती, असे चित्र उभे केले. याच कारणांमुळे बहुधा हे काहीसे ब्राम्हणवादाकडे झुकणारे इतिहासकार पालिपेक्षा संस्कृत स्रोतांनाच महत्त्व देत होते. सर जॉन मार्शल व आ फ्रेड फाऊशर यांनी सांची स्तूपाच्या प्रवेशह्ारावरीत्त सम्राट अशोकाची जी माहिति दिली तिच्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले.

स्वातंत्र्यानंतर अशोकाचे अजून तीन शिलालेख कर्नाटकात सापडले-- निचूरत्ता १९७७ साली, उदेवगोलमत्ता१९७८ साली तर सन्नतीता १९८९ साली. यातील पहिले दोन शिलालेख तुंगभद्रा नदीकिनारी आणि तिसरा दक्षिण कर्नाटकातील गुलबर्गा जि ह्यात भिमा नदीचे पात्र वळते तेथे सापडला. हा तिसरा शिलालेख चंद्रलम्ब मंदिराच्या शेजारी 'एका ओसाड हिंदू मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी साफसफाई करीत असताना सापडला. ज्या मोठ्या दगडी शिळेवर मूती ठेवली होती ती शिळा मजूरांनी हलवली तेव्हा त्यांना त्या शिळेच्या दोन्ही बाजूस शिलालेख कोरलेला दिसता. शिळेच्या एका बाजूत्ा शिलालेख १२ व १४ चे काही अंश आणि दुसर्या बाजूता कलिंग येथील स्वतंत्र शिलालेख १ व २ (SRE 1, 2) मधला मजकूर होता. मूळत: ही शिंळा इतर शिलालेखांच्या शिंळांबरोबर उभ्या अवस्थेत ठेवलेली असावी परंतु इतर शिळा तेथून नष्ट झालेल्या आहेत. आजतागायत परत अशा दगडी शिंळा (slabs) आढळून आलेल्या नाहीत.

ह्याआधीचे शिलालेख मोठ्या दगडांवर कोरलेले होते. म्हणून त्यांचे वगीकरण बृहद् शिलालेख (इंग्रजीत Rock Edicts) असे केले होते. पण येथे मोठ्या घडवलेल्या दगडी पटावर शिलालेख कोरला होता.

दुसर्या महायुद्धानंतर उत्तर आणि मध्य भारतात सापडलेल्या लघु शिलालेखांचा उ 'खही येथे उचित ठरेतत-- १९५३ मध्ये मध्यप्रदेशातीत्त दतिया जि ह्यात गुजर्री येथे; १९६१ साली बिहार मधल्या मिर्झापूर जि ह्यातल्या अहुंआरा येथे; १९६५ मध्ये नवी दि "मधील कैलास निगम भागाच्या पूर्वेस बहापूर येथे; १९७१ साली मध्यप्रदेश मधील सिहोर जि ह्यात पांगुरिया येथे. यातीत्त शेवटचे ठिकाण विशेष महत्त्वाचे आहे.

पांगुरिया हा नर्मदेच्या उत्तर किनाऱ्यावरील्त एक छोटा पाडा आहे. नर्मदेत्ता ब्रिटीश नेबुं्धा म्हणून ओळखायचे. भारतातील सर्वात मोठ्या नद्यांपैकी ही एक नदी आहे. ती जवळपास ८०० मैत्त एवढे मोठे अंतर भारतीय उपखंडाच्या पश्चिमेत्ता सर्वात रुंद प्रदेशातून पार करीत जाते. त्यामुळे तिला उत्तर व दक्षिण भारतातील पारंपारिक नैसर्गिक सीमारेषा मानतात. उत्तरेस विंध्य व दक्षिणेस सातपुड्याची पर्वतरांग असलेल्या खोऱ्यातून ती वाहते. पांगुरिया ह्याच खोऱ्यात विंध्य पर्वतराजीतून बाहेर येणारा एक पर्वतकडा आणि नर्मदा नदी यांच्या मधल्या भागात आहे. या डोंगरांमध्ये बऱ्याचशा नैसर्गिक गुहा व निवारे आहेत. प्राचीन मानवी अस्तित्वाचे पुरावे शोधण्यासाठी ASI च्या नागपूर विभागाच्या पुरातत्त्व सर्वेक्षकांचा गट या ठिकाणी आला असतांना या शिलालेखाचा शोध लागता.

एका आडबाजूच्या खोऱ्यात कमी उंचीच्या सोंडेवर नऊ लहान-लहान स्तूपांचे अवशेष दिसल्यामुळे ते पांगुरियाकडे आकर्षित झाले. यातील सर्वात मोठा स्तूप सर्वात उंच जागी होता. त्याच्यावर पाषाणाखालील जागेत ओबडधोबड कोरलेला अशोकाचा शिलालेख होता. या लघुशिंलालेखाचा सुरुवातीचा भाग अंशतः वाचता येत होता. उरलेल्या लेखावरून असे दिसते की हा इतर लघुशिंलालेखांपेक्षा खूप वेगळा आहे. अशोकाने समवा नावाच्या राजकुमाराला उद्देशून तो लिहिला होता. समवा (संस्कृतमधे सौहार्द) हा अशोकाचा मुलगा होता की काय, ह्याबद्दल आपण फक्त क नाच करु शकतो कारण त्याचे नाव इतरत्र कुठेही सापडत नाही. ह्या राजकुमारावर पांगुरियाच्या ज्या विहार संकुललाची जबाबदारी टाकली होती तो सुरुवातीच्या विहारांपैकी एक होता ज्यात भिक्षु विहारातील खोल्यांत नाही तर दगडी गुहांमधे निवारा घेत. तरीही या जागेचे अशोकासाठी विशेष महत्त्व होते कारण या शिलालेखाच्या डावीकडे त्याच छोट्या कड्याच्या उंच कातळावर स्पष्ट मोठ्या अक्षरांचा दुसरा एक छोटा शिलालेख आहे.

शेजारच्या शिलालेखासारखा हा लेख छित्नी-हातोडा वापरून कोरलेला नाही तर छिन्नीच्या प्रहाराने कसाबसा लिहित्ता आहे. असे वाटते की दगडावर उभे राहून एका काठीला छिन्नी लावून कुणीतरी हे काम केले आहे. जरी एका बलशाली राजाच्या आज्ञेवरून

केलेला असला तरी हा नियोजनबद्ध लेख नसून सहज कोरलेली प्राफिटी आहे. हरीफा ह्या आपल्या काळातील उत्तम पुरालेखीय तज्ञानुसार हा लेख आहे--
'पियदसी नाम

राजकुमार वा

संवसमने

इमम देसम पापुनिथ

विहार्(य)ता(ये)

फा चे भाषांतर असे आहे

The king, who (now after consecration) is called Piyadassi, (once) came to this place on a pleasure tour while he was still a (ruling) prince, living together with his unwedded consort.

[ज्याला आज (राज्यारोहणानंतर) प्रियदर्शी म्हणतात तो (शासक) राजपुत्र असतांना (एकदा) येथे त्याच्या (लग्न न झालेल्या) सहचारिणीबरोबर येथे आला होता.]

विदिशा जि ह्यात सांची व आजूबाजूची इतर बौद्ध स्मारके आहेत आणि अशोकाची पहिली पत्नीदेखील येथीलच. विदिशाच्या दक्षिणेला केवळ पंचेचाळीस मैलावर पांगुरिया आहे. पांगुरियाची अशोकाची ग्राफिटी हे त्याचे एक प्रकारे अनधिकृत स्मृतिचिन्ह आहे. तरूण राजकुमार अशोक उज्जैनचा शासक असतांना, त्याच्यापासून जिला महिंद्र व संघमित्रा ही अपत्ये झाली त्या आपल्या भावी वधुबरोबर तो या भागात आला होता. सम्राटाची दुसरी मानवी बाजू दाखवणारा ही एक हृदयस्पर्शी कथा आहे.

कदाचित ब्राह्मी अक्षरांचा वापर करून आपले संदेश सर्वज्ञ पोहोचविण्याचे काम अशोकाने पांगुरियापासून सुरू केले असणे शक्य आहे. ज्या लघुशिंलालेखांपासून अशोकाने सुरूवात केत्ती त्या जवळपास सर्व शिलालेखात तो आपल्याला (जणू आपले कुतूहल्ल जाणून) सांगतो की हे काम त्याने बौद्ध धर्म स्विकारल्यानंतर अडीच वर्षांनी तीर्थयात्रेवर गेल्यावर केली. “(मी) ही घोषणा यात्रेवर असतांना केली. (त्यावेळी मी) दोनशे छप्पन्न रात्री यात्रेवर होतो.”

सर्वदूर पसरलेले आणि कर्नाटकात अकरा शिलालेखांचा समूह असलेले असे आत्तापर्यंत सोळा पूर्ण व अपूर्ण असे लघुशिंलालेख सापडले आहेत. हे सर्व ब्राह्मी लिखाणाचे (म्हणजेच प्राकृतचे देखील) सर्वांत जुने उदाहरण आहे. ही प्राकृत पालि व संस्कृतची जननी होती. अशोकाच्या शिळांवरीलल आदेशांची ही पहिली ललाट होती. जरी हे आदेश तो यात्रेवर असतांना पाठवले गेले, तरी हा तर्क योग्य वाटतो की हे मगघात व गंगेच्या खोऱ्यात कोरले गेले, उदाहरणार्थ अहुआरा व सासाराम. आणि अर्थातच फक्त

अहुंआरा, सासाराम व रूपनाथ इथलेच लघुशितलालेख अशोकाचे आदेश कसे प्रसारीत करायचे आहेत हे सांगतात. “आणि हा मजकूर पाषाणांवर कोरून घ्या. आणि (माझ्या राज्यात) जेथे पाषाणस्तंभ आहेत तेथेसुद्धा हे कोरून घ्या.” नंतरच्या लघुशितललालेखात ही आज्ञा वगळली आहे.

हे सर्व सोळा ज्ञात लघुशिंलालेख रस्ते व नदी पार करण्याच्या जागी, सघन वस्तीपासून दूर लहान ललहान टेकड्यांवर किंवा खडक-कातळांमधील गुहा किंवा दगडी निवाऱ्यांमधे आढळले आहेत. अशोकाने या जागा मुद्दामहून निवडल्या असू शकतात कारण अशा ठिकाणी वार्षिक धार्मिक यात्रा-जत्रांसाठी लोक गर्दी करतात आणि त्यामुळे स्थानिक पंथांशी बुद्ध धर्म जोडला जाणे. एक कारण हेही असू शकते की अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर सुरुवातीच्या काळात मोठ्या शहरांमध्ये एकवटलेल्या प्रस्थापित बत्ताढ्य ब्राम्हणवर्गाला सरळ आव्हान न देण्याचे घोरण ठेवले असावे. परंतु आपल्याला याबद्दल काहीच क ना नाही की अशोकानंतरच्या सत्ताधीशांनी ह्या शिलालेखांना कितपत (विध्वंसाचे) लक्ष्य केले होते. जर असा ह् 1 झाला असेल तर अधिक लोकसंख्येच्या भागातील शिलालेख किंवा स्तंभलेख आधी पाडले किंवा नष्ट केले असतील. ते स्तंभ डोळ्यात भरणारे असल्यामुळे पहिल्यांदा विध्वंसाचे लक्ष्य केले असतील. म्हणून आज आपण जे शिलालेख बघतो ते बहुतांश दुर्गम भागात (विध्वंसातून वाचलेले) आहेत.

लघुशिलालेखांच्या पहिल्या लाटेनंतर बैराट-कोलकाता शिंलालेखापासून संघमेद शित्लालेख पुढे आले. हे धर्म-अमात्यांना उद्देशून नाही तर संघाला उद्देशून होते. (घर्म-अमात्यांची बौद्ध संघावर देखरेखीसाठी नेमणूक झाली त्यावेळी सांची आणि सारनाथ येथील संघभेद शिलालेख तयार झाले.) त्यानंतर ओडिशातील धौली व जौगाडातील कलिंगचे वेगळे शिलालेख व दक्षिण कर्नाटकातील सन्नतीचे शिलालेख आले. हेही धर्म-अमात्यांच्या नेमणूकीच्या आधीचे होत. यानंतर इतर महाशित्तालेख आले ज्यांची संख्या आजपर्यंत चौदा (सापडलेले) आहेत. ते कर्नाटकपासून ते अफगाणिस्तानातील कंदाहारपर्यंत सर्वदूर पसरलेले आहेत.

स्तंभलेख असलेल्या पाच अशोकस्तंभापैकी आज केवळ एकच जवळजवळ पूर्णावस्थेत टिकून आहे. उरलेल्या अकरा किंवा संभवत: १२ स्तंभांच्या अवषेशाचे तुकडे-तुकडे फक्त शि आहेत. हे सारे स्तंभ अशोक गादीवर आल्याच्या सव्वीस वर्षांनंतर उभारते गेले. हे स्तंभलेख छातीठोकपणे केलेल्या सार्वजनिक घोषणा आहेत; कुठे डोंगरकपारीत किंवा कुठल्यातरी विहारात नव्हे तर भरपूर लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये किंवा महत्वाच्या रस्त्यांवर आणि काही ठिकाणी विहिरींशेजारी कारण तेथे लोक जमा होत असत. स्तंभलेख '७ सर्वांत शेवटी त्याच्या राज्यारोहणाच्या सत्तावीसाव्या वर्षी उभारला गेला. हा मजकूर फक्त दि "तील फिरोजशाहच्या लाटवर दिसून येतो.

या भव्यदिव्य स्तंभांपैकी सर्वांत मोठा ४६ फूट उंच आहे. त्याचे वजन ५७ टनापेक्षा अधिक आहे. शीर्ष, घंटा आणि चौथरा यामुळे त्याची उंची ६ फूटांनी वाढते आणि वजन ३ टनांनीं. ह्यांची निर्मिती हीच एक अतिशय मोठी कामगिरी आहे. याला कुशल कारागीर तर हवेच पण त्याइतकेच कुशल अभियंतेही हवेत जे त्यांना नदीतून आणि जमिनीवरून वाहून नेऊ शकतील. शिवाय स्तंभांना प्रत्यक्ष उभारणे हे ही अत्यंत कठीण काम होते. वाहतूक करण्याऱ्यांसाठी हे विशाल स्तंभ एक मोठे आव्हानच ठरले असणार. त्यामुळे आपण समजू शकतो की ते मौर्यांची मूळ भूमि असलेल्या मगधांतच अधिक प्रमाणात उभारले गेले जेथे गंगा आणि तिच्या उपनद्यांमुळे त्यांची जलमार्गाने वाहतूक करणे जास्त सोयीचे व संभव होती. सांचीच्या दक्षिणेला एकही अशोकस्तंभ सापडलेला नाही. असा दावा केला जातो की अमरावती स्तूपाजवळ असा एक स्तंभ होता जो उभारल्यानंतर लगेचच नष्ट करण्यात आला व त्याचे तुकडे इतस्त्र वापरले गेले. बौद्ध्र धर्माची शिकवण ज्यांना पाखंडी वाटत होती किंवा ज्यांना हे मूर्तिपूजेचेच प्रतिक वाटत होते त्यांच्यासाठी हे उघड लक्ष्य होते. बनारसच्या वर चुनारच्या खाणीतून किंवा कौसांबीच्या पलिकडे यमुना नदीशेजारील पभोसा खाणीतून प्रत्यक्षात असे किती स्मारकांचे दगड काढले गेले याबद्दल आपण आज फक्त क ना करू शकतो.

यातील उऊ 'खनीय गोष्ट म्हणजे सप्राट अशोकाचे शिलालेख अचानक कुठूनतरी प्रगट झाल्यासारखे पूर्ण र्पात दिसतात. असे असावे की ते सुरुवातीला खरोष्टी आणि ब्राम्ही लिपीत ताडपत्रांवर लिहिले गेले. कदाचित सिकंदराचा नौदल-प्रमुख निऑर्कस म्हणतो त्याप्रमाणे ते कापडाच्या तुकड्यांवर लिहिण्यास तक्षशिला येथून सुरुवात झाली असावी.

पर्शियन आकमिनीड व ग्रीकांच्या उदाहरणावरून अशोकाने दगडावर स्मारक लेख लिहायला सुरुवात केली. यातील अक्षरांची प्रेरणा जरी बाहेरून मिळाली असली तरी भाषा स्थानिक मागधी प्राकृत होती. कारण त्याचा संदेश साप्राज्यात सर्वदूर येथील जनतेला तसेच भावी पिढ्यांना वाचता यावा असा त्याचा हेतू होता.

धर्ममार्तंडांच्या कर्मठ विचारांचा, मूर्तीमंजकांचा आणि वादळवारा-पाऊस यांचा ह्ृ 7 सहन करीत, जवळपास २२७० वर्षांच्या चढउतारांना सामना देत ही अशोकाची गाथा आजही टिकून आहे. तरीदेखील, त्याची ही छातीठोक विधाने आणि धर्म-अशोकाबददलच्या बौद्ध्र कथा असूनही, एक माणूस म्हणून या चक्रवर्ती सम्राटाची ओळख पटलेली नाही. अज्ञात व महत्त्वहीन असा तो सम्राट एका एतिहासिक व्यक्तिमत्वापेक्षा दंतकथा बनून राहिला आहे. तो शैक्षणिक क्षेत्रातच परिचित असून त्या बाहेर सर्व जगाला अपरिचित आहे.

ही परिस्थिती खास करून प्रत्यक्ष भारतामध्येच दिसून येते. रावणाला युद्धात हरवल्यावर परत अयोध्येत्ता येऊन ज्याने भारतावर पुढीत्त अकरा हजार वर्षे आदर्श सप्राट म्हणून राज्य केले तो रामायणाचा नायक व दंतकथेतीतलत राम यावर प्रेम करणाऱ्या

भारताला सत्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. अशोकाने भारताला एकछत्री अंमलाखाली आणले; भारताचा संस्थापक पिता, राष्ट्रपिता, या बिरुदावर त्याचा खरा अधिकार आहे-- हे अशोकाबाबतचे सत्य आहे. स्वतःचा स्वतंत्र व ठाम आवाज आणि मत असलेला तो भारतातील पहिला शासक होता. गांधीजींच्या आधी तो अहिंसेचा आद्यप्रवर्तक आहे. त्याने पहिल्यांदा नैतिक विजयाचा प्रचार केला. सर्व शासकांपेक्षा त्याची राज्यकारभाराची मूल्ये निखालस निर्विवादपणे वेगळी आहेत.

त्याच्या हृदयस्पर्शी भावनांनी आशियाच्या कानाकोपर्यातत पोहचून तेथील संस्कृतीला आकार दिला. भारतात मात्र त्या भावनांची अजिबात कदर नाही. ज्या स्मारकावर या भावना कोरलेल्या आहेत त्यांना भारतीय पुरातत्त्व खात्याकडून थातुरमातूर संरक्षण दिलेले आहे.

हा एवढा भेदभाव का? केवळ अज्ञान याला जबाबदार नाही. सन १९२७ साली आपल्या तुरुंगातील कोठडीतून ब्रिटनमधे हॅरो येथे शिकलेल्या, धर्मनिरपेक्ष पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपली चौदा वर्षाची कन्या इंद्रा हिला लिहिलेल्या पत्रात सम्राट अशोक हा येशू ख्रिस्ताएवढाच ब्रिटीश राजवटीविरुद्धच्या अहिंसामय लढ्याचा प्रेरणास्त्रोत आहे असे लिहिले होते. सम्राट अशोकाप्रति असलेल्या अतीव श्रद्धेपोटीच त्यांनी आपली कन्या इंदिरा हिला प्रियदर्शनी असेही नाव दिले होते. दोन दशकानंतर नेहरू जेव्हा भारताचे अधिक आधुनिक पिता म्हणजे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान बनले तेव्हा त्यांनी नवभारताची चिन्हे म्हणून सम्राट अशोकाशी निगडीत दोन प्रतिमा निवडल्या. एक म्हणजे चोवीस आर्‍यां चे चक्र किंवा धर्मचक्र जे भारतीय तिरंगी ध्वजाच्या मध्यभागी आहे; आणि राष्ट्रीय प्रतिक म्हणून १९०४-५८ मध्ये सारनाथ येथे उत्खनन केलेले अशोककालीन स्तंभावरील सिंहमुद्रा (Lion Capital) ज्यांत चार सिंह चार धर्मचक्रांवर रक्षण करीत उभे आहेत. ते सर्व दिशांना दुमदुमणाऱ्या बुद्धाच्या सिंहगर्जनेचे प्रतिक आहे.

ह्या कार्यात नेहरूंना डो. आंबेडकरांच्या रूपात एक खंदा समर्थक मिळाला. डॉ. आंबेडकर यांनाही आपल्या ह्या कार्याचा अभिमान होता. सन १९५४ ला रंगून (यंगो) येथे भरलेल्या तिसर्‍याआ जागतिक बौद्ध संमेलनात “डा. बाबासाहेब आंबेडकरांनी जाहीर केले की भारतीय संविधानेचे जनक म्हणून त्यांनी अनेक बाबींमधे यश मिळवले होते... ... भारताचे चिन्ह म्हणून अशोकचक्र... ... त्यांनी अभिमानाने सांगितले की हे सारे करतांना त्यांनी लोकसभेत इतके अर्थपूर्ण व परिणामकारक भाषण केले की कुणीही विरोध केला नाही.” (Dr Babasaheb Ambedkar: Life and Mission, Dhananjay Keer 481-2)

हे राष्ट्रीय प्रतिक निवडायचे प्रमुख कारण म्हणजे नवीन धर्मनिरपेक्ष भारतात, कुठल्याही विशिष्ट धर्मपरंपरेशी हे प्रतिक निगडीत नव्हते. प्रकाशक आणि पत्रकार गीता मेहता लिहितात, “जेव्हा आम्ही लहान होतो तेव्हां आम्हाला आमचे पालक नेहमी सांगायचे की ही २३०० वर्षांची जुनी प्रतिके केवळ पुरातन वस्तु म्हणून स्विकारलेली नाहीत तर

देशाचे शासन सदैव न्यायपूर्ण आणि नैतिक असावे अशी प्रेरणा मिळण्यासाठी स्वीकारले आहे.” अशोकाच्या नावाबरोबर “एक थोर जेता जो पुढे थोर मार्गदर्शक बनला? ही एक रोमहर्षक बाब आहे. मेहता लिहितात-

जेता म्हणून आपल्या कर्तृत्वाच्या अत्युच्च शिखरावर असतानाच सम्राट अशोकाने अहिंसेचे तत्व आपलेसे केले व जाहीर केले की युद्धाच्या शंखध्वनीच्या ठिकाणी आता धर्मध्वनी ऐकू येईल.

अशोकानंतर अडीच हजार वर्षांनी महात्मा गांधींनी ब्रिटीशांना भारतातून हुसकून देण्यासाठी अहिंसेचा शस्त्र म्हणून उपयोग केला तेव्हा हा धर्मध्वनी परत ऐकू आत्ता. स्वतंत्र भारताने अशोकाच्या धर्मचक्राला राष्ट्रीय ध्वजाच्या मध्यभागी मानाचे स्थान दिले. अशोक स्तंभावरील चार दिशांकडे तोंड करून असलेले चार सिंह धर्माचे शांतिपूर्ण ऐक्य दर्शवतात. शासन कसे असावे याची सातत्याने आठवण करून देणारे हे चिन्ह स्वतंत्र भारताचे राष्ट्रीय प्रतिक असेल.

नेहरूंनी ह्या दोन अशोकचिन्हांची केलेली ही निवड महात्मा गांधींच्या विचारसरणीला एकप्रकारे मुद्दाम दिलेला शह होता. महात्मा गांधीच्या मनातील स्वतंत्र भारत नेहरूंच्या विचारापेक्षा खूप वेगळा होता. गांधीच्या मनात रामराज्य होते ज्यानुसार भारत परत एकदा दंतकथेतीतल हिंदू सुवर्णयुगाच्या रामराज्यात जाणार होता व येथील जनजीवन चरखा, बेत्तगाडी, गावातील विहीरी, वरिष्ठांच्या स्थानिक पंचायती याभोवती फिरेल अशी अपेक्षा होती. शासन कल्याणकारी पण टूर, फारसा हस्तक्षेप न करणारे असेल. पाळे-मुळे परंपरागतच असतील परंतु तरीही जातीभेद आणि स्त्री-पुरुष भेदभाव नसेल. नेहरूंसाठी ही एक रप्य परंतु अवास्तव क ना होती. त्यांना भारत धार्मिक व जातीभेदाच्या रोगातून मुक्त झालेत्ता हवा होता कारण त्यामुळे भारत आधुनिक जगात मागे पडत होता. हे फक्त कणखर धर्मनिरपेक्ष आणि मध्यवती सरकारच करू शकले असते. अशोककालीन भारतात त्यांना तसे आदर्श उदाहरण मिळाले.

काहीही असो. एका हिंदू अतिरेक्याने बिर्ला हाऊस, नवी दि) येथे ३० जानेवारी, १९४८ तल्ला गांधींची हत्या केली. अशा प्रकारे नेहरूंचे इंड आणि गांधींचे स्वप्न संपले. आणि मग धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक भारताच्या पहिल्या आदर्शवादी दशकांमधे अशोक हा परवलीचा शब्द झाला. त्याचे एक प्रतिक म्हणजे भारतभरातील सरकारी होटेलांमधीत्त एक आदर्श म्हणून नवी दि हत अशोक नावाचे प्रचंड चार-तारांकीत होटेत्त बांधण्यात आले. गिरनार पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या चौदा शिलालेखांचा ठसा घेण्यात आला व त्याची कांस्य प्रतिकृती नवी दि हतील जयसिंह वेधशाळेत ठेवण्यात आली. अनेक मुलांचे नाव अशोक ठेवले गेले-- बौद्ध संदर्भामुळे नाही तर 'शोक नसलेला? असा अर्थ कालानुरुप घेतला गेल्यामुळे. याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे ज्याचे शि कार दलित समाजातून आलेले कायदामंत्री डॉ. भीमराव रामजी आंबेडकर होते ते सर्व प्रकारचा जातीभेद बेकायदा ठरवून;

विश्वास, श्रद्धा व उपासना यांच्या स्वातंत्र्याबरोबर अनेक प्रकारचे व्यक्तीस्वातंत्य नागरिकांना देणारे भारताचे नवीन संविधान २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी स्वीकारले गेले होते.

परंतु दु:खद बाब म्हणजे हे आदर्शवादी विचार विरोधकांना पटले नाही-- यामध्ये खास कर्न काही अ संख्य आंदोलक आणि राष्ट्रीयत्वाचा मिथ्या गर्व बाळगणारे हिंदुत्वाचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या दृष्टीने चांगला भारतीय म्हणजे हिंदू भारतीय असा होता. भारतीय मुस्लीम तसेच काही अंशी ख्रिश्चन, पारसी व आता राजकीय जागूती होऊ लागलेले दलित यांना अप्रत्यक्ष लक्ष्य करण्याचा हा प्रकार होता. प्रचंड भ्रमनिरास झालेल्या डॉ. आंबेडकरांनी आपल्या मृत्युच्या केवळ सहा आठवडे आधी डिसेंबर १९५६ मध्ये हजारो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यांचे म्हणणे होते की जातीमेद भारतीय समाजात खोलवर रुजलेला आहे आणि भारतातील दलित हे पूर्वाश्रमीचे बौद्धच आहेत ज्यांना पूर्वी समाजातून बहिष्कृत केलेले होते. आज भारतीय लोकसंख्येत पंचवीस टक्केज असलेले दलित एक राजकीय शक्ती म्हणून उद्याला आले आहेत जे भारतातील परंपरागत ब्राम्हण-क्षजिय यांच्या अधिकास्शाहीला आव्हानच नाही तर धक्काही देत आहे.

हिंदुत्व चळवळीच्या विचारसरणीचा एक महत्वाचा स्तंभ म्हणजे ते 'आर्यांचे आक्रमण पूर्णपणे नाकारतात. त्यांच्या मते भारतीय संस्कृतीची जडण-घडण पूर्णपणे येथील मातीतूनच झाली आणि त्यावर बाहेरचा कुठलाही प्रभाव नव्हता. परंतु ह्या नकारात कधी कधी बौद्ध धर्म आणि सम्राट अशोकही येतो ज्याला ब्राह्मणवादाचा अव्हेर केल्यामुळे काही लोक अभारतीयच समजतात. सत्य तर हे आहे की त्याने त्याच्या शिलालेखात व स्तंभलेखात ज्या धर्माची व्याख्या केली त्यांचा आधार जितका बौद्ध होता तितकाच हिंदू व जैन ही होता.

सन १९९० च्या शेवटी हिंदुत्ववाद्यांचे मुख्य लक्ष्य इतिहासतज्ञ प्राध्यापिका रोमित्ता थापर या होत्या. स्वातंत्र्यानंतर शालेय अभ्यासक्रमातील प्राचीन भारतीय इतिहास बदलण्यात आला. थापर यांच्या लक्षात आले की आपल्या मूळ लिखाणात बदत्त करून खऱ्या इतिहासाच्या जागी इतिहासाची हिंदुत्ववादी आवृत्ती टाकण्यात आलेली आहे. थापर यांनी त्याला केलेल्या विरोधामुळे त्यांच्यावर हिंदू-विरोधी असा आरोप करण्यात आला आणि पुढे २००३ साली त्यांनी यु. एस्. लायब्ररी ऑफ कांग्रेस येथील पदभार स्वीकारल्यावर त्यांनी राष्ट्रद्रोह केल्याचा आरोपही लादत्ता गेला. यातील दुहेरी परस्परविरोध असा की थापरांवर आरोप करणाऱ्यांना ह्या गोष्टीची जाणीव नव्हती की त्यांनी ज्याच्याबइल लिहिले तो सप्राट्देखील सुरुवातीला हिंदुत्ववादाचा बळी ठरता होता. परंतु सुदैवाने आता ही लाट ओसरलेली दिसते. कुतर्काच्या आवाजाला आता श्रोते मिळत नाही असे वाटते.

दरम्यान अशोकाचा शोध अजूनही सुरूच आहे. जवळ-जवळ प्रत्येक वर्षी या जिग-सो कोड्यातील नवीन माहिती देणारी काहीतरी नवीन गोष्ट सापडते आहे. सन १९८२ साली ASI च्या नागपूर विभागाचे अधिक्षक डॉ. पी. के. मिश्रा यांनी अलाहाबाद-रेवा महामार्गाजवळ देवरकोठार येथे एक विहारांचा समूह नव्याने शोधून काढला. हे विहार भारहूत आणि सांची स्तूपाच्याही आधीचे आहेत. डॉ. मिश्रांनी १९९९ ते २००० साली केलेल्या उत्खननातून असे दिसले की या दोन स्तूपांभोवती एक साधे दगडी कुंपण होते. कदाचित हे लाकडापासून दगडी बांधकामाकडे झालेले स्थित्यंतर दर्शवते. मिश्रांच्या मते तेथील घासून गुळगुळीत केलेला 'शीर्षाखालील पट्टीत चक्र असलेला इ. पू. तिसर्या० शतकातील अशोकालीन' प्रचंड स्तंभ हा सर्वात मोठा शोध होता. त्याचे पन्नासपेक्षा जास्त तुकडे कुंपणाशेजारी पडले होते. त्या कुंपणाचेही छोटे-छोटे तुकडे झाले होते. सर्वत्र *पद्धतशीर विध्वंस' दिसत होता. मिश्रांच्या मते हा इ. पू. दुसर्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात केला गेला होता.

स्तंभाचे तुकडे जोडल्यानंतर त्यावरील सहा ओळींचा ब्राह्मी लेख ओळखता आला. हा स्तंभ भगवान बुद्धाला समर्पित केलेला होता. तो अशोक मौर्याने नाही तर मथुरेच्या स्थविर उपगुप्ताने व त्याच्या अनुयायांनी उभारला होता. जर खरेच असे लिहिले असेल--कारण काहींनी खरेच ते उपगुप्ताचे नाव आहे यावर शंका घेतली आहे--तर अशोकावदान व ह्युएन-त्संगच्या या मताला बळ मिळते की सर्वास्तिवादाचा अशोककालीन प्रमुख उपगुप्त याने अशोकाला बौद्ध धर्मात आणले व पुढे त्याला मार्गदर्शन केले.

देवस्कोठार येथील पद्धतशीर विध्वंस याला दुजोरा देतो की ब्राह्मण सेनापति पुष्यमित्र शुंग याने मौर्य घराण्याचा हिंसक अंत केला आणि त्यानंतर तो बौद्ध स्थळांचा नाश करायला निघाला. अर्थात हे लक्षात ठेवायत्ता हवे की भूकंप व अपघाती आगींही हे चेहराहीन शि व तोडलेले स्तंभ यांना कारणीभूत असतील. देषभावनेतून नाही तर जे सापडले त्याचा जमेल तसा उपयोग करायच्या मानवी क क वृत्तीमुळे कदाचित अशोकस्तंभांचे शिवलिंग, बौद्ध मूर्तींच्या हिंदू देवता म्हणून रूपांतर केले असेत आणि बौद्ध स्मारकांवर हिंदू मंदिरे उभारली असतील.

सध्या अशोक-अभ्यासातील सर्वात उत्साहजनक उत्खनन उत्तर ओडिशा व लांगुडी डोंगरात चालू आहे. येथे पुष्पगिरीच्या महाविहाराचे अवशेष सापडले आहेत. येथे ह्युएन-त्संग याने एक वर्ष अध्ययन व अध्यापन केले होते. हे अवशेष तीन जवळ- जवळच्या डोंगरावर विखुरत्तले आहेत. एका टेकडीवर इ. पू. तिसऱ्या शतकातील एक विटांचा साधा स्तूप व त्याच्याभोवतीचे सव्वीस कुंपणाचे साधे खांब दिसून येतात. याच्या जवळच दगडात कोरलेल्या हत्तीचे शि आहे. याची ठेवण आणि कालावधी मार्खम किट्टोने शोधलेल्या धौतली शित्तालेखाच्या शेजारील हत्तीप्रमाणेच आहे.

सन २००० - २००१ च्या हिवाळ्यात ओडिशात राज्य पुरातत्त्व विभागाचे वस्तुसंग्रहालय प्रमुख डी. आर. प्रधान यांच्या नेतृत्वखालीतत पथकाने लांगुडी येथे दोन दगडी शिं ' शोधून काढली. या दोन्ही ब्राम्ही लिपीतील शिलालेखामध्ये अशोकाच्या नावाचा उऊ 'ख आहे. ही गोष्ट भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांना खूप उ सित करणारी आहे. यातील छोट्या शिलालेखावर लांब केस गोलाकार पद्धतीने मस्तकावर बांधलेली व कानात मोठी कर्णभूषणे असलेली, तसेच धड असलेली मनुष्याकृती आहे. कोलकाता विदयापीठाचे बी.एन. मुखर्जी यांच्यानुसार या शिंलालेखावर "छी (श्री) कारेन रांजा अशोखेमा" असे वाक्य आहे. कारेन याचा अर्थ देणे ज्यावरून हे शि अशोक नावाच्या दात्याची प्रतिमा आहे असे दिसते.

दुसरा शिलालेख थोडासा मोठा आहे. त्याची रुंदी २० इंच आहे. त्यावर सिंहासनावर बसलेले माणूस असून त्याच्या दोन्ही बाजूत्ता दोन राण्या किंवा दासी आहेत. तो दोन्ही पाय एकमेकांवर ठेवून बसलेला आहे. त्याचे दोन्ही हात गुडघ्यावर ठेवलेले आहेत. त्याने पगडी आणि लोंबती कर्णभूषणे घातलेली असून त्याच्या हातात मनगटापासून कोपऱ्यापर्यंत अनेक कंकणे आहेत. ओळ थोडी मोठी आहे-

अमा उपासका अशोकस समचियमाना

अग्र एक स्तूप

प्रो. मुखर्जी यांनी केलेले त्याचे तात्पुरते भाषांतर असे--


श्रद्धाळू उपासक अशोक धार्मिक ओढीपोटी या महत्वाच्या स्तूपाच्या बांधकामाशी जोडलेला आहे.

अशोकाच्या उ 'ख उपासक असा असल्यामुळे ह्याचा काळखंड कलिंगावरील स्वारीच्या आसपास इ. पू. २६५ -२६३ असावा.

अशा रितीने या हरवलेल्या सम्राटाची गोष्ट हळूहळू उतलगडत चालली आहे.




जॉन मार्शल व त्याची पत्नी राजगीर, बिहार येथे सन १९१८ मधे, एका स्तूपावशेषाच्या ढिगाऱ्याच्या उतारावर बसलेले असतांना. (APAC, British Library)




दुरुस्तीच्या वेळी चुकीची जोडणी केलेल्या तोरणावरील मधली आडवी पट्टी. यात रामग्रामच्या बुद्धाच्या स्तूपातील अस्थि अवशेष ताब्यात घेण्यासाठी निघालेला (उजवीकडे) सम्राट अशोक रथात उभा दिसतो. पण नाग राजांनी त्याला


रामग्रामच्या स्तूपाला हात लावू दिला नाही. (अँन्ड व्हिटमोरने घेतलेले छायाचित्र)




सांचीच्या दक्षिंण तोरणाच्या वरील आडव्या शिळांपैकी खालच्या शिळापट्टीचे फ्रेड मैसीने चित्र काढले. त्या चित्राचा एक भाग ज्यात राजगीर येथील बुद्धाचे अस्थि अवशेष एका महाकाय हत्तीवर बसून सम्राट अशोक घेऊन जातांना दिसतो. (Maisey, *Sanchi and its Remains*, 1892)



सम्राट अशोक बोधिवृक्षाच्या दर्शनाने (भावनावेगाने) भोवळ येऊन पडतो व राण्या त्याला सांभाळतात. ह्या आधुनिक छायाचित्रात हा बारकावा स्पष्ट दिसतो जो आधीच्या चित्रांत निसटला होता. (अँन्ड्रू व्हिटमोरने घेतलेले छायाचित्र)




सांचीच्या पूर्व तोरणाच्या वरील आडव्या शिळांपैकी खालच्या शिळापट्टीच्या बाहेरील बाजूस सम्राट अशोक (उभा) त्याच्या राणीसह (गुडघ्यावर बसलेली) हत्तीवरून उतरून बोधिवृक्षाला वंदन करतांना. या पट्टीत डावीकडे संगीतकार वाद्ये वाजवतांना तर बोधिंवृक्षाला जिवंत करण्यासाठी दुधाचे घडे वृक्षावर टाकले जात असतांना भालदार-चोपदार उभे दिसतात. बोधिवृक्ष व वज्रासन अशोकाने बांधलेल्या छत्रीच्या (शामियान्याच्या) आत दिसतात. या पट्टीच्या वरील तीन आधारशिंळांवर अशोकानी निर्मिलेली वा वापरलेली तीन प्रतिके आहेत. (डावीकडून) सिंहशीर्ष असलेला स्तंभलेख, धर्मचक्र आणि बोधिंवृक्ष.
(अँन्डू व्हिटमोरने घेतलेल्या छायाचित्रातील बारकावा)




लंगुडी येथील शिळेत कोरलेला हत्ती. हा धौली येथील अशोकाच्या शिलालेखाजवळील हत्तीसारखाच व त्याच काळातला आहे. हा हत्ती प्राचीन कलिंगमधील चिनी प्रवासी ह्युएन-त्संगने सातव्या शतकात भेट दिलेल्या पुष्पगिरीच्या महाविहाराच्या उत्खननात सापडला. हे उत्खनन २०११ मधे चालू होते. (American Committee of South Asian Arts च्या सौजन्याने)

१६. अशोक धर्माचा उदय आणि अस्त



भारहूतच्या पूर्व प्रवेशद्वाराच्या स्तंभावरील आत्तापर्यंत दुर्लक्षित बारकावा. ह्यात बुद्धाचे धातू-अवशेष असलेले पात्र घेतलेला एक राजा हत्तीवर बसलेला आहे. सोबतचे दानपत्र हे चापा देवी -- विदिशाच्या रेवती देवची पत्नी--चे दान असल्याचे सांगते. विदिशा हे अशोकाच्या पहिल्या पत्नीचे गाव होते. (बेनॉय के. बहल यांच्या सौजन्याने)





अशोकाचा कायापालट. सांचीला (डावीकडे) सम्राट एक अशक्त व बेडौल माणूस आहे. दोन शतकांनी अमरावतीत (उजवीकडे) तो एक चक्रवर्ती राजा-पृथ्वीवरील बौद्ध धर्माचे परिपूर्ण रूप--झालेला आहे. (Andrew Whitmore / British Museum)

अशोकाच्या कथेची सुरुवात त्याच्या आजोबापासून आणि त्याला मगधाच्या गादीवर बसवणारा ब्राम्हण चाणक्य (ज्याला कौटील्य म्हणजे 'कावळ्याप्रमाणे' असे म्हटले जायचे) याच्यापासून होते. चाणक्य तक्षशिलेतून प्रशिक्षित झाला होता. तक्षशिला हे सायरसच्यावेळी आक्मिनीड राजवटीखाली आले होते आणि इ. पू. चौथ्या शतकात ते विधेचे प्रमुख केंद्र बनले होते. याठिकाणी भारताच्या सर्व भागांतून उच्चवर्णीय तरुण येत असत-- ब्राह्मण न्यायशास्त्र, वैद्यकशास्त्र, सामरिकशास्त्र तर क्षजिय युद्धकला शिकण्यासाठी येत होते. परंतु तक्षशिला हे वेगवेगळ्या संस्कृतींच्या देवाणघेवाणीचेही केंद्र होते. येथे लोक वस्तू व विचार दोहोंची देवाणघेवाण करत. चाणक्य व सुरुवातीच्या मौर्य शासकांवरील विविध प्रभाव लक्षात घेता हा अत्यंत महत्वाचा घटक होता.

चाणक्याच्या तक्षशिला येथील शिक्षकांपैकी वैयाकरणी पाणिनी एक असावा, ज्याने अभिजात संस्कृतचे व्याकरण लिहिले. तरीसुद्धा पाणिनी आणि त्याच्या सहकाऱ्यांना आपले विचार मांडण्यासाठी केवळ आर्माईक भाषा उपलब्ध होती. ते उत्तर भारतातील प्राकृत बोलीभाषेंसाठी अयोग्य माध्यम होते. यामुळे आपल्याकडे या तोडीचे किंवा याहूनही चांगले माध्यम का नसावे हा विचार करणे त्यांना भाग पडले. यासाठी (योग्य भाषा व लिपी यांचा वापर सुरू करण्यासाठी) जो परंपरेत्ता आव्हान देऊ शकेल इतका बलशाली आणि चांगला स़ 1 ऐकण्याची क्षमता असलेता राजा आवश्यक होता.

सिकंदर तक्षिशिलेला येण्याच्या दोन दशके आधी चाणक्य त्या ठिकाणी शिकण्यासाठी गेलेत्ता होता. त्यानंतर पाणिनीचे उदाहरण समोर ठेवून त्याने पूर्वेकडे पाटलिपुत्राला प्रयाण केले आणि तो राजा धनानंदाच्या दरबारात हजर झाला. परंतु त्याचे हे पाऊल इतके फसले की त्याला जीव वाचवण्यासाठी तेथून परागंदा व्हावे लागले. अज्ञातवासाच्या काळात त्याला आधी आजीविकांनी मदत केली आणि नंतर जैनांनी त्याला अर्थसहाय्य केले. त्याने पुढे अशा उमेदवाराचा शोध सुरु केला “ज्याचा राजगादीवर जन्मसिद्ध हक्कय असेल”. हा शोध त्याला बाल चंद्रगुप्तापर्यंत घेऊन गेला.

पण चंद्रगुप्त कोण होता? हा राजा धननंदाला त्याच्यासारख्याच खालच्या जातीतील राणी मुरा हिच्यापासून झालेला मुत्तगा, जो मोर सांभाळणाऱ्यांचा नातू होता? की तो पूर्व मगधातील चंपारण्यात येऊन राहिलेल्या शाक्यांचा क्षजिय वंशज होता? की तो मोरियनाग (मयूर पर्वत) या डोंगरातील वस्तीच्या प्रामप्रमुखाचा मुलगा होता? यातील तिसरा पर्याय अधिक समपर्क वाटतो. मयूर हे मौर्य जमातीचे कुलचिन्ह असावे आणि मौर्यांचे मूळ हे बहुधा मेर डोंगर किंवा भारताच्या वायव्य (उत्तर-पश्चिम) सीमेवरील मेरू पर्वतात असावे ज्यात उत्तुंग मेर-कोह किंवा महाबनचा पर्वत जो सिकंदराचा एओर्नस आहे. त्यावरून महाबनचे प्रवेशद्वार असलेल्या शहाबाझगढी आणि मनसेहरा या दोन ठिकाणी अशोकाने आपले दोन महत्वाचे शिलालेख कोरून घेतले ह्याचे स्पष्टीकरण होते. याचा अर्थ असा की चंद्रगुप्त हा ग्रीकांनी वर्णिलेल्या चंद्रवंशी घराण्यातील घोडेस्वारांपैकी होता ज्यांनी सिकंदराकडे युद्धजीवी घोडेस्वार म्हणून काम केले होते.

त्याच्या आईने त्याला गुराख्यांकडे सांभाळायला ठेवले यावरून चंद्रगुप्त हा वैश्य जातीचा घोडेस्वार होता ह्या तर्काला बळ मिळते. तेथेच चाणक्याची नजर त्याच्यावर गेली आणि ज्याप्रमाणे ॲसिस्टाट्लने तरुण मॅसिडोनियन सिकंदरत्ता शिकवले त्याचप्रमाणे चाणक्य चंद्रगुप्ताला राजा म्हणून घडवू लागता. हा एक मोठा योगायोग आहे की प्राचीन जगातील दोन सर्वांत बलाढ्य माणसांना जवळपास एकाच कालावधीत तत्कालीन प्राचीन जगातील दोन सर्वश्रेष्ठ विचारवंतांनी प्रशिक्षण दिले. परंतु सिकंदरने लवकरच असिस्टाटतच्या नीतिमूल्यांना तित्ांजली दिली. याउलट चंद्रगुप्ताने मगधाच्या राजगादीचा त्याग करून जैन संन्यासी होईपर्यंत आपल्यया गुख्ला कधीही सोडले नाही. असे दिसते की चाणक्य एखाद्या जळूसारखा चंद्रगुप्ताला चिटकून राहित्ता. चंद्रगुप्त भारतातील तोपर्यंतचा सर्वांत शक्तिमान सम्राट होईपर्यंत तो त्याला मार्गदर्शन करीत राहिला; तसेच सत्तेचा मद शिष्याच्या डोक्यात शिरू नये म्हणून संयमी प्रभाव टाकत राहिला.

भारतात उपलब्ध असलेल्या सर्व दस्तऐवजांचे याबाबत एकमत आहे की चाणक्याने शेवट्च्या नंदाची गादी उत्लथवून चांद्रवंशीय चंद्रगुप्ताला तेथे बसवले. ग्रीक स्त्रोत एवढेच सांगतात की चंद्रगुप्ताने युद्ध करत-करत सर्वोच्च सत्ता काबीज केली. सुरुवातीला त्याने आपल्या ग्रीक धन्यांविर्दध युद्धजीवी सैनिकांचे नेतृत्व केले. परंतु हे चाणक्याच्या मार्गदर्शनाखाली घडले असावे अशी दाट शक्यवता आहे. त्यानंतर

चाणक्याला 'अर्थशास्त्र' हे पुस्तक लिहिण्याइतका आत्मविश्वास आतला यावरून असे दिसते की हे त्याने चंद्रगुप्ताला घडवतांना आणि नंतर मार्गदर्शन करताना आलेल्या अनुभवाच्या आधारावरच राज्यकर्त्यांसाठी हे एक प्रकारचे पाठ्यपुस्तक लिहिले. चाणक्याने दिलेल्या प्रशिक्षणाचे आणि लिहिलेल्या प्रंथाचेही मूळ तक्षशिला येथील त्याच्या विद्यालयात होते.

चंद्रगुप्ताचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्याने कुमारवयातच युद्धजीवी घोडदळाच्या पथकाचे नेतृत्व मिळवले. सर्वप्रथम त्याने आपली सेवा बॅक्ट्रियाचा सरदार बेसोस याला देऊ केली. मात्र त्यानंतर सिकंदराचे आक्रमण झाले तेव्हा त्याने पक्ष बदलत्ता आणि तो सिकंदराला सामील झाला. ग्रीकांनी दिलेल्या माहितीनुसार चंद्रगुप्त कुमारवयातच सर्वप्रथम सिकंदरात्ा भेटला. परंतु या गोष्टीवर विश्वास बसत नाही की एवढा अनुभवी योद्धा सतरा वर्षांपेक्षाही कमी वयाचा होता. त्यावरून त्याची जन्मतारीख इ. पू. ३४३ च्या आसपास येते. आणि त्यावरून तो सिकंदरपेक्षा तेरा वर्षांनी लहान आहे असे दिसते.

सिकंदर त्याला सिसिकोट्टोस - चांद्रवंशीय शशिंगुप्त -- भारतीय घोडदळाचा युद्धजीवी प्रमुख म्हणून ओळखत असे. आणि शशिंगुप्त म्हणून तरुण चंद्रगुप्ताने स्वतःच्या पहाडी लोकांना जिंकण्यात सिकंदराला मोलाची मदत केली. त्याने आपली मातृभूमी ग्रीकांना जिंकवून दिली आणि त्या बदल्यात एओर्नसची (महाबन) कि दारी मिळवळी. मेरोज (पहाडी माणूस) म्हणून राजा पोरस यातला सिकंद्राकडे आणून चंद्रगुप्त सिकंदराच्या विश्वासाला पात्र झाला.

सिकंदर व त्याचे सैन्य सिंधूवर्न खाली जाईपर्यंत तो शांत राहिला. परंतु सिकंदरने नेमलेल्या शासक फिलीपोसच्या खुनाच्या कटात त्याचा महत्वाचा सहभाग होता असे दिसते. युडेमांस शासक म्हणून येईपर्यंत चंद्रगुप्ताने स्थानिक टोळ्यांशी हातमिळवणी करून व हिमवतकुट (काश्मीर) येथील राजा पर्वतक याच्याबरोबरीने संयुक्त सेना उभी केली होती.

ग्रीक स्त्रोत सांगतात की ग्रीकांनी येथून इ. पू. ३१७ मध्ये संपूर्ण माघार घेतली परंतु येथील पुराव्यांवरून असे दिसते की सिंधुच्या पूर्वेकडीत्त सारा भूभाग सिकंदरच्या मृत्यूनंतर इ. पू. ३२३ मध्ये त्यांच्या हातातून गेलेत्ता होता. यावेळेला चंद्रगुप्ताचे वय बावीसपेक्षा जास्त नव्हते. लाक्षणिक अर्थाने त्याच्या स्थाचे सारथ्य चाणक्य करीत होता. त्याने धननंदावर विद्युतगतीने ह 1 चढवून त्याचा पराभव करायचा प्रयत्न केला व त्यात तो साफ पराभूत झाला. गरम भाकरीचा फक्त मधला भाग खाऊन उरलेला भाग फेकून देणाऱ्या मुलाला त्याची आई रागावते आणि पराभवाने हतप्रभ झालेला चंद्रगुप्त ते ऐकतो ही जी लोकप्रिय कथा आहे ती यानंतरची. भाकरीचा संबंध असो किंवा नसो, चंद्रगुप्त आणि चाणक्य यांनी सरळ युद्ध टाळले नि राजनीतिचा मार्ग अवलंबला. चंद्रगुप्ताच्या साथीला आलेल्या लोकांची जी यादी मुद्राराक्षसात दिलेली आहे - यवन (ग्रीक), शक, गांधास्चे कंबोज व

किरात (नेपाळी किंवा काश्मीरी)--ते सर्व भारताच्या वायव्येकडील (उत्तर-पश्चिम) किंवा त्याही पलिकडचे होते. यामुळे चंद्रगुप्ताची मातृभूमी तिकडचीच ह्या मताला अधिक पुष्टी मिळते.

धननंदाच्या पराभवानंतर चंद्रगुप्त आणि त्याचा महत्वाचा जोडीदार पर्वतक हे उत्तर भारतातील निर्विवाद शासक बनले. दोघांनी हा विजय नंदराजाच्या मुलींशी लग्न करन साजरा केला, परंतु पर्वतकाला पुढे विष देऊन मारले गेले. जिशष्टीशतताकापुरूष या ग्रंथात आचार्य हेमचंद्रांनी लिहिल्याप्रमाणे "हिमातयी राजा मेल्यानंतर सारे साप्राज्य जसच्या तसे चंद्रगुप्ताकडे आले. अशा प्रकारे श्री महावीरांच्या मुक्तीनंतर (मृत्युनंतर) १५५ वर्षांनी चंद्रगुप्त सप्राट झाला".

जैनांच्या मान्यतेप्रमाणे महावीराचा मृत्यू इ. पू. ५२७ मध्ये झाला परंतु विद्वानांच्या म्हणण्यानुसार ही तारीख अर्धा शतक तरी मागे आहे. अभ्यासकांच्या मते चंद्रगुप्त मगधच्या गादीवर इ. पू. ३२२ मध्ये बसला. आपल्या त्वरेने सत्तेवर येण्याच्या सौमाम्यामुळे त्याने पियदसी हे बिरूद वापरायला सुरूवात केली.

पर्वतकाच्या मृत्यूनंतर चंद्रगुप्त हा उत्तर भारताचा विशाल सेना असलेला सार्वभौम सम्राट बनला. उत्तरेकडीत्त मृत सहकाऱ्यांच्या प्रदेशावर त्याने कबजा केला आणि दक्षिणेकडे विंध्य पर्वताच्या पलिकडची राज्ये तो जिंकत गेला. शेवटी आजच्या कर्नाटकाच्या अलिकडे तो थांबला. पुढे या प्रदेशातच तो निवृत्त झाला व मृत्यु पावला.

चंद्रगुप्ताच्या चोवीस वर्षाच्या राजवटीमध्ये त्याचे सैन्य अजिंक्य ठरले होते. सिकंदरानंतर गमावलेत्ता सिंधूच्या पूर्वेकडील (तत्कालिन) ग्रीक साप्राज्याचा भूभाग परत मिळवण्याच्या उद्देशाने बॅबिलीन व पर्शियाचा नवीन राजा सेल्युकस निकेटरने इ. पू. 3०५ च्या सुमारास ह् 1 केला तेव्हा चंद्रगुप्ताने तो सहज परतवून लावला आणि नंतर त्याचा पाठलाग करत त्याने सिंधुच्या पलिकडे आणि सेल्युकसच्या राज्यात खोलवर मुसंडी मारती. मात्र चंद्रगुप्त सूज्ञपणे तेथेच थांबला. त्यासाठी त्याला चाणक्याचा स 1 मिळाला असावा. अर्थशास्त्रामध्ये शक्तिशाली शजूता कसे तोंड द्यावे आणि शांततेच्या प्रस्तावाला कसे उत्तर द्यावे यावर एक संपूर्ण प्रकरण आहे. या युद्धाचा परिणाम काहीशा 'एकपक्षी करारात झाला. सेल्युकसने हिंदुकूश पर्वताच्या दक्षिणेचा गांधार सोडून दिला. यात आजचे काबूत, गझनी, कंदाहार, हेरात आणि बलुचिस्तान समाविष्ट होते. याबदल्यात ५०० लढाऊ हत्ती आणि त्यांचे माहुत एका हिशेबी मैत्रीपोटी चंद्रगुप्ताने सेल्युकसला दिले. असे पुरावे दिसतात हे की हे भेट दिलेले हत्ती वृद्ध होते. असे असले तरी हे हत्ती त्याच्या सेनेत आल्यामुळे सेल्युकसत्ता इतर उत्तराधिकाऱ्यांशी झालेल्या लढायांमध्ये मोठे बळ मिळाले.

कमीत कमी चारशे भारतीय हत्तींनी इ. पू. ३०१९ मधील इप्ससच्या लढाईत भाग घेतत्ा आणि त्यामुळे सिकंदराचे साप्राज्य टॉलेमी, लिसिमॅकस आणि सेल्युकस यांच्यामध्ये विभागले गेले.

या करारातील तिसरे कलम लग्नाचे होते. सेल्युकसने इ. पू. ३२२ मधे पर्शियन राजकुमारीशी सुसा येथे लग्न केले होते. त्या लग्नानंतर त्यातला दोन मुली झाल्या होत्या. त्यांचे इ. पू. ३०४ मधे लग्नाचे वय झाले असावे आणि तेव्हा चंद्रगुप्त ४० वर्षांचा असेल. सिकंदरच्या परंपरेचा हा संबंध होता. पण पती सम्राट असता तरी अशा ततप्रामधून झालेल्या मुत्तांना भारतात शूद्र आणि राजगादीसाठी अयोग्यच समजले गेले असते. तरीदेखील या ग्रीको-पर्शियन राणीचा आणि तिच्या लवाजम्याचा पाटलिपुत्रावर मोठा प्रभाव पडला असणारच.

एकं यशस्वी राजा म्हणून चंद्रगुप्ताच्या अनेक बायका होत्या. त्यातील पहिली म्हणजे धननंदाच्या मुलीशी झालेले लग्न प्रतिष्ठेचे होते. या बायकांमध्ये केवळ एकीचेच नाव माहीत आहे. ती म्हणजे त्याची मामेबहीण थुर्दरा जिचा मुलगा बिंदुसार पुढे सग्राट बनला. ती महावंसातल्या एका विचित्र कथेची दुर्दैवी नायिका आहे-- गर्भारपणाच्या शेवटच्या अवस्थेत तिने विष प्राशन केले त्यामुळे चाणक्याने तिचे शीर कापले आणि 'पोट कापून भ्रूणावस्थेतील बिंदुसाराला बाहेर काढले. त्या अकालजात बालकाला थोडी शक्ती येईपर्यंत कापलेल्या बकऱ्यांच्या ताज्या कातड्यात गुंडाळून ठेवले. म्हणून या मुलाचे नाव बिंदुसार म्हणजे स्क्ताचे शिंतोडे वा डाग असलेला असे ठेवले गेले. या कथेवरून असे अनुमान करता येते की प्रसवाच्या वेळी धुर्दैल्ता अडचण आल्यामुळे सिझेरियन करून बाळाला सुरक्षित बाहेर काढले असावे आणि त्याच्या त्वचेवर पडलेल्या डागांमुळे त्याला हे अप्रचलित नाव देण्यात आले असावे.

चंद्रगुप्त-सेल्युकसच्या करारातील चौथे कलम राजदूतांची देवाणघेवाण हे होते. ही नीती चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर देखीत्त सुरू राहिली. सेल्युकसने त्याचा राजदूत डिमॅकसला चंद्रगुप्ताचा मुतल्तगा अमित्रधात याच्याकडे पाठवले. अमित्रघात म्हणजे शनरूंचा घात करणारा हे बिंदुसाराचे बिरूद होते. चाणक्याचे अर्थशास्त्र आणि मेगास्थेनिसचे ॥108 यामुळे सुरूवातीच्या मौर्यकालीन भारताबद्दल आपल्याला दोन दृष्टिकोन पहायला मिळतात. अर्थशास्त्रावख्न आपल्यातला कळते की चंद्रगुप्ताने धर्मरक्षक म्हणून राज्य केले. परंतु या ठिकाणी धर्माचा अर्थ नैसर्गिक नियमांचे नैतिक अधिष्ठान आणि जातिविषयक कर्तव्य असा आहे. त्याने स्मृतीकार मनुच्या नियमांचा स्विकार केला परंतु आपल्या मंत्र्यांनी तयार केलेले दण्डविधान लागू केले. हे दण्डविधान त्याच्या मंत्र्यांनी प्रमुख मंत्री राक्षस कात्यायनाच्या मार्गदर्शनाखाली बनवलेले होते. सन १७८० मध्ये जे काव्यनाटक सर विल्यम जोन्सच्या हातात पडल्यावर तो उत्साहीत झाला होता त्याचे मुद्राराक्षस हे नाव याच मंत्र्याच्या नावावरून ठेवले होते. चाणक्याचा प्रभाव अनधिकृत स गार म्हणून सरळ दिसित नसला तरी तो कमी महत्वाचा नव्हता.

जर चंद्रगुप्त व त्याच्या उत्तराधिकाऱ्यांनी चाणक्याची मार्गदर्शक तत्वे शब्दशः पाळली असतील तर त्यांची दिनचर्या कठोर व शिस्तबद्ध असणार. त्यांच्यानुसार राजा भल्या पहाटे संगीतमय वातावरणात उठून राजकीय विषयांविषयी चिंतन करी. त्यानंतर


मंत्र्यांशी व हेरांशी विचार-विनिमय करी आणि त्यानंतर सकाळची प्रार्थना. राजाची सकाळ चार भागात विभागली होती-- ज्यामध्ये विविध अहवाल ऐकणे, जनता-द्रबार, कामांचे वाटप व पत्राचार आणि हेरांकडून माहिती घेणे अशी राजकर्तव्ये केली जात. दुपारच्या काळात तो सैन्याची पहाणी व सेनापतींशी खलबते करत असे. संध्याकाळी प्रार्थना, नंतर स्नान आणि त्यानंतर शयनकक्षात विश्रांतीसाठी जाई. मेगास्थेनिसच्या India मध्ये लिहिले आहे की मौर्यकालीन समाज जाति-व्यवस्थेबाबत कट्टर होता. सम्राट कुठलीही बेशिस्त खपवून घेत नसे. आणि कायद्याबद्दल सर्वंत्र आदर होता. "सत्य आणि शील यांची खूप कदर आहे... त्यांचे कायदे व करार इतके साधे-सरळ आहेत की त्यांना क्वचितच न्याय मागायला जावे लागते. कुठलेही करार व ठेवी याबद्दल दावे नसतात. त्यांना सही-शिंक्के व साक्षीदार यांची जरुरी नसते." तरी देखील चंद्रगुप्त कुठलाही धोका पत्करत नसे. मेगास्थेनिसच्या वर्णनानुसार राजाची व्यक्तिगत सुरक्षा केवळ स्त्री-योद्ध्यांकडे सोपवली जात असे आणि हत्येच्या भीतीपोटी तो झोपण्याची जागा रोज बदलत असे. आणि चंद्रगुप्त राजवाड्याबाहेर पडला की सुरक्षा अत्यंत कडक होत असे. "त्याच्याभोवती अनेक स्त्रियांचा गराडा असतो आणि त्यांच्याबाहेर भालदार उभे असतात. येण्या-जाण्याचे रस्ते दोरखंडांनी बंद केलेले असतात. जर एखादा माणूस किंवास्त्री या दोराच्या आत आली तर मृत्यु ठरलेलाच... त्याच्या बाजूला दोन किंवा तीन सशस्त्र स्त्रिया कायम असतात. सांची येथील शि ंवरून खात्री पटते की राजाबरोबर स्त्री-सेविका व स्त्री सुरक्षारक्षकांची प्रथा होती.

मेगास्थेनिसने पाहिले की राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी तेथे प्रशासकीय अधिकाऱ्यांची फळी होती. त्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या दोन हजारापेक्षा जास्त वर्षानंतर अस्तित्वात आलेल्या भारतीय प्रशासकीय सेवेसारख्याच होत्या. हे सारे अधिकारी ब्राम्हण होते. हे सारे पुरोहीत होते परंतु त्याबरोबरच ते सुगगाराचे कामही करीत. "हा वर्ग संख्येने छोटा परंतु विहठततेच्या आणि न्यायाच्या बाबत इतरांपेक्षा वरचढ आहे. त्यांच्यातूनच शासक, प्रादेशिक राज्यपाल, त्यांचे सहाय्यक, खजिनदार, सेनापती, नौसेना-प्रमुख, लेखापरीक्षक, शेतकी विभागाचे अधिकारी नेमले जातात." प्रत्येक शहरामागे तीस प्रशासकीय अधिकारी असत. त्यांचे पाच भागात वगीकरण केलेले असे. करवसुतलीपासून ते अनोळखी माणसांवर लक्ष ठेवण्यापर्यंत विविध जवाबदाऱ्या त्यांच्यावर असत. बाकी प्रांतांमधेही असेच अधिकारी कार्यरत होते.

अशा प्रकारच्या उच्च दर्जाच्या सरकारी कामकाजासाठी त्याच तोडीचे लिखीत संवाद माध्यम आवश्यक होते. यामुळे खरोष्टी आणि नंतर ब्राम्ही यांना प्राकृत लिहिण्यासाठीचे अधिक उपयुक्त माध्यम म्हणून विकसित केल्या जाण्याच्या आधी अयोग्य असली तरी वायव्येतील आर्माईक लिपीचा वापर केला जात असे. खरोष्टीचा वापर बहुधा इ. पू. ३०० मध्ये सुरू झाला. त्यावेळी अशोक लहान मुलगा होता. तो सत्तेवर आल्यानंतर

ब्राम्हीचा वापर सुरु झाला. आणि चाणक्य, जो या एकसंध जाळ्याच्या मध्यभागी असलेला कोळी होता, त्याचा ह्या लिपीच्या विकासात हात असला पाहिजे.

उत्तर आणि मध्य भारताला एकछत्री अंमलाखाली आणणे आणि कुशल प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सहाय्याने मध्यवर्ती सरकार चालवणे हे सम्राट चंद्रगुप्ताचे सगळ्यात मोठे यश होते. यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये सुधारणा झाली तसे दळणवळण व व्यापारी मार्ग सुधारले, शहरांची वाढ झाली आणि चलनी आर्थिक व्यवस्थेचा विकास झाला. त्यामुळे व्यापारी (वैश्य) जाती संपन्न झाल्या व त्याबरोबरच ब्राम्हणांचे वर्चस्व कमी होऊ लागले. चांदीची सच्छीद्र नाणी भारतात एक शतकाहून अधिक काळ पूर्वीच वापरात आली होती परंतु आता मौर्य साम्राज्यात वजन, आकार, धातू, चिन्हे व ठशांची संख्या (साधारणत: चार ते पाच) याबाबत प्रमाणित नाणी वापरात आणण्याचा प्रयत्न झाला. सच्छीद्र नाण्यांवरच्या चिन्हांपैकी कोणते चिन्ह मौर्यकालीन आहे किंवा कोणते चिन्ह एखाद्या मौर्य शासकाशी संबंधित आहे याबाबत नाणेशास्त्राच्या अभ्यासकांमधे एकमत नाही. परंतु या नाण्यांवर नेहमीच दोन विशिष्ट चिन्हे आढळतात. एक चिन्ह सूर्याचे होते. मधे एक बिन्दु, त्याभोवती वर्तुळ, वर्तुळातून बाहेर पडणारे तीन बाण व शिंगासारखे काहीतरी आलटून पालटून असलेले असे दुसरे चिन्ह होते. या षडांगयुक्त चक्राकृती प्रतिकाला सदर-चक्र म्हणतात. हे कदाचित सार्वभौम राजाचे प्रतिक होते. मौर्यकाळाच्या पूर्वार्धाशी निगडीत दोन वेगळी चिन्हे म्हणजे एका रेषेने जोडलेली, जणू आडव्या दोरीने बांधलेली ‘‘एका ओळीत असलेली तीन अंडी' आणि तीन टेकड्या व त्यावरील चंद्रकोर (तीन अर्धवर्तुळाकारांनी बनलेला पिरॅमिड व त्यावरील चंद्रकोर) जी नक्कीच जेम्स प्रिन्सेप म्हटल्याप्रमाणे बौद्ध स्तूपावरील चंद्रकोर होती.



मेगास्थेनिस चंद्रगुप्त व बिंदुसार या दोहोंच्या दरबारात राजदूत असला तरी सत्ता परिवर्तन कसे झाले याविषयी ॥॥॥8 चा भाग आज उपलब्ध नाही. असे दिसते की चाणक्याच्या अर्थशास्त्रातील *राजपरिवारातील अंतर्गत कलह टाळले पाहीजेत? या स नुसार हे स्थित्यंतर अत्यंत सुरळीत व शांतपणे पार पडले असावे. चंद्रगुप्त जिवंत असतानाच बिंदुसारच्या हाती सत्ता सोपवली गेली. असे क्वचितच घडते. सर्व जैन ग्रंथानुसार चंद्रगुप्त राज्याचा त्याग करून जैन संत भद्रबाहु यांच्याबरोबर गेला. भद्रबाहुने मगध देशात बारा वर्षे दुष्काळ पडल्यानंतर अनेक अनुयायांबरोबर दक्षिणेकडे स्थलांतर

केले होते. आपले गुरु भद्रबाहु यांच्या मृत्यूनंतर बारा वर्षांनी अन्नपाण्याचा त्याग करून चंद्रगुप्ताने श्रवणबेळगोळ येथे एका गुफेत प्राण सोडले.

चंद्रगुप्ताचा मार्गदर्शक चाणक्य या साऱ्या घटनांमुळे नक्कीच विषण्ण झाला असावा. तरी देखील नंतर त्याने त्याच्या मृत्युपर्यंत पंधरा वर्षे बिंदुसाराचा निष्ठावंत स गार म्हणून भूमिका बजावली. चाणक्याचा शिष्य व नातू राधागुप्त याने त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. राक्षस कात्यायनानंतर राधागुप्त महामंत्री बनला. याच राधागुप्ताने अशोकाला सिंहासन मिळवण्यासाठी त्याच्या मोठ्या सावत्र भावाविर्दध महत्वाची मदत केली. याचाच अर्थ असा की मौर्य राजकारणावर चंद्रगुप्ताच्या व त्याच्या स्वतःच्या मृत्यूनंतरही चाणक्याचा प्रभाव टिकून राहिला.

जैनांनी दक्षिणेला स्थलांतर केल्यानंतर दरबारात त्यांची ताकद कमी होऊन ब्राम्हणांची ताकद वाढीला त्लागली होती. ब्राम्हणांचा वाढता प्रभाव दबलेल्या बौद्ध समाजाला आवडला नाही.

विसाव्या शतकातील इंडो-तिबेटन 'मंजुश्री-मुल-तंत्रः हे इतिवृत्त पुराणांप्रमाणेच भविष्यकथनांच्या रूपात दिले आहे. त्यात सांगितले आहे राजा बिंदुसार हुशार आणि शूर सम्राट होईल परंतु “चंद्रगुप्ताचा व त्याचा मुलगा बिंदुसार यांचा मंत्री चाणक्य नरकात जाईल”. आचार्य तारानाथाचा भारतातील बौद्ध धर्माचा इतिहाससुद्धा असाच चाणक्याला शिव्याशाप देतो. त्याच्यानुसार चाणक्याकडे आसुरी शक्ती होत्या ज्यांचा वापर करून त्याने सोळा मोठ्या राज्यांचे राजे आणि मंत्री मारले होते आणि त्याचे फळ म्हणून तो अत्यंत वाईट रोगाला बळी पडला ज्यात “त्याचे शरीर कुजून त्याचे तुकडे पडले”.

पुराणांमधून अजून हे स्पष्टपणे कळत नाही की बिंदुसाराची राजवट चोवीस वर्षांची होती की अट्टावीस वर्षांची. याचे कारण म्हणजे चंद्रगुप्ताने राजगादीचा त्याग नक्की कधी केला याबद्दल अनिश्चितता आहे. त्याने अमित्रघात हे बिरूद खरे ठरवून आपल्या वडिलांचे राज्य दख्खनात म्हैसूरपर्यंत वाढवले. परंतु पूर्वेकडील बलशाली कलिंग बळकावयला तो असमर्थ ठरता. या विजयांमुळे कदाचित बिंदुसाराच्या क्षजिय सैन्याचे प्रभुत्व वाढले आणि दरबारातील ब्राम्हणांच्या वर्चस्वाला काहीसा धक्का बसला.

बिंदुसाराच्या राजवटीबद्दल अत्यंत कमी माहिती आहे-- त्याने पश्चिमेकडील शेजाऱ्यांशी चांगले संबंध ठेवले होते. त्याचा आजीविकांकडे झुकाव होता. बिंदुसारत्ता अनेक राण्या आणि अनेक मुले होती. बौद्ध ग्रंथानुसार त्याला १०१ मुले होती, त्यातील सर्वात मोठा सुमन होता (उत्तर--महायान-- परंपरेत सुशीम किंवा सुसीम) आणि सर्वांत लहान तिस्स (तिष्य, वीतशोक). दक्षिण परंपरेप्रमाणे (थेरवाद) बिंदुसारचा मुत्तगा अशोकाच्या आईचे नाव धर्मा होते आणि ती जनासन नावाच्या आजीवकाची मुलगी होती. अशोक त्याच्या राजवटीच्या किमान बाराव्या वर्षापर्यंत आजीवकांचा दाता होता त्याचे कारण ह्यामुळे स्पष्ट होते. परंतु उत्तर परंपरेनुसार अशोकाच्या आईचे नाव सुभद्रांगी असे

होते. ती चंपारण्यातील्त एका ब्राम्हणाची मुलगी होती. हिच्याच पोटी अशोकाचा अनुज तिस्स (तिष्य, वीताशोक) जन्माला आतला.

सॅल्युसिडांशी लग्नसंबंधांचा पुढे कुठे उ 'ख दिसत नाही. परंतु अशोकाच्या दरबारात त्यांच्या सावत्र आजीमुळे प्रीको-पर्शियन प्रभाव दरबारात टिकून होता. तिचा भाऊ पहित्ता अँन्टीओकस इ. पू. २८१ मध्ये सॅल्युसिड साप्राज्याच्या राजा बनला. त्यामुळे त्याच्या इ. पू. २६१ मधे झालेल्या मृत्युपर्यंत तिचा राजवाड्यात मोठा प्रभाव असणार यात शंका नाही.

अशोकाचा जन्म इ. पू. ३०२च्या आधी झाला असण्याची शक्य्ता नाही कारण सर्व राण्यांमध्ये त्याची आई सर्वांत लहान होती. याबाबत एक लोकप्रिय कथा अशी की लहानपणीच अशोक आपली बुद्धी व युद्धकौशल्यामुळे त्याच्या आजोबांचा लाडका झाला. पण नंतर चंद्रगुप्ताने जैन धर्म स्वीकारला आणि आपली तलवार फेकून दिली. चंद्रगुप्ताने तसे न करण्याची ताकीद देऊनही अशोकाने ती तलवार शोधून काढली आणि स्वतःकडे ठेवली. परंतु त्याच्या आजोबांना अशोक केवळ एक लहान मुलगा म्हणूनच तेवढा माहीत असावा असे वाटते. बिंदुसार आजीवकांचा अनुयायी असल्यामुळे त्याची मुलेही आजीवक परंपरेतच वाढली असावी असे अनुमान करता येते.

बिंडुसारचा थोरला मुलगा सुशीम राजगादीचा वारस होता आणि त्याला तशीच वागणूक मिळत होती. धाकटा मुतल्तगा अशोक राजकुमारांच्या रांगेत शेवटी होता. त्याशिंवाय 'रखरखीत आणि स्पर्शाला अप्रिय* त्वचेमुळे तो इतका कुरुप होता की त्याच्या पित्याचा तो नावडता होता. उत्तर-परंपरेत अशोकाच्या कुरूपपणाबद्दल कमीत कमी तीन उ 'ख आहेत. याचा संबंध आधीच्या जन्मात अशोक लहानपणी बुद्धाला भेटतो आणि नकळत त्याला माती दान करतो या कथेशी जोडला जातो. अशोकावदानात लिहिले आहे की चंड-अशोकाला जेव्हा कळले की त्याच्या राण्यांना त्याच्या खरबरीत त्वचेचा स्पर्श नकोसा वाटतो तेव्हा त्याने त्याचा संपूर्ण राणीवसा जाळून टाकला. अशोकावदानाच्या काही आवृत्यांमधे दिले आहे की त्याच्या दरबारातील ज्योतिषी अशोकाच्या शरीरावर अशुभ चिन्हे असल्याचे सांगतो व ती निष्फळ करण्याच्या प्रयत्नांत काही पुण्यकर्म करतो.

अशोक कुरूप होता याचा आणखी पुरावा सांची येथील दक्षिण तोरणावरील एका दृश्यात मिळतो. यात बोधिवृक्षासमोर भावनावेगाने चक्कर येणारा व त्याच्या दोन राण्यांनी आधार दिलेला सप्राट दाखवला आहे. तो हिंदी सिनेमात अशोकाची भूमिका केलेल्या शाहरुख खानप्रमाणे उंच व देखणा नाही तर त्या दृश्यातील राजा बुटका, स्थूल आणि माठासारख्या मोठ्या डोक्याचा दाखवला आहे.

सम्राटाला चक्कर येते हा प्रसंग लंकेतील महावंसात इतक्या वेळा सांगितत्ता आहे की अशोक एकतर खूपच भावनाप्रधान असावा किंवा त्याला अपस्मारासारखा काहीतरी आजार असावा. या सगळ्यातून असे दिसते की राजकुमार अशोकाच्या प्रकृतीमुळे तो राजगादीचा वारस म्हणून अयोग्य ठरला होता.

नावडता राजकुमार असूनही अशोकाला भारतातील त्यावेळपर्यंतच्या सर्वांत बलवान राजाचा मुलगा म्हणून योग्य ते प्रशिक्षण नक्कीच मिळाले होते. अशोकाबद्दल उपलब्ध सर्व माहितीवरून असे दिसून येते की चाणक्याचा प्रभाव त्याचा नातू राधागुप्ताच्या रूपात टिकून होता. आणि कदाचित कौटिल्य म्हणजे कावळ्याप्रमाणे असे वर्णन केला गेलेल्या चाणक्याबद्दल कुरूप राजकुमाराच्या मनात आपुलकी असणार. चाणक्याने आपल्या अर्थशास्त्रात विद्वानांशी संगत ठेवावी यावर भर दिला होता. अशोकाने हे मनावर घेतलेले दिसते कारण पित्याच्या दरबारात त्याने बलवान मित्र गोळा केले होते. त्यापैकी एक म्हणजे बिंदुसाराचा प्रधान राधागुप्त ज्याने खरा उत्तराधिकारी सुशीमच्या जागी अशोकाला राजगादीवर बसवण्याच्या कटाचे नेतृत्व केलेले दिसते. बिंदुसाराला आधीच या कटाची माहिती झाली असावी आणि त्यामुळे त्याने अशोकाला अगदी कोवळ्या वयात दूरवर तक्षशिलेता बंड मोडण्यासाठी पाठवले. कदाचित याचे कारण असेही असू शकेल की राजाच्या सर्व मुलांमध्ये हा लहान अशोक सर्वाधिक सक्षम आणि सर्वाधिक धोकादायकही असावा. कारण या संतापी वादळाचे आधीचे नाव चंड अशोक होते. त्याची केवळ उपस्थिती तक्षशिलेत सुव्यवस्था निर्माण करायला पुरेसी ठरली.

इ. पू. २८७च्या आसपास तक्षशिला हे एक आंतरराष्ट्रीय केंद्र होते. तेथे भारतीय प्राकृतइतक्याच ग्रीक, पर्शियन व आर्माईक या भाषा बोलल्या जात. सेल्युकस निकेटॅरला हरवून स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या लोकप्रिय नायक चंद्रगुप्ताचा नातू म्हणून तेथे राजकुमार अशोकाचे मोठे स्वागत झाले. तरूण अशोकाच्या मनावर या स्वागताची चांगलीच छाप पडलेली दिसते. त्याने पहाडी टोळ्यांच्या प्रमुखांशी असलेल्या जुन्या कौटुंबिक नात्यांना परत उजाळा दिला. त्याचा त्याला एका दशकानंतरच्या सत्तासंघर्षात चांगलाच फायदा झाला.

राजकुमार अशोकाने तक्षशिलेतले बंड मोडून काढल्याबद्दल बक्षीस म्हणून त्याला दक्षिणेतल्या अवंती राज्याची (आजचे मध्यप्रदेश) राजधानी उज्जैन येथे राजप्रतिनिधी म्हणून नेमणूक केली गेली. त्या दूर प्रदेशात अशोकाचा बौद्ध धर्माशी संपर्क आला. त्याच ठिकाणी विदिशा येथील एका व्यापाऱ्याची कन्या देवी ही त्याला भेटली. ती शाक्य.कुमारी म्हणजे शाक्यमुनी बुद्धाच्या कुळातली होती हा बुद्ध-भक्तांचा कं नाविलांस असला तरी ती स्वतः श्रडाळू बोध होती यात शंका नाही. ती केवळ राजघराण्यांच्या परंपरेतील अंगवस्त्र नव्हते तर तिचे व अशोकाचे संबंध अत्यंत जवळचे व प्रेमाचे नाते होते यांचा हृदयस्पर्शी पुरावा पांगुरियाच्या शिलालेखात दिसतो. देवीला अशोकापासून त्याची पहिली दोन मुले झाली. पहिला मुलगा महिंद्र इ. पू. २८५ मध्ये आणि त्यानंतर तीन वर्षांनी मुलगी संघमित्ता हिचा जन्म झाला.

असे दिसते की अशोकाचे मन बौद्ध धर्माकडे वळवण्यात देवीला अपयश आले. तो राजगादीवर हक्का सांगायला पाटलिपुत्राला गेला तेव्हा त्याने तिला व तिच्या दोन्ही मुलांना विदिशेलाच मागे ठेवले. मौर्यांच्या राजघराण्यात एका व्यापाऱ्याची मुलगी राणी म्हणून

स्वीकारली गेली नसती. त्यामुळे अशोकाचे असंधिमित्रा (असंधिमित्ता) हिच्याशी लगून लावले गेले. ती पुढे त्याची पट्टराणी झाली. असंधीमित्रा बहुधा दि च्या उत्तरेकडील पूर्व हरियाणातील एका लहानशा राज्यातून आलेली असावी. कारण असंध नावाच्या छोट्या गावात भारतात सापडलेला सर्वांत मोठा अशोक स्तूप असणे हा केवळ योगायोग मानून चालणार नाही. या स्तूपाची उंची ८० फूट आणि परिघ २५० फूट होता.

यानंतर पुढे इ. पू. २७४ मध्ये तक्षशिला येथे पुन्हा एकदा बंडाळी झाली. यावेळेला युवराज सुशीमला तेथे पाठवण्यात आले. परंतु पहिल्या बंडापेक्षा हे बंड अधिक गंभीर होते आणि त्यामुळे सुशीमला तेथेच रहावे लागले. याच काळात राजा बिंदुसार गंभीररित्या आजारी पडला. त्याने सुशीमत्ता परत बोलवण्याची आज्ञा दिली आणि त्याठिकाणी अशोकाला पाठवायला सांगितले. अशोकाचा राजवाड्यातील सहकारी मंत्री राधागुप्त याने राजाज्ञा पुढे जाऊ दिली नाही. अशोकाने आजारपणाचा बहाणा करून वेळ मारून नेली. नंतर तो आपल्या पित्यासमोर हजर झाला आणि आपल्याला तात्पुरता शासक म्हणून घोषित करावे अशी त्याने मागणी केली. ह्याचा बिंदुसाराला इतका धक्का बसला की क्रोधातिरेकाच्या अपस्माराने त्याचा मृत्यू झाला. सुशीम पाटलिपुत्राला परत आला तेव्हा त्याच्या लहान सावत्र भावाने राजधानीचा ताबा मिळवला होता आणि महाकाय ग्रीक रक्षक शहराच्या दरवाजावर पहारा देत होते. अत्यंत भीतीदायक म्हणून ख्याती असलेले हे ग्रीक युद्धजीवी सैनिक असावेत. त्यांची दहशत होती किंवा ते सिकंदरच्या मोहिमेचे पडसाद असावेत. कारण एकोणिसाव्या शतकापर्यंत खोडकर मुलांना गप्प बसवण्यासाठी सिकंदरच्या नावाची भीती घातली जात असे. कनिंगहेमत्ला भारहूतला सापडलेले ग्रीक सैनिकाचे शि दर्शवते की त्या काळी भारतात युद्धजीवी ग्रीकांचे अस्तित्व टिकून होते.

पाटलिपुत्नच्या पूर्व प्रवेशद्वारावर सुशीमचा वध झाला. यापुढे चार वर्ष जो सत्तासंघर्ष झाला त्याला उत्तर बौद्ध परंपरा (जी पुढे महायान परंपरा झाली) चंड अशोकाची काळीकुट्ट कारकीर्द मानते. अशोकाच्या नावावर या काळात त्याने केलेले नव्व्यान्नव भावांचे खून तसेच त्याचा नारकीय तुरुंग अशा अनेक भयंकर कथा सांगितल्या जातात. धर्मांतरानंतर चंड अशोकात कसे महान परिवर्तन झाले दर्शविण्यासाठी अशोकावदानाच्या लेखकांनी हे अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केलेले दिसते. मात्र याच घटनांचे सौम्य शब्दातील वर्णन महावंसातही आढळते. महावंसानुसार स्वतःला मगधचा सम्राट घोषित करण्याच्या आधी अशोक चार वर्ष युद्ध करून राजगादीवर बसता होता.

सर्वात बलाढ्य स्पर्धक, कुठलेही सामाजिक बंधन त्याला लागू नसेल तर जे करतो, तेच अशोकाने केले-- त्याने आपला सहोदर तिस्स (वीतशोक) सोडून उरलेल्या सर्व प्रतिस्पर्धी भावांची हत्या केली. अशा प्रकारे राजगादीच्या मार्गातील सर्व अडथळे दूर झाल्यावर अशोकाने आपल्या ब्राम्हण पुरोहितांकडून शुद्धीकरण, राज्याभिषेक व राज्यारोहण हे सारे विधी समारंभपूर्वक करून घेतले आणि तो दिव्य* राजा बनला. यानंतर त्याने त्याच्या आजोबांनी सर्वप्रथम वापरलेले बिरूद देवांना प्रिय' धारण केले. हे बिरूद पुढे

त्याचा नातू दशरथ याने देखील वापरते. कदाचित त्याच्या कुरूपतेमुळे अशोक स्वत:ला प्रियदर्शी (पियद्सी) म्हणवून घेऊ लागला असावा. त्याचा लहान भाऊ तिस्स हा उपराजा झाला. त्याने आपल्या पदाचा बराच गैरवापर केला. त्याच्या चुका अशोकाने दाखवून दिल्यावर पदत्याग करून तो बौद्ध भिक्षु झाला. सत्य हे असावे की आपल्याला प्रिय परंतु राज्यासाठी त्रासदायक असलेल्या लहान भावाला अशोकाने जबरदस्तीने दूर घालवले.

इ. पू. २७० च्या आसपास देवांना प्रिय प्रियदर्शी राजा नव्याने राज्य करू लागला तेव्हा आपल्या पित्याप्रमाणेच आपल्या ट्रबारात ब्राम्हणांना मोठ्या प्रमाणात आश्रय देण्याची परंपरा त्याने कायम ठेवली. त्यावेळेला बौद्ध धर्माकडे त्याचे दुर्लक्ष होते. उत्तरेतील बौद्ध परंपरेतील स्रोतांनुसार अशोक आणि त्याची पट्टराणी हे दोघेही बौडविरोधी होते व त्यांनी बोधिवृक्ष नष्ट करण्याचे प्रयत्न केले तसेच बुद्धाशी निगडीत इंतर पवित्र स्थळे नष्ट करण्यासाठी आपले सैन्य पाठवले. ज्या माणसाची पहिली पत्नी अदाळू बौद्ध आहे तो असे करणे शक्यी वाटत नाही. पट्टराणीच्या बोढडेषाला त्याने विरोध केला नाही एवढाच याचा अर्थ दिसितो.

राजवटीच्या पहिल्या चार-पाच वर्षांत अशोकाने जी पावले उचलली ती त्याच्या पुढील आयुष्याला आणि राजवटीला वेगळाच आकार देणारी ठरली. एक शक्य ता अशी आहे की पाटलिपुत्राच्या गादीवर आपत्े स्थान भक्कीम झाल्यावर अशोकाने आपल्या पहिल्या पत्नीला व दोन्ही मुलांना विदिशेहून बोलावून घेतले असावे. ते तिघे बौद्ध वातावरणात वाढले होते. अशोकाने बांधलेल्या नरक सदृश्य तुरूंगात छळ सोसणाऱ्या भिक्षु समुद्राच्या तितिक्षेमुळे (उत्तरेकडील परंपरा) किंवा त्याने हत्या केलेल्या थोरल्या सावत्र भावाचा मुलगा भिक्षु निग्नोध याच्या प्रभावामुळे (दक्षिणेकडीतत परंपरा) तो बुद्ध धर्माकडे आकर्षित झाला ह्या का निक कथा असून खरी बाब ही असावी की दरबारातील ब्राम्हणांच्या वर्चस्वामुळे अशोकाच्या अधिकारांवर निर्बंध येत होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून त्यांच्यापेक्षा सौम्य अशा बौद्धांना आश्रय देणे त्याने सुरु केले. राजाशी सरळ संपर्क साधू शकल्याने बौद्धांचा प्रभाव विलक्षण वाढला.

राणीवशातीत्त इतर स्त्रिया (उपपल््या) सोडून अशोकाच्या किमान सहा राण्या होत्या ज्यांची नावे आपल्याला ज्ञात आहेत. त्याला कमीत कमी अकरा मुले व तीन मुली होत्या. अशोकाची दोन अपत्ये महिंद्र व संघमित्रा यांचा उ ख फक्त महावंसातच आढळतो. पण महावंसाचा स्रोत असलेला दीपवंस हा प्राचीन ग्रंथ आहे. दीपवंसाची माहिती खरी आहे असे मानण्याला आधार आहे कारण अन्य दृष्ट्याही हा प्रंथ अस्सल आहे. लघुशिंलालेख सांगतात की अशोक इ. पू. २६५ च्या आसपास बौद्ध उपासक झाला. त्याने स्वतःच कबुत्ती दिल्याप्रमाणे पहित्ती अडीच वर्षे त्याने धर्माला फास्शा गांभीर्याने घेतले नव्हते. आपल्या वडिलांच्या नाममात्र बौद्ध प्रवेशानंतर एक-दोन वर्षात महेंद्र आणि संघमित्रा दीक्षा घेऊन सामणेर व सामणेरी बनले. महिंद्राचे वय त्यावेळी अकरा-बारा वर्ष असावे आणि संघमित्रेचे वय आठ-नऊ वर्षं असावे. परंतु संघमित्रेच्या लहानपणी घेतलेल्या

धर्मदीक्षेबद्द्ल शंका घेण्यास जागा आहे कारण पुढे तिने लग्न केले व तितला एक मुलगा झाल्याची माहिती मिळते. तिचा पति व मुलगा यांनी पुढे बौद्ध संघात प्रवेश केला.

कलिंग हे भारतातील एकमेव असे मोठे राज्य होते जे बिंदुसार जिंकू शकला नव्हता. इ. पू. २६१ मध्ये अशोकाने कलिंगावर आक्रमण केले. कलिंगावरील विजयानंतर व दक्षिणेकडे इतर काही राज्यांना आपल्या अधिपत्याखाली आणल्यानंतर अशोक स्वतःला पूर्णं भारताचा शासक म्हणवू शकत होता. तो आता त्याच्या वडिलांपेक्षा व आजोबांपेक्षा अधिक बलशाली असा एक खरा सप्राट बनला होता. त्यानंतर संपूर्ण भारतीय उपखंडावर अशोकाचे शांतीपर्व अवतरले आणि ते पुढील तीस वर्षे अखंड चालले. अशा प्रकारचा एकसंघ, युद्ध वा बंडाळी नसलेत्ता, तुलनेने शांततेचा कालखंड संपूर्ण भारतवर्षात पुन्हा आला तो ब्रिटीश राजवटीतच.

गिरनार, कालसी, शहाबाझगढी, मनसेहरा व एर्रागुडी येथील शिलालेखावरून असे स्पष्ट होते की कलिंगावर मिळवलेल्या नृशंस विजयामुळे तेथीत्त लोक व स्वतः अशोकही उध्वस्त झाला. ते सत्य स्वीकारायला व त्यावर कृती करायला त्याला दोन- तीन वर्ष लागली. परंतु या युद्धाने त्याच्या जीवनाला एक वेगळे वळण दिले. ती एक अशी निर्णायक घटना ठरली की जिच्यामुळे एक नावापुरता असलेला बौद्ध उपासक आता अत्यंत श्रद्धाळू अनुयायी व युद्धविरोधक बनला. एक पश्चातापदग्ध व्यक्तीला खर्यार अर्थाने धर्माचा सहारा मिळाला. त्यानंतर सप्राटाने आपली सारी सरकारी यंत्रणा बौद्ध धर्माच्या नैतिकतेच्या आधारावर उभारण्यासाठी सर्व प्रयत्न सुरू केले.

ह्या सर्वांचे कारण कलिंगचे युद्ध आणि त्यातून निर्माण झालेली दहशत हे होते. तरीसुद्धा हे सत्य वादातीत आहे की एका राजाचा संपूर्ण भारताचा सप्राट होण्याच्या प्रक्रियेमध्ये प्रियदर्शी चंड-अशोक न राहता धर्म-अशोक बनला. हे परिवर्तन न-भूतो-न-भविष्यती असे होते; आणि मौलिक र्पात इंतके विस्मयंजनक होते की ते अयशस्वी होणारच होते.

कलिंग युद्धानंतर तीन वर्षांनी, साधारणतः इ. पू. २६०मध्ये, सप्राट अशोकाची पहिली सार्वजनिक घोषणा लघुशिताालेखांच्या रूपात प्रसिद्ध झाली. त्यांत सम्राटाने लोकांना सांगितले की तो आता एक समर्पित बौद्ध उपासक झाला होता, त्याने संघाला भेटी दिल्या होत्या व त्याच्यामुळे देव व मानव जवळ आले होते. त्याने काय काय केले याचे विवरण दिलेले दिसत नाही पण प्रजेनेही तसेच करावे असे तो प्रजेला सांगतो. त्यासाठी यात्रेवर असतांना तो ही घोषणा करीत होता आणि हे शिलालेख पाषाणांवर व स्तंभांवर सर्वन कोरण्याचे आदेश देत होता.

हा शाही दौरा एखाद्या सेनेप्रमाणे संपूर्ण राज्यमर कसा सरकत असेल याची आपण क ना करू शकतो-- सप्राट व राजपरिवाराच्या भोवती आतील वर्तुळात त्याचे मंत्री, अधिकारी, घरगुती नोकर, महित्ता सुरक्षा रक्षक; बाहेरील वर्तुळात हजारोंचा लवाजमा

आणि उस्लेले सारे सैन्य; प्रत्येक नवीन जागेवर अनेक तंबू; आणि हे सर्व स्थानिक लोकांची साधनसंपत्ती स्वाहा करीत असणार. इतर चांगल्या राजांप्रमाणे अशोक आपल्या प्रजेसाठी उपलब्ध असायचा. परंतु त्याच्याशी सरळ संवाद मोजक्या खास लोकांचाच होत असावा. अशोकाला मात्र त्याच्या सर्व प्रजेशी बोलायचे होते. एवढेच नाही त्याचा संदेश चिरकाळ टिकवायचा होता. म्हणून त्याला एक लिखित भाषा आणि दीर्घ काळ टिकणारे प्रसारमाध्यम गरजेचे होते.

मगधाची बोलीभाषा असलेली अशोकाची प्राकृत भाषा आता नव्याने विकसित केलेल्या लिपीत लिहिली जाऊ लागली. प्राकृत भाषेसाठी ही लिपी खरोष्टीपेक्षा अधिक योग्य होती. परंतु ती लिपी अजूनही परिपूर्ण नव्हती. त्यामुळे अनेक शतके विस्मरणात गेलेली ही अक्षरे ओळखली गेली तरी त्या शब्दांचा अर्थ त्रासदायकरित्या संदिग्धच रहातो. आपण काय सांगायचा प्रयत्न करीत आहोत हे ज्याला स्वतःलाच पूर्णपणे स्पष्ट नव्हते परंतु मनातले काहीतरी सांगायचे तर नक्की होते अशा राजाचे हे शब्द होते. सम्राटाचे बोत्तणे लिहून घेणाऱ्या लिपिकाता कुठलाही उललट प्रश्न करण्याचे धाडस झाले नसावे. हे शब्द थेट हृदयातून आलेले होते पण भाबडेपणाचे, काहीसे विस्कळीत आणि आत्तकेंद्रीत होते.

सुरुवातीपासूनच सम्राट स्तंभलेख व शिलालेख दोहोंचा उ ख करतो पण यातील सुख्वातीचे शिलालेखच टिकले आहेत. याशिवाय संघभेद शिलालेख (Schism Edicts) म्हणवले जाणारे हे अशोकाचे दुसरे शिलालेखही होते. यांचा नक्की काळ माहीत नाही. पण ज्याप्रकारे अशोक स्वतःच तो बौद्ध संघाचा प्रमुख आहे अशा अविर्भावात भिक्षु आणि भिक्षुणींना कसे वागावे, कोणती वस्त्रे वापरावीत, काय वाचावे इत्यादीचे आदेश देतो त्यावरून ट्युडर इंग्लंडमघे आठवा हेन्री ज्याप्रकारे वागत होता तसाच काहीसा अशोकही वागत होता असे दिसते. [आठव्या हेत्रीने रोमन कॅथॉलिक चर्चच्या प्रमुख पोपचे वर्चस्व झुगारून इंग्लंडचे चर्च स्वतंत्र केले आणि तो स्वतः इंग्लंडच्या चर्चचा अधिपती बनला]. बौद्ध संघामध्ये जी मोठी फूट पडून त्याची परिणती पुढे अठरा पंथात आणि उत्तर व दक्षिण परंपरेत विभाजन होण्यात झाली त्या फूटीचा सर्वात आधीचा लिखित पुरावा संघभेद शिलालेखात सापडतो.

यानंतर पुढे अशोकाचे सार्वजनिक आयुष्य बौद्ध धर्माबद्दलची श्रद्धा कशी व्यक्त करावी आणि बौद्ध संघाला कशी मदत करता येईल यावरच केंद्रीत झाले. त्याच्या लघुशिलालेखात ज्या तीर्थयात्रेचा उ 'ख आहे ती त्याच्या कमीत कमी दोन अशा बौद्ध तीर्थयात्रांपैकी पहिली असावी. बौद्ध संघाच्या स्थविर (वरिष्ठ) भिक्षुच्या मार्गदर्शनाखाली अशोकाने ह्या यात्रा केल्या. पण हा स्थविर (थेर) भिक्षु कोण होता? महावंसाच्या वाचकाची खात्री होते की हा स्थविर मोग्गलीपुत्त तिस्स (स्थविरवादी पंथाचा भिक्षु, पुढे स्थविरवाद थेरवाद म्हणून ओळखला जाऊ लागला) होता. याचेच काही अस्थि-अवशेष जनरत्त कनिंगहमत् सांची येथे सापडले होते. परंतु अशोकावदानानुसार हा वरीष्ठ भिक्षु मथुरेच्या सर्वस्तिवादी परंपरेचा (पुढे महायान परंपरा) उपगुप्त होता. आणि तिबेटी आचार्य 'तारानाथ

तर हा गोंधळ अजून वाढवतो. त्याच्या मते हा स्थविर पाटलिपुत्नच्या कुक्ुकुटाराम विहाराचा प्रमुख यश होता. अशोकाने स्थापलेल्या या विहाराला अशोकाराम असेही म्हणतात. यश हा नक्कीच उपगुप्त नव्हता. तारानाथाच्या ग्रंथानुसार उपगुप्त अशोकाच्या जन्माआधीच मृत्यु पावला होता. त्यामुळे उपगुप्त येथे घुसखोर वाटतो. महायान परंपरेची थोरवी वाढवण्यासाठी त्याचे नाव घुसवलेले दिसते. ह्यातून असे दिसते की वेगवेगळ्या बौद्ध गटात अंतर्गत कडु कलह सुरू झाला होता आणि प्रत्येक गट सम्राटाच्या बौद्ध संघाच्या केंद्रस्थानी जाण्याचा प्रयत्न करीत होता.

या धार्मिक गुंतागुंतीतून मार्ग काढण्याचे काम शिंलालेखांच्या मदतीने करता येते. इ. पू. २५९ मधे शिंलालेखांचा दुसरा भाग प्रकाशित होऊ लागता. त्याची सुरूवात करलिंगपासून झाली व तेथून ते उत्तरेला पसरते. तरीही गंगेच्या खोऱ्यात शिलालेख का सापडलेले नाहीत हे एक कोडेच आहे. आपण केवळ अंदाज करू शकतो की तेथे दगडांवर वा गुफांमधे नाही तर स्तंभांवर अशोकाचे लेख होते आणि ते काळाच्या ओघात नाहीसे झाले आहेत.

लघुशिंलालेखांची (MRE) शिंलालेखांमधे (RE) झालेली प्रगती एका शब्दात वर्णन करता येते-- धर्म. हा शब्द पहिल्या शिंत्तालेखाच्या पहिल्याच वाक्यात आहे आणि त्यानंतर पुनःपुन्हा दिसतो. अशोकाच्या राजकीय विचारसरणीचा तो पाया झाला होता. धर्मप्रसाराचे धोरण ठरले होते. यांत नवीन धर्म-महामात्र यांची तुकडी तयार करण्यात आली. त्यांच्यावर धर्मप्रसार व लोकांमध्ये कल्याणकारक नैतिक मूल्ये 'पसरवण्याची जवाबदारी होती.

शिंलालेखांमधे (लघुशिंलालेखांपेक्षा) एक नवीन सूर दिसतो. प्रत्येक आदेशाची सुरुवात स्पष्ट करते की सप्राटाचे राज्यावर पूर्ण नियंत्रण आहे पण त्याच्यामध्ये परिवर्तन झाले आहे. हे परिवर्तत कसे घडले हे लोकांना कळले पाहिजे-- केवळ कलिंग-युद्धानंतरच्या पश्चातापामुळे नव्हे. कदाचित आपल्या आयुष्यात पहिल्यांदाच अशोक विनयशील झाला-- इतका विनयशीतत की आपण राज्यकारभार सुधारण्याचे प्रयत्न करीत आहोत असे प्रजाजनांना सांगणे हे व्यक्तिशः त्यातता त्याचे कर्तव्य वाटते. "खरोखरच सगळ्यांचे कल्याण हे माझे कर्तव्य आहे. यासाठी मुळात प्रयत्न व त्वरीत कार्यवाही आवश्यक आहे. सर्वांच्या कल्याणाची काळजी घेण्यापेक्षा दुसरे मोठे कार्य नाही."

अशोकाच्या राज्यारोहणाला आता बारा-तेरा वर्षे झाली होती आणि तो चाळीशीच्या मध्यावर पोहोचला होता. त्याने आपल्या राज्यशासनात्ता एका क्रांतिकारी सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या कामाला जुंपले होते. ह्या सुधारणा प्रस्थापितांच्या मर्मस्थानी आघात करणाऱ्या होत्या. त्याच्या सुधारणांचे तीन उद्देश होते-- अहिंसेच्या मार्गाने ध्येयप्राप्ती, केवळ नैतिकतेच्या आधारावर धर्मविजय; कुठलेही धार्मिक विचार प्रकट करायला स्वातंत्र्य व इतरांच्या धार्मिक मतांचा आंदर; आणि सदांचार, चित्तशुद्धी, संयम, अतूट श्रद्धा, इतरांचा आदर, दातृत्व, सत्कमे, कृतज्ञता, संयम, तट्स्थभाव व न्यायबुद्धी, इतरांची हानी न करणे

आणि क्षमाशीलता (जेथे चूक करणाऱ्यांना माफ करणे शक्य आहे अशा वेळी) या सर्व धर्मांच्या समान सारतत्त्वांना प्रोत्साहन.

हा धर्म बौद्धांचा नव्हता. तसेच ब्राह्मणांचाही नव्हता. यांत शाक्यमुनी किंवा संघ यांचा मूळ स्रोत म्हणून उ 'ख नव्हता. हे योग्यही होते, कारण शिलालेख अखिल प्रजेला उद्देशून होते केवळ बौद्ध समुदायाला नाही. हे अशोकाच्या उक्तीनुसार होते की सर्व प्रजा त्याला मुलासारखी आहे. यामुळे हे स्पष्ट होते की त्याच्या शिलालेखात नैतिकता आहे पण धार्मिक तत्त्वज्ञान नाही. देवांचा उ ख फक्त त्याच्या नावांत काय तो येतो, इतरत्र नाही. धार्मिक उत्सवांचा उ *ख एकदाच येतो व तोही स्पष्ट नापसंती दर्शवणारा-- शिलालेख २ म्हणतो 'अशिष्ट व निरर्थक उत्सव'. अशोक पुनःपुन्हा ब्राह्मणांना आदर दाखवा असे लिहीत होता तरी ब्राह्मणांना ते खटकले असणार--ब्राह्मणांना नाही तर कुणाला आदर दाखवणार?

शिलालेखात येथे किंवा इतरत्र कुठेही स्तूप-निर्मितीच्या प्रचंड योजनेचा उ 'ख नाही. दक्षिण-परंपरेनुसार तीन वर्षे हे काम चालले. एक कारण हे असू शकते की इ. पू. २५९-८ ला शिलालेख कोरले त्याच्या आणि इ. पू. २४३-२ ला स्तंभलेख कोरले त्याच्या दरप्यान स्तूप निर्मितीचे हे काम झाले. संपूर्ण भारतीय उपखंडात स्तूप व विहार बांधण्यात आले हे मात्र निःसंशय आहे. भारतभर व पश्चिमेला अफगाणिस्तानात हेरातपर्यंत सापडेलेत्ले शेकडो स्तूपांचे व त्यांच्या आजूबाजूला बौद्ध विहारांचे अवशेष हे त्याचे सबळ पुरावे आहेत. हे स्तूप जरी कुषाण किंवा गुप्तकालीन असले तरी ते मौर्यकालीन साध्या स्तूपांवर बांधले गेले होते. सुरूवातीच्या बौद्ध संप्रदायात स्तूपांची परंपरा होती व तिला अशोक काळात खूप चालना मिळाली हे नक्की .

अशोकाच्या पूर्वी कुठलीही धार्मिक वास्तू लाकूड, माती व गिलावा यांच्याशिंवाय इतर कशाची नसायची. आता विटा, चुना व दगडाच्या इमारती उभ्या होऊ लागल्या. भारताच्या धार्मिक पटलावर ह्या अचानक मोठ्या बदलामुळे मोठाच परिणाम झाला असणार. अशोकाचा हेतू काहीही असो, ह्या (स्तूप व विहारांच्या) इमारतींचा संदेश शिलालेखातता सार्वजनिक धर्म नव्हता तर बुद्ध-धर्म होता.

अशोकाच्या स्तूप परंपरेचे अस्तित्व बोधि-वृक्ष व धर्मचक्राची पूजा यांच्या बरोबरीने होते. बौद्ध स्तूपांवर पहिले शि आले ते बुद्ध धर्माची तीन मूलभूत प्रतिके घेऊनच. अशोकामुळे ह्या प्रतिकांना बौद्ध प्रतिमांमधे महत्वाचे स्थान आहे. वृक्षपूजा व तिच्याशी जवळचा संबंध असलेली मातृदेवतेची पूजा हे आधीही भारतीय लोकपरंपरेतले महत्वाचे अंग होते. पण सप्राट अशोकाच्या उतारवयातल्या बोधिवृक्षाविषयीच्या अतीव ध्यासामुळे त्याला आता अत्याधिक महत्व आले. धर्मचक्र अ-बौद्धांनी कसे समजून घ्यावे? भारतीय वैदिक धर्माचे प्रतिक की शाक््यकमुनी बुद्धाचे धर्म-प्रतिक? एकाला पुढे आणण्यात दुसर्यालची पिछेहाट होत होती.

स्तूपनिर्मितीचे कार्य हाती घेतलें तेव्हा अशोक पत्नाशीला पोहोचला असावा. त्या कार्यामुळे त्याचा संघाशी व संघातील स्थविरांशी जवळून संबंध आला. तरीही त्याच्या राज्यात संघातील विविध गटांमधील वितुष्ट व वैरभाव चालूच राहिले. इ. पू. २५४ ला बौद्ध संघ व निर्गंथ नावाच्या नग्न साधूंच्यातील्ल विवाद मिटवण्यासाठी एका मंत्र्याला पाठवण्यात आले पण त्याने काही भिक्षुंची हत्या केली व प्रकरण अधिकच चिघळले. यात अशोकाचा लहान भाऊ तिस्स/वीतशोकही कोणत्या ना कोणत्या प्रकारे गुंतला गेला व त्याचीही हत्या झाली. असे दिसते की ह्या घटनेमुळे अशोकाने सर्व बौद्धांना त्याच्या कुक्‌्कु टाराम ह्या पाटलिपुत्राबाहेरील विहारात एकत्र केले. दक्षिण परंपरेनुसार स्थविरांच्या (वरीष्ठांड्वारा प्रमाणित) धर्ममतांना न स्वीकारणाऱ्यांना संघातून बाहेर हाकलण्यात आले. मागे संघात राहिलेल्यांनी धर्माच्या विविध पैलूंचे संकलन करण्यासाठी एक संगायन केले. त्यानंतर धर्मप्रसाराची मोठी योजना हाती घेण्यात आली आणि सर्व दिशांना धर्मदूत पाठवण्यात आले. त्यानुसारच राजकुमार महिंद्र श्रीलंकेला गेला.

उत्तर परंपरा हे संगायन वा धर्मटूतांबद्दल पूर्णपणे मौन आहे. यावरून असे दिसते की त्या समेत त्यांचा पराजय झाला असावा. तिसर्याह धर्म-संगायनाचा उ 'ख शिलालेखात कुठेही सापडत नसल्याने ही दक्षिण परंपरेची क ना मात्र आहे असे काहींचे मत आहे. पण याला पुरातत्त्वाचा मोठा पुरावा आहे--वोडेल, मुखर्जी व स्पूनर यांना पाटण्याबाहेर सापडलेले अनेक स्तंभाचे विशातल सभागृह. पाटलिपुत्न व बाजूच्या गावांवरून सहज पोहोचता येईत्त अशी ही एकमेवाद्वितीय इमारत, तिचा त्ताकडी जिना वनदीजवळचा धक्का विशेषकरून मोठ्या सभारंभाच्या आयोजनासाठीच बांधलेले होते. असे म्हणतात की त्या संगायनात साठ हजार भिक्षु उपस्थित होते. हे सर्व त्या विशाल कक्षात सामावणे शक्यe नव्हते पण त्यांचे प्रतिनिधी जरूर त्या कक्षात एकत्र येऊ शकले असतील.

महावंसानुसार श्रीलंका, भारतभर व भारताबाहेर पाठवलेल्या धर्मदूतांची (धम्मदूत) उ 'खनीय कथा तितकीच खरी आहे. कारण महावंसात दिलेल्या नावांच्या अरहेतांचे अस्थि-अवशेष त्यांच्या नावासहीत कनिंगहॅम व मेसी यांना सांचीला सापडले होते. सांचीची टेकडी ही आधी शाक्‌्यामुनीद्वारा भारतात व नंतर अशोकाद्वारा भारताबाहेर धर्मप्रसाराचे स्मारक आहे असे आपण खरेच म्हणू शकतो. तिसर्या संगायनानंतर उत्तर परंपरेची वर्णने विस्कळीत झालेली दिसतात. याउत्लट महावंस नेमकी सुसूत्र माहिती देतो. उत्तर परंपरेला हे दाखवायचे होते की सम्राट अशोक मथुरेच्या बौद्धांचा अनुयायी होता. त्यामुळे त्यांनी अशोकाला उपगुप्तासमोर लोटांगण घात्ून वंदन करतांना; उपगुप्त त्याला स्तूपनिर्मितीत मदत करतांना; उपगुप्ताच्या पक्षाला दानादि मदत करतांना दाखवले आहे. ह्या म्हणण्याला लुंबिनीवरील स्तंभलेखांवरून, जवळच्या निगली सागर शिलालेखावरून व उत्तर बिहारमधील अशोकस्तंभांच्या राजमार्गावरून काही प्रमाणात समर्थन मिळते. उत्तर व दक्षिण परंपरा काही बाबतीत मात्र सहमत आहेत-- सांचीच्या शिं त दाखवल्याप्रमाणे अशोकाद्वारा बुद्धांचे अस्थि-अवशेष एकत्र करणे, त्याची स्तूप-निर्मिती व त्याचे बोधि-

वृक्षाप्रति वाढती श्रद्धा. अशोकावदानमधे लिहिले आहे की आयुष्याच्या शेवटी अशोक संघाच्या सेवेत इतका गुंतला की त्याला इतर कशालाही वेळ नव्हता. शिं वर्न ह्या वर्णनाला पुष्टी मिळते.

अशोकाच्या राज्यारोहणानंतर सव्वीस वर्षांनी उभारलेले स्तंभलेख मात्र अशोक केवळ बौद्ध धर्माच्या प्रसारातच गुंतला होता ह्या बौद्ध परंपरांच्या म्हणण्याला दुजोरा देत नाहीत. स्तंभलेखांवरून असे दिसते की सम्राट अशोक व त्याचे मंत्री एक न-भूतो-न-भविष्यति असे अत्यंत कार्यक्षम व कल्याणकारी प्रशासन चालवत होते. त्याची झलक या सुधारणांमधे दिसते-- (यज्ञात) प्राण्यांचे बळी देण्यावर बंदी, जनावरांच्या झुंजीवर बंदी, शिकार व मांसाहारावर बंदी (शिलालेख १); दवाखान्यांची सोय, औषधी वनस्पतींची उद्याने, विहीरी व रस्त्यांवर दुतर्फा वृक्ष लागवड (शिलालेख २); सीमाप्रदेशात व शेजारच्या राज्यांमधे औषधांचे वितरण (शिलालेख २); धर्म-महामात्र व प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी पाच वर्षांच्या दौर्यांचा कार्यक्रम (शिलालेख ३); कायदा व सुव्यवस्थेसाठी राज्यपालांना स्वतंत्र कार्यकक्षा, मृत्युदंड मिळालेल्यांच्या शिक्षेच्या स्थगितीसंबंधी सुधारणा (शिलालेख ४).

जर शिंलालेखांमधे नोंदवलेल्या सर्व सुधारणा लागू करण्यात आल्या असतील तर अशोकाचे राज्य हे इतिहासातील पहिले कल्याणकारी राज्य होते. त्याबद्दल पुरातत्त्वाचे पुरेसे पुरावे मिळालेले नाहीत. सांची प्रदेशात नुकतेच झालेले सर्वेक्षण दर्शवते की मौर्यकाळात तेथे धरणे व पाटबंधारे यांचे मोठे जाळे होते. इतरत्र अशोकस्तंभ व विहीरी जवळ जवळच असत.

ह्या सुधारणा प्रत्यक्ष अमलात आणल्या गेल्या होत्या हे फिरोझशहाच्या स्तंभलेखाच्या शेवटी जोडलेल्या लेखात अशोकाच्या शेवटच्या जाहीर घोषणेतून सिद्ध होते. ह्यात सम्राट अशोकाने त्याच्या सदतीस वर्षांच्या राजवटीत काय काय केले याचा गोषवारा आहे. यात त्याच्या व धर्म-महामात्रांच्या प्रयत्नांनी धर्माचा प्रसार कसा केला गेला व त्याचे काय परिणाम झाले याची माहिती आहे. अशोक सांगतो की हे नियम व दबाव आणून करण्यात आले पण खरा परिणाम झाला तो धर्माची महती पटल्याने. अशोकाची बौद्ध धर्माप्रती व्यक्तीगत श्रद्धा कितीही वाढली तरी राज्यकारभारात त्याने सर्वधर्मसमभाव ठेवला होता. "मी सर्व संप्रदायांचा वेगवेगळ्या प्रकारे सन्मान केला आहे" (स्तंभलेख ६). त्याने नैतिकतेवर आधारीत धर्मावरच जोर दिला, सांप्रदायिकतेवर (सांप्रदायिक तत्त्वज्ञान वा चालीरिती यांवर) नाही. शिलातेखांप्रमाणेच येथे सार्वजनिक व व्यक्तीगत सदाचाराला प्रोत्साहन दिले आहे, सांप्रदायिक धर्म व सांप्रदायिक तत्त्वांना नाही. स्तंभलेख २ मधे तर अशोक स्वतःच "धर्म म्हणजे काय?" असा प्रश्न विचारतो व त्याचा खुलासा करतो की धर्म म्हणजे "पाप न करणे, भरपूर सदाचार, परोपकार, दातृत्वभाव, सत्य व निर्मलता" आणि शिलालेख १ मधे तो म्हणतो (धर्म म्हणजे), "प्रचुर स्व-परिक्षण, भरपूर आदरभाव,

(पापकृत्यांची) भीती आणि भरपूर उत्साह". यात कुठेही प्रार्थना, नैवेद्य-भोग, बळी, कर्मकांड वा देवादिकांचा ऊ 'ख नाही.

अशोकानंतर आज इतक्या शतकांनीही त्याचे स्तंभलेख ७ मधील शेवटचे शब्द तेवढेच प्रेरणाजनक आणि तितकेच हृदयस्पर्शी आहेत.

याबद्दल देवांना प्रिय (राजा) म्हणतो-- जेथे जेथे पाषाण स्तंभ आहेत किंवा पाषाण शिळा आहेत, तेथे तेथे ही धर्मदेशना कोरून ठेवा जेणेकरून ती खूप काळ टिकेल. माझी मुले, नातू-पणतू (आदि) असेपर्यंत, सूर्य व चंद्र असेपर्यंत ती टिकून रहावी म्हणून ती कोरली आहे. जेणेकरून लोक सांगितल्याप्रमाणे त्याचे पालन करतील. त्याच्या पालनानेच इहलोकात व पर्तलोकातही सुख मिळणार आहे. ही धर्मदेशना मी माझ्या राज्यारोहणानंतर सत्तावीस वर्षांनी लिहिली आहे.

हे शब्द इ. पू. २४२ च्या आसपास कोरले गेले. या वेळी सम्राट अशोक साठीचा झाला असावा. त्या काळात ही वृद्धावस्था होती.

अशोकाच्या आयुष्याची सायंकाळ मात्र अंधःकारात व गोंधळात गेली. उपलब्ध माहितीवरून असे दिसते की उतारवयात तो बौद्ध धर्म व बौद्ध संघ यांच्याप्रती अधिकाधिक श्रद्धाळू झाला, इतका की त्याला धर्मवेडा म्हणता येईल. त्यातही सर्वात जास्त बोधिवृक्षाच्या बाबतीत त्याचा अतिउत्साही ध्यास दिसत होता. याचे कारण हेही असावे की तरूणपणी त्याने त्या वृक्षाला केलेल्या हानीमुळे तो पश्चातापदग्ध झाला असावा. त्याच्या आयुष्याच्या अखेरीच्या प्रत्येक वर्णनात बोधिवृक्ष प्रामुख्याने येतोच. अशोकावदानानुसार "त्याची बोधिवृक्षावर विशेष श्रद्धा होती. अशोक म्हणत असे, 'जेव्हा मी या वृक्षराजाकडे बघतो तेव्हा मत्ता वाटते की प्रत्यक्ष बुद्धाचेच दर्शन घेत आहे." अशोकानेच बोधिवृक्षाची शाखा त्याचा मित्र लंकेचा राजा देवानांपियतिस्स याला पाठवण्यासाठी कशी निवडली व कशी पाठवली या वर्णनाने तसेच तिष्यरक्षिता ह्या दुष्ट राणीच्या कारस्थानांनी बोधिवृक्ष कसा वठला व मृत झाला याविषयी महावंसाची पानेच्या पाने भरली आहेत. अर्थात ह्यामुळे लंकेतीत्त आनंद बोधिवृक्ष हा बुद्धाच्या बोधिचे एकमेव जिवंत प्रतिक शि क राहतो. अशोकाच्या आयुष्याची शेवट सुरू होते पंचवार्षिक पावसाळी उत्सवाने. ह्या संमेलनाचे मूळ बुद्धपूर्व असण्याची शक्यता आहे. पण यामुळे इतर बौद्ध व बुद्धांप्रती सहानुभूती असलेल्या राजांसाठी एक आकृतीबंध तयार झाला. त्यानंतर आठशे वर्षांनी सम्राट हर्षवर्धनाने प्रयाग येथे असाच एक पंचवार्षिक उत्सव आयोजित केला आणि त्यात मोठ्या प्रमाणात सोने, चांदी व इतर दानवस्तु इत्यादी गत पाच वर्षात गोळा केलेली संपत्ती हजारो पुरोहीत व भिक्षु यांना दान केली. चिनीप्रवासी ह्युएन-त्संग ह्या समारंभाचा साक्षीदार होता. ह्युएन-त्संगने बौद्ध चष्म्यातून केलेल्या वर्णनानुसारही असे दिसते की सर्व धर्मांना सारखे प्रतिनिधित्व व सारखी वागणूक मिळेल याची हर्ष काळजी घेत असे. अशोकाचा पंचवार्षिक

उत्सव मात्र फक्त बौद्धांसाठी होता असे दिसते कारण त्यात त्याने त्याच्या राज्यापासून त्याचा मुलगा कुणालापर्यंत सर्वकाही संघाला दान केले.

अर्थात ही दाट शक्याता आहेच की अशोकावदान व आचार्य तारानाथाचा इतिहास यावर बौद्ध रंग चढवला गेला होता. पण सर्वसामावेशकतेच्या पुराव्याअभावी आपल्याला हे गृहीत धरावे लागेल की उत्तर परंपरेत वर्णन केल्याप्रमाणे अशोक वागला होता. असा उघड उघड पक्षपात ब्राह्मण, जैन, आजीवक व इतर अबोद्ध पंथांना अजिबात रूचला नसणार. सम्राटाच्या बौद्धांवरील म्जीचा सर्वात जास्त परिणाम सनातन ब्राह्मणांवर होत होता कारण बहुसंख्य बौद्ध भिक्षु ब्राह्मणांमधूनच येत असत. शाक्यमुनी बुद्धाचे पहिले शिष्य ब्राह्मण होते आणि तो कल टिकून होता. जितके जास्त ब्राह्मण बौद्ध होत तितका ब्राह्मण समाज कमजोर होत होता. त्यावर प्रतिक्रिया अपरिहार्य होती.

अशोकाच्या पहिल्या पंचवार्षिक उत्सवानंतर अशोक “वेगवेगळ्या अत्तरांनी भरलेल्या सोने, चांदी, स्फटीक, वैदूर्यमणि (लेहसुनिया) यांच्या पाच हजार भांड्यातून चंदन, केशर व कापूरयुक्त दूथाने” बोधिवृक्षाला अशिषेक करण्यासाठी त्याच्याभोवती उभारलेल्या खास व्यासपीठावर चढला. हे वर्णन सांची महास्तूपाच्या पूर्व तोरणावरील खालच्या आडव्या पट्टीवर असलेल्या दृश्याशी मिळतेजुळते आहे. ही घटना इ. पू. २४० ची असावी. हा पंचवार्षिक समारंभ असल्याने यानंतरचा उत्सव इ. पू. २३५ ला झाला असावा.

पण इ. पू. २३९ ला अशोकाची पट्टराणी व सुंदर डोळे असलेल्या कुणालाची आई असंधिमित्रा हिचे निधन झाले. तिची जागा चार वर्षांनी तिष्यरक्षितेने (तिस्सरक्खिता) घेतली. तिला उत्तर व दक्षिण अशा दोन्ही परंपरेत कपटी पाखंडी व बौड़विरोधी दाखवले आहे-- प्रथम ती बोधिवृक्षाला वठवते. त्यानंतर तिच्याशी अनैतिक संबंध ठेवण्यास नकार देणाऱ्या कुणालला अंध करते. कुणालला तक्षशिलेला बंड मोडण्यासाठी पाठवले गेल्यावर इकडे ती अशोकाची असाध्य पोटदुखी बरी करून त्याचे मन जिंकते. मग नकली राजाज्ञा पाठवून ती कुणालचे डोळे फोडते. पण कुणाल पाटलिपुत्राला परततो व त्याची कथा इतरांना माहीत होते. त्यानंतर तिष्यरक्षितेला मृत्युदंड दिला जातो. आंधळा कुणाल राज्य करण्यास असमर्थ असल्याने त्याचा मुत्तगा संप्रति (संपादिन) यात्ता राजगादीचा वारस घोषित करण्यात येते.

या कथेतील बराच भाग क नाविलास म्हणून दुर्लक्षित करता येतो. खरी मूळ बाब ही की ही नवी राणी दरबारातील कुणालविरोधक असलेल्या अबौद्ध पक्षाचे नेतृत्व करीत होती. हा पक्ष कुणाल तक्षशिलेत्ता असतांना बलवान झाला आणि कुणालाचे डोळे काढण्यात यशस्वी झाला पण नंतर त्यांचा कर उघडकीस आला, राणीला मृत्युदंड दिला गेला व तो पक्ष मोडून काढला गेला. या कथेसंबंधात ह्युएन-त्संग जे विवरण देतो ते इतरत्र सापडत नाही. राणीचा वध केल्यानंतर अशोक “त्याच्या मंत्र्यांची कानउघाडणी करतो, त्यांच्या दरबारातील सहायकांवर कारवाई करतो-- त्यांना निलंबित करतो वा तडीपार

करतो वा त्यांची पदावनती करतो वा त्यांचा वध करतो. अनेक संपन्न आणि बलवान कुटुंबांना तो देशाबाहेर हिमपर्वतांच्या ईशान्येकडे वाळवंटात हाकलून देतो.”

ह्या घटनांबरोबरच्च इतरही काही अगम्य घटना पाटलिपुत्रात घडल्या असाव्या. विकलांग सम्राट अशोकाने दुसरा पंचवार्षिक उत्सव आयोजित करण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या मंत्र्यांनी तो हाणून पाडता. अशोकवदानात याबद्दल असे लिहिले आहे की--

अशोकाने आधीच ८४,००० धर्माराजिक (स्तूप) बांधले होते आणि प्रत्येकाला १,००,००० सुवर्णमुद्रांचे दान दिले होते. त्यानंतर त्याने १,००,००० सुवर्णमुद्रा प्रत्येकी लुंबिनीला, बोधिवृक्षाला, धर्मचक्रप्रवर्तनाच्या स्थानाला व बुद्धांच्या महापरिनिर्वाणांच्या स्थानाला दिल्या होत्या. नंतर त्याने पंचवार्षिक महोत्सवात ३,००,००० भिक्षुंच्या पाहुणचारावर ४,००,००० सुवर्णमुद्रा खर्च केल्या होत्या... तसेच, त्याने आर्यसंघाला ... ४,००,००० सुवर्णमुद्रा दिल्या होत्या. अशा प्रकारे त्याने बुद्धाच्या शिकवणुकीसाठी एकूण ९६ कोटी खर्च केले होते. नंतर मात्र अशोक आजारी पडला आणि मृत्यु नजीक आला आहे ह्या विचाराने उदास झाला.

कुक्कुटाराम (अशोकाराम) विहारात्ला अजून सुवर्णमुद्रा पाठवण्याच्या आजारी सम्राटाच्या आग्रहामुळे शेवटी मंत्री सिंहासनाचा नवीन उत्तराधिकारी संप्रतिकडे वळले. त्याने खजीनदाराला सम्राटाच्या सांगण्यावरून काहीही पैसे वितरण न करण्याचा आदेश दिला. सम्राटाच्या अधिकाराला हे सरळ-सरळ आव्हान होते, एक प्रकारे तो राजद्रोहच होता पण अशोक खूप विकलांग होता आणि त्याच्या मदतीला कुणीही आले नाही. आता तो खऱ्या अर्थाने राज्य करत नव्हता. आता राधागुप्त व इतर मंत्र्यांच्या मदतीने संप्रति (अधिकृतरित्या नाही तरी प्रत्यक्षात) मगधराज व भारताचा सम्राट झाला. बौद्ध संघाचा याला विरोध होता कारण त्यामुळे त्यांचा तलाभ कमी होणार होता.

ह्या वाढत चाललेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर सम्राट आपले शेवटचे दिवस मोजत होता. ह्युएन-त्संग अशोकाच्या कुक्‌ुकुसटाराम विहाराच्या अवशेषांना भेट देतांना त्याचे वर्णन करतो, “अशोक राजा मृत्युशय्येवर असतांना त्याला माहीत होते की तो आता बरा होणार नाही. त्याला त्याचे दागदागिने व हिरिजवाहीर सत्कर्मासाठी वापरायचे होते. पण त्याच्या बलशाली मंत्र्यांनी सत्ता ताब्यात घेतली होती व त्यांनी त्याला तसे करू दिले नाही.” यानंतर आवळ्याची दु:खद गोष्ट येते. अशोक उद्गार काढतो की आता त्याची सार्वभौम सत्ता केवळ अर्ध्या आवळ्यावर चालते आणि मग अशोक तो आवळा कुक्कुटारामच्या संघात्ता दान देतो. तिथे त्याचा चुरा करून त्याची सर्व भिक्षुंसाठी पेज बनवण्यात येते. त्यानंतर शेवटचे श्वास मोजत असतांना सम्राट सर्व पृथ्वी संघाला दान देतो व तसे दानपत्र तयार करतो, ते त्याच्या दातांनी सील्ल करतो व शेवटचा श्वास घेतो.

सर्व वर्णनांमधे सम्राटाचे शेवटचे दिवस व त्याच्या मंत्र्यांकडून केला गेलेला त्याचा अंत्यविधि यांचे वर्णन थोडक्यात करण्यात आते आहे. उत्तर परंपरेत मंत्री राधागुप्ताची भूमिका निर्णायक दाखवली आहे. राधागुप्त खजिन्यातून चार कोटी मुद्रा काढून संघाला देतो व संघाकडून पृथ्वी परत विकत घेतो. त्यानंतर मंत्रीगण संप्रतित्ला राज्याभिषेक करतात.

उत्तर परंपरेच्या ह्या वर्णनात गंभीर उणीवा आहेत. प्रधान राधागुप्त अशोकाच्या राज्यारोहणाच्या वेळीही मुख्य भूमिका पार पाडतो व त्याच्या अखेरीस एक्केचाळीस वर्षांनीही. सत्ता हडप करण्यात संप्रतिची काही महत्त्वाची भूमिका असेल हेही अविश्वसनीय वाटते कारण त्यावेळी तो लहान मुलगा होता. असे असावे की बौद्धविरोधी पक्षाने बौद्ध पक्षाशी काहीतरी तडजोड केली असावी.

दक्षिण परंपरा ज्याने धर्म श्रीलंकेत आणत्ता तो तिचा आवडता चक्रवती सम्राट त्याच्या शेवटच्या दिवसांबद्दल व राज्याच्या वारसाबद्दल संपूर्णपणे मौन आहे हे खूपच आश्चर्यजनक आहे. दीपवंस, महावंस व महावंसावरील अर्थकथा यांत याबद्दल काहीही लिहिलेले नाही. हे कानठळ्या बसवणारे मौन आहे. याचा कमीत कमी अर्थ असा की हे ग्रंथकर्ते जे काही झाले त्याबद्दल दुःखी होते. बौद्धांसाठी ही एक पिछेहाट होती.

याच्या इतकेच हेही महत्त्वपूर्ण आहे की पुराणांमधे अशोकानंतर कोण आले यात एकमत नाही. फक्त दोन नावे दोन वेगवेगळ्या पुराणात समान आहेत. ते म्हणजे दशरथ व संप्रति (पुराणानुसार संगत). आपल्यात्ता फक्त हीच बाब खात्रीशीररित्या ठाऊक आहे की नागार्जुनी येथील आजीवकांच्या गुफांतील्त दानपत्रात्मक शिलालेख दशरथाचा आहे. जैन धर्म स्वीकारलेला आणि पाटलिपुत्र व उज्जैन या दोन राजधान्यांवरून राज्य करणारा अशोकाचा नातू असा संप्रतिचा उ 'ख जरिशष्टीशलाकापुरूष या जैन ग्रंथात आहे ही एक महत्त्वपूर्ण बाब आहे.

यावरून आपण सर्वात योग्य अनुमान हे काढू शकतो की इ. पू. २३५ मधे नवीन राणी व दरबारातील बौद्धविरोधी पक्षाचा विरोधक युवराज कुणाल याला तक्षशिलेवर शासन करायला पाठवण्यात आले. त्याचा तान्हा मुलगा संप्रति याला पाटलिपुत्रातच ठेऊन घेतले गेले. याच वर्षी अशोकाने दुसरा पंचवार्षिक महोत्सव साजरा करायची तयारी केली ज्याला खजिना खाली होण्याच्या चिंतेने प्रस्त मंत्रीगणांच्या पाठिंब्याने राणीचा विरोध होता. स्वतःच्या भविष्याची चिंता वाटून कुणालाने राजगादी बळकावण्याचा अयशस्वी प्रयत्न केला ज्यात त्याचे डोळे काढले गेले. पण याने राणीचा बौद्धविरोधी पक्षही मोडीत निघाला व तिला मृत्युदंड दिला गेला. या सर्व घटना अशोकाच्या ''एक न्यायी राजाः अशा प्रतिमेला काळीमा लावणाऱ्या होत्या तसेच बौद्ध संत अशा कुणालाच्याही ख्यातीलता हानीकारक होत्या. म्हणून त्या बौद्ध परंपरेतून काढून टाकण्यात आल्या. यावरून हे स्पष्ट होते की तीन

पुराणांमधे कुणात्त अशोकाचा वारसदार म्हणून का येतो व त्याचा कार्यकाल का सांगितला जात नाही.

या महान सप्राटाच्या मृत्युनंतर गादीवर आलेल्या ललहानग्या संप्रतिकडून सत्ता काबीज करण्यासाठी अशोकाच्या मुलांमधे सुंदोपसुंदी सुरू झाली. यात बहुतेक दशस्थाचा विजय झाला असावा. बात संप्रतिलला मांडीवर घेऊन तो राज्य करीत असण्याचीही शक्याता आहे. पण तो ब्राह्मण व बौद्ध दोहोंनाही नकोसा होता कारण तो आजीवकांचा अनुयायी होता. दशरथाने जास्तीत जास्त आठ वर्षे राज्य केले. त्यानंतर परत एकदा सत्तासंघर्ष झाला. यात बौद्धांनी त्यांचे वजन कुमारवयीन संप्रतिच्या पारड्यात टाकले. पण संप्रति जैनांचा अनुयायी झाला. त्यामुळे त्याच्या चुललत भावाने (शालिशुक, सलिसुक) त्याला पाटलिपुत्राच्या बाहेर घालवले आणि आपली राजधानी उज्जैनला नेणे त्याला भाग पडले.

हा ब्राह्मणी प्रतिकाराचा भाग होता की नाही हे सांगता येत नाही पण अशोकानंतर एका दशकातच त्याच्या बलशाली साम्राज्याचे चार-पाच प्रादेशिक राज्यांत तुकडे झाले आणि त्यावर त्याची मुले किंवा नातू राज्य करू लागली. यात काश्मीस्चा जालुक होता ज्याने त्याच्या पित्याचे धोरण बदत्लून शेवांना राजाश्रय दिला. त्याने तत्कालिन मौर्य साम्राज्याच्या वायव्येतील दुर्बलतेचा फायदा घेत तक्षशिला ताब्यात घेऊ पाहणाऱ्या ग्रीको-बॅक्ट्रीयनांना पराभूत केले.

अशोकानंतर चाळीस वर्षांपर्यंत, शतधनवान राजा बनेपर्यंत, मौर्य राजांच्या नावांबद्दल अनिश्चितता आहे. शेवटून दुसरा मौर्य राजा शतधनवानबद्दल सर्व पुराणांचे एकमत आहे पण त्याचे राज्य मगधापलिकडे असण्याची शक्यमता कमीच आहे. पुराणांमधे बृहद्रथ या शेवटच्या मौर्य राजाबद्दलही एकमत आहे. याचा अशोकानंतर पन्नास वर्षांनी इ. पू. १८३च्या आसपास शुंग सेनापती पुष्यमित्र याने खून केला.

पुष्यमित्र शुंगाने मध्यवर्ती ब्राह्मणी वर्चस्व प्रस्थापित करणे सुरू केले. हिंसक बौद्धविरोधक अशी त्याची ख्याती झाली. त्याने कुक्कुटाराम, देवरकोठार, भारहूत आणि सांची अशा अनेक बौद्ध स्मारकांचा विध्वंस केला. पण नंतर तो किंवा त्याचा उत्तराधिकारी अग्निमित्र (इ. पू. १५०-१४२) याने परत एकदा बौद्धांना राजाश्रय देणे सुरू केले. हेच धोरण पुढील शुंग राजांनीही चालू ठेवले.

पण शुंगांच्या उदयाआधीच अशोकाच्या मृत्युनंतरच्या गोंधळाचा फायदा घेत अनेक स्थानिक राज्ये स्वतंत्र होऊ लागली होती. कलिंगच्या दक्षिणेला व पूर्वेला असलेले सातवाहन यात सर्वात यशस्वी झाले. साधारणतः इ. पू. १८० पासून सहावा सातवाहन राजा सातकर्णी (इ. पू. १८० ते १२४) याने शुंगांना, ग्रीकांना व कलिंगांना मागे ढकलायला सुख्वात केली. लवकरच तो मध्य व दक्षिण भारतातील सर्वात बलशाली राजघराण्याची

स्थापना करण्यात यशस्वी झाला. कमीत कमी काही सातवाहन तरी उघड उघड बौद्ध होते किंवा बौद्धांचे आश्रयदाते होते.

यापैकी काही शुंग व सातवाहनांच्या सहिष्णुतेमुळे आज आपल्याला आज भारहूत, अमरावती आणि सांचीच्या शि चे वैभव पहायला मिळते आहे. भारहूतमधे अशोकाचे उघड अस्तित्व नाही. यात काही आश्चर्य वाटायत्ता नको कारण शुंग घराण्याच्या संस्थापकाने मौर्य घराण्याला हिंसक पद्धतीने संपवले होते. तरीही भारहूतच्या स्तूपाच्या कुंपणाच्या शेजारी बुद्धाचे अस्थि अवशेषाचे पात्र घेऊन हत्तीवर बसलेल्या राजाचे शि हे अशोकाला केलेले गुप्त अभिवादन असण्याची शक्यऊता आहेच.

एका शुंगाने सांचीचा विध्वंस केला तर त्याच्याच वंशजाने सांचीचा जीर्णोद्धार केला. तेथील स्मारकांत वाढही केली. पण नंतर सातवाहनांचे राज्य आले आणि सातवाहन सातकर्णींच्या काळात चार भव्य तोरणे (प्रवेशद्वार) उभारली गेली. ह्या महान कलाकृती इ. पू. १५७च्या आधीच्या असणे शक्यन नाही. त्यामुळे अशोकाबइल प्रत्यक्ष माहिती शिं कारांना नसणार. दुसर्यां कडून मिळालेल्या माहितीतून त्याच्या आठवणी मात्र इतक्या ताज्या नक्कीच असतील की त्याची व्यंगे लोकांच्या लक्षात असावी. त्यामुळे त्यांनी त्याला तो जसा असेल तसा म्हणजे ठेंगणा, जाड चेहर्यायचा व तणावाखाली चक्कर येऊन पडणारा कमजोर शरीराचा राजा असा दाखवला. अमरावतीला मात्र त्याच्या स्मृती जगावर उपकार करणारा, काहीसा क नेतला आदर्श चक्रवर्ती राजा अशा होत्या. (सांचीतील्त शिं 1त) चक्कर येणारा सम्राट येथे दिग्विजयी धर्मराजा म्हणून दाखवला गेला.

आयुष्याच्या शेवटच्या वर्षांची शोकांतिका होऊनही अशोकाचे यश यात आहे की त्याने नैतिकतेचा विजय हा आदर्श स्वीकार्य बनवत्ता व ही कना आजही आशियात अनेक ठिकाणी अस्तित्वात आहे. काहींच्या मते बौद्ध धर्माचा स्विकार करणे, त्याला राजाश्रय देणे, अडचणीच्या काळात मदतीचा हात देणे, त्याचा संपूर्ण उपखंडात व बाहेरही प्रसार करणे आणि त्याला काही अंशी आकार देणे हे अशोकाचे सर्वात मोठे कार्य होते. अशोकाने एक छोटा संप्रदाय जागतिक धर्मात परिवर्तित केला. पुढील सहा- सात शतकात भारताच्या मोठ्या भागात बौद्ध धर्माचा भरभराट झाली. भारतातील बहुसंख्य लोक बुद्धानुयायी झाले. जेथे बौद्ध संघाला स्थानिक राजे व व्यापारी समुदायाचे पाठबळ लाभले तेथे त्याची पाळेमुळे खोलवर गेली. हूण राजांचा तसेच सिंहवर्मा, तरिलोचन, बंगालचा शशांक या ब्राह्मण राजांचा अत्याचार सहन करूनही बौद्ध धर्म टिकून राहिला. बंगालच्या शशांकाला शेवटी सप्राट हर्षवर्धनने नेस्तनाबूत केले. हर्षवर्धन हा कदाचित सप्राट अशोकाचे चक्रवर्ती सप्राट असे अनुकरण करणारा शेवटचा भारतीय राजा होता.

पण बोधिवृक्षाप्रमाणेच बौद्ध धर्मालाही नवीन भूमीची गरज होती जी त्याला लंका, नेपाळ, गांधार व हिमालयाच्या उत्तरेला मिळाली. येथे धर्माने राज्य करणारा चक्रवती सम्राट असा अशोकाचा आदर्श टिकून राहिला. भारतात बौद्ध धर्म तांजरिकांच्या मगरमिठीता

बळी पडला. आठव्या शतकात आदी शंकराचार्यांनी त्यांचा दिग्विजय सुरू केला तेव्हा बौद्ध धर्म बराचसा प्राणहीन झाला होता. या समाजसुधारकाचा उद्देश बौद्धाप्रती हिंसाचाराचा अजिबात नव्हता कारण त्याची तशी गरज नव्हती. ब्राह्मणी धर्म बौद्ध धर्माकडून बरेच काही शिकला आणि त्याची उत्क्रांती आजच्या हिंदु धर्मात झाली. पुरोहितांच्या देखरेखीखाली होणाऱ्या हिंसक यज्ञांची जागा भक्तीने घेतली; जुन्या अप्राप्य देवदेवता आजच्या भारतातल्या लाडक्या कृष्णासारख्या सौम्य देवांमधे रूपांतरीत झाल्या; अगदी बुद्धसुद्धा विष्णुचा (फसवा का असेना) नववा अवतार म्हणून स्वीकारता गेला. यामुळे बौद्ध धर्माची ही हानी झाली की त्यांची पवित्र स्थळे गिळंकृत करण्यात आली, त्याचा इतिहास पुसून टाकला गेला आणि जे बौद्ध मताला चिटकून राहिले त्यांना अस्पृश्य मानण्यात आले. शंकराचार्यांच्या दिग्विजयानंतर, विशेषतः दक्षिण भारतात, ब्राह्मणांचे वर्चस्व अबाधित राहिले आणि जातीयतेचा शाप या देशाच्या विकासात अडथळा ठरत राहिला.

ऑगष्ट २०९७ मधे प्राचीन नालंदा विद्यापीठाच्या जागी एक आंतरराष्ट्रीय नालंदा विद्यापीठ स्थापन करण्यासाठी भारताच्या संसदेत एक असाधारण बिल मांडले गेले. हे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी व चालवण्यासाठी भारत, चीन, जपान, सिंगापूर व इतर दक्षिण व दक्षिण-पूर्व आशियातील देश शंभर कोटी अमेरीकन डॉलर्स गोळा करीत आहेत. हे निवासी विद्यापीठ असेल व त्यात पाच भाग असतील-- आंतरराष्ट्रीय संबंध व शांतता, भाषा व साहित्य, पर्यावरण शास्त्र, व्यवसाय व्यवस्थापन व विकास आणि बौद्ध अभ्यास. सरकारचे पाठबळ व आंतरराष्ट्रीय मदत यामुळे हे कार्य नुकतेच सुरू झाले आहे.

सरतेशेवटी सांगायचे म्हणजे, अनेकदा पायदळी तुडवूनही अशोकाचा आदर्श अजून जिवंत आहे.

परिशिष्ट 1

अशोकाचे शिलालेख

चौदा शिलालेख ((२०ल९ हांला)

अगदी मामुली फरकाने हे चौदा शिलालेख गिरतार, कालसी, शहाबाझगढी व मतसेहरा येथे आढळत्तात. सोपारा व एर्रागुडी येथे यांचे काही तुकडे सापडतात. येथे गिरतारच्या शिलालेखाचे भाषांतर देण्यात येत आहे. इतरत्र दोन ठिकाणी, धौली व जौगाडा येथेही हे सापडतात पण त्यात शिलालेख ११, १२, १३ (RE 11, 12, 13) ताहीत. त्यासाठी पुढे कलिंगचे शिलालेख पहा.

शिलालेख १

हा धर्मलेख देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याने लिहून घेत्तला. माझ्या राज्यात कुठल्याही प्राण्याला मारू नये वा त्याचा बळी दिला जाऊ नये. उत्सवांचे आयोजन करू नये कारण देवांना प्रिय राजा प्रियदर्शील्ता या उत्सवात बरेच दोष दिसतात, जरी हे खरे असले की काही उत्सव देवांना प्रिय राजा प्रियदर्शीला योग्य वाटतात. पूर्वी देवांना प्रिय राजा प्रियदर्शीच्या पाकशाळेत रोज लाखो जीव मारले जायचे. आता रोज फक्त दोन मोर व एक हरीण मारले जाते. त्यातही कधी कधी हरीण मारले जात नाही. पुढे हे तीन प्राणीही मारले जाणार नाहीत.

शिलालेख २

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याच्या राज्यात सर्वत्र व त्याचप्रमाणे त्याच्या शेजारच्या राज्यात म्हणजे चोल, पांड्य, सत्यपुत, केरळपुत्र, ताम्रपर्णी या राज्यांतून आणि एंटिओक या यवनराजाच्या व जे त्याच्या शेजास्चे राजे आहेत त्या सर्वांच्या देशांतून, देवांचा प्रिय प्रियदर्शी याने मनुष्यांसाठी व पशूंसाठी अशा दोन्ही प्रकारच्या वैद्यकीय उपचारांची व्यवस्था केली आहे. मानव व पशू यांना उपयोगी अशा औषधी वनस्पती जेथे-जेथे नाही तेथे-तेथे मी

त्या बाहेरून आणून लावल्या आहेत. तसेच औषधी कंदमुळे व फळे जेथे-जेथे नव्हती तेथे-तेथे ती बाहेरून आणून लावती आहेत. रस्त्याने प्राणी व मनुष्य यांच्यासाठी झाडे लावली आहेत व विहिरी खोदल्या आहेत.

शिलालेख ३

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की, राज्यारोहणानंतरच्या बाराव्या वर्षी मी ही आज्ञा दिली आहे की माझ्या राज्यात सर्वत्र युक्त, रज्जुक व प्रादेशिक या अधिकाऱ्यांनी दर पाच वर्षांनी धर्म-शासनासाठी व त्याचप्रमाणे इतर कामांसाठी दौरा करावा.

आईबापांची सेवा करणे चांगले, तसेच मित्र, परिचित, नातेवाईक, श्रमण- ब्राह्मण यांना दान देणे चांगले. जीवहिंसा न करणे चांगले, खर्चात व संचयात संयम करणे ही चांगली गोष्ट आहे. परिषद ही युक्त अधिकाऱ्यांना याच शब्दात या आज्ञांच्या 'पालनाबाबत आज्ञा देईल.

शिलालेख ४

शतकानुशतके प्राण्यांचा वध, जिवांची हिंसा, नातेवाईक व श्रमण-ब्राह्मण यांचा अनादर वाढत आला आहे. पण आता देवांना प्रिय राजा प्रियदरशीमुळे नगाऱ्याच्या आवाजाची जागा धर्म-घोषाने घेतली आहे. विमाने, मंगल हत्ती, अग्निज्वाला व इतर देवी दृष्ये दिव्यरुपे अनेक शतके दिसत नव्हते. पण आता ते दिसू त्तागले आहेत कारण देवांचा प्रिय राजा प्रियदर्शी जिवीत प्राण्यांची हत्या व त्यांना क्रूर वागणूक यांचा विरोध करतो आणि नातेवाईकांशी योग्य व्यवहार, श्रमणःब्राह्मण यांचा सन्मान, मातापित्याची तसेच वृद्धांची सेवा यांना प्रोत्साहन देतो.

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी हे व दुसरे अनेक प्रकारचे धर्माचरण यांना उत्तेजन देतो आणि तो या धर्माचरणाला आणखीही वाढवील. देवांना प्रिय राजा प्रियदर्शीचे पुत्र, नातू, पणतू हेही या धर्माचरणाला अनंत काल वाढवतील तसेच धर्म आणि शील यांचे पालन करीत धर्माची शिकवण देतील. धर्माचा प्रचार सर्वश्रेष्ठ कार्य आहे. दुःशील व्यक्तीकडून धर्माचरण घडत नाही. यासाठी धर्माचा प्रचार-प्रसार प्रशंसनीय आहे.

माझ्या उत्तराधिकाऱ्यांनी या बाबींना प्रोत्साहन द्यावे व त्यांचा हास होऊ देऊ नये या उद्देशाने हा लेख लिहिला आहे. हा लेख देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याने राज्यारोहणाच्या बाराव्या वर्षी लिहून घेतला.

शिलालेख

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की, चांगते कार्य करणे कठीण असते. जो कोणी प्रथम सत्कृत्य करतो तो कठीण काम करतो. मी अनेक सत्कृत्ये केली आहेत आणि जर माझे मुलगे, नातू, पणतू व त्यांच्यानंतर्चे वंशज क ंतापर्यंत तसेच करीत राहतीत्त तर खूप पुण्यकृत्य करतील. पण जे कोणी यात निष्काळजीपणा दाखवतील ते पाप होईतत. खरेच, पाप करणे सोपे आहे.

पूर्वी घर्म-महामात्र (धम्म-अमात्य) नव्हते; पण मी माझ्या राज्यारोहणानंतर तेराव्या वर्षी मी त्यांची नेमणूक केली आहे. आता ते सर्व संप्रदायात धर्माचा प्रसार करण्यासाठी, धर्माची वृद्धी करण्यासाठी, धार्मिकांच्या हितासाठी व सुखासाठी कार्य करत आहेत. ते यवन, कंबोज, गांधार, राष्ट्रीक, प्रतिषठ्ठानिक तसेच सीमाप्रदेशात काम करीत आहेत. ते सैनिक, सरदार, ब्राह्मण, गृहस्थ, गरीब आणि वृद्ध यांच्या व धर्मनिष्ठांच्या हितासाठी व सुखासाठी नेमले आहेत जेणेकरून त्यांना त्रास होऊ नये. ते कैद्यांना योग्य वागणूक मिळावी व त्यांची सुटका व्हावी म्हणून प्रयत्न करतात. जेव्हा अमात्यांना असे वाटले की “ह्याच्यावर कुटुंबाची जबाबदारी आहे,” “तो मोहात पडला,” “हा वृद्ध आहे” तेव्हा ते त्या कैद्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न करतात. ते येथे व इतर शहरांत, माझ्या भाऊबहिणी व नातेवाईक यांच्या अंतःपुरात काम करतात. हे धम्म-अमात्य माझ्या राज्यात कोण धर्माप्रति समर्पित आहे, कोण धर्मात प्रतिष्ठीत आहे आणि कोण दानशूर आहे हे बघतात.

हा धर्मलेख लिहिण्यामागचा हेतू हा आहे की ही व्यवस्था चिरकाल कायम राहावी आणि माझ्या वंशजांनी त्यानुसार वागावे.

शिलालेख ६

पूर्वी राज्यकारभाराची कामे वेळेवर होत नसत व राज्याची वित्तंबातमी सर्वकाळ राजाला मिळत नसे. पण आता मी अशी आज्ञा दिली आहे की केव्हाही, मी जेथे असेल तेथे-- जेवत असलो तरी, अंतःपुरात असलो तरी, शय्यागृहात असलो तरी, रथात असो वा पालखीत, उद्यानात वा इतरत्र कुठेही-- बातमीदारांनी मला येऊन प्रजेच्या संदर्भातील कुठलीही बाब असेल तर ती माझ्या निदर्शनास आणावी जेणेकरून मी प्रजेचे काम सर्व ठिकाणी करू शकेल. दान किंवा इंतर कामाबद्दल मी मौखिक आदेश दिला असेल; घधम्म-अमात्यांना एखादे तातडीचे काम असेल किंवा परिषदेत काही मतभेद वा वाद उपस्थित झाला तर तात्काळ मी कोठेही असलो तरी तसे मला कळविण्यात यावे असा आदेश मी दिलेला आहे. मी (यासंबंधात) कितीही कष्ट केले व कितीही कार्य केले तरी माझे समाधान होत नाही. खरेच, जनकल्याण मी आपले कर्तव्य मानतो आणि तेच माझ्या परिश्रम व कार्य

यांच्या मुळाशी आहे. सर्व लोकांच्या कल्याणापेक्षा श्रेष्ठ दुसरे कार्य नाही. मी जो काही प्रयास करतो तो यासाठी की सर्व प्राण्यांचा कणी आहे. सर्व लोकांना ह्या आयुष्यात सुखी करावे आणि परलोकातही सदूती मिळावी ह्यातच माझ्यावरच्या उपकारांची परतफेड आहे.

हा धर्मलेख यासाठी लिहून घेतला आहे की तो चिरकाळ टिकावा आणि माझे मुलगे, नातू, पणतू यांनी सर्व विश्वकल्याणासाठी प्रयत्रशीलत असावे. पण हे काम महद्प्रयासाशिंवाय कठीण आहे.

शिलालेख ७

देवांना प्रिय राजा प्रियदर्शीची मनीषा आहे की सर्व धर्मांनी (संप्रदायाच्या लोकांनी) सगळीकडे रहावे, कारण सर्व धर्म आत्मसंयम व चित्तशुद्धीची शिंकवण देतात. पण लोकांच्या वेगवेगळ्या आशाआकांक्षा असतात व त्यामुळे त्यांनी वांच्छीत सर्व काही किंवा त्यातील काही भागाचे पालन करावे. पण ज्याला मोठ्या देणग्या मिळतात पण जो असंयमित असेल, ज्याचे मन निर्मळ नसेल, ज्याच्यात कृतज्ञता व दृढ श्रद्धाभाव नसेल तो नीच व्यक्ती आहे.

शिलालेख ८

पूर्वी राजे मौजमजेसाठी सहलींवर जात असत आणि त्यांत शिकार व इतर मनोरंजन होत असे. पण देवांना प्रिय राजा प्रियदशर्शी त्याच्या राज्यारोहणाच्या दहा वर्षांनंतर संबोधिच्या यात्रेवर गेला व अशाप्रकारे त्याने धर्मयात्रा सुरू केल्या. या धर्मयात्रांत पुढील गोष्टी घडतात-- श्रमण-ब्राह्मण यांचे दर्शन व त्यांना दान, वृद्धांना भेटी व त्यांना सुवर्णदान उपदेश करणे, ग्रामीण भागातील लोकांना भेटी व, योग्य तेथे, त्यांना धर्मविषयक उपदेश किंवा धर्मचर्चा. यातच देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याला खरा आनंद होतो व हा त्याच्यासाठी एक वेगळाच महसूल आहे.

शिलालेख ९

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी सांगतो की, आजारपणात, पुत्र व कन्येच्या विवाह प्रसंगी, मूत्त जन्माच्या वेळी, प्रवासाला निघतांना व अशा इतर प्रसंगी लोक मंगलकृत्ये करीत असतात. विशेषकरून स्त्रिया अनेक अशिष्ट व निकामी कर्मकांडे करतात. अशा प्रकास्ची कर्मकांडे करावीत पण ती क्वचितच फलदायी असतात. धर्मकार्येच खरी महत्फले देतात. यात दास व सेवक यांच्याशी उचित व्यवहार, गुरूजनांविषयी आदर, भूतदया व

श्रमण-ब्राह्मण यांना दान ही कार्ये येतात. या व असल्या कृतीच धर्मकार्य होय. म्हणून पिता, पुत्र, बंधु, यजमान, मित्र, सोबती, फार काय पण शेजारीपाजारीही, यांनी असे म्हणावे, “हे सत्कृत्य आहे. जोपर्यंत इष्ट कार्य सिद्ध होत नाही तोपर्यंत ही करावयास पाहिजेत. हे मी करणार.” या जगात इतर कर्मकांडे आहेत जी संदिग्ध आहेत-- त्यांच्यामुळे इष्ट कार्य सिद्धीस जाईल किंवा नाही आणि गेले तरी त्यांचे परिणाम इहलोकापुरतेच असतात. पण धर्मकार्य सार्वकालिक आहेत. इहलोकात नाही तरी परलोकात त्यापासून अनंत पुण्य लाभते. इहलोकी इष्ट कार्य सिद्ध झाले इहलोकी व पर्लोकीही प्रचुर पुण्यललाभ होतो.

शिलालेख १०

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी प्रसिद्धी वा कीर्ती यांना फारशी किंमत देत नाही. तो प्रसिद्धी किंवा कीर्ती यांची कामना करतो ती केवळ एवढ्यासाठी की वर्तमानात व भविष्यात प्रजेने धर्माचा आदर करावा व धर्माचे पालन करावे. देवांना प्रिय राजा प्रियदर्शी जे काही प्रयत्न करतो ते लोकांचे परतोकात कल्याण व्हावे व पाप कमी व्हावे यासाठी. सत्कर्माचा अभाव ही एक विपत्ती आहे. व्यक्ती लहान असो की मोठी, सर्वांसाठी हे मोठ्या प्रयत्नांनीच शक्यी आहे व त्यासाठी इतर बाबींचा त्याग करावा लागतो. खरे तर, हे मोठ्या त्ोकांना अधिकच दुष्कर आहे.

शिलालेख ११

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी सांगतो की, धर्माच्या दानासारखे दुसरे दान नाही. धर्माच्या सोबतीसारखा दुसरा सखा नाही. धर्माच्या औदार्यासारखे दुसरे औदार्य नाही, धर्माच्या नात्यासारखे दुसरे नाते नाही. धर्म म्हणजे काय --दास व सेवक यांच्याशी उचित वर्तन; माता-पित्याची सेवा; सखेसोबती, नातेवाईक, श्रमण-ब्राह्मण यांना दान आणि जीवहत्या न करणे. म्हणून पिता, पुत्र, मालक, मित्र, सहचर व शेजारी यांनी म्हणावे, “हे कल्याणकारी आहे, असे करावे”. धर्माचे दान देणाऱ्याचे इहलोकी व परलोकी दोन्हीकडे कल्याण होते.

शिलालेख १२

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी सर्व संप्रदायांच्या संन्यासी व गृहस्थांचा दान वगैर विविध प्रकारे सन्मान करतो. पण देवांना प्रिय राजा प्रियदर्शीं या भेटवस्तू वा इतर सन्मानांना महत्त्व देत नाही. त्यातला असे वाटते की सर्व संप्रदायांच्या तत्त्वांची वृद्धी व्हावी.

संप्रदायाच्या तत्त्वांची वृद्धी अनेक प्रकारांनी करता येते पण वाणीचा संयम तिच्या मुळाशी आहे. अर्थात, माणसाने केवळ स्वतःच्याच संप्रदायाचा आदर व दुसर्यी संप्रदायाची निष्कारण निंदा करु नये. टीका करण्यासारखे कारण असेल तर ती सौम्य असावी. पण इतर संप्रदायांचा आदर करणे चांगले. असे केल्याने स्वतःच्या संप्रदायाची उन्नती होते व दुसऱ्या संप्रदायाचेही हित होते. याउत्तट वागल्याने स्वत:च्या संप्रदायाचीही आणि दुसऱ्या संप्रदायाचीही हानी होते. आपल्या संप्रदायाच्या आसक्तीपोटी 'मी माझ्या संप्रदायाचे उदात्तीकरण करेन* असे समजून जो आपल्या संप्रदायाची प्रशंसा व इतर संप्रदायांची निंदा करतो तो वस्तुत: स्वतःच्याच संप्रदायाची हानी करतो. म्हणून (सर्व संप्रदायांनी) मिळूनमिसळून राहणे चांगले. दुसर्यास संप्रदायांची शिकवण लक्ष देऊन ऐकावी. देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याची अशी इच्छा आहे की सर्वांनी इतरांच्या संप्रदायाच्या शिकवणीतील चांगल्या तत्त्वांची माहिती करून घ्यावी.

आपल्या संप्रदायात समाधानी असणाऱ्यांना असे सांगावे-- देवांना प्रिय राजा प्रियदर्शी भेखस्तू वा इतर सन्मानांना महत्त्व देत नाही. त्याला असे वाटते की सर्व संप्रदायांच्या तत्त्वांची वृद्धी व्हावी. यासाठी अनेक धम्म-अमात्य, अंतःपुरात कार्य करणारे धम्म- अमात्य, दूरच्या प्रदेशासाठी नेमलेले अधिकारी व इतर अधिकारी नेमण्यात आले आहेत. याचा परिणाम असा आहे की आपला संप्रदाय वाढतो व धर्माचाही विकास होतो.

शिलालेख १३

राज्यारोहणानंतर आठ वर्षांनी देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याने कलिंग देश जिंकला. या युद्धात दीड लाख देशोधडीला लागले, एक लाख मारले गेले व यापेक्षा कितीतरी अधिक इतर कारणांनी मृत्यु पावले. कलिंगविजयानंतर देवांना प्रिय राजा धर्मभीरू झाला, तो धर्मकार्य व धर्मानुशासन यांत रमू लागला. आता देवांना प्रियला कर्लिंगविजयाबद्दल अत्यंत पश्चाताप होत आहे...

खरोखरच देवांना प्रिय राजा प्रियदर्शीत्ता नवीन प्रदेश जिंकतांना ज्या हत्या, मृत्यु व बळजबरीचे स्थलांतर होते त्यामुळे अत्यंत यातना होतात. याहीपेक्षा जास्त यातना त्याला होते कारण त्या ठिकाणी असणारे श्रमण-ब्राह्मण व इतर संप्रदायांचे लोक असतात जे श्रमण-ब्राह्मणांची सेवा, मातापित्यांची सेवा, गुरूंची सेवा, मित्र, परिचित, नातेवाईक, दास व सेवक यांच्याशी उत्तम आचरण ठेवतात. ते अ्रद्धाळू असतात. अशा लोकांचा नाश व वध किंवा त्यांना प्रियजनांचा वियोग होतो. किंवा ते स्वत: सुरक्षित रहातात पण त्यांचे मित्र, परिचित, नातेवाईक यांच्यावर संकट आल्लयाने त्यांनाही फार पीडा होते. (युद्धामुळे) अशी

अनेक संकटे जवळपास सर्वांच्या वाट्यात्ता येतात. यामुळे देवांना प्रिय राजाला विशेष दुःख होते. कारण, यवन (ग्रीक) सोडला तर असा कोणताही देश नाही की जेथे सर्व संप्रदायात श्रमण-ब्राह्मण नाहीत. आणखी असा कोणताही देश नाही जेथे मनुष्य कोणत्या ना कोणत्या संप्रदायाला मानीत नाही. म्हणून कलिंग युद्धाच्या वेळी जितकी माणसे मारली गेली किंवा देशोधडीला लागली, त्याच्या शतांश किंवा सहस्रांश जरी आता मारली गेली किंवा देशोधडीत्ता लागली तरी देवांना प्रिय राजाला खूप दुःख होते. याशिवाय यावेळी देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याला जर कोणी अपकार केरील तरी जर तो क्षमेला पात्र असल्यास राजा त्याला क्षमा करील.

वनवासी लोकांवरही देवांना प्रिय राजा प्रियदर्शीं सदेव कृपादृष्टी ठेवत आहे आणि त्यांना युक्तीवादाने सन्मार्गाला आणण्याचा प्रयत्न करीत आहे. पश्चातापदग्ध असला तरी राजाला शिंक्षा करण्याचा अधिकार आहे हे त्यांना सांगण्यात येते जेणेकरून त्यांना त्यांच्या दुष्कृत्याची ललाज वाटावी व त्यांचा वध होऊ नये. खरोखरच देवांना प्रिय राजा प्रियदर्शी सर्वांप्रति अहिंसा, संयम व न्याय बाळगू इच्छितो, अगदी गुन्हा घडला असला तरी.

आता देवांना प्रिय राजाला धर्मविजयच खरा विजय वाटतो... हा धर्मविजय त्याने येथे, येथून शेकडो योजने दूर एटिओक नावाच्या यवन राजाच्या राज्यात मिळवित्ता आहे, तसेच टॉलेमी, एटीगोनस, मगस व अलेक्झांडर या चार राजांच्या राज्यात व दक्षिणेत चोल, पांड्य व ताम्रपर्णी येथेही धर्मविजय मिळविता आहे. त्याचप्रकारे येथील साम्राज्यात यवन, कांबोज, नाभक, नाभपंक्ति, भोज, पितिनिक, आंध्र व पुलिंद यांच्यात सर्वत्र देवांना प्रिय राजाच्या धर्मदेशनेनुसार ल्लोक वागतात. जेथे देवांना प्रिय राजाचे दूत पोहोचू शकत नाहीत, तेथेही देवांना प्रिय राजाचे धर्माचरण, धर्मविधान आणि धर्मदेशना यांच्याबद्दल ऐकून तललोक धर्माचरण करीत आहेत व पुढेही करतीत्त. अशा प्रकारे जो सर्वत्र धर्मविजय होत आहे. हाच विजय खरोखर आनंद देणारा आहे. धर्मविजयापासून मिळणार आनंद महान असतो. पण तो आनंदही गौण आहे. देवांना प्रिय राजा पारलौकिक कल्याणाला अधिक महत्त्व देतो.

मी हा धर्मलेख ह्यासाठी लिहवून घेतला आहे की माझी मुले, नातू, पणतू, खापर-पणतू यांनी नवीन मोहिमा काढू नये किंवा सैन्य मोहिमा काढल्याच तर संयम बाळगावा, तसेच कठोर शिक्षा देऊ नये किवा त्यापेक्षाही उत्तम म्हणजे त्यांनी केवळ धर्मविजय मिळवावा कारण त्याचा लाभ इहलोकी व परलोकी अशा दोन्ही ठिकाणी होतो.

शिलालेख ९४

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी याने हे धर्मदेश लिहून घेतले आहेत-- काही संक्षिप्त, काही मध्यम तर काही विस्तृत स्वरूपात आहेत. सर्व जागी सगळ्या बाबी लिहिलेल्या

नाहीत कारण माझे साम्राज्य फार विस्तृत आहे; बरेच लिहिले गेले आहे व पुढेही लिहिण्यात येईल. काही गोष्टींच्या माधुर्यांमुळे त्यांची पुनरुक्ती झाली आहे जेणेकरून लोकांनी त्यासारखे आचरण ठेवावे. या लेखात काही अपूर्णता राहिली असली तरी तिचे कारण स्थानिक कारणे, उद्देशाला लक्षात घेऊन किंवा लिपिकाचा दोष होय.

***

कलिंग शिलालेखांना स्वतंत्र शिलालेख (Separate Rock Edicts) असेही म्हणतात.

हे ओडिशात धौली व जोगाडा येथे आढळतात जेथे ते शिलालेख ११, १२ व २३ ची जागा घेतात. कर्नाटकातील सन्नाती येथे ते अपूर्ण अवस्थेत सापडतात.

कलिंग शिलालेख १

देवांना प्रियच्या सांगतो की तोसत्ती नगरात असलेल्या महामात्रांस, जे तेथील न्यायाधिकारीही आहेत, आदेश द्यावा-- मला जे योग्य वाटते त्याची उचित प्रकारे कार्यवाही व्हावी. तुम्हाला आदेश देऊन हे मला साधता येईल असे मला वाटते. तुम्हाला हजारो लोकांवर अधिकारी नेमले आहे जेणेकरून तुम्ही सर्वांची मने जिंकावी.

सर्व माणसे मला मुलासारखी आहे. माझ्या पुत्रांसाठी माझी जी कामना आहे, आणि त्यांचे इहलोकी व परतोकी कल्याण व्हावे ही माझी इच्छा आहे, तिच कामना मी सर्व मनुष्यांसाठी करतो. ही माझी कामना तुमच्या लक्षात येत नाही आणि ज्यांच्या ही कामना लक्षात येते त्यांना माझ्या सद्भावनेच्या तीव्रतेचे आकतन होत नाही.

तुम्ही इकडे लक्ष द्यावे. असेही होऊ शकते की निरपराध व्यक्तीला कैदेत टाकण्यात येते किंवा त्याच्यावर जुलूम होतो किंवा त्याची हत्याही होते, तेव्हा अनेक दुःखी होतात. म्हणून तुम्ही न्यायाने वागले पाहिजे. ईर्ष्या, क्रोध, क्रौर्य, डेष, निष्ठरता, आळस व सुस्ती यांमुळे (न्यायाने) वागणे होते नाही. तुम्ही लोकांनी "असे दोष मला जडू नये" हे ध्येय ठेवले पाहिजे. हे अक्रोध व संयम यामुळे शक्य. होते. ज्यांना न्यायदानाचा कंटाळा आहे त्यांना पुढे बढती मिळणार नाही. (ज्यांना कंटाळा नाही) त्यांची प्रगती होईल व त्यांना बढती मिळेल. तुमच्यापैकी ज्यांना हे कळते त्यांनी इतर सहकाऱ्यांना सांगावे, "तुमचे कर्तव्य योग्य प्रकारे करा. ही देवांना प्रिय राजाची आज्ञा आहे. या आज्ञेप्रमाणे काम केल्याने मोठे फळ मिळते आणि न केल्यास फार अहित होते-- त्यांना स्वर्गप्राप्तीही होत नाही आणि

राजालाही प्रसन्न राखता येत नाही. कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडल्यावर तुम्हाला स्वर्ग मिळेल आणि माझ्या क्रणातूनही तुम्ही मुक्त व्हाल.

हा लेख प्रत्येक तिस दिवशी, त्यांच्या मधे तसेच इतर प्रसंगीही तुम्ही ऐकावा. मधूनमधून एकट्यानेही ऐकावा. अशा रीतीने तुम्ही तुमचे कर्तव्य पूर्ण कराल.

हा लेख अशासाठी लिहिला आहे की न्यायाधिकाऱ्यांनी त्यांचे कर्तव्य यथोचित पार पाडावे व नागरिकांना निष्कारण कैद किंवा दंड होऊ नये. यासाठी मी पाच-पाच वर्षांनी सौम्य, क्रोधरहित व दयाळू अमात्यांना दौऱ्यावर पाठवीन जे न्यायाधिकारी माझे मन जाणून माझ्या आज्ञेप्रमाणे वागतात की नाही याची खात्री करतील. उज्जयिनीतही राजकुमार या कार्यासाठी अशा प्रकारे तीन-तीन वर्षांच्या आत अधिकारी दौऱ्यांवर पाठवेल. पण ही मुदत तीन वर्षांच्या पलीकडे जाऊ देणार नाहीत. तक्षशिलेसंबंधानेही हीच आज्ञा आहे. जेव्हा वर सांगितलेले महामात्र दौऱ्यावर निघतील तेव्हा आपले नेहमीच्या कामाकडे दुर्लक्ष न देता हे ही तपासतील की न्यायाधिकारी राजाच्या हुकुमाप्रमाणे काम करताहेत की नाही.

कलिंग शिलालेख २

देवांना प्रिय असे सांगतो की, ही राजाज्ञा समापा येथील्त अमात्यांसाठी आहे. मला जे योग्य वाटते त्याची उचित प्रकारे कार्यवाही व्हावी. तुम्हाला आदेश देऊन हे मला साधता येईल असे मला वाटते. तुम्हाला हजारो लोकांवर अधिकारी नेमले आहे जेणेकरून तुम्ही सर्वांची मने जिंकावी.

सर्व माणसे मला मुलासारखी आहे. माझ्या पुत्रांसाठी माझी जी कामना आहे, आणि त्यांचे इहलोकी व परलोकी कल्याण व्हावे ही माझी इच्छा आहे, तीच कामना मी सर्व मनुष्यांसाठी करतो.

कदाचित सरहद्दीषलिकडील लोक अद्याप जिंकले गेलेले नाहीत. त्यांना वाटत असेल की त्यांच्याबद्दल राजाचा काय मानस आहे. माझी केवळ अशी इच्छा आहे की त्यांनी माझे भय बाळगू नये. माझ्यावर विश्वास ठेवावा. माझ्याकडून सुखच लाभेल, दुःख नाही. त्यांनी असाही विश्वास बाळगावा की क्षम्य बाबींना राजा नक्की क्षणा करेल. त्यांनी धर्माप्रमाणे वागावे. त्यामुळे त्यांना इहत्लोक व परलोक दोन्ही साधतील. मी तुम्हाला हे सांगतो कारण मी मला क्रणमुक्त व्हायचे आहे, तुम्हाला माहीत असावे की मी माझी प्रतिज्ञा व माझे वचन पाळेल. तुम्ही अशा प्रकारे वागावे, आपले कार्य करावे आणि सीमेवरील लोकांना भरवसा द्यावा की "राज पित्यासारका आहे. पित्यात्ता जसे त्याचे पुत्र, त्याप्रमाणेच राजाला प्रजा वाटते."

तुम्हाला माझी प्रतिज्ञा व माझे वचन यांची माहिती देऊन मी ते पाळण्यास पूर्णपणे प्रयत्नशीत्त आहे. तुम्ही त्यांना विश्वासात घेण्यास समर्थ आहात आणि त्यांचे इहलोकी व परलोकी त्यांचे कल्याण साधण्यासही समर्थ आहात. अशा रीतीने कर्तव्य केल्याने तुम्हाला स्वर्गलाभ करुन घेता येईल व तुम्ही माझ्याही क्रणातून मुक्त व्हाल. अमात्य सीमेवरील लोकांच्या मनात विश्वास उत्पन्न करतील व त्यांना धर्ममार्गावर आणतील यासाठी हा लेख लिहून घेतला आहे.

चार-चार महिन्यांनंतर पुष्य नक्षत्राच्या (अष्टमीच्या) दिवशी व मधेही हा लेख ऐकावा व सवडीप्रमाणे इतर वेळी तसेच एकांतातही ऐकावा. असे करीत असता तुम्ही तुमचे कर्तव्य कराल.

***

अशोकाचे स्तंभलेख

दि "ऱ्टोपरा (फिरोझशहाची लाट), दि १ (मीरत), अलाहाबाद (मूळ कौसांबीचा), लौरिया-अराराज, लौरिया-नंदनगड व रामपूर्वा या ठिकाणी पिळून एकंदर अशोकाचे सात स्तंभलेख आहेत. यातील पहिल्यातच शिलालेख ७ मिळतो. यांत अलाहाबाद येथील राणीचा लेख दिलेत्ता नाही.

स्तंभलेख १

राज्याभिषेकानंतर सव्वीसाव्या वर्षीं मी हा धर्मादेश लिहित्ता. इहलोक व परलोकांत सुखप्राप्रि धर्माविषयी खरे प्रेम, कठोर आत्मपरिक्षण, खूप आदर, (पापाबद्दल) आत्यंतिक भय आणि अतीव उत्साह यांच्याशिवाय शक्य नाही. माझ्या शिकवणुकीने धर्माविषयीचा आदर आणि प्रेम दिवसेंदिवस वाढले आहे आणि यापुढेही वाढतच जाईल. माझे उच्च, मध्यम, खालच्या पदांवरचे अधिकारी धर्माचे पालन करतात, धर्मानुरुप वागतात; आणि ते इतरांनाही मार्गदर्शन करण्यास समर्थ आहेत. सीमाप्रदेशातीलल महामात्यही तसेच करत आहेत. माझ्या ह्या सूचना आहेत-- धर्माचे पालन करावे, धर्माद्वारे सुख द्यावे आणि धर्मानुसार रक्षण करावे.

स्तंभलेख २

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की धर्म हा उत्तम आहे. पण धर्म म्हणजे काय? धर्म हाच की पापापासून दूर राहावे, पुष्कळ चांगली कृत्ये करावी, करूणा, औदार्य, सत्य व पावित्र्य यांचे पालन करावे. मी अनेक प्रकारे चक्षुदान केले आहे. द्विपाद, चतुष्पाद, पक्षी व जलचर प्राण्यांवर मी अनेक प्रकारे कृपा केली आहे. मी त्यांना प्राणदानही दिले आहे. आणखीही पुष्कळ चांगली कामे केली आहेत.

हा लेख मी अशासाठी लिहून घेतला आहे की लोकांनी या आदर्शाप्रमाणे वागावे व ते आदर्श चिरकाळ टिकावे. जो याप्रमाणे वागेल तो सत्कृत्य करील.

देवांना प्रिय प्रियदर्शी राजा असे सांगतो की मनुष्य आपल्या चांगल्या कृत्यांकडेच पाहतो, "मी हे चांगले काम केले". पण तो आपल्या पापकृत्याकडे पाहत नाही, "मी हे दुष्कृत्य केले, पाप केले" असे म्हणत नाही. पण ही सवय त्याच्या लक्षात येत नाही. असा विचार करायला हवा, "ह्यामुळे मी पाप, हिंसा, क्रौर्य, क्रोध, गर्व व मत्सर यांना बळी पडतो. या गोष्टींमुळे माझी अधोगती न होवो." त्याने विचार करावा की "सन्मार्गाने मला इहलोकी व परलोकीही सुख मिळेल."

स्तंभलेख 4

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की, राज्याशिषेकानंतर सव्वीस वर्षांनी मी हा लेख लिहून घेतला. माझे रज्जुक नामक अधिकारी लाखो मनुष्यांमधे काम करीत आहेत. त्यांनी निश्चिंतपणे व निर्भयतेने आपले कर्तव्य करावे, लोकांचे हित-सुख करावे आणि लोकांचे कल्याण करावे म्हणून लोकांच्या फिर्यादी ऐकण्याचे व प्रशासनाचे काम मी मी त्यांना दिले आहे. ते सुखदुःखाची कारणे समजून घेतीत्त व मी नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या आदेशांचे पालन करतील. लोक ऐहिक व पारलौकिक अशी दोन्ही प्रकारची सुखे प्राप्त करुन घेण्याचा यत्न करतील अशा प्रकारचा उपदेश ते करतील. रज्जुक अधिकारी माझी आज्ञा पाळण्याचा पूरेपूर प्रयत्न करीत आहेत. माझे इतर अधिकारीही माझ्या इच्छेनुसार काम करीत आहेत. तेही असा उपदेश करतील जेणेकरुन रज्जुक मला प्रसन्न करण्याचा यत्न करतील. ज्याप्रमाणे एखादा मनुष्य आपल्या बाळाला निपुण अशा दाईंच्या स्वाधीन केल्यावर निश्चित होतो (आणि मनात) समजतो की ही दाई माझ्या मुलाला सुखी ठेवेल, त्याचप्रमाणे लोकांचे कल्याण व सुख व्हावे म्हणून मी रज्जुक नावाचे अधिकारी नेमले आहे. त्यांनी निर्भयपणे व निश्चितपणाने व शांतरपणाने काम करावे म्हणून तक्रार ऐकण्याचा व न्यायदानाचा अधिकार मी त्यांना दिला आहे. खटला चालविण्यात व शिक्षा देण्यात पक्षपात होता कामा नये. म्हणून माझी अशी आजपासून आज्ञा आहे की तुरुंगात पडलेल्या ज्या माणसांना मृत्यूची शिक्षा सांगण्यात आली असेल त्यांना तीन दिवसांची सवलत देण्यात येईल. या मुदतीत ज्यांना मृत्युदंड करण्यात आला असेल त्यांच्या नातेवाईकांनी त्यांच्या जीवनासाठी दाद मागावी आणि त्यांच्या वतीने दाद मागणारा कुणी

नसेल तर त्यांनी परलौकीक हितासाठी दान द्यावे व तप करावे. कारण की माझी इच्छा आहे की अ काळ हातात असला तरी त्यांनी परलोकाचा विचार करावा, व लोकांत अनेक प्रकारे धर्माचरण, संयम व औदार्य वृद्धिंगत व्हावे.

स्तंभलेख

देवांचा प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की, राज्याभिषेकानंतर सव्वीस वर्षांनी मी पुढील प्राण्यांचा वध करण्याला मनाई केली आहे. पोपट, मैना, अरुण, चकोर, हेस, नांदीमुख, गेलाट, जुका, अंबाकपीलिका, दुडी, बिनहाडाची मासळी, वेटवेयक, गंगेपुपुटक, संकृजमत्स्य, कासव, शल्य, पर्णशश, सांबर, सांड, वानर, गेंडा, श्वेतकपोत, प्रामकपोत व इतर सर्व प्रकारचे चतुष्पाद प्राणी जे कोणत्याही कामी उपयोगी पडत नाहीत व खाण्याच्याही उपयोगी नाहीत. गाभण किंवा दुभती बकरी, मेंढी किंवा डुकरी व त्याचप्रमाणे त्यांची सहा महिन्यांच्या आतली पिल्ले मारू नयेत, ज्यात जीवित प्राणी असतीत्त असा कोंड्यात्ता जाळू नये. कोंबड्याबरोबर जिवंत प्राणी जाळू नयेत. विनाकारण किंवा प्राण्यांची हिंसा करण्यासाठी जंगत्तात्ता आग लावू नये. एक जीवमारुन दुसर्यीला खाऊ घालू नये. तीन चातुर्मासाच्या पौर्णिमा, पुष्याचे तीन दिवस, प्रत्येक पौर्णिमा व चतुर्दशी या उपोसथांच्या दिवशी मासे मारू नयेत व विकू नयेत. या सर्व दिवशी हत्तींच्या वनातून वत्तलावातून कोणतेही दुसऱ्या जातीचे प्राणी मासले जाऊ नयेत. प्रत्येक पक्षाची अष्टमी, चतुर्दशी, अमावास्या, पौर्णिमा, तसेच पुष्य, पुनर्वसू नक्षत्र असलेल्या दिवशी व चातुर्मासातल्या प्रत्येक सणाच्या दिवशी बैलाचे वृषण काढू नयेत व बकर, मेंढा,डुक््कसर व या जातीचे डुसरेप्राणी यांचेही वृषण काढू नये. पुष्य व पुनर्वसू नक्षत्रांच्या दिवशी, चातुर्मासाच्या प्रत्येक पौर्णिमेच्या दिवशी व प्रत्येक चातुर्मासाच्या शुद्ध पक्षात घोडे व बैल यांना डागण्या देऊ नयेत. राज्याभिषेकानंतर सव्वीस वर्षांच्या आत मी पंचवीस वेळा तुरुंगातून कैदी सोडले आहेत.

स्तंभलेख ६

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की, राज्याभिषेकानंतर बारा वर्षांनी मी लोकांच्या हितार्थ व सुखार्थ धर्मलेख लिहून घेतले. जेणेकरून त्यांनी आपला चुकीचा मार्ग सोडून कोणत्या ना कोणत्या प्रकारे धर्माचा उत्कर्ष करावा. याप्रमाणे मी लोकांच्या कल्याणासाठी व सुखासाठी झटत असता माझे नातेवाईक, दूरचे लोक व जवळचे लोक हे कशाप्रकारे सुखी होतील इकडेही माझे लक्ष असते. या उद्देशानुसार मी कामही करतो, अशा रीतीने सगळ्यांच्या कल्याणाकडे माझे लक्ष असते. मी सर्व संप्रदायांचाही

निरनिराळ्या प्रकारे आदर केला आहे. तथापि लोकांना व्यक्तीशः भेटणे ही माझ्या दृष्टीने मुख्य बाब आहे. राज्याभिषेकानंतर सव्वीस वर्षांनी मी हा लेख लिहून घेतला.

स्तंभलेख ७

देवांना प्रिय प्रियदर्शी राजा असे म्हणतो, पूर्वी जे राजे होऊन गेले त्यांची इच्छा होती धर्मवृद्धी व्हावी; पण त्यांच्या अपेक्षेप्रमाणे ती झाली नाही.

यासाठी देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की, हा विचार माझ्या मनात आला आहेकी पूर्वीच्या काळी राजांना वाटत होते की कोणत्याही प्रकारे योग्यरुपाने धर्मवृद्धी व्हावी; पण ती झाली नाही. तर मग आता लोकांची प्रवृत्ती तिकडे कशी करता येईल? कमीत कमी काही थोड्या लोकांना तरी मी धर्माकडे कसा नेऊ शकेन?

म्हणून देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असे सांगतो की, माझ्या मनात असा विचार आला की, लोकांना धर्म ऐकवावा व त्यांना धर्माचा उपदेश करावा म्हणजे लोक तो ऐकून त्याप्रमाणे आचरण करतील, उन्नती करतीत्त व विशेष रुपाने धर्मवृद्धी करतील. या उद्देशाने धर्मश्रवण करविले गेले व निरनिराळ्या प्रकारे धर्मोपदेश करवित्ता गेला. माझे 'पुरुष' नावाचे अधिकारी जे पुष्कळशा लोकांचेवर नेमले आहेत, ते माझ्या उपदेशाचा प्रचार करतील. लाखो माणसांवर जे रुज्जुक नावाचे अधिकारी नेमलेले आहेत, त्यांना आज्ञा देण्यात आली आहे की, त्यांनी धर्मायुक्त नावाच्या अधिकाऱ्यांना असा उपदेश करावा.

देवांना प्रिय प्रियदर्शी राजा असे सांगतो की, याच उद्देशाने मी धर्मस्तंभ उभारले. धर्म महामात्यांची नेमणूक केली, धर्माचा उपदेश केला.

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की, सडकांवरुन मनुष्ये व पशू यांना छाया देण्यासाठी वटवृक्ष लावले. आठ-आठ कोसाच्या अंतरावर विहिरी खोदल्या, धर्मशाळा बांधल्या तसेच जागोजागी पशूंसाठी आणि माणसांसाठी पाणपोयांची सोय केली. पण या सुखसोयी गौण आहेत. पूवीच्या राजांनी व मीही विविध प्रकारांनी लोकांना सुखी केले आहे. पण मी हे अशाकरता केले आहे की, लोकांनी धर्माचरण करावे.

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की, माझे धर्म महामात्यही अशा पुष्कळ प्रकारच्या उपयुक्त कार्यात गुंतले आहेत की ज्यांचा संबंध संन्यासी व गृहस्थ या दोहोंशी येतो. त्याचप्रमाणे सर्व संप्रदायांकरताही ते नेमिले गेले आहेत. त्यांनी (बो) संघ, ब्राह्मण, आजीवक, निग्रंथ यांचा प्रबंध करावा. निरनिराळे महामात्य निरनिराळ्या संप्रदायांच्या विशिष्ट कामांसाठी नेमले आहेत. धर्म महामात्य सर्व संप्रदायांवर देखरेखही करतात.

देवांना प्रिय प्रियदर्शी राजा असे सांगतो की, हे व तसेच दुसरे मुख्य अधिकारी माझ्या व माझ्या राण्यांच्या दानधर्माच्या कामासाठी नेमलेले आहेत. येथे त्याचप्रमाणे प्रांतातून ते सगळ्या अंत:पुरवासियांच्या दानकार्याचे ते प्रबंधन करतात. धर्माची उन्नती व धर्माचे आचरण व्हावे म्हणून माझे पुत्र व दुसरे राजकुमार यांच्या दानधर्मावर देखरेख करण्यासाठीही मी अधिकारी नेमलेले आहेत. करूणा, औदार्य, सत्य, शुद्धता, कजुता व चांगुलपणा लोकांत वाढावा यातच धर्माची उन्नती व धर्माचरण आहे.

देवांना प्रिय राजा प्रियदर्शी असे सांगतो की, मी जे सत्कृत्य केले आहे ते लोकांनी स्वीकास्ते व त्याचे अनुकरण केले आहे. मातापित्यांची सेवा, गुरुंची सेवा, वृद्धांचा आदर व श्रमण-ब्राह्मण, दीनदुबळे, दुःखी, दास व नोकरचाकर यांच्याशी योग्य वागणूक हे गुण उत्कर्ष पावले आहेत व आणखीही पावतील.

देवांना प्रिय प्रियदर्शी राजा असे सांगतो की, माणसांत जी ही धर्मवृद्धी झाली आहे त्री दोन प्रकारांनी झाली आहे. एक धर्मनियमांनी व दुसरी त्यांचे मन वळवून. यापैकी धर्मविषयक नियम फारसे महत्त्वाचे नाही. पण मतपरिवर्तन ही मोठी महत्वाची बाब आहे. तथापि धर्माचे नियम मी अशासाठी बनवले आहेत की अमुक प्राणी मारले जाऊ नयेत. मी आणखीही पुष्कळ नियम केले आणि यज्ञात जीवहत्या कमी होऊ लागल्या आहेत. पण नियमांपेक्षा मतपखिर्तनाने हे साध्य झाले आहे.

याबद्दल देवांना प्रिय म्हणतो की जेथे जेथे पाषाणस्तंभ किंवा पाषाणपट्ट्या असतील तेथे धरमदिश लिहून ठेवावेत जेणेकरून तो दीर्घकाळ टिकेल. हा लेख अशासाठी लिहिला गेला आहे की सूर्यचंद्र आहेत तोपर्यंत माझ्या पुत्र-पौत्रांनी याप्रमाणे आचरण करावे. कारण की याप्रमाणे आचरण करून ते इहतल्लोक व परलोक दोन्ही साधतील.

राज्यारोहणानंतर सत्तावीस वर्षांनी हा लेख लिहून घेतला आहे.

परिशिष्ट 2

प्राकृत हा एक भारतीय बोली भाषांचा समूह होता ज्यातून पालि आणि संस्कृत या अभिजात भाषांचा उगम झाला. संस्कृतचा वापर बहुतांश एका जातीपुरत 1तापुरता तर पालिचा एका धर्मापुरत म पुर ता राहिला. या समूहात सर्वात महत्त्वाची प्राकृत होती ती गंगेच्या खोऱ्यातील, विशेषत: प्राचीन मगध राज्यातील. हीच भारतीय उपखंडाची मुख्य भाषा बनली, अर्थात त्यात काहीसे प्रादेशिक बदल होतेच.

संस्कृत हा प्राकृतचेच अभिजात रूप आहे. तिची रचना इ. पू. चवथ्या शतकात पाणिंनीने केली असे दिसते. पाणिनीने वैदिक संस्कृतमधे सुधारणा करून तिला अधिक अभिजात स्वरूप दिले. हिंदू, जैन व आधीचे बौद्ध संस्कृतला देवांची भाषा समजत, आणि म्हणून ती केवळ पुरोहित ब्राह्मण वर्गापर्यंत सीमित अशी ‘‘पवित्र' भाषा झाली.

पालि ही प्राकृतचेच काहीसे सुसंस्कृत स्वरूप. ही बहुदा बुद्धाच्या व महावीराच्या काळी मगध देशात सुशिक्षित जनतेची बोली भाषा असावी. बौद्ध आणि जेन धर्मग्रंथ जेव्हा इसवी सनाच्या पहिल्या शतकात लिहिले गेले तेव्हा ते पालि भाषेत लिहिले गेले. ह्या भाषेची रचना अशोकाच्या किंवा अशोकाच्या काही काळ अभधी सुनिश्चित करण्यात आली असावी. ही पुढे ताम्रपर्णी, सिंहल, लंका (पुढे सिलोन आणि श्रीलंका) येथे स्थिरावलेल्या थेरवादाची पवित्र भाषा झाली. (अर्थात त्या पाच-सहा शतकात पालित बरेच बदल झाले असणार कारण अशोकाची प्राकृत बुद्धानंतरची आहे आणि पालि ग्रंथांची भाषा अशोकानंतरची -- या दोहोत बराच फरक आहे. त्यामुळे आजची पालि तंतोतंत बुद्धकालिन असण्याची शक्यता कमीच आहे.)

भारतात मात्र पालिची पवित्र भाषेची जागा संस्कृतने घेतली. बौद्ध ग्रंथ तिबेटात व सिल्क रूटने गेले ते संस्कृत भाषेत.

गांधारात (आजच्या अफगाण-पाकिस्तान सीमेवर) गांधारी भाषेसाठी तसेच प्र ग्कृत लिहिण्यासाठी खरोष्ठीची निर्मिती झम गली. तिची निर्मिती व वापर नक्कीच भारतात ब्राह्मी लिपीच्या निर्मितीच्या आधीचे. अशी दाट शक्यीता आहे, जरी त्याला सबळ पुरावा नाही तरी, की खरोष्ठीची निर्मिती अशोकाचा आजोबा चंद्रगुप्ताच्या काळातील असावी. खरोष्ठीचा संबंध एकेमेनिड विजयानंतर आलेल्या अरेमिक लिपीशी आहे--अरेमिकमधे प्राकृत उच्चार लिहिण्यासाठी बदल करून खरोष्ठी बनलेली दिसते.

ब्राह्मी लिपी ही दक्षिण-पूर्व आशियातील बहुतेक लिप्यांची जननी मानली जाते. तामिळनाडूमधे इ. पू. सहाव्या शतकातील आद्य-ब्राह्मी लिपीचा शोध लागल्याची बातमी असूनही आज हे सर्वमान्य आहेकी ब्राह्मी लिपी अशोकाच्या काळात सुनिश्चित करण्यात आली. तेव्हा अस्तित्वात असलेल्या एखाद्या लिपीवर ती आधारीत असावी. तिची रचना प्राकृत अचूकपणे मांडण्यासाठी तसेच गांधार व उत्तर पंजाबमधील खरोष्ठीपेक्षा अधिक योग्य लिपी म्हणून करण्यात आली असावी. खरोष्ठीप्रमाणे, ब्राह्मीत प्रत्येक अक्षर हे एका व्यंजनाचे 'अ' ह्या स्वराबरोबर संयुक्त प्रतिनिधित्व करते; इतर स्वर हे वेगवेगळ्या मात्रांनी (काना- उकार-वेलांटी) दशविण्यात येते. ब्राह्मीचा उपयोग सुरूवातीचा राजाचे आदेश व धार्मिक वास्तूंबर दात्यांचे संदेश लिहिण्यापुरताच होता असावा असे दिसिते.

(अधिक माहितीसाठी पहा-- Professor Richard Solomon’s Indian Epigraphy: A Guide to the Study of Inscriptions in Sanskrit, Prakrit, and the other Indo-Aryan Languages, 1998.)

प्रस्तावना. शोकरहीत सम्राट - राजा अशोक

1. विरोधकांवर विजयाचे स्मृती चिह्ृ म्हणून राजा नरसिंहदेवाने तेराव्या शतकात घोड्यांच्या भव्य रथाच्या स्वरूपात कोणार्कचे सूर्यमंदिर बांधून घेतले. यात बौद्ध हत्ती माणसाला सोंडेने चिरडणारा क्रूर प्राणी दाखवला आहे. भारतात इतरत्र नष्ट झाल्यावरही तत्कालिन कलिंगात (आताचा ओरिसा) काही ठिकाणी बौद्ध धर्म टिकून होता. तेराव्या शतकात मात्र तो तेथूनही नष्ट झाला.

2. Orientalism ह्या १९७८ मधे प्रकाशित ग्रंथात लेखक सेंद म्हणतो की येथील प्राच्याविद्यिापीडित युरोपियनांच्या वेज़ानिक शोधदष्टीने प्रेरित नव्हते तर त्यांची प्रेरणा बौद्धिक साम्राज्यवाद होता जो प्रजेवर नियंत्रण करु पहात होता व त्यांना एक वस्तूविषय मात्र बनवू पहात होता. सैंदचे हे म्हणणे पूर्णत: खोडून काढले गेले आहे. पहा-- Robert Irwin, The Lust for Knowing: the Orientalists and the Enemies, 2006, and Ibn Warraq, Defending the West: a Critique of Edward Said’s Orientalism, 2007. भारतीय संदर्थातील विस्तृत टीकेसाठी पहा-Sheldon Pollock, The Language of the Gods in the World of Men: Sanskrit, Culture, and Power in Premodern India, 2006.

3. Max Deeg, ‘From the Iron Wheel to Bodhisattvahood: Asoka in Buddhist Culture and Memory’, Asoka in History and Historical Memory, Ed. P. Olivelle, 2009.

प्रकरण १. मूर्तिभंजन प्रकरण

1. Sadr-ud-din Muhammad Hasan Nizami, Taj-ul-Masr; in Sir Elliot and John Dowson, History of India as Told By its Own Historians, 1867-77, Vol. II.

2. Minkaj-ud-din, Tabakat-i-Nasiri: a General History of the Mohammedan Dynasties of Asia, including Hindustan; from A. H. 194 (810 AD) to A. H. 658 (1260 AD) and the irruption of the infidel Mughals into Islam, Vol. I, trans. H. G. Raverty, 1880

3. Sir Elliot and John Dowson, History of India as Told By its Own Historians, 1867-77, Vol. II

4. तिबेटन भिक्षु धर्मस्वामी नालंदाच्या दुर्गतीचा शेवटचा साक्षीदार होता. तो नालंदाला सन १२५० ला आला तेव्हा त्याला तेथे केवळ एक व्यक्ती त्या नरसंहारातून वाचलेली सापडली, राहुल श्रीभद्र नावाचा नव्वद वर्ष वयाचा आचार्य जो एका छोट्या शिंष्यसमूहाला संस्कृत व्याकरण शिंकवत होता. तेथील आगीतून वाचलेला तो एकमेव ग्रंथ होता. धर्मस्वामीही त्या वर्गात सामील झाला. पण तुर्क आक्रमकांची टोळी येत असल्याच्या बातमीने तो वर्गही भीतीपोटी पांगला. धर्मस्वामी त्या वृद्ध आचार्याला घेऊन पळाला व लपून बसला. ते परत नालंदाला आले तेव्हा त्या वर्गातील इतर सर्व पळून गेले होते. श्रीभद्रने त्याचे पूर्ण ज्ञान धर्मस्वामीला दिले आणि संस्कृत व्याकरणाचे ते पुस्तक शिष्याला देऊन त्याला तिबेटला जायला सांगितले.

5. पहिले अगिनिकांड होते-इ. पू. ४८ मधे जुलियस सिझरद्वारा अलेक्झांड्रिया हे शहर अपघाताने पेटवले गेले तेव्हाचे. त्यांनंतर दोनदा, ख्रिश्चन नेते थिओफिलस आणि त्याचा पुतण्या सिरिल यांनी साधारणत: इ. स. ३९० व ४९०, काफीरांचा नरसंहार केला. शेवटी ६४२ मधे अरबांनी अलेक्झांड्रियावर ताबा मिळवला. असे म्हणतात की ओमार खलिफाच्या आदेशावरून अमर-बिन-अल-अस या सेनापतीने तेथील उरलेल्या सर्व मोठ्या ग्रंथालयांना आग लावली. खलिफाचे म्हणणे असे होते म्हणतात की जर ते ग्रंथ अल्लाच्या शब्दाला धरून असतील तर त्यांची गरज काय आणि जर नसतील तर पाखंड म्हणून जाळायलाच हवी. अलेक्झांड्रियाच्या शाही टॉलेमी ग्रंथालयाच्या विध्वंसाचे तटस्थ वर्णन James Hannan च्या Bede's Library मधे वाचायला मिळते. Edward Gibbon च्या Decline and Fall of the Roman Empire मधे ते ग्रंथालय अरबांनी जाळले या दाव्याला खोडून काढले आणि सर्व दोष तेराव्या शतकातील मुस्लिम-विरोधी ख्रिश्चन बिशप Gregory Bar Hebraeus ला देण्यात आला. अर्थात अरब प्रवासी अब्दुल लतिफ अल बगदादी याने त्याच्या Account of Egypt ह्या बिशपच्या पूर्वी खलिफा ओमारच्या त्या

आज्ञेचा उल्लेख कसा केला हा प्रश्नि राहतोच. ही शियाविरोधी अफवा सलादीनने सुरू केली असण्याची शक्योता आहे असे लेविसचे म्हणणे आहे. पहा--Professor Bernard Lewis's letter "The Vanished LIbrary" in the New York Review of Books, 27 Septermber 1990.

२. फिरोजशहाचे सुवर्णस्तंभ

1. पश्चिम हिमालयातील कांग्रातून हा स्तंम आला असावा. त्यावर गुप्तकालीन ब्राह्मीत सहा ओळीचा लेख आहे ज्यात म्हटले आहे की चंद्र नावाच्या राजाने बंगाल व उत्तर पंजाब जिंकल्यावर विष्णुपाद पर्वतावर हा स्तंभ उभारला. हा राजा दुसरा चंद्रगुप्त असावा. अर्थात ही बाब लोकप्रिय समजाच्या विरुद्ध आहे. कुतुबने ही मशीद हिंटू मंदिरावर उभारली अशी लोकमान्यता आहे (ते शक्यही आहे). ही मशीद विष्णुच्या स्तंभाच्या भोवती उभारली असा प्रवाद आहे (कुतुबची कट्टरता लक्षात घेतली तर हे मात्र खरे नसावे). स्व. जॉन इर्विन याने या विषयावर बरेच विवादास्पद लिहिले आहे. 'Islam and the Cosmic Pillar' and other essays.

2. Shams-i Siraj 'Afif, Tarikh-i Firoz Shahi, in Sir Elliot and John Dowson, History of India as Told By its Own Historians, 1867-77, Vol. III.

3. Sirat-i Firoz Shahi, quoted in Harry Falk, Asokan Sites and Artefacts: a Source Book with Bibliography, 2006.

4. Samuel Purchas, Hakluytus Posthumus; or, Purchas his pilgrimes, 1625, ed. W. Foster, 1905-7 मधील उद्धरण

5. डॉ एस एम अस्करी यांचे सिरत-ए-फिरोझशाहीचे भाषांतर संपादन डॉ अहमद. प्रकाशनाधीन

6. ह्याव इतर अशोकस्तंमांच्या पूर्ण विविरणासाठी पहा-Harry Falk, Asokan Sites and Artefacts, 2006.

7. 7. Timur, Mulfuzat-I Timuri, in Sir Elliot and John Dowson, History of India as Told By its Own Historians, 1867-77, Vol. II.

8. William Finch in Samuel Purchas, Purchas His Pilgrimes, 1613.

9. 9. Safaat Ahmad Khan, ed., John Marshal in India: Notes and Observations in India 1668-1672, 1927.

10. चौदाव्या शतकात सुलतान कुतुबुद्दीन ऐबकचा योद्धा महम्मद बख्तियार, पंधराव्या शवकाव जॉनपूरचे शर्की राजे व सिकंदर लोदी आणि सतराव्या शतकाच्या सुरवातीला शहाजहान.

11. Jean-Baptiste Tavernier, Travels in India, translated from the original French of 1676 with a biographical sketch of the author, Notes, Appendices, etc. by V. Ball, ed. William Crooke, 2001.

12. हा स्थानिक इतिहासकार दुसरातिसरा कुणी नसून जेम्स प्रिन्सेप होता (९८३३ ला प्रकाशित झालेले त्याचे रेखाटनांचे पुस्तक Benares Illustrated. प्रिन्येप ती लाट अशोकस्तंभ असल्याबद्दल अनगिज होता.

13. H. R. Nevill, Banaras Gazeteer; 1909. The Varanasi Gazeteer of 1965 gives a very different and wholly unwarranted version of these events, playing down the religious differences between the two communities.

14. Bishop Reginald Heber, Journey through India, from Calcutta to Bombay with Notes upon Ceylon, 1828.

15. Padre Marco della Tomba, de Gubernatis, 1878, trans. Hosten 1812, quoted in Harry Falk, Asokan Sites and Artefacts, 2006.

16. M. Noti, Joesph Tiefenthaler, S. J., A Forgotten Geographer of India, 1906.

17. For more detail on William Jones's Indian career see Charles Allen, The Buddha and the Sahibs: the Men who Discovered India's Lost Religion, 2003; Dr Michael J. Franklin, Sir William Jones: a Critical Biography, 1997, and as editor, The European Discovery of India, 2007.

18. Sir William Jones, co-founder of the Asiatic Society of Bengal, Letters, 1970. See also O. P. Kejariwal, The Asiatic Society of Bengal and the Discovery of India's Past, 1988.

प्रकरण ३. संशोधनाचे विषय

1. Rudyard Kipling, 'The City of Dreadful Night and Other Places', 1892.

2. James Forbes, Oriental Memoirs, 1834.

3. Author unknown, Calcutta Review, Vol. VI, 1849.

4. Lord Teignmouth, Memoirs of the Life, Writings and Correspondence of Sir William James, 1804.

5. Sir William Jones to Charles Wilkins, 22 June 1784, The Letters of Sir William Jones, Vol II, ed. G. Cannon, 1970. My thanks to Dr Michael Franklin for drawing my attention to this and to other aspects of Jones contained in his unpublished paper ‘And the Celt Knew the Indian: Sir William Jones 1746-94’, read at conference at Cardiff University on 25 May 2010.

6. Sir William Jones, ‘Asiatick Orthography’, AR, Vol. I, 1788, see also Kejariwal.

7. Sir William Jones, ‘On the Chronology of the Hindus’, AR, Vol. II, 1790.

8. Ill-health forced Law to quit India and he eventually settled down to farm near Washington in the United States of America.

9. Law’s paper was never published, but is referred to in James Prinsep, ‘Further particulars of the Sarun and Tirhut Laths, and account of two Bauddha Inscriptions found, the one at Bakhra, in Tirhut, the other at Sarnath, near Benares’, JASB, Vol. IV, 1835.

10. John Harington, ‘A Description of a Cave near Gaya’, AR, Vol. I, 1788.

11. John Harrigton had a stronger constitution than Law and he stayed on in Bengal, eventually retiring from India in 1822 to become President of the Board of Trade.

12. Robert Montgomery Martin, The British Colonies: British Possessions in Asia, Vol. XI, 1854.

13. The unfortunate Polier ran straight into French Revolution and was stabbed to death by a mob. However, just before he left India in 1788

he sold half his collection of five hundred Persian, Arabic and Sanskrit MSS to Edward Pote, Resident at Patna, who promptly donated most of them to his alma mater, Eton College.

14. Sir William Jones in a letter to Lieutenant William Steuart, Krishna-nagar, 13 September 1789, The Letters of Sir William Jones, Vol II, ed. G. Cannon, 1970.

15. Sir Charles Ware Mallet, ‘Account of Some Ancient Inscriptions at Ellora’, AR, Vol. V, 1897.

16. Sir William Jones, ‘Fourth Anniversary Discourse’, delivered 15 February 1787 by the President, AR, Vol. II, 1790.

17. Sir William Jones, ‘On the Gods of Greece, Italy and India’, AR, Vol. I, 1788.

18. Henry Colebrooke, ‘On the Sanskrit and Pracrit Languages’, AR, Vol. VII, 1804.

19. Captain Wilford, ‘Of the Kings of Magad’ha; their Chronology’, AR, Vol. IX, 1807.

20. John Harrington, ‘Introductory Remarks, Intended to Have Accompanied Captain Mahony’s Paper on Ceylon’, AR, Vol. VII, 1804.

21. William Chambers, ‘Some Account of the Sculptures and Ruins at Mavalipuram’, AR Vol. I, 1788

22. Charles Wilkins, ‘An Inscription Copied by Mr Wilmot from a Stone at Bood-dha-Gaya;, AR Vol. I, 1788.

23. Theon Wilkinson, Two Monsoons, 1976 मधील उद्धरण ग्रूळ संदर्थ दिलेला नाही

24. Jonathan Duncan, ‘An Account of the Discovery of Two Urns in the Vicinity of Benares’, AR, Vol. IV, 1795.

25. हे सुरेख ९ब्द आहेत जोन्सच्या एका उत्तराधिकाऱ्याचे--George Turnour, in his Introduction to his An Epitome of the History of Ceylon, Compiled from Native Annals: and the First Twenty Chapters of the Mahawanso, 1836..

प्रकरण ४. सिंकदराचा प्रवेश

1. कालक्रमानुसार-- Several chapters in the Bibliotecha Historica of the Sicilian-Greek historian Diodoros Siculos, writing at the time of Julius Caesar; Historiae Alexandri Magni, written by the gladiator's son Quintus Curtius Rufus (usually referred to as 'Curtius'); Anabasis by Lucius Flavius Arrianus Xenophon ('Arrian'); a chapter on Alexander in Bioi Paralleloi or 'Parallel Lives' by Lucius Mestrius Plutarchus ('Plutarch'); and Historiarum Philippicarum by the fifth-century Roman historian Marcus Juniannus Justinus ('Justin'), drawing heavily on an earlier and now lost forty-four-volume work on Macedonian history written by his fellow Roman Trogus Pompeius.

2. Arrian, Anabasis. The Invasion of India by Alexander the Great, as described by Arrian, Quintus Curtius, Diodorus, Plutarch, and Justin, J. W. McCrindle, च्या भाषांतरामधून. 1893.

3. वरील प्रमाणे.

4. Quintus Curtius Rufus, Historiae Alexandri Magni. The Invasion of India by Alexander the Great, as described by Arrian, Quintus Curtius, Diodorus, Plutarch, and Justin, J. W. McCrindle, च्या माषांतरामधून. 1893.

Plutarch, Parallel Lives. The Invasion of India by Alexander the Great, as described by Arrian, Quintus Curtius, Diodorus, Plutarch, and Justin, J. W. McCrindle, च्या भाषांतरामधून. 1893.

6. Arrian, Anabasis. The Invasion of India by Alexander the Great, as described by Arrian, Quintus Curtius, Diodorus, Plutarch, and Justin, J. W. McCrindle, च्या माषांतरामधून. 1893.

7. Arrian, Anabasis. The Invasion of India by Alexander the Great, as described by Arrian, Quintus Curtius, Diodorus, Plutarch, and Justin, J. W. McCrindle, च्या माषांतरामधून. 1893.

8. Junianus Justinus, Historiarum Philippicarum. The Invasion of India by Alexander the Great, as described by Arrian, Quintus Curtius, Diodorus, Plutarch, and Justin, J. W. McCrindle, च्या भाषांतरामधून. 1893.

9. स्पिटामेनेसने बंडखोर बेस्सोसला सिकंदराच्या ताब्यात दिले होते, पण तो स्वतःच पुढे बंडखोर झाला. नंतर त्याचा त्याच्या पत्नीने खून केला. ही मॅसेदोनियन लोकांत कुप्रसिद्ध झाली कारण ती तिच्या पतीचे शिर घेऊन सिकंदराच्या तंबूवर पोहोचली होती.

10. Diodorus Siculos, Library of World History, Book XIX.

11. Appian, History of Rome, The Syrian Wars.

12. Junianus Justinus, Historiarum Philippicarum. The Invasion of India by Alexander the Great, as described by Arrian, Quintus Curtius, Diodorus, Plutarch, and Justin, J. W. McCrindle, च्या भाषांतरामधून. 1893.

13. Plutarch, Life of Alexander. The Invasion of India by Alexander the Great, as described by Arrian, Quintus Curtius, Diodorus, Plutarch, and Justin, J. W. McCrindle, च्या भाषांतरामधून. 1893.

14. Athenaios, Deiphosophists, quoted by J. W. McCrindle.

15. Junianus Justinus, Historiarum Philippicarum. The Invasion of India by Alexander the Great, as described by Arrian, Quintus Curtius, Diodorus, Plutarch, and Justin, J. W. McCrindle, च्या भाषांतरामधून. 1893.

16. Pliny the Elder, Natural History, Book VI.

17. Arrian, Indica, from Anabasis of Alexander, together with the Indica, trans. E. J. Chambers, 1893.

18. Sir William Jones, ‘The Tenth Anniversary Discourse, delivered 28 February, 1793, by the President, on Asiatick History, Civil and Natural’, AR, Vol. IV, 1795.

पाटणा बनारसच्या २४० मैल प्रवाहाच्या दिशेने पुढे आहे तर मुंगेरच्या आधी ८५ मैल आहे. हे अल्-बिरूनीच्या १९.३ ह्या प्रमाणाशी तंतोतंत जुळते. जोन्सला हे माहीत नव्हते की अल्-बिरूनीने त्याच्या अल्-हिंद मधे दिले होते की पाटलिपुत्र गंगेच्या काठी बनारसच्या खालच्या दिशेला २२० मैल आणि मुंगेरच्या आधी ६० मैल आहे--यामुळे पाटलिपुत्र पाटणा असल्याचे स्पष्ट झाले.

20. James Rennell’s case ws set out in the introduction to his Memoir and Map of Hindoostan, 1788.

21. Sir William Jones, 'The Tenth Anniversary Discourse, delivered 28 February, 1793, by the President, on Asiatick History, Civil and Natural', AR, Vol. IV, 1795.

22. Sir William Jones, 'The Tenth Anniversary Discourse, delivered 28 February, 1793, by the President, on Asiatick History, Civil and Natural', AR, Vol. IV, 1795.

23. Captain Wilford, 'Of the Kings of Magad'ha; their Chronology', AR, Vol. IX, 1809.

प्रकरण ५. आवेशपूर्ण प्राच्यविद्यापंडित

1. Sir William Jones to Lord Cornwallis, Lord Teignmouth, Memoirs of the Life, Writings and Correspondence of Sir William James, 1804.

2. Henry Colebrooke in a letter to his father, Sir T. E. Colebrooke, The life of H. T. Colebrooke, 1873.

3. ही माहिती लेफ्टनंट किट्टोकडून मिळाली होती. ह्या पत्रासाठी पहा--James Prinsep, 'Further particulars of the Sarun and Tirhut Laths, and account of two Bauddha Inscriptions found, the one at Bakhra, in Tirhut, the other at Sarnath, near Benares', JASB, Vol. IV, 1835.

4. Henry Colebrooke, 'Translation of One of the Inscriptions of the Pillar at Dehlee, Called the Lat of Feeroz Shah', AR, Vol. VII, 1801.

5. Hugh Murray, 'Conquest of Mysore', Historical and Descriptive Account of British India, Vol. II, 1843.

6. Letter to a Mr. Ballantyne dated Penag, 24 October 1805, quoted by Robert Chambers, Biographical Dictionary of Eminent Scotsmen, 1856.

7. Sir John Malcolm in an obituary published in the Bombay Courier; quoted by Chambers.

8. H. H. Wilson, 'An Essay in the Hindu History of Cashmir', AR, Vol XV, 1825.

9. Francis Buchanan, 'On the Religion and Literature of the Burmas', AR, Vol. VI, 1800.

10. बुकॅनन (Buchanan) ने नंतर त्याचे नाव बदलून हॅमिल्टन (Hamilton) केले. यामुळे त्याचे कार्य आणि यश तीन नावांमधे वाटले गेले Buchanan, Hamilton व Buchanan-Hamilton.

11. Sir Charles D'Oyly, Sketches of the NewRoad in a Journey from Calcutta to Gaya, 1830.

12. Francis Buchanan, 'Description of the Ruins of Buddha Gaya, by Dr Francis Buchanan hamilton, Extracted from his Report of the Survey of South Bihar', Transactions of the Royal Asiatic Society, Vol II, 1830, and Journal of Francis Buchanan (afterwards Hamilton) kept during the Survey of the Districts of Patna and Gaya in 1811-12, Ed. H. V. Jackson, 1925.

13. See Richard Fynes, trans. The Lives of the Jain Elders, 1998.

14. Montgomery Martin, The History, Antiquities, Topography and Statistics of Eastern India, Vol. I, 1838 (compiled from the papers of Francis Buchanan).

15. Colin Mackenzie in a letter to Sir Alexander Johnston in 1817, quoted by H. H. Wilson in his introduction to A Descriptive Catalogue of the Oriental Manuscripts and other Articles Illustrative of the Literature, HIstory, Statistics, and Antiquities of the South of India; Collected by the Late Lt. Col. Colin Mackenzie, Surveyor General of India, 1828.

16. म्हैसूरच्या गॅझेटियरमधे १९९०च्या दशकात बर्नार्ड लेविस राईसने चंद्रगुप्ताचे जैन मुनी झाल्यावर म्हैसूरजवळच्या श्रवणबेळगोळ येथील शेवटच्या दिवसांचे वर्णन केले आहे. 'चंद्रगुप्ताने शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या आचार्याची सेवा केली. तो त्याच्या आचार्याच्या मृत्युचा एकटाच साक्षीदार होता. परंपरेनुसार त्यानंतर चंद्रगुप्त बारा वर्षे जगला. ही बारा वर्षे त्याने तपश्चर्येत घालवली व तो येथेच मृत्यु पावला... अवणबेळगोळला ज्या भट्रबाहूच्या गुफेत तो मृत्यु पावला ती आजही दिसते आहे. इतकेच नव्हेत तर त्या टेकडीला चंद्रगिरी (चंद्रगुप्ताच्या नावावरून) म्हणतात. टेकडीच्या माथ्यावर सर्वात जुने चंद्रगुप्ताचे मंदिर इतर मंदिरांनी वेढलेले आहे. त्या प्राचीन मंदिराच्या दर्शनी भागावर भट्रबाहू आणि चंद्रगुप्ताच्या जीवनाचे नव्वद प्रसंग तपशीलासह सुबकपणे कोरलेले आहेत.

अधिक माहिती टेकडीवरील प्राचीन शिलालेखांतून मिळते.'B. Lewis Rice, Mysore: a Gazetteer Compiled for Government, Vol. I, 1897.

17. Colin Mackenzie, ‘Extracts from a Journal, dated Feb 24 1797’, AR, Vol. IX, 1809.

18. Colin Mackenzie, ‘The Ruins of Amravutty, Depauldina, and Durnacotta’, Asiatic Journal, May 1823.

19. Mackenzie Album (WD1061), India Office Library Prints and Drawings, British Library. See also Robert Knox, Amaravati Sculptures at the British Museum, 1994.

20. James Burgess ची Notes on the Amaravati Stupa, 1882 च्या पृष्ठभागावर छोटी टीपणी.

21. चक्रवर्तीची व्याख्या मांधाता-अवदान व सुदस्सन-सुत्तात दिली आहे. पहा--I. Armelin, Le Roi Detanteur de le Roue Solarie en Revolution (Cakaravartin) selon le Brahmanisme et selon le Boudddhisme, 1975. चक्रवर्ती राजाकडे सात रते असतात-- धर्मचक्र, राणी, प्रज्ञावंत सल्लागार, खजिनदार, हिरे-माणके, घोडा व रथ आणि हत्तीरत्न.

प्रकरण ६. हॉरेस हेमन विल्सनचा दीर्घ दुष्प्रभाव

1. Quoted in R. F. Young and G. P. V. Somaratna, Vain Debates: the Buddhist-Christian Controversies of Nineteenth-Century Ceylon, 1996.

2. Sir Alexander’s letter to the chairman of the Court of Directors of the EICo, dated 13 November, 1826, reproduced in Edward Upham, The Mahavansi, the Raja-Ratnacari and the Raja-vali, forming the Sacred and Historical books of Ceylon, 1833.

3. Remarks furnished by Captain j. J. Chapman of the R. E. upon the Ancient City of Anarajapura or Anaradhepura, and the hill Temple of Mehendale in Ceylon’, Transaction of the Royal Asiatic Society, Vol. III, 1834.

4. James Emerson Tennent, Ceylon: an Account of the Island, 1859. Tenner was Turnour's Resident in Ceylon and, by his account, one of the few members of the Ceylon Civil Service who appreciated the nature and immensity of the task he had undertaken.

5. Drawings of Sanchi by John Henry Bagnold, accession nos. 07.001-022, Royal Asiatic Society.

6. Andrew Stirling, An Account, Geographical, Statistical, and HIstorical, of Orissa Proper, or Cuttack, 1822. This was afterwards reprinted under the same title in AR, Vol XV, 1825.

7. A. K. Mitra, 'A Bell-Capital from Bhuvaneshwara', Indian Historical Quarterly, 5, 1929; and Nirmalkar Basu, 'Some Ancient Remains from Bhubaneswar', Journal of theBihar and Orissa Research Society, 15, 1929.

8. Harry Falk, 'Rajula-Mandagiri', Asokan Sites and Artefacts, 2006.

9. James Tod, 'Major Tod's Account of Greek, Parthian, and Hindu Medals, Found in India', Transactions of the Royal Asiatic Society, Vol. I, 1827.

10. James Tod, Travels in Western India, Embracing a Visit to the Sacred Mounts of the Jains, and the Most Celebrated Shrines of Hindu Faith between Radjpootana and the Indus, 1839.

11. James Tod, 'Major Tod's Account of Greek, Parthian, and Hindu Medals, Found in India', Transactions of the Royal Asiatic Society, Vol. I, 1827.

12. India Act of 1813 पास होण्याआधी William Wilberforce असे म्हटला. हाच सटरूहस्थ असेही म्हटला होता की त्याच्या मते भारताचे ख्रिस्ती धर्मात धर्मांतर हे "the greatest of all causes, for I really place it before Abolition [of slavery]" आहे.

13. Robert Montgomery Martin, The British Colonies: British Possessions in Asia, Vol. XI, 1854.

14. Despatch, 29 September 1830.

15. James Alexander, ‘Notice of a Visit to the Cavern Temples of Adjunta in the East-Indies’. Transactions of the Royal Asiatic Society, Vol. II, 1830.

16. याच्या पार्श्वभूमीसाठी पहा-- J. Princep, ‘Facsimiles of Ancient Inscriptions, lithographed by Jas. Prinsep’, JASB, Vol. V, 1836. यात राल्फच्या ग्रीस्लेबरोबरच्या अजंठाला दिलेल्या पहिल्या भेटीचे वर्णन आहे.

प्रकरण ७. प्रिन्सेपचा घाट

1. हा नावातील बदल विचित्र वाटत हो कारण ज्याने आधुनिक कलकत्त्याची स्थापना केली त्या जॉब चार्नोकने हे नाव कालिघाट ह्या खेड्यावरून घेतले होते. हे मौर्यकाळापासून नदीवरील बंदर होते आणि सातव्या शतकात ह्युएन-त्संग ह्या चिनी भिक्षुनेदेखील हेच नाव वापरले होते.

2. मृत्युलेख - ‘The Late James Princep [sic]’, The Friend of India, 30 July 1840.

3. James Prinsep’s Benares Illustrated (reprint 1996) मधे ओम प्रकाश केजरीवाल यांनी उद्धृत केलेल्या पत्रातून.

4. James Prinsep, ‘Note on the Occurrence of the Buddha Formula’, JASB, Vol. IV, 1835.

5. B. H. Hodgson in letter dated 11 August 1827 to Dr Nathaniel Wallich, quoted in Donald S. Lopez, Jr, ‘The Ambivalent Exegete’, essay in The Origins of Himalayan Studies: Brian Houghton Hodgson in Nepal and Darjeeling 1820-1858, ed. David Waterhouse, 2004.

6. B. H. Hodgson, ‘Sketch of Buddhism, derived from Bouddha scriptures of Nipal’, Transactions of the Royal Asiatic Society, Vol. II, 1830.

7. B. H. Hodgson, ‘Sketch of Buddhism, derived from Bouddha scriptures of Nipal’, Transactions of the Royal Asiatic Society, Vol. III, 1929.

8. B. H. Hodgson, ‘Notices on the Languages, Literature, and Religion of the Bauddhas of Nepal and Bhot’, AR, Vol. XVI, 1828.

9. H. H. Wilson, 'Description of Select Coins from Originals or Drawings in the Possession of the Asiatic Society', AR, Vol. XVII, 1832.

10. James Prinsep, 'Editor's Preface', JASB, Vol. I, 1832. See also Charles Allen, The Buddha and the Sahibs, 2002.

11. Dr. H. Falconer, quoted in H. T. Prinsep, 'Memoir of the Author', Essays on Indian Antiquities by James Prinsep, 1858.

12. Dr. J. G. Gerard, 'Memoir on the Topes and Antiquities of Afghanistan', JASB, Vol. III, 1834.

13. C.A. Court, 'Extracts Translated from a Memoir on a Map of Peshawar and the Country Comprised Between the Indus and the Hydaspes', JASB, Vol. V, 1836.

14. James Prinsep, 'Additions to Bacrrian Numismatics, and Discovery of the Bactrian Alphabet', JASB, Vol. VII, 1838.

15. James Prinsep, 'Note on Lieutenant Burnes' Collection of Ancient Coins', JASB, Vol. II, 183e. See also Harry Falk, 'The Art of Writing at the Time of the Pillar Edicts of Asoka', Berliner Indologische Studien, 7, 1993; Richard Salomon, 'On the Origin of the Early Indian Scripts', Journal of the American Oriental Society, 115, 1995; Richard N. Frye, 'The Aramaic Alphabet in the East', Journal of Inner Asian Art and Archaeology, 2006.

16. James Prinsep, 'Note on the Coins, found by Captain Cautley, at Behat, near Saharanpur', JASB, Vol. III, 1834.

17. James Prinsep, 'On connection of the various ancient Hindu coins with the Grecian or Indo-Scythic series', JASB, Vol. IV, 1835.

18. Alexander Cunningham, 'Four Reports made during the years 1862-63-64-65', ASI Report, Vol. I, 1871.

19. Ibid.

20. James Prinsep, 'Note on Inscription no. 1 on the Allahabad Column', JASB, Vol. III, 1834.

21. Lieutenant T. S. Burt, ‘A Description with Drawings of the Ancient Stone Pillar at Allahabad, Called Bhim Sen Gada or Club, with Accompanying Copies of Four Inscriptions Engraven Upon its Surface’, JASB, Vol. III, 1834.

22. B. H. Hodgson, ‘Notice of Some Ancient Inscriptions in the Characters of the Allahabad Column’, JASB Vol. III, 1834.

23. James Prinsep, ‘Note on the Mathia Lath Inscription’, JASB, Vol. III, 1834.

24. B. H. Hodgson, ‘Account of a Visit to the Ruins of Simroun, Once the Capital of the Mithila Province’, JASB Vol. III, 1834.

25. James Prinsep, ‘Further Particulars of the Sarun and Tirhut Laths, and Accounts of Two Buddha Inscriptions Found’, JASB, Vol. III, 1834.

26. James Prinsep, ‘Second Note on the Boils Inscription’, JASB, Vol. III, 1834. This incorporated Captain E. Fell’s ‘Description of an Ancient and Remarkable Monument, near Bhilsa’, originally published in the Calcutta Journal, 11 July 1819.

27. George Turnour, ‘Examination of Some Points of Buddhist Chronology’, JASB, Vol. V 1836.

28. ‘Minutes of the Committee of Pares on Mr. Turnour’s Proposed Publication of the Mahavamsi [sic]’, JASB, Vol. V 1836.

29. George Turnour, An Epitome of the history of Ceylon, Compiled from Native Annals: and the First Twenty Chapters of the Mahawanso, translated by the Hon. George Turnour, Esq., Ceylon, Civil Service, 1836.

अचूक भाषांतर हवे म्हणून टर्नोरचे भाषांतर न वापरता हे भाषांतर वापरले आहे — Wilhem Geiger, The Mahavamsa: the Great Chronicle of Lanka, translated into German and English and published in 1912. अन्यथा निर्देश केला नसेल तर इतरत्र मात्र टनोरिचे मूळ भाषांतर वापरले आहे.

31. George Turnour, An Epitome of the history of Ceylon, Compiled from Native Annals: and the First Twenty Chapters of the Mahawanso,

translated by the Hon. George Turnour, Esq., Ceylon, Civil Service, 1836. हा भाग गायगरच्या पांडुलिंपीत नाही.

32. Wilhem Geiger, The Mahavamsa: the Great Chronicle of Lanka, 1912.

33. Ibid.

34. Ibid.

35. George Turnour, An Epitome of the history of Ceylon, Compiled from Native Annals: and the First Twenty Chapters of the Mahawanso, translated by the Hon. George Turnour, Esq., Ceylon, Civil Service, 1836.

36. Wilhem Geiger. हा उतारा बावीसाव्या प्रकरणातील आहे. ट्नोरने केवळ वीस प्रकरणांचेच भाषांतर केले होते.

प्रकरण ८. राजा प्रियदर्शी उवाच

1. _ याच वर्षी फ्रांसमघधे Foe Koue Ki चे प्रकाशन झाले. फ्रांसच्या चीनच्या अम्यासकाचे-Jean-Pierre Abel-Remusat याचे हे कार्य होते त्याच्या मृत्युनंतर हे कार्य Juels von Klaproth व Jean-Pierre Landresse यांनी पूर्ण केले. पाचव्या शतकातील चीनी प्रवासी फाहेन याच्या भारतयात्रेच्या वर्णनाचे चीनबाहेर 1नबाहूर हे पहिले हिले भाषांतर होते.

2. सोसायटीच्या रेकॉर्डनुसार स्टुआर्टने १८१३मधे ओरिसातील भुवनेश्वर येथील लेख कोरलेल्या दोन शिळा दिल्या.

3. स्टुआर्टने पळवलेल्या उरलेल्या शिळा ख्रिस्टीने लिलाव केल्या व त्या आता ब्रिटीश म्युझियममधे आहेत.

4. मर्खम किट्टोच्या रिपोर्टसाठी पहा-- James Prinsep, ‘Examination of the Separate Edicts of the Aswastama Inscription at Dhauli in Cuttack’, JASB, Vol. VII, 1838.

5. मर्खम किट्टो ओडियांनी केलेल्या विरोधामुले काहीसा चिडला होता तर जोसेफ बेगलर इतका वैतागला की त्याने त्याच्या पुरातत्त्वसंशोधकाच्या रिपोर्टमधे अनेक पाने ओडियांच्या 'असहिष्णु व बदलाखोर वृत्तीवर' टीका करण्यात घालवली. J. D. M.

Beglar, 'Report of Tours in the South-Eastern Provinces in 1874-75 and 1875-76', ASI Report, Vol XIII, 1882.

6. 'द्रोणाचा मुलगा', पण येथे बहुधा याचा अर्थ खालचा डोंगरमाथा असावा.

7. James Prinsep, 'Note on the Facsimiles of Inscriptions from Sanchi near Bhilsa, taken by Captain Ed. Smith, and on the Drawings of the Buddhist Monument, presented by Captain W. Murray', JASB, Vol. VI, 1837.

8. James Prinsep, 'The legends of the Saurashtra Group of Coins Deciphered', JRAS, Vol. VI, 1837.

9. प्रिन्सेपने वापरलेला शब्द 'अभिसितेन' वरून (संस्कृत अभिषेकवरून) आला. राज्याभिषेकाची ही वैदिक पद्धत होती.

10. Romila Thapar, Asoka and the Decline of the Mauryas, 1973.

11S. Dhammika, The Edicts of King Asoka, 2009. हे भाषांवर अपुल्यचंद्र सेन, सी: डी. सरकार आणि डी. के. भांडारकर यांच्या आधीच्या माषांतरावर आधारीत आहे. पहा - http://www.accesstoinsight.org/lib/authors/dhammika/wheel386.html.

12. James Prinsep, ''Interpretation of the Most Ancient of the Inscriptions on the Pillar called the Lat of Firuz Shah, near Delhi, and of the Allahabad, Radhia and Mattia Pillar or Lat Inscriptions which agree herewith', JASB, Vol. VI, 1837.

13. George Turnour's letter quoted in James Prinsep, 'Further Elucidation of the Lat or Silasthambha Inscriptions from Various Sources', JASB, Vol. VI, 1837.

14. टर्नोरने नंतर परत लिहिले की 'इतरही अनेक ग्रंथ सापडले आहेत ज्यावरून पियदसो, पयदर्सा, पियदसिनो पयर्दासंनो वा पियदसी पयदर्सा हे घर्म-अ शकाचेच ॥ 1काचच त्याने भारतीय साम्राज्य हडप करण्याच्या आधी नाव होते. या सम्राटाचे पालि ग्रंथात बरेच संदर्भ सापडतात.' पहा--George Turnour, 'Further Notes on the Inscriptions on the Columns in Delhi, Allahabad, Betiah, etc', JASB, Vol. VI, 1837.

15. James Prinsep, ‘Facsimiles of Ancient Inscriptions’, JASB, Vol. VI, 1837.

16. James Prinsep, ‘Discovery of the Name of Antiochus the Great, in Two of the Edicts of Asoka King of India,’ JASB, Vol. VII, 1838. फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध झाले तरी हा शोध १८३७मधेच किट्टोने पाठवलेल्या धौली शिलालेखाच्या नकलेवरून लागला होता.

17. Markham Kittoe, ‘Mr Kittoe’s Journal of his Tour in the Province of Orissa’, JASB, Vol. VII, 1838.

18. James Prinsep, ‘Discovery of the Name of Antiochus the Great, in Two of the Edicts of Asoka King of India’, JASB, Vol. VII, 1838. फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध झाले तरी हा शोध १८३७मधघेच किट्टोने पाठवलेल्या धौली शिलालेखाच्या नकलेवरून लागला होता.

19. James Prinsep, ‘On the Edicts of Piyadasi, or Asoka, the Buddhist Monarch of India, Preserved on the Girnar Rock in the Gujarat Peninsula, and on the Dhauli Rock in Cuttack, with the Discovery of Ptolemy’s Name therein’, JASB, Vol. VII, 1838.

20. Ven. S. Dhammika, The Edicts of King Asoka, 2009.

21. Ibid.

22. Prinsep’s summary is quoted in Alexander Cunningham, Inscriptions of Asoka, 1877.

23. James Prinsep, ‘Discovery of the Name of Antiochus the Great, in Two of the Edicts of Asoka King of India’, JASB, Vol. VII, 1838.

24. Ven. S. Dhammika, The Edicts of King Asoka, 2009.

25. George Turnour, JASB, Vol. VII, 1838.

प्रकरण ९. ब्रायन हॉजसनचा उपहार

1. Undated letter from his biographer W. W. Hunter quoted in David Waterhouse, Ed. The Origins of Himalayan Studies: Brian Houghton

Hodgson in Nepal and Darjeeling 1820-1858, 2004.

2. B. H. Hodgson in a letter dated 1 November 1867 to W. W. Hunter quoted in David Waterhouse, Ed. The Origins of Himalayan Studies: Brian Houghton Hodgson in Nepal and Darjeeling 1820-1858, 2004.

3. अपवाद होता भारताच्या वायव्य सरहद्दीवर व त्यापलिकडे जेम्स प्रिन्सेपने शोध लावल्याप्रमाणे स्थानिक बॅक्ट्रीयन]यन भाषा जी बोलली व लिहिली जाते व जिला आज खरोष्ठी म्हणून ओळखतात.

4. John S. Strong: The Legend of King Ashoka: a Study and Translation of the Asokavadana, 1983.

5. V. P. Vasiliev, Introduction to the Russian translation of Taranatha’s History of Buddhism in India, 1869.

6. The Avadana-Kalpalata and Madadhai-pandita sadban-bzan-po, the last being the work fo a Pandit Ksemndrabhadra of Magadha.

7. Lama Chimpa and Alaka Chattopadhyaya, Tarantha’s History of Buddhism in India, 1970

8. इ. स. ३५० ते ६०० पर्यंत अराकन आणि बंगालच्या पूर्वेकडील प्रदेशातही एक चंद्र घराण्याचे राज्य होते. नंतरचे चंद्र बौद्ध होते आणि त्यांचे लंकेशी जवळचे संबंध होते. तारानाथने त्यांच्याबद्दल ऐकले असावे आणि त्यांना अशोकाचेच घराणे समजला असावा.

9. Foé Koué Ki, ou Relations des royaumes bouddhiques : voyage dans la Tartarie, dans l'Afghanistan et dans l'Inde, exécuté, à la fin du IVe siècle, par Chy Fa Hian, traduit du chinois et commenté par Abel Rémusat. Ouvrage Posthume. Revu, complété et augmenté d'éclaircissements nouveaux par MM. Klaproth et Landresse, 1836..

यानंतर अधिक परिपूर्ण भाषांतर दोन खंडात १८५७ व १८५८ मधे प्रकाशित झाले. Julien, Stanislas, (1857/1858). Mémoires sur les contrées occidentales.

प्रकरण १०. पश्चिमेच्या कथा

1. पूर्ण कथेसाठी पहा-- Sun Shuyun, Ten Thousand Miles Without a Cloud, 2004.

2. James Legge, A Record of Buddhistic Kingdoms; being an Account by the Chinese Monk Fa-Hien of his Travels in India and Ceylon (AD 399-414) in Search of the Buddhist Books of Discipline, 1886.

3. अशोकासंबंधी चीनमधील पूर्ण विवरणासाठी पहा-- Deeg, M., 'From the Iron-Wheel to Bodhisattvahood: Aśoka in Buddhist Culture and Memory', in Patrick Olivelle (ed.), Aśoka in History and Historic Memory (2009); ‘Mapping Common Territory— Mapping Other Territory’, Acta Orientalia Vilnensia, Vol. VIII, Issue I, 2007; and ‘Writing for the Emperor: Xuanzang between Peitry Religious Propaganda Intelligence, and Modern Imagination’, Indica et Tibetica, Vol. 52, 2009.

4. सजग वाचकाच्या लक्षात आले असेल की लेग्गे एकदा पश्चिमेत अशोकाची ओळख पटल्यावर वुयु वांग याऐवजी त्याला अशोक म्हणतो पण मी मात्र वुयुच म्हटले आहे कारण त्याने कथानकाला बाधा आली असती!

5. James Legge A Record of Buddhistic Kingdoms, being an account by the Chinese Monk Fa-Hien of his Travels in India and Ceylon (A.d. 399-414) in Search of the Buddhist Books of Discipline. 1886.

6. Max Deeg, 'From the Iron-Wheel to Bodhisattvahood: Aśoka in Buddhist Culture and Memory', in P. Olivelle (ed.) 2009.

7. Xuanzang, Datang Xiguo-ji, The Great Tang Dynasty Record of the Western Regions, trans, Li Rongxi, 1996.

8. येथे मूळ चीनी स्रोत वापरला आहे.

9. Examen critique de quelques pages de chinois relatives à l'Inde, traduites par M. G. ... rôle que les inflexions dans les autres langues, par M. Stanislas Julien, 1841.

10. Alexander Cunningham, ‘An Account of the Discovery of the Ruins of the Buddhist City of Samkassa — by Lieut. Alexander Cunningham of the Bengal Engineers, in a letter to Colonel Sykes, JRAS, Vol VII, 1843.

11. Alexander Cunningham, 'Proposed Archaeological Excavation', JASB, Vol XVII, 1848.

12. Markham Kittoe, 'Note on the Inscription found near Bhabra', JRAS, Vol. IX, 1840.

13. M. E. Burnouf, Le Lotus de la Bonne Loi, 1852.

14. पुढे ह्याचे प्रकाशन झाले -- The Pilgrimage of Fa Hian, 1848.

15. Markham Kittoe in a letter to Cunningham quoted in The Bhilsa Topes, 1853.

प्रकरण ११. अलेक्झांडर कनिंगहेम द ग्रेट

1. Edwin Norris, 'On the Kapur-di-Giri Rock Inscription', JRAS, Vol. VIII, 1846, and Charles Masson, 'Narrative of an Excursion from Peshawar to Shah-baz-Ghari', JRAS, Vol. VIII, 1846.

2. Ibid.

3. Edwin Norris, 'On the Kapur-di-Giri Rock Inscription', JRAS, Vol. VIII, 1846.

4. Lumsden and the Crops of Guides च्या कथेसाठी पहा— Charles Allen, Soldier Sahibs: the Men who Made the North West Frontier; 2001.

5. Alexander Cunningham, Inscriptions of Ashoka, 1877.

6. Hindustani Fanatics च्या कथेसाठी पहा— Charles Allen, God's Terrorists: the Wahhabi Cult and the Roots of Modern Jihad, 2004.

7. James Aboott, 'Gradus ad Aornon', JRAS, Vol. XIX, 1856.

8. १९०५ मधे एबोट्टचे म्हणणे ऑरेल स्टेनने (स्वतः टोळीच्या देखरेखीखाली घाईघाईत का होईना पण स्वतः महाबनचे पुरातत्त्व संशोधनाच्या दृष्टीने बघणारा पिहला युरिपयन झाल्यावर) खोडून काढले. स्टेनच्या मते खरा एओनर्स अजून उत्तरेला होता. Stein, Report of archaeological survey work in the North-West Frontier

Province and Baluchistan for the period from January 2nd, 1904, to March 31st, 1905, 1905.

9. Abbott and Bellew च्या कथेसाठी पहा— Charles Allen, Soldier Sahibs: the Men who Made the North West Frontier; 2001.

10. Dr Henry Bellew, A General Report on the Yusufzais, 1864.

11. Alexander Cunningham, The Bhilsa Topes, 1854.

12. John Marshall चे भाषांतर असे— 'Ananda, son of Vasithi, foreman of the artisans of Raja Siri Satkarni', John Marshall, A Guide to Sanchi, 1918.

13. Alexander Cunningham, The Bhilsa Topes, 1854.

14. James Mill, History of British India, 1818.

प्रकरण १२. ऐन भरातील सर अलेक्झांडर

1. Thomas Watters, On Yuan Chwang's Travels in India AD 629-645, 1904.

2. Alexander Cunningham, 'A-yu-to, or Ayodhya', ASI Report, Vol I, 1871. See also Harry Falk, Asokan Sites and Artefacts, 2006.

3. Alexander Cunningham, 'Four Reports made during the years 1862-63-64-65', ASI Report, Vol. I, 1871.

4. Alexander Cunningham, Mahabodhi or the Great Buddhist Temple under the Bodhi Tree at Buddha-gaya, 1892.

5. Xuanzang quoted in Thomas Watters, On Yuan Chwang's Travels in India AD 629-645, 1904.

6. Alexander Cunningham, 'Four Reports made during the years 1862-63-64-65', ASI Report, Vol. I, 1871.

7. शाक्यमुनीच्या आईच्या स्वप्नात पांढर्या हत्तीने तिच्या कुशीत प्रवेश केला होता. तो चक्रवर्ती सम्राट होता असा समज आहे—बौद्ध मानतात की सिद्धार्थ बुद्ध झाला

नसता तर चक्रवतीर् सम्राट झाला असता. अशोकाने स्वतःला चक्रवतीर् सम्राट मानत असावा.

8. Ven. S. Dhammika, The Edicts of King Asoka, 2009.

9. Ibid.

10. मुकजीर् व धिम्मक यांचे भाषांतर देत नाहीत त्यामुळे आधीच्या भाषांतराचा आधार घेतला आहे— Prof Eugen Hultzch, Inscriptions of Asoka, 1925.

11. दयाराम सहानींनी पुढे १९३५-६ ला बैराट येथे उत्खनन के ले तेव्हा त्यांना अजून दोन अशोकस्तंभांचे तुकडे सापडले.

12. Alexander Cunningham, Inscriptions of Ashoka, 1877.

13. Alexander Cunningham, The Stupa of Bharhut: a Buddhist Monument Ornamented with Numerous Sculptures Illustrative of Buddhist Legend and History of the Thrid Century, BC, 1879.

14. Alexander Cunningham, The Stupa of Bharhut, 1879.

प्रकरण १३. भारतीय िशलालेखांचा ठेवा

1. Markham Kittoe quoted in James Prinsep, 'Further Elucidation of the Lat or Silasthambha Inscriptions from Various Sources', JASB, Vol. VI, 1837.

2. W. F. Grahame, 'Rock Inscriptions in Ganjam District', Indian Antiquary, Vo. I, 1872.

3. Ven. S. Dhammika, The Edicts of King Asoka, 2009.

4. Benudhar Patra, 'Jaugadha: an Early Historical Fort Town of Orissa', Orissa Review, Jan 2007.

5. Ramkrishna Gopal Bhandarkar, 'Note on the Ganjam Rock Inscription', IA, Vol I, 1872.

6. The Stupa of Bharhut, च्या प्रस्तावनेत कनिंगर्हमची 58 वरील जळजळीत टीका वाचायला मिळते.

7. Bhau Daji, ‘Rudraman inscription’, JBBRAS, Vol. VII, 1863.

8. Epigraphica Indika, Vol. II, 1881.

9. Bhagwanlal Indraji, ‘Antiquarian remains at Sopara and Padana’, JBBRAS, Vol XV, 1882.

10. James Burgess, Notes on a Visit to Gujarat, 1870.

11. Archibald Carllyle, ‘Discovery of a new Edict Pillar o Asoka at Rampurwaparsa in the Tarai, 32.5 miles to North of Betiya’, ASI Report, Vol. XXII, 1885.

12. See J. Cook and H. E. Martingell, ‘The Carllyle Collection of Stone Age Artefacts from Central India’, British Museum Occasional paper 95, 1994.

13. Alexander Cunningham, Inscriptions of Ashoka, 1877.

हा कालक्रम Alexander Cunningham, Inscriptions of Ashoka, 1877. वरून घेतला आहे.

15. J. H. C. Kern, ‘On the Era of Buddha and the Asoka Inscriptions’ Indian Antiquary, 1874, and Concerning the Chronology of the Southern Buddhist, 1876.

16. Alexander Cunningham, Inscriptions of Ashoka, 1877.

17. Rajendra Lal Mitra, letter to the Secretary to the Government of Bengal dated 31 October 1877, OIOC, BL, quoted in Upinder Singh, The Discovery of Ancient India, 2004.

प्रकरण १४. कनिंगहॅमच्या पश्चात भारत

1. James Burgess, Notes on the Amaravati Stupa, 1882.

2. R. Shama Shastry trans., Kautilya’s Arthashastra, 1915, quoted in R.K. Mookerji in his ‘Appendix I. Chankaya and Chandragupta Traditions (from Buddhist Sources)’. Chandragupta Maurya and his Times, 1943.

3. Jawaharlal Nehru, Discovery of India, 1946.

4. कॉवेलची आज मुख्य ओळख ही आहे की त्याला बंगालच्या 'एकशियाटीक सोसायटीच्या ग्रंथालयात ओमार खय्याम ह्या पर्शियन गणिती, खगोलशास्त्रज्ञ आणि कवी ह्याची रूबायत (चारोळ्यांचा संग्रह) सापडला. त्याने तो भाषांतर करून कलकत्ता रिव्ह्यूमधे प्रकाशिक केला आणि त्याचा शिष्य एडवर्ड फिट्झजेराल्ड याला पाठवला.

5. Harry Falk, Asokan Sites and Artefacts, 2006.

6. Charles Allen, The Buddha and Dr Fuhrer: an Archaeological Scandal, 2008.

7. Harry Falk, Asokan Sites and Artefacts, 2006.

8. नेपाल सीमेच्या जवळ बस्ती जिल्ह्यात अशोकस्तंभाच्या शीर्षाचा तुकडे १९५५ मधे सापडले. हे बहुधा धर्मसिंह किंवा पाल्ता देवी येथून आले असावेत. पाल्ता देवीच्या मंदिरात एका मोठ्या स्तंभाची शिवलिंग म्हणून पूजा केली जाते. नेपाळच्या बाजूला तौलिहवा गावात अशोकस्तंभाचा एक तुकडा शिवलिंग म्हणून शिवमंदिरात उभारला गेला असावा. पहा— Harry Falk, Asokan Sites and Artefacts, 2006.

9. R. Mukerji, S. K. Maitry, ‘A Fortunate Find of 1931’, Corpus of Bengal Inscriptions, 1967.

10. वॉडेलच्या जीवनाबद्दल अधिक माहितीसाठी पहा--Charles Allen, The Buddha and the Sahibs, 2002; Duel in the Snows: the True Story fo the Young husband Mission to Lhasa, 2004 Charles Allen, The Buddha and Dr Fuhrer..

11. मुकर्जीच्या कथेसाठी पहा--Charles Allen, The Buddha and Dr Fuhrer: an Archaeological Scandal, 2008.

12. Dr. L. A. Waddell, Report on the Excavations at Pataliputra (Patna), the Palibothra of the Greeks, 1903.

13. See Mary Stewart, ‘The Persepolitan Legacy in India’, Circle of Ancient Iranian Studies website, 1998.

14. Letter from G. Buhler to P. C. Peppe dated 21 February 1898, Peppe Collection, RAS.

15. Quoted in Charles Allen, The Buddha and Dr Fuhrer: an Archaeological Scandal, 2008.

प्रकरण १५. विसाव्या शतकातील अशोक

1. Sir John Marshall, ‘The Story of the Archaeological Department in India’, Revealing India’s Past, 1939.

2. A. Foucher,1905-1951 : L'art gréco-bouddhique du Gandhara: étude sur les origines de l'influence classique dans l'art bouddhique de l'Inde et de l'Extrême- Orient. Vol I 1905, Vol II 1922, Vol. III 1951.

3. John Marshall in an unpublished letter to a friend dated Sanchi, 28 December, 1918. Courtney of John Wilson of John Wilson Manuscripts Cheltenham.

4. A. Foucher, La Porte Oreintale du Stupa de Sanchi, 1910.

5. Sir John Marshall, A Guide to Sanchi, 1918.

6. Radhakumud Mookerji, Asoka, 1927.

7. Harry Falk, ‘The Preamble at Panguraria’, P. Kieffer-Pulz and J. Hartmann, eds., Bauddhavidyasudhakarah, 1997. Professor Falk’s remarks in Asokan Sites and Artefacts.

8. From the Sahasram MRE, as translated by Eugen Hultsch, Inscriptions of Asoka, 1925.

9. Ibid.

10. Harry Falk, Asokan Sites and Artefacts, 2006 मधे हा युक्तिवाद केला गेला आहे.

11. D. C. Sirkar, ‘Minor Rock and Pillar Edicts at Kandahar and Amarvati’, Ashokan Studies, 1979. सन १९५९ मधे अमरावतीच्या एका घरात एक घुण्याचा (सँडस्टोन) दगड दिसून आला. त्याच्यावर काही ब्राह्मी अक्षर अस्पष्ट दिसत होते व हेही दिसत होते की त्याला चौकोनी बनविण्यासाठी कापण्यात आले होते. त्यावर

अशोकस्तंभावर असते तशी विशिष्ट झळाळी दिसत होती. त्यावर दिसणारे शब्द परत्र व अभिसित गिरनारच्या लेखांतील शब्दांसारखेच होते.

12. पभोस ही अशोककालीन खाण होती की नाही ह्याबद्दल माहितीसाठी पहा-- Harry Falk, Asokan Sites and Artefacts, 2006.

13. अशीही शक्यता आहे की हे तक्षशिलेत नाही तर श्रीलंकेत सुरू झाले. Coningham, R.A.E., Allchin, F.R., Batt, C.M., and Lucy, D. 1996. Passage to India? Anuradhapura and the Early Use of the Brahmi Script. Cambridge Archaeological Journal Vol VI, 1996.

14. Gita Mehta, 'In the Footsteps of the Buddha', Tricycle: the Buddhist Review, Winter 1998.

15. Romila Thapar, 'Propaganda as History Won't Sell', Hindustan Times, 9 December 2001..

16. P. K. Mishra, 'Deorkother: A Milestone of History', Govt of India Press Release, 4 February 2003. See also Mishra, 'Excavations at the Buddhist Site of Deorkother (Barhat) District Rewa, Madhya Pradesh, India 1999-2001', CIAA Newsletter, Issue 13, June 2001.

17. B. N. MUkherjee, 'A Fregmentary Inscription Referring to Asoka', in Journal of the Epigraphical Society of India. forthcoming. दुर्देवाने ह्या दोन शिल्पांचे व त्यांवरील लेखांचे सुस्पष्ट छायाचित्रे अजून प्रकाशित करण्यात आलेली नाही.

प्रकरण १६. अशोक धर्माचा उदय आणिं अस्त

1. महावंसमधे असे वर्णन आहे की चाणक्य तक्षशिलेचा होता आणि चंद्रगुप्ताने अनेक वर्षे तेथे त्याचा शिष्य म्हणून काढली. महावंसचा काळ बराच नंतरचा असला तरी ह्या संदर्भात त्यावर संशय घेण्यास जागा नाही.

2. पाणिणीचा काळ आधीचा समजला जातो तरी त्याच्या अष्टाध्यायीमधे तो यवनानी (ग्रीक लिपी) हा ९ब्द वापरतो. त्यामुळे पाणिणी चौथ्या शतकातील असावा. तो राजा अम्भीचा उल्लेख करतो (अम्भीचा राज्यकाल सिकंदराच्या आधी व नंतरचा आहे) त्यावरूनही तोच काळ योग्य वाटतो. फारसे विश्वसनीय नसलेले मंजुश्री-मूल-तंत्र पाणिणीला नंदाबरोबर जोडते--राजा वीरसेन ७० वर्ष राज्य करेल आणि त्यानंतर नंद राजा

येईल. तो ५६ वर्ष राज्य करेल आणि त्याचा मित्र ब्राह्मण पाणिणी असेल. त्यानंतर चंद्रगुप्त येईल...

3. गुप्त शब्दाचा अर्थ सांभाळणे वा रक्षण करणे असा होतो. ते एक वैश्य घराणेही आहे. नंतर आलेले गुप्त राजघराणेही वैश्यच असावे. यावरून असे दिसते की जस्टीनसने म्हटल्याप्रमाणे चंद्रगुपताचा जन्म खालच्या जातीत झाला.

4. Parisishtaparvan of Hemchandra, trans. P. L. Bhargava.

5. W. W. Tarn, The Greeks of Bactria and India, 1938.

6. वीस वर्षात अगदी थोडे साडून सर्व मृत्यु पावले होते त्यामुळे इ. पू. २८९ च्या वारसांच्या युद्धात त्यांनी काही विशेष भूमिका बजावली नाही. ह्या मौर्यांच्या युद्ध-हत्तींपैकी शेवटचे इ. पू २७९ ला सिकंदराचा चुलत-भाऊ पायऱ्हस याने रोमनांच्या विरूद्ध वापरले.

7. Strabo in Ancient India as Described in Classical Literature, trans. J. W. McCrindle, 1901.

8. हे दिगंबर होते ज्यांनी श्वेतांबरापासून वेगळे होऊन स्वतःचा पंथ स्थापन केला होता.

9. Taranath, History of Buddhism in India, trans. Lama Chimpa, Alaka Chattopadhyaya, 1970.

10. आजीविक पंथाचा संस्थापक गोशाल होता. त्याच्या मते सर्वकाही पूर्वनिश्चित असते त्यामुळे आपण काहीही करू शकत नाही (अकर्मण्यतावाद). पण आपल्याला ह्या पंथाबद्दल जी काही थोडीशी माहिती आहे ती जैन व बौद्ध ग्रंथातून मिळते आणि हे दोन्ही त्याचे विरोधक असल्याने ह्या स्त्रोतांना विश्वसनीय समजता येणार नाही.

11. See Appendix in John S. Strong, The Legend of King Asoka, 1983.

12. अलाहाबाद स्तंभावरील अशोकाच्या लेखाबरोबर असलेल्या राणीच्या लेखाप्रमाणे कारूवकी दुसरी राणी व तिवरची आई होती. महावंस अशोकाच्या पट्टराणीचे नाव असंधिमित्ता असे देतो--हिचा राज्याभिषेकाच्या तेराव्या वर्षी मृत्यु झाला. अशोकावदानात पबद्मावतीचे नाव येते--ही धर्मविवर्धन (कुणाल) याची आई.महावंस, अशोकावदान व तारानाथचा इतिहास यात कधी नव्हे ती याबाबतीत मात्र एकमत आहे की अशोकाची शेवटची राणी तिष्यरक्षिता (तिस्सरक्खिता) होती. अशोकाच्या शिलालेखात चार राजपुत्रांचा उल्लेख आहे (ते चार दिशांना उपराजे म्हणून काम करतात) पण त्यांचे नाव दिलेले नाही. तारानाथ म्हणतो की अशोकाला अकरा मुले होती व त्यातील कुणाल

सर्वोत्तम होता तसेच अशोकानंतर वीरसेन गादीवर बसला. अशोकावदान कुणालाचा मुलगा संपदी गादीवर बसला असे सांगते कारण कुणाल आंधळा झाला होता. फाहेन सांगतो की धर्मविवर्धन हा अशोकाचा मुलगा तक्षशिलेवर राज्य करत होता. कल्हाणाचा इतिहास सांगतो की काश्मीरवर अशोकानंतर त्याचा मुलगा जलुकाने राज्य केले. त्याची एक मुलगी चारूमती हिचा विवाह नेपाळच्या क्षत्रिय देवपालशी झाला व त्यांचे (आजच्या पाटण येथील) विहारांवर अधिपत्य होते. केवळ महावंस अशोकाच्या दोन थोरल्या मुलामुलींचा (महिंद व संघमित्ता) उल्लेख करतो.

13. अकबराने पाच दशके अनेक युद्ध मोहिमा राबवल्या पण त्याला भारताचे दक्षिण टोक कधीही जिंकता आले नाही. सन १८५७ ते १९४७ या नव्वद वर्षांच्या ब्रिटीश साम्राज्यातसुद्धा दोन पंचमांश भारताचा ताबा शेकडो राजे-महाराजे-नवाब यांचेकडे होता.

14. RE 10 as rendered in Ven. S. Dhammika, The Edicts of King Asoka, 2009.

15. Ven. S. Dhammika, The Edicts of King Asoka, 2009.

16. John. S. Strong, The Legend of King Asoka, 1983.

17. ह्याबाबत एक “ध चा मा” सारखी कथाही सांगितली जाते. कुणालाला तक्षशिलेला अध्ययनासाठी पाठवले होते आणि सम्राटाच्या ब्राह्मी लिपीतील संदेशात अध्य वर अनुस्वार देऊन त्याचा अंध्य केला होता.

18. हे अत्यंत दुर्देवी आहे की एकही मौर्यकालीन सोन्याची वस्तू आजवर मिळालेली नाही.

19. Li Rongxi trans. The Great Tang Dynasty Record of the Western Regions, 1996.